कुणास्तव कुणीतरी...



यशोदा पाडगावकर

SHOUT
SHARE
IT

राजहंसच्या निवडक कादंबऱ्या

पांगिरा
विश्वास पाटील

महानायक
विश्वास पाटील

ब्र
कविता महाजन

नातिचरामि
मेघना पेठे

बाकी शून्य
कमलेश वालावलकर

मुखवटा
अरुण साधू

मन्वंतर
दिनानाथ मनोहर

विदेश
आशा कर्दळे

रेघोट्या
प्रतिभा रानडे

NO LONGER PROPERTY OF
THE QUEENS LIBRARY.
SALE OF THIS ITEM
SUPPORTED THE LIBRARY

कुणास्तव कुणीतरी...

यशोदा पाडगावकर

राजहंस प्रकाशन

कुणास्तव कुणीतरी...
यशोदा पाडगावकर

प्रकाशक
दिलीप माजगावकर
राजहंस प्रकाशन
१०२५, सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०
फोन - (०२०) २४४७३४५९
E-mail : rajhans1@pn2.vsnl.net.in

मुद्रक
रोहन एंटरप्रायझेस
१६/२, 'स्वोजस'
सहवास सोसायटी
कर्वेनगर
पुणे - ४११ ०५२

Kunastav Kunitari...
Yashoda Padgaonkar

© यशोदा पाडगावकर

अक्षरजुळणी
रेखा ढोले
प्रिंट लिंक
७६९/५, शिवाजीनगर
पुणे ४११ ००४

मुखपृष्ठ : चंद्रमोहन कुलकर्णी

पहिली आवृत्ती : ११ जून २०००
दुसरी आवृत्ती : डिसेंबर २००५

ISBN 81-7434-183-8

किंमत : २०० रुपये

मनोगत

१९८४च्या ऑक्टोबर महिन्यात माझा 'किर्लोस्कर' मासिकात 'लेखक आमच्या घरात' या लेखमालेत लेख प्रसिद्ध झाला होता.

तसेच १० जून १९९०च्या 'लोकप्रभा'च्या अंकात रत्नप्रभा जोशी यांनी घेतलेली माझी मुलाखत छापली होती. विषय होता 'साहित्यिकांच्या सहवासात.'

त्याआधी सुहासिनी मुळगावकर यांनी 'कविकान्ता' हा मुलाखतीचा कार्यक्रम दूरदर्शनवर आयोजित केला होता. त्यात कृष्णाबाई सुर्वे, हिरा पवार व मी अशा आम्ही तीन कविपत्नी होतो आणि मुलाखत घेतली होती, वासंती मुझुमदार या कवयित्रीने.

तोच मुलाखतीचा कार्यक्रम शिवाजी पार्कच्या 'वनिता समाज'मध्येही झाला होता. मंगला खाडिलकर यांनी 'चतुरंग'साठी मुलाखत घेतली होती. तसेच आकाशवाणीवर माझी एक मुलाखत घेतली गेली होती.

त्यानंतर मात्र मला अशा मुलाखती देण्यात स्वारस्य वाटेनासे झाले. कारण दिलेल्या मोजक्या वेळात एवढ्या दीर्घ आयुष्याबद्दल पुन्हा पुन्हा तेच सांगत बसायचे हे मला रुचेनासे झाले. आत्मचरित्र लिहावेसे वाटायला लागण्याचे हे पहिले निमित्त.

असेच एकदा श्रीनिवास विनायक कुलकर्णी आमच्या घरी आले असताना मंगेश पाडगावकर यांचे चरित्र लिहावे का, अशी चर्चा निघाली. तेव्हा श्रीनिवास यांनी व मी असे दोघांनी मिळून ते लिहावे अशी एक सूचना गमतीने पुढे आली. त्यानंतर श्रीनिवास भेटले की पाडगावकर त्यांचा 'अर्धचरित्रकार' किंवा 'एकद्वितीयांश चरित्रकार' असा हसून उल्लेख करू लागले. नंतर मी एकदा म्हणाले, "थांबा, आता मीच माझं चरित्र लिहिते म्हणजे त्यात आपोआपच पाडगावकरांचं चरित्र येईल"–आणि हा विचार माझ्या मनात बळावत चालला.

शिकत असताना इंटरनंतर पाडगावकर मुंबईत आणि मी पुण्याला असे झाल्यामुळे पत्रव्यवहारातूनच आम्ही एकमेकांची ओळख वाढवत राहिलो. तो पत्रसंग्रह मी आजपर्यंत जतन करून ठेवल्यामुळे या माझ्या आत्मचरित्राला प्रेरक ठरला आणि त्यात प्राणही भरू शकला.

लेखक, कवी, नट, शास्त्रज्ञ अशा प्रसिद्ध व्यक्तींबद्दल समाजाच्या मनात विशेष कुतूहल असते–त्याच्या जीवनात डोकावून पाहावे अशी इच्छा असते. अशा वेळी, काही सांगोवांगीच्या गोष्टी, कोठे प्रसिद्ध झालेला जीवनातला एखादा तुकडा पुढे

येतो. त्यांतून असंबद्ध, वेगळे, कधी विपरीत असेही त्या प्रसिद्ध व्यक्तीचे चित्र निर्माण होऊ शकते. यथार्थतेच्या जवळ जाणारे चित्रण त्या प्रसिद्ध व्यक्तीच्या निकटचीच व्यक्ती करू शकते. तसे काही आपल्याला करता येते का हे पाहण्याचा प्रयत्न मी इथे करून पाहिला आहे. पण हेच या लेखनाचे सर्वस्वी उद्दिष्ट आहे असे नाही. माझ्या वाट्याला आलेल्या जीवनानुभवाचे स्वरूप काय, त्याचा अर्थ काय, त्याचा अन्वय काय हे शोधून पाहावे म्हणून मी माझ्या आयुष्याचे केलेले हे अवलोकन आहे. म्हणूनच मी घेतलेला अनुभव आहे त्या रूपातच मांडला आहे.

१९८७मध्ये माझा भाऊ हरीश व उषावहिनी यांच्या घरी दिल्लीला राहायला गेले असताना मी या लेखनाला सुरुवात केली. त्यानंतर काही भाग सायनला पुरुषोत्तम नाईक यांच्या घरी बसून लिहिला. माझी नणंद प्रभा व शंकर परुळकर यांच्याकडे अमेरिकेत डॅनबरी इथे चार महिने राहिले असताना जीवनातला बराच महत्त्वाचा भाग लिहून पूर्ण झाला. तसेच अमेरिकेत फिनिक्स इथे माझा धाकटा मुलगा अभय याच्याकडे काही लेखन झाले.

अंजली, दिलीप यांची मुलगी रैना ही माझी लाडकी एकुलती नात. ती मंगळूर इथे फिजिओथेरपीच्या शिक्षणासाठी स्वतंत्र ब्लॉकमध्ये राहत होती. तिच्याकडे महिना महिना मी दोन वेळा जाऊन राहिले असताना हे लेखन पूर्ण केले. म्हणजे हे लेखन जवळजवळ एक तपभर होत राहिले.

हे लेखन जुळत पूर्ण होत असताना या लेखनाचा सगळा अनुभव चपखलपणे पकडणारे एखादे शीर्षक सुचतेय का, याची मी मनातल्या मनात वाट पाहत होते. आणि खरेच एक दिवस, रेव्हरंड नारायण वामन टिळक यांच्या कवितेतली 'कुणास्तव कुणीतरी सभय वाट पाहे घरीं' ही ओळ तरळत, बघता बघता मनात उतरली आणि माझ्या लगेचच लक्षात आले की, 'कुणास्तव कुणीतरी' हेच आहे मी वाट पाहत असलेल्या शीर्षकाचे नाव.

श्रीनिवास विनायक कुलकर्णी आणि वासंती मुझुमदार हे दोघे सतत कितीतरी वर्षे माझ्या आत्मचरित्रपर लेखनाविषयी विचारणा करत होते. लिहिता की नाही? कुठपर्यंत आलं? झालं की नाही? त्यातलं एखादं प्रकरण छापू या का? अशा अनेक प्रश्नांनी ते मला भंडावून सोडत. पण त्या प्रश्नांनी मला लिहायला खूप हुरूपही मिळे. हे लेखन व्हावे म्हणून त्यांचे हरतऱ्हेचे साहाय्य झाले.

लेखन करण्यासाठी जी आत्मशक्ती हवी असते ती मला मिळाली समृद्ध, प्रतिभावंत व्यक्तींच्या शब्दांतून. त्या शब्दांचा मला सतत आधार मिळत राहिला. त्या संदर्भातला एक उल्लेख इथं केल्याशिवाय राहवत नाही. रसिक साक्षेपी संपादक श्री० पु० भागवत यांनी, ते अमेरिकेत असताना हटिंग्टनहून मला लिहिलेल्या २१.११.८५ च्या पत्रोत्तरात म्हटलं आहे : "...तुम्ही गद्य चांगले लिहिता : साधे, स्वच्छ व डौल असलेले. तुमच्या लेखनाबद्दलचे माझे हे जुने मत मला पुन्हा आठवले."...

ह्या लेखनाची अंतिम संहिता पुरुषोत्तम नाईक आणि त्यांची पत्नी व माझी मैत्रीण मंदाकिनी यांच्या घरी पूर्ण झाली. त्या दोघांप्रमाणे त्यांच्या दोन मुलांच्या व दोन सुनांच्या आमच्याविषयीच्या अगत्याच्या भावनेमुळे अतिशय स्वास्थ्य मिळाले. या पुस्तकाच्या निमित्ताने घडलेले त्यांच्याकडचे निर्वेध, उत्साहवर्धक आणि आनंददायक वास्तव्य माझ्या नेहमीच स्मरणात राहील.

'लोकप्रभा' (१० जून १९९०) साप्ताहिकातली 'साहित्यिकांच्या सहवासात' ही माझी मुलाखत वाचून दिलीप माजगावकर यांच्यासारख्या नामवंत प्रकाशकाने आवर्जून मला पत्र लिहिले–मी आत्मचरित्र लिहावे असे सुचवले–त्याविषयी पुन्हा उत्सुकता दाखवली आणि अतिशय अगत्याने माझे हे पुस्तक देखण्या स्वरूपात प्रसिद्ध केले.

दिलीप माजगावकर यांचे आभार कोणत्या शब्दांत मानावेत?

विख्यात चित्रकार चंद्रमोहन कुलकर्णी यांनी पुस्तकाचा आशय अधिक अर्थपूर्ण करणारे मनोज्ञ मुखपृष्ठ काढून दिले.

आणि सर्वांत आधी उल्लेख करायला हवा तो मंगेश पाडगावकर यांचा. तेच या पुस्तकाचे मूलाधार. ते माझ्या जीवनात आल्यामुळे मौलिक आणि अनन्य जीवनानुभव मला मिळाला.

यशोदा पाडगावकर

साईप्रसाद, प्लॉट १२५अ
शीव (पश्चिम)
मुंबई ४०००२२

Digitized by the Internet Archive
in 2022 with funding from
Kahle/Austin Foundation

https://archive.org/details/kunastavakunitar0000pada

कुणास्तव कुणीतरी...

यशोदा पाडगावकर

यशोदा

वडील : भास्कर्राव कृष्णराव उजगरे

आई : सोनूबाई भास्कर्राव उजगरे

मावशी : डॉ॰ चंपूताई केळकर, एम॰बी॰बी॰एस॰

भावंडे : येरवडा (डावीकडून) यशोदा, विजयानंद, सरला

वाडिया कॉलेजातील मैत्रिणी : (डावीकडून)
यशोदा, मंदाकिनी पाटोळे, प्रभा लाटकर



श्वशुर : केशवराव पाडगावकर, सासूबाई : सौ॰ इंदिराबाई



म्हातारी आजी
मंगेशच्या आईची आई–कृष्णाबाई

विवाह : मंगेश-यशोदा



विहिणी : (डावीकडून) सौ॰ इंदिराबाई पाडगावकर, श्री॰ सोनूबाई उजगरे



यशोदा आणि मंगेश मुलांसमवेत : अजित, अभय, अंजू

व्याही : डॉ॰ रवीन्द्र कुळकर्णी
विहीणबाई : सौ॰ गुलाब कुळकर्णी

यशोदा, हरिश्चंद्र, उषावहिनी



मंगेश आणि नरेश मंत्री



कविवर्य बा॰ भ॰ बोरकर यांच्यासमवेत : यशोदा आणि मंगेश

विंदा करंदीकर आणि मंगेश

डावीकडून : श्री॰ पु॰ भागवत, विंदा करंदीकर, डॉ॰ वि॰ भि॰ कोलते, मंगेश, वसंत बापट



मंगेश : श्री॰ पु॰ भागवत यांच्यासमवेत

कविवर्य कुसुमाग्रज आणि मंगेश



यशोदा, सचिन तेंडुलकर, मंगेश



वसंत बापट आणि मंगेश

यशोदा , मंदाकिनी आणि पुरुषोत्तम नाईक

यशोदा, मंगेश

परिवार : बसलेले (डावीकडून) कमल, मंगेश, यशोदा, मीनल
उभे (डावीकडून) तनय, अजित, रैना, दिलीप, अंजू, अभय, पार्थ, रूपक

लहानशी टेकडी होती. गाडीरस्त्यानं वर चढून गेलं की, मिशनची जागा दिसायची. उजव्या बाजूला शाळेचे शिक्षक व इतर कर्मचारी यांची घरं होती. मधे शाळा व चर्च. तिथून पुढं गेलं, की आमच्या बंगल्याची मागची बाजू दिसायची. एक बैलगाडी, पाणी आणण्यासाठी. मोठं पिंप. बाजूला गोठा. त्यात गाय व तिची वासरं. बंगल्यात पुढच्या बाजूनं गेलं की मोठा व्हरांडा लागायचा. आत बैठकीची खोली होती. तिथं खुर्च्या, सोफासेट, जेवणाचं टेबल असायचं. बाजूला मोठी झोपायची खोली, बैठकीच्या खोलीतून पुढं गेलं की स्वयंपाकघर, तिथं मातीच्या चुली आणि त्यांना लाकडाचं सरपण. बाजूला न्हाणीघर व कोठीघर. तिथं धान्य व इतर वस्तू साठवलेल्या असत.

घराच्या आजूबाजूला रान होतं. गवत खूप वाढलेलं असायचं. उन्हाळ्यात ते सुकून जायचं. पुढच्या दारातून पुढं चालत गेलं, की काही अंतरावर दोन बांधलेल्या कबरी दिसायच्या. त्यांतली एक, पूर्वीच्या कोणा गोऱ्या मिशनरी साहेबाची होती आणि दुसरी त्यांच्या पत्नीची, असं सर्व जण सांगत. तेव्हा मला इंग्लिश वाचता येत नव्हतं. मी पाच वर्षांची व माझी बहीण सरला तीन वर्षांची. आम्ही दोघी त्या कबरींवर जाऊन बसत होतो–खेळत होतो. भोवती मोठ्या मोठ्या गारगोट्या पडलेल्या असायच्या. त्या दोन हातांत दोन घेऊन एकमेकींवर आपटल्या की आग दिसते, हे आम्हांला कळलं होतं. खूप गंमत वाटायची. बहुतेक वेळ आमचा तोच खेळ चालायचा.

पावसाळ्यात सगळीकडं हिरवंगार गवत उगवायचं. त्यात मधे मधे रंगीबेरंगी रानफुलं दिसायची. पिवळी–शेवंतीसारखी–पण लहान व उंच देठाची फुलं उठून दिसायची. निळ्या व जांभळ्या रंगांची नाजुकशी फुलं जमिनीलगत असायची. गोगलगाई, रुपेरी, चिकट द्राव उमठवत जाताना दिसायच्या. कुंकवासारखे लाल मखमली किडे तर आम्हांला खेळायला फारच आवडायचे.

घरापासून काही अंतरावर एक आमराई होती. तिथं अगदी थंडगार वाटायचं. पण आम्हांला तिकडं एकटं जायची परवानगी नव्हती. आई बरोबर असली, तर आम्ही जात होतो. वानरं खूप असायची. निरनिराळे पक्षी पण बघायला मिळायचे. कुकुडकुंभा, कोकीळ, पोपट, सुतारपक्षी, आणखी कोण...कोण..

आणखी पुढं गेलं, की कऱ्हा नदी होती. माझे तीन मोठे भाऊ विद्याधर (आबा), विजयानंद (कुंजा) व हरिश्चंद्र (बच्चू). ते तिघं जरा मोठे झाल्यावर पोहायला जात.

पण हे बाबांना कळलं तर त्यांना खूप मार मिळायचा. बाबांनी घरात वेताची छडी ठेवली होती. ते जास्त चिडले तर कमरेचा पट्टा काढूनसुद्धा मुलांना मारायचे.

फासेपारधी लोक डुकरं पकडायला यायचे. त्यासाठी ते मोठी मोठी जाळी लावायचे. खूप आरडाओरडा करून डुकराला त्या जाळीच्या सापळ्यात आणायचे. असं पकडलेलं डुक्कर विचित्र व भयंकर आवाज काढून ओरडायचं. ते फासेपारधी पण ओरडायचे. ती गंमत बघायला हे तिघं त्यांच्या मागं पळत सुटायचे. ते बंगल्याच्या बाजूला आले की, आम्ही दोघी घाबरून घरात लपून बसत होतो.

ह्या रानात पुष्कळ साप होते. कधी कधी घरात पण साप यायचे. रात्री बंगल्याच्या बाजूनं फिरायचे. एकदा रात्री आम्ही सगळे स्वयंपाकघरात गप्पा करत बसलो होतो. विजेचे दिवे नसल्यामुळं अंधार फार गडद होता, आणि एकदम मागच्या दाराच्या बाहेर टॉक, टॉक, टॉक असा आवाज आला. आम्ही कान देऊन ऐकू लागलो. लगेच जाऊन आईला सांगितलं. आई आली व आवाज ऐकून म्हणाली, "मोठा नाग चालला आहे. पोट आपटत चालला आहे. त्याचा आवाज हा." ऐकून आम्हांला धडकीच भरली. आमची आई मात्र धीराची होती. ती गडबडून जात नसे. क्षणात निर्णय घेऊन प्रसंगातून पार पडत असे.

एकदा घरात साप आला. तो न्हाणीघरातून स्वयंपाकघराकडं येत होता. सगळ्य ांनी ओरडायला सुरुवात केली. त्याबरोबर आई आली. आधी तिनं आम्हांला सगळ्यांना एकत्र करून बैठकीच्या खोलीत उभं केलं. तोपर्यंत तो साप स्वयंपाक-खोलीच्या उंबरठ्यावर आला. त्याच क्षणी आईनं जाऊन जोरानं दार बंद केलं. त्याला मधे अडकवलं आणि मग जाऊन काठीनं त्याचं डोकं चेचलं. घरात आलेले उंदीर पण ती काठीनं मारायची.

बाबा साप आणि उंदीर यांना फार घाबरायचे. कारण त्यांचे डोळे अधू होते. दृष्टी कमी झाली होती. आई जेव्हा उंदीर मारायची तेव्हा ते पलंगावर चढून बसायचे आणि वर बसून तिला ऑर्डर सोडायचे. आई सांगायची की, त्यांची दृष्टी जायलाच आली होती. तेव्हा त्यांनी मनोभावे देवाची प्रार्थना केली की, "देवा, मला दृष्टी दे. दिलीस तर माझं पुढचं सर्व आयुष्य तुझं काम करण्यातच मी घालवीन." त्यानंतर वाचण्याइतपत त्यांना दिसायला लागलं. तेव्हा बोलल्याप्रमाणं त्यांनी अभ्यास करून बायबलचा शिक्षणक्रम पूर्ण केला आणि गिरगावात महारबावडी पोलिस स्टेशनच्या समोर अंब्रोली चर्च नावाचं ख्रिस्ती प्रार्थनामंदिर आहे, तिथं बाबांनी प्रीस्टचं (पाळकाचं) काम घेतलं. त्याच्या बाजूला अंब्रोली मॅन्स नावाची इमारत आहे. तिथं राहत होते. त्याच घरात असताना आमचा चौघांचा जन्म झाला. सरला, सासवडला गेल्यानंतर पुण्याच्या हॉस्पिटलमधे जन्मली.

मुंबईची हवा बाबांना आवडत नव्हती. मुलं पण सारखी आजारी पडायला लागली. काही वर्षांपासून सासवडची नोकरी मिळावी म्हणून त्यांची खटपट चालली होती. तोपर्यंत त्यांना 'रेव्हरंड' ही पदवी मिळाली होती. गंमत म्हणजे माझा जन्म

झाला आणि त्यांना सासवडला लगेच नोकरीवर रुजू होण्याची ऑर्डर आली. मी फक्त सव्वा महिन्याची असताना ते आम्हां सर्वांना घेऊन सासवडला आले. 'देवा, मला आता मुलगी होऊ दे.' अशी, आई माझ्या वेळी गरोदरपणात रोज प्रार्थना करायची. देवानं दिलेली, तीन मुलांवर झालेली आणि चांगल्या पायगुणांची म्हणून माझं नाव काय ठेवायचं याची चर्चा सुरू झाली. आई म्हणाली, "तिचं नाव 'पद्मनयना' ठेवायचं." कारण तिच्या आईचं ते नाव होतं. बाबा म्हणाले, "छे, छे, तुझ्या आईचं नाव नाही ठेवायचं. तिचं नाव मीच ठेवणार–ते म्हणजे 'यशोदा.' कारण तिनं मला यश दिलं आहे." शेवटी 'यशोदा' हेच नाव ठेवलं. सर्व कंपौंडमधल्या लोकांना बिर्याणीचं जेवण दिलं. नवा फ्रॉक घालून मला मधे बसवलं होतं. मुलीची सर्व हौस तिनं भागवून घेतली. मला परकर-पोलका शिवून घालणं, माझ्या वेण्या घालणं, फ्रॉक शिवणं वगैरे. माझ्यानंतर दोन वर्षांनी सरलचा जन्म झाला. ती बाबांची जास्त लाडकी झाली. आमचे दोघींचे ते खूप लाड करायचे. दोन मांड्यांवर दोघींना बसवून स्वत:च तयार केलेली गाणी म्हणायचे. लाडानं मला 'बिट्टी' म्हणायचे व तिला 'पक्षा'. बाहेरून आले की, दारातूनच 'पक्षा' म्हणून हाक मारायचे. शिक्षा म्हणजे उजव्या हाताच्या पहिल्या दोन बोटांनी आमच्या तळहातावर पट्टीसारखे मारायचे.

घरची कापड-खरेदी पुण्याला व्हायची. मुलांना शर्टसाठी आणि आम्हांला फ्रॉकसाठी एकाच कापडाचा तागा घेऊन यायचे. आई घरीच मशिनवर फ्रॉक व इतर कपडे शिवायची. ते वाढत्या अंगाचे असत. गुडघ्याच्याही खाली येईल इतका लांब फ्रॉक असायचा. म्हणजे आताचा 'मिडी' म्हणता येईल.

आमच्या घरी यमुना नावाची बाई स्वयंपाकाला होती. तेव्हा तिला पाच रुपये पगार होता. तिचे केस पिंगट रंगाचे व इतके कुरळे होते की, ते कधीच नीट बसत नसत. नेहमीच पिंजारल्यासारखे दिसायचे. तिची मुलं बहुतेक वेळ आमच्या घरीच असायची. बाबांनी त्यांना पण अशीच विनोदी नावं दिली होती. त्यांच्यावर गाणी करून ते ती मोठमोठ्यानं म्हणून सर्वांना हसवायचे. तिचा नवरा शंकर. तो घरातली इतर कामं करायचा. बैलगाडीत पिंप घालून झऱ्याचं पाणी आणणं, झाडलोट करणं, लाकडं फोडणं, गाईचा गोठा स्वच्छ करणं वगैरे.

एकदा संध्याकाळच्या वेळेला शंकर आला आणि त्यानं हळूच आईला काहीतरी सांगितलं. आईनं कपडे बदलले आणि हातात एक कातर घेऊन घाईघाईनं ती शंकरच्या घरी गेली. अशी न सांगता एकाएकी कशासाठी गेली असेल ती? नंतर मी ते विसरून खेळात दंग झाले. तासाभरानं ती परत आली आणि सांगायला लागली की, "यमुनाबाईला मुलगा झाला." म्हणजे ही बाळंतपण करायला गेली होती तर!

व्हरांड्याच्या दुसऱ्या टोकाला ऑफिससाठी आणखी एक खोली होती. सकाळी न्याहरी झाली की बाबा कामासाठी तिथं जाऊन बसत. मधे मोठं टेबल व खुर्ची होती. फक्त दाराची भिंत सोडून बाकीच्या तिन्ही भिंतींवरची कपाटं पुस्तकांनी

भरलेली होती. स्वत:चे पैसे खर्च करून पुस्तकं विकत घेणारा माणूस म्हणून त्यांची ख्याती होती. खूप जाड काचांचा चष्मा लावून ते तिथं लिहीत किंवा वाचत बसलेले असायचे. आई आम्हांला तिकडं जाऊ देत नसे. फक्त दुपारी जेवायची वेळ झाली की, "त्यांना जेवायला बोलावलंय म्हणून सांग जा." असं सांगायची. वाचताना महत्त्वाच्या वाक्याखाली लाल पेन्सिलनं खुणा करायची त्यांना सवय होती.

धार्मिक आणि साहित्यिक क्षेत्रांत काहीतरी नवीन करण्यासाठी त्यांची धडपड चाललेली असायची असं दिसतं. 'इंडियन चर्च हिस्ट्री रिव्ह्यू'मधे त्यांच्याबद्दल म्हटलं आहे की :

रेव्ह० भास्करराव कृष्णाजी उजगरे यांनीं मराठी साहित्याला उत्तेजन देण्याचा प्रयत्न केला. सुप्रसिद्ध कवि व कीर्तनकार नारायण वामन टिळक व त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई यांच्या प्रभावानें व सहवासानें तेही 'मनोहरबंधू' या टोपण नांवानें कविता लिहूं लागले. पुणें येथें महाराष्ट्र साहित्य परिषद संमेलन या प्रतिष्ठित संस्थेचे सेक्रेटरी म्हणून त्यांची नेमणूक झाली होती. पण १९३५ सालीं त्यांचें अकाली निधन झाल्यामुळें ते काम स्वीकारूं शकले नाहींत.

सासवड येथें 'पास्टर' म्हणून काम करीत असतांना रेव्ह० उजगरे यांनीं एक असामान्य संघटना स्थापन केली होती. तिचें नाव, 'धर्म जागृती मंडळ' असें होतें. सर्व धर्मांच्या जाणकारांनीं एकत्र जमून दर साप्ताहिक सभेंत एकेका धर्माचें तत्त्व चर्चेला घेऊन त्यावर उलट सुलट चर्चा करावी, असा त्यामागें हेतू होता. त्यामुळें भिन्नधर्मी लोकांचा एकमेकांबद्दल विश्वास वाढायला मदत झाली. एकोपा वाढला. ह्या सभांना सासवड गांवांतील लोकांकडून फारच चांगला प्रतिसाद मिळाला. आणि प्रसिद्धी पण मिळाली होती.

१८ एप्रिल १९२७ रोजी त्यांनी 'मराठी ख्रिस्ती साहित्य संघा'ची स्थापना केली होती. त्या संघाचें कार्य आजतागायत खंड न पडतां चालू आहे. ही त्यांची लक्षांत राहावी अशी मोठी कामगिरी आहे.

रेव्ह० नारायण वामन टिळकांचा कवितासंग्रह त्यांनी संपादित केला होता व त्याला प्रस्तावनाही स्वत:च लिहिली होती.

तसेच बालकवींची आणि त्यांची चांगली ओळख होती. नारायण वामन टिळकांच्या घरी ते जात तेव्हा सर्व जण एकत्र भेटत. एकमेकांची खूप चेष्टामस्करी चाले. लक्ष्मीबाई टिळकांनी 'स्मृतिचित्रा'त त्यांच्या नावाचा उल्लेख 'भास्कर' असा केलेला आहे. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांची कागदपत्रं बघताना आढळून आलं की, बालकवींचं चरित्र लिहिण्याचा त्यांचा विचार होता. त्यांच्या पुष्कळ आठवणी त्यांनी लिहून ठेवलेल्या होत्या. वर्तमानपत्रांतून, मासिकांतून त्यांच्या कवितेवर आलेले सर्व लेख त्यांनी जमवून ठेवलेले होते. त्यांच्या मृत्यूनंतर बऱ्याच वर्षांनी म्हणजे माझ्या लग्नानंतर कृ० बा० मराठे यांनी बालकवींचं चरित्र लिहायला घेतलं. तेव्हा श्री० पु०

भागवत यांनी त्यांना सांगितलं की, माझ्या आईकडं (सोनूबाई उजगरे) काही आठवणी व कागदपत्रं वडिलांनी ठेवलेली आहेत. त्यांविषयी मराठे यांनी माझ्या आईकडं विचारणा केली आणि आईनं ती त्यांना काढून दिली. चरित्राच्या प्रस्तावनेत त्याचा त्यांनी फार चांगला उल्लेख केला आहे.

अधू डोळ्यांमुळं व गरीब परिस्थितीमुळं पुढचं मोठं शिक्षण घेणं त्यांना शक्य झालं नाही. त्यांच्या पुस्तक-संग्रहात 'संतकवी'पासून 'पंचकवी'पर्यंत सर्वांची पुस्तकं होती. आचार्य अत्रे यांनी भेट दिलेलं 'झेंडूचीं फुलें' अजून माझ्याजवळ आहे. इंग्लिश लेखकांची आणि कवींची पुस्तकं त्यांच्या संग्रहात होती. तसंच केशवसुत व बालकवी यांच्यावर त्या वेळी वर्तमानपत्रांत आलेल्या लेखांची कात्रणं कापून क्रमानं पुस्तकासारखी बाइंड करून ठेवली होती. मी वाडिया कॉलेजमध्ये बी०ए०ला असताना मला ती कपाटात सापडली आणि मला इतका आनंद झाला! कारण मी मराठी (ऑनर्स) विषय घेतला होता आणि 'संपूर्ण केशवसुत' अभ्यासक्रमात होता.

बाबांना एकूण सहा भाऊ व एक बहीण होती, असं आई सांगायची. त्यांतले तीन काका फक्त मला ठाऊक आहेत. बाकीचे माझ्या जन्माच्या आधीच वारले. मोठे मनोहरराव व काकू सावित्रीबाई, दुसरे प्रेमचंद्रराव व काकू सुलोचनाबाई. ह्यांची पाच मुलं. मोठा रत्नाकर, यमुना, सिंधू, तारा व बाळ (पुरुषोत्तम). मी इंटरला असताना एक वर्ष त्यांच्या घरी राहत होते. सिंधू व मी एका वर्गात होतो. एकत्र कॉलेजला जात-येत होतो. बहिणी म्हणण्यापेक्षा मैत्रिणी झालो होतो.

धाकटे विश्वनाथरावकाका व काकू हन्नाबाई. त्यांच्या दोन मुली म्हणजे कमळ आणि विमल. त्यांचे आईवडील वारल्यानंतर आमच्या आईनं त्यांना घरी आणून आमच्याबरोबरच वाढवलं.

आईचं माहेरचं नाव सोनूबाई हरिपंत केळकर. आजोबा ब्राह्मण होते. त्यांनी ख्रिस्ती धर्माचा अभ्यास करून स्वखुषीनं ख्रिस्ती धर्म स्वीकारला. ते शाळेत शिक्षकाचं काम करत. त्यांच्या पहिल्या बायकोचं आडनाव ढालवाणी असं होतं. तिला एक मुलगी झाली. तिचं नाव वेणूबाई. ती लहान असतानाच तिची आई वारली. तेव्हा तिला तिच्या आजोळी नेलं. ती तिकडंच वाढली. त्यांनीच तिला शिकवलं. ती एम०ए० झाली. तिनं शिक्षिकेचं काम केलं आणि सुप्रसिद्ध नट शाहू मोडक यांच्या चुलत्याशी तिचं लग्न झालं. नंतर त्या मावशी अहमदनगरच्या ट्रेनिंग कॉलेजमधे प्रिन्सिपॉल झाल्या. त्यांना मूल झालंच नाही. निवृत्त झाल्यानंतर काही वर्षांनी त्या वारल्या.

पहिली बायको वारल्यानंतर आजोबांनी आमच्या आजीशी लग्न केलं. तिचं नाव आवडीबाई (पद्मनयना). ती पण शिक्षिकेचं काम करत होती. ती फार सुंदर लेसकाम व भरतकाम करत असावी. तिच्या लेसच्या व क्रॉसस्टिचच्या नमुन्यांच्या कापडी वह्या आईकडून माझ्याकडं आल्या. त्या बघून मी थक्क झाले.

तिला चार मुलं झाली. पहिला बापूमामा (पद्माकर) त्यांचा एकच मुलगा, सदानंद

केळकर. मग आई. नंतर रत्नाकरमामा व चंपूमावशी. रत्नाकरमामांनी शाहू मोडकच्या आत्याशी लग्न केलं. त्यांचं नाव इंदिरा, त्यांना दोन मुलं झाली. मोठी सुरेखा व नंतर रंजन.

सर्वांत धाकटी चंपूबाई मावशी. आईचे वडील ती पाच वर्षांची असताना वारले. आजीनं नोकरी करून मुलांना वाढवलं. पण आई इंटरला असताना आजीला इन्फ्लूएन्झा झाला आणि त्यातून टी०बी० उद्‌भवला व ती वारली. अशा परिस्थितीत आईला पुढचं शिक्षण चालू ठेवणं शक्य नव्हतं. दोन धाकटी भावंडं होती. तेव्हा कॉलेज सोडून तिनं शाळेत नोकरी धरली. रत्नाकरमामांनी नोकरी करून कॉलेज शिक्षण चालू ठेवलं. चंपूबाई मावशींना मेडिकल कॉलेजमध्ये ॲडमिशन मिळाली. तिनं पण स्वत:च्या जबाबदारीवर आपलं शिक्षण चालू ठेवलं. त्यानंतर आईची, बाबांशी ओळख झाली व त्यांनी लग्न केलं.

चंपूमावशी फार जिद्दी व हुशार होती. तिचा मेडिकलचा अभ्यास व्यवस्थित चालू होता. अभ्यासक्रमानुसार फुप्फुसांच्या अभ्यासासाठी तिला एक मृत शरीर देण्यात आलं. तिनं त्याचं डिसेक्शन केलं आणि ती फुप्फुसं शोधायला लागली. पण ती दिसेनात. तेव्हा तिनं प्रोफेसरांना बोलावून विचारलं, की असं कसं? प्रोफेसरांच्या बघता क्षणीच लक्षात आलं की हे शरीर फुप्फुसांचा टी०बी० झालेल्या माणसाचं आहे. टी० बी०च्या जंतूंनी त्याची फुप्फुसं निकामी करून टाकली आहेत. ते फार घाबरले. चुकीनं तिला ते शरीर दिलं गेलं होतं. त्यांनी लगेच तिला आत नेलं. निर्जंतुक औषधांनी हात, तोंड, शरीर धुवायला लावलं. जे करणे शक्य होते ते सर्व उपाय केले. पण चारच महिन्यांनी तिला ताप येऊ लागला आणि तिला फुप्फुसांचा टी०बी० झाला. त्यांनी तिला मिरजेला वानलेस हॉस्पिटलमधे पाठवलं. जरा बरं वाटल्यावर ती मुंबईला आली आणि कॉलेजमध्ये जायला लागली. ते तिचं एम०बी०बी०एस०चं शेवटचं वर्ष होतं. म्हणून ती खूप अभ्यास करायला लागली. ती दगदग सहन न होऊन तिला पुन्हा ताप यायला लागला. तशीच जिद्दीनं तिनं परीक्षा दिली आणि मग पुन्हा मिरजेला जाऊन ॲडमिट झाली. प्रकृती सुधारण्याऐवजी बिघडत गेली. रोग बळावत गेला. परीक्षेच्या निकालाचा दिवस आला. ती मिरजेला बिछान्यातून उठू शकत नव्हती. पडल्या जागेवरच तिला कळलं की ती एम०बी०बी०एस० पास झाली. आई, वडील नाहीत–कोणाची मदत नाही–पैसे नाहीत-प्रकृतीची साथ नाही. अशा विपरीत परिस्थितीत तिनं आपलं ध्येय पूर्णत्वाला नेलं. स्वप्न साकार केलं. त्यानंतर ती वारली. तेव्हा मी एक वर्षाची होते. आई सांगायची की, "मावशीचं तिच्या वर्गातल्या जोशी नावाच्या ब्राह्मण मुलावर प्रेम होतं. तो तिला भेटायला मिरजेला जात असे." ती जगली असती तर माझ्या आधी तिनंच हिंदू मुलाबरोबर लग्न केलं असतं.

मुंबईची हवा बाबांना आवडत नसे. मुलं वरचेवर आजारी पडायची. त्यांना न्युमोनिया, ब्रॉंकायटिस, सर्दी, ताप अशा प्रकारचे घशाचे आणि छातीचे आजार

जास्त प्रमाणात होऊ लागले. मुंबईतल्या अशुद्ध हवेमुळंच ते होतात असं त्या काळातसुद्धा त्यांना वाटायचं. म्हणून सासवडला जागा मिळावी म्हणून बरेच दिवस त्यांची खटपट चालली होती. पण काम होत नव्हतं. माझ्या वेळेस आईचे दिवस भरत आले होते. ऑक्टोबर महिना. दिवाळी जवळ आली होती. २४ तारखेला धनत्रयोदशीच्या दिवशी, भायखळ्याला–राणीच्या बागेजवळ एक हॉस्पिटल होतं तिथं–माझा जन्म झाला. दिवसा फटाके आणि रात्री वाघ-सिंहांच्या डरकाळ्या ऐकू यायच्या असं आई सांगायची. बाळंतपणात बाबा तिची खूप काळजी घ्यायचे. चिकनसूप स्वत: करून तिला आणून द्यायचे. प्रत्येक बाळंतपणात एक ब्रँडीची बाटली आणून तिला अंडं, दूध आणि एक चमचा ब्रँडी रोज द्यायचे. तिला टी०बी० होईल म्हणून त्यांना सारखी भीती वाटायची. कारण तिचे वडील, आई, मोठा भाऊ व धाकटी बहीण सर्व जण टी०बी०नं वारले होते. तिला कसलाही ताप आला तरी मिशनच्या हॉस्पिटलमधे नेऊन त्या गोऱ्या डॉक्टरला सांगायचे की, 'हिला तपासा आणि टी० बी० झाला आहे का ते बघा.'

आई मला घेऊन अंब्रोली मॅन्समधे घरी आली आणि सव्वा महिना झाला नाही तोच बाबांना सासवडला जाऊन कामावर रुजू होण्याची ऑर्डर आली. लगेच ते आम्हां सर्वांना घेऊन सासवडला आले. तिथं ते मिशनरी म्हणून आले. चर्च, शाळा, शिक्षकवर्ग, इतर कामगार आणि मिशन कंपौंडची देखभाल हे त्यांचं काम होतं.

तेव्हा पंचम जॉर्ज राजा होता. सिल्व्हर ज्युबिलीचा समारंभ झाला, तेव्हा आम्हांला खाऊ मिळाला होता. तेव्हा 'भो पंचम जॉर्ज' अशी सुरुवात असलेलं गाणं आम्हांला म्हणावं लागत होतं. सहा वर्षं पूर्ण झाल्याशिवाय पहिलीत प्रवेश मिळत नसे. आम्ही साहेबांच्या मुली म्हणून आमचा फार रुबाब असायचा. आम्हांला कोणी ओरडत नसे; अभ्यास केला का नाही म्हणून विचारत नसे. नुसतं खाणं, खेळणं आणि वासरासारखं हुंदडणं चालू होतं. सरल व मी दोघी असल्यामुळं इतर कोणा मैत्रिणींची आम्हांला जरूर वाटत नसे.

शाळेच्या इमारतीत एका बाजूला एक गेस्टरूम होती. आंब्याच्या दिवसांत ती रिकामी असली की बाबा खूप आंबे आणून जमिनीवर त्यांची आढी लावायचे. त्यात काही गोधडी आंबेही ते आणत. हे गोधडी आंबे नारळाहून मोठ्या आकाराचे असत. केव्हाही जाऊन पिकलेला आंबा घेऊन खाण्याची आम्हां मुलांना पूर्ण मुभा होती.

शाळेसमोरच्या अंगणात संध्याकाळी आम्ही खूप खेळत होतो. तिथं एक दिव्याचा खांब होता. त्याच्या भोवती लहानसा पार बांधलेला होता. एकदा संध्याकाळी तिघं भाऊ व इतर मुलं तिथं खेळत होती. खेळता खेळता हरीश पडला आणि त्याच्या कानाला पाराचा काठ लागला आणि कान मधे फाटला. रक्त वाहायला लागलं. बाबा घरात नव्हते. गावात डॉक्टर खूप दूर. आईला कळल्याबरोबर ती पळत आली. त्याला घरी नेलं. कान बोटांनी दाबून चिकटवला. औषध लावलं आणि गच्च पट्टी बांधली. तिचा फर्स्टएडचा कोर्स झालेला होता. त्यामुळं योग्य ती काळजी तिनं

घेतली असणार. आता मला कळतं की, त्या कानाला टाके घालायला पाहिजे होते. तरीसुद्धा कान जोडला गेला आणि जखम नीट भरून आली.

"चांगले उत्तम पदार्थ खावे. बाहेर आणलेल्या सर्व वस्तू धुतल्याशिवाय वापरू नयेत. पैसे पण घाण आहेत. त्यांना किती घाणेरड्या लोकांचे हात लागले असतील, कारणाशिवाय पैशांना पण हात लावू नये" असं बाबा म्हणायचे. मुलांना भरपूर दूध, तूप मिळावं म्हणून त्यांनी घरी गाय ठेवली होती. बैलगाडीसाठी बैल पण होता. गोठ्यात एखादं वासरू पण असायचं. दुपारच्या सुट्टीत शाळेतून जेवायला घरी आलो की, आई तुपात तळलेल्या चपातीला आणखी तूप किंवा जाड साय लावून वर साखर टाकायची व गुंडाळी करून आम्हांला खायला द्यायची; बाबांना मात्र जेवताना रोज मटण लागायचं. वरण ते कधीच घेत नसत. आईला सुरवातीला फारसा स्वयंपाक येत नसे. मटणाचे वेगवेगळे प्रकार आणि बिर्याणी करायला त्यांनीच तिला शिकवलं असं ती सांगायची. वर्षभर पुरेल इतका उत्तम गहू व तांदूळ मोठ्या मोठ्या पिंपांत भरून ठेवलेला असायचा. पिंपं अर्धी झाली, की आईचा हात धान्य काढायला पोचत नसे. मग ती आम्हां दोघींना उचलून आत पिंपात टाकायची आणि आमच्याकडून धान्य काढून घ्यायची. वर्षाच्या शेवया, कुरडया ती कंपौंडमधल्या बायकांच्या मदतीनं करून घ्यायची. सर्व जणी एकत्र जमल्या की एकमेकींची खूप चेष्टामस्करी चालायची. काम झाल्यावर त्या मागच्या अंगणात फुगडी, कोंबडा खेळायच्या. काही जणींना भाजलेली मशेरी लावायची सवय होती. श्रमपरिहार म्हणून त्या मशेरी लावत बसायच्या. अशा वेळी नेमके बाबा यायचे आणि त्यांचे विनोद सुरू व्हायचे. त्यांतलं एक गाणं मला चालीसकट आठवतं :

मशरी साची सासवडाची
लावा दातांचा लाहो
पच पच थुंका प्रियजनहो

आईचा तेव्हा फार रुबाब असायचा. सगळे तिला बाईसाहेब म्हणायचे. तेव्हा ती खूप जाड झाली होती. तीन तीन तोळ्यांची पाटली मनगटात रुतायची.

एकदा बाबांनी पुण्याहून तिच्यासाठी साडी आणली. सुंदर फिका जांभळा रंग आणि हिरवे जरीचे काठ. त्यावर द्राक्षाची पानं. साडी सुंदरच होती. पण तिला संशय आला. तिनं ती जर घासून पाहिली. ती खोटी निघाली. तिला खोटी जर आवडत नसे. ती फार चिडली. ती साडी तिनं तशीच ठेवून दिली. पुढं बाबा वारल्यावर येरवड्याला असताना ती साडी कापून त्यातून तिनं आम्हांला दोघींना परकर-पोलकी शिवली.

.तिचं शिक्षण मुंबईतल्या सेंट कोलंबा शाळेत झालं. लहानपणापासून ती एक हुशार विद्यार्थिनी म्हणून प्रसिद्ध होती. त्या काळी तिला चौथीची व सातवीची स्कॉलरशिप मिळाली होती. गणित विषयात तिनं प्रावीण्य मिळवलं होतं. उत्तम

स्मरणशक्ती आणि सुंदर हस्ताक्षर. त्यामुळं बाबांनी तिच्याकडून लिहिण्याचं, प्रुफं तपासण्याचं पुष्कळ काम करून घेतलं.

मॅट्रिकनंतर तिनं विल्सन कॉलेजमध्ये ॲडमिशन घेतली. वत्सलाबाई घाटे, गोदूताई मुंगी (अत्रे) ह्या तिच्या मैत्रिणी. त्या वेळी अगदी मोजक्याच मुली कॉलेजमधे जात. त्यामुळं आई जर कॉलेजला गेली नाही, तर त्या दोघी पण जात नसत. इंटरला आपण गणित विषय घेतला होता असं ती सांगायची. पुढं घडलेल्या घटनांमुळं तिला इंटरची परीक्षाच देता आली नाही. कॉलेज सोडून द्यावं लागलं. तिची आई वारल्यामुळं पुढच्या शिक्षणाचा विचार करणं शक्य नव्हतं. तिच्या मैत्रिणी पुढं शिकल्या. बी०ए०, एम०ए० झाल्या. शाळांच्या प्रिन्सिपॉल झाल्या. ही हुशार असून परिस्थितीचा बळी होऊन कायम खंत करत राहिली. निराश झाली.

स्वतंत्रपणानं वागण्याची, निर्णय घेण्याची व कृती करण्याची तिला सवय असल्यामुळं लग्नानंतर तिला बंधनात पडल्यासारखं वाटलं. तिला नोकरी करण्याची इच्छा होती. बाबांना ते पसंत नव्हतं. साडीचा पदर हाताएवढा लांब आणि नेहमीच खांद्यावरून घेतला पाहिजे–बाहेर जाताना पदर डोक्यावरून पाहिजे–दोघं मिळून बाहेर पडत तेव्हा दोन हात त्यांच्या मागं चाललं पाहिजे आणि गुलाबी रंगाची साडी कधीच नेसायची नाही. कारण तो रंग इतरांना आकर्षित करून घेतो अशी बाबांची कल्पना असावी.

आईचं माहेरचं नाव सोनूबाई. लग्नात बाबांनी ते बदलून 'शांताबाई' असं ठेवलं होतं. पण ते तिला आवडलं नाही म्हणून तिनं ते नाव कधीच वापरलं नाही.

सासवडला आल्यापासून आयुष्य सुखाचं झालं होतं. पैसाअडका, नोकरचाकर, मानसन्मान, घरदार–कसलीच कमतरता नव्हती. मुलं मोठी होत होती. बाबांच्या प्रकृतीच्या तक्रारी मात्र चालू होत्या. सांधेदुखी असह्य होती. मूळव्याधीचा फार त्रास होता. त्यातच भर म्हणून टॉन्सिल्सचा त्रास सुरू झाला. आणि तो इतका वाढला की त्यांना भाषण करणं अशक्य होऊ लागलं. दर रविवारी चर्चमधे भाषण करावं लागे; तसंच धर्मजागृती मंडळांच्या सभेमध्ये नेहमीच बोलावं लागत असे. होमिओपाथी, आयुर्वेदिक औषधं घेऊन पाहिली. पण फायदा झाला नाही म्हणून त्यांनी पुण्याला 'मंगळवार हॉस्पिटल'मधे जाऊन, कोणी गोरे सर्जन होते त्यांना दाखवलं. "ऑपरेशन करून घ्या, मी स्वत: तुमचं ऑपरेशन करीन." असं त्यांनी वचन दिलं.

आईला त्यांनी जेव्हा हे सांगितलं तेव्हा ती फार अस्वस्थ झाली, गडबडली. "ऑपरेशन करून घेऊ नका" असं त्यांना सांगायला लागली. पण त्यांचा निश्चय झालेला होता. तिच्यासाठी ते आपला निर्णय बदलायला तयार झाले नाहीत. "साधं टॉन्सिल्सचं ऑपरेशन. त्यात घाबरण्यासारखं काय आहे? दोन दिवसांत मी घरी येईन." असं त्यांचं म्हणणं. तेही बरोबरच होतं. पण कधी न डगमगणारी आई, हवालदिल झाली. तिला रोज एक स्वप्न पडायला लागलं :

एक नदी आहे. अगदी दुथडी भरून वाहतेय. तिचं पाणी फार खोल आहे. त्या नदीत ती पडली आहे; तिन्ही मुलांना हाका मारून सांगते आहे की, "अरे मला

वाचवा, मला वाचवा.'' पण कोणी येत नाही.

हेच स्वप्न पुन्हा पुन्हा पडायला लागल्यावर, तिच्या मनात आलं : पुढं घडणाऱ्या वाईट घटेनची ही पूर्वसूचना आहे की काय!

दुसरी एक अशुभ घटना घडली. असं ती सांगायची की : ''बंगल्यात अचानक इतके ढेकूण झाले की सर्वांची झोप उडाली.'' मला आठवतं की, जमिनीवर घातलेल्या आमच्या गादीभोवती, रांगोळीसारखी, ढेकणांच्या औषधाची पांढरी पावडर घालून ठेवलेली असायची. सर्व उपाय करूनही ढेकूण कमी होईनात. हे चिन्ह चांगलं नाही, असं तिला वाटायला लागलं. भुताखेतांवर तिचा विश्वास नव्हता– अंधश्रद्धेला मनात जागा नव्हती. देवावर तिचा पूर्ण विश्वास होता. रोज बायबलमधला थोडा भाग वाचणं आणि प्रार्थना करणं हा नित्यक्रम होता. असं असताना ह्या वेळीच तिचं मन का कमजोर बनलं असावं, असा प्रश्न मनात आल्याशिवाय राहत नाही!

ठरल्याप्रमाणं ऑपरेशनचा दिवस आला. आई-बाबा सकाळीच पुण्याला गेले. आम्हांला नेहमीप्रमाणं शाळेत पाठवून दिलं. शाळा सुरू झाली. मी मराठी तिसरीत होते. मास्तर काहीतरी शिकवत होते. इतक्यात, त्यांना कोणीतरी बाहेर बोलावलं म्हणून ते बाहेर गेले. काही मिनिटांतच परत आत आले. आणि माझ्याकडं अशा काही नजरेनं त्यांनी पाहिलं की, ते मास्तर मला आठवत नाहीत, पण ती नजर मी कधीच विसरू शकले नाही. आत येऊन म्हणाले की, ''आज शाळेला सुट्टी दिली आहे. सर्वांनी घरी जा.'' सुट्टी का दिली असेल? असा विचार करत मी पाटीदप्तर आवरलं आणि घरी जायला निघाले. माझ्याबरोबर नेहमी असणारी बहीणही त्या वेळी मला कुठं दिसत नव्हती. आणखीही कुणी माझ्याबरोबर नव्हतं. मी एकटीच निघाले. घरी येऊन बघते तर, बंगल्याच्या मागच्या दारात खूप लोक, गर्दी करून उभे आहेत आणि आत डोकावून बघण्याचा प्रयत्न करत आहेत. मला कोणी आत जायला पण वाट देईना, म्हणून मी पण तिथं उभी राहिले; इतक्यात बाजूला एक शाळेतली, ओळखीची मुलगी दिसली. तिला मी विचारलं, ''काय झालं ग?'' तर ती मला म्हणाली, ''तुला माहीत नाही? अग, तुझे वडील वारले.'' हे ऐकल्याबरोबर गर्दीतून मी तशीच आत घुसले.

आत जाऊन बघते तर प्रेमचंद्रावकाका, सुलोचना काकू आणि त्यांची मुलं सर्व जण घरात आलेले. आणि काकू इतक्या मोठ्यानं रडत होत्या की, असं रडताना त्यापूर्वी मी कधीच कोणाला पाहिलं नव्हतं. ते ऐकून मी आणखीनच घाबरून गेले. बंगल्याच्या समोर एक बस उभी होती. आम्हांला सर्वांना बसमधे बसायला सांगितलं. सरल व मी आत जाऊन बसलो. सर्व जण आल्यावर बस सुरू झाली आणि पुण्याच्या वाटेला लागली. दुपारी आम्ही दवाखान्यात पोचलो. आम्हांला बाबांच्या खोलीत नेलं. त्यांच्या नाकात-तोंडात कापूस घालून ठेवला होता. त्यांच्या खाटेसमोर खाली सतरंजी घालून आई बसली होती. आम्ही दोघी तिच्याजवळ जाऊन बसलो तेव्हा ती जास्तच रडायला लागली.

तोपर्यंत दुपारी जेवणाची वेळ होऊन गेली होती–घरी जेवण तयार होतं; पण पुण्याहून बाबा वारल्याचा निरोप आल्यामुळं आम्हांला तसंच बसमधे बसवून पुण्याला आणलं. आम्ही दोघी आईजवळ बसलो. थोड्या वेळानं हळूच तिला म्हटलं की, "आम्हांला भूक लागली आहे." आईच्या लक्षात आलं असेल की, सकाळपासून ह्यांनी काही खाल्लेलं नाही आणि प्रसंग काय आहे हे कळण्याचं वय पण नाही. सकाळी घरातून निघताना तिनं चपात्या व दूध बरोबर घेतलं होतं. शांतपणं एका ताटलीत तिनं चपात्या कुस्करल्या. त्यांवर दूध घातलं आणि आम्हांला म्हणाली, "खा." आम्ही तिथंच बसून तेवढं खाऊन घेतलं. आणि पाणी प्यालो.

तिला वाटणारी ऑपरेशनची भीती, तिला पडणारी भयंकर स्वप्नं, घडणाऱ्या अशुभ घटना ह्या सर्वांना खरंच काही अर्थ होता का? नाही म्हणावा तर आता तिच्यावर असं संकट ओढवलं होतं की त्यातून तिला कोणीही बाहेर काढू शकलं नसतं.

सर्व जण विचारायला लागले की असं कसं झालं? साध्या टॉन्सिल्सच्या ऑपरेशनमधे काय चूक झाली? तेव्हा एका नर्सकडून कळलं की, ऑपरेशन स्वत: गोऱ्या साहेबानं केलंच नाही. त्यानं ते एका शिकाऊ विद्यार्थ्याला करायला दिलं; आणि त्यानं चुकीनं गळ्यातली मोठी रक्तवाहिनी कापली. दिलेली भूल उतरलीच नाही. ऑपरेशन टेबलावरच प्राण गेला. काही लोक म्हणाले, "केस करा त्या डॉक्टरवर." आई म्हणाली, "नको, केस करून गेलेलं माणूस परत येणार आहे का?"

अशा तऱ्हेनं अचानक बाबा गेले. आई व आम्ही पाच मुलं पोरकी झालो आणि आमचे सुखाचे दिवस संपले. ते १९३४ साल होतं. आईचं वय पस्तीस. मोठा भाऊ आबा चौदा वर्षांचा व धाकटी सरल पाच वर्षांची, मी सात वर्षांची होते. पाचही मुलं लहान, तरुण वय, डिग्री नाही. अशा परिस्थितीत तिच्या मन:स्थितीची कल्पनाच केलेली बरी.

रत्नाकरमामा तेव्हा शिवाजी पार्कला राहायचे. त्यांचं दोनतीन वर्षांपूर्वीच इंदिरामामींशी लग्न झालं होतं. त्यांनी आम्हांला सर्वांना काही दिवसांसाठी घरी राहायला नेलं. त्यांच्याकडं पंधरा दिवस आम्ही राहिलो. त्यातच सरलला ताप येऊ लागला. तेव्हा आईनं सासवडला परत जाण्याचा विचार केला. पुढचे सहा महिने तिला त्या बंगल्यात राहण्याची परवानगी होती. तेवढ्या अवधीत दुसरी काही तरी व्यवस्था करणं भाग होतं.

आम्ही पुन्हा सासवडला आलो. घरात बाबा नाहीत–आई सुरवातीला सारखी रडायची. हळूहळू दु:ख आवरून ती नोकरी शोधायला लागली. पुण्याला ट्रेनिंग कॉलेजच्या प्रिन्सिपॉल मिस गॉर्डन म्हणून गोऱ्या बाई होत्या. त्या आईला नेहमीच मदत करायला तयार असत. त्यांनी खटपट करून पुण्याजवळ येरवडा इथं इंडस्ट्रियल स्कूलमधे तिच्यासाठी नोकरी मिळवून दिली. खरं म्हणजे तो होता अठरा वर्षांखालील मुलांचा तुरुंग. ह्या गुन्हेगार मुलांनी सजा संपेपर्यंत तिथं काहीतरी धंद्याचं शिक्षण

घ्यावं. म्हणजे बाहेर गेल्यावर त्या शिक्षणाचा उपयोग करून त्यांना चरितार्थ चालवता यावा. असा त्यामागं फार चांगला हेतू. तिथं सुतारकाम, लोहारकाम, वेताचं काम, शिंपीकाम, माळीकाम, ड्रॉइंग, शेती वगैरे शिक्षण दिलं जाई. स्वयंपाकही मुलंच आळीपाळीनं करत. आतमधे त्यांच्यासाठी लहानसा दवाखाना. त्यांच्यासाठी एक डॉक्टर. मुलांची संख्या चारशे ते साडेचारशे एवढी होती. डॉक्टरांना मदत करायला नर्स आणि मुलांच्या स्वयंपाकावर लक्ष ठेवण्यासाठी मेट्रन अशी दुहेरी कामं देण्यात आली. आईला इंटरपर्यंत शिक्षण आणि फर्स्टएडचं सर्टिफिकेट एवढ्या शिक्षणावर ही नोकरी मिळाली. मुख्य म्हणजे राहायला घर मिळालं. दोन खोल्या. पुढं लाकडी चौकटींचा व्हरांडा व मागं बिनछपराचा चौक.

नोकरीचं नक्की करून, आई तिला मिळणार होतं ते घर बघून परत सासवडला आली आणि खूप रडायला लागली. सगळे म्हणाले, "बाई, का रडता?" तर ती म्हणाली की, येरवड्याचं घर चाळीसारखं आणि इतकं लहान आहे की त्यांत हे सामान तर राहणार नाहीच पण नुसत्या पुस्तकांनीच एक खोली भरून जाईल. कवडी-मोलानं सासवडमधे सामान विकून टाकलं. काही जुनी पुस्तकं रद्दीच्या भावानं गेली. बाकीची कोणाला दिली ते ठाऊक नाही. येरवड्याला आणले फक्त बिछाने, कपड्यांच्या ट्रंका, एक टेबल, खुर्ची, भांडी व काही निवडक पुस्तकं आणि बाबांच्या डायऱ्या, पत्रं, आणि लेखनाचे कागद यांची एक ट्रंक. एवढं सामान घेऊन आई मुलांना घेऊन आली आणि नोकरीवर रूजू झाली.

मला मिस गॉर्डनच्या ट्रेनिंग कॉलेजमधे, ठेवलं. तिथं शिक्षिकांसाठी होस्टेल होतं. त्यांच्यामधे मी राहायचं आणि त्यांच्या शाळेत जायचं–वर्ष बुडू नये म्हणून तिसरीची परीक्षा तिथं देऊन मग घरी जायचं–असं त्यांनी ठरवलं होतं.

तिथं माझ्याबरोबर खेळायला लहान कोणीच नव्हतं. शाळा सुटली की मी एकटीच भटकत राही. ग्राउंडच्या मागं शिंदीची काही झाडं होती. त्याच सुमारास त्याच्या शिंदोळ्या पिकून खाली पडत होत्या. साहजिकच मी त्या मातीत पडलेल्या शिंदोळ्या उचलून एकटीच तिथं बसून खात होते. त्यामुळं पोटात कृमी झाल्या. मला एकटीला इथं आणून टाकल्यामुळं रडू यायचं. आई दिसत नाही म्हणून फार वाईट वाटायचं. शेवटी एकदाची परीक्षा संपली आणि आई मला येरवड्याला घेऊन गेली. मी चौथीत गेले होते.

येरवडा गावात म्युनिसिपालिटीची चौथीपर्यंत शाळा. ती अगदी पर्णकुटीच्या पायथ्याशी. त्या शाळेत मला घातलं. दुपारी डबा खायला आम्ही पर्णकुटीच्या पायऱ्यांवर जाऊन बसत होतो. तिथं बसून खाल्लेल्या मटकीची उसळ आणि चपातीची चव अजूनही जिभेवर रेंगाळत आहे असं वाटतं. आम्हीं ख्रिश्चन होतो तरी आमच्या जेवण्याखाण्याच्या पद्धती बऱ्याचशा हिंदू मध्यम वर्गासारख्याच होत्या. इतरही रीतिभाती तशाच असत. रोज संध्याकाळी आई प्रार्थना करायची; पण

आम्हीही तसंच केलं पाहिजे अशी तिची सक्ती नसे. इतर कुटुंबांपेक्षा आम्ही फार वेगळे कुणी आहोत, असं कधीच जाणवायचं नाही.

बाबा गेले आणि माझं सगळं जगच बदलून गेलं. तेव्हाचं सुरक्षित वातावरण जाऊन उघड्यावर टाकल्यासारखं झालं. मनात भीती निर्माण झाली. त्यातच चौथीचा अभ्यास आणि गणित जरा कठीणच. शाळेत गेल्यापासून गणिताचे मास्तर माझ्याकडं जरा रागानंच बघायचे. घरचा अभ्यास केला नाही, किंवा गणित चुकलं, की ते इतक्या जोरानं ओरडायचे की, भीतीनं माझ्या पोटात गोळा उठायचा. त्यामुळं ते काय शिकवतात ते मला कळेनासं झालं. मला त्यांनी अगदी धारेवरच धरलं. त्याचा परिणाम असा झाला की मी चौथीत नापास झाले; आणि मला अंकगणिताची भीती वाटायला लागली.

पुढच्या वर्षी आईनं मला मुंबईला 'सेंट कोलंबा हायस्कूल'मधे घालायचं ठरवलं, तिचं शिक्षण तिथं झाल्यामुळं तिला त्या शाळेबद्दल प्रेम वाटत होतं. शिवाय मिशनची शाळा म्हणून थोडी फी माफ झाली असती. ब्रिटिश शिस्तीप्रमाणं सर्व प्रकारची काळजी घेतली गेली असती. अभ्यासाकडं लक्ष दिलं गेलं असतं, की जे आईला शक्य होत नव्हतं.

तेव्हा मी नऊ-दहा वर्षांची होते. मला एकटीलाच मुंबईला पाठवायची तयारी सुरू झाली. सुरवातीला सरल माझ्याबरोबर नव्हती. स्वतंत्र गादी, चादरी, पांघरूण, थोडे कपडे आणि इतर वस्तू भरून एक पत्र्याची ट्रंक व एक वळकटी तयार केली. आई स्वत: मला सोडायला आली. मी खूप रडले. ती मन घट्ट करून निघून गेली. पण त्यातल्या त्यात एका गोष्टीचा आनंद वाटला की, प्रेमचंद्रराव काकांच्या दोन मुली, यमुना आणि सिंधू ह्यापण तिथं होत्या. खाली शाळा व वर आमचं होस्टेल होतं. एका बाजूला हिंदू मुलींसाठी आणि दुसऱ्या बाजूला ख्रिश्चन मुलींसाठी. स्वयंपाकाची, जेवणाची व झोपण्याची स्वतंत्र वेगवेगळी व्यवस्था होती. जेवण चांगलं व भरपूर असायचं. ब्रिटिश गोऱ्या बाई होस्टेलच्या रेक्टर होत्या. त्यांची शिस्त फार कडक होती. आम्ही जेवायला बसलो की त्या स्वत: येऊन सर्व मुली नीट बसून जेवताहेत की नाही ते बघायच्या. पाटावर बसून जेवताना नीट मांडी घालून बसलं पाहिजे असा नियम होता. गुडघा पोटाकडं उभा करून बसलं तर पोटावर दाब पडून मुली कमी जेवतात असं त्यांना वाटायचं. एकदा आम्ही सकाळी चहा प्यायला बसलो होतो आणि एकदम आमच्या समोरचे चहाचे पेले हालायला लागले. पाठीमागची भिंत पण हालायला लागली. प्रत्येकीला वाटलं की, आपल्या शेजारच्या मुलीनं धक्का दिला. सगळ्या एकदम बोलायला आणि भांडायला लागल्या. काही क्षणांत सर्व शांत झालं आणि मग कळलं की तो भूकंप होता.

मेट्रनबाई मराठी होत्या. ठरवून दिलेल्या नियमाप्रमाणं त्या आमच्याकडून सर्व कामं वेळच्या वेळी करून घ्यायच्या. दर पंधरा दिवसांनी सर्वांना गोल बसवून लहान

मुलींची नखं कापायच्या. कधी कधी गोष्टी सांगायच्या. रेक्टरबाई नर्सरीची गाणी शिकवायच्या. लोकनृत्य व शिवण पण शिकवायच्या. गर्ल गाइडसाठी वेगळ्या बाई होत्या.

महिन्याच्या शेवटल्या शनिवारी-रविवारी घरी जायला मिळे. मी यमू-सिंधू बरोबर काकांच्या घरी-अंब्रोली मॅन्समधे जात होते. त्या वेळी पाळक म्हणून काका काम करायचे.

रात्री दहा वाजता सर्वत्र सामसूम व्हायचं. सर्व दिवे बंद करून डॉरमेटरीत ओळीनं आम्ही झोपत असू. दाराकडं फक्त एक कंदील ठेवलेला असे. बाथरूम जरा लांब होती. जाताना कंदील घेऊन जायचा आणि मग बाथरूमचा लाइट लावायचा. अशी पद्धत होती. झोपेतून उठून एकटं बाथरूमला जायचं म्हणजे एक भीतिदायक अनुभव होता.

शाळेच्या मुख्याध्यापिका पण गोऱ्या बाई होत्या. एलिझाबेथ चांदगावकर ही ज्यू मुलगी माझी मैत्रीण होती. लिली इझिकेल, कमल होनावर ह्या माझ्या वर्गात होत्या. आम्ही सर्व जणी बास्केटबॉलच्या टीममध्ये खेळत होतो. माझा नेम चांगला म्हणून मला सेकंड शूटर केलं होतं. एन्सायक्लोपीडियाचे मोठे मोठे हाताएवढे ग्रंथ शाळेत ठेवलेले. त्यांतली सुंदर रंगीत चित्रं बघत राहावी असं वाटायचं. फर्स्ट एड़चा अभ्यासक्रम आमच्याकडून पुरा करून घेतला. परीक्षा घेऊन सर्टिफिकेट्स पण दिली होती.

दिवाळीच्या आणि उन्हाळ्याच्या सुट्टीत मी घरी येरवड्याला जात असे. दुसऱ्या वर्षापासून सरलला पण सेंट कोलंबात घातलं. आम्ही सुट्टीत घरी गेलो की खूप खेळत होतो. मजा करत होतो. जसजशी सुट्टी संपत येई, तशा आठ दिवस आधीपासून रडायला सुरुवात करत होतो. "आम्ही जाणार नाही." म्हणायचो. तरी तशीच आमची सर्व तयारी व्हायची. स्टेशनवर जाण्यासाठी आबा टांगा आणायला जायचा. टांगा येताना दिसला की आम्ही दोन्ही हातांनी टेबलाचे पाय धरून ठेवत होतो. असं केल्यावर आपलं जाणं रद्द करतील आणि आपल्याला घरी राहायला मिळेल अशी वेडी आशा वाटायची. तेवढ्यात आबा टांग्यातून उडी मारून यायचा. आमचं सामान आत नेऊन ठेवायचा आणि आम्हांला एकेकीला टेबलाच्या पायापासून ओढून काढायचा आणि उचलून टांग्यात नेऊन ठेवायचा. त्या वेळी आम्ही रडून, ओरडून इतका गोंधळ करत होतो की कोणाचंही मन द्रवलं असतं. आबा चटकन टांग्यात पुढं जाऊन बसायचा आणि टांगेवाल्याला 'चल' म्हणून सांगायचा. थोड्या वेळानं आपोआप आमचा आवाज कमी व्हायचा. टांगा गेल्यावर आई बिचारी एकटी, किती तरी वेळ रडत बसायची, असं शेजारचे लोक नंतर सांगायचे. आमच्या शिक्षणासाठी तिला किती यातना!

अशा तऱ्हेनं माझं, इंग्लिश तिसरी म्हणजे मराठी सातवीपर्यंत शिक्षण पूर्ण झालं आणि आईनं पुन्हा माझी शाळा बदलली. सेंट कोलंबा शाळा आवडायला लागली

होती. मैत्रिणी झाल्या होत्या. पण आईनं, एकदा निर्णय घेतला की त्याचं कारण विचारण्याची पण आम्हांला सवय नव्हती. आठवीसाठी येरवड्याच्या मिड्लस्कूलमधे माझं नाव घातलं. ती मुलामुलींची शाळा होती. वर्गात मी एकटीच मुलगी. जुन्या अभ्यासक्रमाप्रमाणं आठवीपासून अल्जिब्रा-जॉमेट्री हे नवे विषय सुरू व्हायला पाहिजे होते, ते तिथं नव्हतेच. फिजिक्स, केमिस्ट्रीऐवजी फक्त शरीरविज्ञान हाच विषय होता.

पण एक नवीनच विषय आम्हांला तिथं शिकायला मिळाला. जोगळेकर नावाचे सायन्सचे सर होते. ते एकदा म्हणाले की, "चला. तुम्हांला बदामी हलवा करायला शिकवतो." मग एकाला गव्हाचा चीक काढून आणायला सांगितला. एकाला तूप, एकाला साखर, एकाला मोठं भांडं, एकाला स्टोव्ह असं सर्व साहित्य जमल्यावर त्यांनी आम्हांला हलवा करून दाखवला. फारच छान झाला होता. आम्हांला सर्वांना देऊन त्यांनी स्वत: पण खाल्ला.

एकदा शाळेत इन्स्पेक्शनसाठी दिपोटी यायचे होते. सरांनी आमची खूप तयारी करून घेतली. पुष्कळ सूचना दिल्या. चांगले कपडे घालून यायला सांगितलं. शेवटी एकदाचे दिपोटी आले. आमच्या वर्गात येऊन मुलांना प्रश्न विचारायला सुरुवात केली. तेव्हा घड्याळात पावणेतीन झाले होते. त्यांनी इंग्लिशमधून विचारलं, "किती वाजलेत?" मुलांनी उत्तर दिलं, "फिफ्टीन मिनिट्स टु थ्री." ते म्हणाले एका शब्दात सांगा. कोणालाच सांगता येईना. मला एकदम आठवलं. मी हात वर केला. ते म्हणाले, "सांग." मी लगेच उभी राहिले आणि सांगितलं की, "क्वार्टर टु थ्री." ते म्हणाले, "शाबास, बरोबर आहे." दिपोटी गेल्यावर, सरांनी आणि सर्व वर्गानं माझं फार कौतुक केलं.

माझ्या वर्गात श्याम वाघमारे नावाचा मुलगा होता. तो फार हुशार होता. त्याचा नेहमी पहिला नंबर यायचा. तो नंतर पुण्याच्या शाळेत शिकायला गेला. इंटरनंतर त्याला मेडिकलला ॲडमिशन मिळाली. तो एम०बी०बी०एस० झाला आणि आता त्याची उत्तम प्रॅक्टिस चालली आहे. येरवड्याच्या शाळेतला माझ्या वर्गातला सर्वांत जास्त शिकलेला मुलगा बहुधा तोच असावा.

येरवड्याच्या शाळेतलं इंग्लिश चौथीचं वर्ष संपलं. श्याम वाघमारेचा पहिला व माझा दुसरा नंबर आला. त्या शाळेत पुढं हायस्कूल नव्हतं. म्हणून माझी पुन्हा उचलबांगडी झाली. पुण्यात सेंट अँड्र्यूज हायस्कूलच्या होस्टेलमधे मला ठेवलं. तिथं इतिहास, भूगोल सोडून बाकी सर्व विषय इंग्लिशमधून शिकवले जात. अल्जिब्रा-जॉमेट्री व फिजिक्स-केमिस्ट्री चौथीपासून शिकवायला सुरुवात झाली होती. आणि मी पाचवीपासून प्रवेश घेतला होता. म्हणजे दोन महत्त्वाच्या विषयांचा संपूर्ण एक वर्षाचा अभ्यास मागं पडला होता. कोणाला सांगून काही होण्यासारखं नव्हतं. अर्धी फी माफ होऊन ॲडमिशन मिळाली होती. शिकवणी ठेवण्याचा विचार करणंसुद्धा अशक्य होतं. अल्जिब्रा म्हणजे काय? आणि जॉमेट्री म्हणजे काय? हे माहीत

नसताना मी बावळटासारखी वर्गात जाऊन बसत असे. मेंदूला कितीही ताण दिला तरी विषयाच्या सुरवातीचं ज्ञान माझ्या डोक्यात जाणार कुठून? सहामाहीला अल्जिब्रात नऊ मार्क मिळाले. मन खचून गेलं. तरी तशीच धीर करून गणिताचे ओगले सर यांच्याकडं गेले आणि मी त्यांना माझी अडचण सांगितली. ते म्हणाले की, "तुला वेगळं शिकवायला मला काही वेळ नाही. पण तू वर्गात शिकताना नीट लक्ष देत जा. आपोआप तुला मागचा संदर्भ लागत जाईल." मी खरंच, वर्गात जास्त लक्ष द्यायला सुरुवात केली. आणि माझ्या लक्षात आलं की, 'सर पुढचं शिकवताना मागच्याचा उल्लेख करूनच पुढं जातात.' असं करता करता, मला ते काय शिकवतात ते वर्गात कळायला लागलं. आश्चर्य म्हणजे ह्या दोन्ही विषयांची पुढं मला गोडी लागली आणि मॅट्रिकला त्या विषयांत डिस्टिंक्शन मिळालं. फिजिक्स, केमिस्ट्री या विषयांची आवड निर्माण झालीच नाही.

सेंट अँड्र्यूजमधे असताना दुसऱ्या वर्षी माझ्या वर्गात सुशीला पाटील नावाची मुलगी आली. ती एकच वर्ष शाळेत राहिली. पुढे मी बी०ए०ला असताना माझा मोठा भाऊ आबा याच्याशी तिचं लग्न झालं. पुढं त्या आमच्या 'आशावहिनी' म्हणून घरात आल्या.

तेव्हा स्वातंत्र्यलढा जोरात चालू होता; पण आम्ही मिशनच्या होस्टेलमध्ये आत अगदी बंदोबस्तात असल्यामुळं आम्हांला बाहेरच्या गोष्टी जवळजवळ काही कळत नव्हत्या. बाहेरून येणाऱ्या मुलींनी काही सांगितलं तर ते समजे. आमचे दोनतीन शिक्षक व शिपाई एवढे सोडून आम्हांला दुसऱ्या पुरुषाचं दर्शन आठ-आठ दिवसांत होत नसे. रविवारी चर्चला जाताना आठवड्यातून एकदाच आम्ही रस्त्यावर येत होतो.

आम्ही शंभरदीडशे मुली एकत्र राहत होतो. लहान-मोठ्या, चांगल्या-वाईट, काळ्या-गोऱ्या वगैरे. त्यामुळं तिथं पुष्कळ गमती चालत. भांडणं, हेवेदावे हे तर नेहमीचेच. मोठ्या मुलींना, एवढ्या कडेकोट बंदोबस्तात प्रेमपत्रं मिळत. कोणातरी दोन मुलींत 'वेगळी'च मैत्री आहे, असं बोललं जात असे; कुणी मेट्रन बाईंच्या विशेष लाडक्या असायच्या; तेव्हा बाईंच्या भाच्यासाठी कोणाला पसंत केलं ह्यावर चर्चा चालायची; त्यांना बाईंकडून खास काही खाण्याचा पदार्थ मिळायचा; भुतांच्या आणि हडळींच्या खूप गोष्टी ऐकायला मिळायच्या. हडळ नेहमीच हिरवी साडी नेसलेली, हिरव्या बांगड्या घातलेली व केस मोकळे सोडलेली असायची. पांढरी साडी नेसून आणि केस मोकळे सोडून आली तर ते भूत असायचं. भुतांना केस बांधताच येत नाहीत की त्यांना बांधायची परवानगी नाही? काही कळत नसे.

आमचा झोपण्याचा हॉल व खोल्या वरच्या मजल्यावर होत्या. वर जायला लाकडी जिना होता. खाली शाळेचे वर्ग भरायचे. रात्री खाली कोणीच झोपत नसे. एकदा काय गंमत झाली, मध्यरात्रीचा सुमार होता. एक मुलगी झोपेतच घाबरून मोठ्यानं किंचाळत उठली आणि जिन्याकडं पळत सुटली. त्याबरोबर होस्टेलच्या सर्वच मुली एकदम उठून ओरडायला लागल्या. अंधारातच, किंचाळत, ओरडत,

धडपडत सगळ्याच जिन्याकडं धावल्या. लहान मुली खाली पडून तुडवल्या गेल्या. काहींची बोबडी वळली. खाली गेल्यावर आपल्याला धोका नाही अशी सर्वांची समजूत झाली. काहींची अनामिक भीतीनं विचारशक्ती खुंटली. विवेक गेला. इतक्यात मेट्रनबाईंनी लाइट लावले. त्या खाली आल्या व काही क्षणांचा खेळ संपला. पहिली ओरडली ती मुलगी कोण हेसुद्धा नीटसं कळलं नाही.

स्वातंत्र्यसैनिकांना पकडून तुरुंगात घालण्याचं प्रमाण इतकं वाढलं की येरवड्याचा मोठा तुरुंग भरला. ठेवायला जागा उरली नाही. तेव्हा आमच्या इंडस्ट्रियल स्कूलचा तुरुंग रिकामा करून देण्याची ऑर्डर आली. पुण्याजवळ नसरापूर नावाचं गाव आहे. तिथं जंगलात अगदी जुनी अशी जर्मन मिशनची प्रॉपर्टी होती. त्यांचे पुष्कळसे बंगले, मोठे हॉल, दिवाणखाने असे पडून होते. तिथं ह्या स्कूलच्या चारशे-साडेचारशे मुलांना व सर्व स्टाफला न्यायचं ठरलं. क्वार्टर्स रिकामे करायला सांगितलं गेलं. नसरापूरला जायला वेळ होता. तोपर्यंत आईनं नव्या खडकीत श्याम वाघमारेच्या वडिलांकडून दोन खोल्या भाड्यानं घेतल्या. तिथं आम्ही राहत असताना आईला कळलं की हन्नाबाईकाकू वारल्या. विश्वनाथरावकाका तर पूर्वीच वारले होते. त्यांच्या दोन मुली, म्हणजे कमळ व विमल ह्यांना मिशनरी लोकांनी ऑर्फनेजमध्ये ठेवलं व आईला कळवलं. ते कळल्यापासून ती फार बेचैन झाली. तिला वाटायला लागलं की त्यांना घेऊन यावं. आधीच आमची पाच जणांची जबाबदारी असताना आणखी दोन मुलींची नवी जबाबदारी घ्यायची की नाही? आपल्याला हे झेपेल का, असा विचार तिच्या मनात येत होता. आम्हांला ती विचारायची, "आणू का ग, त्या दोघींना इकडं?" आम्ही म्हणत होतो, "हो, हो, आई आण ना! आम्हांला खेळायला जास्तच मजा येईल!" पण त्यामुळं आईची जबाबदारी किती वाढेल हे कळण्याचं आमचं वय नव्हतं. शेवटी आईनं तो धाडसी निर्णय घेतला आणि त्यांना ती खडकीच्या घरात घेऊन आली.

लवकरच सर्व इंडस्ट्रियल स्कूल नसरापूरला हलवलं. आईला तिकडं राहायला जागा मिळाली. खडकीची जागा सोडून आम्ही नसरापूरला गेलो. डॉक्टर दर तीन वर्षांनी बदलायचे. त्या वेळी डॉक्टर 'तलाठी' नोकरीवर होते. डॉक्टर अगदी तरुण व तरतरीत होते. त्यांना आईच्या बाजूलाच खोली दिली होती. आई, मुलासारखी त्यांची काळजी घ्यायची. आम्ही दोघी होस्टेलमधे राहत होतो. सुट्टी असेल तेव्हा आई येऊन घरी घेऊन जायची. आम्ही राहत होतो तो नसरापूरचा परिसर मला फारच आवडायचा. भोवती दाट जंगल होतं. जवळच खळखळून वाहणारी नदी. जंगलात जांभळाची झाडं, करवंदीची जाळी, केवड्याचं बन, बांबूचं बन, वड, पिंपळ आणि इतर किती किती प्रकारची झाडं असायची! शिवाय घरासमोर चिकूची आणि आंब्याची पुष्कळ झाडं लावलेली होती.

ह्या जंगलात वाघ आहेत असं लोक सांगत. साप तर आम्हांला पण दिसायचे.

एकदा पायवाटेनं जाताना एक मोठा लांडगा आडवा जाताना दिसला. आम्ही घाबरून जागीच उभे राहिलो; परंतु त्यानं आमची दखल पण घेतली नाही. तो रुबाबात पावलं टाकत निघून गेला व झाडीत दिसेनासा झाला.

विमलची आणि माझी जोडी छान जमली होती. तिचा माझ्यावर इतका विश्वास की मी म्हणेन त्याला ती कधी नाही म्हणाली नाही. दुपारची जेवणं झाली की मी म्हणायची, "चल विमल, फिरायला जाऊ या." की ती लगेच निघायची. आम्ही दोघी त्या जंगलात वेड्यासारख्या भटकायचो. जांभळं, करवंदं, कैऱ्या जे मिळेल ते खात होतो. पाय दुखेपर्यंत फिरत होतो.

कमळ आणि सरल, विमल आणि मी अशा कामासाठी आमच्या जोड्या ठरलेल्या होत्या. आमचं काम झाल्यावर आम्ही कितीही वेळ फिरलो तरी आम्हांला कोणी बोलत नसे.

आम्ही अनेक वेळा नदीवर फिरायला, कधी धुणं धुवायला जात असू. नीरा नदी आम्हांला फार आवडायची. तिचं पात्र रुंद आणि वाहतं पाणी नितळ पारदर्शी. त्या आरशात स्वत:लाच बघताना गंमत वाटायची. एकदा विमल आणि मी धुण्याची गाठोडी घेऊन नदीवर कपडे धुवायला गेलो होतो. नदीच्या वरच्या बाजूला उंचवटा होता. तो उतरून आम्ही खडकावर बसून कपडे धुण्यात गुंग होऊन गेलो होतो. इतक्यात कोणीतरी ओरडतं आहे असा भास झाला. म्हणून बघतो तर कमळ व सरल वरच्या बाजूला उभ्या राहून सांगत होत्या की, 'पाण्यातून एक मोठी पिवळी धामण खाली तुमच्या बाजूला येते आहे. तुम्ही पाण्यातून बाहेर निघा.' आम्ही इतक्या घाबरलो, की अर्धवट धुतलेल्या कपड्यांची ओली गाठोडी बांधून ती घेऊन पळत सुटलो. आता ओल्या, लाल चिकणमातीचा उंचवटा चढून वर जायचं होतं. आम्हांला गाठोडी घेऊन वर चढताच येईना. पाय घसरून पुन्हा खाली येत होतो. त्या गोंधळात ओली गाठोडी सरळ लाल, चिकणमातीत टाकली आणि कशातरी धडपडत त्या दोघी उभ्या असलेल्या उंचवट्यावर गेलो आणि धामण कुठं आहे ती बघितली. सहासात फूट लांब, पिवळीधम्मक धामण पाण्यातून सळसळत जाताना दिसली. तिचा विजेसारखा वेग आणि तिचं झळकणारं सोनेरी पिवळेपण भुलवून टाकणारं होतं. ती निघून जाईपर्यंत आम्ही वरच उभ्या राहिलो. मग खाली येऊन पुन्हा सगळे कपडे नीट धुऊन मग घरी गेलो. भेटेल त्याला ही गंमत सांगून खूप हसलो.

सुट्टी संपली की आई आम्हांला बसनं पुण्याला घेऊन जायची. मधे वेळ असला तर क्वचित एखादा सिनेमा दाखवायची. 'देवता','माणूस' किंवा एखादा पौराणिक. एकदा असाच सिनेमा पाहून आम्हांला होस्टेलमधे सोडून ती पुन्हा नसरापूरला गेली. कुलकर्णी नावाचे सुपरिंटेंडंट होते. गेल्या गेल्या त्यांनी तिला बोलावलं आणि म्हणाले, "काय, झालं का नाटक, सिनेमा पाहून?" हे ऐकताच ती भयंकर चिडली. त्यांना काहीच उत्तर न देता घरी येऊन रडत बसली. ह्या सुशिक्षित म्हणवणाऱ्या माणसानं इतक्या खालच्या थराला जाऊन तिचा अपमान करावा हे तिला सहन झालं

नाही. पुष्कळदा ती ह्या प्रसंगाची आठवण काढून दु:खी व्हायची.

दुसऱ्या वेळी पुण्याला जाण्यासाठी बस स्टँडवर आलो. बसला वेळ आहे असं कळलं म्हणून मी इकडं तिकडं भटकायला लागले. जवळच एक पाण्याचा डोह होता. तऱ्हतऱ्हेच्या झाडांनी आणि वेलींनी तो वेढलेला होता. मान वर करून पाहिलं तर पाण्यावर वाकलेल्या एका झाडावरून, अगदी हाताच्या अंतरावर एक हिरवीगार, चमकदार शेंग खाली लोंबताना दिसली–शेवग्याच्या शेंगेएवढी लांब. ती इतकी मोहक आणि तजेलदार होती की, ती तोडून घेण्याचा मला मोह झाला. आणि मी एकदम हात वर केला आणि शेंग धरणार इतक्यात ती शेंग आपोआप हलली. घाबरून मी हात मागं घेतला. माझ्या लक्षात आलं की ती शेंग नसून, तो हिरवा साप आहे. नीट बघितल्यावर तसे लोंबणारे आणखी साप दिसले. पळत जाऊन आईला सांगितलं. ती म्हणाली, "अगं, तो हिरवा साप आहे. तो वरून टाळू फोडतो. तू पुन्हा तिथं जाऊ नकोस."

नसरापूरला फार डास होते. एकेकाला मलेरिया व्हायला सुरुवात झाली. आई इंजेक्शन देत नसे म्हणून डॉक्टर स्वत:च सगळ्यांना इंजेक्शन द्यायचे. आणि एक दिवस डॉक्टर तलाठींनाच थंडी भरून ताप आला. सगळ्या चार-पाचशे लोकांसाठी तिथं एकच डॉक्टर होता. गावातसुद्धा दुसरा चांगला डॉक्टर नव्हता. तेव्हा त्यांना आजारी पडून चालण्यासारखं नव्हतं. लवकर बरं व्हायला पाहिजे म्हणून त्यांनी स्वत:च आपल्या मांडीत इंजेक्शन टोचून घेतलं.

गावातले लोक पण अडचणीच्या वेळी त्यांच्याकडंच येत. एकदा रात्री त्यांच्या अंगात ताप असताना गावातून कंदील घेऊन काही लोक आले. त्यांना उठवलं व म्हणाले की, "डॉक्टर एक बाई अडली आहे. कसंही करून तुम्ही चला आणि तिला सोडवा. नाहीतर बाई आणि तिच्या पोटातलं मूल दोघंही वाचणार नाहीत." क्षणाचाही विलंब न लावता ते उठले. कपडे केले, शाल पांघरली आणि आपली बॅग घेऊन त्यांच्याबरोबर निघून गेले. बरोबर माझा भाऊ हरीश होता. दोन तासांनी परत आले आणि आईला म्हणाले, "आई आणि मूल दोघंही वाचले."

एकदा बैलानं पोटात शिंग मारलेल्या माणसाला घोंगडीत गुंडाळून, लोकांनी उचलून त्यांच्याकडं आणलं. मधे लुडबुडण्याची आमची नेहमीच घाई असायची. डॉक्टरांनी पोटावरची घोंगडी बाजूला केली. आडवंतिडवं पोट फाटलं होतं. भयंकर दृश्य दिसत होतं. त्यांनी लगेच पोट पुन्हा झाकून टाकलं आणि त्यांना म्हणाले की, "त्याला मोठ्या हॉस्पिटलमधे लवकर घेऊन जा. इथं ऑपरेशन थिएटर नाही. मी काही करू शकणार नाही."

मालूताई ही शाळेच्या डेप्युटी सुपरिटेंडेंटची एक तरुण सुंदर मुलगी होती. ती अंघोळीला गेली आणि आत बेशुद्ध पडली. कारण ऐनवेळेस कशीतरी तयार केलेली ती बाथरूम होती. बंब आत पेटत होता. धूर बाहेर जायला वाट नव्हती.

तिच्या आईच्या लवकर लक्षात आलं आणि तिनं तिला बाहेर काढलं. ती बेशुद्ध झाली होती. लगेच डॉक्टरांना बोलावलं. लागणारी औषधं घेऊन ते पळतच तिकडं गेले. त्यांच्या मागून आम्ही पण पळालो. त्यांनी तिला उघड्या अंगणात बाजेवर आणून ठेवलं व इतक्या चपळाईनं सर्व हालचाली केल्या की आम्ही बघतच राहिलो. काही मिनिटांतच त्यांनी तिला शुद्धीवर आणलं.

तेव्हा, तो तरुण, गोरा व चपळ डॉक्टर आम्हांला अगदी हीरोसारखा वाटायचा. आम्ही तशा लहान आणि शाळकरीच होतो. त्याची भाषा गुजराती. ती आम्हांला फारशी समजत नसे. आमच्या मोडक्या इंग्लिश बोलण्याची ते खूप चेष्टा करायचे आणि आम्हांला चिडवायचे.

दिवस खूप मजेत चालले होते. पुढे राजकैद्यांना सोडून देण्यात आलं. लहान मुलांचा तुरुंग रिकामा झाला, आणि आमचा नसरापूरचा मुक्काम संपला. खळाळणाऱ्या नदीच्या पाण्यात खेळणं संपलं. जंगलात मनसोक्त भटकणं संपलं. खूप वाईट वाटलं.

सेंट अँड्र्यूज होस्टेल व शाळा सुरूच होती. होस्टेलचे नियम फार कडक होते. सकाळी साडेपाचलाच मेट्रनबाई घंटा वाजवून उठवायच्या. थंडी असो, पाऊस असो, मुलगी लहान असो, मोठी असो, सर्वांना एकच नियम. सर्वांना साड्या नेसाव्या लागत आणि केसांचा आंबाडा बांधावा लागायचा. तोंडाला पावडर लावायची नाही. काजळ तर मुळीच नाही. केस साधे सरळ विंचरायचे. फुगे काढायचे नाहीत. शाळेला जाण्याच्या आधी बाजरीची अर्धी भाकर आणि थोडी भाजी मिळायची. बाकी काही नाही. भाकर खाण्याची मला सवय नव्हती. आणि त्यात गवारीची भाजी असली की मला उपासच घडायचा.

ठरलेल्या वेळी मेडिकल तपासणी होत असे. तसेच साथ आली की कॉलरा, टॉयफॉइडच्या लसीची इंजेक्शनं द्यायला डॉक्टर यायचे. एका तपासणीत, ज्यांना रोज दूध दिलं पाहिजे त्यांच्या यादीत माझं नाव गेलं; पण त्याचा कोणी विचार केला नाही. कारण शिक्षणाचा, तिथं राहण्याचा व जेवणाचा पूर्ण खर्च करणं आईला शक्य नव्हतं. अर्धी भाकरी देऊन का होईना पण आम्हांला शिक्षण दिलं हे मिशनरी लोकांचे आमच्यावर उपकारच आहेत, हे मला विसरून चालणार नाही. आपण गरीब आहोत याची खंत कधी वाटली नाही. कारण त्याच परिस्थितीतून आलेल्या बऱ्याच मुली, तिथं असत.

मला खेळण्याची फार आवड होती. शाळेत मी थ्रोबॉल, नेटबॉल, लगोरी, लंगडी अगदी श्वास कोंडेपर्यंत खेळत असे. घरी सुट्टीत, हुतूतू, आट्यापाट्या, आणि दुपारी, पत्ते, कॅरम काचाकवड्या वगैरे खेळ अगदी मनसोक्त खेळत होतो.

आमचं घर तसं लहानच होतं. पुढं लाकडी चौकटी असलेला व्हरांडा. आत एक खोली, पुढं स्वयंपाकघर व मोरी. मागं उघडा वाडा व एक मोरी. मागच्या दारानं

बाहेर पडलं की, उघड्यावर, मागच्या अंगणात नळ होता. नळाला खूप जोरानं व दिवसभर पाणी यायचं. बाजूला डॉक्टरांचं घर होतं. दोन घरांच्या मधे बोळासारखी जागा होती. तिथं विजयानंदनं कबुतरं ठेवली होती. पांढरी शुभ्र, शेपटाला पंखा असलेली जोडी, काळीभोर जोडी, तपकिरी रंगाची जोडी, अशी सुंदर सुंदर कबुतरं होती. तो त्यांची खूप काळजी घ्यायचा. त्यानं कोंबड्या पण सांभाळल्या होत्या. व्हाइट लेग हॉर्न, ऱ्होड आयलंड रेड व काही गावठी होत्या. एक रुबाबदार कोंबडा होता. 'टॉमी' नावाचा कुत्रा व 'बदाम' नावाचा बोका होता. 'टॉमी' आणि 'बदाम', दोघांनाही आम्ही नसरापूरला नेलं होतं. थोड्या दिवसांनी 'बदाम' कुठं पळून गेला समजलंच नाही. 'बदाम'चा गुलाबी-तपकिरी फिका रंग मात्र आठवणीत राहिला. ह्या पक्ष्यांच्या, प्राण्यांच्या सहवासात आमची सुट्टी अगदी मजेत जायची.

विजयानंदला गाण्याची फार आवड होती. तो सायकलवरून पुण्याला गाण्याच्या क्लाससाठी जायचा. बाज्याची पेटी, दिलरुबा आणि तबला त्यानं घेतला होता. वेळ मिळेल तेव्हा तो एकटाच गात आणि वाजवत बसायचा. तो फारसा आमच्यात मिसळत नसे. घरात कमी बोलायचा व नादिष्टपणं एकटाच काहीतरी करत बसायचा. त्याची आणि आबाची आम्हांला भीती वाटायची. आबा मोठा. तो आनंदी स्वभावाचा होता. त्याला चित्रकलेची फार आवड होती. एकटाच रानात जाऊन चित्र काढत बसायचा. फोटो काढायचाही त्याला नाद होता. कविता करायची, चित्र काढायची आवड कमी-अधिक प्रमाणांत तिघा भावांना पण होती.

आबाला इंटर झाल्यावर 'किंग्ज कमिशन' घेऊन सैन्यात जायचं होतं; पण आईनं जाऊ दिलं नाही. कारण सर्वांत वडील तो होता आणि तिचा फार मोठा आधार होता. त्यानं बी०ए० होऊन नोकरी करावी आणि घरातल्या वाढत्या खर्चाला हातभार लावावा अशी तिची इच्छा होती. त्यानं तिचं ऐकलं. शिक्षण पूर्ण झाल्यावर रेशनिंग ऑफिसरची नोकरी धरली. आईला तो फार आवडायचा. दिवसभर तिचं 'आबा','आबा' चालू असायचं.

धाकटा हरिश्चंद्र. तो लहानपणापासून मस्तीखोर व दांडगा. तो आमच्याबरोबर कॅरम, पत्ते खेळायचा. खेळताना चूक झाली की तो मांडीवर फटाफट चापट्या मारायचा. त्याचा रुंद व दणकट हात इतका लागायचा की, मी रडत बसायची. पण त्याचं आईला नाव सांगत नसे. सरलला मारलं की ती आईला सांगायची. मग आई त्याला रागवायची. म्हणून तो सहसा तिला मारत नसे. माझ्या सारख्या खोड्या काढायचा. नाक नकटं म्हणून येता-जाता नाक ओढायचा. "थांब, ओढून तुझं नाक सरळ करतो." म्हणायचा.

मला झुरळाची फार भीती वाटे. म्हणून एकदा हातात झुरळ घेऊन माझ्या मागं लागला. "तुझ्या अंगावर टाकतो." म्हणाला. मी पळत सुटले आणि तो माझ्या मागं, बोळातून घरात व घरातून बोळात. दमून गेले तरी पाठ सोडीना. शेवटी त्यानं ते अंगावर टाकलंच. तेव्हापासून मला झुरळाची जास्तच भीती वाटायला लागली.

उडणारं झुरळ आलं की नकळत किंकाळी बाहेर पडते व मी पळत सुटते.

एकदा अंधार पडल्यावर मी बाहेरच्या नळावरून पाणी आणायला जात होते. पायरीच्या खाली पाय ठेवल्याबरोबर मला अंगठ्याला काहीतरी चावलं. मी जोरानं ओरडले. कंदील आणून पाहिलं तर तो विंचू होता. आईनं लगेच पोटॅशियम परमँगनेट टाकून तो दंशाचा भाग जाळला. दुसऱ्या दिवशी त्या जागेवर मोठा फोड आला. समोरच्या ग्राउंडवर मुलं खेळत होती. मी पायरीवर बसून त्यांचे खेळ बघत होते. हरीश पण माझ्या बाजूला बसला होता. तो हळूच उठून आत गेला. माझं लक्षच नव्हतं. आतून पिन घेऊन आला आणि मला नकळत, ती फोडाला लावली. त्याबरोबर फोड फुटला. त्यातून पाणी निघालं आणि आग व्हायला लागली, तेव्हा मी पायाकडं पाहिलं, तर फोड फुटला आहे आणि हा मोठमोठ्यानं हसतो आहे. तो अशा कोणा ना कोणाच्या सतत खोड्या काढत असायचा.

विजयानंदचं आणि हरीशचं मुळीच पटत नसे. दोघांची भांडणं, मारामाऱ्या सारख्या चालू असायच्या. आई घरात नसायची. त्यांना सोडवायला कोणी नसे. आम्ही दोघी घाबरून जात होतो, म्हणून आईनं त्यांच्या शाळा बदलायच्या असं ठरवलं. हरीशला मुंबईत विल्सन हायस्कूलच्या हॉस्टेलमधे ठेवलं. तो हुशार होता. अभ्यासात तसंच खेळात पण नेहमीच पुढं असायचा. क्रिकेट हा त्याचा आवडता खेळ. विल्सन कॉलेजमधे गेल्यावर त्याला कॉलेजच्या टीममधे घेतलं. बोलिंग व बॅटिंग या दोन्हींतही तो तरबेज होता.

चांगली उंची, प्रमाणबद्ध शरीर, उंच नाक, देखणा चेहरा, स्मार्ट व उत्तम क्रिकेट खेळाडू त्यामुळं कॉलेजमधल्या मुली त्याच्या मागं लागायच्या–त्याची ओळख करून घ्यायला धडपडायच्या. हिंदू मुली हरीशच्या मागं लागतात म्हणून ग्रेस साळवी नावाच्या ख्रिश्चन मुलीशी–जी सेंट अँड्र्यूजमधे माझ्यापुढं दोन वर्षं होती–त्याची ओळख करून देण्यात आली. साहजिकच अभ्यासाकडं दुर्लक्ष व्हायला लागलं. तेव्हा आईनं त्याला समज दिली. त्याचा खेळ कमी केला. तो बी०एस्सी० झाल्यावर, ओळखीचं रूपांतर प्रेमात झालं आणि ग्रेस साळवी ह्या आमच्या 'उषावहिनी' झाल्या. त्यानं काही वर्षं इतर नोकऱ्या केल्या. नंतर पोलीस सब्इन्स्पेक्टरच्या जागेसाठी निवडला गेला. तिथं तो पहिल्या क्रमांकानं पास झाला आणि बरीच वर्षं त्याच नोकरीत राहिला. निवड झाली तेव्हा हरीशला पिस्तूल मिळालं. त्या वेळी आम्ही सगळे एकत्र जमलो होतो. रुबाब दाखवण्यासाठी हातात पिस्तूल घेऊन हरीश घरी आला. त्यानं विजयानंदला समोर उभं केलं आणि त्याच्यावर पिस्तूल रोखलं. हरीश म्हणाला, "पिस्तूल रिकामं आहे. नुसती गंमत."

मला काय वाटलं, कळलं नाही. पण मी एकदम उठले आणि विजयानंदच्या पुढ्यात उभी राहिले. म्हटलं, "मुळीच चालवायचं नाही पिस्तूल. त्यात गोळी असू दे की नसू दे." मी विजयानंदला बाजूस सारलं आणि मीही दूर झाले. हरीशनं पिस्तुलाचा दट्ट्या ओढला तसा जबरदस्त आवाज झाला आणि थेट भिंतीला भिडून

भिंतीला भोक पडलं.

क्षणमात्र आम्ही सगळे अवाक झालो. आजूबाजूची माणसं धावत आली.

सुदैवानं सगळं इथंच संपलं. पण नंतर हरीश म्हणाला, "या गोळीचा हिशेब कसा देऊ?"

घरात पहिलं लग्न त्याचंच झालं. सुट्टीत घरी आलो की आमचे खेळ सुरू व्हायचे. दुपारी कॅरम, पत्ते, सागरगोटे, असे घरात बसून खेळ चालायचे. किंवा आई झोपली असेल तर, तुरुंगाच्या मागं मुलांनी केलेला बगिचा होता तिथं जायचं. ह्या लहान बागेत फुलझाडं व फळझाडं होती. कुंपणाच्या कडेवर आंब्याची, चिंचेची झाडं होती. जरा आत, गोल मोठे पेरू, सीताफळं, रामफळं अशी झाडं होती आणि मधे पाण्याचा हौद व त्याभोवती सुंदर सुंदर फुलझाडं होती. बागेच्या आत जाण्याची फार इच्छा असायची. पण फाटकाला माळीबुवांनी भलं मोठं कुलूप लावलेलं असायचं. मग माळीबुवा आसपास नाहीत ह्याची खात्री करून घ्यायची व कुठून तरी फटीतून आत शिरायचं. आत फार थंड आणि शांत वाटायचं. आधी पिकायला आलेले पेरू काढून हौदावर बसून पोटभर खायचे आणि बाहेर पडताना आंब्यांच्या दिवसांत कैऱ्या किंवा चिंचा पाडून, फ्रॉकमधे लपवून, घराच्या मागच्या बाजूनं यायचं. शेजारी 'मुल्ला' नावाचे ड्रॉइंगमास्तर राहायचे. त्यांच्या घरी जायचं. त्यांच्या बायकोकडून कैऱ्या कापून घ्यायच्या. मीठ-मिरची घ्यायची, थोड्या तिला पण द्यायच्या. तिला कैऱ्या फार आवडायच्या. ती तरुण आणि गोरी होती. तिची लहान मुलं होती. तिथंच बसून कैऱ्या खायच्या. ती जोंधळ्याच्या भाकरी करत असली तर बघत बसायचं. तिची प्रत्येक भाकर पातळ, पांढरी शुभ्र, गोल असायची. भाजताना पुरीसारखी पूर्ण फुगून वर यायची. इतक्या सुंदर भाकरी पुन्हा कधी पाहिल्या नाहीत. तिच्या मुलांचे आम्ही खूप लाड करत होतो.

लहान बगिचावरून पुढं गेलं की मोठा बगिचा असायचा. तिथं मुलांना शेतीचं शिक्षण दिलं जात होतं. तिकडं नुसतं भटकायला फार आवडायचं. शेताच्या कडेनं गप्पा मारत फिरायचं. ते निर्मनुष्य असं रान होतं. आसपास वस्ती नव्हती. क्वचित एखादी बैलगाडी किंवा माणूस जाताना दिसायचा. मधे मधे वडाची झाडं होती. आनंदानं निर्हेतुक, निसर्ग न्याहळीत आम्ही मनसोक्त भटकत असू. संध्याकाळ झाली की पावलं आपोआप घराकडं वळत.

आईचा ख्रिस्तावर पूर्ण विश्वास होता. वडील पण देवभक्त होते. आई रोज सकाळी बायबल वाचून प्रार्थना करायची. रात्री झोपताना पुन्हा प्रार्थना करायची. आम्हांला पण लहानपणापासून तीच सवय तिनं लावली होती. जमेल त्या रविवारी चर्चला जायचं. आमच्या घरापासून चर्च फारच लांब होतं; पण होस्टेलमधून दर रविवारी, सर्व मुलींना, ओळीनं चालत चर्चमधे जावं लागे. बहुतेक सर्व मुली धार्मिक प्रवृत्तीच्या होत्या. देवाशी एकरूप होऊन, प्रार्थनेत तल्लीन झालेल्या त्या मुली पाहिल्या की मी पण त्यांचं अनुकरण करण्याचा प्रयत्न करत असे; पण खरी भक्तीची

भावना निर्माण होत नसे. एकाग्रता होत नसे. मनात नाना प्रश्न उभे राहत. उदाहरणार्थ, आपण हे सर्व कुणाला सांगतो आहोत? तो ते खरंच ऐकतो आहे का? आणि हे सर्व त्याला कशासाठी सांगायचं आहे? आपल्या मागण्या तो पुऱ्या करणार आहे का? तसा अनुभव तर आतापर्यंत कधीच आला नव्हता. द्विधा मन:स्थिती होत होती तेव्हापासूनच ही आंदोलनं सुरू झाली.

बाबांचे एक मित्र पुण्यात मिशनरीच्या हुद्यावर काम करायचे. क्वचित्प्रसंगी आई त्यांच्या घरी भेटायला जायची. सोबत आम्हांला दोघींना पण न्यायची. त्यांचा बंगला खूप मोठा होता. गाडी पण होती. त्यांचा एक तरुण मुलगा होता. तो कॉलेजमधे इंटरच्या वर्गात शिकत होता. त्याला बंगल्याच्या आउट हाउसमधे एक स्वतंत्र खोली दिली होती. असेच एकदा आईबरोबर आम्ही त्यांच्या घरी गेलो होतो. मोठी माणसं बोलत बसली होती. इतक्यात तो आला व मला म्हणाला की, "तू आत ये ना!" मी आईकडं पाहिलं. ती म्हणाली, "जा." सरल आईजवळच बसून राहिली. मी उठले आणि त्याच्यामागून गेले. मागच्या बाजूनं बंगल्यातून बाहेर पडल्यावर डाव्या हाताला दोन खोल्या होत्या. त्यांतली एक त्याची होती. खोली उघडून तो मला आत घेऊन गेला. मी खुर्चीवर बसले. आत एक कॉट, टेबल, खुर्ची, पुस्तकं आणि त्याचे कपडे होते. मी तशी लहानच होते. नववीत असेन. मला फार भीती वाटायला लागली. त्याच्या एकदोन प्रश्नांची उत्तरं दिली. आणि म्हणाले, "मी जाते." पण तो मला जाऊ देईना. "थांब ना जरा, इतक्यात काय घाई आहे? नको ना जाऊस." मी आणखीनच घाबरले. अगदी रडकुंडी आले. कारण खोलीत, दोघांशिवाय कोणीच नव्हतं. इतक्यात आई आणि इतर माणसं मला बोलवायला आली आणि मी उठून बाहेर पळाले. कोणाला काहीच गैर वाटलं नाही.

त्यानंतर आबाचा मित्र म्हणून तो येरवड्याला यायला लागला. आबा नसला तरी घरात बसून राहायचा. मी पुढं जात नसे. कारण त्याच्याबद्दल आकर्षण वाटावं असं माझं वय नव्हतं आणि मला त्याची भीती वाटायला लागली होती.

महिन्याच्या शेवटल्या शनिवारी, रविवारी आम्हांला होस्टेलमधून घरी जाण्याची परवानगी असायची. रविवारी संध्याकाळी पुन्हा नेऊन पोचवावं लागत असे. अशाच एकदा आम्ही घरी गेलो होतो. रविवारी आईला खूप ताप आला. संध्याकाळी तिला बिछान्यातून उठता येईना. भावांपैकी कोणीच घरात नव्हतं. आणि इतक्यात हा मुलगा आला. होस्टेलचे कडक नियम लक्षात घेता, आईला वाटलं की, हा नाही तरी परत पुण्याला जाणार आहे तेव्हा ह्याच्या बरोबरच दोघींना पाठवून द्यावं. त्याला तिनं तसं विचारलं. तो आनंदानं हो म्हणाला, "चला लवकर तयारी करा. तुम्हांला नेऊन सोडतो." आम्ही गपचूप तयार झालो व निघालो. वाटेनं तो फारसं काही माझ्याशी बोलला नाही. शाळेच्या पायरीपर्यंत वर आला आणि त्यानं मला शेकहँड केला. आणि माझा हात असा दाबला की मी आयुष्यात प्रथमच थरारून गेले.

दिवस, महिने जात राहिले. मी शिकत होते. सुट्टीत घरी जात होते. मोठी होत होते. समज येत होती. आणि माझ्या लक्षात आलं की हा मुलगा माझ्यावर फार प्रेम करतो आहे. तो वरचेवर घरी येऊ लागला. आई एकदा मला विचारायला लागली की, "ताई, तो तुला लग्नाची मागणी घालतो आहे. तुला करायचं का त्याच्याशी लग्न?" मला धक्काच बसला. मी म्हणाले, "अग, मी अजून शाळेत आहे. मला पुढं शिकायचंय, इतक्यात काय लग्न करू?" तिलाच उलट मी प्रश्न केला की, "तुला वाटतं का मी त्याच्याशी लग्न करावं?" तर ती म्हणाली, "नाही. तुझ्यासारखी मुलगी मी त्याला देणार नाही. आणि मला तुम्हांला शिकवायचंय. मला शिकायला मिळालं नाही, पण मी माझ्या मुलींना शिकवणार आहे. पण सांगून ठेवते, नापास व्हायचं नाही. नापास झालांत तर मात्र शिक्षण बंद. एका वर्गात दोन दोन वर्षं फी भरायला माझ्याजवळ पैसे नाहीत." तिची सतत आर्थिक ओढाताण चालू होती. पण ती आम्हांला शिकवून स्वत:ची शिक्षणाची हौस पुरी करून घेणार होती.

आमच्या दृष्टीनं लग्नाचा प्रश्न मिटला होता. तसं आईनं त्याला सांगितलं. तेव्हा तो अतिशय दु:खी होऊन घरी गेला. आणि काही दिवसांनीच पुन्हा घरी आला. माझ्याकडून काहीच प्रतिसाद मिळत नव्हता. तरी हे एकतर्फी प्रेम चालूच होतं. आईनं त्याला पुन्हा सांगून पाहिलं पण तो वेडाच झाला होता. तो ऐकेचना. मी आणि विमल घरात होतो. आम्हांला आईनं सांगितलं की तुम्ही दोघी जणी मागच्या दारात जाऊन बसा. मुलं कोणी घरात नव्हती. आई भयंकर चिडली. त्याला हाताला धरून बाहेर काढला. शेवटी त्यानं एकच विनवणी केली की एकदा मला तिच्याशी बोलू द्या. ती आईनं ऐकली. ती मागच्या दारी आली आणि मला म्हणाली, "त्याला तुझ्याशी बोलायचं आहे. पुन्हा तो इकडे येणार नाही. तेव्हा बोळात जा, तो समोरून येईल." मी विमलला घेऊन पुढं झाले. पोटात भीतीनं गोळा आला होता. इतक्यात तो समोरून आला. उभा राहिला आणि म्हणाला की, "विमलला जायला सांग. मला फक्त तुझ्याशीच बोलायचंय." बाप रे! आता हा माझं काय करील, कळेना. विमल मागं गेली. मग म्हणाला, "माझं तुझ्यावर फार प्रेम आहे. तू मला फार आवडतेस. पण, तू लग्न करायला तयार नाहीस. आता निदान मला वचन दे की, मला तू कधी विसरणार नाहीस." मी तसं वचन दिलं. मग म्हणाला की, "चल मला सोडायला. त्या कोपऱ्यापर्यंत माझ्याबरोबर चाल." बोळाच्या टोकापर्यंत मी जड पावलांनी त्याच्याबरोबर चालत गेले. तिथं मला शेकहँड करून तो निघून गेला, आणि खिन्न वातावरणात आम्ही तिघी न बोलता बसून राहिलो. पुन्हा तो मला कधीच भेटला नाही.

अशा तऱ्हेनं मॅट्रिक पास झाले. येरवड्यापासून सर्वांत जवळ 'वाडिया कॉलेज' म्हणून तिथं फर्स्ट इयरला नाव घातलं. तेव्हा बसेस सुरू झाल्या होत्या. म्हणजे अर्ध्या तासानं एक बस यायची. ती खरं किती वेळानं यायची हे कोणास ठाऊक! कारण माझ्याजवळ घड्याळ नव्हतं. एक बस जर चुकली तर त्या तुरळक रहदारीच्या

रस्त्यावर मला एकटीला तासभर उभं राहावं लागायचं. कारण त्या भागातून कॉलेजला जाणारी दुसरी तरुण मुलगी मला कधीच दिसली नाही.

एकदा अशीच कॉलेजला जायला घरातून निघाले. त्या लांबलचक, निर्मनुष्य रस्त्यानं एकटीच हातात पुस्तकं घेऊन चालले होते. अर्ध्या रस्त्यावर असताना माझ्या उजव्या खांद्याला एक जोरदार धक्का बसला. बघते तर सायकलवरून एक शीख जवान मागं बघत जोरजोरानं पुढं निघून गेला. मी पण धडधडत्या काळजानं, दुखरा खांदा दाबत, बसस्टॉपवर जाऊन उभी राहिले.

घराच्या मागच्या बाजूला नळावर कायम करायला गेलं की, तोच डेक्कन कॉलेजकडून येणारा रस्ता दिसायचा. कंपौंडच्या कडेला, शेराची व वडाच्या झाडांची गर्दी होती. तिथं नीट पाहिलं तर, माणसांची हालचाल दिसायची. मी विमलला दाखवलं. तर ती म्हणाली, "अग ताई, ते तीन शिखडे तिथं बसून आपल्याला बघतात."

बाप रे! म्हणजे त्याचे आणखी दोन साथीदार आहेत तर! सुट्टीत आईनं आम्हांला चौघींना स्वयंपाकाच्या पाळ्या लावून दिल्या होत्या. विमलची व माझी जोडी होती. आम्ही कमळ व सरलला सांगितलं की, "दुपारचं जेवण आम्ही करू, तुम्ही दोघी संध्याकाळचं करा." संध्याकाळ आम्हांला मोकळी मिळायची. आमची फिरायची हौस कमी न होता वाढली होती. संध्याकाळी घरात आम्हांला चैन पडत नसे. रस्त्याच्या पलीकडं वाळूचे मोठे मोठे ढीग टाकलेले होते. ती जाड वाळू होती. तीत सुंदर सुंदर शिंपल्या आणि शंख मिळायचे. संध्याकाळी पुष्कळदा आम्ही त्या ढिगावर जाऊन बसत होतो. शिंपल्या गोळा करत होतो. कधी 'हैदोसहुल्ला' असं म्हणून त्या ढिगात नाचत होतो.

आमच्या शेजारी तेव्हा दुसरे डॉक्टर राहायला आले होते. त्यांची बहीण काही दिवसांसाठी त्यांच्याकडं पाहुणी म्हणून राहायला आली होती. ती आमच्याच वयाची तरुण मुलगी होती. एकदा आम्हांला कळलं की, पर्णकुटीवर गांधीजी आले आहेत आणि संध्याकाळी रोज प्रार्थना होते. आम्ही विचार केला की आपण अजून गांधीजींना पाहिलं नाही. त्यांचा आवाज ऐकला नाही. इतक्या जवळ ते येऊन राहिले आहेत तर आपण ही संधी सोडू नये. गांधीजींना इतक्या जवळून आपल्याला कधी बघायला मिळणार? तेव्हा, मी, विमल व डॉक्टरांची बहीण, तिघी जणी, प्रार्थनेची वेळ साधता येईल अशा बेतानं संध्याकाळी घरातून निघालो. खडकीच्या बाजूनं येरवडा गावातून गेलं तर लवकर तिथं पोचता येतं. म्हणून रस्ता ओलांडला. थोड्या अंतरावर मोठा उतार आहे. खाली उतरलं की इंडस्ट्रियल स्कूल दिसेनासं होतं. उतारावर आमच्या लक्षात आलं की, तीन शीख आपला पाठलाग करताहेत. विमल आणि मी घाबरलो. पाहुणीला काहीच माहीत नव्हतं. घरी परत जाण्याची मनाची तयारी नव्हती. आयुष्यात प्रथमच गांधींजींना बघायची जबरदस्त इच्छा होती. शेवटी आम्ही ठरवलं की, आपण जायचंच. पर्णकुटीवर जाऊन परत येईपर्यंत खूप वेळ लागेल. ते बहुतेक कंटाळून निघून जातील. आम्ही झपाझप पुढं निघालो. येरवडा

गावातून बाहेर पडलो. समोर बंडगार्डनकडं जाणारा पूल दिसतो. त्याच्याखालून मुळामुठा नदी वाहते. उजव्या बाजूला वळलो. खाली म्युनिसिपालिटीची लहान शाळा लागली. तिथूनच पर्णकुटीच्या पायऱ्या सुरू होतात. वर जाण्याची आमची ही पहिलीच वेळ. पायऱ्या चढून घाबरत घाबरत वर गेलो. आपल्याला कोणी घालवून तर देणार नाही ना, अशी भीती वाटत होती. पहारेकऱ्याला विचारून पुढं गेलो.

बंगल्याच्या व्हरांड्यात उंचावर गांधीजी मांडी घालून बसले होते. त्यांच्यासमोर खूप गर्दी होती. प्रार्थना चालू झाली होती. पण ते स्वत: काहीच बोलत नव्हते. नंतर कळलं की आज त्यांचा मौनाचा दिवस आहे. खूप वाईट वाटलं. पण जाऊ दे, बघायला मिळाले हेच खूप झालं. त्या समाधानात खाली उतरायला सुरुवात केली. अंधार व्हायला सुरुवात झाली होती. सूर्य मावळला होता. आता आम्हांला घराची ओढ लागली होती. शिखांची भीती वाटायला लागली. पायऱ्या संपल्या. खाली येऊन पाहतो तर तीन शिखडे आमची वाट पाहत उभेच. त्यांतल्या एकाजवळ सायकल होती. त्यांना बघून आमच्या रक्ताचं पाणी पाणी झालं. हा कठीण प्रसंग आहे. गाव संपल्यावर पुढे मोठं माळरान आहे. तिथं चिटपाखरू नसतं. "अगं विमल, आता काय करायचं? ह्यांचा बेत तरी काय आहे? आता कोणाची मदत घ्यायची?" विमल म्हणाली, "आता सरळ चालायला सुरुवात करू. मदत घ्यायला आपल्या ओळखीचं इथं कुणी नाही. वेळ काढला तर आणखी अंधार वाढेल." "अगं, पण ते तिघं आहेत. अंगावर आले तर आपण काही करू शकणार नाही." असं मी म्हणाले खरी, पण चालत राहण्याशिवाय गत्यंतरच नव्हतं. गाव संपला. तळं लागलं. तळ्याला वळसा घालून माळावर आलो. पुढं उंचवटा होता. आमचं कंपौंडसुद्धा तिथून दिसत नव्हतं. पाठलाग चालूच होता, आम्ही वळून पाहत होतो. त्यांच्या-आमच्यातलं अंतर कमी कमी होत होतं. उंचवट्याच्या आधीचा खोलगट भाग आला आणि एक शीख झपाट्यानं आमच्या समोर आला. दोन्ही हात लांब करून उभा राहिला. आणि म्हणाला "ठैरो." मी मधे होते. उजव्या हाताला पाहुणी व डाव्या हाताला विमल. पाहुणी मुलगी चपळाई करून बाजूनं धूम पळत सुटली. तिला पकडायला त्यांच्यापैकी कोणीच पळाला नाही. मागं दोघं सायकल घेऊन उभे होते. विमलनं माझा हात सोडला नाही. तितक्यात त्यानं हातानं माझा उजवा दंड पकडला. ओढायला लागला. त्याबरोबर विमलनं जिवाच्या आकांतानं ओरडायला सुरुवात केली. "छोड दे, छोड दे, छोड दे." ती ओरडायची थांबत नाही आणि मला सोडत नाही हे पाहिल्यावर लोक येतील ह्या भीतीनं त्यानं माझा दंड सोडला व तो मागं गेला. त्याबरोबर आम्ही दोघींनी पळायला सुरुवात केली. आम्ही इतक्या जोरानं त्या उंचवट्यावरून पळत आमच्या हद्दीत आलो की आम्हांला तिथं खालीच बसावं लागलं. या शर्यतीत आम्ही कुठल्याही धावपटूलासुद्धा हरवलं असतं. आणि मग आमच्या फाटकाच्या आतल्या लहानशा पुलावर बसलो आणि भयंकर हसत सुटलो. हसण्याचा पूर ओसरल्यावर आम्ही सावकाश घरात गेलो. जसं काहीच झालं नाही.

घरात सांगितलं तर घराबाहेर पडायला पण देणार नाहीत म्हणून गप्पच बसलो.

नंतर कळलं की ह्या मिलिटरीच्या लोकांनी एका कॉलेजमधल्या मुलीला असंच पळवून नेलं. तिच्यावर बऱ्याच जणांनी बलात्कार केला आणि मारून, तिला कुठं टाकलं ते कधी कुणाला कळलंच नाही. तिच्या आईवडिलांनी, भावानं खूप शोध केला. पोलिसांची मदत घेतली. किती वर्षं ते तिला शोधत होते पण ती सापडली नाही. ती कायमचीच नाहीशी झाली. तेव्हा कळलं की मी किती भयंकर प्रसंगातून सहीसलामत सुटले आहे! अर्थात विमलमुळं. विमलही पळून गेली असती तर आज माझं नखपण कुणाला दिसलं नसतं. त्यानंतर फिरण्यातला आनंदच संपून गेला.

त्या वेळेस इंडस्ट्रियल स्कूलचे सुपरिटेंडेंट शेखसाहेब होते. त्यांचा आमच्या घरासमोर मोठा बंगला होता. भोवती बगिचा होता. मोठे वृक्ष होते. त्यांना तीन मुली होत्या. सर्वांत धाकटी अगदी लहान होती. तिला खेळवायला आम्ही घरी आणत होतो. मुली फार सुंदर होत्या. मधली मुलगी झुबेदा. ती सात-आठ वर्षांची असेल. ती फारच सुंदर व गोड दिसायची. गोरा रंग, मोठे डोळे, गोल चेहरा. ती आमच्या घरी पुष्कळदा यायची, खेळायची. आम्हांला ती फार आवडायची. एकदा आई सांगत आली की, "झुबेदाला ताप आला." रोज सकाळी आणि संध्याकाळी आई तिचा ताप बघायला बंगल्यावर जायची. डॉक्टरांची ट्रीटमेंट चालूच होती. तिचा ताप काही केल्या उतरेना. तो टॉयफॉइडचा ताप आहे असं डॉक्टरांनी सांगितलं. तेव्हा त्या तापावर औषधं निघाली नव्हतीच. मुलगी खंगत चालली. पथ्य फार असायचं. ताप तर हटत नव्हता. तिच्या वडिलांनी शुश्रूषेसाठी दोन नर्सेस ठेवल्या. रात्री एक व दिवसा एक. त्या नर्सेस त्यांच्या ड्रेसमधे यायच्या. पांढरा शुभ्र फ्रॉक, मोजे व तुऱ्याच्या पांढऱ्या टोप्या. त्या नर्सला बघताच ती लहान व अशक्त झालेली मुलगी घाबरून किंचाळायला लागे. ती तिला पुढेच येऊ देईना. "वो नही चाहिये. उसे अंदर मत लाओ. वो शैतान है." सगळे घाबरून गेले. शेवटी असं ठरलं की, नर्सनं, ड्रेसमधे न येता साध्या कपड्यातच यावं. कॉलेजमधून घरी आल्यावर संध्याकाळी मी तिला भेटायला जात होते. ती मला म्हणायची, "मला तुझ्यासारख्या बांगड्या आणून दे. पिना आणून दे." मी तिला आणून देत होते. ती दिवसेंदिवस अशक्त होत चालली. तिचा सुंदर चेहरा निस्तेज होत चालला. एका संध्याकाळी, तिला भेटून मी खिन्न मनानं बाहेर पडत होते. इतक्यात बंगल्याच्या डाव्या बाजूला बगिचात कोणीतरी अर्धवट उजेडात उभं आहे असं दिसलं. मी पुढं निघाले तर, त्यानं मला 'इकडे ये' म्हणून खुणावलं. बघते तर तो झुबेदाचा तरुण मामा होता म्हणून मी पुढं गेले. तो इंजिनिअरिंग कॉलेजमधे शिकणारा. मला वाटलं झुबेदा इतकी सीरियस आहे, तेव्हा त्याबद्दल ह्याला काही बोलायचं असेल. तोपर्यंत त्याची माझी ओळखही नव्हती. आम्ही एकमेकांशी बोललो पण नव्हतो.

मी गेल्याबरोबर तो म्हणाला की, "तू मला फार आवडतेस. मी तुला रोज बघतो. माझं तुझ्यावर फार प्रेम बसलंय. तू माझ्याशी लग्न करशील का?"

अरे, हा काय प्रकार आहे? मला एवढा धक्का बसला! काय बोलावं तेच कळेना. नंतर मी त्याची समजूत घातली की, "तुम्ही मुसलमान, मी ख्रिश्चन, मी शिकते आहे. माझी तुझी धड ओळख नाही. तुमच्या घरात एक लहान मुलगी सीरियस आहे आणि तू लग्नाच्या गोष्टी करतोस! मी तुझ्याशी लग्न करणं अशक्य आहे. तू मला क्षमा कर." आणि मी घरी निघून गेले.

एक दिवस, संध्याकाळी आई घरी आली. ती फार घाबरलेली दिसत होती. म्हणाली की, "झुबेदा वारली." आणि एकदम थंडी वाजल्यासारखी तिला हुडहुडी भरली. आम्ही तिला गादी घालून दिली. अंगावर जाड पांघरूण घातलं पण तिचं हुडहुडणं वाढतच होतं. आम्ही सगळ्या जणी तिच्या अंगावर पडलो. तिला दाबून ठेवण्याचा प्रयत्न केला. पण शरीर उडायचं थांबेना. शेवटी आम्ही एक जड गादी तिच्या अंगावर घातली आणि त्या गादीवर आम्ही पडलो. बऱ्याच वेळानं, सावकाश ते थडथडणं कमी होत गेलं. पण तिला ताप भरला नव्हता. नुसताच शॉक बसला होता. दोन दिवस तिचं अंग फार दुखलं. ती बिछान्यातून उठू शकली नाही. आम्ही झुबेदाला बघून आलो. कळायला लागल्यानंतर पाहिलेला हा पहिला मृत्यू.

फर्स्ट इयरला कॉलेजमधे अभ्यास चांगला चालला होता. कॉलेजजीवन, मिशन शाळेपेक्षा फार वेगळं वाटत होतं. घरी राहत असल्यामुळं सर्व प्रकारचं स्वातंत्र्य होतं. आई पण आनंदात होती. तिचा मला कसलाच त्रास नव्हता. मी पण आनंदात होते. अभ्यास आवडायला लागला होता. मैत्रिणी मिळत होत्या. माझ्या वर्गात शिरीष अत्रे होती. तिची आई आणि माझी आई विल्सन कॉलेजमधे असताना मैत्रिणी होत्या. तिची आई गव्हर्नमेंट ट्रेनिंग कॉलेजमधे प्रिन्सिपॉल होती. शिरीषच्या आईला जेव्हा कळलं की मी शिरीषच्या वर्गात आहे तेव्हा त्यांनी मला भेटायला बोलावलं. शिरीषबरोबर मी त्यांच्या घरी गेले. मी सोनूबाईची मुलगी म्हणून मला भेटून त्यांना फार आनंद वाटला. त्या मला म्हणाल्या की, "जेवायला ये एकदा. कधी येतेस?" मी म्हणाले, "आईला विचारून सांगते." घरी जाऊन आईला सांगितलं की, "त्या मला जेवायला बोलावताहेत. काय करू?" आई म्हणाली, "जाऊ नकोस." मला एकदम आश्चर्य वाटलं. मी म्हणाले "असं का म्हणतेस?" त्यावर ती म्हणाली की, "तू त्यांच्याकडं जेवलीस की, दुसऱ्या वेळी त्यांना तुला बोलवावं लागेल. आपली परिस्थिती ही अशी. आपलं घर लहान आणि साधं. त्यांचा पाहुणचार करणं आपल्याला जमणार नाही. तेव्हा तू जाऊ नयेस हे बरं." पुढं म्हणाली, "कॉलेजमधे असताना मी पण फार हुशार होते. आणि धीट होते. मी कॉलेजला गेले नाही तर, माझ्या मैत्रिणी पण जात नसत. मला फार चांगले मार्क मिळायचे, पण मला पुढं शिक्षण घेता आलं नाही. माझी आई वारली आणि घराची, भावंडांची जबाबदारी माझ्यावर पडली. आणि आज ही नोकरी करायची वेळ आली." मला तिचं म्हणणं पटलं आणि मी गप्प बसले.

अशा तऱ्हेनं वर्ष संपलं. परीक्षा झाली व मी पास झाले. पुन्हा घरात माझं कॉलेज बदलण्याच्या गोष्टी सुरू झाल्या. त्याचं कारण मला कोणी सांगितलं नाही. पण घरगुती कारण असावं, असं नंतर लक्षात आलं. मला व विजयानंदला मुंबईला विल्सन कॉलेजमधे घालायचं ठरलं. प्रेमचंद्रराव्कांच्या घरी राहायचं व विल्सनमधे शिकायचं असं ठरलं. पुन्हा एकदा माझी उचलबांगडी झाली आणि काकांच्या घरी रवानगी झाली. मी आणि काकांची मुलगी सिंधू–दोघी एकाच वर्गात–इंटरला गेलो होतो. सिंधू फर्स्ट इयरपासून तिथं शिकत होती. मला कॉलेज नवीन होतं. कोणाचीच ओळख नव्हती. तिनं माझी हळूहळू सर्वांशी ओळख करून दिली. आता तिच्या मैत्रिणी त्याच माझ्या मैत्रिणी झाल्या. नंदा रेळे, कुमुद प्रधान, शकू. तसंच मुलांपैकी विठ्ठल प्रभू, मंगेश पाडगावकर, नरेश मंत्री–म्हणजे कवी शरदकुमार मंत्री यांचे धाकटे भाऊ. ते आमच्या डिव्हिजनमधे नव्हते. पण ह्या दोघांचे मित्र होते.

सिंधू व मी एकत्रच कॉलेजला जात होतो व येत होतो. आमची जोडी छान जमली होती. बहिणींपेक्षा मैत्रिणी म्हणावं असं प्रेम आमच्यांत वाढू लागलं होतं. काका अंब्रोली चर्चमधे प्रीस्ट होते. चर्चच्या बाजूला मोठं एकमजली घर होतं. मोठ्या मोठ्या खोल्या व सर्व बाजूंनी गॅलरी. काकू स्वयंपाक छान करायच्या. यमू त्यांना खूप मदत करायची. सिंधू व मी त्या सांगतील ती मदत करत होतो. तारा जरा लहान व अशक्त म्हणून तिला कोणी त्रास देत नसे. रत्नाकर, बाळ व विजयानंद ह्यांचे आपापले उद्योग चालू होते. काकांची शिस्त कडक होती. काजळ, पावडर लावून नटणं, फॅशन करणं त्यांना मुळीच चालत नसे. मुलींनी गॅलरीत उभं राहायचं नाही. कारण समोरच ख्रिश्चन मुलांचं हॉस्टेल होतं. कॉलेज सुटल्याबरोबर घरी आलं पाहिजे असा नियम होता. मला ते लाडानं 'टी' म्हणायचे. सिंधूला 'गोळ्ळा' व ताराला 'वय्या' असे विचित्र शब्द त्यांनी तयार केले होते. सतत घरात कोणाची तरी टिंगल, चेष्टामस्करी चालू असायची. काकूंचीदेखील खूप थट्टा करायचे.

एकदा सर्वांचे फोटो काढले होते. ते घरी आणले. काकूंनी स्वत:चा फोटो पाहिला. चांगलाच आला होता. पण त्यांना काही तो आवडला नाही. म्हणाल्या, "मला नाही आवडले फोटो. माझा फोटो मुळीच चांगला आला नाही." त्यावर काका म्हणाले, "माणूस जसं आहे, तसा फोटो येणार. वेगळा कसा येऊ शकेल"? असे विनोद करून सर्वांना सतत हसवायचे.

प्रभू आणि मंगेश विल्सनच्या जुन्या हॉस्टेलमधे राहायचे. ही मुंबईतच राहणारी मुलं असून होस्टेलमधे का राहतात, असा प्रश्न मला नेहमी पडायचा. आमच्या क्लासरूमच्या मागच्या बाजूला हॉस्टेलची गॅलरी दिसायची. कधी तरी स्वत:त मग्न असलेला मंगेश तिथं सिगरेट ओढत अस्वस्थपणं फिरताना वर्गातून दिसायचा. रंग गोरापान, मोठे व किंचित बाहेर आलेले डोळे, अशक्त व नाजूक शरीर. दाढी वाढवून, मानेपर्यंत लांब उलटे फिरवलेले काळेभोर केस. हनुवटीबरोबर कापलेली बुल्गॅनिन-टाइप दाढी, पांढरा झब्बा आणि खूपच मोठ्या बॉटमचा पांढरा लेंगा. हा

अवतार पाहून माझ्या मनात त्याच्याबद्दल कुतूहल निर्माण झालं. नंतर कळलं की तो कवी आहे. सिंधू त्याला "ए कवी" म्हणूनच हाक मारायची. एकूण पात्र जरा विनोदीच दिसायचं.

त्याच्या उलट प्रभू. सावळा रंग, निरोगी व प्रमाणबद्ध शरीर. उंच, स्मार्ट, बोलका व चटपटीत. शर्ट, पँट घालणारा. हातात कायम सिगरेट आणि कॉलेजमधल्या मुलींना आकर्षित करून घेईल असं व्यक्तिमत्त्व. अशी ही जोडी.

कॉलेजमधे कुठंही भेटलो की आम्ही चौघं थांबून गप्पा मारत होतो. एकमेकांची टिंगल करत होतो. सिंधू मला 'ताई' म्हणायची म्हणून प्रभू पण 'ताई' म्हणायला लागला. पण मंगेश मात्र 'ताई' म्हणत नसे. तो माझ्याशी जास्त बोलत नसे. फक्त एकटक डोळ्यांत बघत राहायचा. मला कसंतरीच वाटायचं. मी एकदा त्याला म्हणाले की, "असा बघतोस काय?" तर म्हणाला की, "तुझे डोळे फार सुंदर आहेत. मला आवडतात." सिंधू बरोबर असताना मंगेश असा बघायला लागला की मला फार संकोच वाटायचा. आमची दोघांचीच अशी कधीच भेट होत नसे, किंवा आम्ही सर्व जण मिळून, फिरायला, सिनेमाला किंवा हॉटेलात कधीच जात नव्हतो. तरीसुद्धा एकप्रकारचं आकर्षण वाटू लागलं होतं.

एकदा आम्हांला कळलं की त्यानं 'वायूस' नावाची एक कविता लिहिली आहे. मी त्याला म्हणाले, "कविता लिहून पूर्ण झाली की, मला वाचायला दे. बघू या मला कळते का"! कारण तोपर्यंत मी काही फारशा कविता वगैरे वाचत नव्हते. पुस्तकात अभ्यासाला असतील त्याच कविता वाचलेल्या होत्या.

काही दिवसांनी त्यानं एक घडी केलेला कागद वर्गात माझ्या हातात दिला. मी हळूच उघडून पाहिला तर त्यात 'वायूस' ही कविता होती. मला वाटलं की, ही कविता माझ्यावर लिहिली असेल म्हणून वाचून पाहिली. पण फारसं काही कळलं नाही. म्हणून पुन्हा पुन्हा वाचली तरी फारसा प्रकाश पडला नाही.

आमच्या कॉलेजची ट्रिप विहार लेकला जाणार असं ठरलं. आम्ही घरी सांगितलं आणि काकांनी परवानगी दिली. आम्हांला खूप आनंद झाला. आम्ही सर्व विहार लेकला गेलो. मुली, मैत्रिणी वेगळ्या बसलो, फिरलो, जेवलो थोडे खेळ खेळलो. मुलांमधे फारशा मिसळलो नाही. परत येताना बसेस लांब थांबल्या होत्या. तेवढं अंतर चालत जायचं होतं. मला जास्त वेगानं चालता येत नाही. त्यामुळं मी इतर मुलींपासून मागं पडत गेले. मंगेशनं ते पाहिलं. मग तो पण रेंगाळायला लागला आणि माझ्या बरोबर चालायला लागला. आम्ही दोघं मागं राहून गप्पा करत चाललो होतो. त्यानं मला माझ्यासंबंधी पुष्कळ प्रश्न विचारले. आई, वडील, भाऊ, बहिणी ह्यांची त्याला फारशी माहिती नव्हती. राहते कुठं? सुट्टीत घरी जाणार काय? वगैरे. तो इतका आपलेपणानं, आत्मीयतेनं बोलत होता की ह्याला माझ्याबद्दल नक्कीच काही तरी जास्त वाटतं ह्याबद्दल माझी खात्री झाली. मला जास्त बोलता येत नसे.

सर्व जण एकत्र असतानासुद्धा मी इतकी कमी बोलत असे की त्यांनी मला 'अबोली' नाव दिलं होतं. मग तो एकटाच असताना तर तोंडातून शब्द फुटणं कठीण झालं. आम्ही दोघं मागं पडलोय, हे फारसं कुणाच्या लक्षात आलं नाही असं वाटतं. वाट संपू नये असं वाटत होतं. तरी चालता चालता वाट संपली. बसमधे बसून घरी आलो. मनात एक हुरहूर घेऊन, एक भीती घेऊन. आणि एक आनंदसुद्धा.

कॉलेज चालू होतं. हे दोघं फारसे वर्गात दिसत नसत. कधी आले तरी प्रोफेसर काय शिकवतात ह्याकडं लक्ष देत नसत. जवळ वहीसुद्धा नसायची. नोट्स घेण्याची तर गोष्टच नाही. कवी तर आपल्या धुंदीतच असायचा. मनात कविता असायची. चुकून नजर माझ्याकडं वळली तरी त्या नजरेत ओळखसुद्धा नसायची. मला कळत नसे की हे सर्व काय चाललंय? बाकी सर्व मुलं वर्गात लक्ष देतात, अभ्यास करतात, चांगले मार्क मिळवण्यासाठी धडपडतात. ह्यांना कशाचीच पर्वा कशी वाटत नाही? मी बोलले तर प्रभूशीच थोडं बोलत असे. कारण मला मंगेशची भीती वाटायची. तो एकदम काहीतरी बोलून जाईल, तो जरा फटकळ आहे असं वाटायचं.

आम्हीं दोघी अभ्यास करत होतो त्यापेक्षा जास्त गप्पा करत होतो. सिंधूला खूप बोलायला आवडायचं. लॉजिक हा विषय मला जरा कठीण वाटायचा. नीट अभ्यास केल्याशिवाय धडगत नाही हे कळत होतं. तरी ह्या दोघांबद्दल आमच्या खूप गोष्टी चालायच्या. एक दिवस सिंधू मला म्हणाली की, "ताई, माझी आणि ह्यांची तू येण्याच्या आधीपासून ओळख आहे, मैत्री आहे. तुला येऊन चार-सहा महिने पण झाले नाहीत. आता मला असं वाटतं की, माझ्यापेक्षा तूच त्या दोघांना जास्त आवडतेस." ती कशावरून असं म्हणत असेल? प्रत्यक्ष त्याच्या तोंडून ऐकल्याशिवाय मी हे कसं खरं मानावं? मंगेशबद्दल थोडी आशा होती. पण प्रभू तर पुष्कळ मुलींना आवडायचा. तो सगळ्यांशीच चांगलं बोलायचा.

आम्हांला एक तास मधे मोकळा होता. मंगेश तासाला आलेला होता. पहिला तास संपल्यावर मुलं बाहेर निघून गेली. सिंधू पण काही कामासाठी ऑफिसमधे गेली म्हणून मी वर्गातून बाहेर न पडता, जागेवर बसून राहिले. मंगेश पण बाजूच्या बाकावरून माझ्याशी बोलायला लागला. ते बोलणं फार खासगी होतं. त्या वेळी त्यानं मला सांगितलं की, "तू मला फार आवडतेस." मला खूप आनंद झाला व मी स्वत:वर खूष झाले. कारण कालच मला सिंधू तसं म्हणाली होती, आणि आज तेच वाक्य मला ऐकायला मिळालं. त्यावर मी पण काहीतरी बोलावं अशी त्याची इच्छा होती. पण नेहमीप्रमाणं माझ्या तोंडातून संकोचानं एक शब्द पण बाहेर पडला नाही.

त्याचे लांब मानेपर्यंत वाढवलेले केस मला मुळीच आवडत नसत. "एकवेळ दाढी चालेल पण ते केस कापून घे." असं मी एकदा म्हणाले. त्यानं सांगितलं, "मला ते आवडतात, मी कापणार नाही." त्या केसांच्या कटला मी, 'इंदिरा गांधी कट' असं नाव दिलं होतं, त्या वेळेस इंदिरा गांधींचे केस तेवढे लांब असायचे.

त्यानंतर कॉलेजच्या गॅदरिंगचा दिवस आला. आम्ही कोणी कशातच भाग घेतला

नव्हता. फक्त कार्यक्रम बघायला जायचं होतं. माझ्याजवळ एक काळ्या रंगाची खडीची साडी होती. साडीला, चंदेरी खडीची किनार आणि मधे पण खडीची नक्षी होती. साडी सुंदरच होती. तीच गॅदरिंगला नेसून जायचं ठरवलं. कुंकू आम्ही लावत नव्हतो. लग्न होईपर्यंत कधीच लावलं नाही. पावडर, काजळ यांवर घरात बंदी होती. केसांचं वळण जरा वरून घेतलं तर, फुगे काढते म्हणत. चांगल्या घरातल्या मुली असे केस करत नाहीत. तेव्हा स्वच्छ तोंड धुऊन, पुसून, कपडे बदलणं एवढीच तयारी असायची. अशा तयार होऊन आम्ही दोघी कार्यक्रमाच्या आधी थोडा वेळ कॉलेजमधे पोचलो. वरच्या मजल्यावर गेलो तर समोरून हे दोघे आले. मंगेश माझ्याकडं खाली वर पाहतच राहिला. त्या वेळी मी फारच सुंदर दिसते असा त्याला भास झाला असावा. तो एकदम त्या इंग्रजी कवितेतली ओळ पुटपुटला : "शी वॉक्स इन ब्यूटी." 'सौंदर्ययुता ती चाले रजनीऐसी/या नक्षत्रांकित कृष्णतलम परिवेषी'. आणि भारावून जाऊन ओढाळ नजरेनं माझ्याकडं असा पाहायला लागला की, उभ्याउभ्याच थिजून गेल्यासारखं मला वाटायला लागलं. दुसऱ्या दिवशी वर्गातल्या वर्गात फिशपाँड्स देण्याचा कार्यक्रम होता. मुलामुलींनी एकमेकांना फिशपाँड्स दिले. त्या वेळी मी त्याच्या लांब केसावरून झिपऱ्या की काय असं काहीतरी बोलले. नेमके शब्द आता आठवत नाहीत. आणि त्याला माझा भयंकर राग आला. तो पण मला रागारागानं काहीतरी बोलला आणि इतका चिडला की माझ्याकडं वर नजर करून पाहीना. हा राग खूप दिवस टिकला. सिंधू म्हणाली, "ताई, तू असं बोलायला नको होतंस." मी म्हणाले, "पण आता काय करू? बोलून तर गेले."

असा एक महिना गेला. तो आपणहून बोलायला तयार नव्हता. घाबरून मला पण बोलायचा धीर होत नव्हता. ही अवस्था फार त्रासदायक व्हायला लागली. कशातच लक्ष लागे ना. धड झोप लागेना तेव्हा विचार केला की, आता काय होईल ते होईल. काही बोलला तरी ऐकून घेण्याची मनाची तयारी केली आणि एका मंगळवारी त्याच्यापुढं जाऊन उभी राहिले, आणि म्हणाले, "अजून गेला नाही का राग? सोडून दे आता. माझं चुकलं. पुन्हा असं बोलणार नाही."

हे ऐकून त्याच्या मनात चलबिचल झाली असावी. माझ्याकडं पाहिलं आणि चेहऱ्यावरचे भाव बदलले. चेहरा निवळला. शांत झाला आणि त्यानं अबोला सोडला. त्या वेळी जर मी स्वत: त्याच्याशी बोलायला गेले नसते तर, तो आपणहून कधीच माझ्याशी बोलायला आला नसता याची मला खात्री आहे.

घरात तो एकच मुलगा. त्याच्या आधी एक मुलगा झाला होता पण तो लहानपणीच वारला. मंगेशच्या पाठीवर तीन मुली झाल्या: मोठी कुमुदिनी, दुसरी प्रभा (जयश्री) आणि तिसरी सुहासिनी. आईचं माहेरचं नाव इंदिराबाई–सासरचं रखमाबाई. त्यांना साहित्याची फार आवड होती. शिक्षण कमी असलं तरी वाचन फार होतं. त्या स्वत: कविता लिहीत. वडील केशवराव पाडगावकर हे आर्किटेक्ट होते. ते म्युनिसिपालिटीत नोकरी करत आणि बाहेरची कामं पण नंतर करत. मंगेशची आई ही एकुलती

एक मुलगी असल्यामुळं, मंगेशची आजी ही म्हातारपणी त्यांच्याकडंच राहत असे. तिचा तर हा फारच लाडका नातू. एकुलत्या एक मुलीचा एकच मुलगा. आई-वडिलांचा पण नवसाचा एकच मुलगा. त्यामुळं त्याच्या मनाविरुद्ध सहसा कोणी वागत नसे आणि तो कोणाचं ऐकत नसे. हे सर्व समजल्यावर मला त्याच्या जगावेगळ्या वागण्याचं, आणि गिरगावात घर असून होस्टेलमधे राहण्याचं रहस्य उलगडलं.

नरेश मंत्री हे त्याचे मित्रच. पण दुसऱ्या डिव्हिजनमधे असल्यामुळं आमच्या वर्गात फारसे येत नव्हते. इतर वेळी ते, प्रभू आणि मंगेश हे त्रिकूट एकत्रच असायचं. नरेश मंत्री सावळ्या रंगाचे होते. त्यांनी पण दाढी राखली होती. त्यांना चष्मा होता. लेंगा व झब्बा हाच त्यांचा पेहराव. स्वभावानं शांत, कमी बोलणारे, आत्ममग्न व अभ्यासू वृत्तीचे होते. त्यांचं संस्कृत भाषेवर प्रभुत्व होतं. आमच्यात ते फारसे मिसळत नसत.

परीक्षा जवळ आली. आम्ही दोघी घाबरून अभ्यासाला लागलो. कॉलेजमधे इथं तिथं थांबून गप्पा मारणं बंद केलं. हे दोघे मात्र पूर्वीसारखेच भटकताना दिसायचे. सिंधूनं त्यांना विचारलं की, "अभ्यास किती झाला?" तर म्हणाले की, "आम्ही अभ्यास कुठं करतो? अभ्यास कशाला करायचा?" आम्हांला नवल वाटलं. आम्हांला वाटलं की, ह्यांना काही सांगायचं नाही. आम्हांला कळू न देता खूप अभ्यास करून चांगले मार्क मिळवून चकित करून दाखवायचं असेल.

परीक्षेचा दिवस उजाडला. आम्ही हॉलवर गेलो. आमचे सर्वांचे नंबर एकाच हॉलमध्ये होते. आत जाऊन बसलो. पेपर मिळाले. एकदा प्रश्न वाचून आम्ही लिहायला सुरुवात केली. त्या वेळी डोळ्यांपुढं फक्त पेपर दिसत होता. पंधरावीस मिनिटं गेली असतील. इतक्यात डाव्या बाजूला काहीतरी आवाज झाला आणि थोडी गडबड ऐकू आली. बघते तर हे त्रिकूट, सुपरवायझरकडं पेपर देऊन हॉलबाहेर चाललेलं. अरे, पंधरा मिनिटांत ह्यांचा पेपर कसा लिहून झाला? मनाला धक्काच बसला. ते बाहेर गेले आणि हॉलमध्ये पुन्हा शांतता झाली. माझं मन फार अस्वस्थ झालं. क्षणभर वाटलं, आपण पण उठून जावं. तरी पुढचा पेपर लिहिणं भाग होतं. आम्ही पेपर लिहून संपवला आणि बाहेर येऊन बघतो तर हे तिकडंच घोटाळत उभे होते. आम्ही विचारलं, "पेपर का लिहिला नाही?" तर म्हणे की, "आम्ही परीक्षेला बसणारच नव्हतो. ह्या शिक्षणात काही अर्थ नाही. ह्यानं माणसाचा काय विकास होणार? आम्ही तिघं आता दक्षिणेकडं प्रवासाला तीनेक वर्षं जाणार आहोत. रामकृष्ण परमहंस, विवेकानंद यांच्या आश्रमांत राहू. काम करून पैसे मिळवू आणि पुढचा सिलोनपर्यंत प्रवास करू. प्रवासात जे अनुभव येतात त्यानं ज्ञान वाढतं, माणूस कळतो आणि आपला विकास होतो."

हे विचार मी पहिल्यांदाच ऐकत होते. त्या वयातसुद्धा ते तितकेसे पटत नव्हते. नुसता प्रवास करून चरितार्थ चालवण्यासाठी पैसा कसा मिळणार? मला फार फार वाईट वाटलं. मंगेशनं कॉलेज सोडण्यात फार मोठी चूक केली असं वाटलं.

त्याच्याबद्दल माझ्या मनात प्रेमाची भावना निर्माण होत असताना त्यानं आयुष्याला ही भलतीच कलाटणी दिली. ह्याचा पुढं फार त्रास होणार आहे, हे तेव्हासुद्धा कळत होतं.

त्याच्या घरी पण खूप गहजब झाला असं नंतर कळलं; पण त्यानं कोणालाच जुमानलं नाही. तो आपल्या कवितेच्या धुंदीत आणि मस्तीत मग्न असे. सर्वांचाच नाइलाज झाला. प्रभू आणि नरेश त्यांच्या घरी पण सर्व जण चिडले. मंत्रींचे भाऊ शरद हे तेव्हा बँकेत नोकरीला होते. त्यांचा शालिनीवहिनींशी प्रेमविवाह झाला होता. ते वेगळे राहत होते आणि नरेशनी पण पुढं घर सोडलं.

आमची परीक्षा संपली आणि मुंबईतला मुक्काम पण संपला. एका वर्षासाठीच मला व विजयानंदला काकांकडं ठेवायचं ठरलं होतं. आता पुन्हा येरवडा. आमचं दोघांचं पुण्याचं बसचं तिकीट काढलं. आम्ही सकाळीच घरात सर्वांचा निरोप घेऊन निघालो. बस स्टँडवर गेलो. विजयानंदनं मला बसमधे खिडकीजवळ बसवलं आणि तो बाहेर फिरत होता. इतक्यात बघते तर मंगेश, मी जाणार म्हणून मला भेटायला तिथं आला. त्यानं माझा पत्ता घेतला आणि स्वत:चा दिला. पुष्कळ बोलला. पत्र लिहिण्याचं वचन घेतलं. प्रेमानं माझा हात हातात घेऊन निरोप घेतला आणि तो निघून गेला.

खिन्न मनानं प्रवास सुरू झाला. ही मैत्री पुढं टिकवता येणार नाही. मी येरवड्यात– तो प्रवासाला निघून जाणार. भेट फक्त पत्रानंच होऊ शकेल. ते काही खरं नाही. हे सर्व आता विसरून गेलं पाहिजे अशा विचारात, खंडाळा, लोणावळा करत प्रवास संपला आणि आम्ही पुणे स्टेशनवर टांगा करून घरी आलो.

सरलनं अहमदनगरच्या कॉलेजमधे ॲडमिशन घेतली होती. विमलला व्हर्नाक्युलर फायनलसाठी होस्टेलमधे ठेवलं होतं. आबानं रेशनिंगमधली नोकरी सोडून सरकारी नोकरी धरली होती. तो सोलापूरला राहत असे. हरीश मुंबईला सब्इन्स्पेक्टर होता. तो घर मिळवण्याच्या खटपटीत होता. तेव्हा त्याचं लग्न झालेलं होतं आणि त्याला एक मुलगा होता. काही दिवस उषावहिनी राजूला घेऊन येरवड्याला राहिल्या होत्या. कमळ ट्रेनिंग कॉलेजमधल्या मुलींच्या शाळेत शिक्षिकेचं काम करत होती. ती पुण्यात शिक्षिकांच्या होस्टेलमधे राहत असे. सुट्टीत सर्व जणी घरी जमत होतो. फिरायला जाणं आम्हांला फार आवडायचं. दुपारी घरात कॅरम, पत्ते, काचाकवड्या, सागरगोटे ह्यांपैकी काहीतरी खेळायचं. संध्याकाळी आट्यापाट्या, हुतूतू, लगोरी, ठिकरी, लंगडी असे सर्व खेळ मागच्या अंगणात आम्ही खेळत होतो. खूप मस्ती आणि धमाल चालायची. जेवण अगदी साधं असायचं; पण त्याचं काही वाटत नसे. चमचमीत खाण्याची आम्हांला सवय नव्हती. तिखट पण फार कमी. मासे तर तिकडं मिळतच नव्हते. ते मला करता पण येत नव्हते आणि खाण्याची पण माहिती नव्हती. मटण फक्त आठवड्यातून दोनदा. ते पण अर्धा किलो असायचं. रोज वरण, भात,

भाजी, खिचडी कधीतरी आमटी. एवढंच जेवण असायचं. लाडू, चकल्या, पोहे, सांजा हे करायला कोणाला वेळ पण नसायचा; आणि आईच्या पगारात ते परवडण्यासारखं पण नव्हतं. त्यामुळं ते पदार्थ पण मला करता येत नव्हते.

घरी पोचल्यावर 'पत्र लिही' असं मला मंगेशनं सांगितलं होतं. पत्ता पण दिला होता. बस स्टँडवर मला निरोप द्यायला तो आला होता तेव्हा पुष्कळ बोलत होता. माझ्या तोंडातून एक शब्द बाहेर पडला नाही. खूप प्रयत्न करूनही मला माझी भावना एका शब्दानं व्यक्त करता आली नाही. त्याची मला सारखी हुरहूर लागून राहिली होती. त्याला मी म्हणत होते की पहिलं पत्र पण तूच लिही. ते मात्र त्यानं ऐकलं नाही. मोठ्या कष्टानं मी पत्र लिहायला घेतलं. एकतर अक्षर वाईट, शुद्धलेखनाची खात्री नाही, आणि पहिलंच प्रेमपत्र. ते लिहायचं कसं? आणि काय? शेवटी लिहिलं आणि नुसती 'यशोदा' अशी सही करून पूर्ण केलं.

माझं पहिलं पत्र :

येरवडा
.४.४८

प्रिय मंगेश,

सप्रेम नमस्कार.

कालच मी इकडे आले. प्रवास मोटारीनं केला. फार मजा वाटली. विजयानंद पण माझ्याबरोबर इकडे आला आहे. तो सुट्टीत इकडेच राहणार आहे.

पत्राला आरंभ तर केला पण आता कसं लिहूं आणि काय लिहूं तें समजत नाहीं. एकसारखं माझ्या मनांत तुझं एक वाक्य घोळतंय, 'तूं मला छळलंस.' आणि जसजसा मी विचार करतें तसं तसं तें मला खरं वाटू लागलंय. खरंच, फारच छळलं मी तुला. मला कळत का नव्हत्या तुझ्या भावना? पण कांहीं करूं शकत नव्हतें मी. मला वाटायचं, मी पण खूप बोलावं तुझ्यासारखं. पण ते मला कधींच साधलं नाहीं. माझ्या भावना मला बोलून कधींच व्यक्त करता आल्या नाहीत. फार प्रयत्न केला मी पण कधीं एक वाक्यसुद्धां बोलतां आलं नाहीं मला. हा माझा अबोलपणाच कारण त्या गोष्टीला. तूं इतकं बोलल्यावर मी थोडं तरी बोलावं, अशी तुझी इच्छा असणं साहजिकच आहे. माझीच चूक होती ती. चूक म्हणण्यापेक्षां तो माझ्यांतला एक दोषच म्हटला पाहिजे.

सिंधूला मी काय काय सांगितलं असं तुला वाटतं? खरं सांगूं का? तो मंगळवार आठवतो ना? आपण वर्गांत बसून खूप गप्पा मारल्या होत्या, त्याच्या आदल्या दिवशींच सिंधू मला म्हणाली होती कीं, "ताई तूं त्या दोघांना माझ्यापेक्षां जास्त आवडतेस." तेव्हां मी म्हणालें होतें कीं, "मी तें त्यांच्या तोंडून ऐकल्याशिवाय कबूल करणार नाहीं." आणि योगायोग असा कीं, लगेच दुसऱ्याच दिवशीं मला

तुझ्या तोंडून तेंच वाक्य ऐकायला मिळालं. तेवढं जाऊन मी सिंधूला सांगितलं की, "तूं बोललीस तेंच खरं आहे." खरं पाहिलं तर मला सिंधूनंच सांगायची जरूर नव्हती. तुझ्या बाबतींत मला अगदीं खात्री होती. तूं प्रत्येक वेळेला मला म्हणतोस कीं, 'मी तुला असं कधीं सांगितलं?' पण, खरं सांग, ह्या गोष्टी काय फक्त तोंडानं सांगूनच समजतात का? ज्याची त्याला ओळख बरोबर पटते.

तुला हेंच वाक्य माझ्या तोंडून ऐकायला पाहिजे होतं. पण मला कधींच धीर झाला नाहीं बोलायचा. पण आतां मी लिहूं शकतें कीं तूंच मला जास्त आवडतोस. इतकंच नाहीं तर दुसरा कोणताच पुरुष मला इतका आवडला नव्हता. अर्थात बोलतांना मी दोघांत कधींच भेद केला नाहीं. उलट पहिल्यांदा मी प्रभूशींच जास्त बोलत असे. कारण मला तुझी भीती वाटत असे. असं वाटायचं कीं, तूं एकदम कांहींतरी बोलून जाशील. तूं जरा फटकळ असावास असं मला वाटायचं. त्यामुळं तुला माझ्याविषयीं शंका वाटत असणार. तें मला चांगलं समजत होतं. पण काय करूं? तोंडांतून शब्दच बाहेर पडत नसे. फार राग यायचा मला स्वत:चा. बरं, आतां पत्र लिहायला घेतलं तर नीट वाक्यरचनासुद्धां जमेना मला. किती खाडाखोड करून ठेवलीय मी. हसणार तर नाहींस ना ह्या पत्राला?

अरे, हो. एक गोष्ट विचारायची राहिली. वाढदिवसाला पाठवलेलं कार्ड पाहून डोळ्यांतून अश्रू कां आले तुझ्या? मला कांहीं असा अनुभव कधीं आला नाहीं.

तुमचं जाण्याचं अगदीं नक्की ठरलं का? मला आशा आहे, अजूनही बेत बदलूं शकाल तुम्ही. किती हाल होतील तुमचे! कसं सहन करणार तूं एवढं? शिवाय आईवडिलांची काय स्थिती होणार तुझ्या? मी कांहीं तुझ्या आड येत नाहीं. तुला माझ्यापेक्षां जास्त समजतं. तेव्हां तूंच नीट विचार करून काय तें ठरव. मात्र अशा वेळीं हळवं मन ठेवून चालणार नाहीं हं! मन घट्ट करून वाटेल त्या प्रसंगाला तोंड द्यावं लागेल.

बरं, आतां खरं सांग. लग्नाच्या बाबतींत तूं तुझा बेत कां बदललास? मागं एकदा मी विचारलं होतं तेव्हां तूं लग्न करणार म्हणून सांगितलं होतंस. आणि आतां कां नाहीं म्हणतोस? आणि वर मला सांगतोस कीं, लवकर लग्न करून घे म्हणून. तूं जर असा रहाणार असशील तर मला कसं सुख वाटेल लग्न करून? तूं जर सुखी नसलास तर मलाही कोणत्याच स्थितींत सुख वाटणार नाहीं.

तुझं एक एक वाक्य मला आठवतं. खरंच किती निर्दय आहे मी! एकदांसुद्धा गोड शब्द बोलले नाहीं तुझ्याशीं.

आतां रात्र फार झाली. दिवसभर घरांत फार गडबड असते. शांतपणानं बसायलासुद्धां मिळत नाहीं. म्हणून आतां बसलें लिहीत. झोप लवकर लागत नाहीं. फार विचार येतात मनांत आणि झोप उडून जाते. हें पत्र लिहायच्या आधीं पण फार विचार करावा लागला. मला कशा तऱ्हेनं पत्र लिहावं तेंच समजेना, म्हणून मी तुलाच आधीं पत्र लिहायला सांगत होतें.

यशोदा

तीनचार दिवसांनंतरची गोष्ट. संध्याकाळी कोणी तरी आलं असं वाटलं म्हणून बघते तर मंगेश! त्याच्याबरोबर एक मुलगा होता. मला एकदम आश्चर्याचा धक्का बसला, तेवढाच आनंद झाला. आणि भीती पण वाटली. आई काय म्हणेल? नशीब म्हणजे आई चांगली वागली. मी त्याची ओळख करून दिली. सोबत आलेला मुलगा हा श्रीपाद जोशी यांच्या नात्यातला होता. त्याची ओळख मंगेशनं करून दिली. आमचं गरिबाचं घर. तिथं किमती,महागाच्या वस्तू नव्हत्या. चहाबरोबर खायला देण्यासारखा पदार्थ नव्हता. मोसंबी होती ती कापून दिली व चहा केला. विमलची आणि माझी धांदल उडाली. तेवढं झाल्यावर आई म्हणाली, "त्यांना आपली शाळा दाखवू. लहान बगिचा व मोठा बगिचा पण दाखवू." तिनं परवानगी काढली आणि सर्व इंडस्ट्रियल स्कूल फिरवून दाखवलं. नंतर मला म्हणाली, "तू त्यांना बगिच्यात घेऊन जा. माळीबाबा दार उघडून देतील." आम्ही तिघं निघालो. आम्ही दोघं पुढं चाललो व तो मंगेशबरोबर आलेला मुलगा आमच्या मागून चालत होता. एकटी मी त्याच्याबरोबर कधी कुठंच गेले नव्हते. फार अवघडून गेल्यासारखं होत होतं. आधी लहान बगिचा दाखवला. तिथं खूप सुंदर फुलं होती. पेरू, चिंचा, सीताफळ, रामफळ, आंबा, यांची झाडं होती. आत फार प्रसन्न व शांत वाटलं. आमच्याशिवाय तिथं कुणीच नव्हतं. मंगेश पुष्कळ बोलत होता. शाळा पाहून तो अगदी भारावून गेला होता. बगिचा बघून आश्चर्यचकित झाला होता. नंतर मोठ्या बगिच्यात गेलो. तिथं मुलांनी शेती केलेली होती. अगदी निर्मनुष्य जागा. संध्याकाळची वेळ. त्या शेतातून आम्ही दोघं फिरत होतो. पण दोघंच नव्हतो. आमच्या मागून तो जोशींचा नातेवाईकही होता.

सर्व बघून घरी आलो. पत्र आधीच लिहून टाकलं आहे हे मी त्याला सांगितलं. घरी आईचा निरोप घेऊन ते दोघे निघून गेले. मंगेश मुंबईला गेला. गेल्याबरोबर त्याला माझं पत्र मिळालं. त्याचं उत्तर त्यानं लगेच पाठवलं. त्यानं लिहिलं की :

> ...पुण्याला तुझी माझी भेट झाली. निघाल्यापासून तुझ्या पत्राशिवाय अन्य विचार माझ्या मनांतच येऊं शकत नव्हता. किती उत्सुकतेनें तुझं पत्र मी उघडलं असेन त्याची तूंच कल्पना कर.
>
> पत्र मी एकदां वाचलं–दोनदां वाचलं–पुष्कळदां वाचलं. एखाद्या कवितेसारखं मी तें आतां पाठसुद्धां म्हणूं शकेन. अबोल यशोदा इतक्या स्पष्टपणें आपली भावना व्यक्त करूं शकेल याची मला कल्पना नव्हती. मुंबईला एका वर्षांत कधींही तुझं प्रेम तूं शब्दांतून व्यक्त केलं नाहींस आणि मौज अशी कीं तुझा हा अबोलपणा मला अभिव्यक्तीहूनही प्रिय होता. तूं न बोलूनही तुझी भावना मी जाणून होतों, आणि त्याला कारण म्हणजे तुझे डोळे. तुझ्या नकळत तुझ्या मनांतलीं सारीं रहस्यं ते मला कळवीत. तूं कितीही ठरवलंस तरी त्यांच्याइतकं तूं बोलूं शकणार नाहींस. तुझ्याप्रमाणें ते 'सांगायलाच पाहिजे का?' असा प्रश्न विचारीत नाहींत. सगळं काही मला

सांगतात, माझ्यावर त्यांचं निरतिशय प्रेम आहे.

परंतु आता तुला स्पष्ट विचारतों कीं, या प्रेमाचं पर्यवसान केवळ स्वप्नचिंतनांतच होणार का? पुष्कळ वेळां मी तुला हें विचारणार असं ठरवलं आणि तुझ्यासारखाच अबोल राहिलों, परंतु तुझं पत्र वाचल्यानंतर मी हें लिहिण्याचा-तुला विचारण्याचा निश्चय केला.

यशोदा, तुला असं वाटतं का की तुझ्यावर निरतिशय प्रेम करून मी अन्य स्त्रीशीं लग्न करूं शकेन? केवळ शरीराची गरज भागविण्यासाठीं मी जीवनाशीं-माझ्या भावनांशीं द्रोह करूं? चर्चमधल्या भिंतींतला काळोख जर तुला प्रेमाहूनही उज्ज्वल वाटत असेल-धर्माच्या शृंखला तुला प्रेमाहून पूज्य वाटत असतील तर तूं हें करूं शकशील. परंतु माझी प्रेरणा मला सांगते कीं तुला असं वाटत नाहीं. तुला मी प्रामाणिकपणें सांगतों कीं मला हें शक्य नाहीं. परंतु तुला हें शक्य नसेल, भयाच्या पिंजऱ्यांतून तूं बाहेर येऊं इच्छित नसशील तर तूं खुशाल दुसऱ्याशीं विवाह कर. मी कांहीं बोलणार नाहीं. शांतपणें हें मी सहन करीन. कोणत्या कार्यासाठी माझा जन्म झाला आहे हें मला ठाऊक आहे. माझ्या काव्यनिर्मितींत-माझ्या या पवित्र जीवनसाधनेंत कोणतीही गोष्ट आड येऊ शकणार नाहीं. धुंद होऊन मी गात राहीन. माझ्या खऱ्या प्रेमाचं गाणं आज ना उद्यां-हजार वर्षांनंतर या धर्माच्या आणि नीतीच्या दुष्ट शृंखला तोडण्याचं सामर्थ्य मानवाच्या मनांत निर्माण करील. त्या वेळी प्रेमाला भयाचा स्पर्शही होणार नाहीं.

माझ्या आईला पण मी हेंच सांगितलं की, "जिच्यावर माझं प्राणापलीकडे प्रेम आहे ती स्त्री जर दुसऱ्याशीं लग्न करणार असेल तर मीही तिच्याप्रमाणें वागावं असं तूं मला सांगशील का?" आई निरुत्तर झाली. ती म्हणाली, "म्हणूनच तूं कुणावर प्रेम करूं नको. तूं म्हणतोस तसल्या प्रेमाची कल्पना फक्त थोड्यांनाच असते. उगीच तुझं जीवन दुःखी होईल." मी तिला काय सांगूं? मी एवढंच म्हणालो, "माझ्यांतला माणूस जरी दुःखानें जळला तरी माझ्यांतला कवी त्या दुःखाचंही अमृतच करील. कारण मरणाच्याही पलीकडच्या जीवनाचा साक्षात्कार त्याला झाला आहे."

माझ्या पत्राला उत्तर देतांना तुला याबद्दल काय वाटतं तें तूं स्पष्ट लिही. त्या क्षणापुरती तरी निर्भय होऊन लिही. तुझी पावलोपावली आठवण येते आणि म्हणून मी गमतीनं तुला म्हणालों कीं, 'तूं मला छळलंस.' त्यांत सुधारणा करून मी म्हणतो की, 'तूं मला छळतेस.'

तुझ्या घराजवळच्या झाडाखालीं तूं बसलेली मला स्पष्ट दिसतेस. मी तुझ्या घरीं अकस्मात आलों तेव्हां तुझ्या डोळ्यांतून ओसंडून वाहणारं तुझं हृदय अजूनही मला स्पर्श करीत आहे. तुला असं वाटतं का कीं कॉलेजमधल्या वर्ष-सहामहिन्यांत आपलं प्रेम जडलं? मी तुला एक रहस्य सांगतों, पृथ्वी जन्मण्यापूर्वीही आपण दोघे प्रेम करीतच होतों, आणि अनंत कालपर्यंत प्रेम करीत रहाणार. हें कुणालाही सांगूं नको.

अगदी गुप्त ठेव. पत्राचं उत्तर ताबडतोब लिही. क्षणाचाही विलंब लावूं नको. मी एकसारखी वाट बघत आहे.

तुझाच मंगेश

ता० क० पत्राच्या पाकिटांत बसून माझ्या घरी येणं शक्य असेल तर तशी ये. नंतर पुन्हां पाठवून देऊं.–मंगेश

इंडस्ट्रियल स्कूल बघून घरी गेल्यावर त्यानं त्याच्या आईला पत्रांत लिहिलं आहे :

शनिवार पेठ, पुणे
१३.४.४८

कोल्हापूरहून मुंबईला जाण्यापूर्वी श्री० जोशी यांच्या आग्रहामुळें पुण्याला आलों आहें.

वेंगुर्ला ही जशी माझी जन्मभूमी आहे तशी पुणें ही माझी स्वप्नभूमी आहे. या वाक्याचा अर्थ तुला कळणार नाहीं. तो प्रभूला व नरेशला कळेल.

मुलांच्या शाळेचं कामकाज बघून तो फार प्रभावित झाला आहे. त्यांना दिलं जाणारं धंद्याचं शिक्षण, त्यांनी फुलवलेल्या फळाफुलांच्या बागा, त्यांनीं केलेला स्वयंपाक. त्यांनी काढलेली चित्रं, हे सर्व बघून त्यानं आईला लिहिलं आहे की :

...आज झालेल्या जीवन-साक्षात्कारांतून तुझ्या या वेड्या मुलाच्या आयुष्यांत नव्या संकल्पांचा एक सूर्य उगवला. प्रवासांतून आल्यानंतर मी या शाळेंत एखादें वर्ष शिक्षकाचें काम करण्याचें ठरवलें आहे. कारण हे लोक, मुलांवर नुसतें प्रेम करीत नाहींत, त्यांना शिक्षण देऊन सुसंस्कृत करण्याचा प्रयत्न करतात. आजच्या धर्माप्रमाणेंच आजच्या सर्व शिक्षणसंस्था क्षुद्र आणि बेगडी आहेत. जीवनांतून प्रेम आणि माणुसकी वजा केली कीं धर्म आणि संस्था निर्माण होतात असं म्हटलंस तरी चालेल; आणि असल्या गोष्टींची पूजा करण्यासाठीं तूं माझ्या पाठी कां लागतेस तेंच मला कळत नाही?

लग्न करून मंगेशच्या घरी आल्यानंतर हे पत्र मी वाचलं आणि त्याचे हे विशीतले विचार वाचून मला पुन्हा एकदा आश्चर्य वाटलं. त्याच्या विचारातलं वेगळेपण आणि परिपक्वता पाहून मी अधिकच लोभावले.

पत्रात त्यानं एकदम लग्नाला होकार की नकार देणार याचं उत्तर मागितलं होतं. आणि तेही क्षणाचाही विलंब न लावता. एका क्षणात निर्णय होण्यासारखा हा प्रश्न नव्हता. प्रेम केलं म्हणजे इतक्या घाईनं लग्नाचा विचार करावा लागेल असं मला वाटलं नव्हतं. म्हणून मी लिहिलं :

येरवडा
२४.४.४८

तूं माझ्या पत्राची खूप वाट पाहिली असशील. मी लवकर उत्तर पाठवणार होतें, पण तुझा प्रश्न सोडवणं फार अवघड काम होतं. असा प्रश्न टाकून तूं लगेच उत्तर पाठवायला कसं सांगतोस? किती विचार करते आहे मी, पण काय करावं तें समजतच नाहीं.

तूं म्हणाला होतास कीं सर्व कांहीं सोपं आहे. खरं सांग, आतां ही गोष्ट सोपी आहे का? मला स्वत:ला काय वाटेल तो त्रास झाला तरी तो सहन करायला मी तयार आहे. मांझ्यामुळं इतरांना त्रास होऊ नये अशी माझी इच्छा आहे. मला सोडलं तरी बाकी सर्वांना समाजांतच राहायचं आहे ना? माझ्या धाकट्या बहिणीला (सरलाला) लग्नाच्या बाबतींत फार त्रास होईल. मला सर्व समजतं की, धर्म नुसत्या चर्चमध्यें किंवा मंदिरांत नाही. तो ज्याच्या त्याच्या मनांत आहे. मनावर अवलंबून आहे. मी आतां काय करूं? तूंच मला मार्ग सांग. माझी विचारशक्तीच खुंटली आहे. अशा स्थितींत नक्की उत्तर कसं देणार तुला?

तूं मला सांगतोस कीं, मी निर्भय झालं पाहिजे. पण इतक्यांच्या तावडीतून सुटणं सोपं आहे का? सिंधूची मला फार आठवण येते. ती माझं समाधान करायला नेहमीं तयार असे. तुला तर उत्तर लवकर पाहिजे आणि इकडे मी जणूं काही फासांत अडकलेली. तेव्हां रात्रीं मी आईला ह्या गोष्टीची कल्पना दिली. पहिल्यांदा तिला हें मुळींच पसंत पडलं नाहीं. बराच वेळ वाद घातल्यावर ती म्हणूं लागली कीं, "तुला तर काही धर्म बदलतां येणार नाहीं. तेव्हां त्याचं काय म्हणणं आहे तें विचारून पहा." मला वाटलं, खूप रागावेल. पण तसं काही झालं नाही. नंतर म्हणाली, "इतकी घाई कां झाली तुला लग्नाची?" तेव्हां मी म्हणालें, "घाई नाही ग, पण जें झालं तें नको का सांगायला तुला?" तेव्हां म्हणाली, "बरं केलंस, मला सर्व कांहीं अगोदरच सांगितलंस म्हणून."

हें तुला आवडेल का नाहीं ते सांगतां येत नाहीं; पण तिला सांगण्याशिवाय मला गत्यंतरच नव्हतं. तिच्यापासून अजूनपर्यंत मी कांहीं एक लपवून ठेवलं नव्हतं, आणि हेंही ठेवणं मला शक्य झालं नाहीं.

गैरसमज करून घेऊं नकोस, तूं माझी स्थिती आणि माझा स्वभाव जाणून आहेस. दुसऱ्या कोणाला सांगून तें समजण्यासारखं नाहीं. पत्राचा अर्थ नीट समजून घे, आणि मग उत्तर लिही.

मन अस्वस्थ झालं. मंगेशची प्रतिक्रिया कशी असेल, याची नक्की कल्पना येईना. त्या अधीर अवस्थेत असतांनाच त्याचं पत्र आलं. ह्या पत्राचं उत्तर असं आलं :

मुंबई
२८.४.४८

तुझं पत्र मिळालं. खरं सांगू? तुझं अशा तऱ्हेचं पत्र वाचून मला मुळींच आश्चर्य वाटलं नाहीं. मला पूर्णपणें त्याची कल्पना होती. तुझ्या पत्रांत सुरवातीलाच तूं लिहितेस, 'तुझा प्रश्न सोडवणं मोठं अवघड काम आहे!' तुला असं वाटतं का कीं हा प्रश्न मी निर्माण केला? ज्या क्षणीं आपण दोघं एकमेकांकडे कोणत्या तरी अदृश्य जीवनशक्तीनें ओढलों गेलों त्याच क्षणीं, हा प्रश्न निर्माण झाला. एवढंच कीं मी पुरुष असल्यामुळें मी तो प्रथम व्यक्त केला. तो व्यक्त करणं हे माझं कर्तव्य होतं, त्या परिस्थितींत.

तूं म्हणतेस की, "ही गोष्ट सोपी नाही." मला तिचें विशेष कांहीं वाटत नाही. पण मला जी गोष्ट नैसर्गिक आणि म्हणून सहज-सोपी वाटते तशीच ती तुलाही वाटावी असा अट्टाहास मी कसा धरूं? तूं लिहितेस की, "माझ्यामुळं दुसऱ्यांना त्रास होऊ नये अशी माझी इच्छा आहे." तुझ्या या उदात्त विचारसरणीबद्दल धन्यवादाखेरीज मी काय देऊं शकणार?

मी एवढंच म्हणेन कीं तूं सत्याशीं प्रामाणिक रहा. जीवनाशीं प्रतारणा करूं नको. कारण तूं जर जीवनाशी अप्रामाणिक होण्याचं पत्करलंस तर ती गोष्ट पुढच्या कितीतरी पिढ्यांच्या पायांतल्या शृंखला घट्ट करण्यापलीकडे कांहींही करणार नाहीं.

आता मी फारसं लिहिणार नाहीं, तुझ्या एका वाक्याबद्दल मला थोडंसं लिहायचं आहे. तूं म्हणतेस, की, "तूंच मला मार्ग सांग." दुसऱ्या कुणी हें वाचलं तर त्याला वाटेल कीं खरोखर केवढा विश्वास आहे यशोदाचा मंगेशवर! वाईट वाटून घेऊं नकोस. पण, मला मात्र असं वाटलं नाहीं. हा प्रश्न उपस्थित झाल्यामुळें 'तुझी विचारशक्ती खुंटली' त्याबद्दल मला विशेष आश्चर्य वाटलं नाही. पण त्या पत्राच्या शेवटी तूं जी '-यशोदा' अशी नुसती सही केलीस ती माझ्यावरच्या अविश्वासाची द्योतक आहे. आणि म्हणूनच तुला मी काय मार्ग दाखवणार? तुला मार्ग दाखवणारा मी 'तुझा' कोण? जो 'तुझी' हा शब्द तूं हेतुपूर्वक टाळतेस, तो मी प्रामाणिकपणें इथें वापरतों. मी जीवनाशीं आणि माझ्या कलेशीं कधींही प्रतारणा केली नाही. आणि म्हणूनच माझ्या हृदयांत प्रतिभेची ज्योत सदैव उजळत असते. तीच माझी शक्ती आणि तीच माझा प्राण.

प्रेम हा जीवनाचा आत्मा आहे. ती एक प्रेरणांची प्रेरणा आहे. ती तुझ्या अंत:करणांत उगवली असली तर तीच तुला मार्ग दाखवील. तीच तुला महान सामर्थ्य प्राप्त करून देईल. मी काय करूं शकणार? समुद्राला जाऊन मिळणाऱ्या नदीला कोण मार्ग दाखवतो? जीवनाची एक विलक्षण ओढ तिला खेचून नेत असते. जो आपल्या हृदयांतल्या परमेश्वराला फसवीत नाहीं तोच निर्भय होऊं शकतो. तो स्वत:च एक जीवनाचा मार्ग असतो. He is the way of life.

तुझी आई म्हणते, "तुला कांहीं धर्म बदलता येणार नाहीं, तर त्यांचं काय म्हणणं आहे तें विचारून पहा." त्याला माझं एकच उत्तर आहे, कवी हा कोणत्याही धर्माचा अथवा जातीचा असूंच शकत नाहीं. जीवनप्रेम हा एकच महाधर्म तो जाणतो. सौंदर्यपूजा ही एकच नीती तो मानीत असतो. कवी हा कवीच आहे. अत्यंत थोर अशा जीवनधर्माचा साक्षात्कार झाल्यामुळें लौकिकदृष्ट्या तो 'अधर्मी' असतो. दोन हृदयं एक झाल्यानंतर जगांत असा कोणता धर्म आहे, अशी कोणती नीती आहे की ती या एकतेहून श्रेष्ठ असूं शकेल? अंधार सूर्याला कधींही आव्हान देऊं शकणार नाहीं, हें जरूर लक्षांत ठेव.

दुसऱ्या एखाद्या पुरुषाशीं तूं अशी वागली असतीस, हा प्रसंग त्याच्यावर ओढवला असता तर काय झाला असता त्यांचा परिणाम त्याच्या जीवनावर? कसल्यातरी साक्षात्काराच्या मस्तींत धुंद राहाणं जगांत अत्यंत थोड्या लोकांना शक्य असतं. तुझ्याप्रमाणें मींही प्रेम केलं. पण पहिल्या क्षणापासून तो या क्षणापर्यंत–(आणि पुढेंही) मी प्रामाणिक होतों, निर्भय होतों, खऱ्या अर्थानें मी प्रेम केलं. सारं जग जरी माझ्या विरुद्ध उठलं असतं तरी तुझ्याजवळ राहून शांतपणे जगाला तोंड देण्याची माझी तयारी होती. आणि आहेही; पण तुझ्या मनांत काय होतं, आणि काय आहे हें तुलाच ठाऊक. यशोदा, प्रेम हा खेळ नाहीं, तो जीवनाचा प्राण आहे. आणि प्राणावाचून निर्जीव कलेवराच्या या संसाराला–या जगाला मी कवडीचीही किंमत देत नाहीं. तुझ्या मनांत तूंही देणार नाहींस.

जें मला सत्य वाटतं–जें मला पवित्र वाटतं तेच मी लिहिलं आहे. उलट्यासुलट्या गोष्टी लिहून तुला झुलवण्याचं पाप मी करणार नाहीं. आणखी काय लिहूं? माझ्या घरच्या आणि समाजाच्या अडचणींची यादी लिहिणं म्हणजे तुझ्या प्रेमाचा अपमान करण्यासारखं मला वाटतं. तें मी कालत्रयी करणार नाहीं.

२५ मेपर्यंत मी मुंबईंत आहे. माझ्या पत्राचं उत्तर पाठव असं मी कसं लिहूं? तेवढा आहे का माझा अधिकार आतां? तुलाच ठाऊक. मला विसरलीस तरी चालेल पण माझं एक वाक्य लक्षांत ठेव. "लौकिक प्रतिष्ठेसाठीं जीवनाशीं अप्रामाणिक होऊं नको. जो जीवनाशीं प्रामाणिक असतो तो विश्वांतली दुःखं नाहींशी करतो. त्याच्यामुळें 'दुसऱ्यांना त्रास होणं' ही गोष्ट अशक्य आहे. असत्य आहे. प्रामाणिक रहा. तुझ्या जीवनांत केव्हांही मला हक्कानें हाक मार. भिऊं नको. तुझ्यासाठीं मी मरणांतूनही उठून येऊं शकेन.

२५ तारखेला मी बहुतेक एकदम सिलोनला किंवा मद्रासला जाणार. निश्चित ठरलं आहे. माझी पत्रं फाडून टाक. ठेवलींस तर कदाचित पुढें तुला त्रास होईल. अर्थात तूं हें अगोदरच केलं असशील. माझ्यासारखा व्यवहारशून्य तुला काय शिकवणार?

तूं कविता लिहितेस काय ग? मला माहीत आहे. माझी शेवटची इच्छा पुरी कर. मला त्यांतल्या कांहीं पाठवून दे. वाङ्मयाच्या दृष्टीनें बघून तुझी थट्टा करण्यासाठीं

म्हणून नव्हे, केवळ एक अंतर्यामींचा जिव्हाळा म्हणून. पाठवशील?

अच्छा, नमस्ते. पान उलटून पुढें जा. वाईट वाटून घेण्यांत अर्थ नाहीं. 'व्यवहार' शिकायचा आहे ना तुला? कवी वेडे असतात.

यशोदाला मंगेशचा अंत:करणपूर्वक नमस्कार. तिनें त्याची काळजी करूं नये. कां करावी? खरं आहे. तुझी आईसुद्धां हेंच सांगेल. एक काम कर. तो गाणीं म्हणून दाखवणारा लहान मुलगा–त्याला सांग की त्याची मला आठवण येते. त्याची गाणींही आठवतात.

आणुं ताईला नवीन साडी,
माझ्या बैलांची रंगीत गाडी...

तुला आठवतं का? प्रवासांत भटकतांना कधीं बैलगाडींतून जाण्याचा योग आला तर, बैलांच्या गळ्यांतल्या घुंगरांच्या तालावर मी गुणगुणूं लागेन–अगदीं उपाशी असलों तरी. 'आणुं ताईला नवीन साडी/माझ्या बैलांची रंगीत गाडी.'

मंगेश

ता० क० केवळ तुझ्या इच्छेला, हेतूला आणि सूचनेला मान देण्यासाठीं नुसती –मंगेश अशीच सही केली आहे. आतां झाला का आनंद? लग्नाच्या बाबतींत एक व्यवहाराची गोष्ट लिहायला विसरत होतों, मला घरून जवळ जवळ विरोध नाहींच असं म्हटलं तरी चालेल. आणि रजिस्टर्ड लग्न करण्यासाठीं धर्माचा प्रश्न आपल्या दोघांच्या बाबतींत उपस्थित होऊं शकत नाहीं. पण तें जाऊं दे. या बाबतींत कुणाशी न बोललीस तर उत्तम. जे कृतींत तूं आणणार नाहींस, ते शब्दांच्या बाजारांत चव्हाट्यावर मांडण्यांत काय अर्थ आहे? आणि पुरुषानें कुणाच्या विरोधाची पर्वा कां करावी? प्रश्न तुझ्या विश्वासाचा आहे. संपलं.

मंगेश

घरात झालेली माझी विचित्र परिस्थिती, माझ्या भूमिकेत जाऊन, समजून घेऊन, सहानुभूतीनं मला तो काही तरी मार्ग दाखवील, धीर देईल अशी माझी कल्पना होती. पण तसं काहीच न करता त्यानं आपल्या मतांचा आणि तत्त्वज्ञानाचा डोंगर माझ्यापुढं उभा केला. 'ही गोष्ट सोपी नाही' असं मी म्हणते तेव्हा त्याला त्या गोष्टीचं, 'विशेष कांहीं वाटत नाहीं', 'माझ्यामुळें इतरांना त्रास होऊं नये' असं मला वाटतं, तेव्हा तो मला धन्यवादाखेरीज काही देऊ शकत नाही. मी एक हिंदुस्थानातली स्त्री आहे. मला आर्थिक स्वातंत्र्य नाही. समाजाच्या, कुटुंबाच्या काही बंधनांनी मी बांधलेली आहे. ही बंधनं तोडण्यासाठी स्त्रीला फार सामर्थ्य लागतं. कोणाचं तरी पाठबळ लागतं. त्यासाठी मनाची पूर्ण तयारी व्हावी लागते. एका क्षणात होणारं ते काम नाही. शिवाय माझं वय–नुकती इंटरला बसलेली मुलगी मी. शहरात वाढलेली नाही. मिशनरी कडक शिस्तीत राहून मनातून घाबरलेली. त्याच्यासारखा मनाचा

बेडरपणा, करारीपणा माझ्यात कसा येणार?

त्या पत्राला मी उत्तर लिहिलं :

येरवडा
१.५.४८

तुझं पत्र मिळालं. तें वाचून मला काय वाटलं असेल हें सांगायला नकोच, तें तुला आधींच समजलं असेल.

कदाचित तूं माझ्या पत्राची वाटसुद्धा पहात नसशील. तुला वाटलं की 'संपलं'. हो ना? आणि तसं तू लिहिलं पण आहेस. तुझ्या मतानं जरी संपलं असलं, तरी माझ्या मतें अजून पुष्कळ व्हायचं आहे.

तुझीं पत्रं मी फाडून टाकलीं असतील हें तुला खरं वाटतं का? ती कल्पना तरी कशी सहन होते तुला? पण तूंच जर तसं सांगत असशील तर मात्र मला तसं करावं लागेल. तुला वाटतं, माझा तुझ्यावर विश्वास नाहीं. शब्दांत लिहून दाखवलं, म्हणजेच फक्त विश्वास दिसून येतो का? ह्या क्षणाला जरी मी तुझी होऊं शकत नसलें, तरी 'मनानें मी तुझीच' आहे हें तूं ओळखायला पाहिजे होतंस. सर्वस्वी तुझी होणं मला अवघड वाटत होतं. म्हणून मी तो शब्द गाळला. त्याचा तुला फारच राग आलेला दिसतो. आतां इलाज नाहीं. तो राग मला सहन केलाच पाहिजे. दिवसेंदिवस मला माझी सहनशक्ती वाढवली पाहिजे. तरच माझा निभाव लागणार आहे.

तूं म्हणतोस तें खरं आहे. लग्नाचा प्रश्न दोघांचा आहे. आणि तूं मला प्रथम विचारलंस तेंही अगदीं योग्यच झालं. पण पहिल्याच पत्रांत असं लिहिशील असं मला वाटलं नव्हतं. म्हणून मी तसं लिहिलं. अर्थात मीसुद्धां त्या गोष्टीचा विचार करीत होते. पण तोंपर्यंत माझ्या मनाची इतकी तयारी झालेली नव्हती.

तूं स्वत:ला व्यवहारशून्य समजतोस, आणि तुला व्यवहार नकोच असतो. पण असं म्हणून कसं चालेल? जगात जर रहायचं तर व्यवहार सोडून चालेल का? प्रेम उत्पन्न झाल्यावर आपण लग्न करतों. हा व्यवहार नाहीं का? अरे, पण मी तुला काय शिकवायला लागलेंय? तुला तर सर्व कांहीं कळतंय.

बरं, आतां थोडं व्यवहारातलं. ३० तारखेला काका आणि सर्व मंडळी सुट्टीत पुण्याला आलीं आहेत. मी स्टेशनवर गेलें होतें. सिंधू भेटली. तुम्हीं दोघेंही तिला येतांना भेटलांत. तुला म्हणे सारखं हंसूं येत होतं. पण तें कां, ते तिला कळलं नाही. मला ते कळलं. सिंधू माझ्याशी नीट बोलली नाहीं. तिला घरांत सारखे माझ्यामुळें बोलत असतात असं तीच म्हणाली. मी तिला म्हटलं, "तूं अशक्त झालीस." तर म्हणाली कीं, "बोलणीं खाऊन खाऊन मी अशी झालें.' ती नीट बोललीच नाहीं माझ्याशीं. खरंच्र मला असं वाटूं लागलंय कीं मी उगीच मुंबईला आलें. किती जणांना माझ्यामुळें त्रास होत आहे. तोही मला प्रिय असणाऱ्यांनाच.

कविता माझ्याजवळ फारशा नाहींत. निष्काळजीपणानं मी त्या कुठेंही टाकून दिल्यात. तेवढी त्यांची किंमतच नाहीं हें मला ठाऊक आहे. त्या मी कोणाला दाखवल्या नाहींत व कुणाचं मत पण विचारलं नाहीं. तूं म्हणतोस म्हणून दोन पाठवतें. वाङ्मयाच्या दृष्टीनं त्यांत काहीच अर्थ नाहीं हें मला पूर्णपणें ठाऊक आहे. तरी त्या तूं वाचल्यास तर मला चालेल. तुझ्यासारखी प्रतिभा क्वचितच असते. तुझ्यापुढें मला प्रतिभा नसल्यासारखीच आहे.

तूं म्हणत असशील कीं, हिनं मला लग्नाच्या बाबतींत कांहींच स्पष्ट उत्तर दिलं नाहीं. आणि भलत्याच गोष्टी लिहीत बसली आहे. निदान सध्यां तरी तसं करण्याशिवाय दुसरा इलाज नाहीं. कारण एकदम 'हो' म्हणून, तसं जर माझ्याकडून झालं नाही, तर तुला फसवल्यासारखं नाहीं का होणार? तुला उगीच झुलवीत ठेवण्याचा माझासुद्धा उद्देश नाहीं. मला जें वाटतं तें मीं लिहिलं. ह्याउप्पर तुझी मर्जी.

पुढच्या वर्षीं काय करायचं तें अजून नक्की नाही. कॉलेजला मात्र मी मुळींच जाणार नाहीं. नोकरी करणार. पण कुठें करायची हा प्रश्न आहे.

२५ मेला तूं जाणार तर मग मला पत्र पाठवीत रहाशील ना? तुला जरी असं वाटतं कीं, तुला मला पत्र पाठव असं सांगण्याचा अधिकार नाहीं. तरी मला तसं बाटत नाहीं. तुझा नाहीं तर कुणाचा अधिकार आहे तो?

ह्या वेळेला मी सही बदलून लिहिणार आहे. ती केवळ तुझी समजूत काढण्यासाठीं नव्हे, किंवा तुला वाईट वाटलं म्हणून नव्हे, किंवा तूं तसं लिहितोस म्हणूनसुद्धां नव्हे, तर फक्त मला तसं वाटतं म्हणून.

तुझीच यशोदा.

इतकं होईपर्यंत, काकांच्या घरी माझ्याबद्दल बऱ्याच गोष्टी समजल्या होत्या. हे सिंधूच्या बोलण्यावरून स्पष्ट दिसलं. तिला त्यांच्या बोलण्याचा त्रास पण व्हायला लागला होता. त्यामुळं ती माझ्याशी नीट बोलत नव्हती आणि तिनं मला पत्र लिहायचं पण बंद केलं. आई पण पूर्वीसारखी माझ्याशी वागेनाशी झाली. तिच्या कानांवर कुठून तरी, कोणाकडून तरी बऱ्या-वाईट, खऱ्या-खोट्या गोष्टी येऊ लागल्या होत्या. मला येणाऱ्या पत्रावर ती लक्ष ठेवायला लागली. काही पत्रं माझ्या हातांत पडलीच नाहीत. आमची घरची पत्रं पोस्टमन ऑफिसमधे नेऊन देई. मग कामावरून येताना आई ती घेऊन येई. काही वेळा ती पत्रं देत असे व काही वेळा देत नसे, असं माझ्या लक्षात आलं. माझा काय उद्योग चालू आहे हे अर्थातच तिला कळण्याची इच्छा होती.

माझं पत्र मंगेशला मिळून त्याचं उत्तर येईपर्यंत माझा जीव उतावळा होऊन राहत असे. पत्र येऊनही आईनं मला तें दिलं तर नाही ना, मंगेशनं काय लिहिलं असेल, असे विचार सतत मनात गर्दी करत राहत.

आणि अचानक मंगेशचं पत्र हाती पडलं. त्यानं लिहिलं होतं:

मुंबई
१५.५.४८

प्रिय यशोदा,

तुझें पत्र काल सकाळीं मला मिळालें. मागच्या महिन्याच्या २७ तारखेला मी तुला पत्र लिहिलें होतें. त्या पत्राचें उत्तर तूं २० दिवसांनीं पाठविलेंस. मी तुझ्या पत्राची प्रथम प्रथम वाट पाहिली. नंतर मी असा समज करून घेतला कीं, आतां माझ्याशीं कोणत्याही तऱ्हेचा संबंध ठेवण्याची तुझी इच्छा नसेल आणि म्हणून पत्रही न पाठविण्याचा तूं निश्चय केला असशील. मला थोडं वाईट वाटलं. पण मी शांत होतो. मी तुला पत्रात लिहिलेलं एक वाक्य मला आठवत होतं, 'तुझ्या अंत:करणांतली प्रेरणाच तुला मार्ग दाखवील.'

काल मी तुझं पत्र वाचलं. पण मला अजूनही तूं तें लहानसं पत्र लिहिण्यास, कां विलंब लावलास तें कळलेलं नाही. एक 'मोठ्ठं' पत्र तूं लिहून ठेवलं आहेस असं तुझ्या पत्रांत आहे. तें तूं कां पाठवलं नाहींस? माझ्या मनाला त्रास होतो हें तुला कसं कळलं? मला तें पत्र वाचण्याची फार इच्छा आहे. त्रास किंवा दु:ख जरी मला झालं तरी त्यांतूनही विकास करून घेण्याचं सामर्थ्य माझ्याजवळ आहे. एका विशिष्ट नात्यानें माझ्या जीवनांत येण्याची तुझी खरोखरच इच्छा असेल तर आतांपासून एवढी काळजी करूं नको. थोडी शिल्लक ठेव. पुढें तिचा उपयोग होऊं शकेल.

तुझ्या शेवटच्या अत्यंत महत्त्वाच्या वाक्याचा अर्थ मला नीटसा कळलेला नाही, "मनानें मी तुझीच आहे. सर्वस्वी तुझीच करून घेणं तुझ्याच हातांत आहे." त्यांत निश्चितपणें तुला काय म्हणायचं आहे? माझी भूमिका मी पहिल्याच पत्रांत स्पष्ट केली होती. खरोखरीच मला तूं हवी आहेस. अगदीं सर्वस्वी हवी आहेस. आणि म्हणूनच मी तुला लिहिलं कीं, 'मला तुझ्याशींच लग्न करायचं आहे.' तुझ्याही सर्व पत्रांतून मला तोच सूर जाणवला. परंतु ही नैसर्गिक गोष्ट करण्यासाठींही तुला भय वाटतं लोकांचं आणि समाजाचं. मी तुला मार्गही सांगितला रजिस्टर लग्नाचा. तुझ्यावर कोणत्याही धर्माची सक्ती मी करणार नाहीं. मी स्वत:तर अधर्मीच आहे. या वाक्याचा अर्थ असा होतो का कीं, तूं या मार्गानें माझ्याजवळ येणार? दुसरा कांहीं अर्थ असेल तर त्याची स्पष्ट फोड करून लिही. हें वाक्य मोठं काव्यपूर्ण आहे, पण शब्दांतल्या काव्याला भुलून जीवनाच्या महाकाव्याला मुकण्याची तुझी इच्छा आहे का? नसेल तर, लग्न करून माझ्याजवळ रहाण्याची तुझी तयारी आहे का नाहीं हें स्पष्ट, अगदीं शुद्ध, सोप्या मराठी भाषेंत लिहावं लागेल.

पंचवीस मेच्या आंत तुझीं, दोन पत्रं मला आलींच पाहिजेत. एक तें 'मोठ्ठं' आणि दुसरं, याचं उत्तर. मनानें तूं माझी आहेस ना? मग माझ्यावर पूर्ण विश्वास ठेव. तुला लग्न करायचं असेल तर तसं लिही. नसेल तर तसं लिही. मी तुझ्यावर रागावणार नाहीं. माझ्या यशोदावर मी कसा रागावेन? सुखदु:खांच्या आंदोलनांवर

कवि कसा झुलत राहील? सुखदु:खांच्या पलीकडची आणि जीवनाच्या आणि मरणाच्या पलीकडली प्रकाशसत्यं त्याला हवीं असतात. त्याचसाठीं त्याच्या जीवनाची साधना चाललेली असते. माझ्या आत्म्याचं अस्तित्व माझं कवि म्हणून जे व्यक्तित्व त्यांतूनच व्यक्त होतं. त्यामुळें बहुतेक वेळां मी माझ्याच Moods मध्यें असतों. ही गोष्ट तूं नीट लक्षांत आण. माझ्यांतले बरेचसे दोष तुला सहवासानें कळले असतीलच. त्या सगळ्यांचा विचार करून तूं माझी पत्नी म्हणून सुखी होऊं शकशील कीं नाहीं तें पहा. दुसऱ्या कुणाचा सल्ला घेऊन करण्यासारखी ही गोष्ट नव्हे. तूं तुझ्या हृदयाचाच कौल घे. एकांतात तुझ्या हृदयाला हा प्रश्न विचार. आंतून आलेलं उत्तरच प्रमाण मान. लग्न करण्याची तुझी इच्छा आणि तयारी असेल तर प्रवास संपवून आल्यानंतर मी लग्न करूं शकेन. तुझ्याच शब्दांत सांगायचं म्हणजे मी तुला सर्वस्वी माझीच करून घेईन. खरं सांगूं? मला प्रवासाला निघण्यापूर्वी तुला भेटण्याची अत्यंत इच्छा होती. पण तें कसं शक्य आहे? तुला जर कांहीं मार्ग सुचत असला तर मला कळव. प्रवासांत मी तुला पत्र पाठवीन. पण तूं पुण्यालाच रहाणार कीं मुंबईला कॉलेजमध्ये येणार तें मला कुठें ठाऊक आहे? तें तूं मला कळवशीलच. २४ तारखेच्या आंत पत्र आलं नाहीं तर नंतर मला पत्र मिळणार नाहीं; आणि तुझं पत्र आलं नाहीं तर पुन्हां मी तुला पत्र मुळींच पाठवणार नाहीं. मागें तूं माझ्याशीं एक महिना नऊ दिवस बोलत नव्हतीस, त्याची आठवण आहे का? नंतर जर तूं माझ्याशीं बोललीं नसतीस तर मीही तुझ्याशीं मुळींच बोललों नसतों. तसंच या पत्राच्या बाबतींत. आणखी काय लिहूं?

तुझ्या कविता वाचल्या. तूं आळशासारखी बसून राहूं नको. पुष्कळसं वाचन कर. मला न वाचणाऱ्या लोकांचा अगदीं राग येतो. सध्या सिंधू पुण्यालाच आहे ना? ती आजारी तर नाहीं ना? तिला आमचा नमस्कार सांग. पत्राचें उत्तर जरूर लिही. ते 'मोठ्ठं पत्र' न विसरतां पाठव. त्यांत कांहींही लिहिलेलं असलं तरी मी तुझ्याविषयीं गैरसमज करून घेणार नाहीं.

सर्वस्वी तुझाच–मंगेश

त्यानंतरच्या पत्रात मी लिहिलं :

येरवडा
२०.५.४८

तूं रजिस्टर लग्नाविषयीं लिहिलंस तें ठीक आहे. पण खरं सांगूं का? राग नाहीं ना येणार तुला? मला तेवढं करायलासुद्धां धीर होत नाहीं बघ. तूं म्हणशील, हेंच का हिचं प्रेम, हो ना?

त्यावर मी असा उपाय सुचवला की, लग्न लागेपर्यंत त्यानं माझा धर्म स्वीकारावा. केवळ मला सर्वांच्या बोलण्यातून वाचवण्यासाठी. धर्म कायमचा बदलावा असं

नाही. नंतर त्याचा तो स्वतंत्र आहेच. नाहीतरी त्यानं स्वत:ला 'अधर्मी' म्हणून गेल्याच पत्रात लिहिलं आहे :

माझ्या भित्रेपणामुळं तुला एवढा त्रास सहन करावा लागेल. आणखी स्पष्ट लिहायला माझ्याजवळ शब्द नाहींत. मला तर ह्याच्याशिवाय दुसरा मार्गच बरा वाटत नाहीं.

तूं मला आळशी कां म्हणतोस? किती काम करतें मी घरांत, कल्पना नाहीं तुला. शिवाय शिवण शिवतें, लेस करतें आणि वाचतेंही. आतांच पुरोहितांची 'मी कोण?' कादंबरी वाचली. त्याच्या आधी 'सुख आणि शांती' (On peace and happiness) म्हणून एका इंग्लिश पुस्तकाचं भाषांतर आहे तें वाचलं. त्यांत मोठ्या लेखकांचे लेख व उतारे आहेत. आतां मी 'भारतामृत' वाचायला घेतलं आहे. तरी आळशीच का? पुस्तक मिळालं तर सोडीत नाहीं. नसलंच तर मी तरी काय करणार?

दोन तीन दिवसांपूर्वी मला एक स्वप्न पडलं. कॉलेजमध्ये मैत्रिणींच्या घोळक्यांत मी आहे. इतक्यांत तूं आलास. मी तुला दिसलें, आणि तूं मला बोलावलंस. मी घोळक्यांतून चटकन तुझ्याकडे आलें. आणि आपण कोणालाही न भितां सर्व कॉलेजमध्ये हातांत हात घालून फिरलों. स्वप्नच तें! काय अर्थ असेल त्याचा?

कॉलेजमध्ये आपलं भांडण झालं, त्यानंतर मी तुझ्याशीं बोलले नसतें तर तूं माझ्याशीं कधींच बोलला नसतास ना? मग काय झालं असतं? विसरलाही असतास तूं आतांपर्यंत मला. म्हणाला असतास, जाऊं द्या. एक गर्विष्ठ मुलगी होती ती. बरी गेली. हो ना? माझ्याकडं पहायला पण तयार नव्हतास.

सिंधू कांहीं आजारी नाहीं, ती बरी आहे. पण तिनं पत्र कां लिहिलं नाहीं हें मला ठाऊक नाहीं. कारण ती मला अजून भेटली नाही.

माझ्या कवितांविषयीं कांहीं लिहिलं नाहींस हें बरं केलंस. कारण चांगल्या म्हटलं तर मला खरं वाटणार नाही, आणि वाईट म्हटलं तर वाईट वाटल्याशिवाय रहाणार नाहीं. फाडून टाक त्या. आतां मी लिहायचं सोडून देणार आहे. आपल्याला प्रतिभा नाहीं तर कशाला लिहायचं असं तूंच एकदा म्हणाला होतास. म्हणजे तें मला उद्देशून नव्हतं. तर असंच. आठवतं का? वर्गात बसलों असतांना?

बरं, तें जाऊं दे. उगीच भांडण नको काढायला. आता वाटतं, उगीच बोललें मी तुला फिशपाँडस्च्या वेळेस. पण तूं किती शांतपणें ऐकून घेतलंस सगळं, फार वाईट आहे ना मी?

तुझीच यशोदा

माझ्या पत्राला आलेलं उत्तर :

मुंबई
२२.५.४८

प्रिय यशोदा,

तुझ्या काव्यपूर्ण वाक्याचा अर्थ कळला. अर्थ आणि अनर्थ यांच्यातल्या सीमारेषा क्षणभर लुप्त होऊन गेल्यासारख्या मला वाटल्या. आतां मी अगदीं कंटाळून गेलों आहे. रजिस्टर लग्न करण्याचा तुला धीर होत नाहीं. निदान एका तासापुरतं तरी मी धर्मांतर करावें असें तूं म्हणतेस. माझा धर्मावर विश्वास नाहीं. आजच्या धर्मसंस्था मानवी मनाचा विकास करायला पूर्णपणें असमर्थ आहेत. प्रत्येक धर्मांत उदात्त तत्त्वें आहेत. पण त्यांच्यासाठीं कोणत्याही धर्माचें लेबल लावण्याची जरूर नाहीं. माझ्या आयुष्यांतून आणि कलेंतून हेंच मला मुख्यत: सांगायचं आहे, कीं मनाचा विकास करून घ्या. कोणत्याही साच्यांत बांधून घेऊं नका. असं असतांना मी धर्मांतर करावें, नंतर पुन्हां माझ्या धर्मांत यावें, याला काय अर्थ उरतो? तुझ्यासाठीं लोकांच्या डोळ्यांत धूळ फेकून स्वत:च्या तत्त्वांना काजळ फासून, मी चेतनाशून्य जीवन जगूं असं तुला म्हणायचं आहे का? मला माझाही धर्म नको आहे आणि तुझाही धर्म नको. तूं मला किती आवडतेस हें तुला ठाऊक आहे का? तुझ्यासाठीं मला प्राणांचीही पर्वा नाहीं. परंतु आत्म्याच्या उदात्त आकांक्षांचा खून करून मुडद्यासारखें जीवन जगणें मला शक्य नाहीं. तुझ्यासाठीं मला प्राणांचीही पर्वा नाही–तुझ्यासाठीं म्हणजे तुझ्या शरीरासाठीं नव्हे तर प्रेमासाठीं, जीवनांतल्या कोणत्याही उदात्त मूल्यांसाठीं, यशोदा, तूं सांगतेस त्या मार्गानें मी तुझ्याशीं लग्न केलें तर तुला केवळ माझं शरीर मिळेल. माझ्या आत्म्याची त्यांत हत्या आहे. या असत्य मार्गानें गेलों तर सळसळणाऱ्या जिवन्त व्यक्तित्वाचा मंगेश मरून केवळ देहानें जगणारा मंगेश उरेल, कवितेची एक ओळही तो लिहूं शकणार नाहीं. अंत:करणाची आध्यात्मिकता जळून गेली कीं माझ्यांतला कलाकारही नष्ट झालाच. बोल, तुला असा मुडद्याचं आयुष्य जगणारा मंगेश हवा आहे का? यशोदा, मंगेश म्हणजे शरीर नव्हे. मंगेश म्हणजे आत्मा. सूर्यप्रकाशाचा निर्भय मार्ग सोडून तूं त्याला चिचुंद्रीच्या मार्गानें कां बोलावतेस? लग्न करून एकमेकांच्या शरीरांचे गुलाम बनून आपण जीवन कंठावें अशी माझी इच्छा नाहीं. एका विराट अशा विकासशील जीवनाचे सहप्रवासी म्हणून आपण जगूं. यशोदा, प्रकाशमार्गानें येण्यासाठीं मी तुला शेवटची हाक मारतों. तूं सुचवलेल्या भित्र्या, अंधाऱ्या वाटेनें, मी कालत्रयी तुझ्याशी लग्न करणार नाहीं. निर्भय होऊन ये. गरुडासारखी पंख झेपावत ये. बाण लागून आपण दोघेही रक्तांत भिजून मरून पडलों तरी चालेल; पण चिचुंद्रीच्या मार्गानें सरपटत जाऊन, लोकांकडून जीवनाची, सुखाची भीक मला नको. ही अंत:करणापासून घातलेली शेवटची हाक आहे. यानंतर लग्नाविषयीं एक शब्दही मी काढणार नाहीं. अर्थात तुझा मार्ग तुला मोकळाच राहील. यशोदा, तुझ्या भित्रेपणाच्या शृंखला माझ्या पायांत अडकवून तूं माझ्यावर काय प्रेम करणार?

तुझ्यावर माझं निस्सीम प्रेम आहे. पण प्रेम ही बेडी नव्हे. प्रेम हा विकास आहे. या पत्रांत (आणि यापुढें कोणत्याही पत्रांत) मी 'तुझाच' असं लिहिणार नाहीं. आतां ज्या वेळीं तूं तुझ्या प्रेमासाठीं निर्भय होऊन येऊन मला बिलगशील, त्याच क्षणीं मी तुझा होईन. इतके दिवस माझ्या सहवासांत राहून, माझ्यावर प्रेम करून हीच का माझ्या व्यक्तित्वाची प्रतीती तूं घेतलीस? मी आत्मप्रतीतीशीं द्रोह करून तुझ्या भित्रेपणाची पूजा करीन असं तुला कसं वाटलं? खरंच, तुझ्या काळजीचा आणि प्रेमाचा अमोल ठेवा दुसऱ्या कुणालातरी अर्पण करून तूं सुखी हो. तुला यांत कठोरता वाटेल–पण सूक्ष्म विचार करशील तर तुलाच कळेल कीं, मी तुझ्यावर निरतिशय प्रेम केलं म्हणूनच मी हें लिहूं शकलों. शेवटचं सांगतों, माझ्याशीं लग्न करायचं असेल तर भित्रेपणाचा त्याग करावा लागेल. तीन वर्षं थांबून मी आल्यानंतर आपण रजिस्टर लग्न करूं. अधिक काय लिहूं? प्रवासांत असतांना मी तुला खुशालीचें पत्र लिहीन–एक स्नेही म्हणून, एखाद्या ठिकाणीं Stable रहाणार असेन तर तुला पत्र पाठवीन. २५ तारखेला दुपारीं १-४५ला मद्रास मेलनें मी निघणार आहे. तोपर्यंत वेळ असेल तर ताबडतोब मला मुंबईच्या पत्त्यावर पत्र लिही. ती गाडी पुण्याला किती वाजतां येते ती चौकशी करून, तुला शक्य झाल्यास स्टेशनवर ये. 'कदाचित्' शेवटचा नमस्कार तरी करतां येईल. नंतर तूं कुणाची होशील तें काय सांगावं?

मंगेश

ता० क० कविता लिहिण्याचं सोडून द्यायचं काहीं कारण नाहीं. तुझं कवितेचं वाचन कमी आहे, हे स्पष्ट दिसतं. नव्या, जुन्या कविता वाचीत जा. त्यामुळें नवी वृत्तें तोंडांत बसतील आणि हळूहळू शैली refine होईल. अलीकडचे सगळे नवे कवि अवश्य वाच. कविता जीवनाशीं आणि तुझ्या भावनेशीं प्रामाणिक राहून लिही. आंतरिक शक्तीबरोबर कविताही प्रगल्भ होत जाते. तुझ्या कवितांत वृत्तदोष आहेत. पण 'निनाद' या कवितेंत अंत:करणांतली भावना व्यक्त करण्याची तळमळ मला जाणवली. अशीच भावनेशी प्रामाणिक राहून, तिच्या अनुषंगानें, चिंतनानें जीवनाचें स्वरूप समजावून घेऊन तें व्यक्त करण्याच्या प्रयत्नांतून तूं निश्चित चांगलं लिहूं शकशील.

मंगेश

ह्या पत्राचं उत्तर मी लिहिलंच नाही. पुण्यात येऊन माझी भेट झाल्यानंतर त्यानं मला लिहिलं :

मुंबई
२७.५.४८

प्रिय यशोदा,

काल तूं आलीस तेव्हां मला खरोखरीच आनंद झाला. प्रथम वाटलं होतं की तूं

येणारच नाहींस. आणि म्हणूनच तूं आलीस तेव्हां मी आश्चर्य व्यक्त केलं. हॉटेलमध्ये मी तुला विचारलं कीं तूं पत्राचं उत्तर काय पाठवणार होतीस? तेव्हां तूं म्हणालीस, "तुझंच बरोबर आहे." मी धरूनच चाललों होतों कीं तूं रजिस्टर लग्न करायला तयार नाहींस. तूं तुझ्या तोंडानें तसं स्पष्ट सांगेपर्यंत माझी तशीच समजूत होती. तूं तरी किती विचित्र वागलीस! आधींच कां नाहीं मला सांगितलंस हें? कितीतरी वेळ पाणावलेल्या डोळ्यांनी काय पहात होतीस माझ्याकडे? वेडी कुठली!

यशोदा, माझ्या मनांत आता समृद्धीचा प्रकाश उजळला आहे. माझी काळजी घेणारं–माझ्यावर मनापासून प्रेम करणारं कुणी तरी मिळालं. पहा, केवढी जबाबदारी तूं तुझ्यावर घेतली आहेस ती. मीही तुझ्यावर पूर्ण विश्वास ठेवून निर्धास्त आहे. माझ्यांतले असंख्य दोष तूं तुझ्या प्रेमाने नाहींसे कर, आणि उत्तरोत्तर, विकास करून घेण्यासाठीं मला मदत कर. मी तुला सांगितलं होतंच कीं विराट अशा विकासशील जीवनाचे आपण सहप्रवासी आहोंत.

ता० क० अधिक काय लिहूं? मोटारींत हात जुळवतांना झालेला माझा ओझरता स्पर्शच तुला सर्व कांहीं सांगेल. मी तुझ्या पुण्याच्या पत्त्यावरच पत्रें पाठवीन. घरच्या माणसांना, तूं असशील तिथें, तीं न फोडतां पाठवून द्यायला सांग. मी तुला माझा पत्ता कळवीन तेव्हां ताबडतोब पत्र लिही.

मंगेश

शेवटी तो पुण्याला आला. मी त्याला भेटायला गेले. इराण्याच्या हॉटेलमधे बसून आम्ही चहा मागवला. तिथं त्यानं मला पुन्हा एकदा रजिस्टर लग्नाबद्दल विचारलं. मला धीर होत नव्हताच. पण तिथं त्याला निराश झालेलं बघणं मला केवळ अशक्य झालं. मलासुद्धा लग्न त्याच्याशीच करायचं होतं. पण शक्यतो घरचा विरोध न होता आणि घरी माझ्यामुळं कुणाला त्रास न होता, करायचं होतं. कुठल्याही मार्गानं ते होणार नाही हे माझ्या लक्षात आलं आणि केवळ नाइलाजानं आणि दु:खानं मी रजिस्टर लग्नाला हो म्हणाले. कारण दुसऱ्या कुणाशीही मी लग्न करू शकणार नाही, सुखी होऊ शकणार नाही, हे मी समजून चुकले होते. त्याच्यावर मनापासून प्रेम केलं. पण त्याला वाटलं तसं, त्याची काळजी घ्यायला असमर्थ होते. मी पूर्णपणं परावलंबी होते. हा निर्णय घेतल्यानंतर मंगेश प्रवासाला निघून जाणार होता. मला घरात राहणं भाग होतं. तिथं माझा कसा निभाव लागणार? पुढची दोन वर्षं कुठल्या प्रसंगांना तोंड द्यावं लागेल? आईचा विरोध, चिडचिड, राग, रोज उठून कसा सहन करणार? माझे मोठे तीन भाऊ मला काय करतील? काय बोलतील? बहिणी किती दोष देतील? पुढं शिकायला देतील का नाही? मंगेशशी पत्रव्यवहार कसा करणार? असे एक ना दोन–शेकडो प्रश्न मनात येऊन मला रडू येत होतं. मनात वादळ उठलं होतं. लग्न ठरवल्याचा आनंद स्वस्थ मनानं घेऊ शकले नाही.

माझ्याकडून होकार मिळाल्यानंतर मंगेश अतिशय आनंदानं पुढच्या प्रवासाला निघून गेला. आणि मी अतिशय जड अंत:करणानं घरी आले. मनात विचार आले, त्याच्या घरून जरी फारसा विरोध नाही, असं तो म्हणतो, तरी हे काही त्यांनी आनंदानं मान्य केलं नसेल. केवळ तो एकुलता एक मुलगा आहे आणि त्याला दुखवायचं नाही. आणि नाही, म्हटलं तरी तो आपलं ऐकणार नाही. त्याला करायचं तेच करणार. कॉलेज शिक्षणाबाबतीत त्यानं केलं, तसंच. म्हणून फारसा विरोध करायचा नाही, असं त्यांनी ठरवलं असेल. म्हणजे तिथंही मला नको असलेली सून म्हणूनच जावं लागणार. हे सारस्वत ब्राह्मण लोक. घरात म्हातारी आजी, तिचं कडक सोवळं. सोवळं कशाला म्हणतात हेसुद्धा मला ठाऊक नाही. मला ते शिवणार नाहीत. मी घरात (स्वयंपाकघरात) कशाला हात लावू शकणार नाही. इतपत कल्पना होती. घर लहान, घाणेरड्या चाळीतली जागा. स्वतंत्र खोली मिळणार नाही. संडास खालच्या मजल्यावर. मासळी खाणारे लोक. मला काहीच येत नाही. खाण्याची पण माहिती नाही.

मंगेशनं कॉलेज सोडून दिलं आहे. प्रवास करून अनुभव गाठीशी आला तरी लग्न झाल्यावर निदान दोघांच्या खर्चाचे पैसे मिळवता आले पाहिजेत. ते कसे मिळवणार? आतापर्यंत सर्व काही आई-वडीलच करत होते. मुलगा कितीही लाडका झाला तरी लग्न झाल्यावर दोघांनी आयतं खाणं योग्य नाही. मला बी०ए० व्हायला अजून दोन वर्षं आहेत. सर्व संकटांना तोंड देऊन पास झाले तरी त्याच्या घरचे लोक नोकरी करायला देतील याची काहीच खात्री नाही. प्रश्न, प्रश्न, प्रश्न! प्रश्नांचा डोंगर माझ्यापुढं उभा राहिला. त्या डोंगराखाली मी चिरडून कशी गेले नाही? याचंच मला आश्चर्य वाटतं.

लग्न केलं म्हणजे संसाराचं बंधन आलं. मुलं होणार–त्यांसाठी पैसा पाहिजे. म्हणजे नोकरी पाहिजे. म्हणजे व्यवहार आला, समाजाचं बंधन आलं. चक्र सुरू झालं. ह्या चक्रातून बाहेर पडलं तर फार मोठ्या आपत्तींना तोंड द्यावं लागतं, शारीरिक, मानसिक हानी होते. शक्ती क्षीण होत जाते. मोठी मोठी तत्त्वज्ञानं इथं कामाला येत नाहीत. हे सर्व थोड्याफार प्रमाणात कळत होतं. आता कळतं, एवढं नाही. तरी मनातून मी घाबरले होते. ह्या आत्मकेंद्री कवीबरोबर संसार मला झेपेल का? घेतलेली उडी, मला बुडवून तर टाकणार नाही ना?

बंगलोरहून त्याचं पत्र आलं :

बंगलोर
२.६.४८

प्रिय यशोदा,

पुण्याला बंगलोरच्या गाडींत बसण्यापूर्वी मी तुला एक लहानसं पत्र लिहिलं होतं.

बंगलोरला येऊन मला ५ दिवस झाले. उद्यां सकाळी पाँडेचरीला जाण्यासाठीं मी इथून निघणार आहे. बँगलोरला मी चॅनसिंग मास्तरांच्या घरीं उतरलों होतों. सर्व शहर मी पाहून घेतलं. या शहराचं खरं वैशिष्ट्य इथल्या मोठमोठ्या बागांत आहे. चार चार मैल क्षेत्रफळ असलेल्या बागा इथं आहेत म्हणून सांगितलं तर तुला आश्चर्य वाटेल. या बागा नाना तऱ्हांच्या फुलझाडांनीं आणि वृक्षांनीं सजवलेल्या आहेत. या बागांचं सौंदर्य पहात फिरत असतांना मला एकसारखी तुझी आठवण येत होती.

तूं इथें असतीस तर कुठल्यातरी विशाल वृक्षाखालीं आपण दोघे सावल्यांच्या मखमलीवर कुजबुजत बसलों असतों. त्या झाडाला जरी फुलं नसतीं तरी आपल्या अंत:करणांतला सुगंध शब्दांतून आणि श्वासांतून इथें दरवळत राहिला असता. मी प्रथम बोललों असतों, आणि तूं मधून मधून–थोडंसंच बोलली असतीस. मग मी विचारलं असतं, "बोलत कां नाहींस?" तूं म्हणाली असतीस, "कुठं? बोलतें आहे कीं" आणि मग मी चिडून–जरा मोठ्या आवाजांत म्हणालों असतों, "बोलते आहेस, पण जणूं कांही माझ्यावर उपकारच करते आहेस अशाच भावनेनें. त्यापेक्षां न बोललीस तरच उत्तम" (वगैरे). आणि मग आपण एकमेकांकडे पाहून हंसलो असतों–पुण्याला हंसत होतों ना? तसे. या क्षणीं आपलीं सर्व संभाषणं मला आठवताहेत. आणि या आठवणींतून कसल्या तरी विलक्षण सौंदर्याची प्रतीति मला येते आहे. खरं पाहिलं तर त्यांत विशेष कांहीं नाहीं. साधेच शब्द–साधीं वाक्यं. पाण्यावर पडलेल्या सावल्यांच्या जाळीसारखाच हा साधेपणा आहे. आणि साधेपणांतच अनंत सौंदर्य आहे. त्यांत एकप्रकारचा विशुद्ध आनंद आहे. या आनंदाच्या स्पर्शानं अंत:करणांतला क्षुद्र संकोच आणि भीती नष्ट होऊन माझं मन प्रसन्न आहे. जीवन आणि मरण मला सारखंच सुंदर वाटूं लागलं आहे. हें पत्र तुला लिहितांना मला असं वाटतं आहे कीं मी आनंदमय आहे, आणि आनंदाच्या कुठल्यातरी अनंत सागराकडे मी वाहत चाललों आहे. यशोदाही हातांत हात घालून माझ्याबरोबर शांतपणें अनंताकडे जाते आहे.

कालच माझ्या आईला मी एक पत्र लिहिलं. त्यांत तिला मी लग्नाची गोष्ट सूचनेनें कळवली. ज्या प्रतीकानें मी तिला हें कळवलं तें मोठं मौजेचं आहे. म्हणून तुला मी तें लिहितों. पूर्वीं माझ्या गळ्यांत एक लॉकेट होतं. तें तूं पाहिलं असशीलच. मी दीड वर्षांचा असतांना तें मला करवून घेतलं होतं. अर्थात इतकी वर्षं गेल्यानंतर ते मधून मधून तुटत असे. म्हणून नव्या नमुन्याची चेन करून घेण्यासाठीं सोनाराकडे टाकलं होतं. तें २४ तारखेला (निघण्याच्या आदल्या दिवशीं.) मिळालं. तें गळ्यांत घालून आईला दाखवतांना मी तिला म्हणालों कीं, "परवां ही चेन माझ्या गळ्यांत नसणार." आई म्हणाली, "कां?" मी हळूंच म्हणालों कीं, "हें लॉकेट मी यशोदाच्या गळ्यांत घालणार आहे." आई म्हणाली, "हें लॉकेट मुद्दाम करवून घेतलं आहे. तें तुझ्याच गळ्यांत असूं दे. 'वेळ' आली कीं मी दुसरं करवून घेईन." तेव्हां मी तिला लिहिलं, "पुण्याला आयत्या वेळी विस्मरण झाल्यामुळें, लॉकेट माझ्याच गळ्यांत

राहिलं. पण लौकरच तुला दुसरं लॉकेट करवून घ्यावं लागणार.''

खरोखरीच मी हें लॉकेट तुझ्या गळ्यांत घालणार होतों. पण तूं अशी कांहीं विचित्र वागलीस कीं मी गोंधळून गेलों. आणि त्या गोंधळांत विसरून गेलों. मी तुला स्पर्शही केला नाहीं. कारण माझ्यावर तुझा पूर्ण विश्वास आहे असं मला वाटलं नाहीं–त्याच वेळीं काय पण या क्षणींसुद्धां वाटत नाहीं. यशोदा, माझ्यावर तूं पूर्ण विश्वास ठेवशील तेव्हांच तूं खरं प्रेम करूं शकशील. आणि त्या वेळीं स्पर्श ही जीवनाच्या हृदयाकडे नेणारी एक महान गती होईल.

पाँडेचरीला जर मी रहाणार असलों तर ताबडतोब तुला पत्ता कळवीन. मग तूं मला पत्र पाठव. पत्र ''इतकं मोठ्ठं'' पाहिजे कीं तें वाचतांना तीन तास तूं माझ्याशीं बोलते आहेस असं मला वाटलं पाहिजं. एका पाकिटांत तें पुरणार नाहीं. तेव्हा तीन पाकिटं घेऊन ठेव. एकाच वेळीं तीन पाकिटं मला मिळालीं पाहिजेत. लहानसं पत्र पाठवलंस तर पुन्हां पत्र लिहिण्याची संधी केव्हां येईल हें सांगतां येणार नाहीं. प्रकृतीची नीट काळजी घे. आणखी काय लिहूं?

ता० क० प्रभू तुला नमस्कार सांगतो आहे.

मंगेश

ह्या पत्राचं उत्तर पाठवणं शक्य नव्हतं. कारण माझ्याजवळ पत्ता नव्हता. दुसरं पत्र पुन्हा त्याचंच आहे.

खिस्तुकुलाश्रम, तिरुपत्तूर.
१२.६.४८.

प्रिय यशोदा,

बंगलोरला असतांना मी तुला पत्र पाठविलें होतें. त्यानंतर मी पाँडेचरीला गेलों. चार दिवस मी तिथें होतों. अरविंदाश्रमांत जागा मिळाली नाही. अर्थात तिथें आम्ही एका लॉजमध्येच होतों. पाँडेचरीहून निघून आम्ही तिरुवण्णामलय या गांवीं रमणमहर्षींच्या आश्रमांत उतरलों. आश्रमांत तीन दिवस आम्ही होतों. नंतर तिथूनही निघावेंच लागलें. कुठेंच खोली मिळेना. तिरुवण्णामलयहून निघून तिरुपत्तूर या गांवीं शेवटीं आम्ही येऊन पोहोंचलों. इथें 'खिस्तुकुलाश्रम' नांवाचा आश्रम आहे. या आश्रमांत आम्ही उतरलों आहोंत. ही संस्था डॉ० पॅटन आणि डॉ० जसुदासन् या दोन मिशनऱ्यांनी उघडली. कोणत्याही मिशनशी अर्थात त्यांचा संबंध नाही, २०-२५ एकर क्षेत्रफळाची मोठी जागा आहे. या जागेंत त्यांच्या, शेतें, शाळा, एक मोठें हॉस्पिटल वगैरे गोष्टी आहेत. अगदीं तुमच्या इंडस्ट्रियल स्कूलसारखीच ही संस्था आहे. फक्त परिस्थिती वेगळी. डॉ० पॅटन हा माणूस फारच प्रेमळ आहे. या महिन्याच्या अखेरपर्यंत इथें रहाण्याची परवानगी त्यानें आम्हांला दिली. आश्रमाच्या बागेंत आणि

वाचनालयांत आम्ही काम करणार आहोंत. कदाचित् पुढेंही एकदोन महिने इथें राहूं. बँगलोरला असतांना प्रभूला कानडी भाषा येत असल्यामुळें विशेष अडचण भासली नाहीं. तिथून निघाल्यानंतर जे काही घोटाळे सुरूं झाले ते विचारूं नकोस. कारण तामीळ आणि तेलगू या दोनच भाषा या लोकांना येतात.

जेवणाचीही सारीच मौज. एका पत्रावळींत एक मोठा भाताचा गोळा आणून वाढतात. त्यावर एक पातळ सार. त्याला ना धड चव ना रुचि. असा कंटाळा येतो. पण हळूंहळूं होईल संवय. घरच्या चमचमीत जेवणाची आठवण येते. तुला जेवण करतां येतें का नाहीं? पण पुढें तूं कसंही जेवण केलंस तरी शांतपणें मी तें जेवूं शकेन. कदाचित् तूं स्वयंपाक सुंदरही करीत असशील. पाहूं आतां नशिबांत काय आहे तें.

आम्हांला रहाण्यासाठीं सुंदर खोली मिळाली आहे. माझी कॉट खिडकीजवळच आहे. तांबडा गुलमोहर अगदीं जवळच उभा असतो. लाल फुलांनी तो अगदीं मोहरून गेला आहे. कदाचित् कुणाच्या प्रेमांतही पडला असेल. कारण माझ्यासारखाच तो रात्रीं जागा असतो. कुणाची आठवण काढीत बसतो कुणास ठाऊक! पण हळूंहळूं मलाही नीज येऊ लागते आणि त्याच्यासारखींच माझीं स्वप्नें लाल फुलांनीं मोहरून येतात. पहाटे आम्ही दोघे जागे होतों आणि एकमेकांकडे बघून हंसतो. आपल्या हंसण्याचे अर्थ आम्हां दोघांनाच कळतात. इथला पत्ता मी तुला पाठवीत आहें. हातांत पत्र मिळाल्याबरोबर तूं पत्र लिहायला सुरुवात कर. मागल्यासारखा उशीर करूं नको. पत्र पोहोंचण्यास ४-५ दिवस लागतात. मग तुला विलंब करून कसं चालेल? एकच पाकीट असलं तर मी मुळींच वाचणार नाहीं. मी मागच्याच पत्रांत लिहून ठेवलं होतं की, तीन पाकिटं घेऊन ठेव. तूं पुण्याला आहेस कीं नगरला? कुणास ठाऊक?

मंगेश

ता० क० पाकिटावर पत्ता इंग्रजींतच लिही. मराठींत लिहूं नकोस. पत्र मात्र मराठींत लिही. इंग्रजीत लिहूं नको.

तुझाच मंगेश

प्रोटेस्टंट ख्रिश्चन समाजाबद्दल मंगेशच्या घरात बरेच गैरसमज होते. त्यांना वाटत होतं की ख्रिश्चन म्हणजे कॅथॉलिक ख्रिश्चन. म्हणजे मी फ्रॉक घालणारी, उंच टाचांचे सँडल्स घालून टॉक टॉक करत फिरणारी चंट मुलगी आहे. आणि आपल्या गोऱ्यागोमट्या एकुलत्या एका मुलाला नादी लावलं आहे. ते खरं प्रेम वगैरे नसून केवळ तारुण्यातली मजा लुटण्यासाठी त्याला मोहात पाडून, प्रेमाचं नाटक करत आहे. तो प्रवासात असताना त्यानं जेव्हा लग्नाबद्दल आईला लिहिलं, तेव्हा त्यांनी त्याला खरमरीत पत्र लिहिलं असावं. ते पत्र मला मिळालं नाही. बहुतेक फाडून टाकलं असावं. पण मंगेशनं लिहिलेलं त्या पत्राचं उत्तर माझ्याजवळ आहे. त्यावरून त्याची भूमिका काय होती हे लक्षात येतं. आईंना लिहिलेल्या पत्रावर तारीख नाही. पण माझ्या अंदाजाप्रमाणं ते 'ख्रिस्तुकुलाश्रम' मधूनच लिहिलेलं आहे :

प्रिय सौ० आई,

लग्नाच्या बाबतीत हें खास पत्र लिहीत आहे. नीट लक्षांत ठेव कीं या बाबतींत हें शेवटचेंच पत्र. पुन्हां यावर कोणत्याही तऱ्हेची चर्चा करण्याची अथवा या बाबतींत एक शब्दही बोलण्याची माझी इच्छा नाहीं.

पुष्कळ वेळां मौज अशी होते कीं, तूं शब्द वापरतेस पण त्या शब्दांचे अर्थ तुला नीटसे कळलेले नसतात. "परधर्माची मुलगी मी केली तर लोक निंदा करतील." वगैरे वगैरे. ज्या अडचणी तूं सांगतेस त्यांबद्दल मी कांहीं बोलत नाहीं. कारण ते बरंचसं खरं आहे. समाजाची वृत्तीच एकाद्या बुरसटलेल्या, महामूर्ख, दमेकरी म्हाताऱ्यासारखी असते. तेव्हां अशा गोष्टी होणं ही गोष्ट सहज आहे.

परंतु मला वाईट वाटलं तें, तूं हें लिहिल्याबद्दल नव्हे. तर तुझ्या दोन विशिष्ट वाक्यांबद्दल. लोकनिंदेची भीती तुझ्या मनांत निर्माण होऊन त्यामुळें माझ्या भावनांना उथळ आणि क्षुद्र म्हणण्याचा तुलाच काय पण कुणालाही अधिकार नाहीं.

तूं म्हणतेस कीं हें प्रेम नसून 'तारुण्यांतले चाळे' आहेत. तारुण्यांतले चाळे हा शब्द आपण केव्हां वापरतों? जेव्हां स्त्री आणि पुरुष केवळ शरीराच्या आसक्तीनें जवळ येतात आणि जी मोहावस्था निर्माण होते, तिला आसक्तीची धुंदी उतरेपर्यंत 'प्रेम' असें म्हणतात. तेव्हां तुला असं म्हणण्याचा काय अधिकार आहे कीं आम्ही दोघं केवळ उपभोगाच्या आसक्तीनें जवळ आलों आहोत? आणि हें प्रेम नसून केवळ हा मोह आहे? तो एक तारुण्यांतला चाळा आहे? असं पहा कीं केवळ शरीराच्या आसक्तीनें मी बेभान होऊन उठलों असतों, तर विशेष सुंदर नसलेल्या-अत्यंत साध्या अशा या मुलीशीं, मी वचनबद्ध झालोंच नसतों. ती जर उपभोगाची धुंदी असती तर माझ्याकडे पैसे होते. मुंबईसारख्या संपन्न शहरांत मी होतों-तिथें मी उत्तमोत्तम वेश्यांच्या दारांत बेहोष होऊन पडलों असतों. तारुण्यांतले सर्व चाळे तिथें केले असते. आणि वासनेची तहान सहज भागवली असती. त्यासाठीं प्रेम करण्याची जरूरच नव्हती. पाहा-मनाची फसवणूक मी करीत नसून अज्ञान आणि भय यांच्या पट्ट्या डोळ्यांना बांधल्यामुळें तुम्ही करीत आहांत.

आतां तुझ्या दुसऱ्या वाक्याबद्दल. तूं म्हणतेस कीं, "समाज आणि निसर्ग दोन्ही क्षमाशील नाहींत." क्षमा या शब्दाचा अर्थ तुला कळतो का? क्षमा कोण मागतो? ज्याची चूक झालेली असते तो. माझ्या बाबतींत क्षमेचा प्रश्न येतो कुठें? मी तर जें सत्य आहे-जें प्रकाशासारखें निर्मळ आहे, शुद्ध आहे, तेंच करीत आहे. भयाच्या ज्वाळांनी ज्यांच्या भावनांचे कोळसे झालेले आहेत आणि आपल्या सुरकुतलेल्या जीर्ण हातांनीं जीवनाचा गतिमान प्रवाह जे थोपवून धरण्याचा मूर्ख प्रयत्न करीत आहेत ते लोक आणि त्यांचा समाज मला क्षमा कसली करणार? मीच त्यांना क्षमा

करतों. कारण ते चुकत आहेत. क्षमा म्हणजे प्रेमाचा सुगंध. जो खरोखरीच प्रेम करतो तोच चुकलेल्यांना क्षमा करतों. मी सर्व मानवांवर प्रेम करतों आणि म्हणून मी या दुबळ्या समाजाला आनंदानें क्षमा करीन.

तसेंच निसर्गाच्या क्षमेबद्दल. मी निसर्गाच्या विरुद्ध गेलों तर त्याच्या क्षमेचा अथवा शिक्षेचा प्रश्न उत्पन्न होतो. मी तर उलट अगदीं निसर्गाचा लाडका आहे. कारण नैसर्गिक सत्य आचरणांत आणण्यासाठीं अनैसर्गिक वागणाऱ्या धर्माचे आणि शिस्तीचे खोटे बागुलबुवा निर्माण करणाऱ्या लोकांविरुद्ध मी बंड करून उठलों आहे. आज ना उद्यां साखळ्या तोडून हें कृत्रिम जीवन नैसर्गिक होईल अशी आमची आशा आहे. तेव्हां मी आणि निसर्ग दोघेही समाजाला क्षमा करूं. सत्य हीच सर्वांत मोठी शक्ती आहे. ज्या माणसाच्या मनांत ती आहे तो माणूस सर्व पृथ्वी जरी सुकलेल्या पानासारखी डळमळून कोसळली तरी पर्वा करणार नाहीं.

तुमच्या उभयतांच्या मनानें हें लग्न योग्य नसेल–तें तुम्हांला पसंत नसेल तर, त्याला इलाज नाहीं. तुम्हा दोघांवर माझें प्रेम आहे, परंतु तुम्ही जर सत्यापासून मला परावृत्त करणार असाल तर अर्थात माझा मार्ग मला पाहावा लागेल. तुमच्याशीं कोणत्याही तऱ्हेचा संबंध न ठेवतां मी कुठेंही राहीन. दु:ख सोसण्यासाठींच माझा जन्म आहे. उद्याच्या जगांत खरें सुख निर्माण करण्यासाठीं अनंत यातना मी हसत सोशीन. पण भेकडपणा करून हें लग्न मोडणार नाहीं. असत्य मार्गानें जाऊन आणि लाचार होऊन तुम्ही घातलेली सुखाची भीक हवी आहे कुणाला? मूर्ख समाजाच्या दारांत लाचारपणें याचनेचा कटोरा घेऊन सुखाची आणि शांतीची भीक मागण्यापेक्षां मी आजन्म झुंज घेऊन दु:खच पत्करीन. पुन्हां एकदां सांगतों कीं हें लग्न होणारच. आम्हां दोघांपैकीं एकाला मृत्यु आला तरच लग्न न होणें शक्य आहे.

तुमच्या घरांत आम्ही दोघे राहूं नये अशी तुमची इच्छा असल्यास मला तूं स्पष्ट कळव. कारण त्याप्रमाणें मला पुढचा विचार करावा लागेल. कृपा करून दुबळें तत्त्वज्ञान शिकवूं नको. 'नेहमीं सत्याचाच विजय होतो.' हें तूं लहानपणीं मला शिकवलेंस. त्याच्यावरच माझा अखंड विश्वास आहे.

तुझाच मंगेश

ह्या पत्रानंतर त्यांचा काय पत्रव्यवहार झाला हे मला ठाऊक नाही. पण ह्या लग्नाला विरोध न करण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे. मंगेशला लिहिलेल्या पत्रात मला त्यांनी पत्र लिहायला सांगितलं आहे. आणि त्यानं शिक्षण सोडलं तरी मी बी०ए० व्हावं, शिक्षण सोडू नये, असं त्यांनी सुचवलं आहे.

माझं पत्र मिळण्याच्या आधींच त्याचं तिरुपत्तूरहून आणखी एक पत्र आलं :

खिस्तुकुल आश्रम, तिरुपत्तूर
२३.६.४८

प्रिय यशोदा,

इथून मी तुला १२ तारखेला एक पत्र लिहिलें होतें, त्या पत्रांत माझा पत्ता होता. ज्यांना आम्हीं पत्रें पाठवलीं होतीं त्या सर्वांचीं पत्रें आलीं. परंतु तुझें पत्र अजून आलें नाहीं. २६मेला तूं मला पुण्याला भेटली होतीस. २७ तारखेला पुण्याहून बँगलोरला निघण्यापूर्वी मी तुला एक लहानसें पत्र लिहिलें होतें. मंत्रीच्या मोठ्या भावाचें (शरद) पत्र आलें. त्यांत त्यानें २९ तारखेला तूं मोटरस्टँडवर भेटल्याचें लिहिलें आहे. माझें पुण्याहून लिहिलेलें पत्र तुला त्याआधीं मिळालेलें असणार. दुसरें पत्र बँगलोरहून लिहिलें होतें. तें तुला मिळालें कीं नाहीं कुणास ठाऊक!

तिरुपत्तूरहून लिहिलेलें पत्र महत्त्वाचें होतें. कारण त्यांतून मी माझा पत्ता पाठविला होता. पुण्याहून इथें पत्र यायला फक्त तीनच दिवस लागतात. तेव्हां तुझें पत्र मला १९ तारखेला वास्तविक मिळायला पाहिजे होतें. पण २३ तारखेपर्यंत त्याचा पत्ता नाहीं. माझीं पत्रें पोस्टांतून हरवलीं कीं तुझ्या घरींच कुणी फोडलीं? कांहीं कळत नाहीं. तूं मुंबईला गेली असलीस तरी माझें पत्र Redirect होऊन त्याचें उत्तर एव्हांना मिळावयास हवें होतें. कदाचित तूं आजारी पडली असशील. तीच मला काळजी लागली आहे. मी एक तारखेपर्यंत इथें आहे. अजूनही ताबडतोब पत्र लिहिल्यास तें मला मिळूं शकेल. तोंपर्यंत पत्र आलें नाहीं तर मग पुन्हां योग केव्हां येईल हें सांगतां येत नाहीं. कारण पुन्हां आम्ही इथून कुठें जाऊं तें ठरलेलें नाहीं. तुझी खुशाली पण मला कळणार नाहीं. तुला जर कसलीही अडचण असली तर तूं माझ्या घरीं (आईला) किंवा मंत्रींच्या मोठ्या भावालाही लिहिलेंस तरी चालेल. तो मला अगदी जवळ आहे.

तुझें पत्र येणार नाहीं असेंच धरून या निर्वाणीच्या सूचना लिहीत आहे. अधिक काय लिहूं?

मंगेश

ह्या पत्रानंतर मी एक पत्र लिहिलं होतं; पण पेन नसल्यामुळं निळ्या कागदावर पेन्सिलीनं लिहिलं होतं. ते इतक्या वर्षांनंतर मलाच वाचणं अशक्य झालं. त्यांतला मजकूर मंगेशच्या पत्रावरून लक्षात येईलच.

तिरुपत्तूर
३०.६.४८

प्रिय यशोदा,

तुझें २७ तारखेचें पत्र आज सकाळींच मला मिळालें. मी चष्मा लावावा अशी तुझी इच्छा दिसते. पेन्सिलीनें लिहिलेलें तुझें पत्र इतकें पुसट होतें कीं तें सर्व

वाचण्यासाठीं मला जवळ जवळ एक तास लागला. कृपा करून पुढचीं पत्रें शाईनें लिही. कारण पेन्सिलीनें लिहिलेलीं तुझीं पाच पत्रें वाचलीं कीं मला डोळ्यांच्या डॉक्टरकडे जावें लागेलच म्हणून समज.

तूं पत्रांतून 'अहोजाहो' करण्यास सुरुवात केलेली पाहून मला आश्चर्य वाटलें. असं वाटलं कीं, मी जणूं काय ४०-४५ वर्षांचा प्रौढ मनुष्यच झालों आहे. पुन्हां तूं मला 'अहो' न म्हणतां 'अरे'च म्हणावं अशी माझी इच्छा आहे. जरी तूं माझ्याशीं लग्न करणार असलीस तरी शेवटपर्यंत तूं माझी कॉलेजमधली मैत्रीणच रहावीस अशी माझी उत्कट इच्छा आहे. पत्नी झालीस म्हणून अगदी म्हाताऱ्या माणसासारखं वागलं पाहिजे म्हणून तुला कुणी सांगितलं? आपण दोघं जरी म्हातारे झालो ना तरीसुद्धा इंटरच्या वर्गांत होतों तसेच खेळकर आणि स्वच्छंदी राहूं.

तूं पूर्वीं पाठवलेलीं पत्रं पोष्टांतच हरवलीं गेलीं. कदाचित् त्या पत्रांतून तूं 'अहोजाहो' केल्यामुळें तीं इतकीं जड झालीं असतील कीं पोष्टमनला उचलणं अशक्य होऊन त्यानं तीं वाटेंतच कुठंतरी टाकलीं असावींत.

कालच माझ्या आईचं पत्र आलं. मागें मी तिला लिहिलं होतं कीं, तुला यशोदाची पत्रानें ओळख करून घ्यायची असल्यास मी तिला कळवीन. तिनें तुला पत्र लिहिण्यास सांगितलें आहे. तूं पत्र लिहिलेंस कीं मग ती उत्तर पाठवील. (तिला शाईनेंच पत्र लिही. कारण नुक्तीच ती चष्मा लावूं लागली आहे.)

तुझ्या पत्राची मी एकसारखी वाट पहात असे. शेवटी तुझं पत्र मिळालं तेव्हा खरोखरीच अत्यंत आनंद झाला. आतां इथून मी मद्रासला जाणार. तिकडचा पत्ता मी तुला पाठवतों. तूं पत्राचें उत्तर पाठव. मला अजून ५-६ पत्रें लिहायचीं आहेत. पत्र लिहिण्याचा मला अगदीं जन्मजात आळस आहे. तुझी आई माझें अक्षर ओळखते असें तूं लिहिलेंस. मीच पत्रें पाठवितों हें तिला कसें कळलें?

दुसरी एक गोष्ट लिहिण्याचें विसरतच होतों. माझ्या आईनें लिहिलें आहे कीं, "तूं शिक्षण सोडलंस. आतां निदान तिला (यशोदाला) तरी बी०ए० होण्यास सांग. माझी तशी अगदीं इच्छा आहे." अर्थात तूं तुला काय हवें तें कर.

तुझाच मंगेश

ता० क० तुझे 'तुम्ही' आपल्या पत्रांत माझा नमस्कार लिहायला विसरले असं दिसतं. म्हणून माझ्या 'ताईला' व नव्या वहिनीला 'नमस्कार' लिहिण्यासाठी हा ताजा कलम जोडत आहे.

वि० श्री० प्रभु

माझी पत्रं त्याला मिळत नाहीत असं वाटलं म्हणून मी त्यानं सांगितल्याप्रमाणं शरद मंत्रींना एक पत्र लिहून माझा निरोप कळवायला सांगितला.

येरवडा
२६.६.४८

श्री० शरदकुमार यांस
यशोदाचा सप्रेम नमस्कार.

आश्चर्य वाटेल तुम्हांला हें पत्र पाहून. काय करणार, वेळच तशी आली.

काल मंगेशचं पत्र आलं. त्यांना मीं पाठवलेलं पत्र मिळालेलं दिसत नाहीं. तर त्यांना माझा एवढा निरोप कळवा कीं, मी अगदीं बरी आहे, काळजी नसावी. त्यांचं अगोदरचं पत्र ज्या दिवशीं मला मिळालं, त्याच दिवशीं एकदम दोन पाकिटं त्यांना टाकलीं होतीं. ती त्यांना मिळालीं नाहींत. आज पुन्हां एक पत्र त्यांना टाकणार आहें. तें तरी मिळेल का नाहीं कुणाला ठाऊक! म्हणून त्यांच्याच सांगण्यावरून हें पत्र तुम्हांला लिहीत आहें. त्यांना सांगा त्यांची सर्व पत्रं मला मिळालीं. आणि मी ह्या वर्षीं इकडेच राहाणार आहे. त्यांनीं सांगितलं होतं कीं तुम्हांला किंवा त्यांच्या आईंना लिही म्हणून. पण आईंना अशा गोष्टी कशा लिहायच्या? म्हणून तुम्हांलाच लिहायचं धैर्य केलं. क्षमा करा. फार त्रास दिला मीं तुम्हांला. शालिनी वहिनींना माझा नमस्कार सांगा. माझा पत्ता देऊन ठेवतें. केव्हां कशी वेळ येईल त्याचा नेम नाही.

यशोदा

इकडे आमचा दोघांचा सारखा पत्रव्यवहार चालेला बघून माझी आई बेचैन झाली आणि तिनं मला आलेलीं पत्रं मला न देता, स्वत:च फोडायला सुरुवात केली. असंच गपचूप उघडलेलं एक पत्र वाचून ती भयंकर चिडली. त्यात मंगेशनं पत्ता पण दिलेला होता; आणि तिनं त्या पत्रातून त्याला चांगलाच दम दिला असावा असा मला संशय आला. आणि मी लगेच त्याला दुसरं पत्र लिहून सावध केलं. ते असं :

येरवडा
९.७.४८

प्रिय मंगेश,

तुम्हांला माझा सप्रेम नमस्कार. तुमचं पत्र मिळालं. पण तें माझ्या अगोदर आईला मिळालं. आमचीं सर्व पत्रं अगोदर ऑफिसमधें जातात. मग घरीं पाठवतात. त्यामुळं सर्वच पत्रं मला आई आणून देते. तुमचं प्रत्येक पत्र मला तिच्याच हातून मिळालं आहे. पण ह्या वेळीं तिनं तें मला न देतां स्वत:च उघडलं. आणि तुम्हांला पत्र लिहिलं असावं असं मला वाटतं. तुम्ही पत्रांत काय लिहिलं होतं? आणि तिनं तुम्हांला काय लिहिलं असेल? मला कांहींच ठाऊक नाहीं; पण तुम्हीं एवढंच करा कीं, मनाला लावून घेऊं नका. आणि तिला उत्तर पाठवूं नका. आतांपासून मला

सरळच वाडिया कॉलेजच्या पत्त्यावर पत्र पाठवीत जा. मी नाइलाजानं ज्यूनिअरसाठीं वाडिया कॉलेजमधें नांव घातलं आहे. तुमचा पत्ता माहीत नसल्यामुळं हें पत्र शरदकुमारांच्याकडं पाठवणं भाग पडलं. त्यांचा पत्ता कळवला नसता तर माझी फार वाईट स्थिती झाली असती. त्यांच्याशिवाय आतां दुसरा मार्ग राहिला नाहीं. त्यांनीं गेल्या पत्राचं उत्तर फार चांगलं लिहिलं मला.

पत्र फारच घाईनं लिहिलं. आईनं सांगितलं की, "आतां जर माझं ऐकणार नसलीस तर आबाला (मोठ्या भावाला) सांगून टाकीन. त्याची पण मला फार भीती वाटते. केव्हां तरी कळायचंच आहे. पण आतां नको असं वाटतं. काय करूं, कांहीं समजत नाहीं! म्हणून कॉलेजला जातें. तुम्हीं सध्यां कुठें आहांत? मला कांहींच माहीत नाही. पुढच्या पत्रांत सर्व कळवा.

तुमची यशोदा

जी पत्रं आई मला आणून देत होती तीसुद्धा रात्री मी झोपल्यावर ती माझ्या ट्रंकेतून काढून वाचते हे एकदा मी बघितलं. म्हणून मी घरातच जागा बदलून पत्रं ठेवली तीसुद्धा ती शोधून रात्री वाचायला लागली. मग मी विमलच्या ट्रंकेत पत्र ठेवायला लागले. कारण घरात फक्त विमलच माझ्या बाजूनं होती. सर्व प्रकारची मदत ती करत असे व धीरसुद्धा देत असे. बाकी सर्व जण माझ्यावर रागावलेले होते. शेवटी विमलच्या ट्रंकेतसुद्धा पत्रं सुरक्षित आहेत असं मला वाटेना. तेव्हा प्रभा लाटकर नावाची माझी कॉलेजमधली मैत्रीण होती. ती हॉस्टेलमधे राहायची. तिला मी सर्व हकीगत सांगितली. आणि 'माझी आलेली पत्रं काही दिवसांसाठी तुझ्याकडं राहू देत. नंतर मी ती मुंबईला पाठवून देईन' असं सांगितलं. त्याला ती तयार झाली. ही पत्रं मी जिवापाड जपली. ती फाडून टाकून मला केव्हाच मोकळं होता आलं असतं; पण तसं मला मुळीच करायचं नव्हतं. ही पत्रं म्हणजे मला माझा मौल्यवान ठेवा आहे असं वाटायचं. जी गेली ती गेली. पण जी आहेत ती आजपर्यंत तशीच जपून ठेवली आहेत.

येरवड्याहून मी ९ जुलै ४८ ला मंगेशला जे पत्र लिहिलं, त्याचं उत्तर त्यानं लिहिलं :

चिंगलपट
१०.७.४८

प्रिय यशोदा,

तुझ्या आईचें पत्र मला एक्कामोरला असतांना मिळालें. तुझ्या आईनें तें पत्र तुला दाखविलें होतें कीं नाहीं याची मला नीटशी कल्पना नाहीं. परंतु आतां तुझ्या घरची परिस्थिती कशी असेल त्याची मला पूर्ण कल्पना आहे. ज्या दिवशीं मला तुझ्या आईचें पत्र मिळालें त्याच दिवशीं रात्रीं त्या पत्राचें उत्तर मीं तिला पाठविलें. तें तुला

वाचावयाचें असल्यास तिच्याकडून मागून घे. (बहुतेक ती तुला देणार नाहीं.) हे पत्रसुद्धां तुला मिळेल कीं नाही याची शंकाच आहे.

यापुढें तुझ्या घरच्या या हुकुमशाही परिस्थितींत तुला माझ्याशीं पत्रव्यवहार करायला मिळेल कीं नाहीं याची खात्री नाहीं. कारण माझा पत्ता तुला कसा मिळणार? पण तुला कांहीं निरोप कळवायचा असेल तर मुंबईच्या पत्त्यावर पाठव. मला तो मिळेल. तुला भिऊं नको म्हणून सांगण्यांत अर्थ नाहीं. कारण कांहींही झालं तरी तें सहन करण्याची तुझी तयारी असल्याचं तूं मला मागेंच अभिवचन दिलं होतंस. स्वत:च्या सुखदु:खांना जेवढं वैयक्तिक स्वरूप द्यावं तेवढं मन नेहमीं खालच्या पातळीवर येत असतं. आपल्या जीवनाच्या क्षणाक्षणांतून मानवाच्या दु:खमय जीवनाचे प्रश्न सुटले पाहिजेत. ह्यासाठीं जीवन हें एक हवन ठरलें तरी चालेल. माझे डोळे उद्यांच्या मानवाकडे लागून राहिले आहेत. जीवनांत क्षुद्र मूल्यांच्या पाठीं लागून दुसऱ्यांना तुडवूं पहाणाऱ्या सर्व हुकुमशहांविरुद्ध माझी जीवनशक्ती अभिमंत्रून मीं उभा आहें. हा अन्यायी हुकुमशहा घरांतला असो, समाजांतला असो, धर्मांतला असो, वा साम्राज्यांतला असो. कवीचा मार्ग अत्याचारी असूंच शकत नाहीं. कारण अत्याचारांतून सौंदर्य आणि शांती कशी निर्माण होणार?

तेव्हां तुला एवढंच सांगायचं आहे कीं कांहीं काळ तुला हें सहन करावंच लागेल. तूं मागेंच मला म्हणाली होतीस ना कीं, "खोटा मोठेपणा–खोटी प्रतिष्ठा तुला मुळींच नको" म्हणून? होतीस तशीच रहा म्हणजे झालं. अधिक काय लिहूं? कांहींही लागलं तरी माझ्या घरीं कळव. मीं आईला सर्व कळवीत आहें. माझी आई कोर्टाच्या प्रकरणाला कंटाळते. पण नाइलाज झाला तर काय करणार? कायदा पूर्णपणें आपल्या बाजूचा होईल त्यासाठीं मात्र आणखी दोन वर्षें थांबलंच पाहिजे. स्टेशनवरून हें पत्र लिहिलें–गाडी येण्याची वेळ झाली.

तुझाच मंगेश

मला त्याचा पत्ता माहीत नसल्यामुळं मी एक खुशालीचं पत्र शरदच्या नावावर लिहिलं आणि ते त्यांनी त्याला मदुरेच्या पत्त्यावर पाठवलं, त्यानंतरचं हे पत्र आहे. शरदकुमारांचं मला आलेलं पत्र :

गोरेगांवकरवाडी

१६.७.४८

प्रिय वहिनी,

त्रिमूर्तीपैकीं मला अजून कोणाचेंच पत्र आलें नाहीं. परंतु आपल्या 'ह्यांचें' एक पत्र त्यांच्या घरीं आलें आहे. पत्रांत तिघांची खुशाली आहे. आपल्या आईनें मंगेशला एक 'धमकी-पत्र' (समास मंगेशचा) लिहिलें आहे. त्या पत्राला आपण शांतपणें उत्तर पाठवलें आहे असें मंगेशनें लिहिलें आहे. असल्या पत्रानें अस्वस्थ होणारा मंगेश

नाहीं. तो चांगला खमक्या आहे. आपण अगदीं काळजी करूं नये. सध्यां फिरती चालूं असल्यामुळें मंगेशनें पत्ता दिला नाहीं. पण प्रभूचें घरीं पत्र आलें आहे. त्यानें दिलेल्या पत्त्यावर मी आतांच आपलें पत्र पाठवीत आहें. ते त्यांना मदुरेला मिळेल. आतां काळजी करूं नये. आपल्याला कोठलीही अडचण असल्यास संकोच न ठेवतां मला लिहिणें. आपला मंगेश फिरतीवर असला तरी त्याचा भाऊ शरदकुमार येथें गृहस्थाश्रम स्थापून स्थाईक आहे. म्हणून आपणांस काळजी नसावी. कदाचित पुढें मागें आपणांस आपल्या आईकडून अगर बंधूंकडून त्रास होईल. कदाचित घर सोडण्याचा आपल्यावर प्रसंग येईल. अशा वेळीं आपण आपल्या या दिराकडे खुशाल धांव घ्यावी. गरिबाच्या झोपडीचें दार आपणांस नेहमींच उघडें आहे. मंगेशच्या घरचीं माणसेंसुद्धां फार प्रेमळ आहेत. तें तर आपलें हक्काचें घर आहे. दीर म्हणून आपण मजवर हक्क सांगूं लागला ते वाचून बरें वाटलें. आपण काळजी करूं नये. घाबरण्याचेसुद्धां कारण नाहीं. आपल्या अडचणी नि:संकोचपणें लिहिणें. आम्ही सर्व खुशाल. शाली मजेत आहे.

आपला शरद

मदुराईच्या पत्त्यावर मी मंगेशला जे पत्र लिहिलं, त्यावर मंगेशचं उत्तर आलं :

मदुरा
२६.७.४८

प्रिय यशोदा,

तूं ९ तारखेला शरदच्या पत्त्यावर मला देण्यासाठीं जें पत्र पाठवलें होतेंस तें मला मिळालें. तुझ्या तिरुपत्तूर येथील पत्राला मीं त्याच वेळीं उत्तर पाठविलें होतें. त्या पत्रांत मी माझा मद्रासचा पत्ता पाठविला होता. (३०.६.४८ तिरुपत्तूर) तें पत्र तुझ्या आईनें फोडलें व त्या मद्रासच्या पत्त्यावर मला एक पत्र पाठविलें. माझें पत्र नंतर आईनें तुला दिलें असें तूं लिहितेस. मग त्या वेळीं मद्रासच्या पत्त्यावर तूं मला ताबडतोब कां पत्र लिहिलें नाहींस? तुझ्या आईनें मला जें पत्र पाठविलें, त्यांत तिनें असभ्यपणाची खरोखरीच कमाल केली. तुला वाईट वाटेल पण तिनें काय लिहिलें तें तिच्याच वाक्यांत इथें मीं देतों. "यशोदाचा आणि तुमचा संबंध होणें शक्य नाहीं. या पुढें तुम्हीं संबंध वाढवाल तर आम्हीं तुम्हांला ठोकून काढूं." ही धमकी ही या पत्रांतली मुख्य गोष्ट. उरलेली सर्व दरडावणी.

तुझ्या आईला मी त्याच दिवशीं उत्तर पाठविलें. अत्यंत शांतपणें–न चिडतां न उद्वेगतां मी तिचें पत्र लिहिलें होतें. आपण जुलूम करीत असतांनासुद्धा शांत राहून त्याला हंसत उत्तर देणारे लोक जगांत आहेत हें तिला कळावें अशीच माझी इच्छा होती. तें पत्र तुला तिनें दाखविलें नसणारच. दुसरे दिवशीं मी तुलाही चिंगलपट या रेल्वे स्टेशनवरून एक पत्र लिहिलें होतें. तें पत्र तुझी आई फोडणार याची मला

खात्री होती. तिनें तुला पत्र न पाठविण्याविषयीं मला दरडावलें होतें. परंतु मुद्दामच तें पत्र तुझ्या घरच्या पत्त्यावर पाठविलें. तें तुला मिळालें का? बहुतेक मिळणारच नाहीं.

तुझ्या घरीं सध्या तुला फार त्रास होत असेल. तुझें बरेच दिवस पत्र नव्हतें. अन्य कोणत्याही तऱ्हेनें खुशाली कळण्याची शक्यता नव्हती. एकसारखी मला तुझी काळजी वाटत असे. असं वाटे कीं, हिला घरीं कसं वागवीत असतील? कदाचित दुसऱ्या कुणाशी तरी लग्न करण्याची सक्ती तर करणार नाहींत? तुला मारहाण करण्याचा आचरटपणा तुझ्या घरचे लोक करतील असं वाटत नाहीं. पण कुणी सांगावं?

कांहींही झालं तरी माझा तुझ्यावर विश्वास होता. तुझ्या एकंदर सहवासांत–तू विलक्षण करारी आहेस असा संस्कार माझ्या मनावर झाला आहे. (तो चुकीचा असावा पण मनापुढें इलाज नाहीं.)

अर्थात् मी शरदला पत्र लिहितांना कळवीत असे कीं तुझा कांहीं निरोप असला तर ताबडतोब पाठवून द्यावा. त्याप्रमाणें तुझे ९ तारखेचें पत्र त्यानें मला पाठवलें. माझ्या आईलाही मी सर्व गोष्ट कळवली होती. तुझा पुण्याचा सध्यांचा पत्ता माझ्या बहिणीच्या पत्रांतूनही आला. शिवाय तुझ्या पत्रांत तो होताच. इतक्यांत तुझ्याशीं लग्न न करण्याचें कारण म्हणजे कोर्टाचा कायदा. कायद्याप्रमाणें मी अजून 'अज्ञान' (Minor) आहें, तेव्हां तुझी आई जर कोर्टांत गेली तर मला कायद्याप्रमाणें लग्न करण्याचा हक्क येत नाहीं. तेव्हां या सर्व गोष्टी नीट पाहूनच मला पावलें उचललीं पाहिजेत.

यशोदा, तुझ्या पत्रांतून तूं 'अहोजाहो' करण्यास कां सुरुवात केलीस? मला तूं 'अरे' म्हटलं असतंस तर अधिक बरं वाटलं असतं. अर्थात तुझी इच्छा (मीसुद्धा तुला 'अहो' म्हणावं असं वाटत असल्यास कळव!!).

तिरुपत्तूरला तुझीं दोन्ही पत्रें हरवलीं याचें कारण तुझा वेंधळेपणा. तूं चुकीचा पत्ता घातलास. कारण South India मधे दोन ठिकाणी 'तिरुपत्तूर' नांवाची गावे आहेत. पत्त्यातलं एक जरी अक्षर गाळलंस तरी पुरे. पत्रं गेलींच म्हणून समज. तरी बरं, तुझं तें पेन्सिलीनें लिहिलेलें तिसरें पत्र मला मिळालें.

आणि दुसरं एक तुला सांगतों. तूं भित्रेपणा केव्हा घालवणार तुझा? आईला घाबर, मोठ्या भावाला घाबर, असं करायला लागलीस तर लग्न झाल्यानंतर कसं करणार? तेव्हां तर आपण सर्वांच्या टीकेचा विषय होणार! नेहमीं मनांत भय निर्माण झालं की, अंतर्मुख होऊन त्याचं कारण शोधून काढावं. भयाचं कारण एकदा कळलं की पाहा, काय चमत्कार होतो तो. अर्थात प्रत्येक वेळीं ही अंतर्मुखता हवी. एक सत्य मी तुला सांगतों. जिथं भय आहे तिथं मोठं प्रेम असणं शक्यच नाहीं. प्रेम आणि भय एके ठिकाणीं राहूं शकतील असं तुला वाटतं का?

मदुरेला येण्यापूर्वीं आम्ही कोडाइकनाल या ठिकाणीं गेलों होतो. माथेरानप्रमाणें हे एक Hill Station आहे. समुद्रसपाटीपासून ८००० फूट उंचीवर हें ठिकाण आहे.

इथें कल्पनातीत थंडी असते. आम्ही एका अमेरिकन डॉक्टरणीकडे उतरलों होतों. तिनें आमची सर्व व्यवस्था केली. तीन Woolen Blankets आणि २ जाडजाड दुलया घेऊन प्रत्येकाला झोपावं लागतं. मजा वाटते. एकसारखी तुझी आठवण येत असे. अर्थात जागेपणीं. कारण झोप लागली कीं तूं नेहमीं स्वप्नांत माझ्याजवळच असतेस. तुला माझी कधीं आठवण येते का? तुझीं पत्रंसुद्धां मला मिळत नाहींत. तूं मला कधी भेटतेस असं झालं आहे. South India पाहून झाला कीं North India पहाण्यापूर्वीं मीं मुंबईला महिनाभर राहाणार आहें. जवळजवळ हें निश्चितच आहे. त्या वेळीं मीं ३-४ दिवस पुण्याला येऊन राहीन. अर्थात मी अगोदर तुला कळवीन. मग तूं मला भेटायला ये.

इथून मीं आतां सिलोनला जाणार. मधें कांहीं ठिकाणें पहाण्यासाठीं दोन दोन दिवस रहावें लागेल. सिलोनला मीं बहुतेक २० दिवस तरी रहाणार आहें. सिलोनला जाईपर्यंत मीं कांहीं तुला माझा पत्ता पाठवूं शकणार नाहीं. नंतर मीं तुला पत्ता पाठवला की, तूं मला पत्र पाठव. तुला लहर आली कीं तूं पत्र लिहून ठेवीत जा. मग पत्ता मिळाला कीं सगळीं पाठवून दे. पाकिटावर मुद्दाम चुकीचा पत्ता घालण्याची काळजी घे, नाहीतर तू यशोदा कसली?

तुला कांहींही लागलं तर तू शरदला कळवीत जा. कोणत्याही तऱ्हेची मदत तो तुला करील. मी, प्रभू, शरद आणि नरेश आम्ही चौघे अगदीं सख्ख्या भावाप्रमाणें जगतों. मैत्रीच्याही पलिकडची ती पायरी आहे.

इकडच्या जेवणाचा अगदीं कंटाळा येतो. भात आणि सार यांशिवाय बात नाही. मला तर चपातीच खाण्याची संवय होती. मटन मासळीसुद्धां इथें जवळ जवळ नाहींच. असा कंटाळा येतो कीं विचारूं नकोस. तुला जेवण करतां येतं का? येत असलं तर माझं नशीब! तुझं कॉलेज काय म्हणतं? पुन्हां पत्र पाठवशील तेव्हां सर्व गोष्टी लिही. (आता प्रभूनें गाण्याच्या सुरात विचारलं, कितवं पान? दहावं, बारावं?)

तुझ्या घरची परिस्थिती कशी आहे? तेंही सविस्तर कळव. तुझीं जीं दोन पत्रं हरवलीं होतीं त्यांत तूं काय लिहिलं होतंस? तीं हरवल्यामुळं माझी वाचण्याची उत्सुकता अधिक वाढली. त्यांतला महत्त्वाचा मजकूर मला पाठवून दे. आतां मी (एका धर्मशाळेंतून) पत्र लिहीत असतांना मौज झाली. एक बाई हातांत तांब्या घेऊन दारांत आली आणि तामीळमधें कांहींतरी बडबडूं लागली. आमची तिघांची तिला समजावतां समजावतां चांगलीच तिरपीट उडाली. शेवटीं चौकशी अंतीं कळलं कीं, 'ती दूध हवं कीं काय' हे विचारण्यासाठी आली होती. South मध्यें जवळ जवळ सगळे तामीळ बोलतात. फक्त सुशिक्षित माणसांना इंग्रजी येतें. आम्हांला थोडे थोडे तामीळ शब्द येऊं लागले आहेत, 'तामीळ तेरीआड' (I do not know Tamil) हें सर्वांत महत्त्वाचें. बाकीचे सर्व हातवारे. इकडे सर्व लोक लुंग्या लावून फिरतात. आम्हीसुद्धां लुंग्या नेसून मद्राश्यांत मिसळतों. प्रभू आणि मंत्री यांनी केस अगदीं बारीक करून घेतले आहेत. लुंग्या नेसले की ते विनोदी दिसतात. आणि म्हणूनच

मद्रासी लोकांत खपून जातात. लांब केस ठेवल्यामुळें आणि व्यवस्थित गोरा असल्यामुळें मी परका आहे हें ताबडतोब कळतें. मला बहुतेक बंगाली समजतात. सगळीकडे आम्हीं अगदीं धुमाकूळ घालीत असतों.

माझें पत्र मिळालें कीं शरदला कळव. तंजावरला असतांना मी त्याला सविस्तर पत्र लिहिलें होतें. सिंधूचें पत्र तुला येतें का? तूं तिला पत्र पाठवीत असशीलच.

घरीं तुला कसंही वागवलं तरी भिऊं नको. माझ्यासाठीं कांहीं काळ सहन कर. शरद आपलाच आहे. तो सर्व तऱ्हेची मदत करील.

अलीकडे कविता लिहितेस का? मी 'दधीचि' नांवाचं काव्य लिहायला घेणार असं म्हणतो. इतक्यांत नाही, चिंतन चालू आहे. इथें माझ्या हातून चांगल्या कविता लिहून होतात. प्रभू आणि नरेश यांचा तुला नमस्कार. अधिक काय लिहूं? प्रकृतीची काळजी घे.

तुझाच मंगेश

मला २६.७.४८ ला मदुरेहून पत्र लिहिलं. त्यानंतर लगेच मंगेशनं त्याच्या आईला लिहिलेलं हे पत्र :

मदुरा
८.८.४८

प्रिय सौ० आई,

मदुरेहून २६ तारखेला मीं तुला एक कार्ड लिहिलें होतें. त्यानंतर ताबडतोब दुसरे दिवशीं पोलिसांनीं 'संशयित' या सदराखालीं आम्हांला पकडून नेलें. कदाचित एकाद्या राजकीय कटाचे प्रतिनिधी म्हणून आम्हीं प्रवास करीत असूं असा त्यांचा संशय होता. जवळ जवळ १० दिवस आम्हीं तुरुंगांत होतो. प्रथम आम्हांला 'तिसरा वर्ग' दिला गेला. तेव्हां एक दिवस आम्ही अन्नसत्याग्रह केला. दुसरे दिवशीं ताबडतोब आम्हांला पहिला वर्ग मिळाला. उत्तम जेवण, दूध, दहीं, तूप सर्व गोष्टी आम्हांला तुरुंगांत मिळत होत्या. नंतर पोलिसांनीं मुंबईच्या पोलिसांकडे चौकशी केली. मुंबई पोलिसांनी कळविलें की कोणत्याही गटाशी यांचा संबंध नाहीं. अर्थात त्याच दिवशीं आम्हांला सोडून देण्यांत आलें.

इकडचे सर्व अधिकारी अगदी थेट न्यायाधीशापर्यंत आमच्या चांगलेच परिचयाचे झाले. त्याचप्रमाणें तुरुंगांतल्या वेगवेगळ्या गुन्हेगारांशीं आमचा परिचय झाला. त्यांच्या करुण जीवनकथा आम्हांला ऐकावयास मिळाल्या. जिथें तिथें आम्हांला अत्यंत आदरानें वागवण्यांत आलें. खरोखरीच या अनुभवाला मोल नाही. तो अमोल आहे.

मी तुरुंगांतून मधू लाड यांना पत्र लिहिलें होतें, कीं तात्याला (I.C.S. लाड) सांगून त्यानें आमच्याविषयीं कळवावें. तूं त्याला ताबडतोब कळव कीं आमची

बिनशर्त सुटका झाली. १५ दिवस जराही खर्च न होतां मस्तींत राहाण्यास मिळालें. मायबाप सरकारची कृपा!! फक्त कांहीं दिवस पारतंत्र्याचें दु:ख होत होतें. उद्यां आम्हांला सर्व तुरुंग पाहाण्यासाठी (शाळा हॉस्पिटल वगैरे) खास आमंत्रण आहे. दोन दिवसांनी सिलोनला जाण्यासाठी बहुतेक आम्हीं निघूं. शरदला नमस्कार सांग. सध्यां घाईंत असल्यामुळें पत्र छोटेंसेंच लिहिलें. नंतर सविस्तर लिहीन. कुमू, प्रभा, सुहास यांना आशीर्वाद. काकांना नमस्कार.

तुझाच मंगेश

मला ह्या तुरुंगवासाबद्दल कोणीच काही कळवलं नाही. मी तिकडं एकटी. पत्र पण महिनाभर आलं नाही, की आईनं दिलं नाही? काही कळायला मार्ग नाही. त्यानंतर बरोबर एक महिन्यानं त्यानं २६ जुलैला लिहिलेलं पत्र मला २६ ऑगस्टला मिळालं. तें पत्र लिहिल्यानंतर दोन दिवसांनी त्यांना पोलिसांनी पकडलं होतं. मला काहीच कल्पना नव्हती. माझं नेहमीप्रमाणं कॉलेज चालू होतं. पण चार दिवस आधीं मला सिंधूचं एक पत्रं आलं होतं. ते पत्र माझ्याजवळ नाही. त्यांत तिनं स्पष्ट कांही लिहिलं नव्हतं. पण ओझरता उल्लेख केला होता. त्यामुळं मी जास्तच घाबरून गेले. त्यानंतर मी मंगेशला लिहिलेलं पत्र असं आहे :

येरवडा
२६.८.४८

प्रिय मंगेश,
सप्रेम नमस्कार.

आज बऱ्याच दिवसांनीं तुला पत्र लिहायला बसलें आहें. आजच दुपारीं २६ जुलैला लिहिलेलें पाकीट आणि ११ ऑगस्टला लिहिलेलें एक कार्ड अशी दोन पत्रं एकदम मिळालीं. फार दिवसांनी तुझीं दोन पत्रं पाहून मला खूप आनंद वाटला.

त्याआधींचीं शेवटचीं दोन पत्रं आईनं मला दिलीं; पण तूं तिला लिहिलेलं पत्र मात्र तिनं मला दाखवलं नाही. ती एवढंच मला म्हणाली कीं, "मी त्याला एक पत्र लिहिलं होतं, आणि त्यानं मला फार वाईट उत्तर पाठवलंय."

तूं मजेंत आहेस हें वाचून आनंद वाटला. कारण तीनचार दिवसांपूर्वी सिंधूचं एक पत्र आलं होतं. त्यांत तिनं तूं उपोषण केलं होतंस आणि 'तुरुंगवास' असं काही तरी होतं. स्पष्ट कांहींच नव्हतं. मी घाबरून परवाच तिला एक पत्र लिहिलं आणि सांगितलं की, 'पुढच्या पत्रांत मला नीट सर्व काही कळव.

खरं म्हटलं तर, तुला 'अरे' म्हणायलाच मला आवडतं. पण घरांतल्या वडील माणसांच्या समोर मीं तुला 'अरे' म्हणून म्हणालें तर तें बरं दिसेल का? तरीसुद्धां तुला आवडत नसेल तर नाहीं म्हणणार. पण तूं मला 'अहो' म्हणण्याची मात्र कांहींच जरूर नाही हं!

तुला माझ्या घरांतल्या वातावरणाची बरीच काळजी लागलेली दिसते. पण काळजी करण्याचं कारण नाहीं. कारण इकडं सर्व कांहीं व्यवस्थित चाललें आहे. पण त्याचें कारण सांगितलें तर तूं माझ्यावर नक्की रागावणार हें मला माहीत आहे. घरांत मीं असं सांगितलं आहें कीं, 'मीं तुला अजून होकार दिलेला नाहीं.' हें मीं साफच खोटं सांगितलं. तसं मीं केलं याचं कारण, मला अजून दोन वर्षं इथं काढायचीं आहेत. माझ्या शब्दाला मीं प्राणापलीकडं किंमत देतें. तें तुला लवकरच दिसून येईल म्हणा! घरांतसुद्धां वेळ आल्यावर मी खरं काय तें सांगेनच. पण सध्यां तरी असा जो मी समज करून दिलेला आहे तो माझ्या आणि तुझ्याही फायद्याचा आहे. असं नाही का तुला वाटत? आतां जरी तुला तें बरोबर वाटलं नाहीं तरी तूं थोडे दिवस शांतच रहावंस असं मला वाटतं. तरी तुला काय वाटतं तें जरूर कळव. तुझ्या इच्छेबाहेर मी कधींच जाणार नाहीं.

माझं कॉलेज अगदी ठीक चाललं आहे. मी मराठी ऑनर्स आणि संस्कृत असे विषय घेतले आहेत. एकूण विषय तीनच–मराठी, संस्कृत व इंग्लिश. पण मराठीचा अभ्यास खूपच आहे. ऑक्टोबंरमधे सहामाही आहे. अजून एकही पुस्तक माझ्याजवळ नाही. संस्कृतला 'भगवद्गीता' आणि भवभूतीचे 'उत्तररामचरित' आहे. संस्कृत शिकायला मजा वाटते मला.

आता तूं पुण्याला आलास तर मला भेटतां येईल तुला. घरीं जातांना मीं रोज पुणें स्टेशनवरून बस धरतें. फार आठवण येते मला तुझी. सारखे तुझेच विचार असतात मनांत. स्वप्नं मला फारशीं पडत नाहींत आणि पडलीं तरी आठवत नाहींत.

आपण शाळेच्या बगिच्यांत फिरायला गेलों होतों ना? त्या शेतांत छान हिरवंगार धान्य आलं आहे. क्वचित तिकडे पण जाते फिरायला. त्या लहान बागेंत खूप फुलं आलींत. मीं रोज जुईचा गजरा करून घालतें. इकडे हवा फार छान आहे. पाऊस नाहीं, ऊन नाहीं, आणि थंडीही नाहीं. तिकडं थंडीमुळें फार त्रास होत असेल तुला.

ह्या वेळेस पाकिटावर पत्ता घालतांना फार काळजी घेतली पाहिजे. नाहींतर सगळंच लिहिलेलं फुकट जाईल; पण मला नाही वाटत, मीं त्या पाकिटावर पत्ता चुकलें असेन. तरी सांगतां येत नाहीं. घाईंत लिहिल्यामुळें चुकलेंही असेन. आतां बरोबर लिहिण्याचा प्रयत्न करीन. कारण माझं पत्र तुला फार दिवसांत मिळालं नाही.

माझ्या कविता वगैरे सर्व कांहीं सध्यां बंद आहेत. माझे तुला नेहमींच blessings आहेत. ते वेगळे कशाला पाठवायला पाहिजेत? हो, पण 'दधीचि' म्हणजे काय? इथूनच मला सुरुवात केली पाहिजे. नाहींतर कविता कशी कळणार? मधून मधून पाठवीत जा ना मला तुझ्या कविता. पाहूं या काही समजलं तर! बहुतेक तुला अर्थ सांगायची वेळ येणार. ह्या वर्षीं आम्ही गद्य शिकत आहोंत. पुढच्या वर्षीं तुझ्या कविता समजल्या तर नशीबच समजेन मी माझं.

तुला न मिळालेल्या पत्रांत मी फार लिहिलं होतं. आतां खूप दिवस झाले.

आठवत नाहीं मला जास्त. तरी–तुला भेटून आल्यानंतर घरीं काय प्रकार झाला होता तो वर्णन करून लिहिला होता. आईला वाटलं, मीं पळूनच गेलें. ती मुंबईला तार करणार होती–तुझ्या बहिणींचीं नांवं विचारलीं होतीं–मी तुला 'अहो' म्हणूं का नको म्हणून विचारलं होतं–नंतर त्या चेनविषयीं होतं. ती मला दिली नाहीस तेंच बरं झालं. कारण ती मला घालतांही आली नसती आणि जवळ ठेवणंही धोक्याचंच झालं असतं. त्यांतले महत्त्वाचे मुद्दे हेच आहेत.

आतां रात्रीचे १२ वाजलेत. मला झोप येऊ लागली. राहिलेलं पत्र आणखी मजकूर आठवून सकाळीं लिहीन.

छान झोप लागली. स्वप्न वगैरे काही पडलं नाही हं! तुम्हीं तर थंडीमुळं खूप उशिरां उठत असाल. घरी वेळ मिळाला नाहीं म्हणून हें राहिलेलं पत्र बस स्टँडवर उभं राहून लिहीत आहें. कारण आज पत्र टाकलंच पाहिजे मला. बरं पण तूं कोणत्या महिन्यांत परत मुंबईला येणार? लवकर ये, प्रभूला व नरेशला नमस्कार सांग. पुरें करतें.

यशोदा

तिघांचा एवढा प्रवास झाल्यानंतर प्रभूनं पुन्हा मुंबईला येण्याचं ठरवलं. मुंबईला येणाऱ्या गाडीत बसल्यानंतर त्यानं मला पत्र लिहिलं आहे, त्यावर तारीख आहे. गावाचं नाव नाही. कारण गाडी चालू आहे.

१.९.४८

प्रिय ताईस,

कोणत्या संबोधनानं सुरवात करावी हा क्षणभर मला प्रश्न पडला. केवळ 'प्रिय यशोदेस' म्हणून करावी कीं 'प्रिय वहिनींस' म्हणून करावी की, 'प्रिय ताईस' म्हणून करावी? ह्याचा विचार करावा लागला. मंगेश माझा आवडता मित्र, सख्ख्या भावाहून अधिक प्रिय. तेव्हां तुला वहिनी म्हणणें गैर नव्हतें. बुद्धीला पटलं पण मनाला पटेना. कारण 'वहिनी' शब्द कानाला नवीन वाटला. पूर्वी कॉलेजांत तुला 'ताई' म्हणत असे. त्यामुळें तोच शब्द पुढें पुढें येऊं लागला. आणि ताई आहेसच तूं. कांहीं महिन्यांनीं मोठी आहेस. हें मला विसरून कसं चालेल? तेव्हां शेवटीं ताई म्हणून पत्राची सुरुवात करायचं ठरवलं. यापुढेंही ताईच म्हणणार आहें मीं. तू 'वहिनी' म्हण म्हटलंस तरीदेखील!

सुरवातीला तारखेच्या वर स्थळाचं नांव नाहीं घातलेलं. कुठलं घालूं? कारण प्रतिक्षणीं स्थळ बदलत आहे. नागिणीसारख्या भरधाव सरपटत जाणाऱ्या मद्रास-मुंबई मेलमधे वरच्या बर्थवर बसून हें पत्र लिहीत आहें. अंग, कागद, पेन सारं काही थडथडतं आहे. तेव्हां कांहीं ठिकाणीं अक्षर वाचणं कठीण जाईल.

आजच सकाळी सिलोनहून मुंबईकडे निघालों आहें. जाफनाहून ९-४५ला

सुटणाऱ्या विमानांतून ११ला मद्रासला येऊन पोंचलो. आतां रात्रीं ९। वाजतां मुंबईकडे जाणाऱ्या गाडींत बसलों आहें. वाटेंत पुण्याला उतरून तुला भेटून जावं असा विचार होता. पण ही गाडी रात्री २।। वाजतां पुण्याला पोहोंचते. गैरसोय वाचवण्यासाठीं तो बेत सध्यां रहित करावा लागत आहे.

मंगेश व नरेश सिलोनमधेंच आहेत. मीच एकटा मुंबईकडे चाललों आहें. आश्चर्य वाटलं असेल तुला याचं.

मी पुढच्या प्रवासाचा बेत रहित केला आहे. तो मार्ग माझ्या स्वभावप्रकृतीला मानवला नाहीं. घरची, मुंबईची ओढ लागू लागली म्हणून मी हा मार्ग स्वीकारला आहे. मंगेश व नरेश मात्र मुंबईला परत येणार नाहींत. आणखी ५-६ दिवसांनीं ते सिलोन सोडून त्रावणकोर संस्थानांतून फेरी मारून, शेवटीं बहुतेक तिरुपत्तूरच्या आश्रमांत जाणार आहेत. तेथें वर्षभर रहाण्याचा त्यांचा विचार आहे. हा आश्रम फार सुंदर आहे. निसर्गरम्य, शांत नि प्रसन्न! एक छानशी लायब्ररी आहे. त्यांना रहायला सुंदरशी, वर गच्ची असलेली खोली मिळेल. तिथें एखादें वर्ष वाचन, चिंतन, मनन करण्यांत घालवावे असें त्यांच्या मनांत आहे. मी बहुतेक मुंबईला शाळेंत शिक्षक म्हणून राहीन.

कालच मंगेशला तुझं पत्र मिळालं. त्यानं तुला तीन पत्रं लिहिलीं पण तुला एकच मिळालं. अगदीं सुरवातीपासून हें असं चाललं आहे. तुझी व त्याची– दोघांचीही पत्रं गहाळ होतात. चुकून जर आलींच तर महिना-महिना उशिरां येतात; आणि मध्यंतरींच्या काळांत तुम्हां दोघांना तळमळत रहावं लागतं. मला वाटतं, पोस्टखात्यांत रसिक फार वाढलेयत अलीकडे. त्यांचे हात इतके तीक्ष्ण आहेत कीं एखादं प्रेमपत्र हातीं आलं की त्यांनीं ते ओळखलंच. बाहेरच्या जाड पाकिटांतूनही त्यांना आंतल्या पत्रांतली ऊब जाणवते बहुतेक. त्यामुळें प्रेमपत्र सहसा त्यांच्या हातून जिवंत सुटत नाहीं. तें नक्की गहाळ होतं. 'विरहवादी दिसतात बेटे! प्रेमी जीवांना तळमळत ठेवण्यांतच खरी मौज आहे असं मत दिसतं त्यांचं. ईश्वर त्यांचं भलं करो!

इतके दिवस आम्हीं तिघेही बाहेर असल्यामुळें केवळ शरद मंत्री एकटाच तुला सल्लामदतगार होता. आतां मींही मुंबईला आलों आहें. तेव्हां एका ऐवजीं दोन झाले. पण ह्या दुसऱ्या माणसाचा अधिक हक्क आहे. कारण पहिला तुझा केवळ दीरच होता. दुसरा तुझा दीरही आहे आणि भाऊही आहे. पत्राशेवटीं माझा पत्ता देऊन ठेवतों. गरज लागली तर साद घाल. भाऊ लगेच धावून येईल. विश्वास असूं दे.

पत्र बांध तुटलेल्या नदीसारखं बेसुमार वाहात चाललं आहे; पण गाडीचा वाढता वेग पत्राचा वेग कमी करायला भाग पाडीत आहे.

मंगेश खुशाल आहे. पण इतक्या लवकर पत्र मात्र लिहितां येणार नाहीं म्हणत होता. कदाचित् मन:स्थिती ठीक नसेल त्याची. तरी खुशालीचा निरोप द्यायला त्यानें मला सांगितलं होतं, तो मी ह्या पत्रांतून दिलाच आहे. आणखी थोड्या दिवसांनी

तुला त्याचं पत्र येईलच. आणखी काय लिहू? आपल्या माणसाला पत्र लिहू लागलो म्हणजे संपतां संपत नाहीं तें.

तुझा वि० श्री० प्रभु

प्रभू मुंबईत आला म्हणून मी त्याला एक पत्र पाठवून मंगेशची खुशाली व पत्ता विचारला होता. कारण दोन महिने मला त्याच्याकडून एकही पत्र आहं नव्हतं. शरद किंवा प्रभू यांच्याकडूनच मला त्याचा ठावठिकाणा कळत असे. त्यानंतर प्रभूनं मला पाठवलेलं हे पत्र :

मुंबई
२६.९.४८

प्रिय ताईस,

तुझें पत्र घरीं येऊन पडलें होतें. मी कांहीं जरुरी कामासाठीं मंगळूरपर्यंत जाऊन आलों. १४ दिवसांनी २४ तारखेला परत आल्यावर तुझें पत्र मिळालें. त्यांतला फोटो पाहून फार बरं वाटलं. त्याच दिवशीं मला मंगेशचं कन्याकुमारीहून लिहिलेलं पत्र मिळालं. मला वाटतं, सध्यां तो त्रावणकोर संस्थानांत मथाईच्या आश्रमांत असावा. त्याला मी कालच एक जरा कडक पत्र लिहून पाठवलं आहे. तें पत्र वाचून तो तुला ताबडतोब पत्र पाठवील असं वाटतं. शिवाय त्याच्या पत्रांतून तुझा फोटोही पाठवून दिला आहे.

शरदकडे गेलों होतों तेव्हां त्याला आलेलं तुझं पत्र त्यानं दाखवलं. शरद रागावला असं खरंच का तुला वाटलं? शरद मनापासून कुणावर रागावल्याचें मीं कधींच पाहिलें नाहीं. रागाचें सोंग मात्र खूप वेळां करतो. तुझ्यावरचा रागही केवळ त्याची एक गंमत होती.

मला अलीकडे फार कामं असतात. कधी कधी जीव मेटाकुटीला येतो; पण इतक्या उठाठेवींतूनसुद्धा माझ्या मनाचा जिवंतपणा गेलेला नाहीं. तो कधीं जाणं शक्य नाही. मंगळूरहून परत येतांना मुद्दाम आडरस्त्यानें म्हैसूर संस्थानांत गिरसप्पा येथील धबधबा पाहून आलों. तिथें एक दिवस होतों. तिकडच्या सौंदर्यानं मी क्षणभर भान विसरलों व दिवसभर पावसांत भिजायलाही कमी केलं नाही. परिणाम सरळ होता. मनाला, आत्म्याला संतोष झाला; पण शरीर लेकाचं कुरकुर करूं लागलं. आता खोकला, सर्दी यांचा थोडासा त्रास होऊ लागला आहे.

तूं पुण्याला येण्याविषयीं लिहिलंस याचं मला फार बरं वाटलं, माझीही फार इच्छा आहे तुला एकदां भेटण्याची; पण १० ऑक्टोबरच्या आंत येतां येईल कीं नाहीं याची शंका वाटते. तरीसुद्धां त्यांतल्यात्यांत एक दिवस काढून, येण्याचा मी शक्यतोंवर प्रयत्न करीन.

काल संध्याकाळीं मंगेशच्या घरीं गेलों होतों. मंगेशची आई तुझ्याविषयीं विचारूं

लागली. तेव्हां मी तुझं पत्र व फोटो आला असल्याचं सांगितलं. आईनें व काकांनी (मंगेशचे वडील) तुझा फोटो पहाण्याची फारच इच्छा दर्शवली. पण मी तो फोटो सकाळींच पत्राबरोबर मंगेशला पाठवून दिला होता. तुझ्याजवळ आणखी एखादा फोटो आहे का तुझा? असला तर अवश्य पाठवून दे. नसला तर negetive तरी पाठव म्हणजे मी फोटो काढून घेईन. मंगेशच्या आई-वडिलांची इच्छा आहे पाहायची. त्यांनीं पाहून झाला म्हणजे मीं तो फोटो माझ्या album मध्यें ठेवून देईन. अर्थात्, तुझी त्याला हरकत नसल्यास. असल्यास मीं तो तुला परत पाठवून देईन.

आणखी काय लिहूं? तुझी सहामाही जवळ आली असेलच. अभ्यास चालला आहे ना थोडातरी? कीं आपली मंगेशचंच ध्यान करीत बसतेस दिवसभर? थट्टा केली जरा. मनाला नकोस हं लावून घेऊं. माझी ताई आहेस. मला हक्क आहे तुला त्रास देण्याचा नाहीं का?

अच्छा, समक्षच बोलूं आतां.

तुझा भाऊ वि० श्री० प्रभु

हे पत्र आलं आणि काही दिवसांनीच मंगेशचं पत्र आलं की 'दिवाळीसाठी मी व नरेश मुंबईला येत आहोंत.' ते पत्र असं :

तिरुपत्तूर
२८.९.४८

प्रिय यशोदा,

तिरुपत्तूर येथील आश्रमांतून तुला हें पत्र लिहीत आहें. मुंबईला जाण्यासाठीं मीं इथून उद्यां किंवा परवां निघणार. अर्थात् सरळ मुंबईला न जातां, पुण्याला थांबून तुला भेटून मग पुढें जाईन. तेव्हां १-२-३ तारखेला साधारण २-२।। च्या सुमाराला दररोज, स्टेशनवर माझी ३०-४० मिनिटें वाट पाहा. याचा तुला थोडासा त्रास होईल पण परिस्थितीच अशी आहे कीं मीं तुला निश्चित एक अशी तारीख सांगूं शकत नाहीं. कदाचित तुझी परीक्षा चालूं असण्याचा संभव आहे. तसें असल्यास मीं स्वत: कॉलेजमधे येऊन पाहीन.

प्रभु एका महिन्यापूर्वींच मुंबईला गेला हें तुला कदाचित कळलें असेल. मी व नरेश फक्त एक महिना दिवाळीसाठी घरी येणार आहोंत. तेव्हां मुंबईला जातांना आणि येतांना तुला भेटूं शकेन. सध्यां मी भेटल्याशिवाय कोणत्याही पत्त्यावर पत्र पाठवूं नको.

मंगेश

मंगेशनं जरी 'लिहू नको' कळवलं होतं, तरी त्याचा पत्ता मला कुठूनसा मिळाल्यामुळं मी त्याला पत्र लिहिलं :

येरवडा
२.११.४८

प्रिय मंगेश,

सप्रेम नमस्कार.

खूप खूप वाट पाहिली असशील माझ्या पत्राची. आतां कदाचित वाट पहायचीसुद्धां सोडून दिली असशील. मीं तरी काय करूं? तुला पत्र लिहायचं म्हणजे मला बराच वेळ एकान्त हवा असतो; आणि तो सध्यां घरांत मिळणं फारच कठीण झालं आहे. सुट्टींत सर्वजण घरीं आले आहेत. सुट्टी संपल्यावर मात्र वहिनींशिवाय सर्व जण जातील.

शिवाय गेले सातआठ दिवस मला अगदीं बरं वाटत नव्हतं. खूप सर्दी, खोकला झाला होता. अगदीं पडूनच होतें मी कालपर्यंत. बारीक ताप पण असायचा अंगांत. आतां थोडं बरं आहे मात्र सर्दी आहे अजून. काळजी करण्यासारखं कांहीं नाहीं.

सिंधूचं कालच पत्र आलं. तिला पण मी बरेच दिवसांत पत्र लिहिलं नाहीं. तूं तिला भेटलास असं तिनं लिहिलंय.

बरं, तुझं कसं काय चाललंय? तुझ्या बहिणीच्या (कुमुदिनी) लग्नाचं काय ठरलं? रोज म्हणत होतें, आज पत्र लिहीन, पण त्याला सुरुवातच होत नव्हती!

आतां दिवाळी आली. खूप मजा मजा असेल तुमच्या घरी. फराळ खातांना आठवण तरी येते का माझी? माझ्या वाढदिवसाची आठवण होती का तुला? खूप काय काय खाल्लं होतं मी. पण विसरून नव्हतें गेलें त्या आनंदांत तुला.

मुंबईला किती दिवस रहायचा बेत आहे तुझा? पण माझं कॉलेज सुरूं झाल्याशिवाय कांहींच लिहितां येणार नाहीं तुला!

तुझीच यशोदा

त्यानंतर आठ दिवसांनीच मी दुसरं पत्र लिहिलं. दिवाळीची सुट्टी संपत आली होती.

येरवडा
८.११.४८

प्रिय मंगेश,

तुला माझा सप्रेम नमस्कार. माझं पहिलं पत्र तुला मिळालंच असेल. तें मीं फारच घाईंत लिहिलं होतं. आतांसुद्धां रात्रीचे दहा वाजून गेलेत. आतां मीं पत्र लिहायला बसलें.

माझी सुट्टी संपत आली. एका अर्थीं बरं झालं. तुझं पत्र तरी येईल लवकर. तुझं उत्तर आलेलं नसतांना मीं पत्र लिहायला बसलें तर मला जमतच नाहीं. लिहावंसं तर खूप वाटतं, पण कांहींच लिहून होत नाहीं.

मुंबईत किती दिवसांचा मुक्काम आहे तुझा? जातांना पुण्यावरून जाणार नाहींस म्हणून म्हणाला होतास. समजा, जर इकडे थांबायचा बेत केलास तर त्या लॉजमधें उतरूं नकोस. फार वाईट लोक आहेत ते. तीनदां जाऊन विचारलं तरी त्यांनी खरं सांगितलं नाहीं मला. विनाकारण चुकामूक झाली आपली.

माझा सहामाहीचा रिझल्ट मिळाला. मी फक्त मराठीला बसलें होतें आणि तेंही कांहीं एक अभ्यास न करतां. तरीसुद्धां चांगले मार्क मिळाले. आहे कीं नाहीं आश्चर्य? कॉलेजमधें अभ्यासाला जातें असं सांगून मी तुझ्याकडे येत असे.

तुझ्या घरच्या लोकांना मला पाहाण्याची कितीतरी इच्छा होत असेल. माझ्यापेक्षां चांगलीं मुलगी पाहून दिली असती त्यांनी तुला. पण मींच तुझ्या नशिबांत होतें त्याला कोण काय करणार?

तूं माझ्यावर एक कविता लिहिली आहेस ना? 'वीज तूं होऊन ये गे', ती मला पाठवून दे. मीं दाखवणार नाहीं कोणाला. मीच आपली वाचून समाधान करीन मनाचं. तुझी 'वायूस' नांवाची कविता माझ्याजवळ आहे. लहर आली कीं काढून वाचतें. सुट्टींत खूप, शिवणकाम, लेसकाम केलं. दिवाळींत स्वयंपाक पण करावा लागला. बाईला सुट्टी दिली होती. स्वयंपाक करतांना सारखी तुझी आठवण येत होती. तुला वरण आवडत नाहीं. मला तर फार आवडतं. मग कसं काय व्हायचं आपलं? पाहूं या आतां पुढचं पुढें, हो ना?

तुझ्या बहिणीचं काय ठरलं? (कुमुदिनी) करून देणार ना लग्न त्यांचं? लग्न करतां येत नाहीं म्हणून किती जण तळतळत असतील? त्यांनी जर आपल्यासारखं धैर्य दाखवलं तर त्यांनाही तें अवघड वाटणार नाहीं.

किती लिहिलं तरी थोडंच आहे. तू मला बोलायला सांगत होतास. पण तेव्हां मला बोलतां आलं नाही. पण पहा हं, मीं एकदां बोलायला लागलें म्हणजे कोणाला ऐकणार नाहीं.

आता तूं मला खूप मोठं पत्र पाठवलं पाहिजे. तिकडे असतांना माझीं पत्रंच मिळालीं नाहींत. इकडे आहेस तोंपर्यंत सारखीं पत्रं पाठवीन मी.

नरेश, अण्णा यांना नमस्कार सांग. तसेंच तुझ्या बहिणींना नमस्कार.

तुझीच यशोदा

मुंबई

९.१०.४८

प्रिय यशोदा,

तुझीं दोन्हीं पत्रं मिळालीं. मागल्या महिन्याच्या आठ तारखेला तूं मला पत्र लिहिणार होतीस. जवळ जवळ एक महिना मीं तुझ्या पत्राची वाट पहात होतों. मग म्हटलं कीं, घरांत तूं अगदी रंगून गेली असशील–आणि साहजिकच माझी आठवणसुद्धां

तुला झाली नसेल-कशी होणार?

शेवटीं तूं कसंबसं एक पत्र खरडून टाकलंस. त्याबद्दल तुझे मीं आभारच मानतों. अगदींच कांहीं तूं मला विसरली नाहींस. एकसारखी मी तुझी काळजी करीत असे. माझ्या घरीं सिंधु वरचेवर येते. (मेहुणी म्हणून विशेष हक्कानें येते.) तिलासुद्धां तुझी खुशाली कळत नसे. वेळ मिळाला नाहीं ही खोटी सबब तूं मला लिहिली आहेस. एका महिन्यांत साधं खुशालीचं पत्र पाठवायला तुला मुळींच वेळ मिळाला नाहीं यावर मी म्हणून विश्वास ठेवतों. (इलाज नाहीं.)

आतां कांहीं महत्त्वाच्या गोष्टी मीं तुला लिहिणार आहें. माझ्या आईला तुला पाहायचं आहे. वडील म्हणाले की, तुला इथेंच दिवाळीसाठी म्हणून आठ दिवस राहायला घेऊन ये. अर्थात् ही गोष्ट अशक्य होती. तेव्हां मीं माझ्या आईला व बहिणीला घेऊन पुण्याला लॉजमधें येणार आहें. मीं केव्हां निघूं तें कळव. तुला सोईस्कर अशी तारीख सांग. शक्यतों लवकर ही गोष्ट झाली पाहिजे. हें पत्र मिळाल्याबरोबर ताबडतोब मला पत्र लिही. मला रागावण्याची संधी देऊ नकोस.

तूं तुझ्या पत्रांत आपल्याला नमस्कार कां लिहिला नाहींस, असं आईनं विचारायला सांगितलं आहे. माझ्या बहिणीचं लग्न ठरलं. खुशींत असते. दोघंही फिरायला, सिनेमाला अगदी न चुकता जातात. मीं मात्र इकडे तळमळत असतो. माझ्या घरची सर्व मंडळी अगदीं न चुकता तुझी आठवण काढतात. दोन दिवसांपूर्वी शकू, रेळे, नाईक व सिंधु फराळाला म्हणून आल्या होत्या. माझी धाकटी बहीण सुहासिनी, वहिनीला लवकर घेऊन ये, म्हणून पाठी लागली आहे.

हें पत्र मिळालं की ताबडतोब उत्तर लिही.

तुझाच मंगेश

मंगेशच्या आई मला बघायला येणार हे वाचल्यावर मी अतिशय घाबरले. कारण तोपर्यंत आमची भेट झाली नव्हती. पहिल्यांदाच त्या मला बघणार होत्या. मी काही गोरी नाही, सुंदर नाही, श्रीमंत पण नाही. चांगले, भारी कपडे माझ्याजवळ नाहीत. घरांत कॉलेजला जाते असं सांगूनच बाहेर पडणार तेव्हा मुद्दाम चांगलं पातळ नेसता येणार नाही. नाहीतर आईला संशय येईल. तेव्हा, नेहमी कॉलेजला नेसत असे ते गुलाबी रंगाचं, पुणेरी काठाचं सुती पातळ होतं, तेच नेसायचं ठरवलं. आणि मला सोईस्कर असे दिवस बघून त्याप्रमाणं मंगेशला कॉलेजमधूनच पत्र लिहिलं :

वाडिया कॉलेज, पुणे
११.११.४८

प्रिय मंगेश,

तुला माझा सप्रेम नमस्कार.

आतांच तुझं पत्र मिळालं. वाचून आनंद वाटला आणि भीतीही वाटूं लागलीय.

काय मत होईल त्यांचं मला पाहून! कांहीं का होईना! तुझं माझ्याविषयीं चांगलं मत असलं म्हणजे मग मला दुसरं काहीं नको.

उद्यां, म्हणजे बारा तारखेला मला सुट्टी आहे. आणि मधें फक्त शनिवार आहे तेव्हां सोमवारनंतर म्हणजे–पुढल्या आठवड्यांत तुम्हीं केव्हांही आलांत तरी चालेल. तूं जर आधीं आलास तर जास्त बरं होईल. म्हणजे मला पण तयारींत राहातां येईल आणि बरं वाटेल. कारण आतांपासूनच मला भीती वाटूं लागली आहे.

तुझ्या आईंना मीं नमस्कार लिहिला नव्हता. मला तसं लिहायला जरा अवघड वाटलं. कारण अजून त्या मला ओळखीत नाहींत; पण ह्या वेळेला त्यांना व बहिणींना सप्रेम नमस्कार सांग.

तुम्हीं कधी निघतां तें लवकर कळव. मीं सोमवारी पत्राची वाट बघतें.

तुझीच यशोदा

या पत्राला आलेलं उत्तर :

मुंबई
१३.११.४८

प्रिय यशोदा,

तुझें पत्र मिळालें, आईलासुद्धां दाखवलें. तेव्हां मीं स्वत:च आईला आणि माझ्या सर्वांत धाकट्या बहिणीला (सुहासला) घेऊन सोमवारीं सकाळीं ८.२० च्या गाडीनं निघणार आहें. पुण्याला गाडी १२.३० च्या मानानं पोहोंचते. तेव्हां शक्य तों तूं सोमवारींच लॉजमधें १-३० च्या सुमाराला येऊन जा.

तूं आईला सोमवारीं भेटच. पण मंगळवारींसुद्धां भेटायला ये. सर्व कार्यक्रम नीट लक्षांत घे. वेंधळेपणा करूं नको.

माझं मन सध्यां विलक्षण अस्वस्थ आहे. मनावर आणि मेंदूवर एवढा ताण पडतो कीं तो सहन करणं मला अशक्य व्हावं. तुझ्याशीं बरंचसं बोलायचं आहे. तुझ्या सहवासांतून, स्पर्शांतून मला खरोखरीच नवं जीवन घ्यायचं आहे. जिच्या सहवासानं आणि प्रेमानं माझं थकलेलं आणि गळून गेलेलं मन पुन्हा अननुभूत जिवंतपणानं फुलून उठावं अशी तूंच एकटी आहेस. खरं ना? मला तसं वाटतं. तुला माझ्याविषयीं इतकं गाढ प्रेम वाटतं कीं नाहीं कुणाला ठाऊक? मला उगीचच अविश्वास वाटतो याबद्दल. तूं सर्वस्वी तुझं हृदय मला देतेस असं वाटत नाहीं. कदाचित ही माझी चूक असेल, आहे का? तसं असलं तर तूं मला भेटल्यानंतर न विसरतां सांग.

सध्यां पुष्कळ विचार येतात. प्रमाथी कल्पनांनीं मन भरून गेलेलं असतं. पण हातून कांहींच लिहून होत नाहीं. आतां तू भेटल्याशिवाय नाहींच होणार. तू मायेनें माझ्या केसांवरून आणि कपाळावरून हात फिरवलास कीं अद्‌भुत वेगानें माझी

प्रतिभा जीवन व्यक्त करूं लागेल. मागच्या वेळींसुद्धां असंच झालं. जें लिहिण्यासाठीं मीं चार महिने सारखा तळमळत होतों तें मीं पुण्याला दोन दिवसांत लिहून टाकलं; पण मी येणार म्हणून खरोखरीच तुझं अंत:करण भरून आलं आहे का? तू भेटल्यानंतर कळेलच मला. मात्र या वेळीं मीं निघतांना मागल्यासारखी रडूं नकोस. त्या वेळीं माझ्यामुळें तुझ्या डोळ्यांत अश्रू आले असं मला एकसारखं वाटत होतं. मींच वाईट आहें. पण या वाईट माणसाचं तुझ्यावर अत्यंत प्रेम आहे. आतां तो भेटायला येतो आहे. वाट पहातेस ना?

ता० क० येतांना कुंकू लावून येशील का? सक्ती नाहीं–सूचना. तुझं कपाळ मोठं असल्यामुळें तुला खुलून दिसतें. सोमवारीं येच. त्या दिवशीं दैवयोगानें चुकामूक झाली तर मंगळवारीं.

तुझाच मंगेश

आणि त्यानं सांगितल्याप्रमाणं सोमवारी दुपारी मी लॉजवर गेले. तेव्हां हे तिघं आलेले होते. तिथं माझा जगावेगळा बघण्याचा कार्यक्रम झाला. अगदी साधी सुती गुलाबी रंगाची साडी. एक वेणी, एकही दागिना नाही, हातात कॉलेजची वही आणि पुस्तकं. कॉलेजमधून निघताना कपाळाला बारीकसं कुंकू लावलं होतं. इतर दिवशी मी कधीच कुंकू लावत नव्हते.

खोलीत गेले. मंगेश "बस" म्हणाला, तेव्हा बसले. आई आणि सुहास माझ्याकडं बघत राहिल्या. मग मंगेशनं ओळख करून दिली. मी हातांनी नमस्कार केला. आमच्याकडं पाया पडण्याची पद्धत नाही. मग त्या माझ्याशी बोलायला लागल्या. त्यांनी मला पुष्कळ प्रश्न विचारले. स्वयंपाक करता येतो का? शिवण काम येतं का? वाचनाची आवड आहे का? पण सर्वांत महत्त्वाचा प्रश्न हा होता की, "तू ह्या माझ्या मुलांत काय पाहिलंस? आणि लग्नाला कशी तयार झालीस? त्यानं कॉलेज सोडून दिलं आहे. केस व दाढी वाढवून तो कविता करीत फिरतो. त्याला नोकरी नाही. तो पैसे मिळवीत नाही, संसार कसा करणार आहांत?" आधीच्या प्रश्नांची मी घाबरत त्रोटक अशी उत्तरं दिली. पण हा शेवटचा प्रश्न? ह्या प्रश्नाला उत्तरच नव्हतं, तर सांगणार काय? मी खाली मान घालून, गप्प बसून राहिले, थोड्या वेळानं त्या स्वत:च म्हणाल्या की, "हे बघ मी आहे तोपर्यंत तू भिऊ नकोस." हे वाक्य ऐकलं आणि मला धीर वाटला. ह्या बाई प्रेमळ आहेत ह्याची खात्री पटली.

ही आमची भेट झाली आणि जाताना मंगेशनं सांगितलं की, "आता मी परत पुण्याला येणार नाहीं. मुंबईहून थेट पुन्हां प्रवासाला जाणार आहे. वर्ष दीडवर्ष काही मी येणार नाही. तोपर्यंत ही शेवटची भेट, माझी आठवण काढ." असं सांगून ते सर्व जण बोरकरांच्या घरी गेले आणि तिथून मग दुसऱ्या दिवशी मुंबईला गेले. आणि एकटीच मी पुन्हा येरवड्याला गेले.

पुढचे काही दिवस मला भयंकर मानसिक त्रास झाला. कशातच मन लागेना. एकटं, व निराधार वाटायला लागलं. ह्या प्रकरणाचं दडपण मनावर येऊ लागलं. मन मोकळं करायला कुणाजवळ काही बोलता पण येत नाही. कारण आईला, "मी अजून लग्नाला होकार दिलेला नाही, असं सांगितलं होतं." खरं सांगितलं असतं तर दोन वर्षं मला घरात काढणं कठीण झालं असतं. कोणाजवळ काही बोलले आणि त्यांनी जाऊन आईला सांगितलं तर ती माझं कॉलेज बंद करील–म्हणजे पत्र लिहिणं बंद व क्वचित भेटत होतो ते पण बंद होईल, अशी भीती व भयंकर मानसिक ताण अशी अवस्था झाली; आणि त्या तिरीमिरीतच मी त्याला पत्र लिहिलं :

येरवडा
२२.११.४८

प्रिय मंगेश,

तूं गेलास त्याच दिवसापासून मीं पत्र लिहिण्याचा विचार करीत होतें. पण प्रत्येक वेळेला कांहींतरी अडथळा येत गेला. आज सोमवार. रात्रीचे नऊ वाजून गेलेत. अशीच वेळ मला पत्र लिहायला बरी वाटते.

अभ्यासासाठीं मी व्हरांड्यांत एकटीच बसत असते. लहानशा घासलेटच्या बत्तीच्या उजेडांत पंत्र लिहायला बसलें आहें. (तेव्हां विजेचे दिवे आले नव्हते.) बरं तें जाऊं दे, नाहींतर म्हणशील पत्र लिहायचं सोडून हे काय लिहीत बसली ही? पण मीं पत्र लिहीत असतांना आजूबाजूचं वातावरण कसं होतं, हें तुला समजावं अशी माझी इच्छा होती.

तू इथून गेलास–दुसऱ्या दिवशी मी कॉलेजला गेले. पण माझं तिथं लक्षच लागेना. असं वाटायला लागलं की मी बोरकरांच्याकडं आले असते तर बरं झालं असतं. उगीच वाटलं–लॉजवर जाऊन खोलीत पहावं. पण तूं तिथं असणं अशक्यच होतं. तूं पुण्यांत असून तुला भेटतां आलं नाहीं म्हणून फार वाईट वाटलं.

आतां दीड वर्ष भेट होणार नाहीं. निरोप घेतांना मला विशेष वाईट वाटलं नाहीं; पण घरीं आल्यानंतर माझी स्थिती फारच वाईट झाली होती. वाटलं, तुझ्या पाठोपाठच मुंबईला निघून यावं. तूं मला वेडी म्हणतोस, पण हें वेड कोणी लावलंय मला? किती तरी लिहावंसं वाटतं, पण लिहायला बसलें कीं कांहींच सुचत नाहीं. आतां तूं असतास तर खूप बोललें असतें तुझ्याबरोबर. न बोलून छळतें ना मीं तुला? तूं बोल म्हणतोस पण त्या वेळीं शब्दच निघत नाहीं तोंडांतून माझ्या.

खरंच का आतां मधें येणार नाहींस? असं करूं नको. दोन वेळेला तूं इकडे येऊन गेलास पण मला इतकं वाईट वाटलं नव्हतं. ह्या वेळेला मात्र विरहाची खरी कल्पना आली. जातांना सांगून गेलास, "आठवण काढ हं माझी!" मला मुद्दाम तुझी आठवण काढावीच लागत नाहीं. कारण मीं पुस्तक वाचीत असलें तरी त्यांतून माझं

लक्ष उडून जातं आणि तुझे विचार मनांत घोळूं लागतात. असं झालं तर माझा अभ्यास कसा होणार? तुला परीक्षा द्यावी लागेल माझ्याऐवजीं.

बरं, आतां मुंबईंत किती दिवस राहाणार आहेस? मुंबईंतच राहिलास तर नाहीं का चालणार? इतक्या लांब जाऊन कां रहावंसं वाटतं तुला? एकदा गेलास कीं खरंच लवकर परत येणार नाहीस. बरं पण गेलास तरी, जायच्या आधीं भेटून जाशील ना? मला खूप रडावंसं वाटतं. सारखं डोळ्यांत पाणी येतंच. मन ताब्यांत रहात नाहीं. कारण मनाचा ताबासुद्धां नकळत तूंच घेतला आहेस.

ह्या वेळेला इकडे तुझ्या कांहीं कविता लिहून झाल्या नाहींत. तिकडे तरी लिहून होतील का नाहीं? तूं एक नाटक पण लिहायला घेतलं आहेस ना? तें किती झालं लिहून? मीं आतां अभ्यासाला लागावं म्हणतें पण इतक्यांत लक्ष लागेल असं दिसत नाहीं.

आई कशा आहेत? "मी आहे तोंपर्यंत तूं भिऊं नकोस." ह्या त्यांच्या शब्दांनीं मला फारच धीर दिला. त्यांच्या प्रेमळपणाविषयीं मला प्रश्नच उरला नाहीं. त्या भेटल्यापासून फारच समाधान वाटू लागलं. स्त्रीचं हृदय स्त्रीलाच कळणार. किती लवकर त्यांना माझ्याविषयीं आपलेपणा वाटूं लागला! शिवणाबद्दल कौतुक तरी किती केलं त्यांनी माझं! पण मी बोललें नाहीं म्हणून वाईट वाटलं असेल त्यांना. त्यांना म्हणावं, ही पहिलीच भेट होती. एकदां मुंबईला आल्यावर पाहा किती बोलतें तें. पुढच्या वेळीं मीं त्यांना पत्र लिहीन. ब्द

सुहास मला फार आवडली. फार गोड आहे ती. ती लहानच रहावी असं मला वाटलं. तिला सांग कीं, "मीं येईपर्यंत आहेस तशीच रहा. तसेच कुमुदताईंना व प्रभाताईंना नमस्कार सांग. पुढच्या वेळीं त्यांना घेऊन ये. मला भेटायला. आणि हो, कुमुदताईंना Congratulations सांग. लग्न कधी करायचं ठरवलं त्यांचं?

शुक्रवारीं सिंधूचं पत्र मिळालं. दोन दिवस मीं कॉलेजमधें जात नव्हतें. त्यामुळं पत्र तिथं पडून राहिलं. सिंधु हल्लीं फारच Philosophical लिहिते. तिच्या मनांत काय चाललंय हें तिच्या लिहिण्यावरून कळत नाही. ती भेटली तर तिची समजूत घाल. ती माझ्यासाठीं वाटेल तो त्रास सहन करायला तयार आहे. पण तिला कोणत्याच बाबतींत त्रास होऊं देऊं नये असं मला वाटतं. कांहीं झालं तरी, सध्यां तिला माझ्यामुळं घरचीं बोलणीं सहन करावीं लागणारच. तिथं मात्र मी काहीच करूं शकत नाहीं. लवकरच तिला पत्र लिहिणार आहें.

आतां अकरा वाजून गेले. घरांत सर्वजण निजलेत. मी अशी लिहीत बसलें तर किती लिहीन ते सांगतां येत नाहीं. तूं पण मला मोठं पत्र पाठवलं पाहिजेस. शेवटचंच सांगतें, आणखी एकदा पुण्याला येऊन जा. का कंटाळलास पुण्याला? कंटाळून चालणारं नाहीं हं! आतां पुरें करतें.

तुझीच यशोदा

हे पत्र पाठवलं आणि ३० तारखेला मला एकदम दोन पत्रं मिळाली. एक मंगेशचं आणि एक प्रभूचं (अण्णा)–आधी अण्णाचं पत्र :

मुंबई
३०.११.४८

प्रिय ताईस,

तुझ्या अण्णाचा सप्रेम प्रणाम. मंगेशला लिहिलेलं तुझं पत्र आतांच वाचलं. कां, दचकली नाहींस ना? 'अरेच्या हा वेडा मंगेश माझी पत्रंही प्रभूला दाखवतो का, असा विचार येत असेल तुझ्या मनांत. होय ना? अगं, पण त्यांत आश्चर्य कसलं? मंगेश नि तूं मला किती जवळचे आहांत ह्याची तुला पूर्ण जाणीव आहे. तुम्हां दोघा प्रेमी जीवांचीं मनं मला दूरची नाहींत. तुम्हा दोघांच्या अंतरंगांतील तरंग नि प्रवाह मला परकी नाहींत. तरीसुद्धां तुझीं पत्र मीं वाचतों, हें मीं तुला कळूं दिलं नसतं. पण आपली पत्रं तिसरा कोणी वाचतो, म्हणून संकोचानें लिहिणारी तूं नव्हेस. माझ्याशीं मोकळेपणानें वागतेस म्हणून हें लिहून गेलों.

इतर मुलींचा दुबळेपणा, भित्रेपणा पाहून मला तुझी थोरवी कळली. तुझं धैर्य, आपल्या भावनेशीं प्रामाणिक रहाण्यासाठीं कुणाच्याही विरोधाला न जुमानण्याचं तुझं मानसिक सामर्थ्य मोठं आहे. मंगेशच्या ध्येयनिष्ठ व ज्वलंत व्यक्तित्वाला तुझ्या मनोधैर्याची फार फार आवश्यकता आहे.

आईनं व सुहासनं तुझा लळा घेतला याचा मला आनंद झाला. आपल्या मुलांची इच्छा नीट समजून घेऊन ती इच्छा अशुभ नसली तर मुलांच्या मार्गांत अडथळा न आणणारे आईबाप धन्य होत.

पुण्याला तूं भेटलीस तेव्हां आपण एकमेकांशीं फारसं बोलूं शकलों नाहीं. तुझ्याशीं खूप खूप बोलावं अशी इच्छा होती. पण ती तशीच राहिली. तुझं सुख पाहून मी इतका संतुष्ट झालों होतों कीं माझ्या सुखदु:खाच्या गोष्टी काढून रसभंग करण्याची इच्छाच होईना.

सिंधु मला अलीकडे बरेच दिवसांत भेटली नाहीं. मागें दोनतीनदां भेटली तेव्हां फारशी बोलली नाहीं. तिचं दु:ख अगम्य आहे. कदाचित् आपलं दु:ख कळून घ्यायला व तें दूर करायला प्रभू असमर्थ आहे असं तिला वाटलं असेल.

मंगेश तुला आजच पत्र लिहायला बसला आहे. ही दोन्ही पत्रं तुला एकदमच मिळतील.

ज्याला आरंभ आहे त्याला अंतही आहे. हें पत्र इथंच संपवतों.

तुझा भाऊ अण्णा

हे दुसरं पत्र मंगेशचं त्याचबरोबर मिळालं :

मुंबई
२८.११.४८

प्रिय यशोदा,

तुझें पत्र दोन दिवसांपूर्वी मिळालें. ज्या दिवशीं मीं निघालों त्याच दिवशीं तूं पत्र लिहिशील अशी माझी कल्पना होती. प्रत्येक वेळीं निघतांना मीं तुझ्याकडून ही गोष्ट कबूल करून घेतों. पण स्वत:च्या कबुलीप्रमाणें वागायचं तूं नेहमींच टाळतेस. अर्थात त्यासाठीं वेगवेगळ्या सबबी तुझ्याकडे असतात. या वेळींसुद्धां तूं असंच केलंस. जवळ जवळ एक आठवडा मीं तुझ्या पत्राची वाट पहात होतों. तरी तुझं पत्र येईना. मग मला येतेवेळची आठवण झाली. मी जातांना तुला फारसं वाईट वाटलं नाहीं, याची जाणीव मला झाली होती. तेव्हांच मीं तुला म्हणालों होतों, "जरा तरी वाईट वाटतं का तुला"? तेव्हां तूं म्हणालीस, "नाहीं तर! वाईट फक्त तुलाच वाटतं कीं काय?" मी गप्प बसलों. बोरकरांकडे असतांना मला तुझी एकसारखी आठवण येत होती. पण तिथंसुद्धां तूं आली नाहींस तेव्हढी ओढच तुला नाहीं असा मीं समज करून घेतला होता.

तुझं मला पत्र मिळालं त्याच्या आदल्या दिवशीं मीं तुला एक लहानसं पत्र लिहायचं ठरवलं होतं. त्यांत मीं असं लिहिणार होतों कीं, "तुला माझ्याविषयीं ओढ वाटत नाहीं, हें खरं असलं तरी निदान एक खुशालीचं पत्र पाठवीत जा."

पण दुसरे दिवशीं तुझं जें पत्र आलं त्यानं माझा सर्व गैरसमज दूर झाला. मला वाटलं कीं, उगीचच मीं भावनाविवश झालों. इतकं तळमळून तूं कधींच पत्र लिहिलं नव्हतंस. पत्र वाचलं तेव्हां माझे डोळे अक्षरश: भरून आले. क्षणभर असं वाटलं की माझी यशोदा मला मिळाली. मी एका विशिष्ट आर्त mood मधे असलों कीं चटकन भावनाविवश होतों.

इथें मला तुझ्यावांचून मुळींच करमत नाहीं. ध्यानीं, मनीं आणि स्वप्नीं तूंच असतेस. मी एकसारखा तळमळतों; पण कांहीं झालं तरी हें दीड वर्ष मला काढलंच पाहिजे. माझं प्रेम अधिकाधिक सखोल होत चाललं आहे. माझ्या जीवनाचा गाभा महाप्रकाशानं उजळून टाकण्याचं सामर्थ्य त्यांत येत आहे.

तूं मला एकसारखी पुण्याला येऊन जा असं सांगतेस. मला तें आतां जमेल का नाहीं कुणाला ठाऊक! तरी माझी इच्छा येण्याचीच आहे. त्रावणकोरला जातांना जमलं तर मी पुण्याला येऊन जाण्याचा प्रयत्न करीन. इतका दीर्घकाळ तुला भेटल्याशिवाय मलासुद्धां राहाणं शक्य नाहीं.

काल एक कविता माझ्या मनाप्रमाणें लिहून झाली. नाटक कांहीं मी लिहायला घेतलं नाही. कविता मात्र बऱ्याच सुचल्या आहेत. निर्मितीचा तो पवित्र क्षण आला कीं त्या लिहून होतील. बोरकर या वेळीं म्हणत होते कीं "तुम्ही संग्रह काढा, प्रकाशक वगैरे मी शोधतो." इतक्यांत कवितासंग्रह काढण्याची माझी तेवढी इच्छा

नाही. पण ते फारच म्हणूं लागले तर मी कविता सिलेक्ट करण्यासाठीं बसणार असं म्हणतों. नक्की कांहींच नाहीं. पण संग्रह निघाला तर त्याचं नाव ठेवणार आहें 'धारानृत्य.'

माणसांची मला मोठी मौज वाटते. माझा मुलगा डॉक्टर आहे, वकील आहे, कारकून आहे, वगैरे सांगायला त्यांना बरं वाटतं. पण माझा मुलगा कवी आहे असं सांगायचं झालं तर तोंड वाकडं होतं. पैसे हेच आज मोठेपणाचं मूल्य आहे. तुलासुद्धां तोंड वाईट करून सांगावं लागेल कीं, 'माझा नवरा कवि आहे,' खरं ना?

पत्र बरंच लांबलं. आतां पुरें करतों. मला मोठीं पत्रं पाठवीत जा. विलंब करूं नको. या वेळीं आईलाही छोटंसं पत्र टाक. त्यांतच चार ओळी सुहासला. तुझं पत्र आलं तर तेवढंच मला सुख.

सर्वस्वी तुझाच मंगेश

बोरकरांसारखा कवी, मंगेशला कवितासंग्रह काढण्याचा आग्रह करतो आहे याचा मला फार आनंद वाटला. त्या आनंदातच मी मंगेशला लिहिलं :

येरवडा
१ डिसेंबर ४८

प्रिय मंगेश,

तुला माझा सप्रेम नमस्कार. कालच तुझं पत्र मिळालं. खूप खूप आनंद वाटला. अण्णाचं पत्र पण त्याबरोबरच मिळालं. तूं त्याला माझं सबंध पत्र वाचायला देत असशील याची कल्पना नव्हती मला.

इकडे सध्यां फारच थंडी पडते. रात्रीचे १० वाजून गेलेत. हवेंत फारच गारठा आहे. माझ्या अंगांतली सगळी ऊब तूं बरोबर घेऊन गेलास कीं काय? फार थंडी वाजतेय मला.

बोरकरांनींच तुला संग्रह छापायला सांगितला म्हणून बरं झालं. कारण ह्या बाबतींत तूं बाकी कोणाचंच ऐकलं नसतंस. आठवतं का? त्या 'संस्मरणीय मंगळवारीं' तूं मला म्हणाला होतास कीं, "माझी कवितांची सर्व पुस्तकं मीं तुला पाठवीन, कवीला ह्यापेक्षां जास्त काय देतां येणार"? आतां नुसती पुस्तकंच नाहीं तर तूं स्वत:च मला मिळालास. भाग्यवान समजतें मीं स्वत:ला. माझा नवरा कवि आहे, हें मी तोंड वाकडं करून सांगणार नाहीं, तर अभिमानानं सांगेन. वकील, डॉक्टर ह्या तर माणसानं दिलेल्या पदव्या आहेत. पण 'प्रतिभा' ही परमेश्वरी देणगी आहे; आणि ती फारच थोड्यांना मिळालेली असते. वकील आणि डॉक्टर तर शेकडोवारी पडले आहेत. पण कवि मात्र बोटांवर मोजण्याइतके आहेत. तुझी कविता जरी मला समजली नाहीं तरी तुझी योग्यता मला कळते.

'धारानृत्य' नांव सुंदरच आहे. मला जास्त वेळ थांबायला मिळावं म्हणून त्या

दिवशीं तूं पावसाला पडायला सांगितलंस–आणि तो पडलाही. आपलं सुख पाहून जणूं काही निसर्गच नाचायला लागला होता. 'धारानृत्य' नांवाची कविता तूं इथंच पूर्ण केलीस? का तिकडेच पुरी झाली होती?

१० ते १३ तारीख आमच्या कॉलेजचं Social आहे. वाडियाला फार चांगले प्रोग्रॅम ठेवतात. खूप मजा येते तीन दिवस. सुशीला राणेचं गाणं आहे. एवढंच मला कळलं आहे. तूं इकडे असतास तर बरं झालं असतं. पण तुला त्यांत मजा वाटेल का नाहीं कुणाला ठाऊक?

तुझं पत्र मीं तीनदा वाचलं. तरी माझं समाधानच होत नाहीं. लवकर पेटींत ठेवून दिलं पाहिजे तिथं ठेवायलासुद्धां मला भीती वाटते. कारण मीं दिवसभर घराबाहेरच असते. आणि पेटीला कुलूप मीं कधींच लावत नसे, आणि आतांच लावूं लागलें तर विनाकारण संशय यायचा.

अण्णाला मीं ह्याच पाकिटांत पत्र टाकतें. रेळेचें पण मला पत्र आलें आहे. तिलाही उत्तर लिहिलें नाहीं. तिला अजून कांहींच माहीत नाहीं असं दिसतं. ती मला विचारते, "किती मागणी आली तुला?" आतां तिला काय उत्तर देऊं?

सिंधु तुला भेटतच असेल. काय म्हणते ती? मला लवकर उत्तर पाठवायला सांग तिला. अजून आईंना, अण्णाला आणि सुहासला पत्रं लिहायचींत म्हणून आतां पुरें करतें.

तुझीच यशोदा

मंगेशनं त्याच्या आईला पत्र लिहायला मला सुचवलेलं. त्यांना लिहावंसं वाटत असूनही मला लिहिण्याचा धीर होत नव्हता. अखेरीस मी लिहिण्याचं साहस केलं.

मंगेशच्या आईला लिहिलेलं पहिलं पत्र :

येरवडा
३.१२.४८

प्रिय आई,

तुम्हांला माझा सादर, सप्रेम नमस्कार. तुम्हीं भेटायच्या आधींच मीं तुम्हांला पत्र लिहिणार होतें. पण तें मला बरें वाटलें नाहीं. तुम्हीं पुण्याला येऊन गेल्यापासून मात्र, तुम्हांला सर्व कांहीं कळवायचं, असं मीं ठरवलं आहें.

तुम्हीं पुण्याला आलांत पण मीं कांहीं फारशी बोललें नाहीं तुमच्याशीं. खरं पाहिलं तर मीं इतकी कांहीं कमी बोलत नाहीं. घरांत मी पुष्कळ बोलतें. पण नवी माणसं पाहिलीं कीं माझ्या तोंडांतून शब्दच बाहेर पडत नाहीं.

तुम्हीं येऊन गेल्यापासून माझ्या मनाला एकप्रकारचं समाधान वाटूं लागलं आहे. मला कोणत्याच प्रकारचा त्रास होणार नाहीं अशी खात्री वाटूं लागली. झालाच तर, तुम्हांलाच माझ्यामुळं त्रास होणार. लोकांना काय, बोलायला विषयच हवा असतो.

तुम्हांला कशा तऱ्हेचा त्रास होईल याची मला कल्पना आहे; पण आतां तो सहन करण्याशिवाय दुसरा इलाजच नाही.

शेवटीं घरांत कांहींच सांगायचं नाहीं असं मीं ठरवलं आहे. कारण त्यामुळं जास्त त्रास होण्याचा संभव आहे. त्यांनीं जर मला घराच्या बाहेर पडण्याचीच बंदी केली तर कसं होणार? तुमच्याइतकीं समजूतदार माणसं नाहींत माझ्या घरांतली. सर्व जण शिकलेले आहेत पण मनानं खंबीर नाहींत.

कालच मीं प्रभूला आणि मंगेशला पत्र टाकलं. तुम्हांला म्हटलं, सावकाश लिहिलं तरी चालेल. तुम्हांला मला लिहायचं असलं तर मंगेशच्या पत्रांत घाला. नाहींतर कॉलेजच्या पत्त्यावर पाठवून द्या.

आता पुरें करतें, अक्षराबद्दल व चुकांबद्दल क्षमा असावी.

तुमची यशोदा

आईला पत्र लिहून झाल्यानंतर मी मंगेशला पत्र लिहिलं :

येरवडा
८.१२.४८

प्रिय मंगेश,

सप्रेम नमस्कार.

काल मला तूं पत्ता घातलेली एकदम तीन पत्रं मिळालीं. त्यांतलं तुझं कोणतं तें समजेना. त्यांतल्या त्यांत जाड पाकीट मीं पहिल्यांदा उघडलं. तर ते निघालं सुहासचं. तिचं पत्र वाचून फार कौतुक वाटलं तिचं. फार सालस मुलगी आहे ती. दुसरं उघडलं, त्यांत आईचं व प्रभाताईंचं पत्र होतं. वाचून फार आनंद वाटला. आईनीं मला खूप धीर देण्याचा प्रयत्न केला. मला वाटत होतं कीं ह्यापुढं मला जीव लावणारं तुझ्याशिवाय कोणीच नाहीं; पण माझी ती समजूत चुकीची ठरली.

आतां सकाळचे नऊ वाजलेत. थंडी फारच आहे. हात इतके गार पडलेत कीं मला पेनसुद्धां नीट धरता येत नाहीं. अगोदरच माझं अक्षर फार सुंदर आणि त्यांतून थंडी. मग विचारायलाच नको. पण तुला वाचतां आलं म्हणजे झालं. मराठीच्या एका पेपरवर आमच्या प्रोफेसरांनी असं लिहिलं होतं की, "अक्षर सुवाच्च काढावे." आणि नंतर मला म्हणाले कीं, "अक्षर वाचतां आलं म्हणजे झालं. मग तें कसंही असलं तरी चालेल. तुला तीन-चार मार्क सहज जास्त दिले असते–अक्षर चांगलं असतं तर." फार वाईट वाटलं मला. पण आतां काय करणार?

सिंधूच्या, तुझ्या आणि आईच्या पत्रावरून हें दिसलं की मी जाण्याच्या अगोदर घरांत सांगावं आणि तें मला स्वत:लाही कळतंच आहे. आईला माझ्याबद्दल प्रेम तर वाटतंच. पण अभिमानही वाटतो. कारण आमच्या समाजांत, शिकलेल्या, सुधारलेल्या मुली फार थोड्या आहेत. शिवाय तिला मुलगी हवी असून, मुलगी होत नव्हती.

अशा स्थितींत मी जन्मलें. जन्मापासून मीं तिला फक्त आनंदच दिला आहे. आणि मींच तिला धोका देणं किती अयोग्य होईल, हें मला पूर्णपणें समजतं. आणि तसं जर मी केलंच, तर मला वाटतं कायद्यानं जरी नाहीं, तरी माणुसकीच्या दृष्टीनं तो एक गुन्हाच होईल. अशा तऱ्हेचे विचार सारखे माझ्या मनांत येतात. कॉलेजमधे असतांना फक्त मीं कांहीं वेळ हें विसरतें. पण घरांत पाऊल टाकलं कीं माझ्या मनाला स्वस्थता मिळत नाहीं. पुष्कळ वेळां, आई एक काम सांगते. आणि मी भलतंच कांही तरी करून ठेवते. "तुझं डोकं फिरलंय" म्हणून म्हणतात सर्व जण मला.

एक प्रकारची भीती माझ्या मनांत नेहमींच असते. मनाला मोकळेपणा वाटत नाहीं. घरामधें कोणतीही गोष्ट उत्साहानं आणि आनंदानं करावीशी वाटत नाहीं. (आई कामावरून येतांना दिसतेय. आतां हें पत्र इथंच थांबवतें.) १० वाजून गेलेत. कॉलेजला जायची वेळ झाली. पत्र उद्यां पोस्टात टाकीन.

यशोदा

आज ९ तारीख आहे. बरोबर २४ तासांनीं पुन्हां पत्र लिहायला बसलें आहें. शेवटीं मुख्य प्रश्न तसाच राहिला. मी घरांत सांगण्यासाठीं आतांपासूनच माझ्या मनाची तयारी करीत आहें. आणि परिस्थिती येईल तशी वागणार आहे.

सध्यां घरांत एकदम शांतता झाली आहे. चार दिवसांपूर्वी वहिनी मुंबईला गेल्या. घरांत फक्त थोरला भाऊ, आई आणि मी इतके जणच आहोंत.

आज इंटर कॉलेजिएट स्पोर्ट्सचा शेवटचा दिवस आहे म्हणून दुपारीं मीं फर्ग्युसन कॉलेजमधें जाणार आहे. ११ व १२ तारखेला कॉलेजचं Social आहे. १९ तारखेला Sanskrit Association ची ट्रीप जाणार आहे बनेश्वरला. मी जाणार असं म्हणतें. माझ्या उजव्या हाताच्या मधल्या बोटाच्या नखाखालीं कुरूप (Corn) झालं आहे. कालच डॉक्टरकडे जाऊन आले. ते म्हणाले, "क्लोरोफार्म देऊं, पांच मिनिटांत होऊन जाईल. पण एक, दोन दिवस Hospital मधें राहावं लागेल." थंडीमुळं बोट फार दुखतं म्हणून तें काढून घ्यायचं ठरवलं आहे–म्हणजे बोट नाही हं. नख काढावं लागेल. कदाचित ट्रीपला जायच्या आधीं मी बोटाचं ऑपरेशन करून घेईन.

मीं परवां क्रिकेटची मॅच पहायला गेलें होतें मंदाबरोबर. फार मजा वाटली. ह्यानंतरची खरी test match मुंबईंतच होणार आहे. West Indiesच्या लोकांना पाहून गंमत वाटली.

आणि हो, 'निनाद' ही माझी कविता मी कॉलेजच्या मॅगझीनसाठीं दिली आहे. सर (वा॰ भा॰ पाठक) म्हणाले, "कविता चांगली आहे. मला आवडली." बहुतेक ते ती छापतील. हंसू आलं ना तुला हें वाचून? तरी वाटलंच मला, तूं हसशील म्हणून. खरं तर सांगणारच नव्हतें तुला, पण सांगितल्याशिवाय राहावेना.

यशोदा

१ डिसेंबर १९४८पर्यंतची पूर्ण पत्रं मी आतापर्यंत मी उद्धृत केली आहेत. तोपर्यंत माझं मन खूपच स्थिरावलं होतं. कितीही विरोध झाला तरी लग्न करण्याचा निर्णय मी घेतला होता. मंगेशची २१ वर्षं पूर्ण होईपर्यंत लग्न करणं शक्य नव्हतं. तोपर्यंत वेळ काढणं भागच होतं. माझी पुढं शिकण्याची इच्छा होती व अनायासे मला ती संधी पण मिळत होती. शिवाय घरात राहून मंगेशशी पत्रव्यवहार करणं शक्य नव्हतं. कारण मी आईला सांगितलं होतं की "अजून लग्न करण्याचा माझा निश्चय पक्का झाला नाही." घरी आलेली पत्रं वाचल्याशिवाय ती राहिली नसती. त्यासाठी पण कॉलेजात जाणं भागच होतं.

मंगेश मला सांगत होता की, "सर्व पत्रं बांधून बोरकरांकडं दे. ते मुंबईला आले की मला देतील. तू येईपर्यंत ती मी माझ्याजवळ ठेवीन व नंतर तुला देईन." ही पत्रं माझ्या दृष्टीनं फार महत्त्वाची गोष्ट होती. कारण आमची कॉलेजमधे आधी ओळख झाली. वर्ष संपता संपता एकमेकांबद्दल किंचित आकर्षण वाटू लागलं होतं. बोलण्यातून कधीही प्रेमाची भावना व्यक्त झाली नव्हती. माझ्याकडून तर अजिबातच नाही. लग्नाला होकार देईपर्यंत, पुढं अनेक घटना घडल्या, अनेक ताणांतून जावं लागलं. इकडून माहेरचा विरोध आणि तिकडून मंगेशचा निर्भय होण्याचा नुसता सल्ला. घरात आई, तीन मोठे भाऊ, त्यातच आईला काल्पनिक गोष्टी सांगणारे काका व काकू. सिंधू पण चिडली आणि मला पत्र लिहीनाशी झाली. तिचा थोडा धीर वाटायचा, तोही नाहीसा झाला. कॉलेजमधे जात असल्यामुळं अभ्यासाचा ताण, कॉलेजची फी भरता येत नाही, सर्व पुस्तकं विकत घेता येत नाहीत असा आर्थिक परिस्थितीचा ताण. घरात कोणीच नीट बोलत नाही, कुणाकडून प्रेम मिळत नाही, अशा मानसिक अवस्थेत, दु:खात एकोणीस-वीस वर्षांची तरुण मुलगी एकटी किती यातना सहन करू शकेल?

फक्त विमलला मी काही गोष्टी सांगत असे. तिचं माझ्यावर फार प्रेम होतं. मी जे काही करत होते, ते तिला मुळीच चुकीचं वाटत नव्हतं. ती मला धीर द्यायची, मदत करायची आणि नेहमीच माझ्या बाजूनं असायची. पण घरात तिला कोणीच महत्त्व देत नव्हतं. कारण ती सर्वांत लहान व कमी शिकलेली. मी वर्षभरानं जाणार म्हणून तिला फार वाईट वाटायचं. ती म्हणायची, "ताई, तू गेल्यावर, तुझी आमची परत भेट तरी होईल का? तुझी एक एक वस्तू बघून मला किती वाईट वाटेल!" आणि एकदम तिच्या डोळ्यांत पाणी यायचं.

विमलनं मंगेशला एक पत्र लिहिलं होतं. त्यात तिनं लिहिलं होतं की, "ताई मला सगळ्या गोष्टी सांगते. तिला मी खूप मदत करते. कारण सगळ्यांत मला तीच आवडते. सध्या तुमची पत्रं माझ्याच पेटीत असतात, कारण तिच्या पेटीत काकू जातात."

त्यावर मंगेशनं उत्तरात तिला लिहिलं की, "तुमच्या पत्रात एक वाक्य मोठं मजेदार आहे, 'ताईच्या पेटीमधें काकू जातात'. अहो, तुमच्या काकू आता पेटीमधेसुद्धां

जाऊं लागल्या का? असं जर झालं तर उंदीर, झुरळं वगैरे पेटीमधे शिरणारे प्राणी माणसाने आपला हक्क हिरावून घेतला म्हणून बंड पुकारतील, तुमच्या ताईला उन्हांत भटकू देऊं नका नाहींतर ती अधिक गोरी होईल.''

मंगेशच्या सूचनेवरून सगळी पत्रं मी बोरकरांकडं द्यायला निघाले पण बोरकरांचं घर मला सापडलंच नाही. मी खूप फिरले, खूप शोधलं, उन्हात भटकले पण सापडलंच नाही. तशीच पुन्हा घरी आले.

मंगेश आणि नरेश एक वर्षासाठी त्रावणकोरच्या आश्रमात जाऊन राहणार होते. पण ते रद्द झालं. आश्रमात काहीतरी अडचण आहे असं त्यांनी कळवलं, तेव्हा तो खूप निराश झाला. बंगालमधे रवींद्रांच्या शांतिनिकेतनमधे, काव्य आणि संगीत यांच्या धुंदीत तिथं एक वर्ष राहावं अशी त्याची इच्छा होती. पण कोणाचीच ओळख नसल्यामुळं तेही शक्य झालं नाही. तेव्हा नोकरी करण्याची कल्पना मंगेशच्या मनात आली. कारण :

> आर्थिक दृष्ट्या माझा चरितार्थ कलेवरती चालवणं मला महाराष्ट्रांत तरी शक्य नाहीं. सर्वसामान्य पगाराची नोकरी करायला मला मुळींच लाज वाटणार नाही. जो रक्ताचा कवि आहे त्यानें काही काळ चरितार्थासाठीं कारकुनी केली म्हणून कांहीं त्याच्या आंतरिक विकासाला बाध येत नाहीं. माझी माझ्या आत्म्याच्या शक्तीवर पूर्ण श्रद्धा आहे. कोणत्याहि परिस्थितींतून मीं माझा विकास करून घेईन, असा मला विश्वास वाटतो. कलेच्या पायीं सर्वस्व वहाण्याची माझी कोणत्याही क्षणाला तयारी आहे, मी नोकरी केली तर तुला वाईट नाहीं ना वाटणार? माझ्या आईचा मात्र अहंकार जरा दुखावल्यासारखा होतो.

असं त्यानं १७.१.४९ च्या पत्रात लिहिलं आहे.

खरं म्हणजे त्याचाही अहंकार जरा दुखावल्यासारख्या होत असावा व त्याला निराशा येत असावी. कारण पुढे तो म्हणतो :

> समजा, जर जीवनांत कधीं बाह्य मोहांना बळी पडून मीं कवीच्या भूमिकेवरून (Mission of Poets life) खालीं आलों तर तूं मला जागं करशील ना? तूं माझ्या जीवनांत ज्योतीसारखी ये. 'तमसो मा ज्योतिर्गमय' (Lead me from darkness to light.) तुझ्याकडे मीं शरीराची एक गरज म्हणून कधीच पाहिलं नाहीं. आत्म्याची दिव्य प्रेरणा म्हणून मीं तुझ्याकडे बघतों. माझ्या कवितेंतल्या शेवटच्या ओळी तुला आठवतात का?

बंधनांत तूं मुक्ती
विप्लवांत आत्मशक्ति
त्रिविधताप वारुनि हे मजसि जागवावें
भगवती उषेपरि तूं घनतमीं फुलावें

माझ्या जीवनाला जेव्हा Limitations पडतील तेव्हां तूं मुक्ति हो. विप्लवकाळीं (crisis) जेव्हां माझा तोल जाऊं लागेल, तेव्हां तूं आत्म्याची शक्ती हो. माझ्या जीवनाच्या अंधकारांत तूं उषेप्रमाणें प्रकाश वैभव घेऊन फुलून ये. पाहा, Can you fulfil this?

कशाला विल्सनला आलीस? वाडिया कॉलेज काय वाईट होतं? मीं गरीब बिचारा कुणाच्या भानगडींत नव्हतों. पण पहा आतां.

तो निराश झाला आहे हे माझ्या लक्षात आलं. पत्रानं त्याचं समाधान करण्याचा मी खूप प्रयत्न केला :

प्रकृतीची काळजी घे. जास्त वाचन करून, जाग्रणं करणं बंद कर. त्रावणकोरला जातां येत नाहीं म्हणून कांहीं हरकत नाहीं. सर्वच गोष्टी आपल्या मनासारख्या कशा होतील?

तूं मला, 'मुक्ती हो. माझा तोल जाऊं देऊं नकोस' असें सांगतोस. सांगतां येत नाहीं, मला हें कितपत जमेल, पार पाडतां येईल? मी शक्य तेवढा प्रयत्न जरूर करीन.

सर्वसामान्य पगाराची नोकरी करायला तुला जर कांहीं वाटत नाहीं, तर तूं माझ्या बरोबर असतांना मलाही लाज वाटणार नाहीं. कलेवरतीं चरितार्थ चालवण्याचे दिवस गेले आता. पोटासाठीं दुसरा उद्योग करावाच लागेल.

असं मी त्याला स्पष्टपणं कळवलं.

ज्यूनियर बी०ए०ची परीक्षा जवळ आली होती आणि मला जोरदार सर्दी, खोकला व ताप सुरू झाला. परीक्षा आठ दिवसांवर आली असताना मधेच अभ्यास थांबवावा लागला. मनावरचा ताण वाढत चालला. अशक्तपणा खूप आला होता. तरी जरा बरं वाटायला लागल्याबरोबर पुन्हा अभ्यासाला लागले. परीक्षा पार पडली. त्यानंतर तीन महिने सुट्टी. म्हणजे मंगेशचं पत्र मिळणार नाही.

आबाची विजापूरला बदली झाली. घरात एकही मुलगा नाही. आबाचा तिकडं खर्च वाढणार. त्यामुळं पुढच्या वर्षी माझ्या कॉलेजच्या खर्चाचा प्रश्नच होता.

माझी मैत्रीण मंदा हिनं 'भालचंद्र खांडेकर' नावाच्या मुलाकडून 'अभिरुचि'चा अंक वाचायला घेतला. त्यात त्याची कविता होती. तो आमच्या वर्गात होता. मीही अंक चाळला. तर त्यात मंगेशची कविता! किती आनंद झाला म्हणून सांगू!

आम्हांला संस्कृत शिकवायला प्रोफेसर 'सुरू' होते. त्यांनी वर्गातल्या मुलामुलींचा एक ग्रुप फोटो काढला होता. सगळ्यांच्या मते माझा फोटो फार छान आला होता. मला त्याची कॉपी हवी होती. पण त्यासाठी द्यायला तीन रुपये माझ्याजवळ नव्हते. शिवाय पत्र पाठवण्यासाठी पोस्टाची पाकिटं पण विकत घ्यावी लागायची. तो फोटो माझ्याजवळ नाही. पुढं काय झालं माहीत नाही.

मला फोटोचं मुळातच फार वेड. आबाजवळ एक कॅमेरा होता. डेव्हलपिंग, प्रिंटिंग सगळंच तो घरी करायचा. माझे दोन फोटो त्यानं एनलार्ज पण केले आहेत. सरलचे, माझे, सर्व फोटो मी अगदी ज़पून ठेवले होते. लग्नानंतर पण तसेच डब्यात ठेवले होते. मुलं झाल्यावर मुलांचे फोटो मंगेशचा वर्गमित्र विठ्ठल प्रभू काढायचा. नंतर सायनला आल्यावर पुरुषोत्तम नाईक आमचे फोटो काढायचे. हे आमचे फार जुने मित्र. पुढं दिल्लीला गेलो होतो तेव्हा एका जपानी तरुणाची ओळख झाली. त्याचं नाव कोकीसान. तोही नंतर आमचा चांगलाच मित्र झाला. त्यानं पण खूप फोटो काढून दिलेत. तो घरी राहायला यायचा. एकदा त्यानं मला एक Collection नावाचा मोठा अल्बम भेट दिला. त्यात सर्व फोटो मी नीट कालानुरूप लावून ठेवलेत. लहर आली की अल्बम काढते. फोटो बघत बसते. मन गतकाळात खूप वेळ रेंगाळत राहतं. जुन्या आठवणी जाग्या होतात. माणसं जिवंत झाल्यासारखी भोवती वावरू लागतात. पुन्हा त्यातून बाहेर पडणं कठीण होतं.

माझी ज्यूनियरची परीक्षा संपली. पुस्तकं नसताना, प्रकृती बिघडली असताना आणि प्रेमप्रकरण चाललेलं असल्यामुळं अभ्यासात लक्ष नसूनही पेपर बरे गेले होते. आता सीनियरला गेल्यातच जमा होते. सरल पण घरी आली होती. ती अहमदनगरच्या कॉलेजमधे एफ०वाय० सायन्सला होती. इकडं विमलला वरचेवर ताप येत होता. ससून हॉस्पिटला ॲडमिट करावं लागे. बरी होऊन घरी यायची आणि पुन्हा दोनतीन महिन्यांनी जोराचा ताप यायचा. तरी पण आम्ही खूप खूप हसून मजा करत होतो. वेळ मिळेल तेव्हा लेसकाम किंवा वाचन. आणि संध्याकाळी फिरायला जात होतो. वेळ कसा जायचा तेच कळत नसे.

पुढच्याच महिन्यात अचानक मुंबईला हरीशच्या घरी आईबरोबर गेले. संध्याकाळी मंगेशला भेटून आले. रात्री हरीश आला. आईची आणि त्याची पैशावरून खूप बोलाचाली झाली. नंतर तो आमच्या शिक्षणावर आला. आणि शेवटी माझ्या लग्नावर. त्याला माझा संशय येतच होता. तो आडवळणानं बोलत होता आणि मी पण तशीच उत्तरं देत होते. शेवटी तो इतकंच म्हणाला की, "एवढं शिकवून तू जर आमच्या हातावर तुरी देऊन जाणार असशील तर तुला शिकवण्यात अर्थ नाही. तू तुझं नक्की काय ते ठरवून टाक." आम्ही दोघींनी शिकावं अशी आईची मनापासून इच्छा होती. पण तिच्या कमी पगारात, तो खर्च बसवता येत नव्हता. भावांची मदत घ्यावी लागायची. त्यांची पण फारशी ऐपत नव्हती व इच्छा पण नव्हती.

दुसऱ्या दिवशी आम्ही दोघी परत पुण्याला आलो. तेव्हा टांग्यात तिनं मला स्पष्टपणं विचारलं की, "खरं खरं काय ते सांग. लग्न करणार आहेस का नाही? कारण अजून तू 'नक्की नाही' म्हणून म्हणत होतीस." तेव्हा मात्र माझा नाइलाज झाला. शिक्षण पूर्ण झाल्यावरच मी खरं सांगायचं असं ठरवलं होतं. त्या क्षणी, "मी नक्की लग्न करणार आहे." असं सांगून टाकलं. त्यावर ती म्हणाली, "मी मुळीच तसं होऊ देणार नाही, ज्या दिवशी तू घर सोडून जाशील, त्या दिवशी माझा मुडदा

पडेल.'' मी तिला निक्षून सांगितलं की, ''तू वाटेल ते बोललीस तरी मी माझं मत बदलणार नाही.'' तिनं मधे आलेलं मंगेशचं एक पत्र वाचलं होतं. त्या पत्राचा ती सारखा उल्लेख करत होती. नंतर म्हणाली की, ''तू जर अशा तऱ्हेनं जाणार असशील तर खरंच, एवढा खर्च करून तुला कशाला शिकवायचं? काय फायदा?'' त्यावर मी म्हणाले, ''नसेल शिकवायचं तर नका शिकवू. माझं बी०ए०वाचून काही अडून राहिलं नाही.'' आबा आला की ती त्याला पण सगळं सांगेल असं माझ्या मनात आलं.

प्रश्न इतकाच होता की मी घरात बसून करणार काय? मंगेशची पत्रं मिळणार नाहीत. संवाद राहणार नाही. शिवाय घरात सगळ्यांची बडबड ऐकत राहावं लागणार. आबाला सांगितल्यावर कसा स्फोट होईल ह्याची काळजी वाटायला लागली. कदाचित कोणत्याही वेळी घराबाहेर पडावं लागेल. म्हणून मी मंगेशला कळवलं की, ''सध्या तू मुंबईबाहेर जाऊं नकोस, आणि सध्यां मला पत्र पण पाठवूं नकोस. आईनं माझीं सगळीं पत्रं चोरून वाचलीं म्हणून मला तिचा खूप राग आला आहे. त्यासाठीं मी तिला बोलणार आहे.''

इतकं झालं तरी आई माझं मन वळवायचा प्रयत्न करत होती. आबाला काही सांगितलं की नाही कळलं नाही. पण तिनं मला एक पत्र लिहून ठेवलं. हातात दिलं नाही. पण मला ते अचानक मिळालं. त्यात तीन गोष्टी तिनं सांगितल्या होत्या, पहिली : माझे वडील ख्रिस्ती धर्मोपदेशक होते. दुसरी : आबाचं लग्न व्हायचं आहे, माझ्या वागण्यानं त्याच्या लग्नात अडथळा येईल. तिसरी : मी घराण्याला काळिमा लावत आहे.

आबाला कळल्यावर प्रश्नाचा निकालच लागेल. शिवाय काका (सिंधूचे वडील) पुण्याला येणार होते. ते मला बोलल्याशिवाय राहणार नाहीत. काय करावं मला समजेनासं झालं होतं. घरातून घालवून दिलं तर पुढं काय करायचं असे विचार मनात यायला लागले. नाइलाजानं आईला खरं काय ते सांगावं लागलं. इतक्यात लग्न तर करता येणार नाही, शिवाय जागेची अडचण होतीच. शांतारामाच्या घाणेरड्या चाळीत राहण्याची कल्पनासुद्धा सहन होत नव्हती. प्रेम केलं म्हणजे चोरी केली नाही किंवा गुन्हा केला नाही; पण आल्या परिस्थितीला तोंड देण्याची कठीण जबाबदारी अंगावर पडतेच. खरं माझी अशी इच्छा होती की, मी बी०ए० व्हावं, दोन वर्षं नोकरी करावी. तोपर्यंत काकांची–मंगेशच्या वडिलांची–बिल्डिंग बांधून झाली की मग तिथं वेगळा संसार थाटून राहावं. म्हणजे मला चाळीत राहावं लागणार नाही. व सारस्वत ब्राह्मणांच्या घरातलं सोवळंओवळं माझ्यामुळं बिघडणार नाही. पण मंगेशला हे मान्य नव्हतं. तो फक्त एकवीस वर्षं पूर्ण होईपर्यंतच थांबणार होता.

त्याच सुमारास सरलची एक मैत्रीण येरवड्याला आली. तिला घेऊन आम्ही दोघी लहान बगिच्यात गेलो. तिथं पाच-सहा आंब्याची झाडं. खाली खूप पाडाच्या कैऱ्या पडल्या होत्या. ते पाहून आम्हांला इतका आनंद झाला की, तिथंच त्या हौदाच्या

काठावर बसून मी चार आंबे खाल्ले. मुळीच आंबट नव्हते. फार गोड होते. त्या वेळी मंगेशची खूप आठवण आली. मंगेश पहिल्यांदा येरवड्याला मला भेटायला अकस्मात आला त्या वेळी मी त्याला घेऊन याच बगिच्यात आले होते.

मंगेशनं पत्रात लिहिलं होतं की मी घरात शक्य तितक्या सौजन्यानं वागावं. पण हे सौजन्य लग्नाला परवानगी मिळवण्यासाठी लाचारी करण्यासारखं नसावं असं मला वाटे. मी लाचारी केली असती तर मला लग्नाला परवानगी मिळाली असती हे केवळ अशक्य होतं. आणि तो माझा स्वभाव पण नव्हता. त्याचं म्हणणं असं की:

> हे कांहीं आपल्याच देशांत असं आहे असं नाहीं. तर ऑस्ट्रेलियातसुद्धां इतर देशांतल्या स्त्रीबरोबर लग्न केलं तर स्टेटमधें राहू देत नाहींत. हा केवढा जुलूम आहे! या देशांतील कवि-लेखकांचं हें काम आहे कीं ही क्षुद्र व्यवस्था उलथून टाकण्यासाठीं त्यांनीं प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे. आज कलावंत Ernst Toller सारखे हवेत. त्याचीं पुस्तकं वाचायला मला मिळणार आहेत. आता १० ते ५ मी लायब्ररीत वाचीत बसतों. त्याचं 'I was a German' हे अलौकिक पुस्तक वाचायला घेणार आहे. भेदातीत अशा समाजरचनेसाठी तो कवि शेवटपर्यंत झुंजला. मला Toller आणि Gibran फार आवडतात.
> असं त्यानं लिहिलं होतं.

प्रेमचंद्ररावकाका आणि सर्व कुटुंब पुण्याला आलं. आई व मी त्यांना भेटायला गेलो. तेव्हा सिंधूनं मला, मंगेशनं पाठवलेले वीस रुपये दिले आणि त्याचे सर्व निरोप सांगितले. आबाची बदली सोलापूरला झाली. आठ दिवसांत तो तिकडं जाणार होता. त्याआधी आईनं पुन्हा एकदा मला प्रश्न विचारला, "तुझा निश्चय कायम आहे का?" मी तिला सांगितलं की, "एकदां काय तें सांगितलं आहे. त्यांत बदल होणार नाहीं आणि जातांना तुला सांगितल्याशिवाय जाणार नाहीं." सर्वच अनिश्चितता होती. मला भीती वाटत होती की ती मला कॉलेजला पाठवणार नाही आणि घरातून निघूनही जाऊ देणार नाही. आणि तिला फसवून घरातून जाणं मला शक्य नव्हतं. मी तर अगदी कंटाळून गेले होते. अनिश्चिततेत दिवस काढणं फार मानसिक त्रासाचं होत चाललं होतं. शिक्षणाचा आनंद पण घेऊ शकत नव्हते. त्यावरूनही मन उडत चाललं होतं. पुढं शिकूच नये असं वाटायला लागलं होतं.

त्यानंतर एके दिवशी रात्री विजयानंदनं मला घरासमोरच्या बुचाच्या झाडाखाली नेऊन बराच उपदेश केला. "घराण्याच्या आणि कुळाच्या अब्रूसाठी तरी हा विचार सोडून दे. समाजात तुझ्यामुळं आम्हांला तोंड दाखवायला जागा राहणार नाही. शिवाय दुसऱ्या बहिणींच्या लग्नांत अडथळे येतील. आणि इतकंही करून विशेष असं काय सुख मिळणार आहे तुला? ह्याही समाजात तुला कोणी विचारणार नाही. आणि हिंदू समाजात तर नाहीच नाही. आणखी महत्त्वाचा मुद्दा म्हणजे तुला होणारी मुलं कोणत्या धर्माची असणार?" घरात कोणीही विचारले नाहीत असे अगदी

मौलिक प्रश्न त्यानं विचारले. त्याच्या प्रश्नांनी मात्र मी मनातून घाबरून आणि गडबडून गेले. त्याला धडपणं एकाही प्रश्नाचं उत्तर देऊ शकले नाही. भयंकर अस्वस्थ झाले. खरंच असं कोणतं विशेष सुख मला मिळणार आहे? की उलट दु:ख आणि त्रासच जास्त होणार आहे? ह्या दोन समाजांना मी कसं तोड देणार आहे?

आदल्या दिवशी खूप पाऊस पडून गेला होता. येरवड्याच्या माळरानांवर हिरवंगार गवत उगवलं होतं. थंड वारा सुटला होता. मन उत्तेजित व्हावं असं सुंदर वातावरण होतं. अशा वेळी आमचं फिरायला जाण्याचं वेड बळावत असे. विमल व मी संध्याकाळी संधी साधून निर्मनुष्य रस्त्यावरून मजेत भटकायला निघालो. बोलताना वाटेत मंगेशचा विषय निघाला. कारण त्याला मी राहत होते तो परिसर, ती शाळा आणि शांत, स्वच्छ, सुंदर असं नैसर्गिक वातावरण फार आवडत असे. पत्रात खूप वेळा त्याचा उल्लेख असायचा. पावसाच्या सुरवातीला लहान लहान गारा पडायच्या. गारा पाहून आमच्या आनंदाला उधाण येत असे. आम्ही पुढच्या अंगणात छत्री उलटी करून ठेवत असू. त्या उघडलेल्या छत्रीत खूप गारा जमा व्हायच्या. त्या लगेच घरात आणून भांड्यात काढून घेत होतो. बघता बघता त्यांचं पाणी होऊन जायचं. मग आभाळातून आलेलं ते थंडगार पाणी थोडं थोडं वाटून पीत होतो. लहान लहान गोष्टींतून आनंद घेत आम्ही जगत होतो.

दोनच दिवसांनी मंगेशचं पत्र आलं. मुंबईत पण पाऊस सुरू झाला होता. पण नुसता रिमझिम. त्यानं लिहिलं होतं की :

मन भारून टाकण्यासारखी धुंदी आणि आवेश ह्या पावसांत नाहीं. दररोज समुद्रावर जाऊन बसतों. खूप कल्पना सुचतात पण लिहूनच होत नाहीं. अर्थात् मनावर अतोनात ताण पडतो. विचारांच्या आणि कल्पनांच्या साऱ्या शक्ती आतल्याआत धुमसत असतात. त्यामुळें माझी प्रकृतीसुद्धां ठीक नाहीं. हें सगळं वाचून तुला मौज वाटेल. पण कवितेचा मूड असूनसुद्धां जर दुर्दैवानें मीं अभिव्यक्ति देऊं शकलों नाहीं, तर माझ्याच शक्ति मला खायला उठतात. हें एक विचित्र दु:ख आहे.

तूं सध्यां विलक्षण खुशींत दिसतेस. एका अर्थीं तूं मोठी नशीबवान आहेस. तूं राहतेस तें ठिकाणसुद्धां किती सुंदर आहे! इथें नुसती माणसांची गर्दी. रडवे चेहरे करून आणि माना वाकवून बिचारे चालत असतात. रस्त्यावर, घरांत, देवळांत, जुलूम करणाऱ्यांसमोर, खोट्या तत्त्वज्ञानापुढें–अगदीं सगळीकडे त्यांच्या माना वाकलेल्या. जीवनाचा प्रमाथी उत्साह खळाळून वाहतांना इथें क्वचितच दिसतो. पुष्कळ वेळां मला असं वाटतं की मीं चुकून कुठेंतरी यांच्यांत आलों आहें.

बोरकरांकडं जाऊन माझं 'सलमा' पुस्तक आणायला सांगितलं होतं; "तें कां आणलं नाहीस?" असा खडसावून प्रश्न पण होता.

पुढच्याच महिन्यांत जूनमधे संध्याकाळी अचानक माझ्या विल्सन कॉलेजमधल्या मैत्रिणी आल्या. नंदा रेळे, कुमुद नाईक, तिची बहीण व वहिनी. नंदा एकाएकी

पुण्यात आली ती कुमुदला भेटली. आणि कुमुद तिला घेऊन माझ्या घरी आली.

त्यांना आमची सर्व शाळा फिरवून दाखवली. त्यानंतर त्यांना पण आमच्या आवडत्या लहान बगिच्यात घेंऊन गेले. तो सुंदर बगिचा त्यांना पण आवडला. मग घरी आलो. भजी, दुधी हलवा आणि कॉफी दिली, त्यानंतर कुमुद, तिची बहीण व वहिनी निघून गेल्या. मग मी, नंदा, सरल, विमल आम्ही नेहमीच्या प्रथेप्रमाणं फिरायला बाहेर पडलो आणि बंडगार्डनमधे गेलो. तिथं खूप गप्पा मारल्या आणि मग तिथूनच नंदा गेली. दिवस असा गडबडीत पण आनंदात गेला. हा स्वछंदीपणा, मोकळेपणा पुढच्या आयुष्यात मिळेल की नाही, अशी अंधूक शंका मनात येऊन गेली.

त्यानंतर मी पुण्यात कुमुदकडं गेले होते. तिला घेऊन बोरकरांच्या घरी गेले. ते नुकतेच मुंबईहून आले होते आणि मंगेशची बहीण कुमुदिनी हिच्या लग्नाचे लाडू बॅगेतून काढत होते. एवढ्यात आम्ही तिथं पोहोचलो. आम्हांला पण त्यांनी लाडू दिले. शेवटी मंगेशच्या घरातला लाडू माझ्यापर्यंत येऊन पोहोचलाच! त्यांच्याकडून 'सलमा' पुस्तक घेऊन आम्ही आपापल्या घरी गेलो.

त्यानंतर मंगेश पुण्याला आला होता. आम्ही आयुष्यात दोघंच अशी कधी फिरायला गेलो नव्हतो. त्या दिवशी आम्ही खूप फिरलो. पर्वतीपासून मुळा-मुठा नदीवरचा पूल व बंडगार्डन असं भटकलो. जोडीनं. तो निघून गेल्यावर पुन्हा फार खिन्न वाटायला लागलं. एकटं वाटायला लागलं.

रविवारी पण मी मंगेशला भेटायला गेले होते. मी घरात नसतानाच मोठा भाऊ आबा घरी आला. त्यानं लगेच विचारलं, "ताई कुठं आहे?" आईनं सांगितलं की, "दोन तीन दिवस झाले ती पाडगांवकरबरोबर भटकते आहे," हे मला विमलनं सांगितलं. मी घरी गेले. बघते तर आबा आलेला. आता माझी चांगलीच खरडपट्टी निघणार. माझ्या पोटात गोळा आला. पण आश्चर्य म्हणजे आबा मला काहीच बोलला नाही.

सोमवारी सकाळी बाहेर जाताना मला म्हणाला, "ताई, आज तू बिलकूल घराबाहेर जायचं नाहीस." गंमत म्हणजे मंगेश निघून गेला होता व मला बाहेर जायचंच नव्हतं. म्हणून मी म्हणाले, "बरं, नाहीं जाणार."

माझं सीनियरचं वर्ष. कॉलेज सुरू व्हायची तारीख जवळ येत होती. २० जूनला कॉलेज उघडणार. आई काहीच बोलत नव्हती. मला पुढं शिकवायचं आईनं, भावांनी ठरवलं का नाही? सर्व काही त्यांच्याच हातांत होतं. 'नाही' म्हणाली तर सीनियर सोडून घरात बसावं लागलं असतं. दुसरा आर्थिक प्रश्न कायमच होता, आणि तिसरा कॉलेजला पाठवलं तर निर्माण होणार होता. वाडियाला संस्कृत विषयाला फार थोडी मुलं होती. त्याच वर्षी 'पुणे युनिव्हर्सिटी' स्थापन झाली. आणि त्यांनी वाडिया कॉलेजमधून संस्कृत विषयच काढून टाकला आणि आम्हां सीनियरच्या मुलांना एस॰पी॰ कॉलेजला संस्कृतच्या तासांसाठी जायला सांगितलं. ते तास संध्याकाळी ठेवलेले.

मी राहत होते येरवड्याला–म्हणजे पुण्याचं एक टोक आणि एस॰पी॰ कॉलेज पुण्याचं दुसरं टोक. संध्याकाळचे तास संपवून परत येरवड्याला दोन बसेस बदलून येईपर्यंत अंधार पडायचा. ते तीन मिलिटरीतले जवान माझ्या मागावर कायम असायचे. अशा सर्व अडचणी होत्या.

आमच्या इंडस्ट्रियल स्कूलची सिल्व्हर ज्युबिली होती. त्यासाठी अध्यक्ष म्हणून रँग्लर परांजपे येणार होते. खूप गडबड, तयारी, स्वच्छता चालू होती, अशा समारंभांना स्टाफच्या घरच्या लोकांना पण आमंत्रण असायचं. मी विशीतली कॉलेजतरुणी. तयारी केली आणि घरात एक कॅमेरा होता लहानसा तो घेतला आणि स्कूलमध्ये गेले. पाहुणे आले. सुपरिटेंडंट, डेप्युटी सुपरिटेंडंट, शिक्षक, शिपाई, इतर स्टाफ, सगळे जमले, आणि मी खट् खट् करून त्यांचे दोन फोटो काढले, आयुष्यात पहिल्यांदाच. मला वाटलं, फारच सुंदर फोटो येणार. पण कसचं काय! अगदी लहान आणि काळपट फोटो आले.

मी मंगेशला लिहिलं होतं :

> तुला लग्नाला 'हो' म्हणेपर्यंत, तुझ्या कवितांवर कांहीं मीं भुललें नव्हतें, पण आतां मात्र त्यांनीं मला खरीच भूल पाडली आहे. मला वाटतं, तुला न पहातांच, तुझ्या कविता वाचून मीं तुझ्याशीं लग्न करायला तयार झालें असतें.

सरल नगरच्या कॉलेजला गेली. विमल पण हॉस्टेलमध्ये गेली. मी, विजयानंद व आई घरात होतो. स्वयंपाकाचं काम आईनं माझ्यावर सोपवलं होतं. शिवण चालूच असायचं. सर्व कपडे आम्ही घरातच मशिनवर शिवत होतो. शिंपी नव्हताच. मंगेशच्या बहिणीचं लग्न झालं होतं. तिला मी काय प्रेझेंट देऊ शकणार? माझ्याजवळ तर पत्राची पाकिटं घ्यायला पण पैसे नसायचे; म्हणून मी तिला परकराला लावायची एक सुंदर लेस तयार करून दिली होती.

त्यानंतर मंगेशचं पत्र आलं,

> मुंबईत फार कंटाळवाणी हवा आहे. काल कविता मनांत घोळत होती म्हणून तुला पत्र लिहूं शकलों नाहीं. इथें नुसत्या घामाच्या धारा चालूं आहेत. काल रात्रीं मीं कविता लिहून काढली. मींच तिच्यावर खूष आहें, बऱ्याच कविता सुचलेल्या अर्ध्या अर्ध्या लिहून पडल्यात. अलीकडं मन त्यांच्या धुंदींत असतं. पुढच्या आठवड्यात मी काकांच्या (वडील) मित्राच्या बंगल्यांत, वागठाव नांवाच्या गांवीं जाणार आहे. एक आठवडा तरी राहीन. मी त्यांच्या शेतांतसुद्धा काम करणार. मला फार आवड आहे. येतांना खूप कविता लिहून येणार.

पुढं मंगेशनं पत्रात म्हटलं होतं :

> तूं रोज संध्याकाळीं फिरायला जात असशीलच. आपण येरवड्याला फिरायला

गेलों होतों, ती जागा, मला फारच आवडली. असल्या सुंदर आणि विशाल जागेंतून फिरतांना मनाची बंधनं निखळून पडल्यासारखीं वाटतात. तू दिलेली लेस कुमूला दिली. तिला आवडली. तुला जाळीचे गंजिफ्रॉक विणता येतात का? येत असले तर माझ्यासाठीं विणशील काय?

घरात आई अगदी थोड्या थोड्या गोष्टींवरून चिडचिड करायला लागली. काल अगदी कहरच केला. दुपारी ती निजली असताना आम्ही बागेत गेलो. तिकडे बसून आंबे खाल्ले. आणि घरी आलो. तर ही उठली होती. आणि भयंकर चिडली. तिला वाटलं आम्ही खोटं बोलतो. दुसरीकडं कुठंतरी जाऊन आलो. मग तर काहीही बोलू देईना. म्हणाली, "तू काही एक बोलू नकोस, मला तुझं सगळं माहीत आहे," मग मी पण तिला खूप बोललो. पण नंतर मलाच वाईट वाटलं. कारण खरं तर, ती मला त्रास देत नसून मीच तिला त्रास देत होते. धार्मिक, सामाजिक परंपरा झुगारून देऊन, मी कुठंतरीच लग्न करायला निघाले होते. ते तिच्या मनाला सहन होणं शक्य नव्हतं. वडील गेले तेव्हा ती फक्त पस्तीस वर्षांची होती; तरी तिनं आम्हांला, थोड्या मिळकतीत, वडिलांच्या पश्चात सुखासमाधानात ठेवलं होतं.

तिनं वाडिया कॉलेजच्या प्रिन्सिपॉल जोगांना पत्र लिहून विचारलं होतं की, ते मला ह्या शेवटच्या वर्षासाठी full freeship देतील का? दिली तरच मला कॉलेजला पाठवणं शक्य होतं. मला वाटत नव्हतं ते मला full freeship देतील. त्यांचं उत्तर येईपर्यंत वाट बघत बसायचं. नाहीतर वर्षं गेलं असं समजायचं. आता माझी एस०पी० कॉलेजला जायची पण मनाची तयारी झाली होती. कारण एकदा वर्ष गेलं म्हणजे गेलंच. पुन्हा काही अभ्यास करावासा वाटणार नाही. पुन्हा वाटायचं, कॉलेजच सोडून द्यावं. ह्या मन:स्थितीत अभ्यास तरी कसा करणार? पास होईनच असं सांगता येत नाही. सरल, विमल पण सुट्टी संपल्यामुळं निघून गेल्या. विजयानंद पुन्हा मुंबईला कॉलेजमधे जाण्याचा विचार करत होता. म्हणजे घरात फक्त मी आणि आई. खूप निराश वाटायला लागलं. वाचायला पण चांगलंसं पुस्तक घरात नव्हत.

मंगेशचं पत्र आलं. त्याचं गावाला जाणं रद्द झालं होतं. त्याला जरा वाईटच वाटलं होतं. कारण तिकडं जाऊन त्याला एकटं राहायचं होतं. म्हणजे हातून बरंच लिहून झालं असतं. त्यानं लिहिलं, "म्हणजे मी माणसांना कंटाळतो असं नाहीं, अर्थात् कधीं कधीं कंटाळतों." त्यावर मी त्याला लिहिलं होतं की, "मला पण कंटाळून जाशील का कांहीं दिवसांनीं"?

पत्राच्या बाबतीत त्याचा उलटा नियम होता. तो म्हणे :

मी पुण्याहून प्रवास करून मुंबईला आलों कीं, ज्यांचा निरोप घेऊन मीं येतों, त्यांनीं मला प्रथम पत्र पाठवलं पाहिजे असा माझा शिरस्ता आहे. म्हणून मी मुंबईला येऊन तुझ्या पत्राची वाट पाहात बसलों. कळलं?

त्यानं मला दिलेल्या पैशांचा जमाखर्च मी पत्रातून लिहिला होता. कारण त्यानं हसतच विचारलं होतं की मी पैशांचं काय केलं? त्यावर त्यानं लिहिलं होतं की :

मी पुण्याला मस्करीनं विचारलं की, पैशांचं काय केलंस? तेवढंच लक्षांत ठेवून हा सगळा मसुदा पाठवलास? मी विचारल्याचं मला आठवत नाहीं. बरं तें जाऊं दे. तुला आणखी पैसे हवे असतील तेव्हां मला कळव. तुला भूक लागली असली तर तूं चांगलं कांहीं तरी खात जा की कॉलेजमधे. उपाशी राहूं नको बरं का!

मी त्याच्यासाठी रेशमी दोऱ्यांचा जाळीचा गंजिफ्रॉक विणावा अशी त्याची इच्छा होती. म्हणून त्याची मापं मागवली. ती त्यानं पाठवली. त्यासाठी दोरा घ्यायला पैसे दिले होते. त्याप्रमाणं मी दोरा आणला आणि सुंदर, शंकरपाळीची वीण घेऊन क्रोशावर विणायला घेतला. तो विणून पूर्ण झाला. पण दुर्दैव असं की, माझी मापात चूक झाली की, त्याच्या मापात प्रकृती सुधारल्यामुळं वाढ झाली, ठाऊक नाही, पण त्याला तो गंजिफ्रॉक लहान झाला. कधीच घालता आला नाही. खूप वर्षं माझ्याजवळ तो पडून होता. परकरांच्या लेस, टेबलक्लॉथ, पिशव्या असं जे मी विणून ठेवलं होतं, त्यांतच आणखी एक भर पडली.

मी कॉलेजमधे नाव घातलं की नाही ह्याची चौकशी मंगेशनं पत्रात केली होती आणि जर फ्रीशिप मिळाली नाही तर मी फीसाठी पैसे पाठवू शकेन, तेवढ्यासाठी कॉलेज बंद करायला नको असं लिहिलं होतं. तो 'पाठवू शकेन', असं जरी म्हणत असला, तरी तो इतके पैसे मिळवत नाही हे मला ठाऊक होतं. म्हणजे आई-वडिलांकडून मागून घ्यावे लागतील. त्यामुळं शक्यतो पैसे मागवायचे नाहीत असं मी ठरवलं होतं. अगदी नाइलाज झाला तरच मागवायचे. त्यानं सध्या पुण्यात येऊ नये, शक्यतो भेटायचं नाही, असं पण सांगून ठेवलं होतं.

त्यानं लिहिलं की :

पुण्यांतून निघणाऱ्या 'नवभारत' मासिकांतून नियमित कविता प्रसिद्ध करणार आहें. आचार्य भागवत ते मासिक काढतात. परवां अंक प्रसिद्ध होणार त्यांत माझी 'करिं माझ्या दीप युगांचा रे, ही संमेलनात म्हटलेली कविता आहे. विमल गेल्यामुळं पत्र बॅगेंत ठेवायला भीत असशील तर वाचल्यानंतर फाडून टाक. नाही तरी पुन्हा सगळीं माझ्याकडेच देतेस.

पत्र फाडून टाकण्याची कल्पना मला सहनच होत नव्हती. त्याची पत्रं म्हणजे मला मोठा अनमोल ठेवा वाटत असे. जिवापलीकडे मी त्यांना जपत होते. म्हणून मी त्याला लिहिलं की :

तुझीं पत्रं मी वाटेल तें झालं तरी फाडून टाकणार नाहीं. तुझ्याजवळ मीं तीं कांहीं दिवसांपुरतीं ठेवायला दिलींत. मीं आल्यावर मला तीं सर्व परत मिळालीं पाहिजेत.

सकाळी घरात कोणीच नव्हतं. आई कामाला गेली होती. विजयानंदला पिठाच्या गिरणीचं कॉन्ट्रॅक्ट मिळाल्यामुळं तो गडबडीत असायचा. सगळा स्वयंपाक आई मलाच करायला सांगायची. मंगेशला मी लिहिलं :

आईनं कॉलेजमधे नाव घालायला सांगितलं. घरीं खरं म्हणजे फार अडचण आहे. तरी पडेल तितकी फी द्यायला ती तयार आहे. मी फ्रीशिपसाठीं लवकरच अर्ज करीन. पहिल्या Term ला आधी ९० रु० नंतर ४० रु० दुसऱ्या Term ला ९० रुपये अशी फी आहे. कॉलेज सुरू झालं आहे, मी कॉलेजला जात असतें, ह्याच पत्त्यावर पत्र पाठव.

Piles चा त्रास पुन्हा सुरू झाला आहे. आईला रजा मिळाली कीं 'मंगळवारदवाखान्यां'त, युरोपियन लेडी डॉक्टरकडून ऑपरेशन करून घ्यायचं ठरलं आहे. सध्या गंजिफ्रॉक विणायला वेळ मिळणार नाही. दिवाळीच्या सुट्टीत अगदी नक्की, तोंपर्यंत सुंदरशी वीण पाहून ठेवते.

मराठी जनरलला 'केशवसुतांची कविता', 'स्वप्नरंजन': माधव जुलियन, 'भावतरंग': मायदेव ही पुस्तकं आहेत. काल पाठकसरांनीं आधुनिक कवींची नावं घेतली. पण तूं पुस्तक छापलं नाहींस म्हणून अजून अप्रसिद्ध आहेस.

पैसे सध्यां नको आहेत. लागल्यावर कळवीन. जमाखर्च मीं सहजच दिला. तुला साधारण कल्पना असावी एवढाच उद्देश होता.

हे सर्व मी त्याला पत्रातून कळवलं होतं.

आईनं मला कॉलेजमधे जायला सांगितलं आणि सर्व फी द्यायला ती तयार झाली, हे वाचून मंगेश फारच अस्वस्थ झाला. त्याला वाटलं, हे परिवर्तन तिच्यात कशामुळं झालं? मी बी०ए० झाले की ती पुन्हा मला गळ घालील की, 'मीं तुला एवढा खर्च करून शिकवलं, ते त्याच्याबरोबर लग्न करून जाण्यासाठीं नाहीं, तेव्हां, तूं तुझा विचार बदल.' म्हणून मी तिला स्पष्ट जाणीव करून द्यावी की, पुढच्या वर्षी मी नक्की त्याच्याबरोबर लग्न करून जाणार आहे, मग आयत्या वेळी गोंधळ नको, असं त्यानं लिहिलं.

सर्व फी भरून मला पुढं शिकवण्याचा निर्णय तिनं का घेतला, हे मला तेव्हा कळलं नाही हे खरं. पण आता ते नक्कीच कळतं. ती मनातून समजली की ही मुलगी लग्न नक्कीच करणार. मंगेशनं शिक्षण सोडलंय. तो काहीच कमवीत नाही. तिला माझी काळजी वाटत असेलच. तेव्हा मला जर डिग्री मिळाली, तर पुढच्या आयुष्यात कोणताही बरा-वाईट प्रसंग आला तरी, माझ्या पायावर मी उभी राहू शकेन. दुसऱ्या कुणावर अवलंबून राहायची माझ्यावर पाळी येऊ नये. ह्या जाणिवेनंच तिनं मला शिक्षण पूर्ण करण्याची संधी दिली होती. माझ्यावरील प्रेमापोटी तिनं ही न पेलणारी जबाबदारी अंगावर घेतली होती.

पुढे मंगेशनं लिहिलं होतं की :

पुढच्या मे महिन्यांत तूं घरांतून जाणार, ही गोष्ट लपवून ठेवूं नको. कारण पुष्कळ वेळां असत्य तात्पुरतं फायदेशीर होतं पण शेवटीं अकल्याणाला कारक होतं, अशी माझी श्रद्धा आहे.

तुझ्या सरांनी नवकवींत माझा उल्लेख केला नाहीं हें चांगलं झालं. मी अजून अप्रसिद्ध आहें, याचं मला समाधान वाटतं. कीर्ती मिळूं लागली कीं, नसत्या भानगडी पाठीशीं लागतात. अप्रसिद्ध राहाणंच चांगलं. खरं ना? तुला कसं वाटतं?

घरीं कामाचा त्रास, कॉलेजचा येण्याजाण्याचा त्रास, सीनियरचा अभ्यास असतांना गंजिफ्रॉक विणण्याची घाई करूं नकोस. मुद्दाम त्रास करून विणून देण्यासारखा मी कुणी बडा माणूस नाहीं!

तुझं पत्र आलं की, वडील विचारतात, 'काय लिहिलं आहे'? मी सांगतों, 'जागा लौकर तयार करा असं लिहिलंय.' एक नवी कविता आज उद्यां लिहीन.

त्याच्या पत्रात सतत नवी कविता सुचली, लिहिली, लिहून झाली नाही, खूप कल्पना डोक्यात आहेत वगैरे वगैरे. पावसाळा म्हणजे, त्याच्या स्फूर्तीला नवं उधाण येण्याचा काळ. बहरणाऱ्या सृष्टीबरोबर त्याच्या काव्याला पण बहर येतो. त्या वेळी तो फार खुषीत असतो.

कॉलेजच्या पत्त्यावर पत्र पाठव म्हटलं होतं, तरी बरेच दिवस पत्र नाही, तेव्हा मी लिहिलं की :

तुला कवितेची समाधी लागलेली दिसते. म्हणून माझी आठवण होत नाही. पण त्याबद्दल मी तुला दोष देऊं शकत नाहीं. दोष द्यायचाच झाला तर माझ्या सवतीला (कविता) द्यावा लागेल, पण तेंही शक्य नाहीं. कारण ती मला पण आवडते. (समजते का नाहीं हा प्रश्न वेगळा.)

मला रोज एक तास संध्याकाळीं ४ ते ५ एस०पी० कॉलेजला जावं लागतं. येरवड्याला यायला रोजच फार उशीर होतो. बसेस वेळेवर मिळाल्या नाहींत तर ६।।, ७सुद्धां वाजतात: शाळेपेक्षांही जास्त वेळ मोडतो. शिवाय घरीं आल्यावर स्वयंपाक करावा लागतो. आईची तब्येत हल्ली बरी नसते. तिनं तरी किती काम करायचं एकटीनं! वय पण झालं तिचं.

मी तुझ्याशीं लग्न करणार ह्याची तिला पूर्ण कल्पना आहे असं मला वाटतं. ह्या वर्षी आबाचं लग्न उरकून घ्यावं असं तिच्या मनांत आहे. तोंपर्यंत मला कसंतरी थांबवून ठेवायचं. शिवाय एका वर्षासाठीं माझं पण नुकसान होऊं नये, कांहीं झालं तरी जातांना ती मला पुन्हां विरोध करणार. सहजासहजीं मला घराबाहेर पडूं देणार नाहीं, हें नक्की.

श्याम वाघमारे इंटरनंतर बी०जे० मेडिकल कॉलेजमध्ये गेला. तो खडकीला राहायचा. म्हणजे आमच्या अगदी येण्याजाण्याच्या वाटेवर त्याचं घर होतं. तो पुष्कळदा

इंडस्ट्रियल स्कूलच्या मागच्या मैदानात क्रिकेट खेळायला यायचा. म्हणजे आमच्या घरावरूनच पुढं जायचा.

एकदा आम्ही समोरच्या लिंबाच्या पारावर बसलो असताना तो खेळून घरी चालला होता. मला पाहून तो थांबला व म्हणाला, "तुला स्वेटर विणता येतो ना?" मी म्हणाले, "हो येतो." तर म्हणाला, "मला क्रिकेट खेळताना घालायला पांढरा व गळ्याला, हाताला, कमरेला निळ्या पट्ट्या असलेला स्वेटर विणून देशील का? मी म्हणाले, "हो देईन की, पण मला तू लागेल तेवढी लोकर आणून दे. मग जमेल तसा विणीन."

तो स्वेटर मी त्याला विणून दिला. लोकर त्यानं लागेल तशी आणून दिली.

हे मंगेशला कळलं. आणि त्यानं क्रोशेवर गंजिफ्रॉक विणून दे म्हणून मला टोमणे मारून लिहायला सुरुवात केली. त्याचा मला एकदा इतका राग आला की, मी त्याला लिहिलं :

गंजिफ्रॉकबद्दल लिहिताना तू प्रत्येक वेळी परक्यासारखं कां लिहितोस? तुझा माझ्यावर पूर्ण विश्वास नाहीं का? पत्र वाचल्यापासून माझं मन बेचैन झालं. रात्रीं झोपतांना पण तुझीं वाक्यं मनांत घोळत होती.

खूप चिडून मी पत्र लिहिलं. समजूत घालण्याचा प्रयत्न केला. आणि शेवटी लिहिलं की,

यापुढें हें असं चालणार नाहीं हं! तूं मला एकदा समक्षच भेट. पत्रांत कांहींतरी लिहून छेडूं नकोस. तुझ्या मनांत काय आहे तें स्पष्ट बोलून दाखव. संशय राहूं देऊं नकोस. हें चांगलं नाहीं. येत असलास तर कळव. मी स्टेशनवर येईन.

मग लगेच उत्तर आलं :

तें सर्व मीं केवळ मस्करीनें लिहीत होतों. तुझ्याइतका माझा कुणावरच विश्वास नाहीं. माझ्या पत्राचा तूं वेगळाच अर्थ केलास. मला किती वाईट वाटलं याची तुला कल्पना येणार नाहीं. अर्थात मस्करी करतांना मला तारतम्य राहिलं नसेल. तुझ्याविषयीं माझ्या मनांत कसलाच संशय नाहीं. पत्र वाचलं आणि लगेच उत्तर लिहायला बसलों. अगदीं त्यापूर्वीं मी (तुझ्यावर) कविता लिहीत होतों. खोटं नाही–दोन कडवीं नुकतीच गुणगुणून झालीं होतीं. Lines अशा आहेत :

उजळ सखि नयनांतिल फुलवात
फुलव गडे तेजाचा मोहर या घन अंधारांत
उधळ स्मितांतुन कांति उषेची
शब्दांतुन कुजबुज पर्णांची
फुलव दर्शनें सौंदर्याचा स्वर्गच संसारांत

धूपापरि तूं जळुनी अनुदिन
करित सुगंधित अवघें जीवन
जळुन मनोमल, मंगल सगळें तुझिया सहवासांत
उजळ सखि नयनांतिल फुलवात

ही शेवटची ओळ पहा–जळुन मनोमल–मनांतला मल जळून, तुझ्या सहवासांत सारें कांहीं मंगल होतें, पवित्र होतें, असं मीं गात होतों. आतां ही कविता सध्यां तरी बंदच. दोन कडवीं तशीच राहूं देत. तूं नि:शंक होऊन पत्र लिहिलंस, कीं मग मी जमलं तर पूर्ण करीन.

आणि मला जर, कसला संशय असता तर मी तोंडावर सरळ विचारलं असतं. आडवळणांनीं छेडण्याचा भित्रेपणा मी कधींच करणार नाहीं. तूंच तर मला 'फटकळ' म्हणतेस.

यशोदा, सध्यां मीं अगदीं खूष आहें. या महिन्यांत मी १४-१५ उत्तम कविता लिहिल्या. आणखी नव्या कल्पना, नवे विचार यांनीं मन ओथंबलेलं आहे.

मी इतक्यांत पुण्याला येत नाहीं. नंतर कधी तरी पाहीन. आतां हस बघू एकदां, मला इथूनसुद्धां दिसतं बरं का! वेडी कुठली!

घरात बसून कविता लिहिण्याशिवाय त्याला दुसरा उद्योग नव्हता. शिक्षणही सोडून दिलं होतं. काही कामधंदा पण करत नव्हता. लागोपाठ दोनतीन पत्रांतून तो तेच तेच लिहीत होता. त्यामुळं माझं एकदम डोकं फिरलं. आधीच माझ्या घरातले लग्नासंदर्भातले त्रास, कॉलेजचे घोटाळे, पैशांचा प्रश्न, हे सर्व कमी म्हणून की काय, मंगेशनं रिकामपणी बसून तेच तेच लिहून मला त्रास (मस्करी) द्यायला सुरुवात केली.

तरी पण त्याचं पत्र आल्यानंतर मला वाईट वाटलं. इतक्या कडक शब्दांत मी त्याला लिहायला नको होतं असं वाटलं. काही झालं तरी कविता लिहीत असताना माझ्यामुळं अडथळा येऊ नये असं मला वाटायचं. म्हणून मी त्याला लिहिलं :

> ते आतां जाऊं दे. माझं मन नि:शंक झालं आहे. तुला माझ्याविषयीं किती आस्था आहे, याची मला पूर्ण कल्पना आहे.
>
> तूं लिहीत होतास ती कविता खरंच किती छान आहे. मला फार आवडली. मी स्वत:ला भाग्यवान समजतें. तुला जर मीं नकार दिला असता तर माझा जन्म फुकट गेला असता. तूं कवितेंत म्हणतोस तशी खरंच का माझ्यांत शक्ती आहे? तितकं सुख मीं देऊ शकेन का? खरं वाटत नाहीं. बरं, आतां ती कविता पुरी करशील ना? ती अपुरी राहिली तर मला नेहमींच तें मनांत टोचत राहील.

माझ्या पत्रानं त्याचं समाधान झालं होतं. पण एक वेगळाच, काळजी वाटावी असा प्रश्न समोर आला होता. शांतारामाच्या चाळीत रात्री एक वाजता पाणी यायला लागलं. ते त्याला उठून भरावं लागायचं. झोपायला दोन वाजायचे. असं चालू असतानाच,

गुरुमामांना ताप यायला लागला. गुरुनाथ सौदागर हे मंगेशची बहीण कुमुदिनी हिचे यजमान. तिचं लग्न होऊन दोन महिनेच झाले होते. त्यांचा प्रेमविवाह होता. ती शिवडीला तिच्या घरी राहत होती. तिथंच गुरुमामांना ताप यायला लागला होता. तो चार, साडेचारपर्यंत चढायला लागला म्हणून त्यांना ॲम्ब्युलन्समधून ऑर्थररोड हॉस्पिटलमधे आणलं. तो टॉयफाइडचा ताप होता. स्पेशल रूममधे आणखी एक पेशंट होता. त्यातच त्यांना डिसेंट्रीसारखा त्रास सुरू झाला. त्या वेळची हकीकत मंगेशनं मला कळवली :

...प्रथम काका म्हणत होते कीं, 'मींच झोपायला जातों हॉस्पिटलमध्यें.' मी जेव्हा म्हटलं कीं मी जाणार, तेव्हां फार घाबरले आणि भडकले. आपल्याला काही झालं तरी चालेल, पण आपल्या 'एकुलत्या बाळ्याला' नको अशी त्यांची इच्छा. पण कुमूच्या आणि गुरूच्या पुढ्यांत त्यांना बोलतां येईना. घरीं आले आणि माझ्याशीं जोरजोरांत भांडूं लागले. मीसुद्धां जरा दम देऊनच सांगितलं कीं काहीं झालं तरी तुम्हांला मी जाऊं देणार नाहीं. कारण या वयांत संसर्गानें त्यांना ताप आला तर sustain करणं फारच कठीण होईल. तेव्हा उद्यां त्या दोन पेशंट्स्बरोबर कवि जाणार रात्रीं झोपायला. मला कसली भीती वाटत नाही. (आतां पत्र लिहितांना मधेंच उठलों. घरांत आई पुऱ्या तळत होती. एक चांगली फुगलेली पुरी ताटांतून उचलून तोंडांत कोंबली. तोंड चांगलंच भाजलं बरं का. हें वाचून तुला जरा बरं वाटेल!)...

...आता मला इतक्यांत ती कविता पुरी करतां येणार नाहीं, कारण तो mood बदलला. लग्न झाल्यानंतर मीं ती कदाचित् पुरी करीन. (किंवा तुला अगोदर पुण्याला कधीं भेटलों तर.) सध्यां मला कवितेचा mood आहे, पण तो वेगळाच! मी आतां 'जीवन' या नांवाची कविता (कालच सुचली) लिहायला घेणार. भर रस्त्यावर अर्धनग्न अशी एक तरुण भिकारीण. तिचे नऊ महिने भरलेले असतात. उन्हांत-धुळींत एका झाडाखालीं ती निराश्रिता त्या मुलाला जन्म देते. बाजूलाच गटार आहे. माशा आणि जंतू तिच्या प्रसूतीमुळें रक्तानें माखलेल्या कपड्यांवर घोंघावतात! आणि त्यांतूनच तें नूतन बालक आपले इवलाले लाल लाल पाय दोन कोवळ्या ज्वालांप्रमाणें हलवतं आणि रडतं. इथें कविता पूर्ण होणार. कवितेचें नांव 'जीवन! जीवन! जीवन!'

सर्वस्वी तुझाच मंगेश

मंगेशनं असं कळवल्यानंतर मी पत्र लिहून, कुमुदताईंना धीर दिला. गुरुमामांची चौकशी केली आणि मंगेशला, 'ॲन्टीटायफॉइड' इंजेक्शन घेण्याचा सल्ला दिला.

आता मला रोज एस०पी० कॉलेजला जावं लागत नव्हतं. मराठीचे तास पाठकसर वाडिया कॉलेजला येऊन घेऊ लागले. फक्त शुक्रवार, शनिवार मात्र जावं लागे. संस्कृतसाठी मी प्रोफेसर सुरूंना भेटले आणि सांगितलं की, एस०पी०ला जाणं मला फारच गैरसोईचं आणि त्रासाचं होतंय, तेव्हा तुम्ही काही तरी मार्ग काढा.'' तेव्हा प्रोफेसर सुरू आणि प्रोफेसर कुळकर्णी तिथंच त्यांच्या ऑफिसमधे बसून मला संस्कृत

शिकवायला तयार झाले. संस्कृतला मला त्या वर्षी 'काव्यप्रकाश' अभ्यासाला लागलं होतं.

दुसऱ्या दिवशी कुळकर्णी सर मला विचारायला लागले की, "मराठी नाटकात तू नायिकेची भूमिका करशील का?" मी म्हणाले, "घरी विचारून, विचार करून सांगते." आईला सांगितलं. तिची फारशी काही इच्छा दिसली नाही. ॲन्युअल गॅदरिंगचे दिवस जवळ आले होते. कॉलेजमधे एक धमाल वातावरण होतं. पण मला त्यात सहभागी होता येत नव्हतं. सीनियरचं वर्ष, भरपूर अभ्यास. घरातलं सगळं काम माझ्यावरच टाकलेलं होतं. शिवाय एस०पी०च्या फेऱ्या. एवढं करून रोज प्रॅक्टिससाठी थांबावं लागेल. सर्व विचार केला आणि सरांना सांगितलं की, "मला जमणार नाही." त्यांना वाईट वाटलं. त्यांना सर्व अडचणी सांगितल्या. नाइलाजानं त्यांनी मान्य केलं. मन अगदी चुटपुटलं. चांगली संधी मी माझ्या हातानं घालवली. ह्या संधीसाठी इतरांना प्रयत्न करावे लागतात, वशिले लावावे लागतात. परिस्थितीमुळं खूप हव्या असलेल्या गोष्टींचा त्याग करावा लागतो. मंगेशला पत्रातून विचारलं होतं की, "नाटकात काम करू का?" त्यानं उत्तर लिहिलं, पण नेमकं ह्या प्रश्नाचं उत्तर त्यात नव्हतं.

'मी फार वाईट आहे, आणि मला खूप गोष्टी कळायच्या आहेत. आणि त्याचंच माझ्यावर जास्त प्रेम आहे आणि मला तेवढं प्रेम करताच येत नाही,' असं त्याचं म्हणणं होतं. खरं तर सर्व कामं करत असतानासुद्धा त्याची आठवण मनात कायम जागी असे. त्या आठवणीवर तर मी जगत होते आणि घरातल्या विरोधाला एकाकी तोंड देत होते. पण तोही ते गमतीनंच म्हणत होता.

त्यानं पुण्याला येऊ नये असं मी सांगत होते. कारण माझ्या अभ्यासात व्यत्यय येत होता आणि घरातलं वातावरण ह्या परिस्थितीत बिघडावं अशी माझी इच्छा नव्हती. ते मला फारच कठीण गेलं असतं. एकमेकांपासून दूर राहण्याची कमाल मर्यादा झाली आहे असं वाटलं तेव्हा मी त्याला लिहिलं की :

> तूं तर सबंध जगाचा कवि आहेस, मीं मात्र फक्त तुझीच आहें. तुझ्याबद्दल मला अभिमान वाटतो. माझ्याबद्दल तुला अभिमान वाटावा असं माझ्याजवळ कांहींच नाहीं.

गुरुमामा अजून हॉस्पिटलमधे होते. मंगेश रोज रात्री त्यांच्याजवळ झोपायला जात होता. त्यातच घरातला गडी भांडून गेला म्हणून आपण भांडी घासतो असं त्यानं लिहिलं–आणि लगेच आता कंत्राट आईनं घेतलं, असंही लिहिलं. म्हणजे खरंच किती दिवस भांडी घासली असतील? शंकाच आहे. कुमुदताई आणि तो पाळी लावून गुरुमामांकडं बसत. मध्यंतरी ते सीरिअस झाले होते. पाचाच्या वर ताप गेला होता. मग बर्फाचं स्पंजिंग, पेनिसिलीनची इंजेक्शन्स असे खूप प्रयत्न केले तेव्हा ताप दोनवर आला होता. कुमुदताई घाबरून लहान तोंड करून बसली होती. मंगेशनं कळवलं : "आतां सारें ठीक आहे, काळजी खूप घेतली पाहिजे."

आता ताप नॉर्मल आला होता. पुढं त्यानं लिहिलं होतं :

तुझा मला खूप अभिमान वाटतो. रात्रभर जागत असतांना मी कुणाची आठवण काढीत असतो? तुझीच ना? इथं अगदीं त्रासलों, वैतागलों कीं, तुझ्याजवळ येऊन सारा शीण घालवावा असं वाटतं. गुरु बरा झाला कीं मी दोन, तीन दिवस पुण्याला येईन, चालेल ना?

'जीवन! जीवन' कविता पूर्ण झाली. अगदीं मनासारखी उतरली. धर्माच्या आणि संस्कृतीच्या निर्लज्ज गप्पा करणारा समाज बघण्यापलीकडे कांहीं करीत नाहीं. माणसांच्या ह्या हीन संस्कृतीचं स्वरूप मीं या कवितेंत मांडलं आहें.

इकडे कवी बोरकरांचा मुलगा दीपक ह्यालासुद्धा टॉयफाइडचा ताप येत होता. त्याचा तापाचा सतरावा दिवस होता. त्याला बघायला मी गेले होते. जाताना थोड्या मोसंब्या बरोबर घेतल्या. माझ्याजवळचे पैसे संपले होते. फक्त एक रुपया गंजिफ्रॉकचा रेशमी दोरा आणण्यासाठी ठेवला होता. आणखी दोरा लागणार होता. पाठची बाजू पुरी झाली होती. पुढची व्हायची होती. म्हणून मी मंगेशला थोडे पैसे पाठवून द्यायला सांगितलं होतं.

गुरुमामांचा ताप नॉर्मल येऊन आठ दिवस झाले होते. तरी त्यांना घरी पाठवलं नाही. फार काळजी घेणं आवश्यक होतं. मंगेशला झोपायला जावं लागत होतं. पण आता निवांत झोपता येत होतं. त्यानं ३०.७.४९ ला मला लिहिलं :

आता सारें कांहीं ठीक आहे, आम्ही खूप घाबरलों होतों. पण कुमूचें सौभाग्य थोर, स्त्रीच्या निष्ठेंत आणि प्रेमांत अपार सामर्थ्य असतें. तिच्या प्रीतीपुढें मृत्यूचें कठोर काळीजसुद्धां विरघळतें. आमच्या साऱ्या कष्टांचें, त्रासांचे सार्थक झालें, कुमूच्या तोंडावर आतां नवा आनंद, नवें हास्य आहे.

मीं बाहेरच्या गॅलरींत बसून पत्र लिहीत आहें. खूप मोठा पाऊस पडतो आहे. हा श्रावण महिना. मला पावसाळा फार आवडतो. जीवनांतली सारीं सौंदर्यं पावसाळ्यांत एक होतात. पावसांत अपार कोमलता आहे. तसेंच अपार सामर्थ्य आहे.

तूं राहतेस ती जागा किती सुंदर आहे! आता तिकडे सारें हिरवेंगार झालें असेल. आजूबाजूला हिरवें गवत आणि मधून मधून झाडें. इथें बसून तिथलें सारें मीं आठवीत आहें. तुझ्या घराच्या मागें ती विहीर आहे ना? तिची मला खूप आठवण होते. आतां ती तुडुंब भरली असेल. तिथल्या कुंपणाच्या दाराची साखळी काढून आपण दोघं तिथं गेलों होतों. त्या प्रसंगांत तुझ्या आणि माझ्या जीवनाचें प्रतीकदर्शन होतें. तिथल्या झाडांवरून आतां थेंबांच्या नक्षत्रांचा सडा ओघळत असेल. तिथें तूं माझ्यासाठीं एकदां जाऊन ये. आणि तुझ्या घरामागल्या बागेंत जो लहानसा हौद होता, त्यांतले सोनेरी मासे आहेत का अजून? माझ्या रक्तारक्तांतून या क्षणीं सोनेरी मासे नाचत आहेत. पावसाळ्यांत मी अगदीं बेभान होतों. खरोखरच मला अगदीं वेड लागण्याची पाळी येते. पावसावर मी

कविता लिहिल्या आहेत. एका कवितेत क्रांतीचीं प्रतीकें आहेत, तर दुसऱ्या कवितेंत प्रीतीचीं आणि नव्या जीवनसमृद्धीचीं. माझ्या त्या ओळी आठवतात का तुला?

रिमझिम रिमझिम ये सरिवर सर
गिरि, दरि, सागर, स्वप्निल निळसर
निळ्या लयींतून आज कालचें हंसलें क्षितिज उदास
आज ये अवचित सजल सुवास

मी तुझ्यावर कविता लिहीत होतों ना, तो मूड पुन्हां येऊं लागला आहे, पहिलीं दोन कडवीं तुला पाठवलीं होतीं. तिचं शेवटचं कडवं मी लिहिलं. आता पुढें पाहूं.

तूं हृदयीं नितनूतन आशा
तूं भविष्य तूं प्रकाश-भाषा
तुझेंच मंगलदर्शन माझ्या उमले या कवितांत
उजळ सखि नयनांतिल फुलवात
फुलव गडे तेजाचा मोहर या घन अंधारांत

तुझा अभिमान मला वाटतो काय, असं तूं मला अप्रत्यक्षपणें मागल्या पत्रांत विचारलं होतंस. खरंच मला वाटतो. बाह्य वैभवावर भुलून दिपून जाण्याइतकी माझी जीवनदृष्टी उथळ नाहीं. (हें पत्र लिहीत होतों इतक्यांत मागून पोस्टमन आला आणि त्यानें तुझें पत्र मला दिलें.)

'नवभारत' मधल्या कवितेचे पैसे आले. त्यांतले पांच रुपये ह्या पत्रांतून पाठवीत आहे. आणखी पांच दुसऱ्या पत्रांतून पाठवीन. ही माझी 'कमाई' बरं का? बिचारा कवि! पत्र हरवलं तर एकदम दहा रुपये जायला नकोत.

त्यानं पाठवलेले पैसे मला मिळाले. पण ती त्याची कमाई म्हणून मला खर्चच करावेसे वाटेनात.

दोनतीन दिवस सारखा पाऊस लागला होता. कॉलेजला येण्याजाण्याचा फार त्रास व्हायला लागला. आम्ही दोघं ज्या मैदानातून फिरलो होतो, ते आता अगदी हिरवंगार झालं होतं. हे सृष्टिसौंदर्य अगदी डोळ्यांनीच पाहण्यासारखं होतं. शब्दांनी वर्णन करणं माझ्यासारखीला शक्य नव्हतं. मंगेशनं लिहिलं होतं की, पावसाळ्यांत त्याला वेड लागायची पाळी येते. तो जर येरवड्याला आला असता तर नक्की वेडाच झाला असता.

माझं रोजचं फिरणं पण बंद झालं. सोबत नव्हती. आई मला एकटीला लांब जाऊ देत नव्हती. कारण एकदा एस०पी० कॉलेजमधून येताना मला फार उशीर होणार होता म्हणून मी आईला बस स्टॉपवर बोलावलं होतं. मला त्या 'सॅपर्स मॅनर्सच्या' जवानांची फार भीती वाटायला लागली होती. त्याप्रमाणं आई येऊन थांबली होती. अगदी संध्याकाळ झाली होती. मी बसमधून उतरले आणि आम्ही दोघी आमच्या इंडस्ट्रियल

स्कूलच्या आडव्या रस्त्याला लागलो. तो रस्ता बराच लांबलचक होता. दोन्ही बाजूंला गोल्फचं ग्राउंड. त्यामुळं वस्ती नाही, रहदारी नाही. एक माणूसही दृष्टीस पडत नव्हता. आम्ही दोघीच न बोलता चालत होतो. इतक्यात मागून एक जवान आला आणि माझ्या जास्तीत जास्त जवळ येऊन चालू लागला. आई बाजूला होतीच. आम्ही जरा रस्त्याच्या कडेला सरकलो. त्याबरोबर तोही जास्त माझ्याजवळ सरकला. मग मात्र आई पण घाबरली आणि म्हणाली, "क्यूं सरदारजी, क्या बात हैं?" त्यावर, "नही, कुछ नहीं बाई." असं म्हणाला. थोडा बाजूला झाला. तो जवळजवळ मला खेटायलाच आला होता. तो पुढं चालायला लागला. आम्ही आमच्या कंपौंडजवळ आलोच होतो. पटकन आत आलो. गेटवर पोलीस पहारा असायचा. त्यामुळं भीती कमी झाली.

आई पत्रं काढून वाचते म्हणून मी माझ्या बॅगेला कुलूप लावायला सुरुवात केली. पण ती तेही उघडून पत्रं वाचते, असं माझ्या लक्षात आलं. म्हणून मी पत्रांची जागा बदलली आणि मंगेशला लिहिलं की, "मी पत्रं एका गंमतीत ठेवून दिलींत." हल्ली आम्ही दोघीच घरात होतो. पण ती मंगेशचा विषय काढत नव्हती. माझ्याशी चांगली वागायची. अजिबात चिडचिड करत नव्हती. तिची प्रकृती पण जरा बिघडत चालली होती. एक दिवस मला विचारायला लागली, "गंजिफ्रॉक कोणासाठी करतेस?" मी उत्तरच दिलं नाही. ती मनातून समजून होती. पुन्हा हा प्रश्न तिनं मला विचारला नाही.

मी पत्रं कुठं लपवून ठेवलीत ह्याची मंगेशला उत्सुकता लागून राहिली आणि आई पत्रं का वाचत असेल? तर ती उथळ आनंदासाठी नसून मनातल्या भीतीमुळं वाचीत असेल. तेव्हा मी तिच्याजवळ जाऊन प्रेमानं, मी लग्न केव्हा करणार वगैरे सांगितलं असतं तर हा प्रकार घडला नसता असं त्याचं म्हणणं.

तसंच 'गंजिफ्रॉक कुणासाठीं विणतेस?' याचं मी उत्तर दिलं नाही. त्यावर त्याचं म्हणणं असं की :

तुझ्या मुत्सद्दीपणावर तूंच खूष झाली असशील. पण खरं सांगू? तिला स्पष्ट सांगण्याचा निर्भयपणा तूं दाखवला असतास तरच मला अभिमान वाटला असता. मौन पत्करण्यांत मोठेपणा का आहे? गप्प कां राहिलीस? अजूनही मला वाटतं कीं तूं, तिला वाटत असलेल्या 'रहस्या'चा मोकळेपणानं उलगडा करावा. तूं त्यांना भितेस कीं तुच्छ समजतेस? दोन्ही गोष्टी वाईट आहेत. मी आतां ही गोष्ट विषय निघाला कीं, सर्वांना सांगतों. काल कॉलेजमधला पै भेटला होता. त्याला पण मी सांगितलें. आतां ते कॉलेजमधें पसरेल (अनायासें जाहिरात झाली.). तूं मात्र अशी वागून मला कां लाजवतेस? आतां हें गौप्य नको ठेवूं. ही गोष्ट तुला दुःखाची का वाटते?

मीं आतां अगदीं थकलों आहें. तूं मला येण्याची तारीख कधीं कळवणार? लवकर कळव. अभ्यास कां करीत नाहींस? नापास होणार? फी हवी तर मी पाठवीन.

मी त्याच्या पत्राची वाट पाहत होते. प्रकृती बरी नसून रोज कॉलेजमधे जाऊन पत्र आलं का, ते बघत होते. शेवटी एकदाचं आलं. पत्र वाचून माझा भ्रमनिरास झाला. मी कोणत्या परिस्थितीत जगत आहे, कोणत्या परिस्थितीत घरात राहत आहे, माझ्या मनाचा किती कोंडमारा होतो, हे त्याला मुंबईच्या घरात, आई-वडिलांच्या उबेत, सुखात, समाधानात राहून कसं कळणार? हे मला आता लक्षात येतं. पण तेव्हासुद्धा त्यानं ज्या पद्धतीनं माझ्यावर टीका केली होती ती मला मुळीच आवडली नव्हती, हे माझ्या पत्रावरून लक्षात येतं.

मी त्याला लिहिलं होतं की :

तुझी पत्रं गमतींत म्हणजे सरळ पुस्तकांच्या फळीवर ठेवलीत.

तुला असं वाटतं का, कीं मी प्रेमानं जवळ जाऊन आईला कांहीं सांगूं लागलें तर ती ऐकून घेईल? मला तें मुळींच शक्य वाटत नाहीं. ती गोष्ट तिला अगदीं मनापासून होऊं नये असं वाटत आहे. इतकंच नाही, तर ती मला असंही म्हणाली आहे कीं, ज्या दिवशी तू घरांतून जाशील त्या दिवशीं मी जीव देईन. असं असतांना त्याच गोष्टीविषयीं ती शांतपणानं कसं ऐकून घेईल? आणि तसं तिनं जर ऐकून घेतलं तर आपल्या लग्नाला तिची एक प्रकारें संमती आहे, असंच नाहीं का सिद्ध होत? तुझी कल्पना साफ चुकीची आहे. ती मला शेवटपर्यंत विरोधच करणार आहे. तिच्या स्वभावाची मला जास्त चांगली ओळख आहे.

बरं, आता गंजिफ्रॉकबद्दल उत्तर न देण्याचा मुत्सद्दीपणा मी कां केला तें सांगतें. मी हेतुपुर:सर तसं केलं. भीतीमुळं उत्तर दिलं नाहीं असं नाहीं. मी तिला तुच्छही लेखीत नाही. तिनं मला जन्म दिला आहे. तिला तुच्छ लेखलं तर मला स्वत:लाही तुच्छ लेखल्यासारखं होईल. मला तिची अजिबात भीती वाटत नाहीं, असंही नाहीं. साधारण मोठ्या माणसांबद्दल, आई-वडिलांबद्दल आपल्याला जी आदरयुक्त भीती वाटत असते ती मलाही वाटते.

मी तिला उत्तर न द्यायचं कारण एवढंच कीं, ती माझीं पत्रं वाचते का नाहीं याची मला खात्री करून घ्यायची होती. मी तिच्याशीं कोणत्याही बाबतींत खोटं बोलत नाहीं. गेल्या वेळेससुद्धां तूं आलास तेव्हां मी खरं सांगूनच आलें होतें, आणि आतांही तूं येणार म्हणून मी तिला सांगणारच आहें.

खरं सांगायचं तर तुझीं पत्रं कोणी वाचलीं तर मला अतिशय चीड येते. मला ती कल्पनाच सहन होत नाहीं. मी आईला मागेंच सांगितलं होतं कीं तुला काय पाहिजे तें मला विचार. मी अगदीं खरं खरं ते सांगेन. पण माझीं पत्रं वाचीत जाऊं नकोस. तीच माझ्याशीं मोकळेपणानं बोलायला तयार नाहीं, तर मी काय करूं?

मीसुद्धा कॉलेजमधें माझं लग्न ठरलं आहे म्हणून पुष्कळ मुलींना सांगितलं आहे. मंदा पाटोळेला तर आतां पुष्कळच माहिती आहे. पण इकडे तूं कोणालाच माहिती नाहींस, त्यामुळें त्यांना त्याचं आश्चर्य वाटत नाहीं. असं सांगतांना मला

मुळींच वाईट वाटत नाहीं किंवा दु:खही होत नाहीं. जी गोष्ट माझ्या मनाप्रमाणं होत आहे, तिचं मला वाईट वाटण्याचं काय कारण?

कॉलेजमध्ये वेळ मिळाला कीं, गंजिफ्रॉक विणते. तो कुणासाठीं विणते सर्वांना ठाऊक आहे. माझा पाहून एकदोन मुली तसाच विणायला घेणार आहेत.

आज एकसारखी डोळ्यांवर झापड येत आहे. काल डिसेंट्री झाली म्हणून गोळ्या घेतल्या. सबंध दिवस मी झोपून होतें. मळमळायला लागलं. आणि उलट्या होऊं लागल्या. त्या थांबेचनात. गोळी पण पोटांत ठरेना, शेवटीं आईनं मोहरी वाटून त्याचं पोटीस पोटावर घातलं. तेव्हा थोड्या वेळानं उलट्या थांबल्या. आज पुष्कळ बरं आहे, तूं येईपर्यंत मी चांगली बरी होईन.

ठरल्याप्रमाणं मंगेश पुण्याला आला. त्याला भेटायला मी आईला सांगून गेले. खूप गोष्टी केल्या. कंटाळा आला म्हणून बंडगार्डनला फिरायला गेलो. मुळामुठेच्या धरणावर गेलो. खळाळून उसळणारं पाणी पाहत बसलो. दुसऱ्या दिवशी एक सिनेमा पाहिला. असे दोनतीन दिवस मी सकाळी त्याला भेटायला जात असे. आणि संध्याकाळी अंधार पडायच्या आधी घरी जात होते.

तो भेटून गेला की मन अस्वस्थ होत असे. प्रकृती नीट राहत नव्हती. फार अशक्तपणा आला होता, म्हणून स्कूलच्या दवाखान्यात आईकडं गेले आणि वजन केलं ते फक्त ९५ पौंड भरलं. डॉक्टरांनी मला रोज दूध घ्यायला सांगितलं. मला दूध आवडत नाही, तरी तसंच प्यायचा प्रयत्न केला. कारण प्रकृती सुधारली पाहिजे हे कळत होतं. पण दूध घेतलं की उलटी व्हायची. चहा पण आवडत नव्हता. एकूण खाण्यापिण्याचं मला भानच नसायचं. आणि आवड पण नव्हती.

आमच्या शेजारी हिंदू ब्राह्मण कुटुंबं होती. मी कॉलेजमधे शिकणारी मुलगी म्हणून माझ्याशी त्या बायका फार आपुलकीनं वागायच्या. हरितालिकेला त्यांनी उपास केला. रात्री जागून खेळायचं असं ठरवलं. त्यांच्यात मी पण सामील झाले. उपास केला नाही, पण पत्ते, फुगड्या, कॉफी. पुन्हा पत्ते खेळलो. गप्पा मारल्या. पहाटे चारला घरी येऊन झोपले. दुपारी चांगली झोप काढली, तेव्हा बरं वाटलं.

माझ्या वर्गात प्रभा लाटकर नावाची कोल्हापूरची मुलगी होती. तिच्याबद्दल मी मंगेशला लिहिलं :

> प्रभाची आणि माझी आतां खूप मैत्री झाली आहे. तिनं पण तिची सगळी हकीगत सांगितली मला. ती आहे सारस्वत आणि नरेंद्र घोरपडे नांवाच्या मराठा मुलाबरोबर तिनं लग्न ठरवलं आहे. तिच्या वडिलांना हें ठाऊक नाहीं. आम्हीं दोघी खूप खूप गप्पा करीत बसतों. ती हॉस्टेलमधे राहते. तिच्या खोलीवर कितीही वेळ बसतां येतं. तूं आलास म्हणजे ओळख करून देईन. तिचा नरेंद्र पण येणार आहे पुढच्या महिन्यांत. तेव्हां ती माझी ओळख करून देणार आहे. तिच्या आणि माझ्या परिस्थितींत खूप साम्य आहे.

काल प्रभा आणि मी प्रमिला बागवेच्या घरीं गेलों होतों. तिच्या सासूबाई आजारी आहेत, म्हणून तिनं कॉलेज सोडलं. तिचं संस्कृतचं पुस्तक मीं आणलं. त्याची किंमत साडेदहा रुपये आहे. आईला इतके पैसे देतां येतील असं वाटत नाहीं. तुला पाठवतां येतील का? शक्य झाल्यास पाठवून दे.

मी अभ्यासाला सुरुवात करणार आहे. अगदी संध्याकाळ झाली. नीट दिसतही नाहीं.

मंगेश कार्यक्रमासाठी अहमदाबादला गेला. जाताना स्वत:च्या आईला सांगून गेला की तू तिला पत्र लिही. त्याप्रमाणं त्यांनी मला लिहिलं की :

तू टायफॉइडचं इंजेक्शन घेतलं नाहींस म्हणून तो तुझ्यावर चिडला होता. तर ताबडतोब इंजेक्शन घे, तसं त्याला कळव.

तूं अगदीं अशक्त झाली आहेस. दूध वगैरे घेत नाहींस, असं कां करतेस? दूध, अंडीं घेऊन प्रकृतीची नीट काळजी घे. विनाकारण आम्हांला काळजी करायला लावूं नकोस. आणि म्हणे, दोन्ही वेळचा स्वयंपाक पण तूंच करतेस. इतका त्रास कसा सोसेल ग तुला? कॉलेजचा अभ्यास, जाण्यायेण्याचा त्रास. बायकांना स्वयंपाक चांगला आला पाहिजे असं मंगेश म्हणतो. म्हणून स्वयंपाक करून एवढा त्रास घेऊन सवय करतेस? लग्न झाल्यावर शिकतां येईल. एखादं काही आलं नाहीं तर जाच होणार नाहीं काहीं सासूचा. घाबरूं नकोस. पण आपल्या प्रकृतीकडे व अभ्यासाकडे नीट लक्ष दे.

इतकं प्रेमळपणानं लिहिलेलं आश्वासक पत्र वाचून माझा ऊर भरून आला. माझ्यावर ह्या इतकं प्रेम कसं करू शकतात? त्यांची माझी तर एकदाच भेट झाली होती. त्यांनी मला काही प्रश्न विचारले. पण लाजेनं आणि भीतीनं मी अगदी त्रोटक उत्तरं दिलीं. मंगेशनं त्यांना माझ्याबद्दल खूप गोष्टी सांगितल्या असणार. त्यावरून त्यांनी मत बनवलं असणार. मी पण त्यांना तसंच आभार व्यक्त करणारं पत्र लिहिलं.

त्यावर त्यांचं परत पत्र आलं :

तूं माझी एकुलतीएक लाडकी सूनबाई. आणि तशांत तुझा प्रेमळ व विनयशील स्वभाव मला फारच आवडतो. मग कां बरं मला तुझ्याबद्दल प्रेम वाटणार नाहीं? कदाचित पूर्वजन्मींचाही ऋणानुबंध असेल. (अर्थात् पूर्वजन्मासंबंधाची कल्पना खरी असल्यास!)

तुझी सौ० आई

असं सगळं छान, सुरळीत चाललं होतं आणि एक घटना अशी घडली की मी लिहिलेल्या एका पत्राच्या अर्थाचा अनर्थ झाला. मी करायला गेले एक आणि झालं भलतंच.

आईला कोणीतरी म्हणालं की, "ताईचं ज्या मुलाशी प्रेमप्रकरण चालू आहे त्या कुटुंबाची तुम्ही नीट चवकशी करावी." हे कळल्यावर ती जी भयंकर चिडली आणि मला वाट्टेल ते बोलायला लागली. आधी तिच्या मनात असलं काही नव्हतं. पण हे निमित्त करून ती म्हणाली, "कशी लग्न करतेस तेच बघते. तू कोणाची मुलगी आहेस हे विसरलीस क्काय? आणि तू काय चालवलं आहेस?" मी सर्व परींनी तिला समजावण्याचा प्रयत्न केला. पण ती माझं काहीएक ऐकून घेण्याच्या मन:स्थितीत नव्हती. कारण मुळात तिला हे लग्नच मान्य नव्हतं. आणि आता हे एक शस्त्रच तिच्या हाती आलं. त्या शस्त्रानंच एक घाव दोन तुकडे करता येतील असं तिला वाटलं. मला म्हणाली, "त्याच्या आईवडिलांना भेटायला सांग मला."

आता घडलेला प्रसंग मंगेशला सांगायला तर पाहिजेच होता. मी नेमकं काय लिहिलं होतं ते मला सांगता येणार नाही. कारण नेमकं तेच पत्र ह्या सर्व पत्रांत मला सापडलं नाही. मंगेशनंच रागानं ते फाडून टाकलं असावं.

ह्या सर्व प्रकारातून मार्ग कसा काढावा म्हणून मी त्याला पत्र लिहिलं होतं. आता हे नक्कीच की, तिचा कोणीतरी गैरसमज करून दिला होता. आणि तिनं चिडून त्यांना भेटण्याची इच्छा व्यक्त केली होती. ह्यात माझा दोष काय हेच मला कळेना. माझ्या आईची आणि मंगेशच्या आई-वडिलांची भेट झाली तर समझोत्यानं प्रश्न सोडवला जाईल आणि माझाही पुढचा मार्ग सोपा होईल. अशी एक आशा माझ्या मनात उद्‌भवली व मी त्याला, 'त्यांना भेटायला घेऊन ये' असं लिहिलं असणार.

माझं पत्र वाचून तिकडं धरणीकंपच झाला. तो भयंकर चिडला. रागानं नुसता वेडा झाला. मला त्यानं जे एक पत्र लिहिलं, ते इतकं वाईट होतं की, आमचं लग्न त्याच वेळी मोडल्यात जमा झालं होतं. एवढंच करून तो थांबला नाही तर त्यानं माझं पत्र त्याचा मित्र प्रभू याला वाचायला दिलं. सिंधूला वाचायला दिलं. आणि स्वत:च्या आईला पण वाचायला दिलं. आणि सर्वांना मला पत्रं लिहायला सांगितली. सर्वांनी मिळून मला मूर्ख ठरवलं. माझ्या अकलेचे आणि बुद्धीचे धिंडवडे काढले. त्यांचं म्हणणं असं की, मंगेशच्या आई-वडिलांनी, आईला भेटायला यावं असं मी लिहायला कशी धजावले? मी अगदी उसळून उठायला पाहिजे होतं. आणि आईला सांगायला पाहिजे होतं की, "ते तुला भेटायला मुळीच येणार नाहीत."

मुळात उसळून उठण्याचा, आणि माझी मर्यादा सोडून, बेभान होण्याचा माझा स्वभाव नाही. आल्या प्रसंगाला, संकटाला मी संसारातसुद्धा संयमानंच तोंड देत आले.

सिंधूनंसुद्धा पुन्हा तेच सर्व लिहिलं आणि शेवटी लिहिलं की :

> तूं कवीला कांहीं कळवायला नको होतंस. ताई, हें सर्व मींच तुला सांगायला पाहिजे का ग? माझ्यापेक्षां कितीतरी बाबतींत तूं पुढंच आहेस. तुझ्या अंगी वसत असलेलं धैर्य, तुझा निश्चयी स्वभाव, अनपेक्षितपणें आलेल्या प्रसंगाला कौशल्यानं तोंड देणं हे सर्व गुण पाहून तुझ्याविषयीं फार

अभिमान वाटतो. कवीच्या सांगण्यावरून तुला हें पत्रं लिहण्याचं धाडस केलं. त्यांत जें चांगलं असेल तें सिंधूनं सांगितलं आणि वाईट असेल असा भाग सिंधूच्या imperfect part नं सांगितला असं समजून तें सोडून दे. तुझं उत्तर येईपर्यंत तूं मला क्षमाच केली नाहींस असं मी समजेन.

तुझी बहीण सिंधू

त्यानंतर खूप दिवसांनी मंगेशचं पत्र आलं. इतकी वर्षं झाली तरी त्याचं ते पत्र वाचताना मनात प्रचंड खळबळ होऊन शरीर थरथर कापल्यासारखं वाटतं. पत्र वाचायचा धीर होत नाही. कारण मी स्वत: काही म्हणालेच नव्हते. किंवा म्हणण्याचा माझा उद्देशच नव्हता. ज्या कुणी माझ्या आईला सुचवलं आणि त्याचा इतका गहजब झाला ती व्यक्ती कोण हे अजूनही मला माहीत नाही. मला कोणाचीच सहानुभूती नव्हती की, जवळ कोणीच जीवाभावाचं नव्हतं की, त्याला माझं दु:ख सांगावं.

ह्या गोष्टीचा गवगवा खरं तर मंगेशनंच केला. माझं पत्र वाचून त्यालाही धक्का बसला असणार–संताप आला असणार. कारण तो त्याचा स्वभावच आहे. तो चिडला ह्याचं मुख्य कारण असं, की मी ख्रिश्चन म्हणजे त्यांच्यासारखी उच्च जातीची नसून त्यानं किंवा त्याच्या घरातल्या वडील माणसांनी माझ्या जातीची चौकशी केली नाही. एवढं रान उठवण्यापेक्षा त्यानं फक्त मला पत्र लिहून त्याला जे काही म्हणायचं होतं ते लिहिलं असतं तर माझा जो मानसिक कोंडमारा झाला, त्यातून मी बचावले असते.

मंगेशचं पत्र आल्यानंतर मी त्याच्या आईंना पत्र लिहिलं :

माझी प्रकृती तशी चांगली आहे. थोडी सर्दी होती. त्यांतच रविवारीं कॉलेजची ट्रीप गेली होती. ट्रीपला मी पण गेलें होतें. 'भाटघरचं धरण' पाहिलं आणि भोरच्या अलीकडं 'बनेश्वर' म्हणून ठिकाण आहे, तेंही पाहिलं. मात्र येतांना मोटारींत फार गार वारा लागला. त्यामुळं सर्दी खूप वाढली आहे.

ऑक्टोबर चारपासून परीक्षा आहे. अभ्यास करतें, पण मन लागत नाहीं. व्हावा तसा अभ्यास पण होत नाहीं. परीक्षा द्यायची म्हणून देणार आहे. पास होईन याची खात्री वाटत नाहीं.

मी मंगेशला लिहिलेलं पत्र त्यानं तुम्हांला दाखवूं नये अशी माझी इच्छा होती. उगीच कोणीतरी कांहींतरी बडबडल्यामुळें आपण तें मनाला लावून घेऊन स्वाभिमान कां दुखवून घ्यायचा? माझ्या पत्राचा तुमच्या मनावर काय परिणाम होईल याची मला कल्पना नव्हती. म्हणून तें पत्र तुम्हांला दाखवूं नये, असं मीं मुद्दाम लिहिलं होतं. तरी त्यानं तें दाखवलं. पण तुमचं मन किती उदार आणि मोठं आहे कीं ते वाचूनसुद्धां तुम्हीं माझ्यावर न चिडतां उलट मला प्रकृतीची काळजी घ्यायला सांगून, नीट अभ्यासपण करायला सांगतां.

आतां मी जें काहीं सांगतें तें तुम्हांला तरी खरं वाटेल अशी मला खात्री आहे.

काकांना आणि तुम्हांला इकडे बोलावतांना, त्यांत तुमचा अपमान होत आहे, ही गोष्ट खरोखरीच माझ्या लक्षांत आली नाहीं. माझी चूक आतां मला कळली. मी भाबडेपणानं सर्व कांहीं लिहून टाकलं. त्याचा परिणाम काय होईल याचा विचार केला नाहीं. आई, मीं माझी चूक कबूल करतें आणि तुमच्याजवळ क्षमा मागतें.

त्या पत्रानंतर मला प्रभूचीं दोन, सिंधूचं एक, मंगेशचं एक अशीं चार पत्रं आलीं. त्या पत्रांतला प्रत्येक शब्द माझा धिक्कार करीत आहे. खरंच का मीं इतकी निर्बुद्ध आहें कीं एखादी गोष्ट मला प्रत्येकाकडून इतक्या वेळां सांगायला लागावी! मंगेशचं पत्र वाचल्यापासून कशांतच मन लागत नाहीं. बसल्या बसल्या डोळ्यांतून पाण्याच्या धारा वाहूं लागतात; पण आई, अशा वेळीं तुमची मूर्ती माझ्या डोळ्यांपुढे येते. आणि मला किती आधार वाटतो म्हणून सांगूं? माझ्या आईच्या घरांत, माझं म्हणण्यासारखं कोणीच राहिलं नाहीं. इथं माझ्याविषयी कोणाला कां सहानुभूती वाटावी? आणि तिकडेही माझ्याच मूर्खपणामुळें सर्व जण माझ्यावर चिडले आहेत. तुम्हींच तेवढ्या चिडल्या नाहींत. पहिल्याच आपुलकीनं कशा बोलूं शकतां? तोंडावर मी तुमची स्तुती करत नाहीं. माझ्या प्रत्येक शब्दांतून मनांतली खरी कळकळ आणि तळमळ प्रगट होत आहे.

आता रात्रीचे बारा वाजलेत. झोप येईल असं वाटत नाहीं, पण आतां झोपले नाहीं तर पहाटे उठून अभ्यास कसा होणार? तेव्हां आतां पुरें करतें.

त्यानंतर मंगेशनं लिहिलं की :

तुला खूप वाईट वाटलेलं दिसतं. आतां झालं तेवढं पुरे. आपलं दोघांचं ठरलं होतं ना, खूप खूप भांडायचं म्हणून? उगीच आतां मनाला लावून घेऊं नकोस. पूर्वी होतों त्याच्यापेक्षां कितीतरी पटींनीं मी तुझ्याजवळ आल्यासारखं वाटतं. आतां माझ्या प्रेमाची सखोलता पूर्वीहून कितीतरी पटींनीं वाढली. तुझी शप्पथ.

मी आजारी होतों त्या दिवशी माळीवर बसलों होतों. अकस्मात छातींत असह्य कळ आली. सोसवेना म्हणून खालीं उतरलों. नंतर सारी रात्र एकसारख्या कळा येऊं लागल्या. श्वास घेतां येईना. घरीं नाना उपाय केले. तुफान पावसामुळें दवाखाने बंद होते. घरीं सगळी घाबरली. नंतर नंतर अगदीं सोसवेना. हार्टफेल होऊन मरतों कीं काय असं वाटूं लागलं. तुझी आठवण होऊन डोळ्यांतून अश्रू वाहायला लागले. दुसरे दिवशीं डॉक्टरकडं गेलों. त्यांनीं सांगितलं हार्ट ठणठणीत आहे. मग अँटी फ्लॉरिस्टीनचा डबा लावला तेव्हां कळा साफ थांबल्या. दुसऱ्या दिवशी १५-१६ वेळां जुलाब झाले. इतका गळून गेलों कीं उठवेना. आतां सारें कांहीं ठीक आहे. तुझ्याजवळ असलों कीं मी खूप भांडतों. दूर गेलों कीं, तुझ्याशिवाय खरंच अगदी पोराहून पोर होतो. ह्या दिवसांत इतकं सारं होऊनसुद्धां मी कितीतरी कविता लिहिल्या (जवळजवळ दहा). अधिक काय लिहूं? प्रकृतीची काळजी घे, परीक्षा केव्हां संपते तें कळव.

मंगेश मला भेटायला पुण्याला आला. तो गेल्यानंतर पुन्हा पत्र मीच लिहायचं असं ठरलं होतं म्हणून मी लिहिलं. कॉलेजसमोरच्या झाडाखाली निरोप घेतला. त्यानं जाऊं नये, एक दिवस तरी राहावं असं वाटत होतं. पण मी गप्प बसले. खूप निराश वाटत होतं. सगळं सोडून द्यावंसं वाटत होतं. पण थोडक्यासाठी घाई नको. मे महिन्यांत परीक्षा झाल्यावर लग्न करायचं ठरवलंच होतं आम्ही.

लग्न झाल्यावर कुठं राहायचं याचा विचार चालला होता. 'तुझ्याबरोबर कुठंही राहायची माझी तयारी आहे' असं मी कळवलं त्याला. मी कुरकुर करणार नाहीं, कारण मीच ह्यात उडी घेतली होती, त्याला कसा दोष देऊ? जे नशिबात येईल ते भोगायला मी तयार होते. त्याची साथ आहे तोपर्यंत कोणत्याच त्रासाची जाणीव होणार नाही असं मला वाटायचं. "ठाण्याला, कार्ल्याला कुठेंही रहावं लागेल आणि नरेश मंत्री पण आमच्याबरोबर राहणार आहेत. त्याबद्दल तुझं मत काय?" असं मंगेशनं विचारलं होतं. मी त्याला कळवलं की, "नरेशसारख्या साधुपुरुषाच्या सहवासामुळें आपल्या आनंदांत, प्रतिक्षणीं भरच पडत जाईल. आयुष्यभर ते तुझ्याबरोबर राहणार आहेत ना? आपणही त्यांना कधींच अंतर देणार नाहीं. ह्या जगांत त्यांच्यासारखीं माणसं दुर्मिळ आहेत. सिगारेट जास्त ओढूं नकोस, छातींतल्या कळांसाठी औषध घे." असा सल्लाही दिला.

त्यानंतर ऑक्टोबर महिना आला. दिवाळी आली आणि माझा वाढदिवस पण आला. त्याबद्दल काकांनी, आईंनी मला आशीर्वाद लिहायला मंगेशला सांगितलं होतं आणि मंगेशनं,

'अशींच पुष्कळ वर्षं जगून माझ्याशीं भांड!' असं म्हटलं होतं. सिंधू फराळाला आली होती. "मी या दिवसांत एकच कविता लिहिली. बहुतेक दिवाळी अंकांतून माझ्या कविता आहेत, १०० रुपये तरी हातांत पडतील असं वाटतं. (तुला किती पाहिजेत त्यांतले?)

काल कुमूच्या घरीं पार्टी होती. पुढच्या वर्षीं तुला व मला आगाऊ आमंत्रण देऊन ठेवलं आहे. वाढदिवशीं माझी आठवण काढ.

असं लिहिलं होतं.

पुढच्याच महिन्यात त्याचं दुसरं पत्रं आलं. त्याआधी मी त्याला लिहिलं होतं:

माझी प्रकृती चांगली आहे. आणि मीं आनंदांत आहें. मला वाटतं, मुळांत माझा स्वभाव आनंदी आहे. आयुष्यांत त्रासाचे, दु:खाचे प्रसंग येतातच. त्या प्रसंगांना सर्व शक्तीनिशीं आणि बुद्धीनिशीं तोंड द्यायचं आणि त्यांतून मनानं बाहेर पडायचं, आणि पुन्हां आपल्या मूळ वृत्तीवर यायचं, सहजपणानं वागायचं, आनंदी राहायचं.

वास्तविक ह्या माझ्या आनंदात मंगेशनं भर घालायला पाहिजे होती. तसं न होता त्यानं लिहिलं की :

मीं सध्यां अत्यंत दु:खांत आहें, दुर्दैवानं माझ्या जीवनांत असा विचित्र क्षण आला आहे, कीं जणूं काय त्या एका क्षणावर माझं भवितव्य अवलंबून आहे. मी सारं सविस्तर लिहीत आहें.

तुला ठाऊकच आहे कीं, मध्यंतरी माझ्या छातींत कळा येत होत्या. तेव्हां एक डॉक्टर म्हणाले कीं, "व्यायाम करतांना शीर दुखावली असेल." दुसरे डॉक्टर म्हणाले, 'प्रकृती उत्तम आहे, गॅसेसमुळं असं होतं.' पण कळा थांबेनात. शेवटीं एका मोठ्या डॉक्टरकडे गेलों. ते म्हणाले, "मला प्लूरसी'चा संशय येतो. तुम्हीं एक्स रे काढून घ्या." आज फोटो काढला. उद्यां मिळेल. मग नक्की निर्णय घेतील.

आतां प्लूरसी म्हणजे काय तें सांगतों. या विकारांत हयगय झाली तर फुप्फुसांत पाणी होतं. आणि पांच वर्षांनीं टी०बी० होतो. वास्तविक प्लूरसीमधें खूप ताप येतो. मला ताप कधींच आला नाहीं. मी माझीं सगळीं कामं करीत होतों. फक्त व्यायाम घेत नव्हतों. तेव्हां डॉक्टर म्हणाले, "अत्यंत mild attack असूं शकेल." अर्थात् फोटो आला कीं सर्व काय तें कळेल. मग व्यवस्थित ट्रीटमेंट घेईन.

गेले तीन दिवस या shock मुळें मला झोप नाहीं. मीं इतका निराश झालों आहें कीं काहीं विचारूं नकोस. घरीं इतरांना विशेष वाटत नाही. त्यांचं म्हणणं, प्लूरसी पटकन बरी होते. मला मात्र कसला तरी विचित्र शॉक बसला आहे. समज, दुर्दैवानं भलतंच कांहींतरी होऊन, डॉक्टर म्हणाले कीं, "तुम्हाला टी०बी० होणार", तर मग काय? तूं लग्न करणार का माझ्याबरोबर? खरंच यशोदा, हें पत्र लिहितांना मन अगदीं निराश आहे. सगळ्या आशा, भवितव्याविषयींच्या आकांक्षा, काळाकुट्ट अंधार गिळून टाकीत आहे, असा मला भास होतो आहे. हें मीं कोणाला बोलून दाखवलं नाहीं. कारण साध्या गोष्टीचा बाऊ केला म्हणून हसतील. पण तुला लिहिलं. कारण आतां यापुढें माझ्या साऱ्या जीवनाची तूं श्रद्धा आहेस. माझें हृदय तूं ओळखतेसच. प्रीती ही स्वातंत्र्याशिवाय जगूं शकत नाहीं, अशी माझी श्रद्धा आहे, अर्थात् माझ्याशीं लग्न करायचं कीं नाहीं, याचा निर्णय घ्यायचं स्वातंत्र्य तुला आहे. मोठं विचित्र पत्र मीं लिहीत आहें. असं कांहींतरी लिहिलं तर तूं रागावशील असं वाटतं; पण धीर करून लिहिलं.

खरोखरींच या क्षणीं मला तुझ्या सहवासाची इतकी जरुरी आहे कीं विचारूं नकोस. काळजीनेंच मीं इतका बारीक झालों आहें. काल वजन केलं. १२६ पौंड होतं ते ११९ पौंड झालं. आठ पौंड कमी झालं. काय करूं? एकसारखे निराश विचार मनांत येतात. विचित्र स्वप्नं पडतात. रात्रीं झोपेंतच विचार येतो कीं माझी यशोदाही मला सोडणार काय? (मला याहून मरण पत्करेल.)

पुढच्या महिन्यांत, जर डॉक्टरांनीं परवानगी दिली असेल तर एकदोन दिवस पुण्याला येऊन जाईन. तुला भेटण्याची अनावर इच्छा झाली आहे. अशा वेळीं माझं मन केवढं हळवं होतं! जवळ असलों कीं तुझ्याशीं भांडतों, रागानें पत्र लिहितों, वाट्टेल तें करतों. पण नेहमीं तूं माझ्या हृदयांत असतेस. जरा बरं वाटेनासं झालं कीं,

तुला भेटण्यासाठीं वेडा होतों. तुझी आठवंण करीत बसतों. पत्र मिळालं कीं मला मोठ्ठं पत्र लिही. तुझा विचारही कळव.

ता०क० सध्यां माझ्या हातून लेखन मनासारखं होत आहे. 'कृष्णजन्म' नांवाची १३० ओळींची एक मोठ्ठी कविता मीं लिहिलीं. 'सत्यकथे'च्या खास अंकांत बहुतेक येईल. आणखीही दोन सुंदर कविता मीं लिहिल्या आणि खूप लिहिणार आहें.

काल संध्याकाळीं तुझं पत्र आलं. अंधार झाला होता. खिन्न होऊन मी बसलों होतों. तुझं पत्र वाचून खूप बरं वाटलं. बाहेरच्या पाकिटावर कोरी जागा होती. तिथें सहज गंमत म्हणून कांहीं ओळी लिहिल्या. खाजगी कविता. कुणाला दाखवायच्या नाहींत. मला हसतील लोक! वाच हं!

माझी सखी यशोदा माझ्यापरीस वेडी
गीतापरीच माझ्या आहे तिच्यांत गोडी
ही दूर राहुनीही माझ्या उरींच आहे
अन् माझिया व्यथांचें ती दुःख सर्व वाहे
नेत्रीं तिच्या बघे मीं सौंदर्य या उषेचें
अन् छंद ऐकतों मी स्पर्शांत अमृताचे
नैराश्य जेधवां ये मृत्यूपरी गिळाया
वैफल्य वा विषारी लागे उरीं जळाया
ज्योतीपरी मला ही मेघांपरी मला ही
वृष्टी करी जळाची अन् जाळिते तमां ही''

एक्स-रे रिपोर्ट मिळाल्यावर त्यानं मला दुसरं पत्र लिहिलं.

लहानसाच पॅच आहे. आणि औषधांनीं आणि विसाव्यानं तो बरा होऊन जाईल. काळजी करायचं काही कारण नाही, असं डॉक्टरांनीं सांगितलं.

तेव्हा त्याच्या मनावरचा ताण बराच कमी झाला. असं पत्रावरून वाटलं. तो चांगलाच घाबरला होता. त्याला वाटलं, टी०बी० होईल असं मला कळलं तर मी लग्न करत नाही असं म्हणेन. म्हणून माझ्याकडून काय उत्तर येतं याची तो सारखी वाट पाहत होता. त्याची दोन्ही पत्रं मला एकदमच मिळाली. त्यानंतरच मी उत्तर पाठवलं :

तुझीं दोन्हीं पत्रं मला एकदमच मिळालीं. आणि तेंच एका अर्थीं बरं झालं. पोस्टखात्याचा निष्काळजीपणा कांहीं वेळां फायद्याचाही होतो. तुझं पहिलं पत्र वाचून काय वाटलं म्हणून सांगूं? त्याचा परिणाम मनावर तर झालाच, पण शरीरावरही दिसून आला. पत्र वाचतां वाचतां माझे एकदम हातपाय थंड पडले. डोक्यांत फिरल्यासारखं होऊं लागलं. (एक्स-रे रिपोर्ट येण्याच्या आधी त्यानं असं पत्र लिहिलं नसतं तर बरं झालं असतं.

परीक्षा तीन चार महिन्यांवर आली असतानां तिकडून नुसते धक्क्यावर धक्के बसत होते.). पण दुसरं पत्र लगेच वाचलं म्हणून बरं झालं. मीं स्वत:ला सावरलं. नाहींतर काय झालं असतं सांगता येत नाहीं. चक्कर येऊन पडलेच असतें. पण तेव्हापासून माझी मन:स्थिती अगदीं बिघडली. अभ्यासाची भीती वाटत होती, तीच गेली. असं वाटतंय, कीं सगळं सोडून द्यावं आणि मुंबईला यावं.

काही सल्ले पण मी त्याला दिले :

माणसानं इतकं हळवं असून चालत नाहीं. आजार, रोग आहेत तशी त्यांवर औषधं, उपाय आहेत. सारखा आजाराचाच विचार करू नये, त्यामुळें वाईट कल्पना मनांत येतात. अस्वस्थ वाटतं, तरी याही अवस्थेंत तूं कविता लिहूं शकतोस याचं आश्चर्य वाटलं आणि आनंदही वाटला.

थोडे दिवस मुंबईबाहेर कोरड्या हवेत जाण्याचा सल्ला दिला. तसेच व्यायाम केल्यावर लगेच तो थंड पाण्यानं आंघोळ करायचा हे किती वाईट आहे, बळकट प्रकृतीच्या माणसाला पण ते सोसणार नाही–तेव्हां आतां यापुढं दुसऱ्यांचं पण जरा ऐकत जा–असं सांगितलं..

डॉक्टरांनी त्याला इतक्यात लग्न न करण्याचा सल्ला दिला होता. तसं असेल तर परीक्षा संपल्यावर नोकरी करण्याची माझी इच्छा होती. किती दिवसांपासून दिलरुबा शिकण्याची इच्छा पण राहून गेली होती. त्यानं लग्न जरा लांबणीवर टाकलं तर मी माझ्या ह्या इच्छा पूर्ण करून घेणार होते.

त्या सुमारास काका, काकू व सिंधू आमच्या घरी आले होते. सिंधूबरोबर त्यानं मला दहा रुपये पाठवले होते. ते तिनं दिले. काकांनी जाण्याची खूप घाई केली. त्यामुळं सिंधूशी जास्त वेळ बोलायला मिळालं नाही. काकांना–म्हणजे सिंधूच्या वडिलांना–माझ्याबद्दल सगळंच कळलं होतं. कारण ते सिंधूला म्हणाले की, "ताईबद्दल मीं काही बऱ्या गोष्टी ऐकत नाही. माझ्या मुलीनं असं केलं असतं तर, तिची खांडोळी केली असती मी." ह्या वाक्यावरून कळतं की माझ्या लग्नाला त्यांच्याकडूनही किती तीव्र विरोध होता.

मंगेशची इच्छा होती की, मी त्याच्यासाठी लोकरीचा स्वेटर विणावा आणि लगेच पाठवावा. म्हणून मी त्याच्या आईंना लिहिलं :

> सध्यां मला अजिबात वेळ मिळत नाहीं, माझी आई नोकरी करते. घरांत माझ्याशिवाय कोणीच नाहीं. राहिलेलं सर्वच काम मला करावं लागतं. कॉलेजला येण्याजाण्याचा फार त्रास होतो. परीक्षा जवळ आली आहे. फार थकवा वाटतो आहे. स्वेटर विणायला दोन महिने तरी लागतील. पण लगेच हवा असेल तर दुकानांतून विकत घेऊन त्याला द्या. त्यालाही तसं सांगितलं म्हणून त्याला माझा राग आला आहे. म्हणून त्यानं माझ्या पत्राला उत्तर लिहिलं नाहीं, तरी तुम्हीं त्याची समजूत घाला. त्याला प्लूरसी झाली म्हणून

स्वेटर हवा होता, तेव्हां तो लगेच विणून देण्याला महत्त्व होतं, तें मला कळतं. माझ्या मनांत असूनही सध्यां मला नाहीं म्हणावं लागत आहे.

माझा थोरला भाऊ आबा (विद्याधर) याचं लग्न ठरलं. नियोजित वधूचं नाव 'सुशीला'. ती सेंट अँड्र्यूज शाळेत एका वर्षासाठी हॉस्टेलमधे राहायला आली होती. ती माझ्याच वर्गात होती. पण आता शिक्षण सोडलं होतं. डिसेंबरमधे साखरपुडा आणि एप्रिल किंवा मेमधे लग्न होणार होतं. माझ्या अगोदर त्याचं लग्न व्हावं अशी आईची इच्छा होती. त्याच्या लग्नाची तिला फार काळजी लागली होती. तो तिचा लाडका मुलगा. आणि मोठा आधार होता. तिनं त्याला सांगितलं की, "ताई इथं आहे तोंपर्यंत अब्रूनिशीं लग्न करून घे." कारण मी लग्न करून गेल्यावर आमच्या सर्व घराण्याची अब्रू जाणार होती.

आई आणि आबा साखरपुड्यासाठी विजापूरला जाणार होते. मी आईला म्हणाले, "मी पण येतें तुझ्याबरोबर." तितक्यात मंगेशचं पत्र आलं. त्याच वेळी तो पुण्याला येणार होता. कॉलेजच्या गॅदरिंगच्या तारखा पण लागल्या होत्या. त्यामुळं आईबरोबर जाण्याचा बेत रद्द करावा लागला; पण आईची जाण्याची तारीख पुढं गेली. तेवढ्यात मंगेश येऊन भेटून गेला. गॅदरिंगसाठी न थांबता मी आईबरोबर गेले. आधी सोलापूरला आबाच्या घरी गेलो. नंतर आम्ही तिघं विजापूरला गेलो. सर्व समारंभ व्यवस्थित पार पडला. आम्ही दोघी परत येरवड्याला परतलो.

प्रवासात आईनं पुन्हा विचारलं, "लग्नाचं काय ठरवलंस?" मी सांगितलं, "अजून नक्की नाही." माझ्या परीक्षेला चारच महिने राहिले होते. ज्यूनियरचा, सिनियरचा दोन्ही वर्षांचा अभ्यास पुन्हा करायचा होता. अशा वेळी वेळी लग्नाचा विषय वाढवून आईचं डोकं भडकवायचं नव्हतं. करायचं ते करणारच होते. मग आतापासून बडबड आणि चिडचिड ऐकून मन अस्वस्थ कशाला करून घ्यायचं, असा विचार मी केला होता. मंगेशनं विचारल्यावर त्याला पण मी तेच सांगितलं; पण त्याला ते आवडलं नाही. पत्रातून मला चांगलाच दम देण्याचा प्रयत्न त्यानं केला :

> मी तुला सांगितलं त्याप्रमाणें वाग. आईला चक्क सांगून टाक कीं, 'मे महिन्यांत लग्न करून टाकण्याचा आमचा बेत आहे,' आतां लाड पुरे. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे, यापुढें माझ्या बाबतींत जरासुद्धां खोटं बोलूं नकोस. या वेळीं आईला खोटं सांगितलंस, त्यामुळें मला फार दु:ख झालं. आपलं प्रेम ही काय इतकी क्षुद्र गोष्ट आहे कीं त्या प्रेमामुळें तुला असत्याचा आश्रय घ्यावा लागावा? असत्य बोलून का तूं तुझ्या पतीवरचं प्रेम व्यक्त करणार? असत्य आणि भीती जिथें आहे तिथें प्रेम कधींच राहूं शकत नाहीं. या असल्या गोष्टींनी तुझं व्यक्तित्व डागाळूं लागलं, तर तुझ्या सहवासांत माझ्या व्यक्तित्वाचा विकास कसा होणार? नुसतीं दोन शरीरं म्हणून आपल्याला जगायचं नाही हें विसरूं नकोस. तुझी सत्यनिष्ठा ही माझ्यावरच्या निष्ठेइतकीच सखोल असू दे. सत्याचा आश्रय आपण सोडला नाहीं तोंपर्यंत परमेश्वर आपल्या पाठीशीं उभा

आहे. माझा (आणि तुझा) भविष्यकाल अत्यंत तेजस्वी आणि महान आहे. त्यावर श्रद्धा ठेवून वाग.

अभ्यास नीट कर. कॉलेजांत रेल्वेच्या रुळावरून जाऊं नकोस. जरा लांब पडलं म्हणून कांहीं पाय मोडत नाहींत. आता पुरें करतो. तुझ्या अभ्यासांत व्यत्यय नको.

ह्या सत्यवादीचं पुन्हा पुन्हा सत्यावरचं व्याख्यान वाचून मला तेव्हा काय वाटलं होतं ते ठाऊक नाही. माझ्या भूमिकेत शिरून माझं दु:ख, माझी अडचण समजून घेण्याची कुवत त्याच्यात त्या वेळी नसावी. आई केव्हा चिडेल आणि काय बोलेल याचा नेम राहिला नव्हता.

गेल्या वेळेस मंगेश पुण्यात आला होता तेव्हा मी तिला सांगितलं होतं की, मी मंगेशला भेटायला जाणार आहे. मी अंघोळ करून आले आणि बाहेर साडी नेसत होते, इतक्यात ती आली. मला बघताच इतकी चिडली आणि ओरडत माझ्याजवळ आली आणि तिनं फाड्कन माझ्या गालावर थप्पड मारली. (ही थप्पड हिंदी सिनेमातली खोटी थप्पड नव्हती. अगदी खरी खरी पाच बोटं उठवणारी आणि अनपेक्षित होती.) आणि मी नेसत असलेली साडी माझ्या हातातून ओढून घेतली. "साडी देणार नाही." म्हणाली. मी भयंकर घाबरले. काय करू, काय बोलू ते कळेना. मनाला मोठा धक्का बसला. नशिबानं माझा भाऊ विजयानंद घरात होता. तो आला त्यानं आईला आवरलं, शांत केलं. तिची समजूत घातली.

मला पण शहाणपणानं वागण्याचा सल्ला दिला. "भेटायला जातेस पण आपली मर्यादा सोडूं नकोस. चुकीचं वागूं नकोस." असं सांगून मग मला जायची परवानगी दिली.

परीक्षा होईपर्यंत मला ह्या घरात दिवस काढायचे होते. अभ्यास करून पास व्हायचं होतं. त्यासाठी मन शांत ठेवून, वाद वाढवायचे नव्हते. ती दुसरी स्थळं माझ्यासाठी पाहत नव्हती. मनातून समजून होती. खरं तर, माझ्यासाठी उपवर मुलांच्या मागण्या येऊ लागल्या होत्या.

तेव्हा रोज उठून मी जाणार, मी जाणार आहे हे सांगून तिला मनस्ताप देण्याची मला जरूर वाटत नव्हती. काही झालं तरी ती माझी आई होती. आणि ती सांगत होती ते चुकीचं नव्हतंच मुळी. मी तिला कधीच दोष दिला नाही. देणार नाही. तिला कमीतकमी त्रास होईल याची मला काळजी घ्यावी लागत होती.

त्याच वर्षी पुणे युनिव्हर्सिटी स्थापन झाली. आणि मुंबई युनिव्हर्सिटीचा एकही सेंटर पुण्यात ठेवला गेला नाही. अचानक झालेल्या या बदलानं आम्ही मुली गडबडून गेलो. आमचं सगळं शिक्षण ज्या युनिव्हर्सिटीत झालं त्याच युनिव्हर्सिटीची डिग्री आम्हांला हवी होती. नव्याची खात्री वाटेना. आम्ही चौकशी करायला सुरुवात केली. तेव्हा आम्हांला सांगितलं गेलं की, 'तुम्ही जिथे मुंबई सेंटर आहे तिथे अर्ज करा.

म्हणजे मुंबई, बेळगाव वगैरे आणि तिकडे जाऊन परीक्षा द्या.' मुंबईत आमची पाच-सहा मुलींची राहण्याची व्यवस्था होणं कठीण होतं. म्हणून बेळगावला जायचं ठरवलं. कारण प्रभा लाटकरची मावशी बेळगावला राहत होती. तिनं आमची राहण्याची व्यवस्था 'राणी पार्वतीदेवी कॉलेज'च्या मुलींच्या हॉस्टेलमधे केली.

त्यामुळं सर्व जणी खुषीत होत्या. मी मात्र मनातून खंतावले. कारण बेळगावला जायचं म्हणजे येता-जाता आगगाडीच्या तिकिटाचा खर्च. शिवाय होस्टेलमधे राहण्याचा, जेवणाचा खर्च हा मला व माझ्या आईला झेपण्यासारखा नव्हता. नाइलाजानं मी तयार झाले. एकटीनं इथं राहून पुणे युनिव्हर्सिटीची परीक्षा द्यावी, हे पण मनाला पटेना. म्हणून, प्रभा लाटकर, मंदा पाटोळे, मंगला बोरकर आणि काही मुली व मी असं सर्वांनी जाण्याचं नक्की केलं.

मंगेशचं छातीत कळा येणं चालूच होतं. तो पुन्हा डॉक्टरांकडं जात नव्हता. त्याला कोणी उपाध्याय नावाचे एक वृद्ध गृहस्थ भेटले. त्याच्या मते ते अत्यंत विद्वान माणूस आहेत. त्यांचा अजमेरला एक आश्रम आहे. त्याचं नाव 'गांधी आश्रम'. त्या आश्रमात जाऊन चार-पाचच महिने, 'गांधीवाद' व 'समाजवाद' यांचा चांगला अभ्यास करावा. पुढच्या काव्यजीवनाला ही साधना अत्यंत उपयोगी पडेल. असं कळवून त्यानं पत्रात म्हटलं होतं :

> ईश्वराच्या कृपेनं बेत जमला तर मला अत्यंत आनंद होईल. कारण अभ्यास आणि अनुभव यांच्याद्वारें मला माझ्या प्रतिभेचा जास्तीत जास्त विकास करून घेतां येईल. सर्व तऱ्हेचे प्रयत्न व साधना मला केलीच पाहिजे.
>
> गेले दोन दिवस माझ्या डोक्यांत कविता घोळत होती. ती थोड्या वेळापूर्वीं पूर्ण केली. आणि लगेच बाईसाहेबांना पत्र लिहायला बसलों. तुझी प्रिलीम केव्हा संपणार? तुला भेटण्याची फार इच्छा आहे. केव्हां येऊं तें कळव. बोरकरांकडे जाऊन त्यांच्याकडून पैसे मागून घे. त्यांचे मी नंतर देईन, आणि आतां नीट अभ्यास कर. चांगले मार्क मिळवून पास हो. आणि मी येऊन गेलों कीं, डिग्री परीक्षेचा अभ्यास कर.
>
> काल सिंधू व शकू माझ्या घरीं आल्या होत्या. शकूनं आपलं लग्न ठरवलं. प्रेमविवाह–मुलगा पुण्याचाच आहे. चांगला श्रीमंत आहे. सुखी होईल.
>
> तुझी इच्छा असती तर तूंसुद्धा एकादा श्रीमंत नवरा गाठूं शकली असतील. माझ्यासारखा एक गरीब बिचारा कवि कां शोधून काढलास? आतां तुला पश्चात्ताप होत असेल नाहीं? तुला हवी असलेली लाल लाल मोटार कांहीं मीं देणार नाहीं.

त्या पत्राच्या उत्तरात त्याला मी १४.१.५०ला येरवड्याहून लिहिलं की :

> शकूविषयीं ऐकून खरंच फार आनंद वाटला. तिला श्रीमंत नवरा मिळाला म्हणून तूं श्रीमंत व्हावंस असं वाटत नाहीं. एवढं मात्र खरं कीं तुझ्याशिवाय दुसरा कोणी पसंत करायचा असता तर मी त्यांतल्या त्यांत पैसेवालाच पाहिला असता. पण तुझ्यापुढे मला

पैशांची किंमत वाटत नाहीं. आणि अगदीं कांहीं नाहीं म्हटलं तरी तुला आपल्या पोटापुरते पैसे मिळवावेच लागतील. मे महिन्यांत लग्न करायचं म्हटलं तर, आतां कांहीं जास्त दिवस नाहींत. तेव्हां आतां नोकरीविषयीं विचार करायला हरकत नाहीं. किंवा दुसरा कांहीं उद्योग करायचा तुझ्या मनांत असेल तर त्याची खटपट कर. कारण लग्न झाल्यानंतर तुला घरांत बसून रहातां येणार नाहीं.

शेती करायचं खरंच का मनांत आहे तुझ्या? मग काकांना तसं सांग. ते कांहींतरी व्यवस्था करतील. पण आतां हें रिकामं बसणं बरं दिसत नाहीं. शिकत असतास तर गोष्ट वेगळी. काका, आई चांगले आहेत आणि त्यांना अजून तुझ्या कमाईची गरज भासत नाहीं, म्हणून ते कांहीं बोलत नाहींत; पण आपण तें समजून घ्यायला पाहिजे. हो ना?

परवां आईनं मला ९० रु. दिले. मी कॉलेजची सर्व फी भरून टाकली. आतां पुढच्या महिन्यांत फॉर्मचे तेवढे ५० रुपये द्यावे लागतील, की संपला माझा शिक्षणाचा खर्च. एवढंही करून पास झालें तर बरं आहे. नाहींतर सगळंच व्यर्थ जाणार.

तूं दिवसभर घरीं काय करतोस? वाचन चालूं आहे, का नुसत्याच झोपा काढतोस दुपारीं? तुला झोप लागायला तर वेळच लागत नाहीं. बोरकरांच्या इथं मीं तुझ्या बाजूला बसलें असून आपण खुशाल झोपून गेलास ना? तुला बरं वाटत नव्हतं म्हणून मी कांहीं बोललें नाहीं. आतां मात्र तसं चालणार नाहीं. लवकर नोकरीच्या खटपटीला लाग, आणि वाचन सोडूं नकोस. परवां बोरकरांच्या आई विचारीत होत्या मला, 'तूं पुढें काय करणार आहेस म्हणून.' मीं सांगितलं कीं, "तूं नोकरी किंवा शेती कांहीतरी करणार आहेस. घरात बसून खाणार नाहीं."

आतां रात्रींचे १०।। वाजून गेलेत. आज मी एस०पी० कॉलेजला जाऊन आलें. आतां मला झोप येऊं लागली आहे. इकडे अजूनही पुष्कळ थंडी आहे, त्यामुळं पहाटें अभ्यासाला उठवत नाहीं. आणि रात्रींपण केव्हां एकदां अंगावर पांघरूण घेऊन झोपतें असं होतं.

माझ्यातली गृहिणी जागी व्हायला लागली होती. संसारी स्त्री, त्याला प्रेमानं समजावून मार्गावर आणायचा प्रयत्न करत होती. आई-वडिलांनी लाडानं सर्व चालू दिलं तरी लग्नानंतर मला ते चालणार नव्हतं. कविता लिहून संसार होणार नाही. दोघांनीही घरात बसून नुसतं खाणं मला नामुष्कीचं वाटत होतं.

त्याच्या छातीत कळा येतच होत्या. प्रत्येक पत्रात तो मला लिहीत होता. पाच महिने झाले तरी दुखणं थांबत नाही. तेव्हा मला पुन्हा त्याची काळजी वाटायला लागली. वीस दिवसांत बरं वाटेल असं डॉक्टर म्हणाले होते. 'आता तर वीस महिने झाले. पुन्हा एक्स-रे काढून घे. दुर्लक्ष करू नको' असा मी सल्ला दिला. आधी मला वाटलं की, त्याला आता बरं वाटतं आहे, म्हणून मी त्याला झोपा न काढता

नोकरीधंद्याचा विचार करायला सांगितलं होतं. मधेच नेचर-क्युअर म्हणून त्यानं तीन दिवस उपास केला होता. त्यामुळं अशक्तपणा येऊन आजार वाढायला वेळ लागणार नाही, असं मी कळवलं, 'मी पुण्याला कधी येऊं? असं त्यानं विचारलं होतं. त्याला मी कळवलं की :

माझी प्रिलीम १ ते ४ तारखेपर्यंत आहे. पाच तारखेला आम्हीं बहुतेक ट्रीपला जाऊं. ६ तारखेला मी घरांत बसून थोडा विसावा घेईन. मग ७ नंतर केव्हांही तुला जमेल तेव्हां ये. थंडी बरीच कमी झाली आहे. तरी तुला ती जास्तच वाटेल, म्हणून स्वेटर, पांघरूण वगैरे घेऊन ये. मी बोरकरांकडून पांच रुपये घेतले. म्हणजे, मी मागायच्या आधींच त्यांनीं काढून दिले, त्या पैशांतून लागणारं एक पुस्तक घेऊन टाकलं. बोरकरांना मुलगी झाली. आतां मुलगा व्हावा असं मला वाटत होतं, पण झालं तुझ्याच मनासारखं.

'मन चिंती तें वैरी न चिंती.' मंगेश माझं ऐकत नाही. म्हणून मी प्रभूला पत्र लिहून कळवलं की :

त्याची प्रकृती चांगली नाहीं, त्याला पुन्हा डॉक्टरला दाखवून घे. २५ रु० खर्च होतील म्हणून तो एक्स रे काढून घेत नाहीं. तेव्हां आतां तूंच काय तें बघ.

आता मात्र अभ्यासाला लागणं भागच होतं. थंडी बरीच होती. आमच्या व्हरांड्याला लाकडी चौकटी होत्या. आतल्या खोलीत सर्व जण झोपायचे म्हणून मला व्हरांड्यातच बसून अभ्यास करावा लागायचा. इलेक्ट्रिसिटी आलेली नव्हती. त्यामुळं लहानसा घासलेटचा दिवा घेत होते. लाकडी उघड्या चौकड्यांतून थंडी आत येत असे. रात्र वाढत जाई तशी थंडी पण वाढे. त्यामुळं मला जोरदार सर्दी झाली. अभ्यासाला लागले की काही ना काही विघ्न यायलाच पाहिजे. किंवा मनस्ताप होईल अशा घटना घडायलाच पाहिजेत असं होत होतं.

त्यातच रात्री १२ वाजता अचानक डोक्यापासून भयंकर खाज उठली आणि सर्व शरीरभर पसरली. सगळ्या अंगावर, डोक्यात पित्त उठलं. अगदी वेड्याची अवस्था झाली. डॉक्टर आमच्या शेजारीच राहायचे. आई लगेच त्यांच्या घरी गेली आणि त्यांना घेऊन आली. त्यांनीं एक इंजेक्शन दिलं. थोड्या वेळानं खाज कमी झाली. पण सर्व शरीरावर सूज यावी तसं पित्त उठलं. थोडा ताप आला. भयंकर थकवा आला. दोन दिवस झाले तरी हातावरची सूज जाईना. फॉर्म भरायची शेवटची तारीख होती, म्हणून तशीच उठून कॉलेजमधे गेले. फॉर्म भरून परत आले. मंगेशला मी कळवलं होतं की, परीक्षेसाठी मी बेळगावला जाणार आहे. कारण प्रभा लाटकरची मावशी व मंदाची मामी बेळगावला राहतात.

शिवाय मंगेशला मी असंही लिहिलं होतं की, त्याची प्रकृती पूर्ण बरी झाल्याशिवाय आपण लग्न करायचं नाही. तेव्हा आतापासून काळजी घेण्याचा सल्ला दिला होता.

डॉक्टर सांगतील तेव्हाच लग्न करायचं ठरवलं होतं.

दुपारी जेवण झाल्यावर रोज झोपायची सवय त्याला लागली होती. मी त्याला ३.३.५०ला लिहिलं की :

हल्ली दुपारी काय करतोस? का अजूनही झोपाच काढतोस? आतां घे दुपारी झोपून. पण लग्न झाल्यावर, मी तुला बिलकुल दुपारीं झोपूं देणार नाहीं. ११ ते ५ लायब्ररींत कां जात नाहींस? किंवा घरीं पुस्तकं आणून वाचीत जा. वाचन सोडूं नकोस. आणि आळस करूं नकोस. आळसानं बुद्धि मंद होते म्हणतात.

बरं, नोकरीविषयीं तुझं मत काय, तें तूं सांगितलंच नाहींस. नोकरी करायची नाहीं असंच का मनात आहे तुझ्या? मग करणार तरी काय? दोघांनींही घरांत बसून खायचं का? तुझ्या मनांत काय आहे तें तूं मला कधींच कां सांगत नाहींस? तुझ्यानं नोकरी होईल असं मला वाटत नाहीं. म्हणून म्हणतें, शेतीचं तरी जमतं का पहा.

आता परीक्षेनंतरच आपली भेट होईल. नंतर पत्र कुठल्या पत्त्यावर पाठवशील मला? खरंच, मला तर काही समजेनासं झालं आहे,

पंधराच दिवसांनी मला त्याला दुसरं पत्र लिहावं लागलं. कारण परीक्षा होण्याच्या आधीच मला एक वर्षासाठी, एक नोकरी, घरी चालत आली होती. जूनपासून रुजू व्हायचं होतं. त्याला विचारल्याशिवाय मला 'हो' म्हणता येईना. वाडिया कॉलेजमधून मी १६.३.५०ला लिहिलं :

पुण्यांत मिशनचं मुलींचं ट्रेनिंग कॉलेज आहे. त्याच्या प्रिन्सिपॉल मिस् गॉर्डन आहेत. त्या आईला फार चांगल्या ओळखतात आणि मदत करायचा प्रयत्न करतात. त्यांचा मला आजच निरोप आला आहे कीं, 'परीक्षा झाल्यावर दुसरं कांहीं करण्याचा विचार नसला तर, जूनपासून ट्रेनिंगच्या पहिल्या वर्षाला शिकवायला ये.' हें काम फक्त एक वर्षापुरतं आहे. त्यांनी मला लवकर भेटायला बोलावलं आहे.

काय करावं तें मला समजत नाहीं. कारण एकदां नोकरी धरली कीं मधें काम सोडतां येणार नाहीं. मी मधेंच गेलें तर उरलेल्या महिन्यांसाठीं त्यांना दुसरी शिक्षिका शोधावी लागेल. ह्या मिशनरी बाया कांहीं बाबतींत फार कडक असतात. आणि एक वर्ष थांबण्याची तुझी तयारी नाहीं. एका दृष्टीनं आपण एक वर्ष थांबायला कांहीं हरकत नाहीं. तोंपर्यंत तुझी प्रकृती चांगली सुधारेल. आपल्या रहाण्याच्या जागेची व्यवस्था होईल. मला घरांत रहाणं दिवसेंदिवस कठीण होत चाललं आहे. नोकरी धरली तर मला होस्टेलमधें रहायला लागेल. जेवणखाण सर्व सोय होईल. पत्रव्यवहार चालूं ठेवतां येईल. व माझ्या मागचा ससेमिरा चुकेल. तुझ्या घरीं मी आतांच आलें तर जो त्रास होईल तो पण चुकेल.

या पत्राला मंगेशचं उत्तर आलं. त्याला मी लिहिलं :

तू 'कर' नोकरी असं जरी लिहिलं असलंस तरी एकंदरीत तुझी इच्छा नाहीं, असंच तुझ्या पत्रावरून वाटतं. तेव्हां आतां मी 'नाहीं' म्हणूनच कळवतें.

तसं मी कळवलं. पण मनातून मला फार वाईट वाटलं. स्वतंत्र राहण्याची, आपल्या पायांवर उभं राहण्याची, पैसे मिळवण्याची पहिलीच संधी मी घालवली. आणि घाईनं लग्न करून, येणाऱ्या अनंत अडचणी मला तक्रार न करता सोशीत राहाव्या लागल्या. त्याला थोड्या प्रमाणात मीच जबाबदार होते का? मंगेशचा 'कर नोकरी' हा शब्द खरा मानून मी नोकरीला गेले असते, तर मंगेशनं ते खपवून घेतलं असतं का नाही? काहीच सांगता येत नाही. मनातून त्याला तसं व्हायला नको होतं हे मी समजून होते. पण आता वाटतं, मी तसा एक प्रयत्न करून बघायला पाहिजे होता.

त्यानंतर त्याची दोन पत्रं आली. पहिल्या पत्रात त्यानं पुन्हा हेच सांगितलं की :

"आईला आतांच सांगून ठेव. परीक्षेनंतर मी जाणार आहे आणि लग्न करणार आहे."

तो माझी मन:स्थिती आणि परिस्थिती समजून घ्यायलाच तयार नव्हता. त्यामुळं मला त्याला निक्षून सांगावं लागलं की :

लग्नाविषयीं मी आईजवळ इतक्यांत कांहीं एक बोलणार नाहीं. कारण माझ्या परीक्षेला आता १५ दिवससुद्धां राहिले नाहींत. घरांत पुन्हां गडबड होईल आणि माझं अभ्यासांत लक्ष लागणार नाहीं. परीक्षा झाल्यावर (नोकरी न केल्यास) पुढं काय करायचं, हा प्रश्न आपोआपच निघेल. आबाच्या लग्नांत माझे काका इकडे आल्यावर आईजवळ माझ्याविषयीं बोलतील, तेव्हां मी स्पष्ट सांगेन. आतां बोलून मलाच त्याचा त्रास होईल.

बरं, तूं नोकरी करणार नाहींस तर, आपल्याला वेगळं रहातां येणार नाहीं.

दुसऱ्या पत्रावरून तूं माझ्यावर रागावला आहेस असं वाटतं. एवढा मूड कशानं गेला तुझा? माझ्या नोकरीबद्दल तुझ्या मनांत काय आहे? तें तूं लिहिलंच नाहींस. पण मीं तें ओळखलं. मीं नोकरी करूं नये अशीच तुझी इच्छा आहे ना? मग तसं मी आईला सांगतें. पण लग्नाविषयीं मात्र इतक्यांत कांहीं बोलणार नाहीं. परीक्षा झाल्यावर होऊ दे किती गडबड व्हायची तेव्हढी. गेल्या वेळेस तिनं मला नुसतं हातानंच मारलं होतं. आतां फार तर काठीनं मारील किंवा कांहीं फेकून मारील. ते तुझ्यासाठीं सहन करायची माझी तयारी आहे. आणि तूंच जर रागावलास, तर मी काय करावं?

तुला काय वाटतं ते तूं स्पष्ट कां लिहीत नाहींस? माझी इच्छा आहे नोकरी करायची आणि माझं मन मोडूं नये, म्हणून आपलं 'कर' म्हणून सांगितलंस ना? असं कां केलंस?

गेल्या वेळेला दिलेले पांच रुपये कसे खर्च झाले बघ : बोरकरांच्याकडं तूं आठ

दिवस होतास. तेव्हां मला रोज चार आणे बसला द्यावे लागत. ते झाले २ रुपये. नंतर मी थंडी फार होती म्हणून एक 'स्नो'ची बाटली घेतली. तो १ रुपया. मंदा, प्रभा आणि मी मिळून चहा घेतला, तो एक रुपया. आपण दोघांनी मिळून चहा घेतला. आठवतो ना? ते आठ आणे. आणि आठ आणे कॉलेजला येतांना बसलाच खर्च झाले.''

आणि शेवटी लिहिलं की :

पत्र पुष्कळच लांबलं. माझा वेळ पण फार गेला. पण ह्या प्रश्नाचा एकदां निकाल करून टाकायचा असं मीं ठरवलं होतं. वेळ गेला तरी चालेल.

मंगेशचं पत्र आलं पण अभ्यास आणि बेळगावला जाण्याची तयारी या गडबडीतच त्याला बेळगावच्या कार्यक्रमाची सर्व माहिती हवी होती. ती लिहायला उशीर झाला. त्याला कळवलं की :

१ तारखेला (मार्च १९५०) रात्री १०।।च्या गाडीनं इथून निघणार आहोंत. माझी परीक्षा ६ ता०पासून सुरूं आहे. मुख्य गोष्ट म्हणजे, आम्हीं सर्व जणी हॉस्टेलमधेंच उतरणार आहोंत. परीक्षा आहे 'लिंगराज कॉलेज'मधे. पण तिथं हॉस्टेल नाहीं, म्हणून 'राणी पार्वतीदेवी (R०P०D०) कॉलेजच्या Ladies' Hostel मधें उतरणार आहोंत. आमची परीक्षा १८ तारखेला संपते. ६ तारखेला पहिलाच पेपर संस्कृतचा आहे. प्रोफेसर सुरूंनीं वर्गांत अभ्यास पुरा केला नव्हता. कितीतरी भाग मला स्वत:लाच घरीं करावा लागला. संस्कृतच्या अभ्यासासाठीं मीं रोज पहाटे चारला उठत होतें. पाहूं या आता काय होतं तें. मला फार भीती वाटते आहे.

आम्ही कन्सेशन काढलं आहे. म्हणून आम्हांला सेकंड क्लासमधें बसता येईल व गाडींत अभ्यास पण करता येईल.

एकंदरींत मला पुष्कळ जास्त खर्च होईल. नाइलाजानं आईला पैसे द्यावे लागतील. पण आतां मला तिच्याकडून पैसे घ्यावेसे वाटत नाहींत. नुसते गाडीखर्चापुरते पैसे तिच्याकडून घेईन. बाकीचे पैसे म्हणजे हॉस्टेलचे १२ रुपये, जेवणाचे २५ रुपये, दुपारचा चहा, रोजचा बसचा खर्च, आणि दूध घेतल्यास तें वेगळं. तुला पाठवतां येतील का एकदम इतके पैसे? शक्य असेल तर दोन तारखेनंतर पाठव. मग मी आईला तिकडून कळवीन कीं तूं पैसे पाठवूं नकोस. मी मंगेशकडून पैसे मागवले आहेत. तुला हा बेत कसा वाटतो? शक्य असेल तर दोन तारखेनंतर पैसे पाठव. तिकडचा पत्ता देते.

तुमच्या आजीबाई (आईच्या आई). त्यांना चालेल का मी तिथं येऊन राहिले तर? (कडक सोवळ्यामुळं)

इंडस्ट्रियल स्कूलवरून आणखी पुढं गेलं की, मोठा तुरुंग आणि मेंटल हॉस्पिटल लागतं. तिकडं शेलार नावाचं एक मोठं कुटुंब राहत होतं. त्यांच्याकडं पुष्कळ गाई

आणि म्हशी होत्या. मेंटल हॉस्पिटलला आणि सेंट्रल जेलला दूध पुरवण्याचं कॉन्ट्रॅक्ट त्यांच्याकडं होतं. त्यांतले दोन भाऊ आमच्या ओळखीचे होते. मोठा भाऊ आमच्या आबाचा मित्र. तो पोलीस इन्स्पेक्टर होता. धाकटा भाऊ माझ्या आधी वाडिया कॉलेजमधून बी०ए० झाला होता. नंतर तो लॉ कॉलेजला (LL०B०) करत होता. तरी वाडियाला त्याची ये-जा चालू असायची. त्याची माझी ओळख झालेली होती. ते दोघं भाऊ कधी तरी आमच्या घरी यायचे. ते पैसेवाले लोक होते. त्यांची त्या काळात गाडी पण होती. त्यांतला धाकटा भाऊ मला म्हणाला की, "तुझ्याजवळ सामान आहे तेव्हां मी रात्री गाडी घेऊन येतो, तुला रात्री स्टेशनवर सोडायला." मी आईला विचारलं. तिला कांहीं त्यात गैर वाटलं नाही. कारण सोबत जायला माझे भाऊ घरात नव्हते. ती म्हणाली, "येत असेल तर येऊ दे. जा त्याच्याचबरोबर." सांगितल्यानंतर तो रात्री आला. माझं सामान गाडीत घातलं आणि मला नीटपणं स्टेशनवर घेऊन गेला. वर्गातली इतर मुलं पण आम्हांला गुडबाय करायला आली होती.

ऐन वेळेस आम्हांला कन्सेशन वेळेवर मिळालं नाही. कन्सेशन नाही तर आम्हांला थर्ड क्लासमधे बसावं लागलं असतं. बाकीच्या सर्व मुलींजवळ पैसे होते. सर्वांनी सेकंड क्लासची तिकिटं काढून जायचं ठरवलं. मी अतिशय घाबरले आणि गडबडून गेले. मला एकटीलाच आता थर्ड क्लासच्या डब्यात बसून रात्रीचा प्रवास करावा लागेल. सगळ्यांनी त्यांची तिकिटं काढून आणली. मी तशीच बसून होते. काय करावं कळत नव्हतं. तितक्यात ही गोष्ट शेलारच्या लक्षात आली. तो माझ्याकडं आला. मी त्याला सांगितलं, "माझ्याजवळ ह्याच्यापेक्षा जास्त पैसे नाहींत, मला थर्डक्लासमधे बसवून दे." तो म्हणाला, "तसं करू नकोस. तू इथंच थांब, मी तुझी सगळी नीट व्यवस्था करून देतो." तो गेला आणि माझ्या पैशांत त्यानं स्वत:चे पैसे घालून मला पण सेकंड क्लासचं तिकीट आणून दिलं. माझ्या वर्गमैत्रिणींच्यासुद्धा माझी अडचण लक्षात आली नाही, ती त्याच्या लक्षात आली, आणि निरपेक्ष बुद्धीनं त्यानं मला मदत केली ती मी कधीच विसरले नाही.

अशा रीतीनं आमचा प्रवास सुखरूप पार पडला व आम्ही बेळगावला जाऊन पोचलो. लेडीज हॉस्टेलवर गेलो. मला एका अनोळखी मुलीबरोबर खोलीत राहायला लागलं. मंगेशशी सतत संपर्क साधून होते. त्याच दिवशी त्याला पत्र लिहिलं :

> सकाळी १०।।ला सुखरूप पोहोंचलों. आल्याबरोबर जाऊन नंबर पाहून आलों. माझा नंबर १६६६ असा लक्षांत राहण्यासारखा आहे. नंबर आला तें कॉलेज इथून लांब आहे. मनीऑर्डर हॉस्टेलवरच पाठव. नरेंद्र घोरपडे इथेंच आहेत. ते आम्हांला कोणत्याच गोष्टीची अडचण पडूं देत नाहींत. जेवणाची व्यवस्था चांगली आहे. परीक्षा दोन दिवसांवर आली. माझी प्रकृती चांगली आहे. तुझी पण तशीच असेल अशी आशा आहे.

'दुष्काळात तेरावा महिना' अशी अवस्था एका संध्याकाळी झाली. सहा वाजता पेपर संपला की, आम्ही सर्व जणी व आमचे मित्र, चहा घ्यायला हॉटेलात जात होतो. मग

रमतगमत हॉस्टेलवर येऊन पुन्हा फाटकातच थांबून गप्पा मारत होतो. कारण मुलींच्या हॉस्टेलमधे पुरुषांना यायला बंदी होती. मग आत येऊन पुन्हा नित्यक्रमाला लागत होतो. एकदा असेच चहा प्यायला गेलो होतो. चहा आला. मी माझं पैशांचं पाकीट टेबलावर उजव्या हाताकडं ठेवलं होतं. माझं लक्ष नसताना आमच्या एका मित्रानं पटकन माझं पाकीट उचललं. मला क्षणभर भयंकर धक्का बसला. माझं पाकीट ह्यानं का नेलं? बघते तर त्यानं कौंटरवर जाऊन, सर्वांचं बिल माझ्या पैशांतून दिलं. आणि पाकीट आणून माझ्याजवळ दिलं. एक शब्दही न बोलता, काहीच झालं नाही असं भासवून मी जागेवरून उठले आणि परत आले.

आधीच पैशांची चणचण. अगदी दोन-चार आणेसुद्धा विचार केल्याशिवाय खर्च करत नव्हते. त्यात मंगेशनं पैसे पाठवले. पण पत्रात शेवटी लिहिलं होतं की "पैसे जपून खर्च कर. उरवता आले तर उरव, म्हणजे पुण्याला आल्यावर हॉटेलचं बिल द्यायला माझ्या कामाला येतील."

मी मंगेशला नोकरी कर म्हणून सांगितलं होतं. तेव्हा त्यानं मला स्पष्ट 'नाही' म्हणून सांगितलं होतं. पण आताच्या सत्रात मी नोकरीसाठी अर्ज केलाय असं कळवलं. आम्ही लग्न झाल्यावर कुठं राहायचं हा विचार त्यांच्या घरात चालू होता. मी त्याला कळवलं की, "सध्यां मी ह्या कुठल्याच गोष्टींचा विचार करूं नये, कारण अभ्यासावरून लक्ष उडायला एवढं कारण पण पुरे होतं."

त्यानं पाठवलेले ५० रुपये मनिऑर्डरनं आले. मी त्याला लिहिलं होतं की ५० रुपये पुरणार नाहीत म्हणून तो नंतर आणखी ३० रुपये पाठवणार होता. त्याची प्रकृती आता बरीच सुधारली होती. सकाळी उठून व्यायामशाळेत जाऊन त्यानं व्यायाम सुरू केला होता. वजन १३२ पौंड झालं होतं.

माझी परीक्षा संपली की त्याच वेळी तो पुण्यात येऊन राहणार होता. मला पाठवण्यासाठी ८० रुपये आईकडून उसने घेतले होते. त्यानं लिहिलं :

> मी ते फेडणार आहे, त्यासाठीं मीं रेडिओ-नाटिका लिहायला घेतल्या आहेत. तीन नाटिका लिहून झाल्या तर प्रयोगाचे मला ६०-७० रुपये मिळतील. गेल्या २२ तारखेला माझी एक कविता त्यांनीं रेडिओवर ब्रॉडकास्ट केली. तिचे १० रुपये मिळाले. लेखनावर अन्यत्र इतके पैसे मिळणं कठीणच. आज पैसे मिळवण्याचा तोच एक मार्ग आहे. काल रात्रीं बारा वाजेपर्यंत लिहायला बसलों. पहिली नाटिका पूर्ण होत आली. गद्य लिहायची संवय नसल्यामुळें असा कंटाळा येतो कीं विचारूं नकोस, आणि स्ट्रेनही फार होतो. पण कुठूनही हे ८० रुपये भरून काढायचेत. हे सगळं तुझ्यामुळं.. (कॉलेजांत आल्यापासून ते आतांपर्यंत तूं मला छळते आहेस.)
>
> तूं तिकडे परीक्षेंत मग्न असशील. मैत्रिणींच्या घोळक्यांत तुला माझी आठवण कसली येणार? पेपर कसे गेले तें कळव. पैसे शिल्लक टाक म्हटलं म्हणून चिक्कूपणा करूं नकोस. नीट रहा. कोल्ड्रिंक्स मुळींच घेऊ नको. नाहींतर आजारी

पडशील. तूं परगांवी गेली आहेस. पण मला खरंच काळजी वाटते. आईनें तुला विचारलं आहे. ती तुझी एकसारखी आठवण काढते. प्रभाला माझा नमस्कार सांग.

आबाचं लग्न झाल्यावर आम्ही लग्न करायचं ठरवलं खरं, पण आमचा राहण्याचा प्रश्न सुटणं जरा कठीण झालं होतं. सायनला सध्या आम्ही राहतो तो प्लॉट काकांनी आधीच घेऊन ठेवला होता. ते स्वत: आर्किटेक्ट होते. माझ्या लग्नाच्या आधी ते म्युनिसिपालिटीत आर्किटेक्ट म्हणून नोकरी करायचे. त्यांच्या त्या व्यवसायात चांगल्या ओळखी होत्या. ते बडोद्याच्या इंजिनियरिंग कॉलेजमधून पास झाले होते. त्या काळी त्यांना 'ब्राँझ पदक' मिळालं होतं. मी ते अजून अप्रूप म्हणून जपून ठेवलं आहे.

त्या काळात गुपचूप पागडी घ्यायला सुरुवात झाली होती. ते कायद्याविरुद्ध होतं. पण पागडी घेतल्यामुळं लवकर पैसे मिळाले असते. लौकर बिल्डिंग बांधायला घेता आली असती. पण आईंनी आणि मंगेशनं त्यांना जोरदार विरोध केला. त्यामुळं ते काम लांबणीवर पडलं. आम्हांला वेगळं बिऱ्हाड करून द्यावं अशी सर्वांची इच्छा होती.

शिवाजीपार्कला त्यांची एक बिल्डिंग होती. तीन मजली. पण प्रत्येक मजल्यावर एकच ब्लॉक. ब्लॉक मोठे प्रशस्त व हवेशीर होते. मला एकदा बघायला काका घेऊन गेले होते. एखाद्या भाडेकरूला जागा खाली करून द्यायला सांगून ती जागा आम्हांला द्यावी अशी काकांची इच्छा होती. (त्या काळी अशा गोष्टी चालत असत.) म्हणून एका भाडेकरूला त्यांनी विनंती केली की माझ्या मुलाचं लग्न होणार आहे, तेव्हा तुम्ही दुसरी जागा बघा आणि मला हा ब्लॉक खाली करून द्या. तशी नोटीस पण त्यांना पाठवली. इतका छान ब्लॉक आपल्याला मिळणार म्हणून मला खूप आनंद झाला होता. पण दुर्दैव असं की त्या भाडेकरूला काही कारणानं वेड लागलं. मग काकांनी तोही प्रयत्न सोडून दिला. ती बिल्डिंगच विकून टाकली व आलेले पैसे, फंडाचे पैसे व अन्य पैसे उभे करून सायनला बिल्डिंग बांधायच्या खटपटीला ते लागले.

वेगळं राहायचं म्हणजे, पुन्हा काळजी वाटायला लागली. मंगेश नोकरी करण्याच्या मन:स्थितीत नव्हता. संसाराला पुरेसे पैसे मिळवल्याशिवाय घर चालणार कसं? दर महिन्याला काकांकडून पैसे घेऊन कसा संसार करणार?

बेळगावात परीक्षा चालू होती. मी मनापासून नीट पेपर लिहीत होते. मानसिक व्याप सांभाळून पेपरवर मी लक्ष केंद्रित केलं होतं. कारण नापास झाले तर पुन्हा आयुष्यात कधीच एवढी मोठी परीक्षा देता येणार नाही, हे पूर्णपणं मला माहीत होतं. शेवटचे तीन पेपर बाकी राहिले होते आणि मंगेशचं पत्र आलं :

तीन दिवसांनीं तुझी परीक्षा संपेल. तूं पुण्याला येण्यासाठीं कधीं निघणार? तुला स्टेशनवर घ्यायला केव्हां येऊं तें तूं अजून मला कळवलं नाहींस. आपण एक सबंध दिवस एकत्र कधींच राहिलों नाहीं. आपण लग्न कोणत्या महिन्यांत करायचं वगैरे गोष्टी निश्चित ठरवून टाकूं. मी घरी सांगितलं आहे की, तीन-चार महिन्यांत आम्ही लग्न करणार आहोंत. घरांत आतां दागिने कुठले करायचे? साड्या किती घ्यायच्या? वगैरे

बोलणीं सुरूं झालींत. दागिने कोणते हवेत याचा तूंही विचार करून ठेव.

इथें भयंकर न सोसवणारा उन्हाळा सुरूं झाला आहे. पुण्याला तीन-चार दिवस आलों कीं बरं वाटेल. आणि तुला भेटण्याची फार उत्कंठा लागून राहिली आहे. कवि बोरकर मुंबईला येऊन गेले. लग्नाला आतां विलंब लावूं नका म्हणाले. तूं त्या ट्रेनिंग कॉलेजच्या नोकरीला 'नाहीं' म्हणून उत्तर दिलंस ते फार चांगलं झालं. त्यावर आई काय म्हणाली तें तूं लिहिलंच नाहींस. प्रकृतीची काळजी घे. आतां लवकरच आपण भेटणार. मला आतांपासूनच चैन पडेनासं झालं आहे.

हे पत्र होतं १५.४.४९ चं. दागिन्यांविषयी मंगेशनं सांगितलं, ते कसं शक्यं होतं?...

परीक्षा संपण्याच्या आधीच मी बेळगावहून आईला पत्र लिहिलं. आणि ह्या पत्रात मात्र मी स्पष्टच लिहिलं की :

मी एप्रिल २१, २२ तारखेला घरीं परत येणार आहे. आबाचं लग्न नीट रीतीनं पार पडलं आणि तो सोलापूरला गेला कीं मग मी मंगेशबरोबर मुंबईला जाऊन लग्न करणार आहें. आतां माझ्या ह्या विचारांत बदल होणार नाहीं.

परीक्षा संपली. शहरात फिरायला आम्हांला वेळ नव्हताच. खरेदीचा विचार करणं पण शक्य नव्हतं. पैसे अगदी मोजके होते. त्यातून पुण्याच्या खर्चासाठी शिल्लक ठेवायचे होते. बेळगावची हवा मला फार आवडली. त्या वीस दिवसांत माझी प्रकृती थोडी सुधारली असं मला वाटलं.

पुणे स्टेशनवर मला घ्यायला मंगेश आलेलाच होता. कोणी ओळखीच्या माणसानं मला पाहिलं तर! एवढीच भीती सारखी वाटत होती. आईला लिहिलेल्या तारखेच्या आधी मी पुण्यात आले होते. तिला जर कोणी सांगितलं की ताईला पुण्यात पाहिलं तर माझी शंभर वर्षं भरलीच म्हणून समजावी. तिनं माझं काय केलं असतं याची कल्पनाच करवत नाही.

आम्ही एकमेकांच्या सहवासात दिवस घालवला. पुढचे सर्व बेत पक्के केले. तारखा नक्की केल्या. मग संध्याकाळी क्लोकरूमधे ठेवलेलं सामान घेऊन मी घरी गेले.

माझं स्वागत अपेक्षेपेक्षा फार चांगलं झालं. आई माझी वाटच बघत होती. आबाच्या लग्नाची तारीख ठरली होती. आईनं मला काही बोलायचं नाही असं ठरवलं होतं. आल्याबरोबर मला म्हणाली, "ताई, आपल्याला कुरडया करायच्यात लग्नासाठी. तुझ्यासाठीं थांबलें आहें मीं." आता ती स्वत: जास्त काम करू शकत नव्हती.

हे सगळं मी मंगेशला लिहिलं. हे आता लग्नाच्या आधीचं शेवटचंच पत्र ठरलं. प्रेम जमलं न जमलं असं वाटायला लागल्यापासून, एकमेकांची ओळख पत्रांतून झाली

तेवढीच. प्रत्यक्ष सहवास असा फार थोडा घडला होता. त्यामुळं पत्रं ही माझ्या आयुष्यात फार महत्त्वाची ठरली. म्हणून पत्रांची मी फार काळजी घेतली. ती जमवली, मिळवली व सांभाळली. मिळाली तेवढी अजून जपून ठेवलीत.

मंगेशला मी कळवलं :

आपला बेत सर्व ठरलेला आहे. त्याप्रमाणंच आता करायचं. खूप गोष्टी माझ्या मनासारख्या होणार नाहींत याची मला कल्पना आहे. (शांतारामाच्या अस्वच्छ चाळींत रहाणें व खालच्या मजल्यावर कधींच स्वच्छ न केलेल्या कॉमन संडासांत जाणें.) सर्वच सुखं पाहिजेत म्हटलं तर तीं कशीं मिळणार? मी वाईट वाटून घेणार नाहीं. जें कांहीं मला मिळत आहें तेंच अपेक्षेबाहेरचं आहे. तुझ्या घरून लग्नाला विरोध नाहीं, प्रेमळ माणसांत मला रहायला मिळणार हेंच माझं सुख आहे. बारीकसारीक गोष्टींना मी महत्त्व देणार नाहीं.

असं मी त्याला लिहिलं खरं, पण भावनेच्या भरात आपण पुष्कळ गोष्टी कबूल करून जातो. पण त्या मनानं कबूल केलेल्या असतात. शरीर त्या मान्य करत नाही. मुख्य म्हणजे मला आधीच थोडा पाइल्सचा त्रास होता. त्या संडासात पाय ठेवल्यापासून मला भयंकर कॉन्स्टिपेशन व्हायला सुरुवात झाली. नवं घर, नवी माणसं, नवी नवरी म्हटल्यावर ह्या गोष्टी सांगायला पण लाज वाटते. दुसरं म्हणजे मुंबईचा उन्हाळा. घर तीन खोल्यांचं. एकीपुढं एक अशा. शेवटची स्वयंपाकाची खोली. त्यातच अंघोळीची, भांड्यांची आणि कपडे धुण्याची व बायकामाणसांना मोरीवर जाण्याची व्यवस्था. बाहेर थोड्या जागेत गरम पाण्याचा बंब. तांब्याच्या प्रचंड मोठ्या तपेल्या, पिंप वगैरे, पाणी साठवण्यासाठीं.

मी बेळगावला जाण्याच्या आधी श्याम वाघमारे भेटायला आला होता. तो पुण्याच्या बी०जे० मेडिकलमध्ये शिकत होता. शिकत असतानाच त्याच्या वडिलांनी त्याच्या मामेबहिणीशी त्याचं लग्न ठरवून टाकलं होतं. तिचं नाव पार्वती. मी परीक्षा देऊन आल्यावर लग्न होतं. त्यानं मला लग्नाला येण्याचं अगत्यानं आमंत्रण दिलं. मी परत आले तेव्हा मंगेश पुण्यात येऊन थांबला होता. त्यात माझे एक-दोन दिवस गेले आणि मी काही लग्नाला जाऊ शकले नाही. घर सोडून जायचं म्हणून मनावरचं दडपण वाढलं होतं. मन:स्थिती चमत्कारिक झाली होती. त्यातून मी खिश्चन. लग्नाला गेले तर त्याच्या वडील माणसांना ते आवडेल का नाही याची खात्री नव्हती. त्याची वर्गमैत्रीण म्हणूनच मी तिथं जाणार होते. शिवाय लग्नात प्रेझेंट घेऊन देण्यासाठी माझ्याजवळ पैसे नव्हते. रिकाम्या हातानं जाणं शक्य नव्हतं. नंतर एकदा तो मला भेटला आणि, "लग्नाला का आली नाहीस?" म्हणून विचारायला लागला. न जाण्याला कितीतरी गोष्टी कारणीभूत होत्या. त्या मी त्याला सांगू शकले नाही. नीटसं उत्तर देऊ शकले नाही. पण माझ्या मनातली अपराधी भावना कधीच गेली नाही.

आबाच्या लग्नाच्या निमित्तानं सर्व बहीण-भावंडं एकत्र जमलो. माझ्या दृष्टीनं हे एकत्र येणं शेवटचंच होतं. पुन्हा मला ह्या घरात प्रवेश मिळेल असं मुळीच वाटत नव्हतं.

ठरल्याप्रमाणं आबा व आशावहिनी (सुशीला) यांचं लग्न आनंदात पार पडलं. एक-दोन दिवस राहून ते दोघं सोलापूरला निघून गेले. बाहेरगावी असणारे भाऊ पण गेले. घरात सरल, विमल व उषावहिनी होत्या. अखेर ठरल्याप्रमाणं माझा जाण्याचा दिवस आला.

खरं म्हटलं तर मंगेशनं येऊन मला घेऊन जावं अशी माझी मनातून इच्छा होती. पण बोरकरांना आणि त्याला तसं करणं धोक्याचं वाटलं, म्हणून मंगेश व त्याची आई आधी एक दिवस बोरकरांच्या घरी येऊन राहिले. आणि मला एकटीलाच सामान घेऊन टांगा करून बोरकरांच्या घरी यायला मंगेशनं सांगितलं.

मी माझी लहानशी पत्र्याची ट्रंक घेतली. तीत माझे थोडेसे कपडे इत्यादी सामान भरलं आणि एक साधासा टॉवेल घरात होता तो वर ठेवला. ट्रंक बंद केल्यावर लगेच आई आली. तिला काय वाटलं कुणास ठाऊक. मी काय नेते आहे भरून ते बघावं म्हणून तिनं ट्रंक उघडली. खाली वर करून सर्व बघून घेतली. आक्षेप घेण्यासारखं काही सापडलं नाही. तेव्हा तिनं वरचा टॉवेल उचलून घेतला. "हा टॉवेल नेऊ नको," असं म्हणाली. मी अर्थातच गप्प बसले. आईला माझा भयंकर राग आला होता व अत्यंत मानसिक त्रास होतो आहे हे तिच्या चेहऱ्यावरून दिसत होतं. तिनं गादी घातली आणि पांघरूण घेऊन ती पडून राहिली.

दुपारचा स्वयंपाक झालेला होता. मला जेवणाची मुळीच इच्छा होत नव्हती. घरात वहिनी (राजू, निरू) सरल, विमल, कमळ सर्व जणी होत्या, त्यांनी आग्रह करून मला थोडं जेवायला लावलं. कोणी कोणाशी बोलत नव्हतं. घराला मृत्यूची कळा आली होती, आणि हळूहळू एकेकीनं रडायला सुरुवात केली. आईच्या भीतीनं दबून, आतल्याआत रडत होत्या. घरावर काहीतरी भयंकर प्रसंग ओढवला आहे, असं वातावरण निर्माण झालं.

मला मात्र अंगात संचारल्यासारखं कुठून बळ आलं होतं कुणास ठाऊक! ही माझी प्रेमाची माणसं माझ्यासाठी दुःख करीत होती आणि मी एका अनामिक ओढीनं घराबाहेर कसं पडता येईल हा विचार करत होते. त्यासाठी मला त्यांच्यापैकी कोणीच मदत करणार नव्हतं. फक्त विमल–तिची मात्र मला मदत करण्याची इच्छा होती. पण ती फारसं काही करू शकत नव्हती. मी मोठ्या विचित्र संकटात सापडले होते. टांगा जवळपास मिळत नसे. थेट येरवडा गावात जाऊन टांगा आणायला पाहिजे होता. समोरच्या चाळीतल्या एका रफीक नावाच्या मुलाला मी विनंती केली की, "मला गावातून एक टांगा घेऊन ये रे." तो लगेच तयार झाला आणि टांगा आणायला गेला.

आईनं बिछानाच धरला होता. सगळ्या जणी गपचूप रडत होत्या. इतक्यात टांगा आला. मी खंबीरपणं सर्व प्रेमाचे पाश तोडून, लोहचुंबकानं ओढून घ्यावं तशी जाऊन एकटीच टांग्यात बसले. आई जागची हाललीच नाही. माझ्या बहिणी आणि उषावहिनी दारात येऊन जास्तच रडायला लागल्या; आणि मी टांगेवाल्याला 'चल' म्हणून सांगितलं. एकट्या मंगेशच्या प्रेमावर आयुष्यभर जगण्यासाठी मी निघाले होते. मंगेशकडं जाऊ शकले नाही तर मी जिवंत राहू शकणार नाही असंच तेव्हा वाटत होतं, म्हणूनच हे धाडस केलं. ते भारलेलं मन व ओढ घेणारं माझं शरीर घेऊन टांगा शिवाजीनगरच्या दिशेनं निघाला.

आईची अवस्था बघून पोटात तुटत होतं. रडणाऱ्या बहिणींना व उषावहिनींना बघून मन व्याकूळ होत होतं. पण माझा निर्णय पक्का होता. त्याच्या आड अगदी ब्रह्मदेवसुद्धा येऊ शकला नसता. म्हटलं तर प्रसंग फार कठीण होता. एक निवारा मी माझ्या हातानं नाहीसा केला. दुसऱ्या निवाऱ्याची माहिती नाही, शाश्वती नाही, पण येईल त्या प्रसंगाला तोंड देण्याच्या तयारीनंच मी चालले होते. पाण्याची खोली माहीत नसताना बेधडक आत उडी टाकली होती.

कोणाची सोबत नाही, आधार नाही, धीर नाही, टांग्याचा घोडा मालकाच्या इशाऱ्याप्रमाणं चालला होता आणि मी–मंगेशनं घेऊन जायला यावं किंवा वाटेत कुठं भेटावं अशीसुद्धां अपेक्षा न करता, अगदी एकटी, त्याच्या प्रेमाच्या इशाऱ्यावर शिवाजीनगरच्या दिशेनं चालले होते. मनातून मोठ्या स्वागताची अपेक्षा करत होते. माझ्या धाडसाचं, बोरकर, मंगेश यांच्याकडून खूप कौतुक होईल–दारात सगळे उभे असतील–माझी वाट बघत असतील–घरात गेल्यावर कशी आलीस? घरी काय काय घडलं–याची चौकशी करतील असं चित्र रंगवत असतानाच टांगा त्यांच्या दारात जाऊन थांबला. पैसे दिले. बॅग काढून घेतली तरी कोणी बाहेर कसं येत नाही, असा विचार करत दार ढकलून आत गेले. घरात कोणीच नव्हतं. मुलाबाळांच्या घरात असं कसं झालं असेल? इतकी सगळी माणसं कुठं गेली असतील? असा विचार करत बाजूच्या खोलीत गेले. बघते तर जमिनीवर चटई घालून अंगावर चादर पांघरून मंगेश एकटाच तिथं पडून होता. मी त्याला विचारलं, "सगळे कुठं गेलेत?" तो म्हणाला, "ते बाहेर गेलेत." "तुला काय झालं?" म्हणाला, "मला ताप आलाय." मी लगेच हातातली बॅग खाली ठेवली व ताप बघायला कपाळावर हात ठेवला. मला वाटलं होतं की तो माझी मनस्थिती जाणत असेल. माझं घर सोडून येताना मला झालेल्या यातना, दु:ख, माझी अगतिक अवस्था याची–चौकशी करील तो मला धीर देऊन माझं समाधान करील. पण माझे अंदाज चुकीचे ठरले. कपाळावर ठेवलेला हात धरून त्यानं मला आपल्या शेजारी ओढून घेतलं. घरात एकही माणूस नव्हतं. लग्न तर मला करायचंच होतं. म्हणूनच आई सांगत होती की, तू आधी हरीशच्या घरी रहा व लग्न झाल्यानंतर त्यांच्याकडं जा. पण काही कामामुळं हरीश व उषावहिनी त्या वेळी मुंबईला येऊ शकत नव्हते. त्यामुळं मला असं सरळ मंगेशच्या आणि त्याच्या आईबरोबर मुंबईला यावं लागलं.

आणि आमचा इतक्या वर्षांचा संयम अशा तऱ्हेनं सुटला. मनात अपराधी भावना, घर सोडून आल्याचं दु:ख व असुरक्षिततेची भावना, मंगेशच्या तापाची काळजी आणि कोणी येईल, बघेल म्हणून भयंकर भीती, अशा संमिश्र भावनांचं वादळ मनात चालू होतं. त्यानंतर मंगेशचा प्रेमज्वर उतरला व तो खडखडीत बरा झाला.

माझी आई, भावंडं, घर हे सगळं सोडून मी पहिल्यांदाच पाडगावकरांच्या घरात प्रवेश करण्यासाठी बोरकरांच्याकडं आले असताना, आणि हे सगळं आधीच ठरवलेलं असताना, मंगेशशिवाय घरात दुसरं कुणीही ऐनवेळी उपस्थित राहिलं नाही–ते सगळे बाहेर निघून गेलेले याचं मला नवल वाटलं तसंच आतून रडूही आलं. माझी वाट बघत, माझ्या गृहप्रवेशासाठी उत्सुकतेनं पुढं यायच्याऐवजी ही सगळी जणं निघून कशी गेली? अशा क्षणी माझ्या स्वागताला न थांबण्याचं त्यांनी का ठरवलं असेल? त्यांची आपापसात यासंबंधी काय बोलणी झाली असतील? माझं येणं ही पाडगावकरांच्या घरातली किती महत्त्वाची गोष्ट होती! मंगेशच्या आईसुद्धा कशा थांबल्या नाहीत?...शेवटपर्यंत मला हे गूढ उलगडलं नाही.

संध्याकाळच्या गाडीनं मुंबईला जायचं होतं त्या विचारानं पुन्हा धडकी भरली. मे महिन्याचे शेवटचे दिवस. भयंकर उन्हाळा व घाम, त्यातून चाळीतली जागा. पंखे नाहीत. घाण संडास, पाण्याचे हाल. विल्सन कॉलेजला असताना सिंधूबरोबर मी त्यांच्या घरी गेले होते, तेव्हा एकही गोष्ट माझ्या नजरेतून सुटली नव्हती. तरीसुद्धा माझ्या घरापेक्षा आर्थिक सुस्थितीत असलेलं घर दिसत होतं. म्हणजे घरात रेडिओ होता. आरशाचं मोठं लाकडी कपाट, शोभेच्या वस्तू ठेवण्यासाठी काचेच्या दारांचं कपाट, लेसकाम केलेले सुंदर टेबलक्लॉथ्स आदी गोष्टी मध्यम वर्गांच्या खुणा दाखवत होत्या.

तिथंच जाऊन राहण्याशिवाय गत्यंतर नव्हतं. आगगाडीत बसलो आणि मुंबईला आलो.

घरी म्हातारी आजी (आईची आई) वडील (काका). प्रभा व सुहास धाकट्या बहिणी शाळेत जात होत्या. त्यांच्यापेक्षा मोठी कुमुदिनी ही आधीच लग्न होऊन गेली होती.

घर होतं दुसऱ्या मजल्यावर. संडास दोनच–ते पहिल्या मजल्यावर. संडासाच्या समोर कचरा टाकण्याची पिंप आणि जवळच पाणी भरण्याचे नळ. नळाला पाणी ठरावीक वेळीच येत असे. संडासासाठी आपापलं पाणी डबा भरून वरून आणावं लागे. बहुतेक भाडेकरू अर्थातच मटण-मासे खाणारे. त्यामुळं टाकलेल्या कचऱ्याची घाण व दुर्गंधी दुसऱ्या मजल्यावर खिडकीतून आमच्या घरात कायम पसरलेली.

जिना चढून वर गेल्यावर पहिलं बिऱ्हाड आमचं. आधी लहानशी गॅलरी. तिथं चपला, संडासाच्या पाण्याचा डबा वगैरे वस्तू असत. आत ओळीनं तीन खोल्या. पहिली बैठकीची खोली. मधली देवाची खोली–तिथं एक कॉट, तीवर सर्व गाद्या, उशा, चादरी असत. बाजूला कपड्यांचं बैठं लाकडी कपाट व वर माळ्यावर जाण्यासाठी जिना. त्याखाली देव्हारा व देव.

नंतर स्वयंपाकघर व मोरी. शेगड्या, स्टोव्ह, भरपूर भांडी होती. मोरीच्या कट्ट्यावर

मी पाहिले नव्हते एवढे मोठे तांब्याचे हंडे, तपेल्या, पाणी भरून ठेवलेल्या होत्या. कोपऱ्यात बंब व कपडे टाकायला बादली. आई आणि आजी स्वयंपाकखोलीत काम करत असताना कधी मोरीला जावं लागे. अंघोळ पण त्या हंड्यांच्या आडोशानं, आपलं त्यांना काही दिसणार नाही, अशी काळजी घेऊन, घाईघाईनं करावी लागे. पाण्याच्या वेळा वाट्टेल त्या असायच्या. बायका मंडळींना सर्व पाणी भरून ठेवावं लागे. ते आई स्वत: सोवळ्यानं किंवा अंगावर वस्त्र न ठेवता दार लावून भरत. हे 'सोवळेप्रकरण' म्हणजे मला तर बघायला मिळालेला एक आश्चर्यकारकच प्रकार! असं मी कधी पाहिलं तर नव्हतंच पण स्वप्नात कल्पनासुद्धा केली नव्हती.

मधल्या खोलीतल्या लाकडी जिन्यानं तोल सावरत वर गेलं की मोठा माळा होता. कौलारू, दोन्ही बाजूला उतरतं छप्पर असलेला–भयंकर धुळीनं भरलेला–डाव्या बाजूच्या छपराखाली सर्व जुनं सामान एक करून सरकवलेलं होतं. उरलेला भाग मोकळा करून एका लहान खिडकीकडं आमच्यासाठी एक लोखंडी डबल कॉट, गादी, उशा, चादरी होत्या! समोर एक टेबल. त्यावर वाट्टेल तशी टाकलेली पुस्तकं. बाजूला एक लोखंडी, गंजकी ट्रंक, एक दिवा. तिथं बाथरूम नाही. त्यासाठी वेळी अवेळी रात्री जिना उतरून खालच्या मोरीत यावं लागे. अशी ही आमची बेडरूम किंवा कवितेतला शयनमहाल. तोंड बघण्यापुरता एक आरसा होता. त्यांच्यापेक्षा मी खूप गरिबीतून आले असले तरी, बऱ्याच गोष्टींची मला सवय नव्हती हेही खरं. म्हणजे स्वतंत्र संडास, दिवसभर भरपूर पाणी, स्वच्छ परिसर, माळरानावरची मोकळी हवा, भरपूर उजेड, खेळायला मागं पुढं खूप जागा, फिरायला मोकळं रान, निवांत रस्ते हे घरी असताना– येरवड्याला.

हॉस्टेलमधे, शाळा चालू असताना तर ब्रिटिश अधिकारी बायांच्या देखरेखीखाली सर्व व्यवस्था काटेकोरपणं सांभाळली जात असे. कुठं गलिच्छपणा, कचरा किंवा धूळसुद्धा राहू दिली जात नसे. स्वतंत्र गादी, उशी, पांघरूण, स्वतंत्र टॉवेल. दर आठवड्याला कपडे धोब्याकडं जाऊन येत. सर्व काही वेळापत्रकाप्रमाणं चालू असे.

अशा वातावरणातून आलेल्या मला तिथं शरीरानं व मनानं एकरूप होणं फार कठीण वाटू लागलं.

मी इंटरला असताना, मुंबईत काकांकडं–प्रेमचंद्रकाकांकडं–दहा-अकरा महिने राहिले होते. हवेतला उकाडा व घाम यांचा त्रास फारच जाणवत होता. अंब्रोलीमॅन्समधला तो एकमजली प्रशस्त बंगला होता. भरपूर जागा, हवा व पाणी यांचा तुटवडा नव्हता. लहानशा, संकुचित वर्तुळात राहिल्यामुळं शहरी राहणी, शहरी घाण तशी जवळून अनुभवली नव्हती. ती असह्य झाली व अजूनही होत आहे. इथून सुटका कशी करून घ्यावी असे विचार मनात सतत येत असत. पण प्रेमाची ओढ आणि शरीराची गरज इतकी अनावर, जबरदस्त असते की तिनं मला तिथंच खिळवून ठेवलं.

विठ्ठल प्रभू, नरेश मंत्री, काका व मंगेश हे, हॉल ठरवणं, पत्रिका छापणं, हार, फुले वगैरे व्यवस्थेला लागले. आणि सासूबाई मला घेऊन दागिने व साड्या खरेदीला लागल्या. मोठा बकुळी हार, दुसरा कोयऱ्यांचा लहान हार, मंगळसूत्र, बांगड्या, तोडे,

कुडी, अंगठी असे सर्व दागिने त्यांनी मला केले. भारी, मध्यम अशा सहा साड्या, सिल्कचा शालू–तेव्हा त्याची किंमत दीडशे की दोनशे होती. लग्नाची तारीख ११ जून १९५० ठरवली.

मी त्यांच्या घरीच राहत होते. तसेच नरेश पण काही कारणानं त्या वेळी तिथंच होते. आम्ही तिघे रोज संध्याकाळी चौपाटीवर फिरायला जात होतो. त्या दोघांच्या मोठ्या मोठ्या विषयांवर गप्पा चालत. गांधीजींची चळवळ, स्वातंत्र्य, विवेकानंदांचं तत्त्वज्ञान आणि काव्य हा तर फार महत्त्वाचा विषय. ध्यानी, मनी, स्वप्नी काव्यच. ह्या विषयांचं वाचन, अभ्यास मी कधी केला नव्हता. घरात बाबांच्या लायब्ररीतून आईनं ठेवून घेतलेली काही पुस्तकं होती. त्यांतून काढून इतर वाचन मी करत होते. 'यमुनापर्यटन', 'पण लक्षांत कोण घेतो?', 'उष:काल', केशवसुत व बालकवी यांच्यावरच्या लेखांची कात्रणं जमवून ती चिकटवून त्यांची व्यवस्थित फाइल केलेली होती. 'ॲलिस इन वंडरलँड' ही पुस्तकं आवडीनं वाचली होती.

त्यामुळं त्यांच्या बोलण्यात मला फारसा भाग घेता येत नसे. लग्नाआधी किंवा लग्नानंतर आमच्या संसाराबद्दल बोलण्याची किंवा ठरवण्याची मंगेशला काही जरूर वाटत नव्हती. आई, वडील आहेत. मी एकुलता एक मुलगा आहे. सगळा संसार आहे. खिश्चन मुलीला ती पसंत नसूनसुद्धा त्यांनी घरात घेतलं आहे. सोवळ्या-ओवळ्याचा फार मोठा प्रश्न होता. पण ते सर्व आई बघून घेईल व यशोदा सहन करील याची त्याला पूर्ण खात्री होती. ह्या स्वभावामुळं, स्वत:ला त्रास होईपर्यंत तो कुठल्याही विषयात पडला नाही किंवा बोलला नाही. पुढं पुढं तर ही वृत्ती त्यानं मुद्दाम जोपासली. त्यामुळं मन इतर कुठंही न गुंतता, ते काव्यावर, किंवा विचारावर स्थिर करून लेखनातच रमू लागलं. घरामधे आजूबाजूला, जवळपास काय चाललं आहे, ह्याचं त्याला फारसं भान नसे.

असं चालू असतानाच ११ जून जवळ येत होती. माझे कपडे, दागिने तयार झाले होते. लग्न रजिस्टर व्हायचं होतं व नंतर रिसेप्शन–म्हणजे आलेल्या लोकांना कोल्ड्रिंक्स. सगळा संध्याकाळचा कार्यक्रम. कवी बोरकर, रुक्मिणीवहिनी, त्यांच्या मुली दुर्गा, सरोजिनी ही मंडळी पुण्याहून शांतारामाच्या चाळीत आमच्याकडं आली होती. पावसाळा सुरू झाला होता. मुंबईचा पाऊस मला तसा अनोळखीच. रस्त्यावर पावसाचं पाणी, कचरा व त्यांत घोड्यांची लीद (तेव्हा घोडागाड्या होत्या.) असं एक चिकट मिश्रण तयार झालं होतं. त्यांतून छत्री, पर्स, साडी, पदर सांभाळत चालणं म्हणजे एक कसरतच होती, इतका पाऊस पडला तरी हवेत थंडावा नाही. उलट घामच घाम. कपडे अंगाला चिकटून बसायला लागले. जीव घाबरा व्हायला लागला.

११ जूनची सकाळ उजाडली. पेपर आले. त्यांत फारच आश्चर्यकारक व भयंकर बातमी होती : 'सानेगुरुजींनी आत्महत्या केली' ही ती बातमी. ह्या जगाचे बरे वाईट अनुभव घेतल्यानंतर जीवनाचा अंत करण्यासाठी त्यांना पण ११ जून हाच दिवस का पसंत पडला असावा?

सकाळपासून पावसानं जोर धरला होता, आई, आजी यांनी मिळून सर्वांचा स्वयंपाक केला. जेवणं झाली आणि अतोनात पाऊस कोसळू लागला. मला भीती वाटायला लागली. आता हॉलवर तरी कसं पोचता येईल? शेवटी तो दमला की, त्याला माझी दया आली म्हणून, पण त्याचं कोसळणं हळूहळू कमी होत गेलं.

सगळे जण हॉलवर जायचे म्हणून तयारीला लागले. तेव्हाची तयारी कसली? दुर्गानं माझ्या केसांचा आंबाडा घालून दिला. साबणानं तोंड धुऊन स्नो, पावडर लावली. कदाचित करंगळीनं थोडं काजळ घातलं असेल.

शालू नेसले व आईंनी सर्व दागिने मला घालायला दिले. सोन्याचा क्वचित स्पर्श झालेल्या माझ्या शरीराला हा अनुभव कल्पनातीत सुखाचा व आनंदाचा होता. आई म्हणाल्या, "घाल सगळे. आर्किटेक्टची सून शोभली पाहिजेस." नवरा तेव्हा नाव घेण्यासारखा कोणीच नाही हा विचारसुद्धा मनात आला नाही. त्याला मार्चमधे नुकतीच एकवीस वर्षं पूर्ण झाली होती. ती पूर्ण नव्हती म्हणून मला बी०ए०ची परीक्षा देईपर्यंत शिकता आलं. नाहीतर आधीच लग्न करावं लागलं असतं. त्यानं कॉलेज सोडून दिलं होतं. पुढं शिकण्याचा बेत रद्द केला होता. नोकरी कसली मिळणार होती? कविता मात्र रंगून जाऊन लिहीत होता. कविता करून दागिने करण्याइतके पैसे कसे मिळणार? लग्नाच्या आधीच माझा रिझल्ट लागला होता. बी०ए० ऑनर्स. मराठी, संस्कृत घेऊन पास झाले होते. मला अत्यानंद झाला. माझ्या कष्टाचं फळ मला मिळालं. कॉलेजला जाण्या-येण्याचा त्रास, पुस्तकं घ्यायला पैसे नाहीत, पुरेसे कपडे नाहीत, परीक्षेसाठी बेळगावला जायला पैसे नाहीत अशी अवस्था. काही वेळा मंगेशनं मला पैशांची थोडी मदत केली. त्यानं आईकडून उसने पैसे घेतले. ऑल इंडिया रेडिओला 'शर्मिष्ठा' हे काव्यनाट्य लिहून दिलं आणि त्यातून आईचे पैसे फेडले असा त्याच्या एका पत्रात उल्लेख आहे. अशा प्रयत्नांनी मिळालेलं यश, हे कितीतरी जास्त आनंद देऊन जातं. याचा अनुभवच घेतला पाहिजे.

'लक्ष्मीबाग' नावाचा गिरगावातला लहानसा हॉल होता. लग्न रजिस्टर होणार होतं. तेव्हा ती रजिस्ट्रार वगैरे सरकारी मंडळी पण आलेलीच होती. दोघांनाही काही प्रश्न विचारण्यात आले. त्यामधे अचानक एक प्रश्न विचारला की, "तुला तुझा धर्म बदलायचा आहे का? हिंदू व्हायचं आहे का?" असा प्रश्न मला विचारणार आहेत ह्याची कल्पनाच नव्हती. मला मोठा धक्का बसला. पण क्षणात मी सावरले. फारसा विचार न करता पटकन उत्तर दिलं, "नाही मला माझा धर्म बदलायचा नाही." नंतर विचार करतें तेव्हां वाटतं, की मी 'हो' का म्हणाले नाही? मी माझ्या सर्वस्वाचा त्याग केला आहे, सर्व नाती तोडून, सर्वांना दुखवून, माझी संस्कृती, माझ्या चालीरीती, माझे संस्कार, माझे सणवार सर्व सोडून ह्या अनिवार्य प्रेमापोटी मी इथं आले आहे ना? मग धर्म बदलण्यानंच काय फरक पडणार होता? बरं, मी मोठी धार्मिक वृत्तीची होते अशातला भाग नाही. उलट दिवसेंदिवस मी नास्तिक बनत गेले. मी चर्चला जाऊ शकत नव्हते. म्हणजे मला त्यानं 'नको जाऊंस' असं म्हटलं नव्हतं. पण मुलांना बरोबर

न्यायचं नाही हे मात्र निक्षून सांगितलं होतं. घरात दुसरं कोणी नसताना मुलांना कुठं ठेवून जाणार? ही सायनला राहायला आल्यानंतरची गोष्ट. पण आमच्याकडं प्रार्थना करण्याची पद्धत आहे. ती जर मी करत राहिले असते तर मला कोणी अडवू शकलं नसतं. ती मी सुरवातीला करत असे सवयीनं. पण कालांतरानं त्यातही मन लागेनासं झालं. हळूहळू तेही बंद पडलं.

मग प्रश्न असा पडतो की, मी पटकन धर्म बदलायला 'नाही' का म्हणाले? हा अंतर्मनातला धर्माबद्दलचा अभिमान असेल, किंवा कळायला लागल्यापासून झालेल्या संस्कारामुळं हिंदू धर्माबद्दल आपलेपणा नसेल. कारण 'मूर्तिपूजा करू नको' अशी आम्हांला शिकवण दिलेली होती. काहीही असेल. पण मी अजूनही खिश्चन आहे हे खरं.

असाही विचार मनात येतो की, समजा मी "हो" म्हणाले असते, तर काय झालं असतं? कागदोपत्री हिंदू झाले असते, पण ह्या मंडळींनी मला कधी ही, 'सारस्वत ब्राह्मण' आहे असं म्हटलं असतं का? ही अगदी आपल्यातलीच असं मानलं आणि वागवलं असतं का? ह्याचं उत्तर अर्थातच 'नाही', असं आहे. त्यामुळं मी केलं तेच बरोबर होतं असं दिवसेंदिवस वाटायला लागलं.

त्यानंतर रजिस्टर लग्नासंदर्भातले सर्व सोपस्कार पार पडले. आणि आम्ही नवरा-नवरी म्हणून सिंहासनासारख्या खुर्च्यांवर बसलो. मी येरवड्याला आईला, भावांना, बहिणीला आमंत्रणं पाठवली होती. पण कोणी येणार नाही ह्याची मला खात्रीच होती. माझा मुंबईत असलेला भाऊ हरीश व उषावहिनी हे दोघं काही वेळानंतर आले. आम्हांला भेटून त्यांनी आमचं अभिनंदन केलं आणि भेट म्हणून मला चांदीचा कुंकवाचा करंडा दिला. मी हिंदू मुलाशी लग्न केल्यामुळं आता मला त्याची जरूर पडेल असंच त्यांना वाटलं असावं. कारण तोपर्यंत मी कपाळाला कुंकू लावत नव्हते. मंगेशला मी जे जे फोटो पाठवले त्यांत कुंकू लावलेलं नव्हतं. फोटो नंतर पाहिले तेव्हा दिसलं की त्यानं, शाईनं फोटोवर टिकली काढली आहे.

त्यानंतर अतिशय घाबरलेली सिंधू आली. तिनं येताना स्टीलची ताटवाटी आणली होती. आपल्याला कोणी बघेल व घरी आईवडिलांना सांगेल, अशी भीती तिच्या मनात होती. कारण त्यांना चोरूनच ती गुपचूप आली होती. भेटून तशीच घाईघाईनं निघून गेली. ह्याशिवाय आलेल्या मंडळीत माझ्या घरचं, नात्यातलं किंवा ओळखीचं कोणीच नव्हतं.

लग्नसमारंभ आटोपला. घरी रात्रीच्या जेवणाची काहीच व्यवस्था नव्हती. त्यामुळं वडील मंडळीत थोडी वादावादी झाली. तेव्हा प्रभूनं व मंगेशनं ठरवलं की, जवळच एक हॉटेल आहे तिथं जेवून मग घरी जाऊ या. त्याप्रमाणं जेवण झाल्यावर आम्ही घरी आलो आणि माळ्यावरच्या आमच्या खोलीत गेलो.

मंगेशचं काव्यलेखन सतत चालू होतं. प्रत्येक कविता लिहून झाली की ती आधी

मला वाचून दाखवायची, हे ठरलेलंच होतं. एक पुस्तक काढण्याइतक्या कविता लिहून झाल्या होत्या. सृष्टिसौंदर्यानं त्याला भारावून टाकलं होतं. समुद्र, वारा, ऊन, माती, पाऊस, वादळ, वृक्ष, पानं, फुलं, पक्षी, आकाश आणि त्यांचे बदलते रंग ह्या सर्वांच्या उल्लेखानं काव्य बहरत होतं. पण सर्वांत त्याला स्फूर्तिदायी वाटतो तो कोसळणारा पाऊस. त्यामुळं पुस्तकाचं नाव 'धारानृत्य' ठेवायचं असं त्यानं ठरवलं. सामाजिक जाणिवेच्या कविताही बऱ्याच लिहिल्या होत्या. असा हा पहिलाच संग्रह १९५०मधे प्रसिद्ध झाला. त्या वेळी त्याचं वय फक्त एकवीस वर्षांचं होतं. भाषेवरचं प्रभुत्व व बुद्धीची प्रगल्भता वयाच्या मानानं विलक्षण होती.

मंगेशचे आईवडील व आजी घरात त्यांची मालवणी भाषाच आपसात बोलताना बोलायचे. मी आयुष्यात प्रथमच ही भाषा ऐकत होते. ते हेल काढून बोलणंही मला अपरिचित होतं. सुरुवातीला ते सर्व जण मोठ्यानं बोलताना, चर्चा करताना, वाद घालताना हेल काढून बोलताना ऐकलं की ते काय व कशाबद्दल बोलतात हेच मला कळत नसे.

एकेक दिवस उगवत होता आणि मावळत होता. संध्याकाळी चौपाटीवर फिरून येणं हा पण एक ठरलेलाच कार्यक्रम. दुसरीकडं कुठंतरी जाऊ या, असं मला वाटायचं. तेव्हा लक्षात आलं की मंगेशला अतिकाळजीपूर्वक वाढवल्यामुळं त्याला मुंबईची फार थोडी माहिती आहे आणि एकट्यानं बाहेर कोठे जाण्याची सवय नाही. फारशी हौस पण नाही.

त्याच सुमारास नरेश मंत्रींनी वर्ध्याला काकासाहेब कालेलकरांच्याकडं जाण्याचं ठरवलं. तिथं राहून ते वर्ष, दोन वर्षं हिंदी शिकणार होते आणि गांधीजींचा मार्ग अनुसरून जीवन जगायचं असं ठरवून, खादी वापरू लागले. लवकरच ते निघून गेले. नाही म्हटलं तरी प्रभूंचं येणं-जाणं पण कमी झालं. सिंधू तर अजिबातच यायची बंद झाली.

आता खऱ्या अर्थानं आम्ही दोघंच राहिलो. दिवस कसा तरी जायचा. मात्र संध्याकाळ झाली की घरच्या आईच्या आठवणीनं मला रोज खूप रडू यायचं. फार अपराधी वाटायचं. खिन्न वाटायचं. मंगेश माझी समजूत घालायचा. धीर द्यायचा, शांत राहायला सांगायचा. पण तरी ते चालूच राहिलं.

मी नवीन म्हणून मला घरात काही काम सांगत नसत. मी स्वत: गेले तरी, "थांब, थांब नको करूस. तू पाटपाणी घे, उष्टी काढ. गहू, तांदूळ निवड" आणि मोठं काम म्हणजे "मधल्या खोलीत बसून स्टोव्हवर सर्व मुलांच्या, दोन वेळच्या चपात्या कर." असं सांगितलं जायचं. म्हातारी आजी, काका, आई नुसता भातच जेवत. म्हातारी आजी ही गेल्या पिढीतली कडक 'सोवळे' पाळणारी बाई. तिनं मला घरात घ्यायचं कसं कबूल केलं हेच एक आश्चर्य. स्वयंपाक ती स्वत: करत असे. आई तिला कातून, चिरून, वाटून देऊन बाकीची मदत करीत. त्यामुळं पाणी दूध, जेवण सर्व सोवळ्यात

ठेवलेलं असे. स्वयंपाक-खोलीत माझ्यासाठी एक लक्ष्मणरेषा होती. त्यापलीकडं मी आत जायचं नाही. पाणी पिण्यासाठी एक माठ रेषेच्या बाहेर ठेवला होता. त्यातलं पाणी घेऊन मी पिऊ शकत होते. पण त्यापुढं जाऊन कुठल्याही पदार्थाला हात लावू शकत नव्हते.

म्हातारी आजी, कोंबडी, अंडं, पाव व दुकानातले इतर कुठलेच पदार्थ खात नव्हती. शिवाय त्या काळात बाहेरचे तयार पदार्थ फारसे मिळत नसत आणि आणून कोणी खात पण नसत. म्हणून दर आठवड्याला एखादा पदार्थ घरातच करण्याची आईची पद्धत होती. सात, आठ माणसांच्या कुटुंबासाठी तो खूप मोठ्या-प्रमाणात करावा लागायचा. कधी चिवडा, लाडू, चकली, शंकरपाळी वगैरे. त्यांचा सोवळ्याचा डबा काढून झाला की मग मला "मदतीला ये" म्हणत. उच्च वर्गीयांचं श्रीमंती जेवण मी कधी पाहिलं नव्हतं व खाल्लं पण नव्हतं. तसंच तऱ्हेतऱ्हेचे मासे, त्यांची नावं हेही ठाऊक नव्हतं. ते नीट करणं, त्यांचे निरनिराळे पदार्थ तयार करणं ही तर केवळ अशक्य कोटीतली गोष्ट वाटायची. येरवड्याला आम्ही कधी चिकन आणि मासे विकत आणून खाल्ल्याचं मला आठवत नाही. आई फक्त अर्धा रत्तल मटण आठवड्यातून एकदा की दोनदा घ्यायची. त्यातला एखादादुसरा तुकडा वाट्याला यायचा, बास. हेच आमचं नॉनव्हेज खाणं. कधीतरी अंडं, किंवा अंड्याची करी. पण ती फारच क्वचित. फराळाचे पदार्थसुद्धा मला काहीच करता येत नव्हते. नारळ फोडता येत नव्हता. तो विळीवर खवता येत नव्हता. आमच्या घरी सर्व कापण्याचं काम सुरीनं करण्याची पद्धत होती. मला हे सर्व 'ग म भ न' पासून शिकायचं होतं. पण स्वयंपाक-खोलीत पाय टाकायला मिळत नाही तर शिकणार कसं? त्यांना पण सुनेकडून काही मदत मिळायला पाहिजे होती ती मिळत नव्हती.

मंगेशला बाहेर जायचं असलं तर तो आधी जेवून घ्यायचा व जाताना आईला सांगायला विसरत नसे, "माझ्या बायकोला नीट बघ गे, तिकां भरपूर जेऊंक घाल." आणि खरंच त्या माझ्याशी फार सांभाळून आणि चांगल्या वागत. मला आग्रह करून भरपूर जेवायला घालत. लग्नाच्या वेळी माझं वजन ९५ पौंड होतं व मंगेशचं १३२ पौंड. त्या मला म्हणायच्या, "तू फार बारीक आहेस ग, तुला उद्यापासून बदाम वाटून दूध करून देते." आणि खरंचच, त्यांनी मला थोडे दिवस बदामाचं दूध करून प्यायला लावलं. मला दूध अजिबात आवडत नाही–अगदी लहानपणापासूनच आणि त्या खूप प्रमाणात साखर घालून खूप उकळवून भयंकर उन्हाळ्यात ते गरम दूध प्यायला सांगत. उलटी येईल असं वाटायचं. पण त्यांना, 'मला हे नको' किंवा 'मी हे पिऊ शकत नाही' असं सांगण्याची माझी टाप नव्हती. मी पण सर्वांना घाबरून, सांभाळून राहत होते. मला कळत होतं की, माझी काही एक चूक नसताना किंवा माझ्यात कोणताही कमीपणा नसताना मला ह्या अपमानकारक परिस्थितीला तोंड द्यावं लागत आहे. वेगळं राहण्याची सोय झाल्याशिवाय खरं तर मंगेशशी लग्न करण्याची घाई करायला नको होती. आई, आजींना पण दोष देता येत नाही, घर त्यांचं आहे.

त्यांच्या पद्धतीप्रमाणं राहण्याचा त्यांना पूर्ण अधिकार आहे. मला त्रास होत होता तसा त्यांना पण त्रास होत होता. फक्त त्रास होत नव्हता तो मंगेशला–कारण ह्या असल्या किरकोळ गोष्टींत लक्ष घालण्याची त्याला सवय नसावी आणि गरज पण वाटत नसावी. मला तर कुणाबद्दल तक्रार करायची सोयच नव्हती. कारण मला त्यांनी घरात ठेवून घेऊन माझ्यावर फार मोठे उपकार केले होते. "माझ्या आई-बहिणींबद्दल कसलीच तक्रार माझ्याकडं करायची नाही." अशी मला तंबी आधीच मिळाली होती. हे वाक्य ऐकल्यावर मला मोठाच धक्का बसला होता. इतकं कडक धोरण स्वीकारलं तर नवराबायकोत सुसंवाद कसा साधणार? माझ्यासारख्या ख्रिश्चन मुलीवर ह्यानं प्रेम केलं. लग्न त्यांनी•करून दिलं व घरात पण ठेवून घेतलं. हे सर्व त्यांच्या चांगुलपणामुळं झालं. मुलावरच्या अतिप्रेमामुळं केलं. आणि त्यांच्यापाशी असलेल्या सुसंस्कृतपणामुळं केलं हेही तितकंच खरं आहे. ह्या मानसिक ओझ्यामुळं माझ्या मनाचा विचार करण्याची आवश्यकता त्याला भासली नाही.

दुसरी गोष्ट अशी की, तो काहीच कमवत नव्हता. घरात लग्नाच्या, शिकणाऱ्या दोन मुली, आजी, आई, मी व मंगेश ह्या सर्व कुटुंबाचा भार एकट्या काकांवर होता. त्यांची फार ओढाताण होत होती. हे घरात मला पण कळत होतं. मोठा मुलगा असून आर्थिकदृष्ट्या त्याची काही मदत होत नव्हती. उलट लग्न करून मला आणल्यामुळं खर्चात वाढ होत होती. ह्याचा ताण मंगेशच्या मनावर नक्कीच होता. पूर्वी त्याची जी कल्पना होती की आपण एकच मुलगा असल्यामुळं आपल्याला घरात कधीच काही कमी पडू दिलं जाणार नाही त्या कल्पनेला धक्का बसायला सुरुवात झाली होती.

हे सर्व कमीच म्हणून की काय, माझी पाळी चुकली, आणि उलट्या व्हायला सुरुवात झाली, डोहाळे कडक होत गेले. शरीरानं तशीच मनानं मी हादरले. प्रेमभावनेची तृप्ती झाली नव्हती. एकमेकांना किती देऊ आणि किती घेऊ, अशी आमची मन:स्थिती होती. वयं लहान होती. वात्सल्याच्या भावनेला मनात थारा नव्हता. आई होण्यासाठी शरीर तयार होतं, पण मन तयार नव्हतं.

एक दिवस मंगेश म्हणाला की, "इतक्या लवकर मूल होत आहे, त्याचं तुला काय वाटतं? लोक काय म्हणतील?"

मी म्हणाले, "लोकांना मी घाबरत नाही. लग्न करायचं म्हणून कोणाचीच पर्वा न करता मी घरातून निघून आले. आता मूल होणार आहे, तर होऊ दे. त्याला इलाज नाही."

प्रभा, सुहास माझ्यापेक्षा लहान होत्या तरी अजाण नव्हत्या. वयात आलेल्या होत्या. घरात सोवळं असल्यामुळं पाळीच्या वेळी वहिनी काय करतात, ह्याकडं त्या लक्ष ठेवून होत्या. तसं काही न दिसल्यामुळं त्यांना वाटलं की वहिनी ख्रिश्चन असल्यामुळं त्यांची पाळी येत नसावी. हे जेव्हा पुढं मला कळलं तेव्हा हसावं की रडावं, हे मला कळेना.

मला तर पावडरचा वास घेववेना. तेलाचा वास सोसेना. नुसती मळमळ. मंगेशला वाटलं, हिला सोड्यानं बरं वाटेल. तोपर्यंत मी सोडा कधी प्यायले नव्हते. त्यानं सोड्याची बाटली मागवली आणि वर माळ्यावर आणून ती उघडली आणि म्हणाला, "पी, लवकर पी." मी "नको, नको" म्हणत असताना माझ्या तोंडात तो ओतायला सुरुवात केली. थोडा सोडा पोटात जाताच, तो तसाच उफाळून वर आला आणि मी भडाभड जमिनीवर ओकून ठेवलं. जिना उतरून खाली मोरीत जाण्याइतका वेळच मिळाला नाही. तेव्हापासून 'सोडा' तर सोडाच पण साधं कोल्ड्रिंक पण मी पिऊ शकले नाही.

माझा त्रास वाढत चालला तसं आईनी सांगितलं, "हिला डॉक्टर म्हस्करांकडं घेऊन जा." त्यांनी तपासून काही औषधं, पुड्या दिल्या. घरात आई पण माझी काळजी घ्यायला लागल्या. म्हणायच्या, "मला 'मंग्या'नंतर तिन्ही मुलीच झाल्या. दर खेपेस आशा वाटायची की, आता तरी मुलगा होईल. सुहासच्या वेळी तर फारच निराशा झाली. मी मुलाचं नाव पण ठरवून ठेवलं होतं. 'सुहास'. पण मुलगीच झाली म्हणून मग तेच बदलून सुहासिनी असं केलं." काकांना तर इतकं वाईट वाटलं की, ते हॉस्पिटलमधे तिला बघायला गेलेच नाहीत. आईंना वाटायचं की, आपल्याला भेटायला तरी त्यांनी यावं. पण ते चौकशी करायला पण गेले नाहीत. पण पुढं हीच सुहास त्यांची सर्वांत लाडकी झाली.

मला त्या 'तिखळी' म्हणायच्या. हा शब्द मी कधी ऐकला नव्हता. तिखळी म्हणजे तीन मुलांवर झालेली मुलगी. ती अपशकुनी असते. घरात काहीतरी वाईट घडतं. ह्याच्या उलट माझ्या घरी मुलगी झाली म्हणून नुसता आनंदोत्सव झाला. कारण माझ्या आईला मुलीची हौस होती. तीन मुलांवर, पुन्हा तिला मुलगा मुळीच नको होता. माझ्या जन्मानंतर हवी ती नोकरी पण बाबांना मिळाली म्हणून त्यांनी माझं नाव 'यशोदा' असं ठेवलं. आणि इथं मी हे काहीतरी वेगळंच ऐकत होते.

आता मला तरी मुलगा होईल ह्या आशेवर त्या होत्या. घरात हातमशिन होती. त्यांनी नवीन कापडं आणली. लहान बाळाचे कपडे, बेतायचे कसे, शिवायचे कसे हे शिकवत असतानाच त्यांच्या लक्षात आलं की मला शिवण्याची चांगली माहिती आहे. कारण माझ्या आईकडं पण शिवणमशिन होतं व माझे कपडे मी स्वत:च शिवत होते. त्यांना खूप आनंद झाला व कौतुक वाटलं. घरात, शेजाऱ्यांना सगळ्यांना-सांगायला लागल्या की, तिला शिवणाची चांगली माहिती आहे. मी काही क्लासला जाऊन शिवण शिकले नव्हते. असंच आईजवळ बसून बघून, प्रयत्न करून शिकले होते.

ह्यापूर्वीच काही दिवस आधी आईंनी घरात विषय काढला की, "मंग्या, मला वाटतं की तूसुद्धा पैसे मिळवण्यासाठी काही तरी नोकरीधंदा करावास." नंतर मला विचारलं की, "तुला काय वाटतं यशोदा?" मी म्हणाले, "मला पण तसंच वाटतं." जास्त चर्चा मी त्यांच्यापुढं केली नाही. खरं म्हणजे माझ्या मनात तेच विचार येत होते. मंगेश सबंध दिवस मधल्या खोलीतल्या सिंगल कॉटवर, दोन उशा मुडपून डोक्याखाली

घेऊन, रेलून बसलेला असे. त्याला कोणीच काही काम सांगत नसे. काका सकाळीच बाजारात जाऊन, मासळी, भाज्या, वाण्याचं सामान असं सर्व आणून द्यायचे. विसरून काही राहिलं तर पटकन प्रभा, सुहास आणून द्यायच्या. तो काहीच काम करत नव्हता. जेवायच्या वेळी मात्र त्याला सर्वांत चांगले माशाचे तुकडे किंवा भरपूर मटण, आवडीची भाजी असं वाढलं जायचं. जर काही कारणानं तो जेवायला उशिरा येणार असला तर सर्वांना जेवण वाढायच्या आधी त्याच्यासाठी चांगले व भरपूर पदार्थ वेगळे काढून ठेवले जायचे. असे नुसते लाड चालू होते.

आता आईंनी जेव्हा कामाबद्दल सुचवलं तेव्हा त्यालाही ते पटलं. तो विल्सन हायस्कूलचे मुख्याध्यापक खिस्ती मास्तर यांच्याकडं गेला. तो त्याच शाळेतून मॅट्रिक झाला होता. मंगेश खिस्तींचा आवडता विद्यार्थी होता. तो फार उत्तम रनर होता. धावण्याच्या शर्यतींत त्यानं खूप कप मिळवले होते. तसंच वक्तृत्वात त्याला नेहमीच बिल्ले, बक्षिसं मिळायची. टेबल टेनिस तो फार चांगलं खेळत असे. आणि चवदाव्या वर्षापासून कविता पण करत असे. बुद्धीही फार चांगल्या दर्जाची होती. पण शिकणं, अभ्यास करणं किंवा परीक्षा देणं, या गोष्टींची त्याला मुळीच आवड नव्हती. त्यामुळं मॅट्रिकला बेताचे मार्क मिळून पास झाला. आणि कॉलेजचं पहिलं वर्ष कसंतरी पास होऊन इंटरनंतर कॉलेज सोडूनच दिलं. पण आश्चर्य म्हणजे खिस्ती मास्तरांनी–त्या भल्या माणसानं ओळखलं होतं की हा सामान्य मुलगा नाही. ह्याच्यामधे ठिणगी आहे. ती केव्हातरी ज्वाला होऊन उठेल.

मंगेश जेव्हा त्यांच्याकडं गेला तेव्हा त्यांनी प्रेमानं त्याची चौकशी केली. आम्ही लग्न केलं हे आमच्या समाजात सर्वांना कळलंच होतं. मला ते चांगले ओळखत होते. मी प्रेमचंद्रराव काकांकडं राहत होते. तेव्हा काही कामानिमित्त दोन वेळा त्यांच्या घरी गेले होते. तसेच माझे दोन भाऊ विजयानंद व हरिश्चंद्र यांच्याच हॉस्टेलमध्ये राहून शिकून गेले होते.

त्यांनी मंगेशला काही मुलांच्या शिकवण्या मिळवून दिल्या आणि अर्धवेळची नोकरी पण दिली. नंतर डी०एड० करावे लागेल म्हणाले. कारण त्याशिवाय जास्त दिवस कामावर ठेवता येणार नाही.

तोपर्यंत काकांनी, म्युनिसिपालिटीतून फॉर्म आणले. क्लार्कच्या जागेसाठी अर्ज करायला सांगितला. अगदी नाइलाजानं त्यानं तो लिहून दिला. आता ह्याला इंटरव्ह्यूला कॉल येईल म्हणून सगळे वाट बघत होते. त्याप्रमाणं एक दिवस कॉल आला, तारीख, वेळ कळली. तो दिवस उजाडला आणि तो इंटरव्ह्यूला गेलाच नाही. म्युनिसिपालिटी एका फार मोठ्या कवीला मुकली असंच म्हणायला पाहिजे. त्यानं क्लार्क व्हावं ही कल्पना मला पण आवडली होती असं मुळीच नाही. पण ह्या एवढ्या शिक्षणावर आणखी मोठी नोकरी दुसरी कुठली मिळणार होती?

मला खरं तर नुकतीच चांगली, मुंबई विद्यापीठाची बी०ए० (ऑनर्स)ची डिग्री मिळाली होती. इंटर न झालेल्यांनाही कॉल येत होता. मला तर चांगली वरच्या

हुद्याची जागा मिळाली असती. ते दिवस वेगळेच होते. मी सर्व कुटुंबाला आधार दिला असता. मनातून माझी खूप तडफड व्हायची. त्या वेळी मी गरोदर होते. पण नसते तरी मला नोकरी कोणी करायला दिली नसती. काकांचा आर्किटेक्चरचा डिप्लोमा सोडल्यास माझ्याइतकं घरात कोणीच शिकलेलं नव्हतं. पण मुलगा शिक्षण सोडून शाळेत शिकवण्या करतो आणि सून ऑफिसात काम करून जास्त पगार घरी आणते हे सहन होणं शक्य नव्हतं. शिवाय लोक बायकोचं खातो म्हणून बोलल्याशिवाय राहिले नसते आणि सुनेच्या पैशावर घर चाललंय हे. आणि थोड्याच दिवसांत काकांना काही कारणानं आधीच रिटायरमेंट घ्यावी लागली. त्यांची काही प्रायव्हेट कामं चालू होती. पण त्यांमधून नियमित पैसा घरात येत नव्हता. फारच ओढाताण व्हायला लागली. काका-आईची खूप भांडणं व्हायला लागली. त्यात माझं बाळंतपण जवळ येत होतं.

सायनला म्युनिसिपालटीतल्या आर्किटेक्ट, इंजिनियर वगैरे लोकांसाठी बरेच प्लॉट्स पाडलेले होते. त्यांचं वाटप करण्याचं काम काकांकडं होतं. त्यांनी स्वत:साठी एक प्लॉट अर्थातच ठेवला होता. एक धाकट्या भावाला दिला. दोन भाच्यांना दोन दिले आणि इतर बाकी लोकांना. तेव्हा तिथं बिल्डिंग बांधण्यासाठी त्यांची धडपड चालू होती.

आमचं लग्न होण्याच्या संदर्भात या घरात किती चर्चा झाल्या, वादविवाद झाले ह्याबद्दल मंगेश मला जास्त काही सांगत नसे. फक्त माझ्या घरातून लग्नाला फारसा विरोध नाही. एवढंच पत्रातून लिहीत होता. माझ्या घरी जोरदार विरोध होता. त्यामुळं मी मात्र, कोण काय म्हणालं, आई माझ्या किती पाळतीवर असते वगैरे सर्व घाबरून सांगत होते. आम्हां दोघांना वेगळं बिऱ्हाड करून द्यावं अशी घरच्यांची इच्छा होती. हे मला नंतर कळलं.

मला चवथा-पाचवा महिना असताना माझी मोठी नणंद कुमुदिनी सौदागर ही बाळंतपणासाठी शांतारामाच्या चाळीत आली. ती फार सुंदर होती. गोरीपान, गोल चेहरा, काळेभोर मोठे डोळे. ती घरात सर्वांची फार लाडकी होती. ती बाळंत झाली. तिला मुलगी झाली. घरात पाणी कमी पडू लागलं. तिला त्रास व्हायला लागला. ती एकदा रागानं निघून जायला निघाली. ती शिवडीला राहत होती. तेव्हा मंगेशनं तिची समजूत घातली की, "मी खालच्या नळावरून, जिन्यानं पाणी वर आणून देईन. पण तू जाऊ नकोस." आणि तो रोज जिन्यावरून पाण्यासाठी खूप खेपा करू लागला. तो फार बारीक होता. लाडात वाढलेला–कष्टाची जिवाला सवय नव्हती. मी गरोदर म्हणून मला ते काम करणं शक्य नव्हतं. असं चाललं होतं. घरात बाळंतीण म्हणून मासे, मटण, भरपूर प्रमाणात काका आणून द्यायचे. चांगले, चांगले पदार्थ आई, आजी करायच्या. माझे डोहाळे कमी होऊ लागले होते.

कुमुदिनीच्या मुलीचं नाव काय ठेवायचं अशी चर्चा चालू होती. मला सर्वांनी म्हटलं, "तुला कुठलं नाव आवडतं? तू नाव सुचव," मी विचार केला व 'शोभना' हे नाव सुचवलं. ते सर्वांना आवडलं. आणि तेच नाव ठेवलं. पण शोभनाचं पुढं 'शोभा' झालं. ती मोठी झाल्यावर मी तिला विचारलं, "तुला तुझं नाव आवडतं का ग?" ती

म्हणाली, "मुळीच नाही. त्यापेक्षा शोभा बरं." मी एकदम थक्कच झाले.

बाळंतपण झाल्यावर कुमु तिच्या घरी निघून गेली, आणि मंगेशची कंबर भयंकर दुखायला लागली. डॉक्टरांना दाखवलं. त्यांनी सांगितलं की हा, आर्थ्रायटिस आहे. गोळ्या दिल्या, शेकणं वगैरे उपाय केले. मग थोड्या दिवसांनी ते दुखणं कमी होत गेलं. हा त्याचा पहिला अॅटॅक, त्यानंतर असे किंवा याहून मोठे अॅटॅक पुष्कळ वेळा येत होते.

मला बाळंत व्हायला अजून पाच-सहा महिने होते, तरी मला मुलगा होणार की मुलगी अशी आई-आजींची चर्चा चाले. डॉक्टर लावतात तसा माझ्या पोटाला कान लावून, बाळाचे ठोके ऐकण्याचा मंगेश प्रयत्न करायचा आणि पोटावर हात फिरवून आतल्या बाळाचे बाहेरून लाड करायचा. मीनलच्या बाळंतपणासाठी मी अमेरिकेला गेले होते, तेव्हा बघते तर अभयनं पोटातल्या बाळाला नाव दिलं होतं व लाडानं त्याच्याशी तो बोलत असे–त्याची चौकशी करत असे. असंच एकदा बोलताना म्हणाला की, "डॉक्टरांनी सांगितलं आहे, की मूल पोटात असल्यापासूनच पालकांनी त्याच्याशी बोललं पाहिजे." ते आवाज मुलाला ऐकू जात असतील का नाही? कोण जाणे! समजा जर जात असले, तर त्या अर्धवट वाढ झालेल्या जिवाला इतर आवाज व आई-बापांचे आवाज ह्यांतला फरक कसा कळत असेल? असू दे. पण अमेरिकेतल्या डॉक्टरांनी सांगितलं आहे ना? मग त्यात काहीतरी तथ्य असणारच ना!

ज्या डॉक्टर म्हसकरांच्या हॉस्पिटलमधे परळला अजित सध्या ऑनररी काम करतो त्याच डॉक्टरांची मला गरोदरपणात ट्रीटमेंट चालू होती. हा एक मोठाच योगायोग आहे असं मला वाटतं.

माहेरचं मला बघायला, भेटायला कोणीच येत नव्हतं. सिंधू पण यायची पूर्णच बंद झाली. तिनं तरी यावं असं मला फार वाटायचं. आमचा पत्रव्यवहार पण बंद पडला. सिंधूशी जवळजवळ संबंध संपला. ती पुढं शिकते आहे एवढंच कानावर येत होतं.

माझा भाऊ हरीश पोलीसमधे सबइन्स्पेक्टर होता. त्याच्या घरी कधी बोलावलं तर मंगेश मला घेऊन जात असे. उषावहिनी व तो आमचं फार अगत्यानं स्वागत करत. पुढं काही वर्षांनी तर मी मुलांना घेऊन त्यांच्याकडं राहायला पण जात होते.

मंगेशच्या आईंनी मात्र फार धैर्यानं आणि शहाणपणानं वागून आमच्या लग्नाला नातेवाइकांत प्रतिष्ठा मिळवून दिली. कुणाच्याही बारशाला डोहाळजेवणाला किंवा हळदीकुंकवाला त्या मला मुद्दाम घेऊन जायच्या. चांगली जरीची साडी नेसायला सांगायच्या. कोणते दागिने घालायचे ते काढून द्यायच्या. लग्न झाल्यापासून कुंकू तर मी रोजच लावायला लागले होते. जाताना वाटेत सुंदर, सुगंधी फुलांच्या वेण्या, गजरे घेऊन द्यायच्या. स्वत: बरोबर मला घालायला सांगायच्या. आणि न संकोचता मला सर्व सारस्वत बायकांच्यात घेऊन जायच्या. मधून मधून हे का करतात, ते का करतात, प्रत्येक विधीमागचा विचार काय आहे ते सर्व समजावून सांगायच्या.

मला फार अवघडल्यासारखं वाटायचं. ह्या नऊवारी नेसलेल्या, दागिन्यांनी नटलेल्या, मध्यम वर्गातल्या स्त्रिया असल्या तरी मला सर्वच नवीन, वेगळं वाटायचं. त्यांचे वेष वेगळे, भाषा वेगळी, हेल वेगळे. आणि मला निरखणारे त्यांचे डोळे पण वेगळेच. एखादा नवीन प्राणी अचानक समोर आल्यावर आपण जशी चटकन नजर वळवून त्याला बघतो, तशा मी आत जाताच सगळ्या नजरा माझा वेध घेण्यासाठी चटकन माझ्याकडं वळायच्या. कसाबसा समारंभ संपवून बाहेर पडताना मी सुटकेचा नि:श्वास टाकत असे.

सासूबाईंचा त्यामागं असा विचार होता की, 'मीच जर वेगळी वागायला लागले, बाहेर जाऊन सुनेविषयी बोलायला लागले किंवा हे लग्न आपल्याला पसंत नाही असं दाखवू लागले तर इतर बायका त्याचा फायदा घेऊन जास्तच बोलतील. चर्चा करायला काहीतरी सनसनाटी हवीच असते.' ह्या त्यांच्या विचारपूर्वक वागण्याचा नक्कीच चांगला परिणाम झाला आणि त्यांचा समाज फारसा आमच्या वाटेला गेला नाही.

अपमानकारक प्रसंग आलेच नाहीत असं नाही. नक्कीच आले. आणि ते चांगलेच लक्षात राहण्यासारखे. आठवण आली की वाटतं, मी हे गप्प राहून सहन कसं केलं आणि कशासाठी? माझा धर्म वेगळा आहे एवढं एकच कारण, बाकी सर्वच बाबतीत, माझ्यात काही कमी नव्हतं.

एकदा आम्ही दोघं लग्नानंतर माझ्या माहेरी येरवड्याला गेलो होतो. तेव्हा कळलं की मंगेशचे एक डॉक्टर मित्र तिथं मेंटल हॉस्पिटलला नोकरीला आहेत. त्यांनी आम्हां दोघांना एकदा घरी जेवायला बोलावलं. त्यांचं लग्न झालेलं होतं. त्यांची आई पण त्यांच्याजवळच राहत होती. आम्ही गेलो तेव्हा त्यांच्या आई स्वयंपाकघरात काम करत होत्या. आणि सूनबाई अंघोळीला की काय गेलेल्या होत्या. तेव्हाच्या पद्धतीप्रमाणं मी साहजिकच बाहेर पुरुष माणसांत न बसता, आत स्वयंपाकघरात जाऊन बसले. आई एकट्याच पुऱ्या लाटून, तळत होत्या. मी त्यांना म्हटलं, "द्या माझ्याकडं मी लाटून देते, तुम्ही तळा." त्या चटकन म्हणाल्या, "नको, नको. आता येईल ना सूनबाई, ती करील मला मदत." बराच वेळ झाला तरी सूनबाई काही आली नाही. म्हणून मी पुन्हा एकदा त्यांना आग्रहानं सांगितलं की, "ती येईपर्यंत मी मदत करते तुम्हांला." त्यावर मात्र त्या जरा जोरानं व अशा सुरात नको म्हणाल्या की, पुन्हा मला काही बोलण्याचा धीर झाला नाही. पण मनात अपराध्यासारखं वाटत होतं की, मी बसून आहे आणि त्या काम करत आहेत. पण मी खिश्चन म्हणून त्या मला हात लावायला देत नाहीत, हे मात्र कितीतरी दिवस माझ्या लक्षात आलं नव्हतं. कारण मी स्वत:ला कोणी वेगळी समजतच नव्हते. पण लोक मला मनातून वेगळी, आपल्यापेक्षा कमी मानतात, याचं भान पण मला राहत नसे. पुढं कितीतरी वर्षांनी जाणीव व बुद्धी प्रगल्भ झाल्यानंतर, ह्या अनुभवांचा उलगडा होत गेला.

दुसरी आठवण आहे, प्रभा व सुहास यांच्या लग्नातली. त्या दोघींची लग्नं,

एकाच दिवशी, एकाच हॉलमधे दोन वेगळ्या खोल्यांत पंधरा मिनिटांच्या अंतरानं होणार होती. तिथं वधूपक्षाला दिलेली एक खोली होती. आम्ही सर्वांनीच आमच्या संध्याकाळी बदलायच्या कपड्यांच्या सूटकेसेस त्या खोलीत ठेवल्या होत्या. तसंच तिथं एका कोपऱ्यात फराळाचे मोठे मोठे डबे ठेवलेले. तो फराळ स्वयंपाक्याकडून करून घेतलेला होता. घरी केलेला नव्हता. त्यावर देखरेख करण्यासाठी मंगेशच्या नात्यातली एक विधवा बाई खोलीत कायम बसून होती. मंगेश त्या वेळी लेंगा-झब्बा घालायचा म्हणून लग्नात परुळकरांकडून त्याला सुंदर सिल्कचं झब्ब्याचं कापड मिळालं. ते त्यानं माझ्याकडं दिलं व सूटकेसमधे ठेव म्हणाला. मी कापड बॅगेत ठेवलं पण कुलूप लावलं नाही. आणि बाहेर आले. मावशी सर्व बघत होत्या. पुन्हा काही कारणानं, मी खोलीत येऊन बॅग उघडली पाहते तर आताच वर ठेवलेलं सिल्कचं कापड दिसत नव्हतं. मी इतकी घाबरले, सर्व बॅग उलटीपालटी करून पाहिली. पण नाही. मी गडबडून आजूबाजूला शोधायला लागले. मावशी शांतपणं माझी गंमत पाहत असाव्यात. आणि अचानक शोधता, शोधता मी फराळाचे डबे ठेवले होते तिथं जायला लागले. त्याबरोबर मला कल्पनाच नव्हती की हा फराळ इथं सोवळ्यात ठेवलेला आहे. त्याबरोबर मावशी दोन्ही हात पसरून माझ्या पुढं आल्या आणि म्हणाल्या की, "तू, पुढं येऊ नकोस, आणि इथं कशालाही हात लावू नकोस." मी म्हणाले, "अहो, मी आता बॅगेत ठेवलेलं सिल्कचं कापड शोधते आहे, तुम्ही पाहिलंत का? कोणी ह्या बॅगेला हात लावला होता का? आताच मंगेशला भेट म्हणून दिलं होतं ते." त्या म्हणाल्या, "मला काही एक माहिती नाही. मी कोणाला पाहिलं नाही. पण तू मात्र इथं कशाला शिवू नकोस." मला मेल्याहून मेल्यासारखं झालं. एक कापड गेलं म्हणून सगळे जण मलाच दोष देणार–कुलूप लावलं नाही म्हणून. वर तर वर ह्या घरातली एकच्या एक सून म्हणजे भावी मालकीण त्या मला ही बाई शिवू नको म्हणून सांगते. असं असूनसुद्धा, त्या मावशीला एक शब्दही उलट न बोलता, मी अतिशय दु:खानं गरिबासारखी त्या खोलीतून निघून गेले. लग्नात रडायचं नाही म्हणून मनातल्या मनात सर्व वेळ रडत होते आणि दु:खी होऊन कोणाला काहीही न सांगता गप्प बसून होते.

सुहासचं लग्न आधीच ठरलेलं होतं. तो प्रेमविवाह होता. आमच्या शेजारीच राहणाऱ्या शशिधर आडारकर नावाच्या मुलाशी. प्रभाचं लग्न शंकर परुळकर यांच्याशी ठरलं. त्या वेळी मी तीन मुलांची आई होते. यांच्या लग्नाच्या आधी मे महिन्यात मी, माझी तीन मुलं व माझी आई, हिंगण्याला मुलींच्या वसतिगृहात एक महिन्यासाठी राहायला गेलो होतो. मंगेशनं मुद्दामच विसाव्यासाठी म्हणून आमची तिकडं व्यवस्था केली होती. अभय दोन वर्षांचा, अंजू सहा व अजित आठ वर्षांचा. मी तिकडं असतानाच इथं प्रभाचा दाखवण्याचा कार्यक्रम झाला. तेव्हा भावानं खिश्चन मुलीशी लग्न केलं म्हणून परुळकर, नाही म्हणतील की काय अशी भीती वाटत होती. पण आबा (परुळकर) सुधारलेल्या मतांचे निघाले. "ते म्हणाले की, 'प्रभाशी लग्न करायचं आहे, त्याचा, तिच्या भावाच्या बायकोशी काय संबंध?"

एक आठवण आहे, माझ्या लग्नाला पंचवीस वर्षं झाल्यानंतरची. काका, आई सायनला खालच्या ब्लॉकमधे वेगळे राहत होते. आम्ही सणाला खाली जेवायला जात होतो. सोवळ्यानं स्वयंपाक झाल्यावर उरलेले मोदक किंवा पुरणपोळ्या माझ्याकडं सोपवल्या जायच्या. देवाची पूजा करून नैवेद्य दाखवून झाल्यावर, सर्वांना जेवण वाढण्याचं काम माझ्याकडं असे. म्हातारी आजी वारल्यानंतर आई त्या मानानं इतकं सोवळं करत नव्हत्या. पिण्याचं पाणी चंद्रभागा भरायची–पुरणपोळ्यांचं पुरण वाटायची आणि इतर सर्वच वाटप करायची. ते सर्व त्यांना चालत असे.

एकदा अशाच होळीच्या पोळ्या करायच्या होत्या. मी वरचं चहाखाणं आटपून अंघोळ करून खाली मदतीला गेले. मंगेशच्या आईंनी नुकतीच पोळ्या करायला सुरुवात केली होती. काय झालं माहीत नाही, त्यांना पोळी लाटायलाच जमेना. त्यांना मी म्हणाले, ''द्या. मी देते लाटून.'' तर म्हणाल्या की, ''माझ्या दोन, तीन, मीच लाटून घेते वेगळ्या. मग बाकीच्या तू लाट.'' काही न बोलता मी गप्प बसून राहिले. माझ्या मनात आलं की चंद्रभागानं वाटून दिलेलं पुरण चालतं कारण ती खालच्या जातीची असली तरी हिंदू आहे. पण मी लाटलेली पोळी चालत नाही. पुरणपोळ्या उरकल्या, जेवणं उरकली. मी वर आले व मंगेशला म्हणाले, ''बघ पंचवीस वर्षं झाली माझ्या लग्नाला. तरी अजून ह्यांनी असंच वागायचं माझ्याशी? मला फार वाईट वाटतं की, चंद्रभागाएवढी पण मी ह्यांना आपली असं वाटत नाही''? ह्या माझ्या प्रश्नाला नेहमीप्रमाणंच उत्तर मिळालं नाही. त्यानं माझं दु:ख, माझी चीड पाहून दोन शब्दांनी माझं समाधान करावं, असं पण त्याला वाटलं नाही. उत्तर दिलं नाही की प्रश्न सुटतो असं त्याला वाटतं. पण माझ्या अनुभवाप्रमाणं प्रश्न सुटत नाहीच–तोच प्रश्न पुढं मनात चीड साठून राहिल्यामुळं, एकदम उग्र रूप धारण करतो. सारासार बुद्धी नाहीशी होऊन, वेड्याची गत होते व उत्तर न देणाऱ्यावरचा विश्वास पूर्ण उडून जातो. एकदम भांबावलेल्या अवस्थेत, एकटेपणामुळं टोकाचे निर्णय घेतले जातात.

अजितच्या वेळी दिवस भरत आले होते. माझं नाव डॉक्टर अजिंक्य यांच्या हॉस्पिटलमधे घातलं होतं. रात्री बारा वाजता माझ्या पोटात दुखायला लागलं. मंगेशनं धावत जाऊन, खूप लांबून टॅक्सी मिळवून आणली. काका, आई, मंगेश सर्व जण मला घेऊन हॉस्पिटलमधे आले. सिस्टरनी तपासलं व सांगितलं की, ''अजून खूप वेळ आहे. तुम्ही सर्वांनी घरी जा, उद्या सकाळी या.'' बाप रे! हे ऐकल्यावर माझं तर अवसानच गळालं. रात्रभर एकट्यानं इथं कळा देत पडायचं ही कल्पना मुळीच सहन झाली नाही.

आताचे डॉक्टर्स पेशंटशी खूप बोलतात. लोकशिक्षण करतात असा माझा अनुभव आहे. त्या वेळी तसं नव्हतं. रांगेत बसलेल्या पंधरा स्त्रियांपैकी मी एक. यांत्रिकपणं एकेक बाई आत आत जात असे. डॉक्टर त्यांच्या पद्धतीनं तपासून पेपरवर काही लिहून ठेवत व पुन्हा कधी यायचं ते सांगत. लिहून ठेवलेलं वाचलं तरी त्याचा अर्थ कळत

नसे. तसंच माझं झालं. बाळाची स्थिती खाली तोंड व खाली हात, म्हणजे उपड्या अवस्थेत असायला पाहिजे होती ती अगदी उलट म्हणजे तोंड वर व हात पण वर. अशा अवस्थेत बाई अडण्याची शक्यता फार असते. कारण हात जरा बाजूला झाला तर सरळ बाळंतपण होऊ शकत नाही. हा धोका हल्ली कोणी पत्करत नाही. सीझेरियन करतात; पण तो काळ वेगळा की काय, कारण माहीत नाही. पण दुसऱ्या दिवशी दुपारी माझ्या कळा वाढल्यावर डॉक्टर स्वत: आत आले. मला सर्व दिसत होतं. हात धुऊन त्यांनी कोपरापर्यंत ग्लोव्ह्ज घातले व शेवटची कळ येण्याआधी हात आत सरकवून त्यांनी मूल उलटं फिरवलं. मंगेश सकाळीच आला होता. त्यानं घरी कळवलं. मुलगा झाला म्हणून घरात नुसता आनंदीआनंद झाला. अगदी म्हाताऱ्या आजीला घेऊन, आई, काका, प्रभा, सुहास सर्व जण खूष होऊन मुलगा बघायला आले. आणि मग तो गोरा किती आहे, दिसतो कोणासारखा, डोळे कोणासारखे, नाक कोणासारखं अशी चर्चा चालू झाली. माझ्या माहेरच्या मंडळींना इकडं कोणीच पाहिलं नव्हतं. त्यामुळं अर्थातच त्यांचा कोणाचाच इथं उल्लेख झाला नाही. शेवटी सर्व जण घरी जायला निघाले. नंतर कळलं की, घरी जाताना आईंनी एक किलो बदामी हलवा घेतला. त्यातला थोडा थोडा इतरांना देऊन, बाकीचा, आनंदाच्या भरात स्वत:च खाल्ला. स्वत:ला दुसरा मुलगा झाला नाही. पण मुलाला मुलगा झाल्यावर तो स्वत:ला झाल्यासारखाच आनंद त्यांना व काकांना झाला. त्याबरोबरच मला मुलगा झाला म्हणून माझा भाव पण वाढला.

हे सर्व अनुभव मला नवीनच होते, कारण माझ्याआधी माझ्या आईला तीन मुलगे झाले होते. "देवा मला मुलगी होऊं दे." अशी प्रार्थना केल्यावर मी झाले. म्हणून माझे मुलांपेक्षाही जास्त लाड झाले. इकडं मात्र वेगळंच चित्र दिसत होतं. एकदा तर सासूबाई मला म्हणाल्या होत्या की, "सहा, सहा महिन्यांनी झाले तरी चालतील पण मुलगेच झाले पाहिजेत." कदाचित त्या ते थोडं गमतीनंही म्हणाल्या असतील.

मी हॉस्पिटलमधे असताना एक दिवस कवी बोरकर भेटायला आले होते. ते बोलता बोलता म्हणाले की, "डॉक्टर अजिंक्य यांच्या हॉस्पिटलमधे मुलगा झाला, तेव्हा त्याचं नाव 'अजित' ठेवा." त्याप्रमाणं तेच त्याचं नाव ठेवलं, कारण ते सर्वांनाच आवडलं पण होतं.

पहिलंच मूल–सर्वच अनुभव नवे. चवथ्या दिवशी दूध येऊ लागलं आणि त्याच वेळी मला थंडी भरून जोरात ताप आला. डॉक्टर आले. तपासून काय औषधं आणायची ते सांगून गेले. म्हणजे नुसता दुधाचा ताप नव्हता. इन्फेक्शनही झालं होतं. त्या वेळी अँटीबायोटिक्स निघाली नव्हती. कसल्या ठाऊक नाही–तेव्हा फारसं काही कळतही नव्हतं. पण चाळीस गोळ्या मला घ्याव्या लागल्या. शिवाय माझ्या खोलीत लाकडी कमोड आणून ठेवला गेला. बिछान्यातून उठण्याला सक्त मनाई केली गेली. झोपून तरी किती राहणार? म्हणून मी एकदा उठण्याचा प्रयत्न केला. खाली पाय ठेवला नाही तोच नर्स आत आली व तुम्हांला जमिनीवर पाय ठेवायची परवानगी नाही. तुम्ही फक्त झोपून रहा, उठायचं नाही असं दमातच सांगून गेली. ताप गेला. पण

गोळ्यांचा व तापाचा परिणाम होऊन, येत असलेलं दूध आपोआप वाहून गेलं. ते पुन्हा नीट, पुरेसं आलंच नाही. आणि कॉन्स्टिपेशन होऊन मूळव्याधीचा भयंकर त्रास सुरू झाला. बाटलीत गरम पाणी भरून शेकायला सांगायच्या सासूबाई. पण त्यानं काही काही फरक पडत नव्हता. शेवटी मला एका डॉक्टर बाईंकडं न्यायचं ठरलं. माझ्या सोबत मंगेश होता.

बाईंनी एका मोठ्या बसक्या टेबलावर मला झोपायला सांगितलं. त्याला पायाकडं काहीतरी यंत्र होतं, ते फिरवलं. त्यातून एक नळा बाहेर आला. तो पाहून माझी छातीच दडपली. मंगेश तर बाहेर बसलेला. आवाज काढण्याचं धैर्य माझ्यात नव्हतंच. आणि नंतर माझी जी तपासणी त्या डॉक्टर बाईंनी केली! मला इतक्या वेदना व्हायला लागल्या की प्राणच जायचा बाकी राहिला.

इतकं सर्व झाल्यावर एक ट्यूब लिहून दिली. "हे लावा–गरम पाण्यानं शेका. इतकं दुखत असताना, मी काही करू शकत नाही, आणि दुखणं थांबल्यावर पुन्हा माझ्याकडं या," असं बाईंनी सांगितलं. मी निराश मनानं व खचलेल्या शरीरानं घरी आले. मला वाटलं होतं की बाई असा काहीतरी इलाज करतील आणि मला थोडा तरी आराम पडेल. पण झालं उलटंच.

त्यानंतर कांहीं दिवसांनी मला एका वैद्याकडं (राजवैद्य) नेलं. त्यांना सांगितलं, "मूळव्याधीचा त्रास आहे व दूध येत नाही." त्यावर त्यांनी एक मोठी बाटली भरून कसला तरी काढा दिला आणि आयुर्वेदाच्या गोळ्या व पुड्या दिल्या.

मुलाला दूध पुरत नाही म्हणून सांगितल्यावर ते भयंकर चिडले. "दूध येईलच कसं? दूध म्हणजे काय?" आम्हांला तेव्हा काहीच कळत नव्हतं. घाबरून त्यांच्या तोंडाकडं पाहत राहिलो. मग म्हणाले, "दूध म्हणजे रक्त. स्तन कापून बघा मागं फक्त रक्त आहे. हिच्या अंगात रक्तच कमी आहे. दूध येणार कुठून?" आणि त्यांनी कडाडून नव्या बाळंतपणाच्या पद्धतीवर टीका केली. जुनी पद्धतच कशी चांगली होती हे पटवून देण्याचा प्रयत्न केला.

सर्व औषधं घेऊन आम्ही घरी आलो. मी नियमितपणं दिलेलं औषध घ्यायला लागले. दूध काही वाढलं नाही पण मूळव्याधीचा त्रास कमी होऊ लागला. पंधरा दिवसांत खूपच फरक पडला. बाळंतपण संपत आलं. पण ह्या भयंकर अनुभवांनी बाळंतपणाचा मी धसकाच घेतला, मंगेशला म्हणाले, "पहिलं मूल लवकर झालं ते झालं, पण आता मात्र मला लवकर मूल नको." मला मुंबईची अजिबात माहिती नव्हती. कोणाची ओळख पण नव्हती. तेव्हा, "तू जरा चौकशी कर आणि त्यासाठी, कोण डॉक्टर असतील त्यांच्याकडं मला घेऊन चल." पण मी काही फार महत्त्वाचं बोलते आहे असं त्याला वाटलंच नाही. त्यानं ते मनावर घेतलं नाही. सोईस्कर दुर्लक्ष केलं. चाळीची, अडचणीची, घाण जागा. पैसे नाहीत. घरात शाळेत जाणाऱ्या दोन बहिणी, आई, काका व म्हातारी आजी. तेव्हा आता काळजी घेतली पाहिजे असं मला मनापासून वाटत होतं. पण कुठल्याच बाबतीत मला निर्णय घेण्याचा अधिकार नव्हता.

अजितनं चांगलं बाळसं घेतलं होतं. तो खूप गोरा होता. गोल चेहरा फार सुंदर दिसायचा आणि कुरळ्या सोनेरी केसांचा कोंबडा काढला की रस्त्यावर लोक बघतच राहायचे. त्याला तेल लावणं, अंघोळ घालणं सर्व प्रकारे त्याची काळजी आईच घ्यायच्या. मला कळत नाही आणि माहिती नाही असं त्यांना वाटायचं आणि ते खरंच होतं. तसंच आपल्याला बाळाच्या घरगुती औषधांचं खूप कळतं असं त्यांना वाटायचं. सहाणेवर तुरटी, वेखंड वगैरे औषधं, आठवड्यातून दोनदा सकाळी उगाळून त्याचं कडू चाटण तयार करायच्या. प्रत्येक औषधाचे किती वेढे उगाळायचे, प्रत्येकाचे गुणधर्म कोणते, ते मला समजावून सांगायच्या. ही नावं मी पूर्वी कधी ऐकली पण नव्हती. ती उगाळून झाली की ती त्याला मांडीवर घेऊन जबरदस्तीनं चाटवण्याचा कार्यक्रम सुरू व्हायचा. अजित जोरजोरानं रडून सगळं घर डोक्यावर घ्यायचा पण त्या त्याला सोडत नव्हत्या. आणि काही तासांतच त्याला पातळ परसाकडे व्हायला सुरुवात व्हायची. तो दूध घेत नसे आणि मलूल होऊन जायचा. बुधवार आणि रविवार उजाडला की मला भीती वाटायची. मला वाटायचं, मुलाला काही झालेलं नसताना अशी मोघम औषधं देऊन त्रास का द्यायचा? ह्याचा त्याच्या प्रकृतीवर चांगला परिणाम होतो की वाईट? त्यांच्याकडं काही बोलण्याची तर मला हिम्मतच नव्हती. अजित फक्त माझ्या पोटातून आला इतकंच. नाहीतर तो आपलाच मुलगा आहे एवढं त्या त्याचं करायच्या.

एकदा तो चाटवण्याचा प्रकार बघणं मला इतकं असह्य झालं की, मी मंगेशकडं त्याबद्दल बोलले, "हे काय चाललंय? आणि कशासाठी?" त्यानं मला काही न बोलता, माझ्या पश्चात आईंना जाऊन सांगितलं. काय सांगितलं हे मला अजूनही ठाऊक नाही. त्याचा परिणाम मात्र माझ्या लगेच लक्षात आला. दुसऱ्या दिवसापासून आईंनी, अजितला तेल लावणं, अंघोळ घालणं, औषध देणं, बाटलीनं दूध देणं सर्व सोडून दिलं. त्या मनातून खूप रागावल्या होत्या. पण मला मात्र काहीच बोलल्या नाहीत. पुष्कळ चांगल्या गोष्टी त्यांनीच मला शिकवल्या. हातमशिनवर कपडे, गोधड्या शिवणं, मुलाची स्वच्छता, पाणी उकळवणं, त्याची भांडी वेगळी ठेवणं वगैरे. इतकंच नाही तर त्या नेहमी सांगायच्या मुलांच्या लहानशा दुखण्याकडंसुद्धा दुर्लक्ष करायचं नाही. एका रात्रीत त्यांचा आजार वाढून विकोपाला जाऊ शकतो. हा मंत्र मी कायम लक्षात ठेवून मुलांना वाढवलं.

माझ्या आईच्या व सर्वांच्याच मनाविरुद्ध, मी घरातून निघून जाऊन लग्न केलं होतं. पुन्हा तिथं गेले तर मला कशी वागणूक मिळेल याची खात्री वाटत नव्हती, "चालती हो, पाय ठेवू नको घरात." असं जर आई म्हणाली तर काय करू? कारण असं बोलण्याइतका तिचा स्वभाव कडक होताच. तरी एकदा धीर करून मला मंगेशनं येरवड्याला घरी नेलं. संध्याकाळ होऊन गेली होती. आई एकटीच घरात होती. आम्हांला अचानक दारात पाहून तिच्या नजरेत कोणकोणते भाव उमटले म्हणून सांगू? राग तर नक्कीच नव्हता. आश्चर्य, आनंद व जावई घरी आला म्हणून थोडा संकोच होता. तिनं आमचं स्वागतच केलं. तिला वाटलं असेल, पुन्हा ह्या

जन्मात माझी तिची भेट होईल की नाही! मी नसते आले तर ती काही आपणहून माझ्या घरी आली नसती. तिला मी फार दु:ख दिलं ह्याची मला नेहमी खंत वाटायची. आयुष्यात सुखापेक्षा तिनं दु:खच जास्त सोसलं होतं. त्यातच मी ही भर घातली.

नरेश मंत्री वर्ध्याजवळ काकावाडीला जाऊन राहिले होते. ते तिथं हिंदी भाषेचं शिक्षण घेत होते. आणि भाषेच्या प्रसारकार्यात मदत करत होते. अजित वर्षाचा होऊन गेला तरी मंगेशला मनासारखं काहीच काम मिळेना. आणि एक दिवस अचानक त्यानं मला सांगितलं की, "मी पण काकावाडीला जातो. नरेश तिथं आहेच. मी हिंदी भाषा शिकेन आणि वर मला पंचाहत्तर रुपये मिळतील ते मला पुरतील. तू इथंच आई, काकांकडं रहा." मला एक जोरदार धक्का बसला. मला शांतारामाच्या चाळीत राहायला मुळीच आवडत नव्हतं. मोकळ्या रानात वाढलेल्या मला इथं घाणीत कोंडून घातल्यासारखं वाटायचं. पण ते मी मंगेशसाठी सहन करत होते. आणि हा जर वर्षभर वर्ध्याला जाऊन राहणार असेल तर मी एकटी इथं कशाला राहू? मी रडारडी किंवा आक्रस्ताळेपणा न करता त्याला सांगितलं की तू जातोस तर मी पण तुझ्याबरोबर येणार. मी एकटी इथं राहणार नाही. माझ्या मनात आलं की मी ह्याच्यावर प्रेम केलं म्हणून मी ह्या घरात आणि सर्व दृष्टींनी मला अपरिचित वातावरणात आणि ह्या माणसांत येऊन पडले. पण आता सोईस्करपणं मंगेश हा मुद्दा विसरून जातो आहे. मला इथं राहणं कसं वाटेल? हा विचार करण्याची त्याला आता जरूर वाटेनाशी झाली आहे. शेवटी मी आणि अजितनं त्याच्याबरोबर जायचं असं ठरलं आणि त्या चाळीतून माझी सुटका होणार म्हणून मला अत्यानंद झाला.

१९५२ सालच्या मे महिन्यात आमचं लहानसं कुटुंब वर्ध्याला जाऊन पोहोचलं. चाळीसारख्या ओळीनं बांधलेल्या खोल्या होत्या. त्यांतली अगदी पहिली जागा आम्हांला दिली होती. आत दोन खोल्या आणि मागच्या अंगणात नळ होता. मी आवडीनं सगळं सामान जागेवर लावलं. स्वयंपाकासाठी एक स्टोव्ह व एक लहान शेगडी होती. घासलेट, कोळसे आणले. जय्यत तयारी झाली. जेवायला मंगेश, नरेश, मी व लहानगा अजित.

काकावाडीत मांसाहारी जेवणाला, तंबाखू ओढण्याला, बंदी होती. तसंच तिथं राहणाऱ्यांना खादीचे कपडे वापरावे लागत. त्यासाठी मला मुंबईहून जाताना दोन जाड खादीच्या साड्या घेतल्या होत्या. एक धुवायची व एक नेसायची. त्या मला सुरवातीलाच झेपेनाशा झाल्या. स्वयंपाकाची भानगड अशी झाली की, मुंबईला सोवळ्यामुळं मला स्वयंपाक-खोलीत जायलाच मिळत नव्हतं. त्यामुळं सारस्वती पद्धतीच्या स्वयंपाकाची जरासुद्धा माहिती नव्हती. नारळ खूप महाग. तो फोडता पण येत नव्हता. ह्या दोघांना तर आई-आजीच्या हातचं चांगलंचुंगलं खायची सवय

झालेली. आणि मला तर काहीच येत नाही. स्वतंत्रपणं संसार करण्याची पहिलीच वेळ. त्यातच नुकते पाय फुटलेलं, प्रत्येक वस्तूला हात लावून, तिची ओळख करून घेण्याचा प्रयत्न करणारं मूल. त्याला आम्ही सात माणसांच्या घरातून अचानक उचलून आणलं आणि दिवसभर त्याला फक्त मीच एकटी दिसू लागले. अजितचं वय एक वर्ष तीन महिने. त्यामुळं सारखा माझ्यामागं फिरून मला त्रास देऊ लागला. रडून गोंधळ करू लागला. काम करताना, स्टोव्ह बंद करून त्याला घेऊन बसावं लागे. नरेश आणि मंगेश जेवायला आले तर जेवण तयार नसायचं.

शेवटी असं ठरलं की माझा स्वयंपाक होईपर्यंत एक दिवस नरेशनं व एक दिवस मंगेशनं त्याला सांभाळायचं. पाण्यात खेळायला त्याला फारच आवडायचं. मी जमिनीवर भरून ठेवलेले हंडे तो सरळ ओतून टाकायचा. सर्व पाणी पुसून पुन्हा भरून ठेवावं लागे. कारण सकाळी नळ फक्त एका तासच चालू असायचा.

रवींद्र केळेकर व सौ० गोदूताई केळेकर तिथंच राहत होते. त्यांचा भाऊ वीरेंद्र हा तरुण मुलगा होता. तो एकदा अजितला खेळायला घेऊन गेला. अजित तेव्हा पाण्यालां 'द्या' म्हणायचा. तिथं एक हौद होता. वीरेंद्रला त्यानं इतका त्रास दिला की शेवटी त्यानं त्याला पाण्यानं भरलेल्या हौदातच बुडवून काढलं. तो मला इतर कामात पण मदत करायचा. बाजार लांब असल्यामुळं, तो बाजारात जाताना मला काही हवं आहे का, ते विचारूनच जात असे. तिथं रवींद्र-गोदूताई यांची फार चांगली सोबत होती.

असं नुकतंच कुठं बस्तान बसत होतं. आजूबाजूला हिरवी शेतं, झाडं आणि शहरापासून दूर मोकळ्या, शुद्ध हवेत राहण्याचा आनंद अनुभवत असताना माझ्या लक्षात आलं की माझी पाळी चुकली आहे आणि मला पुन्हा डोहाळे लागलेत. बघता बघता चांगलाच त्रास व्हायला लागला. पोटात अन्नाचा कण ठरेना. मळमळ, ओकाऱ्या यांनी अगदी बेजार होऊन गेले.

एक दिवस नरेश म्हणाले, "यशोदा, तुला लसणीची फोडणी देऊन केलेलं मसूरचं सुकं करता येतं का?" मी म्हणाले, "अशा काही पदार्थाचं मी नाव पण ऐकलं नाही. पण तुम्ही कसं करायचं ते साधारण सांगितलंत तर मी करण्याचा प्रयत्न करते." त्यांना नीट काही सांगता येईना तरी मी मसूर भिजत घातले आणि अंदाजानं दुसऱ्या दिवशी काहीतरी वेगळाच पदार्थ करून ठेवला. तो काही त्यांच्या मनासारखा झाला नाही. कारण पुन्हा कधी मसूरचं सुकं कर असं त्यांनी मला सांगितलं नाही.

वर्ध्याला पोहे फार चांगले मिळायचे म्हणून मंगेशनं एकदा मुद्दाम बाजारात जाऊन पोहे आणले आणि मला म्हणाला, "संध्याकाळी पोहे कर." मी म्हटलं, "मला पोहे करता येत नाहीत. आणि आज मला इतकं मळमळतंय की फोडणीचा वास पण सोसत नाही. मी पोहे करू शकणार नाही." त्यांना दोघांना खूप वाईट वाटलं. शेवटी मंगेश म्हणाला, "बरं, हरकत नाही. तू नुसती तयारी करून दे. मी टाकतो फोडणीला."

त्याप्रमाणं शेवटी पोहे तयार झाले व दोघांनी आनंदानं खाल्ले.

एकदा शेजारी आप्पाजींनी खूप चांगलं जेवण करून नरेशना व आम्हांला दोघांना जेवायला बोलावलं होतं. आम्ही गेलो, बसलो. जेवण वाढलं. आणि पहिला घास तोंडात घेतल्याबरोबर मंगेश पानावरून उठला. सगळे बघतच राहिले, "काय झालं तरी काय?" त्यानं सांगितलं, "मी हे जेवण जेवू शकणार नाही, कारण त्यात मोहरीच्या तेलाचा जो वास आहे, तो मला सहन होत नाही." सर्वांनाच फार वाईट वाटलं. नरेश व मी कसेतरी जेवलो आणि घरी आलो.

काकावाडीत असताना एक फार आनंदाची घटना घडली आणि ती म्हणजे कवी 'अनिल' यांची ओळख झाली. मी एकटीच घरात होते. संध्याकाळी चारचा सुमार असेल. मी समोरच्या खोलीत उभी होते, आणि सहज समोर बघितलं तर एक देखणा मनुष्य रस्त्यावरून चालत येत आहे– अनोळखी माणूस दिसतो. आपल्याकडं येत नसेल असं मनात येतं म्हणेपर्यंत ते आमच्या घरात येऊन उभे राहिले. त्यांनी स्वत:च आपली ओळख करून दिली. "मी आत्माराम रावजी देशपांडे". नाव ऐकून माझ्या डोक्यात काहीच प्रकाश पडला नाही हे त्यांच्या लक्षात आलं असावं. त्यावर ते पुढे म्हणाले, "मी कवी अनिल." मग मात्र समजले आणि माझी पण मी ओळख करून दिली. नंतर कळलं की नागपूरला ते राहतात. ते डिस्ट्रिक्ट जज्ज आहेत. आणि शिवाय कवी आहेत. आमच्या खोलीच्या व्हरांड्यात बसून, काव्यवाचनाच्या, काव्यगायनाच्या बैठकी त्यानंतर होत राहिल्या. ते कविता गाऊन म्हणायचे. मी अजितला घेऊन आत खोलीत बसून ऐकत असे. तेवीस, चोवीसचं वय. त्यांच्या सुरांनी मी आतल्या आत अगदी भारावून जात असे. पुढं कितीतरी वर्षं त्या सुरांच्या आठवणीनं माझं मन हेलावून जात असे.

एकदा त्यांनी मंगेशला आणि नरेशला कोर्टात बोलावलं. म्हणाले, "आज बलात्काराचा खटला चालणार आहे. तो तुम्ही ऐकायला या. बाईची किंवा मुलीची वाट्टेल ते प्रश्न विचारून किती मानहानी केली जाते, ती ऐकायला या." त्याप्रमाणं हे दोघं गेले होते.

त्यानंतर एकदा त्यांनी आम्हांला तिघांना त्यांच्या नागपूरच्या बंगल्यावर राहायला बोलावलं होतं. कुसुमावतीबाई तेव्हा तिथंच कॉलेजमधे प्रोफेसर होत्या. त्यांनी दोघांनी मिळून आमचा फार प्रेमानं पाहुणचार केला. मी डोहाळ्यांनी बेजार झाले होते. त्यात काम पण खूप पडायचं. त्यांच्याकडं गेल्यावर मला एकदम विसावल्यासारखं झालं–माहेरी गेल्यासारखं वाटलं. आणि गेल्यापासून अशी झोप यायला लागली की बोलून सोय नाही. रात्री दहाला अजितला बाटलीनं दूध पाजून झोपायचं होतं, पण जेवणानंतर मला इतकी गाढ झोप लागली की, कुसुमावतीबाईंनी मला उठवलं म्हणून मी उठले. बघते तर त्यांच्या हातात अजितची दुधाची बाटली. दूध स्टोव्हवर गरम करून, बाटली भरून माझ्या हातात त्यांनी आणून दिली. मला म्हणाल्या, "त्याची दुधाची वेळ झाली ना? तुला झोप लागली म्हणून बाटली भरूनच घेऊन आले."

मला तर काय बोलू तेच कळेना.

त्यांच्या एका मुलाचं नाव अभय आहे. तेव्हा तो घरात होता. आणि ह्या सारख्या 'अभय' 'अभय' म्हणून बोलायच्या. हे नाव मी पहिल्यांदाच ऐकलं आणि ते मला फार आवडलं. मी मनात विचार केला, आता मला दुसरं मूल होणार आहे. मुलगा झाला तर 'अभय'च नाव ठेवायचं. असे सुखाचे दोन-तीन दिवस मागं ठेवून आम्ही पुन्हा काकावाडीला आलो.

त्याच सुमारास मुंबईहून पत्र आलं की, 'आईंच्या गुडघ्याची वाटी सरकली होती म्हणून त्यांना हॉस्पिटलमधे ठेवलं होतं. आता घरी आणलं आहे आणि विसावा घ्यायला सांगितलं आहे'. मंगेशला खूप वाईट वाटलं. तो लगेच मुंबईला जायला निघाला. आईला भेटून येतो म्हणाला. चारच दिवसांनी परत आला तो आईंना घेऊनच. मी खूप घाबरले. कारण मला डोहाळे लागलेत हे त्यांना आम्ही कळवलं पण नव्हतं. आता मला पाहून त्यांच्या लक्षात येईल, मग त्या काय म्हणतील?

आल्यावर त्यांनी मला विचारलं, "यशोदा, तुला बरं वाटत नाही का?" माझी प्रकृती ढासळलेली आहे हे त्यांच्या लक्षात आलं. मी थोडक्यातच उत्तर दिलं, "हो." "काय होतंय तुला?" मी गप्प. मग त्यांनी सरळच विचारलं, "पाळी आली होती का ह्या महिन्यात?" तेव्हा माझा नाइलाज झाला आणि खरं ते सांगावं लागलं. मग थोड्या वेळानं म्हणाल्या की, "काही हरकत नाही, अगदी सहा, सहा महिन्यांनी झाले तरी चालतील. पण मुलगे झाले पाहिजेत."

म्हणजे, मी काय मुलगे तयार करायचं यंत्र आहे की काय? आणि नाही झाला मुलगा, किंवा मुलगीच झाली तर ह्या काय करतील? मला खरं तर मुलीच जास्त आवडायच्या. मुलगा होणं किंवा असणं ह्याला हिंदू संस्कृतीत किती महत्त्व दिलं आहे हे त्या वेळी माझ्या लक्षात आलं. मी ज्या वातावरणात लहानपणापासून वाढले त्यात हिंदू संस्कृतीत असलेलं मुलग्याचं महत्त्व माझ्या मनावर इतकं कधी ठसलेलं नव्हतं.

सासूबाईंचा गुडघा दुखायचा म्हणून मी रोज अंघोळीच्या आधी तो तेलानं चोळून देत होते. पण डोहाळ्यांनी मला इतका अशक्तपणा आला की ते काम झेपेना म्हणून मी एक बाई ठरवली मग ती ते काम करू लागली.

काकासाहेब कधी दिल्लीला जायचे. कधी काकावाडीत असायचे. मंगेश आईला घेऊन आला हे त्यांना कळलं होतं. एकदा तो त्यांना भेटल्यावर, त्यांनी त्याला विचारलं की, "आईला घेऊन येण्यापूर्वी यशोदेला विचारलं होतं का?" घरी आल्यावर त्यानं मला हे सांगितलं. मी बोलले काहीच नाही. पण मनात आलं की, ही माणसं वेगळ्या जगातली आहेत. कारण माझ्या संदर्भात हा विचार मी स्वत:सुद्धा करू शकत नव्हते. ती त्याची आई आहे आणि त्याला हवं तेव्हा तो तिला घेऊन येणार–तो त्याचा हक्कच आहे, असंच मी धरून चालले होते.

त्या आल्यामुळं एक मात्र फायदा झाला की, इथं त्या सोवळं वगैरे करत नव्हत्या. फक्त सोमवारचा व गुरुवारचा उपास चालू होता. त्यांनी बसल्या बसल्या बरेच पदार्थ कसे करायचे ते शिकवलं. रसगोळीची आमटी, मसाल्याची आमटी ('सांबार' हा त्यांचा कोकणी शब्द) काही भाज्या वगैरे. मटण, माशांचा तिथं प्रश्नच येत नसे.

मंगेशच्या काव्यलेखनाला मात्र तिथं अगदी बहर आला; कवी बोरकर व तांबे यांच्या प्रभावातून सुटलेली स्वतंत्र शैलीची कविता निर्माण होऊ लागली. उदाहरणार्थ, त्याची 'सत्कार' ही कविता :

मातीची ही मात मृत्युवर
मृत्युंजय श्रद्धेचा अंकुर
हा सृजनाचा विजयध्वज, हा जीवनसाक्षात्कार
पहिल्या हिरव्या तृणपात्याचा आज असे सत्कार.

तर 'निवांत' ही कविता निसर्गचित्रासारखी व खरी :

कोवळ्या पाण्याचा लखख आरसा
त्यांत डोकावे शुभ्र ढगाचा गुलजार ससा!

तसंच पुढं :

पाऊलवाटेला लाडिक घाई
लाल वळसा घेऊन असा पुढेंच जाई!

तसंच सुंदर चित्र रात्रीचं आहे. 'रात्र भिजली' या कवितेत :

रात्र भिजली,
कांपऱ्या तंद्रींत
पानें निजलीं.

काजवा उडे,
एकला झुरत
मालवे...बुडे.

त्याच वेळी स्वतंत्र संसाराला आमची सुरुवात झाली होती. आईवडिलांवर अवलंबून राहून नि:शंक मनानं नुसता आनंद लुटण्याचे दिवस राहिले नव्हते. संसाराच्या अडीअडचणींना तोंड द्यावं लागत होतं. माझ्या प्रकृतीच्या तक्रारी, अजितची काळजी घेणं, महिनाअखेरपर्यंत पैसे पुरवणं, संपलेल्या वस्तू लांबच्या बाजारातून आणून देणं, हिंदीचा अभ्यास करून त्यात प्रावीण्य मिळवणे ह्या गोष्टींना तोंड देता देता, झऱ्यासारखी झुळझुळ वाहून गोड

गाणी गाणारी त्याची नाजूक प्रतिभा घाबरली आणि 'जिप्सी' सारखी कविता प्रसवू लागली. शेवटचं कडवं :

घर असूनहि आतां घर उरलेलें नाहीं
चार भिंतींची जिप्सीला ओढ राहिलेली नाहीं
कुणीं सांगावें? असेल पूर्वजन्मींचा हा शाप
घडी सुस्थिरपणाची विसकटे आपोआप...
कुणी तरी साद घाली दूर अनंतामधून...
एक जिप्सी आहे माझ्या खोल मनांत दडून...

हा संसार त्याला मोकळं उडण्यापासून, नि:शंकपणं स्वत:त मग्न राहण्यापासून अडवू लागला आणि त्यानं नकळत म्हणायला सुरुवात केली :

माग हवें तें गडे तूं
माझे पंख मागूं नको!
रेशमी ही झुळझुळ धुंद निर्झराच्या काठीं
इथें मखमली एकान्त तुझ्यासाठीं, तुझ्यासाठीं
जरी तुझाच निर्झर...
त्याची गती मागूं नको
माझे पंख मागूं नको!

गीत तुझें; गावयाचें-
माझें वेड मागूं नको
...सुगंधाच्यासाठीं पण
विकास तूं मागूं नको
...दान स्वप्नाचें देऊन
जाग माझी मागूं नको...

ही कविता ऐकल्यावर मी मनातून घाबरले होते. माझंच काही चुकतं की काय? आता नवा संसार दोघांचाच असतो, मला पण अनुभव नाही, अशा वेळी हवं नको, अडीअडचणी सांगायच्या कुणाला? दुसऱ्याला सांगायला एक तर धीरच होणार नाही. आणि धीर करून सांगितलंच तर तो आम्हांलाच मूर्खात काढणार नाही का? लग्न तर केलं होतं. निसर्गनियमानुसार मुलं होत होती. काळज्या वाढत होत्या.

त्यानंतरची कविता : 'जवळपणाचें झालें बंधन'. ज्या जवळपणासाठी तीन वर्षं जीव तडफडला होता. ते जवळपण, पुढच्या दोन-तीन वर्षांतच इतकं बंधनकारक वाटू लागलं?

धुंदपणीं त्या...अंधपणीं त्या भान राहिले नाही हे पण
इतुके आलें जवळ जवळ की जवळपणाचे झाले बंधन

नव्हती जाणिव होइल म्हणुनी शृंखलाच हे मधु आलिंगन
इतुके आलें जवळ जवळ की जवळपणाचे झाले बंधन

कळलें आतां असून डोळे नव्हती दृष्टी नव्हते दर्शन

... ...

गुंफियलेले कर हे झाले पहा साखळ्या,
मीलन कसले? जे न बघूं दे दिशा मोकळ्या
खोल उरीं कुणि तडफडले, पण जाणवले नच ते आक्रंदन
इतुके आलें जवळ जवळ की जवळपणाचे झाले बंधन.

पुढं पण तेच वेगळ्या संदर्भात, वेगळ्या उपमा देऊन, पण अर्थ तोच. अशा तऱ्हेनं त्याची कविता वेगवेगळ्या अनुभवांतून, वेगवेगळं रूप, आकार, आशय, इच्छा घेऊन प्रगट होत होती; पण मी मात्र मनातून दुखावले, खंतावले. असं वाटलं की उगीच एवढा मोठा धोका पत्करून लग्न केले. त्यापेक्षा त्याची प्रेयसी म्हणूनच राहिले असते तर, संसाराच्या, मुलांच्या, त्याच्या लहरी स्वभावाच्या केवढ्या तरी जबाबदाऱ्यांतून मोकळी झाले असते. प्रेम कायम राहिलं असतं. आणि दोष मला देण्याचं कारण पण राहिलं नसतं. पण आता प्रत्यक्षात दुसऱ्या बाळंतपणाच्या तयारीला लागणं प्राप्त होतं. पुन्हा माझी रवानगी आईबरोबर शांतारामाच्या चाळीत झाली. पाचवा महिना लागला होता. लहानगा अजित बरोबर होता. पुन्हा त्या घरात जायचं, अस्वच्छ वातावरणात, पाण्याची टंचाई, गर्दी, सोवळ्याचा धाक, घामोळ्यांची खाज, संडासाची घाण. मन मारून नाइलाजानं, प्रेमापोटी, मंगेशशिवाय तिथं गेले.

पोटातलं मूल फिरू लागलं होतं. भेटलेली माणसं, "काय, पुन्हा गडबड दिसते? प्रकृती खराब झालेली दिसते?" वगैरे प्रश्न विचारायला लागली. लाजेनं मान खाली घालण्याशिवाय मी काही करू शकत नसे. अजून काका-आईंच्याच जबाबदाऱ्या पूर्ण झाल्या नव्हत्या. त्यांच्या दोन मुली शाळेत शिकत होत्या. त्यांची शिक्षणं, लग्नं सर्व बाकी होतं. मंगेश मोठा मुलगा म्हणून आर्थिकदृष्ट्या त्याची थोडीतरी मदत व्हावी ही त्यांची साहजिकच इच्छा असेल. निदान माझी तरी तशी इच्छा होती. आणि आम्ही तर मदत न करता, त्यांच्या आणखी जबाबदाऱ्या वाढवतो आहोत, ह्याची मला दिवसेंदिवस शरम वाटू लागली. गरोदरपण व लहान मूल ह्यांमुळे मी पूर्णपणे घरात अडकले. त्रास घेऊन, कष्ट करून पूर्ण केलेलं पदवीपर्यंतचं शिक्षण युनिवर्सिटीतच राहिलं. माझं सर्टिफिकेटसुद्धा आणण्याचा विचार केला गेला नाही. त्याचे कारण नंतर असं सांगितलं गेलं की ते माझ्या पहिल्या नावानं, म्हणजे 'कु० यशोदा उजगरे' ह्या नावानं मिळेल, 'यशोदा पाडगावकर' करून घ्यायला फार खटपट करावी लागेल. अरे,

पण मी यशोदा भास्करराव उजगरे असतानाच जर शिक्षण घेतलं आहे, परीक्षा दिली आहे, तर मला त्या नावानंच सर्टिफिकेट मिळणं योग्य नाही का? लग्नानंतर माझ्या धर्माचं जवळजवळ उच्चाटन झालं–तसंच पहिल्या आडनावाचं.

मनातून देवावर माझा विश्वास नाही. नंतर नंतर विचार करून, बुद्धीला परिपक्वता आल्यावर तर मी पूर्ण नास्तिक झाले. पण त्या कोवळ्या वयात, कळायला लागल्यापासून दर रविवारी चर्चमधे जाणं, समाजात वावरणं, मित्रमंडळींच्या लग्नाला जाणं, नाताळचा सण नवीन कपडे घालून चर्चमध्ये जाऊन साजरा करणं. तसंच घरात करंज्या, चकल्या, केक, डो-नट इत्यादी पदार्थ करून त्यांवर ताव मारणं हे असायचंच. नाताळच्या दिवशी घरात मटणाचा पुलाव किंवा बिर्याणी हमखास असायचीच. त्याशिवाय नाताळ पार पडला असं वाटतच नसे. नवीन वर्षाचा पण असाच उत्सव साजरा केला जायचा. २५ डिसेंबर ते १ जानेवारी हा पूर्ण आठवडा एका आनंदाच्या धुंदीत जायचा. नाताळच्या दिवशी न चुकता, आई खाण्याची पानं, चुना, कात सुपारी, बडिशेप असं सर्व एका ताटात ठेवायची. दुपारचं जेवण झालं की पान खाण्यात जो आनंद असे, तो परत कधीच अनुभवला नाही. सरलला व मला एक महिना आधीच सुंदर कापड आणून, आमची मापं घेऊन ती वेगवेगळ्या फॅशनचे फ्रॉक हातमशिनवर शिवायची. ते घालून सबंध दिवस एकमेकांची चेष्टामस्करी करत, खेळत, उड्या मारत, समोरच्या उघड्या अंगणात, झाडाखाली आनंदानं आम्ही बागडत असू.

नंतर त्या फक्त आठवणीच राहिल्या. लग्नानंतर त्यांचे सण कसे साजरे करतात ते शिकू लागले. दिवाळी, दसरा, संक्रांत, गुढीपाडवा, होळी वगैरे. प्रत्येक सणाला वेगळं पक्वान्न, वेगळी पूजा, नैवेद्य. पाहुण्यांचा वेगळा पाहुणचार, हळदीकुंकू वगैरे वगैरे.

माझं दुसरं बाळंतपण शांतारामाच्या चाळीत करणं, सर्वांनाच गैरसोईचं झालं असतं. प्रभाची मार्चमधे एस०एस०सी०ची परीक्षा. तिच्या पाठोपाठ सुहासची शाळेची परीक्षा. जागेची अडचण, पाण्याची टंचाई, घरात जरा कुरबूर ऐकू येऊ लागली. मला निर्णय घेण्याचा अधिकारच नव्हता. गप्प राहून ऐकून घेत होते. दिवस भरत आले तरी कुठल्याही डॉक्टरकडून तपासणी झाली नव्हती की काही औषधं चालू केली नव्हती. हॉस्पिटलमधे नाव पण घातलं नव्हतं. अजितच्या जन्माच्या वेळी सायनला काकांनी बिल्डिंग बांधायला घेतली होती. ती आता जवळजवळ पूर्ण झाली होती. त्यांच्या मनात ते सर्वच ब्लॉक्स भाड्यानं द्यायचे होते. आधी पागडी घ्यायची होती, म्हणजे कर्ज झालं नसतं. ते रिटायर झाल्यावर मिळालेले पैसे व शिवाजीपार्कमधे असलेली एक लहान बिल्डिंग होती ती विकून आलेले सर्व पैसे त्यांनी सायनच्या बिल्डिंगमधे घातले होते. तरी ते पुरे पडत नव्हते. पागडी घेण्यावरून आईंनी व मंगेशनं पत्रांतून त्यांना खूपच फैलावर घेतलं होतं. त्यामुळं त्यांचा नाइलाज झाला व त्यांनी भाडेकरूंकडून पाच वर्षांचं भाडं ॲडव्हान्समधे घेतलं. तरी कॉंट्रॅक्टरचे पैसे देणे बाकी राहिले. म्हणून त्या कॉंट्रॅक्टरनं तिसऱ्या मजल्याला सध्या आम्ही राहतो तिथं कुलूप लावून ठेवलं होतं. ते

दोन ब्लॉक टेरेसवर आहेत. ते भाड्यानं दिले असते तर जास्त पैसे मिळाले असते आणि कर्ज फेडता आलं असतं.

पण ऐनवेळेस आलेल्या बाळंतपणामुळं आईंचं व त्यांचं जोरदार भांडण झालं. आईंनी त्यांना निक्षून सांगितलं की, "ते ब्लॉक सोडवून घ्या व यशोदेला बाळंतपणाला तिकडे नेऊ. इथं बाळंतपण जमणार नाही." माझ्यामुळं हा प्रसंग ओढवला याची मला एखाद्या अपराध्यासारखी जाणीव होत होती. तरीसुद्धा आईंचं शेवटचं ब्रह्मवाक्य ऐकून मला इतका आनंद झाला की त्याचं वर्णन करता येणार नाही. पुन्हा एकदा बाळाची झबली, लंगोट, गोधड्या यांच्या तयारीला आम्ही लागलो.

वर्ध्याला जाण्याआधी मंगेशनं एकदा श्री० पु० भागवत यांना संध्याकाळी चहाला बोलावलं आणि "चांगले पोहे करा" म्हणून आजीला आणि आईला जोरात सांगितलं. तेव्हा मी मंगेशकडून 'सत्यकथा' मासिकाचं नाव ऐकलं होतं. मी त्याला विचारलं होतं की, "काय रे, ह्या 'सत्यकथा' मासिकात छापलेल्या सर्व कथा, सत्य म्हणजे, खऱ्या घडलेल्याच असतात का?" तो म्हणाला की, "नाही, तसं काही नाही त्याचं फक्त नाव 'सत्यकथा' आहे." तर असे सत्यकथेचे श्री०पु० आमच्या घरी, म्हणजे शांतारामच्या चाळीत येणार होते. मी त्यांना पहिल्यांदाच पाहणार होते. त्याप्रमाणं ते एकटेच आले असं मला आठवतं. तरुणच होते. गोरेपान, लांब पण किंचित बाक असलेलं नाक. मोठं कपाळ हिरवट रंगाची छटा असलेले सावध डोळे. केस जरा कमी झालेले. पांढरा झब्बा व धोतर. धोतर फार सुंदर नेसलेले होते. ते त्यांना शोभून दिसलं. चौकशी, विचारपूस झाली. मग पोहे आले. त्यांनी आवडीनं खायला सुरुवात केली. दोन घास खाल्ले असतील तोच ते एकदम लाल झाले व त्यांच्या डोळ्यांतून पाणी यायला लागलं. इतकं तिखट खाण्याची त्यांना सवय नसावी. मंगेशच्या लक्षात आलं. त्यांच्यासमोर तो गप्प बसला पण रागारागानं आतल्या बाजूला बघत होता. कसंतरी चहापाणी झालं व ते निघून गेले. बोलणी कशाबद्दल झाली ते लक्षात तर नाहीच. पण ते विषय माझ्या त्या वेळच्या अकलेच्या पलिकडचे होते हे सांगायला नकोच. ते खाली उतरल्यावर मंगेशनं प्रचंड मोठा आवाज काढून पोहे इतके तिखट केले म्हणून आईंची, आजींची चांगलीच खरडपट्टी काढली.

त्या वेळी माझा भाऊ हरीश आणि उषावहिनी हे दोघंच माहेरचे असे माझी चौकशी करत. काही खास प्रसंगी आम्हांला दोघांना जेवायला पण बोलवत. प्रेमानं चांगले संबंध ठेवण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करत. तेव्हा त्यांना एकदा आमच्या घरी जेवायला बोलवायचं ठरलं. ते आवडीनं मटण, मासे खात. म्हणून तसंच भरपूर जेवण केलं व त्यांना आग्रह करकरून वाढलं. वहिनींना तिखट लागतच होतं. त्यामुळं त्या फार सांभाळून जेवत होत्या. जेवून, माझं घरदार, माणसं पाहून ते निघून गेले. पुढच्या वेळी जेव्हा मला उषावहिनी भेटल्या तेव्हा म्हणाल्या, "काय हो ताई, किती भयंकर तिखट असतं तुमच्या घरी. मला जेवून घरी गेल्यापासून जे जुलाब लागले, ते डॉक्टरकडे

जाऊन तीन दिवस औषध घ्यावं लागलं.'' असा कोकणी जेवणाचा झटका त्यांना बसला. मलासुद्धा पाइल्सचा त्रास असल्यामुळं भयंकर त्रास व्हायचा. पण बोलायची सोय नव्हती. कारण स्वयंपाकात माझी फारशी मदत सोवळ्यामुळं होत नसे. बाहेरची कामं म्हणजे, चपात्या करणं, ताटपाणी घेणं, उष्टी खरकटी काढणं. जेवल्यावर लादी पुसणं, गहू, तांदूळ निवडणं, भाज्या निवडणं वगैरे कामं मी करतच होते. तरी मला अपराधी वाटत असे. मला तिखटाची सवय मुळीच नव्हती. आमच्या घरी सर्वांच्या भाजीला किंवा कालवणाला एक मिरची घालायची आमची पद्धत. गरम मसाले पण फार थोडे वापरले जात. सकाळच्या चहाबरोबर न्याहारी करायची मला सवय होती. चपातीबरोबर एखादी भाजी किंवा चटणी. इथं असली तर एखादी चकली किंवा लाडू. लाडू मला आवडत नसे. त्यामुळं दुपारी दीड-दोनपर्यंत मी नुसत्या चहावरच असे. खाण्या-जेवणाच्या सवयी मला फार प्रमाणात बदलाव्या लागल्या. त्याचा मला खूप त्रास झाला, पण न बोलून सहन करण्याची मला सवयच पडून गेली होती. संकोच, भीती आणि त्यांनी मला पत्करून घरात घेतल्याचे उपकार. ह्या ओझ्याखालीच मी कायम वावरत होते. त्यातून आमच्याकडून काडीची पण आर्थिक मदत होत नसे. बोलणार कुठल्या तोंडानं?

विठ्ठल प्रभू हा मंगेशचा त्या काळी जानी दोस्त. तो मधून मधून घरी येत असे आणि आमचं कसं काय चाललंय याची चौकशी करत असे. तो एकसारखा सिगारेट ओढायचा. इतक्या सिगरेट ओढणारा माणूस मी तोपर्यंत पाहिलाच नव्हता. एकदा मी आरशात बघून गंध नीट लावण्याचा प्रयत्न करत होते. पूर्वी कधीच गंध न लावल्यामुळं मला ते नीट जमत नसे. काडीला गंध किती लावून घ्यायचं, मग नीट गोल होण्यासाठी, कुशलतेनं ते कसं पसरवायचं, हे मला न कळल्यामुळं मी खूप गंध काडीवर घेऊन मोठा गोल केला. तितक्यात प्रभू आत आला. मी वळून त्याला ये म्हणून सांगेपर्यंत गंधाचा ओघळ माझ्या नाकापर्यंत आला. ''अग काय हे ताई, तुला अजून गंध लावता येत नाही?'' मग त्यानं गंध लावण्याचं तंत्र मला समजावून सांगितलं. त्याला फोटो काढायचा छंद होता. चौपाटीवर जाऊन त्यानं माझे व मंगेशचे काढलेले फोटो अजून माझ्याजवळ आहेत. अजित झाल्यावर मी त्याला तऱ्हेतऱ्हेचे बाबा सूट शिवून घेतले होते. ते घालून प्रभूनं त्याचे खूप फोटो आवडीनं काढून दिले होते. कर्नाक बंदरला त्याचं स्वत:चं हॉटेल होतं. काही वेळा तो गल्ल्यावर बसायचा. त्याच्याजवळ नेहमी पैसे असायचे. त्यामुळं ह्या मित्रांचा तो नेता होता. लाडानं, घाबरून, खूप सांभाळून वाढवलेल्या मंगेशला त्यानं बरंच धीट बनवलं. मुंबई दाखवली व दक्षिण भारताची सफर पण घडवली.

मंगेश कुठल्याही वेळी मित्रांना घरी घेऊन यायचा, आणि ''आम्ही जेवायला आहोत'' म्हणून सांगायचा. झटपट स्वयंपाक करून त्यांना साग्रसंगीत जेवण वाढलं जायचं. आजी, आई होत्याच. शिवाय प्रभा व सुहास ह्यांची पण खूप मदत व्हायची.

त्यामुळं माझ्या लग्नाच्या आधीच त्यांच्या घराला, 'पाडगावकरांची खानावळ' असं नाव पडलेलं होतं.

ह्या झाल्या जरा आधीच्या गोष्टी. बाळंत व्हायला पंधरा-वीस दिवसच राहिले होते. अजून कुठल्याच हॉस्पिटलमधे नाव घातलं नव्हतं. कुठल्याही डॉक्टरनं मला तपासलं नव्हतं की कुठलंही औषध मी घेतलं नव्हतं. मंगेश वर्धा इथं–काकावाडीला होता. ऐनवेळी माझ्या पोटात दुखायला लागलं तर कुठं जायचं? काका सांगायचे, "सायनच्या बिल्डिंगमधे दुसऱ्या मजल्यावर डॉक्टर सुलभा श्रीखंडे आहेत, त्यांनी नुकतंच हॉस्पिटल व डिस्पेन्सरी चालू केली आहे." ते इतकं नवीन होतं की त्यांच्याकडं फोनसुद्धा नव्हता. त्या वेळी सायन म्हणजे रान होतं. मुंबईहून थेट बस सायनला येत नसे. माटुंग्याला उतरून बस बदलून सायनला यावं लागे. टॅक्सींचं प्रमाण फारच कमी होतं. आणि ते तिकडं जायला तयार होत नसत. कारण परत जाताना टॅक्सीला गिऱ्हाईक मिळण्याची शक्यता नसे. एकच चांगली गोष्ट होती ती म्हणजे सायनचं हॉस्पिटल. ते आमच्या घरापासून चालत जाण्याच्या अंतरावर असलेलं. अर्थात आता जसं सुसज्ज आहे तसं तेव्हा ते नव्हतं. ब्रिटिशांच्या काळात सोल्जर्ससाठी बांधलेल्या बरॅक्स होत्या. त्यांच्या लांब, लांब डॉर्मेंट्रीजमधे खाटा टाकून पेशंट ठेवलेले होते. कौलारू बैठ्या इमारती होत्या. मधे मात्र मोठी बिल्डिंग होती. तिथं ऑपरेशन रूम, डिलिव्हरी रूम व इतर सर्व व्यवस्था होती. मोठ्या डॉक्टर्सना राहायला क्वार्टर्स होत्या आणि चांगले नावाजलेले डॉक्टर्स नोकरीत होते. किंवा ऑनररी म्हणून येत होते.

ठरल्याप्रमाणं, लहानगा अजित, मी, आई आणि काका असे फेब्रुवारीच्या मध्यावर सामानासकट सायनला येऊन पोचलो. काही जुनं, काही नवं असं सामान रिकाम्या घरात आणत असताना एक नवं घेतलेलं लाकडी, आरशाचं कपाट, तिसऱ्या मजल्यावर चढवताना कपाटाचं दार उघडून त्याचा मोठा आरसा फुटला. हॉलमधे सर्व काचा झाल्या. मी मनातून घाबरले. लहानपणी असं कोणी कोणी म्हणताना ऐकलं होतं की, आरसा फुटला तर घरात कोणीतरी मरतं किंवा फार वाईट काहीतरी घडतं. आणि हा आरसा अगदी हॉलच्या दारातून आत आणल्याबरोबर लादीवर फुटून पडला. धडधडत्या मनानं अजितला बाजूला घेतलं आणि आई काही बोलतात का म्हणून त्यांच्याकडं बघत उभी राहिले. त्यांना शकुन, अपशकुन माहीत असणारच; पण काहीच न झाल्यासारख्या शांतपणानं त्या हमालांना काय करायचं ते सांगत होत्या. त्याबद्दल एक शब्दपण बोलल्या नाहीत. दिवस पूर्ण भरत आलेली मी त्यांची एकच्या एक सून. बाळंतपणासाठी ह्या घरात मुद्दाम तिला आणलेली. मुलगा मुंबईत नाही आणि तो पन्नास वर्षांपूर्वीचा काळ. पण त्या शांतच होत्या. काकांनी खूप आरडाओरडा केला. हमालांना वाट्टेल ते बोलले. पण शेवटी सर्व स्थिरस्थावर झालं. लवकरच त्यांनी त्या मापाचा दुसरा आरसा आणून तो कपाटाला लावून पण घेतला.

हळूहळू आम्ही सर्व सामान लावलं. भांडीधुणी करायला नोकर शोधला. तसंच

मालीश करायला, बाळाला अंघोळ घालायला, कपडे धुवायला सुईण पण नक्की केली. ती मध्यम वयाची बाई, गोरीपान, सुंदर चेहऱ्याची होती. धर्मानं बुद्ध होती–म्हणजे तिनं धर्म बदलला होता. तिला आम्ही माळीणबाई म्हणत होतो.

मधे एकदा खाली जाऊन डॉक्टरकडून तपासून घ्यावं म्हणून डॉक्टर श्रीखंडेंकडं गेले. त्यांनी विचारलं की पहिली डिलिव्हरी नॉर्मल झाली ना? मी "हो" म्हणाले. सीझर तर नाहीच, पण फॉरसेप्ससुद्धा लागला नव्हता. तर त्या म्हणाल्या की, "मग काही काळजी करण्याचं कारण नाही. तपासायची पण काही जरूर नाही. ते ऐकून मी वर निघून आले.

फेब्रुवारीचा दुसरा पंधरवडा संपत आला होता. थंडी खूप होती. आता खरं वाटणार नाही. पण सायनला वस्ती वाढली नव्हती. आमच्या आजूबाजूला रानच रान होतं. क्वचित सापसुद्धा दिसायचे. इमारत एखादी-दुसरी दिसायची. धारावीत एकही झोपडी नव्हती. खाडीचं पाणी दिसायचं. माहीमवरून समुद्राचा वारा थेट आमच्या घराच्या तिसऱ्या मजल्यावरची दारं धडाधड आपटायचा. नंतर त्यासाठी दारांना आडणे लावून घेतले. त्यांनासुद्धा तो वारा दाद देत नसे. पंखे नव्हतेच. ते नंतरही खूप वर्षं नव्हते. मंगेश अजून वर्धा-काकावाडीलाच होता. सर्व जबाबदारी काकांवर आणि आईंवर होती. अजितची बाटली बंद करायला बघत होते. कारण आता दुसरं मूल झालं की दोघांच्या बाटल्या कशा सांभाळायच्या याची मला काळजी पडली होती. तो मात्र बाटलीशिवाय दूध प्यायला तयार नव्हता. जेवणही बेताचंच. आता दुसरं मूल झालं की त्याच्याकडं दुर्लक्ष होईल, त्याची हयगय होईल तो आणखी बारीक होईल, या काळजीत मी होते. पण त्याचबरोबर काका-आईंच्या प्रेमळ सहवासात मी निश्चिंत होते. पैशांची काळजी मला करावी लागत नव्हती की घरातल्या कामाची चिंता नव्हती. बाळंतपण जवळ आलं–मुलगा इथं नाही म्हणून तेच माझी काळजी करायचे. मी जड शरीरानं अजितच्या मागं घरभर फिरायची. नवीन जागेत, मोठ्या हवेशीर घरात माझं मन सुखावलं. शांतारामाच्या चाळीतून सुटका झाल्यामुळं पोटातल्या मुलाचे मनातल्या मनात आभार मानत होते. बाळंतपण आलं नसतं तर मी मुंबईला आलेच नसते; आणि आईंना पण काकांकडं जागा मागायला सबळ कारण मिळालं नसतं.

मार्चची चार तारीख उजाडली. सकाळ मजेत गेली, दुपार गेली. चहा दिला तो घेतला. आणि सहा वाजता पोटात बारीक कळ आली. कमरेत पण सणसणायला लागलं. मी लगेच आईंना सांगितलं. त्या म्हणाल्या, "अजून थोडा वेळ आहे, मी लवकर स्वयंपाक करते. तू जेवून घे थोडंसं. कळा वाढायला लागल्या म्हणून डॉक्टर श्रीखंडेंकडं खाली गेले. त्यांनी तपासलं वगैरे नाही. अजून वेळ आहे. आणखी कळा वाढल्या की मग खाली ये असं म्हणाल्या. वर आले. थोडं खाऊन घेतलं. अजितला पण जेवू घातलं आणि खालच्या मजल्यावर जायला निघाले. तर अजित काही केल्या मला सोडीना. त्याला आजी-आजोबांकडं तसाच सोडून मी गेले. मंगेशची आठवण फार येत होती. अशा वेळी तो घरात म्हणजे मुंबईत असता तर, अजितला तरी त्यानं

सांभाळलं असतं. मला पण फार मोठा मानसिक आधार वाटला असता. मंगेशला तिकडं काय वाटत होतं कुणास ठाऊक! की तो जिप्सीतल्या कविता लिहिण्यात पूर्णपणं बुडून गेला होता?

मी खाली गेले. आता त्यांनी मला ठेवून घेतलं. त्यांची नर्स आक्का माझ्या बाजूला उभी राहिली. कळा खूपच वाढल्या आणि वरून अजितच्या रडण्याचा आवाज ऐकू येऊ लागला. कारण मी दुसऱ्या मजल्यावरच्या ज्या खोलीत होते त्याच्याच वर तिसऱ्या मजल्यावर अजितची खोली होती. तो आजी-आजोबांचं बिलकूल ऐकायला तयार नव्हता. आई नाही, बाबा पण नाहीत. नवीन घर–ते अजून त्याला आपलं वाटत नसावं. तो केविलवाणेपणानं भयंकर रडत होता. आणि कधी नव्हे ते काकांनी, तो ऐकेना म्हणून, पहिल्यांदाच त्याला मारलं. आणि अशा अवस्थेत ते ऐकणं म्हणजे मला एक जबरदस्त मानसिक शिक्षा वाटत होती.

इतकं होईपर्यंत अचानक डॉक्टर श्रीखंडे कुठं दिसेनाशा झाल्या. बराच वेळ त्या दिसत नाहीत म्हणून मी आक्कांना विचारलं की, "डॉक्टर कुठं आहेत?" त्या म्हणाल्या, "येतील आता, जरा बाहेर गेल्यात." मी मनात म्हटलं मी आता बाळंत व्हायला आले, आणि ऐनवेळेस ह्या निघून कशा गेल्या? रात्रीचे साडेदहा वाजायला आले होते. बाळंत व्हावं अशी कळ तर येत होती. पण होत नव्हते. डॉक्टरांचा पत्ताच नव्हता. वरून अजितचं असहायपणं रडणं कानांवर पडत होतं. अशा वेळी ईश्वराचा धावा केला तर, यातना थोड्या तरी सुसह्य होत असाव्यात असं वाटतं. पण माझ्या मनाला ती सवयच नव्हती. कारण माझा देवावरचा विश्वास फार पूर्वीच उडाला होता. दु:ख, वेदना, शक्य तेवढी सोसणं हेच मला कळत होतं.

तितक्यात डॉक्टर श्रीखंडे आल्या आणि त्यांच्याबरोबर एक प्रौढ असे गृहस्थ आत आले. ते बहुधा डॉक्टर असावेत असा मी अंदाज केला. अतिशय घाईनं ते माझ्याजवळ आले. काय गडबड आहे हे त्यांना श्रीखंडेबाईंनी आधी सांगितलं होतं असं वाटलं. त्यांनी बघितलं फक्त आणि म्हणाले, "कातर द्या." हलकेच तोंडावर आलेल्या पडद्याला कातर लावली. फाटकन आवाज झाला आणि मुलीचं डोकं बाहेर आलं. मूल बाहेर आलं. ती मुलगी आहे आणि काही इजा झालेली नाही–असावी तशी आहे–हे पाहिल्यावर डॉक्टर माझ्याबाजूला आले व म्हणाले, "नशीबवान म्हणून वाचलीस. लाखात एकसुद्धा अशी केस बघायला मिळत नाही." त्यांचं नाव डॉक्टर आरोसकर. ते लोकमान्य टिळक हॉस्पिटलमधे स्त्रीरोगतज्ज्ञ होते. त्यांना तिथंच राहायला बंगला होता. म्हणून असे रात्रीच्या वेळी, ऐन वेळेस येऊन मला सोडवू शकले. मी शांत झाले. पण तिकडे काका-आईंची काय परिस्थिती झाली होती, हे मला नंतर समजलं.

थोड्या वेळानं आई मला बघायला आत आल्या. मी जरा घाबरलेच होते. मुलगी झाली म्हणून काय म्हणतील, कुणास ठाऊक! त्यांना पुन्हा मुलगाच पाहिजे होता. मी म्हणाले, "मुलगी झाली." तेव्हा त्या म्हणाल्या, "असू दे. सुखरूप सुटका

झाली हेच खूप झालं.'' नंतर कळलं की, बाळंतपणात अडचण आहे असं समजताच डॉ० श्रीखंडेबाईंनी काकांना सांगितलं होतं की कदाचित ऑपरेशन करावं लागेल. तेव्हा सही देऊन ठेवा. दोघंही भयंकर घाबरले. मंगेश इथं नाही. सर्व जबाबदारी आपल्यावर आहे. त्यात दोन वर्षांचा अजित. काही बरं वाईट झालं तर? म्हणून आई सर्व वेळ 'शिवलीलामृत' वाचत देवापुढं बसून होत्या आणि काका अस्वस्थपणं फेऱ्या मारत होते. त्यात रात्री अकराची वेळ. निर्जन ठिकाण. दुसऱ्या दिवशी अजितनं पुन्हा गोंधळ घालायला सुरुवात केली. त्याचं म्हणणं असं होतं की आईला वर आणा. डॉक्टर श्रीखंडे म्हणाल्या, (त्यांना आम्ही मम्मी म्हणत असू.) त्याला पाहिजे तर खाली येऊन आईजवळ झोपू दे. पण तो तयार होईना. तो म्हणत होता, ''तू वर चल.'' पण ते शक्य नव्हतं, तेव्हा ''आई लोकांचीच, आई लोकांचीच.'' असं म्हणून रडत बसला.

दहा दिवसांनी मी वर गेले. पण मी दुसरं बाळ घेऊन आले ह्याचा अजितला राग आला होता. आई त्याला एकट्यालाच पाहिजे होती, त्यामुळं तो प्रेमानं लहान बाळाचं कौतुक करीना. उलट राग करू लागला. पाळण्यात झोपलेल्या अंजूच्या अंगावर तो आपलं खेळणं किंवा चमचा, इतर वस्तू मधेच फेकून द्यायचा. दोघांचीही काळजी घेणं हा आणखी एक उद्योग होऊन बसला.

बारशाच्या आधी मंगेश परत आला. तो अतिशय अस्वस्थ व चिंताग्रस्त दिसत होता. आल्यावर म्हणाला की, ''मी वर्धा सोडून आलो. तिकडं माझं मन लागत नाही.'' मी विचारलं, ''मग आता इथं काय करणार आहेस?'' त्याचं उत्तर त्याच्याजवळ नव्हतं. विचारपूर्वक काही ठरवलं नव्हतं. आईवडिलांचं हक्काचं घर आहे म्हणून तो निघून आला होता. काळजीनं ग्रासला होता. स्वभाव चिडचिडा झाला होता. इतके दिवस फक्त आई-काकांशीच ओरडून बोलायचा. पण आता तो माझ्यावर पण साध्यासाध्या गोष्टींसाठी आवाज काढायला लागला. दुसरं मूल लगेच झाल्यामुळं जबाबदारी वाढल्यासारखं वाटलं असेल. कारण मी आता दोन मुलांची आई झाले होते. नुसती त्याची बायको राहिले नव्हते. भविष्याची चिंता वाटत असेल. आईवडिलांनी मुलाचा वाढता संसार किती वर्षं पेलायचा?

आईंच्या मनात होतं की आता सर्वांनी सायनला येऊन राहावं. प्रभा, सुहासच्या परीक्षा झाल्या होत्या. म्हातारी आजी व त्या दोघी, शांतारामाच्या चाळीतून इथं राहायला आल्या. आता पुन्हा प्रश्न आला सोवळ्याचा. कारण आजीला मी स्वयंपाकपाण्याला हात लावलेला चालत नव्हता. त्यामुळं कामाला माझी मदत मिळू शकत नव्हती. तेव्हा आईंनी, आजीला वेगळा स्टोव्ह व भांडी, पाणी वेगळं देऊन, वेगळा स्वयंपाक करायला सांगितलं. सर्वांना प्रेमानं हरतऱ्हा करून, इतकी वर्षं काढणाऱ्या त्या स्वाभिमानी म्हातारीला ते सहन होत नव्हतं, हे मला कळत होतं. ती फार नाराज व निराश दिसायची. पण मला तोंडातून ब्र काढायची सोय नव्हती. कारण मंगेश काही कमवत नव्हता. आम्ही दोघं व आमची दोन मुलं, सर्वच खर्च काकांवर पडत होता. मुलाकडून मदत

व्हायच्या ऐवजी, उलट आमच्याच संसाराचा खर्च त्यांच्यावर पडत होता.

माझी मदत फारशी होऊ शकत नव्हती. कारण सारस्वती पद्धतीचा, नारळाचा स्वयंपाक मला येत नव्हता; आणि सोवळ्यामुळं तीन वर्षांत फारसं काही शिकायला मिळालं नव्हतं. त्यातच मला विळीवरचं कातणं-चिरण्याचं काम येत नव्हतं. मला फक्त सुरीची सवय होती. पण घरात, साबण कापायच्या सुरीशिवाय चांगली सुरी नव्हती. सगळ्याच पंचायती.

मुलीचं नाव अंजली ठेवलं. ते मीच सुचवलं. ती तीन महिन्यांची होत आली होती. जूनमधे शाळा कॉलेज सुरू होणार. तेव्हा, प्रभा आणि सुहास यांनी सायनहून एस०एन०डी०टी० कॉलेजला आणि चिकित्सक शाळेत कसं जायचं, हा दुसरा प्रश्न निर्माण झाला होता. सायनपासून सगळंच लांब आणि आता आहे तशी त्या काळी वाहनांची सोय नव्हती.

एक दिवस अचानक कवी बोरकर सायनला आले. दोघांच्या खूप गप्पा झाल्या. रात्रीची जेवणं झाली. मी माझ्या खोलीत अंजूला घेऊन बसले होते. दोघंही तिथंच येऊन बोलत बसले. वेगवेगळ्या विषयांवर गोष्टी चालू होत्या. शेवटी रात्र झाली म्हणून दोघं उठून झोपायला गेले. मी पण झोपले.

सकाळी उठलो. चहापाणी चालू होतं. आईंनी बोरकरांना चहा दिला आणि एकदम प्रश्न विचारावा तसं म्हणाल्या, "बोरकर, आता माझ्या ह्या मुलाचं काय करू ते तुम्हीच सांगा. कॉलेज सोडून दिलं, शिक्षण नाही, म्हणून चांगली नोकरी मिळणार नाही, ह्याचा संसार तर वाढत चाललाय. तुम्ही तरी त्याला काही सांगून बघा. माझं तर तो काहीच ऐकत नाही. संसारात लक्ष नाही."

त्यावर ते पटकन म्हणाले की, "तुम्ही जोपर्यंत त्याच्या पाठीशी आहांत, तोपर्यंत तो काही फारसं करील असं मला वाटत नाही. तेव्हा मला वाटतं, तुम्ही सर्वांनी पुन्हा गिरगावात जाऊन राहावं. त्याला आणि त्याच्या बायको-मुलांना इथं राहू दे. वर्षभर तुम्ही इथं यायचं नाही आणि त्याला पैशांची मदत मुळीच करायची नाही. अंगावर पडलं की तो आपोआप हातपाय हालवील." असं सांगून, चहा पिऊन ते निघून गेले.

बोरकरांच्या सांगण्यावर त्यांची काय प्रतिक्रिया झाली ते मला काहीच समजलं नाही. तो दिवस गेला. रात्र गेली. सकाळी उठून खोलीतून बाहेर आले, तर हा सगळा हॉलमधे पसारा! एका बाजूला ताटं, पाट, भांडी, वाट्या इत्यादी सामान काढून ठेवलेलं दिसलं. मला आश्चर्य वाटलं. मी विचारलं, "ही भांडी कशाला बाहेर काढून ठेवलीत?" त्यावर आई म्हणाल्या, "आम्ही सगळे जण पुन्हा गिरगावात राहायला चाललोत." मी म्हणाले, "पण का जाता तुम्ही?" तर म्हणाल्या, "तुला वेगळं राहायला पाहिजे होतं. म्हणून तूच बोरकरांना तसं सांगायला सांगितलंस ना, रात्री तुझ्या खोलीत गप्पा करताना." मी हादरलेच. हा त्यांचा केवळ अंदाजच होता. त्या आधारावरच त्या मला बोलत होत्या. काय बोलू तेच मला कळेना. मंगेश तिथंच

बसलेला होता. मी त्याच्याकडं वळून पाहिलं. 'हे काय चाललं आहे' अशा अर्थानं. तो खाली मान घालून, चेहरा पाडून काहीही न झाल्यासारखा बसून होता. त्यानं माझ्या बाजूनं एक वाक्य तरी बोलावं की, ''यशोदेनं बोरकरांना असं काही एक सांगितलं नाही.'' एवढीच माझी इच्छा होती. पण तो बोलत नाही बघून मला दुसरा जबरदस्त धक्का बसला, आणि कळलं की मला एकटं टाकलेलं आहे. माझी बाजू घेऊन, तो आईवडिलांना दुखवणार नाही. तेव्हा पटकन भानावर येऊन मी स्वत:ची बाजू मांडायला सुरुवात केली. मी म्हणाले की, ''कोणाच्या जिवावर मी, आम्हांला वेगळं राहायचं असं सांगेन? मंगेशचं तर शिक्षण झालेलं नाही. त्याला नोकरी नाही. तो काही कमवत नाही. माझी दोन लहान मुलं आहेत. त्यांना टाकून मी नोकरी करू शकत नाही. तेव्हा मी असं बोलले असेन असं तुम्हांला वाटलं तरी कसं? खरं सांगते, मी बोरकरांना असं काही एक सांगितलं नाही.'' त्यावर त्या काहीच बोलल्या नाहीत पण शांतपणं सामान आवरत राहिल्या. आणि मंगेश मख्खपणं तिथंच बसून होता. मी मात्र अंतर्बाह्य हादरून गेले. इतका खोटा आळ माझ्यावर घेतला जात असताना हा असा कसा गप्प राहू शकतो? खरं प्रेम असं असू शकतं का?

काका पण काहीच बोलले नाहीत. एक शब्द पण तोंडातून न काढता ते सर्वांना घेऊन संध्याकाळी निघून गेले. अशा या असह्य मन:स्थितीत माझ्या नव्या संसाराला सुरुवात झाली. सोबतीला होती त्यांनी ठेवलेली भांडी, स्टोव्ह, शेगडी आणि माझी दोन मुलं. ती इतकी लहान होती की, आजी आणि आत्या जातात म्हणून अजितनं रडायला सुरुवात केली. त्याला समजावताना माझ्या नाकीनऊ आले. अंजू फक्त चार महिन्यांची. तिला फक्त आई पाहिजे होती आणि दुधाची भरलेली बाटली. आता विचार करताना असं वाटतं की, त्यांना सायनला राहणं गैरसोईचंच होतं. आजीचं सोवळं, तिला वेगळा स्वयंपाक करायला लावणं, हे तिला खूप दुखावणारं होतं. तसंच इथं राहून लांब शाळा-कॉलेजात मुलींना पाठवणं सोपं नव्हतं. कारण तेव्हाचं सायन म्हणजे नुसतं रान होतं.

सगळे निघून गेले, पण मला चैन पडेना. मी मंगेशच्या मागं लागले, की तू त्यांना सांगितलं नाहीस, की मी काही बोलले नव्हते म्हणून. आता तरी गिरगावात जा. त्यांना काय ते सांगून ये. शेवटी एकदाचा कबूल झाला. आणि एक दिवस तिकडं जाऊन आला. आल्यावर मी विचारलं, ''सांगितलंस? मग काय म्हणाल्या?'' ''काही नाही.'' हेच उत्तर आलं. खरं खोटं ज्याचं तोच जाणे. मी तर माझ्या कानांनी काहीच ऐकलं नव्हतं, किंवा डोळ्यांनी काही बघितलं नव्हतं.

मंगेश आता पैसे मिळवण्याच्या व नोकरीच्या शोधात होता. त्या वेळी साधना प्रेस मुंबईत होता. रावसाहेब पटवर्धन संपादक होते. वसंत बापट पण त्यांच्याबरोबर काम करायचे. तिथं मंगेशला नोकरीला घेण्याचं रावसाहेबांनी ठरवलं. त्याप्रमाणं महिना

दीडशे रुपये पगारावर कामाला सुरुवात झाली. थोडा का होईना, पैसा घरात येऊ लागला. बहुतेक वेळा महिना संपण्याच्या आधीच पैसे संपून जात. मग पुढच्या पगारातले पन्नास रुपये आधीच आणावे लागत. त्यामुळं पुढच्या महिन्यात शंभर रुपयेच मिळत. पैशांची ओढाताण चालू होती.

त्याच सुमारास नरेश मंत्री वर्ध्याचं हिंदी भाषेचं शिक्षण पूर्ण करून दिल्लीला गेले. तिथं हिंदी राष्ट्रभाषा प्रचाराचं काम चालतं. काकासाहेब कालेलकर स्वत: तिथं राहून ती संस्था चालवत होते. 'सन्निधि' हे संस्थेचं नाव. नरेशना तिथं नोकरी लागली. ते पूर्ण गांधीवादी झाले होते. अविवाहित राहून, खादी वापरत. देशसेवेसाठी राष्ट्रभाषेचं काम कमीत कमी वेतनात करत होते. त्यांना कळलं की आमचे इकडं हाल चालू आहेत. तेव्हा आपल्या तुटपुंज्या कमाईतून ते दर महिन्याला पन्नास रुपये आम्हांला पाठवायला लागले. काका दर रविवारी शांताराम चाळीतून सायनला भाडं गोळा करायला यायचे. दुपारी माझ्याकडं जेवायचे. येताना मुलांना खाऊ घेऊन यायचे. पैसे मात्र उचलून देत नव्हते. बोरकरांनी सांगितल्याप्रमाणं बाकी कोणी येत नव्हतं. सणावारी आम्हांला गिरगावात जेवायला बोलवत. दिवस चालले होते.

सायनमधे फिरून मी 'शिशुविकास' नावाची शाळा शोधून काढली. ती मॉंटेसरी आणि प्रायमरी एवढीच शाळा होती. मुलांना चालत जायला थोडी लांबच. तरी मी तिथं जाऊन अजितचं नाव घातलं. पण मला सोडून आणि घर सोडून तिथं जायला त्याला मुळीच आवडत नव्हतं. तो खूप त्रास द्यायचा. एका हातात अंजूला घेऊन, दुसऱ्या हातानं अजितला ओढत इतक्या लांब उन्हातून चालत जाणं व परत आणणं मला जमेना. त्या वेळी रस्त्याच्या कडेनं झाडं पण नव्हती. तेव्हा बिल्डिंगची सुरक्षा व्यवस्था म्हणून रात्रीचा एक नेपाळी गुरखा ठेवलेला होता. आजूबाजूला सर्व मोकळे प्लॉट्स होते. तिथंच आमच्या भिंतीला लागून त्यानं झोपडं उभारलं होतं. तिथं राहायचा. त्याला मी बोलावलं आणि अजितला शाळेत नेण्या-आणण्याची कामगिरी त्याच्यावर सोपवली. अजितच्या इच्छेविरुद्ध त्याला न्यावं लागे. तेव्हा तो त्याला सरळ उचलून खांद्यावर बसवायचा आणि घेऊन जायचा. एकदा घरातून खाली उतरला की त्याच्या खांद्यावर बसून अजित त्याच्याशी खूप गप्पा मारायचा. म्हणायचा, "आई म्हणते, शाळेत गेला नाहीस तर तुला गडी व्हावं लागेल. लोकांची भांडी-धुणी करावी लागतील. मला गडी व्हायचं नाही, म्हणून मी शाळेत जातो." शाळेत पण मोकळेपणानं इतर मुलांत तो मिसळत नसे. इंदूताई, नलूताई (नलूताईंनी पुढं डॉक्टर आजगावकरांशी लग्न केलं). ह्या शिक्षिका होत्या. त्या त्याला सांभाळून घेत.

नेपाळी गुरखा तरुण होता. तो दिवसभर लोकरीचे स्वेटर विणताना दिसायचा. आणि रात्री बिल्डिंगभोवती फिरताना काठी आपटत पुढं जायचा. त्या रानात अंधाऱ्या रात्री त्याचा आधार वाटत असे. कधी कधी बसून तो नेपाळी भाषेतली गाणी गूढ आणि सुरेल आवाजात गायचा. भररात्री ते सूर कानांवर पडले की मन भारून

गेल्यासारखं वाटायचं आणि पुन्हा शांत झोप लागायची. Our Sweetest Songs are those that tell of saddest thought. ते सूर मी आयुष्यात कधी विसरू शकले नाही.

अंजू पण आता चालती, बोलती झाली होती. ती गोरीगोरी, गुबगुबीत, नुसती प्राजक्ताच्या फुलासारखी दिसायची. मला ती फार आवडायला लागली. अजित लग्नानंतर लवकर झाल्यामुळं मनात जे वात्सल्य निर्माण व्हायला हवं ते तितक्या प्रमाणात झालं नव्हतं. त्या वेळी प्रेमातच डुंबत राहावं असं वाटायचं. मुलांचं बंधन नको वाटायचं. पण अंजूच्या वेळी तसं झालं नाही. मी तिचे खूप लाड करायची. आपलं मूल म्हणजे काय हे तेव्हा कळलं. भावाबहिणीची जोडी फार सुंदर दिसायची. पोदार कॉलेजचे प्राध्यापक राम कोल्हटकर आमच्या बाजूच्या बिल्डिंगमधे राहायचे. ते एकदा रस्त्यात मला भेटले. दोन मुलांना बघून म्हणाले, "किती सुंदर ही दोन मुलं तुम्हांला झालीत. तुमचा अगदी हेवा वाटतो. तुम्हांला वेगळ्या करमणुकीची काही जरूरच नाही."

एकदा असेच काका आले ते एक लहानसं कुत्र्याचं पिल्लू घेऊन आले. पांढरं शुभ्र गुबगुबीत होतं. अंगावर तपकिरी रंगाचे दोन-तीन मोठे ठिबके होते. मुलांना खूपच आनंद झाला. दोघं सारखी त्याच्या मागंच असत. त्याला उचलून घेऊन छातीकडं धरून फिरवत, त्याच्याबरोबर खेळत. असा मजेत वेळ चालला होता. मी त्याला एकदा जवळ घेतलं असताना मला त्याच्या पाठीवर एक मोठा फोड दिसला. कुत्र्यांची काळजी कशी घ्यायची हे मला काहीच ठाऊक नव्हतं.

मागच्या खोलीत मी जुन्या, नको असलेल्या कपड्यांचं एक गोठोडं बांधून ठेवलं होतं. त्या गाठोड्याजवळ जाऊन तो कुत्रा झोपत होता. त्याच सुमारास अजित आणि अंजू दोघांनाही खूप सर्दी झाली. नाक गळायला लागलं. म्हणून मी ते गाठोडं सोडलं आणि त्यातून नाक पुसायला म्हणून जुन्या पातळाचे मऊ असे रुमाल फाडून घेतले आणि ते वापरायला सुरुवात केली. एकदोन दिवसांत बघते तर अजितच्या नाकपुडीखाली आणि अंजूच्या हनुवटीवर बारीक बारीक फोड दिसायला लागले. त्यांना खाली डॉक्टर श्रीखंडे यांच्याकडं घेऊन गेले. त्यांनी कसलंतरी मलम लावायला दिलं. ते लावायला लागले. पण काहीच फरक पडेना. त्यांच्या नाजूक कातडीवर ते फोड चरत पुढंच जाऊ लागले. पुन्हा बदलून दुसरं मलम आणलं. तरी बरं होण्याचं लक्षण दिसेना. अजितच्या तर नाकाच्या आत ती लस जायला सुरुवात झाली. तेव्हा मी मंगेशला सांगितलं की हे काही तरी वेगळंच आहे. तेव्हा तो म्हणाला, "त्यांना मोठ्या हॉस्पिटलमधे नेऊन स्किन स्पेशालिस्टला दाखवतो." त्याप्रमाणं तो घेऊन गेला. डॉक्टरांनी पाहिल्याबरोबर विचारलं, "तुमच्या घरात कुत्रा आहे का?" त्यानं "हो" म्हटल्यावर ते म्हणाले, "हे त्याचंच इन्फेक्शन झालं आहे." त्याप्रमाणं त्यांनी वेगळं औषध लावायला दिलं. नंतर हळूहळू ते कमी होत गेलं.

आता त्या कुत्र्याला घरातून काढलं पाहिजे, हे माझ्या लक्षात आलं, आधीच घरात भरपूर काम. त्यात कुत्र्याचं कोण करत बसणार? श्रीखंडे डॉक्टर पण

म्हणाल्या, "अजितच्या आईला काम कमी आहे म्हणून हा कुत्रा आणून ठेवला आहे का?" मुलांना तो फार आवडायला लागला होता. पण आता इलाजच नव्हता. एक दिवस मी गुरख्याला हाक मारली. तो वर आल्यावर त्याला सांगितलं की कसंही कर पण ह्या कुत्र्याला लांब कुठंतरी नेऊन सोडून दे. त्याचं नशीब आणि तो. कुठंही जाऊ दे. मला ही पीडा नको.

तो त्याला घेऊन गेला. मी निश्चिंत होऊन माझ्या कामाला लागले आणि एक दिवस गुरखा वर आला. बघते तर त्याच्या गालावर आणि कानाकडं तसेच फोड आलेले. "अरे" म्हटलं, "हे काय? तू कुत्र्याला सोडला नाहीस?" तर म्हणाला, "नही बाई, मैंने उसे मेरे पास ही रखा है. ओ इतना प्यारा है. मैं उसे छोड नहीं सका." त्यालाही मग डॉक्टरकडं जायला सांगितलं. पण तो कुठल्यातरी युनानी वैद्याकडं गेला. त्याचं औषध लावून तो बरा झाला. कुत्र्याचं पुढं काय झालं ते कळलं नाही.

मंगेश साधनेत काम करत असताना एक दिवस वसंत बापट घरी आले. घरात फर्निचर काही नव्हतंच. तीन मोडकळीस आलेल्या खुर्च्या, एक ईझीचेअर, एक स्टूल. हॉलमधे एवढंच सामान होतं. तिथंच ते बसले. कॉफी झाली. मला वाटतं, त्यांची माझी ती पहिलीच भेट. आकर्षक व्यक्तिमत्त्व, गोरा रंग, मिश्कील, विनोदी, हळूच हसून बोलण्याची पद्धत. संस्कृतचे आणि मराठीचे ते प्रोफेसर होते. बोलता बोलता मंगेशच्या शिक्षणाचा विषय निघाला. त्यांनी त्याला पटवून दिलं की, शिक्षण घेणं किती महत्त्वाचं आहे, ॲडमिशन कुठं घ्यायची? नोकरी करून कॉलेज कसं करायचं, वगैरे सर्व चर्चा झाली. आणि मंगेशनं इंटरसाठी खालसा कॉलेजमधे ॲडमिशन घ्यायचं ठरलं. त्या वेळी वय होतं २६, २७ वर्षांचं. बरोबरची मुलं त्या मानानं बरीच लहान असणार होती. कॉलेज-शिक्षण घेण्याचा अट्टाहास, सोडण्याचं दुःख. दोन मुलांच्या संसाराची जबाबदारी. सर्वच मानहानिकारक होतं. सर्वांचा ताण मनावर येऊ लागला. चेहरा व्यग्र झाला. धडपणं रात्री जेवला पण नाही. मी मुलांना झोपवलं. मी पण झोपायला गेले. मध्यरात्री अचानक जाग आली. बघते तर मंगेश हॉलमधे फेऱ्या मारतो आहे. झोपेचं वरदान लाभलेला, कुठल्याही वेळी कितीही वेळ झोपणारा, सकाळी लवकर न उठणारा हा कुंभकर्ण आज झोपू शकत नाही. याचं कारणही तितकंच काळजी करण्यासारखं असणार.

त्या वेळी मी त्याची नुसतीच विचारपूस केली. झोपायला चल म्हणून सांगितलं. मनातून मी पण घाबरले. मनाशी खूणगाठ बांधून जपलेल्या तत्त्वाविरुद्ध आता वागावं लागणार त्याचा याच्या मनावर परिणाम तर होणार नाही ना? दुसऱ्या दिवशी मी त्याला सांगितलं की, "हे बघ कॉलेजमधे पुन्हा जाऊन शिक्षण घ्यावं लागणार म्हणून तुला इतका त्रास होत असेल, तर तू जाऊ नकोस कॉलेजला. माझी काही हरकत नाही. आहे त्या परिस्थितीत राहण्याची माझी तयारी आहे." पण तो समजून

चुकला होता, की शिक्षणाशिवाय नोकरी, पैसा व प्रतिष्ठा मिळू शकणार नाही. आणि तो कॉलेजला जायला लागला.

खालसा कॉलेजात मंगेशची पुरुषोत्तम नाईक यांच्याशी ओळख झाली. ते त्याच्याच वर्गात होते आणि सायनला त्यांच्या काकांकडं, दोन बिल्डिंग सोडून अगदी जवळ राहत होते. त्यामुळं त्यांचं येणं-जाणं, खाणं, सिनेमा बघणं एकत्र मिळून होऊ लागलं. ते आमच्या घरी येऊ लागले. मुलांची आणि त्यांची पण चांगलीच गट्टी जमली. येताना एक दोन फळं किंवा खाऊ घेऊन यायचे. त्यांना फोटो काढायचा छंद होता. त्यांनी मुलांचे व माझे काढलेले फोटो अजून माझ्याकडं आहेत. पैशांच्या बाबतीत सगळ्यांचीच तंगी असायची. रविवारी मटण तर आणलंच पाहिजे. तसा रिवाज होता. आठवड्यात मधे मटण होत नसे. त्यामुळं रविवारची सगळे जण वाट बघायचे. एका रविवारी मंगेश मटण आणायला जात होता. तेव्हा दीड-दोन रुपये रत्तल असा काहीतरी भाव होता. पण त्यातही पैसे जरा कमी होते. वाटेत नाईक भेटले. म्हणाले, "काय पाडगावकर, कुठं चाललात?" हा म्हणाला, "मटण आणायला." त्यावर ते म्हणाले, "मी पण येणार जेवायला." मंगेश म्हणाला, "हो हो, या ना. पण पैसे कमी पडताहेत. तुमच्याजवळ असले तर द्या थोडे." त्यांनी त्यात पैसे घातले व दुपारी जेवायला आले. त्यांना मी केलेलं मट्ण त्या वेळी खूप आवडायचं. ब्राह्मण असून आमच्या घरी आल्यावर ते आमच्यातलेच होऊन जात.

सायनला सुरवातीला आम्ही दोघंच राहायला लागल्यावर, मंगेशचे मित्र विठ्ठल प्रभू, पुरव हे शनिवारी रात्री तिथं राहायला यायचे. येताना डझनभर अंडी, ब्रेड आणायचे. सकाळी न्याहरीला सर्वांना अंडी, ब्रेड, चहा मी करून द्यायची. अजित, अंजू अगदी खूष असायचे. मंगेश लवकर जाऊन मटण आणायचा. लवकर स्वयंपाक कर, त्यांना जेवून जायचंय असं सांगायचा. इतकी घाई करून कुठं जायचंय, असं मी कधी विचारलंच नाही. खूप वर्षांनी मला कळलं की ते रेसला जायचे. काही महिन्यांनी त्यांचं येणं पण बंद झालं.

नंतर अभ्यास करण्यासाठी प्रभूनं थोडे दिवस सायनला आमच्याकडं त्यांच्या भावाला पाठवलं; पण तोही कंटाळला व येईनासा झाला. सदानंद रेगे, केशव मेश्राम हे पण अभ्यासाला येत.

अगदी सुरवातीला मला मटण करता येत नसे. प्रभा (सौ० रमा परुळकर) दुपारी येऊन मटण तयार करून देऊन संध्याकाळी पुन्हा गिरगावात जायची. अजितला ती फार आवडायची. त्याला 'प्र' हा उच्चार येत नव्हता. म्हणून तो तिला 'डबा आत्या' म्हणायचा. ती पुन्हा जायला निघाली की तो खूप रडायचा. घरासमोर मोठी गच्ची असल्यामुळं मुलांची खेळायची चांगली सोय झाली होती. त्यांच्याबरोबर मी पण खूप खेळत असे.

मंगेश साधना प्रेसमधे काम करत असतानाची गोष्ट : संध्याकाळी अंजूला खूप ताप

आला. मी सर्व काम आटपून एकटीच तिच्याजवळ कपाळावर घड्या घालीत बसून होते. अजित जेवून झोपला. रात्र वाढू लागली. वरच्या मजल्यावर शेजारी पण कोणी नाही. डॉक्टरचा दवाखाना बंद झालेला. घरात मी एकटी. आजूबाजूला बिल्डिंग नसल्यामुळं रात्री फार भयाण वाटायचं. रात्र वाढत होती. मंगेशचा पत्ताच नाही. घरात फोन नव्हता, की ताप बघायला थर्मामीटर नव्हता. ताप वाढतो आहे एवढं मात्र कळत होतं. ११ वाजले, १२ वाजले, १ वाजला. आता मला मंगेशची पण काळजी वाटायला लागली. इतका उशीर कधीच झाला नव्हता. नाही नाही ते विचार मनात येऊ लागले. शेवटी २ वाजता दारावरची बेल वाजली. मी दार उघडलं आणि त्याला बघताच एकदम मोठमोठ्यानं रडायला सुरुवात केली. "प्रेसमधे काम जास्त असल्यामुळं थांबावं लागलं" म्हणाला. बाकीची रात्र अंजूच्या काळजीत गेली. मुलांना ताप आला की मला फार भीती वाटायची. तासभर नाही झाला की पुन्हा ताप बघायची. थोडा आवाज झाला, किंवा दिवा लावला की मंगेश ओरडायचा. पण त्याला त्रास होऊ नये ह्याची काळजी घ्यावी लागे. त्यामुळं रात्री अंधारातच मला वावरावं लागे. नंतर तीच सवय होऊन गेली.

भांडी-धुणी करायला त्या वेळी माझ्याकडं गणपत नावाचा गडी होता. तो फार वाईट काम करायचा. भांडी चोरायचा. वाट्टेल तेव्हा यायचा. तरी दुसरा कोणी नाही म्हणून त्याला नेमला होता. एकदा संध्याकाळी मंगेश म्हणाला, "आज आपण दोघं सिनेमाला जाऊ." रात्री परत येईपर्यंत गणपतला मुलांजवळ थांबायला सांगितलं. तो थांबतो म्हणाला म्हणून आम्ही गेलो. रात्री आम्ही परत आलो तेव्हा घरात पंखे नव्हते. वाऱ्यासाठी म्हणून दारातच दोघांना चादरीवर टाकलेलं होतं आणि नीट बघताना जे काही दिसलं, त्यानं मी भयंकर घाबरले. गणपत निघून गेला. मी भराभर मुलांना उचललं आणि त्यांच्या जागेवर नेऊन झोपवलं–मी पण झोपायला गेले. दुसऱ्या दिवशी गणपत आला. मी त्याला सांगितलं, "ह्यापुढं तू कामाला येऊ नकोस, हे तुझे झालेल्या कामाचे पैसे." कारण सांगितलं नाही आणि त्यानं पण विचारलं नाही. त्यानंतर एक निश्चय केला की, घरात कामाला गडी ठेवायचा नाही. एखादी बाईच ठेवायची.

शोधाशोध करून माळीणबाईनं एक जयवंतीबाई नावाची बाई आणून दिली. कुरळे केस, गोल, गोरटेला चेहरा. दिसायला चांगलीच होती. तिला कोणाचा पाश नव्हता म्हणून ती घरातच राहायला तयार झाली. ती आल्यामुळं मला खूप मदत होऊ लागली. भांडी, कपडे, स्वयंपाकात मदत, मुलांना म्हणजे अंजूला (कारण अजित माझ्याशिवाय कोणाबरोबर खाली उतरायला तयार नसे.) फिरायला नेणं, वगैरे कामं ती करत होती.

एकदा गिरगावातून आईंचा निरोप आला की आपला सर्वांचा एक कुटुंबाचा स्टुडिओत जाऊन फोटो काढायचा आहे, तेव्हा तुम्ही सर्वांनी तिकडं या. त्याप्रमाणं आम्ही गेलो. सोबत जयवंती पण होती. त्या वेळी मध्यमवर्गात मुलांना सांभाळायला

बाई किंवा घरात कामाला बाई ठेवायची पद्धत रूढ झाली नव्हती. तिला बघून सर्वांचेच डोळे विस्फारले. चेहऱ्यांवर नाराजी दिसली. राजाध्यक्षांच्या स्टुडिओत जाताना तिला टॅक्सीत घेतलं म्हणून घरच्यांची जागा कमी झाली. तसेच एकदाचे सर्व जण तिथं पोचलो. सर्वांना नीट उभं केलं आणि जयवंती एकटीच बाजूला उभी होती. तिला तसं बघून मला वाईट वाटलं. आणि मी काही एक विचार न करता पटकन म्हणाले, "जयवंती, तू पण येऊन बस ना खाली." तेव्हा कोणीच, "ती नको" असं म्हणालं नाही. तेव्हाच सांगितलं असतं तर बाजूला जाऊन थांबली असती. सर्व जण शांत आहेत असं बघून फोटोग्राफरनं फोटो काढला. आणि आम्ही सायनला आलो. बऱ्याच दिवसांनी चौकशी केल्यावर कळलं की नमुन्याला एक लहानशी फोटोची कॉपी त्यांनी पाठवली होती. पसंत असेल तर मोठा करून मिळणार होता. पण आईंनी, आम्हांला तो फोटोच नको म्हणून फोटोग्राफरना कळवलं. मला फोटो जमवायची फार आवड. अगदी लहानपणापासूनचे फोटो जमवून मी खूप अल्बम तयार केले. म्हणून गिरगावात गेले असताना फोटो बघायला मागितला. फोटो तर चांगला आला होता. आणि गंमत म्हणजे जयवंतीचा फोटो फारच सुंदर आला होता. नंतर मला कळलं की तिला मी फोटोत घेतली म्हणून तो फोटो त्यांनी घेतला नाही. मनात आलं, हेच जर खरं कारण असेल तर तेव्हाच मला त्यांना सांगता का आलं नाही की, "तिला फोटोत बोलावू नकोस, तो केवळ आपल्या कुटुंबाचा फोटो आहे." फोटो काढल्यानंतर तो माझ्यामुळं नको म्हणाल्या त्याचं मला खूप दिवस वाईट वाटत होतं. आणि मनातून ही गोष्ट गेली नाही.

गिरगावात राहत असताना आईंच्या नात्यातली त्यांची एक बहीण भेटायला आली होती. ती बराच वेळ गप्पागोष्टी करून चहा घेऊन गेली. ती गेल्यावर मी सहज म्हणाले, "मावशी थोडी तुमच्यासारखी दिसते. बहीण म्हणून थोडं साम्य वाटलं." असं म्हटल्यामुळं त्या रागावतील ह्याची मला कल्पना नव्हती. आणि एक दिवस अचानक प्रभा, सुहास आणि सासूबाई सायनला येऊन मला सांगायला लागल्या की, "तुमच्या घरात विमल (माझी चुलत बहीण) सर्वांत दिसायला चांगली आहे. आम्हांला तीच आवडते. तीच सर्वांत सुंदर आहे." थोडा वेळ मी चक्रावून गेले. हे मधेच काय आणि कशासाठी मला सांगताहेत? काही कळेचना. नंतर विचार केल्यावर कळलं की मी त्यांच्या बहिणीबद्दल बोलले होते त्याविरुद्ध हा माझ्यावर हल्ला आहे. त्या तरुणपणी दिसायला खूप सुंदर होत्या. गोरा रंग, मोठे मोठे काळे डोळे, लांबसडक केस. फक्त उंची कमी होती, असं मंगेश सांगतो. आणि त्याचा त्यांना सार्थ अभिमान होता. माझं लग्न झालं तेव्हा त्या खूप जाड झालेल्या होत्या. डोळ्याला चष्मा, केस कमी झालेले, मला कल्पना नव्हती की आपल्या रूपाच्या बाबतीत त्या अजूनही इतक्या जागरूक असतील.

थोड्या दिवसांनी कळलं की, जयवंतीबाईला वेड लागलं होतं म्हणून तिला

नवऱ्यानं सोडलं होतं. घरात पण ती त्रास द्यायला लागली. काम करायचं नाही, घरातून निघून जायचं, वाट्टेल तेव्हा यायचं. माझ्यावर राग काढायचा. ती वेडी झाली होती हे ऐकल्यावर मात्र मी घाबरले. रात्रंदिवस मला तिच्याबरोबर एकटीला राहावं लागे. मधेच हिचा आटा खसकला तर माझ्या अंगावर येईल अशी भीती वाटायला लागली. मुलांना काही इजा करील म्हणून एक दिवस मी तिला जायला सांगितलं.

पैशांची तंगी, ओढाताण चालूच होती. तुटपुंज्या कमाईवर महिन्याची दोन टोकं जुळवणं कठीण पडत होतं. काका पैसे न देण्याचं ठरल्याप्रमाणं पैसे देत नव्हते. मम्मीची औषधांची बिलं वेळच्या वेळी न दिल्यामुळं मांडून ठेवली जात. मुलांची माझी आजारपणं अधूनमधून चालू होती. बिलं वाढत होती. दुधाचं बिल पूर्ण देता येत नसे. पण दूधवाला भय्या फार चांगला होता. मुलं दूध घ्यायला भांडं घेऊन गेली की मोठी धार टाकत असे. पैशासाठी थांबून राहत असे. पण वाणी मात्र त्रास द्यायचा. त्यानं प्रत्येक घरात जाऊन तुंबलेली बिलं जमा करण्यासाठी एक माणूस नेमला होता.

नेहमीप्रमाणंच एक दिवस तो माझ्याकडं आला. मंगेश घरात नव्हता. मी दार उघडलं आणि त्यानं पैसे मागितले. अर्थातच माझ्याजवळ पैसे नव्हते. दोनशे पन्नास रुपये एकदम देणं त्या वेळी केवळ अशक्यच होतं. तो मला वाट्टेल ते बोलायला लागला. "पैसे देता येत नाहीत तर सामान घेता कशाला? आता सामान द्यायचंच बंद करून टाकू." आणि पुष्कळ काही बोलला. बडबड करत निघून गेला. मला अतिशय वाईट वाटलं. रडायला आलं. ते रडणं ऐकायला, दु:ख सांगायला घरात कोणी नव्हतं. अपमानाचं दु:ख सहन होईना. मनात आलं, मी किती अडचणीतून शिक्षण न सोडता पूर्ण केलं आहे. मुंबई विद्यापीठाची डिग्री माझ्याजवळ आहे. तो, जो मला बोलून गेला तो माझ्या निम्म्यानं पण शिकलेला नसेल. आता मी अर्ज केला तर म्युनिसिपालिटी, इन्कमटॅक्स, लाइफ इन्शुअरन्स–कुठंही मला नोकरी मिळेल. त्या काळी सहजपणं नोकऱ्या मिळत होत्या. पण मी अशी घरात अडकून पडले आहे. निदान रेशनपुरते तरी पैसे घरात नक्कीच आणले असते. जिवाचं रान करून, तडफडून शिकले त्याचा काय फायदा झाला?

संध्याकाळी मंगेश घरी आल्यावर, मी त्याला सांगितलं, आता पैशांची व्यवस्था करायलाच पाहिजे. मला आज तो फारच वाईट रीतीनं बोलून गेला. तो पण काळजीत पडला. काय करायचं आम्हांला दोघांना पण कळेना.

काही दिवसांनी संध्याकाळी चारच्या सुमाराला बेल वाजली. मी दार उघडलं. तर दारात गंगाधर गाडगीळ. त्यांची माझी चांगली ओळख होती. त्यांच्या घरी जाणं, येणं, चहा, जेवण, मुलांचं एकत्र खेळणं वगैरे चालू असायचं. वासंतीबाई अतिशय प्रेमानं आमचं आदरातिथ्य करत. त्यांना मी "बसा" म्हटलं. ते नको म्हणत असतानासुद्धा मी चहा केला. चहा पिऊन लगेच ते उठले. उठताना त्यांनी माझ्या

हातात एक बंद पाकीट दिलं. म्हणाले, "हे पाडगावकरांना द्या. आणि ते परत करण्याची आवश्यकता नाही. त्यांना सांगा की ते त्यांच्या कवितेतून मला पोचले आहेत." एवढे बोलून ते लगेच निघून गेले. मी पाकिटाकडं बघतच राहिले, काय असेल या पाकिटात? मंगेश तर घरात नाही, मी उघडून पाहू की नको? का उघडलंस म्हणून रागावला तर? म्हणून ते तसंच ठेवून दिलं. घरी आल्यावर त्यानंच ते उघडलं, तर त्यात २५० रुपये दिसले. मला आश्चर्य वाटलं. त्यावर मंगेशनं सांगितलं की, "काही दिवसांपूर्वीच मला गाडगीळ भेटले होते, तेव्हा मी त्यांच्याकडं फार काळजीनं आपल्या वाण्याची गोष्ट बोललो होतो. त्यांनाही फार वाईट वाटलं असावं, म्हणून त्यांनी हे पैसे आणून दिले आहेत. नाही म्हटलं तरी मला फार आनंद झाला. आम्ही लगेच वाण्याची उधारी देऊन टाकली. काही दिवसांनी मंगेशनं रेडिओचे, कवितेचे असे आलेले पैसे जमवून गाडगीळ नको म्हणत असताना त्यांचे पैसे परत केले. पण आमची ती वेळ त्यांनी भागवली, हे आम्ही दोघंही आयुष्यात कधी विसरू शकलो नाही.

साधनेत असताना मंगेशला काश्मीरला जाण्याची संधी मिळाली.

आर्थिक परिस्थिती ओढाताणीची होती. त्याच्याबरोबर आणखी काही लोक होते. त्या सर्वांचा येण्याजाण्याचा, राहण्याचा, जेवणाचा खर्च परस्पर होणार होता. मंगेश तेव्हा लेंगा व झब्बा याशिवाय कपडे घालत नसे. लांब केस, दाढी, पायांत चपला किंवा सँडल असा त्याचा वेश होता. त्यात बदल करायला तो मुळीच तयार नव्हता. काश्मीरच्या थंडीत फक्त एक स्वेटर घेऊन पुरणार नव्हता. तिकडं एक महिना राहायचं होतं. सामान बांधून त्याची तयारी झाली. सायनच्या घरात, शेजार नसलेल्या, तिसऱ्या मजल्यावर लहान दोन मुलांना घेऊन मला रात्रंदिवस एकटं राहायचं होतं. रात्री एकटं व भयाण वाटायचं. एक महिना माझ्याकडं येऊन राहायला कोणी रिकामं नव्हतं. ज्याला त्याला आपला उद्योग होता. शेवटी मंगेशचे मित्र पुरुषोत्तम नाईक, रात्री सोबतीला म्हणून हॉलमधे झोपायला तयार झाले. एक दिवस मंगेश निघून गेला. नाईक रोज रात्री त्यांचं जेवण झालं की येत आणि आपली पथारी टाकून झोपून जात. मी आतल्या खोलीत. मुलांचं माझं जेवण आटपून आम्ही पण झोपून जात असू. नाईक बाहेर आहेत ह्या विचारानं कधी भीती वाटली नाही. धाकट्या भावानं मदत करावी तसे ते सोबतीला येत.मला ते 'यशोदाताई' म्हणतात. आमचं तेच नातं दृढ होऊन राहिलेलं आहे.

दिवस जात होते. मंगेशच्या पत्राची मी आतुरतेनं वाट पाहत होते. तीन वर्षांचा अजित, एक वर्षाची अंजू व सव्वीस वर्षांची मी, अशी घरात होतो. हातात पैसे अगदी कमी होते. मंगेशला आमची खूप काळजी वाटत असेल. माझी, मुलांची आठवण येत असेल. तो चौकशीसाठी लगेचच पत्र पाठवील असं वाटत होतं. पंधरा-वीस दिवस झाले तरी पत्र नाही. मला उलट त्याचीच काळजी वाटायला लागली. तो काश्मीरमधे नीट पोचला की नाही, अशी शंका वाटू लागली. एखादं कार्ड तरी त्यानं पाठवावं असं वाटत

होतं. ते शेवटपर्यंत आलंच नाही. आणि एक दिवस तो स्वत:च येऊन उभा राहिला. माझा नवरा काश्मीरला गेला म्हणून मला फार अभिमान वाटत होता. येताना काहीतरी तिकडची म्हणून खास वस्तू माझ्यासाठी घेऊन येईल असं वाटत होतं. खरं तर वय असं होतं की काश्मीरची साडीच हवी होती. किंवा पैसे नाहीत म्हणून रेशमी रुमालसुद्धा चालला असता. उत्सुकतेनं मुलं आणि मी त्याच्याभोवती बसलो. त्यानं बॅगेतून सामान बाहेर काढलं. त्यातून फक्त त्यानं जाताना नेलेले कपडेच बाहेर निघाले. ते बघून माझ्या मनावरचा ताबा सुटला आणि काही बोलायच्याच आधी मी मोठमोठ्यानं रडायला सुरुवात केली. त्यानं विचारलं, "रडायला काय झालं?" मी म्हणाले, "एवढा तू काश्मीरला जाऊन आलास आणि माझ्यासाठी काहीच आणलं नाहीस? तो म्हणाला, "माझ्याजवळ पैसे कुठं होते?" मी म्हणाले, "दहा पैशांचं कार्ड टाकायला पण तुझ्याजवळ पैसे नव्हते का? दोन लहान मुलं घेऊन मी एकटी इथं राहिले त्यांची पण तुला काळजी वाटली नाही? कोणाकडून उसने घेऊन तरी कार्ड टाकायला पाहिजे होतंस." असं बोलून मी आणखी जोरानं रडायला सुरुवात केली. आणि आपलं चुकलं हे तो मनातून समजला आणि म्हणाला, "अग, यशोदा रडू नकोस. मी आणली आहे तुझ्यासाठी साडी. माझ्या बॅगेत जागा नव्हती म्हणून दुसऱ्याच्या बॅगेत ठेवायला दिलीय. ती उद्या, परवा येताना घेऊन येईन." आणि एका क्षणात सगळं चित्रच पालटलं. काश्मिरी साडी कशी असेल याची मनातल्या मनात मी कल्पना करू लागले: साडी रंगीत म्हणजे कुठल्या रंगाची असेल? फुलाफुलांची असेल? की कशी? स्वत:चे कपडे त्याच्या बॅगेत न देता, माझी साडीच त्याच्याकडं का दिली? आता आणली असती म्हणजे लगेच बघायला मिळाली असती ना!

दोन दिवसांनी त्यानं एक साडी आणून माझ्या हातात दिली. तिला बोटाच्या पेराएवढी बारीक फिकट जांभळ्या रंगाची किनार होती आणि त्याच रंगाच्या बारीक चौकड्या होत्या, माझ्या कल्पनेतल्या साडीसारखी ती मुळीच नव्हती. फारच साधी होती. तरी मी आनंदानं ती सर्वांना दाखवली. मला काश्मीरहून साडी आणली ही माझ्या आयुष्यात अतिशय आनंदाची गोष्ट घडली. खूप वर्षं जपून सांभाळून ती वापरत होते. नंतर ती फाटून पण गेली.

बऱ्याच वर्षानंतर मुलं मोठी होऊन कॉलेजात जायला लागली होती. एकदा असंच घरात बोलत बसलो होतो. काही तरी विषय निघाला आणि मंगेश म्हणाला, "आज तुला खरी गोष्ट सांगतो. ती साडी मी काश्मीरहून आणलीच नव्हती." हे ऐकून मला धक्काच बसला, "मग कुठून आणली होतीस? म्हणाला की, "अग, मुंबईत फोर्टमधे काश्मीर एंपोरियम आहे. तिथं काश्मीरच्या सगळ्या वस्तू मिळतात. तू रडायला लागलीस तेव्हा तुला शांत करण्यासाठी मला खोटं बोलावं लागलं आणि हे सर्व नाटक करावं लागलं." तरी खूप वर्षं त्यानं ते नाटक चालू ठेवलं होतं आणि माझा आनंद कमी होऊ दिला नव्हता. जेव्हा त्यानं ते सांगितलं तेव्हा त्या गोष्टीचं महत्त्व राहिलं नव्हतं.

एकदा संध्याकाळच्या स्वयंपाकाला लागले. बघते तर घरात नारळ नाही. फरसबीची भाजी होती. नारळ आणायला पैसे नव्हते. म्हणून खोबरं न घालताच भाजी करून ठेवली. चपात्या केल्या. मंगेश आल्यावर आम्ही दोघं जेवायला बसलो. मुलांची जेवणं आधीच झाली होती. नुसती, खोबऱ्याशिवाय भाजी बघताच, मंगेशचं डोकं भडकलं. त्यानं ओरडायला सुरुवात केली. नारळ का घातला नाही? ही असली भाजी खाणं मला शक्य नाही. आणि एकदम ताट घेऊन त्यानं भिंतीवर फेकून दिलं. आणि तो निघून गेला. दोघंही त्या रात्री उपाशीच झोपलो.

जास्त मुलं होणं हे माझ्या संसाराच्या कल्पनेत बसत नव्हतं. मला मुंबईची काहीच माहिती नसल्यामुळं मी इतके दिवस काही करू शकले नाही. एके दिवशी धीर करून एकटीच खाली मम्मींकडं गेले. नायर हॉस्पिटलला त्या त्याच विभागात नोकरी करायच्या असं समजलं. त्यांच्या सल्ल्यानं काही उपाय केले पण ते अयशस्वी ठरले आणि पुढच्या सर्व दिव्यातून जावं लागलं. प्रकृतीची वाट लागत होती. एकदा मी मंगेशला म्हणाले, "आपल्याला एक मुलगा व एक मुलगी अशी छान दोन मुलं आहेत. ह्यापुढं मला काही मूल नको. मी ऑपरेशन करून घेते." तो म्हणाला, "ते कसं शक्य आहे? मी आईवडिलांचा एकुलता एक मुलगा आहे. मी असं केलं तर ते काय म्हणतील?" मी म्हणाले, "पण पुन्हा मुलगाच होईल ह्याची काय खात्री? माझी प्रकृती बिघडत चालली आहे. मुलाला जन्म मला द्यायचाय. त्याला वाढवून मोठं करायचंय. त्यासाठी आणखी पैसे लागणार." त्या वेळी तो इंटर होऊन बी०ए०चा अभ्यास करत होता. मराठी व संस्कृतसाठी खूप कष्ट घेत होता. प्रोफेसर शांताराम जोग त्या वेळी माटुंग्याला राहत होते. त्यांच्याकडं रात्री जाऊन संस्कृत शिकत होता. पाठांतर व स्मरणशक्ती उत्तम असल्यामुळं तो भराभर सर्व आत्मसात करत होता. रात्री मुलांना जेवायला घालून, झोपवून, त्याची वाट बघत मी एकटी थांबत असे. जोग त्याचं खूप कौतुक करायचे. 'असा विद्यार्थी मला मिळाला नव्हता' म्हणायचे. त्यांनी पण त्याच्यावर पुष्कळ मेहनत घेतली व आपला वेळ खर्च केला. त्याची जाणीव मंगेशनं कायम ठेवली आहे. अजूनही तशीच आहे.

मला खूप अशक्तपणा आला होता. त्यातच पुन्हा दिवस गेले. अंजू चार वर्षांची झाली होती. तेव्हा आम्ही ठरवलं की हे एक मूल होऊन जाऊ द्यावं. आता जर मुलगा झाला तर ऑपरेशन करून घ्यावं असं माझ्या मनात होतं. डोहाळे फार जड गेले. अशक्तपणा भरून येत नव्हता. घरात काम संपतच नव्हतं.

अभयच्या वेळी डोहाळे फार कडक लागले होते. नुसता फोडणीचा वास पण सोसेना. फारसा स्वयंपाक करता येत नव्हता. आणि मी स्वत: केलेला एकही पदार्थ खाण्याची इच्छा होईना. जीव कासावीस व्हायचा. घरात दुसरं कोणी नाही. सांगणार कोणाला?

त्या वेळी डॉक्टर श्रीखंडे यांच्याकडं एक स्वयंपाकी ठेवलेला होता. चांगला तरुणच होता. तो कधी भेटला तर मी त्याला विचारत असे, "आज क्या बनाया खाने के लिये?" तो काही नावं सांगायचा. ते ऐकून मला ते खाण्याची इच्छा व्हायची. एक दिवस जेवणाच्या वेळी मी खाली जिना उतरून गेले व त्यांची बेल वाजवली. तो स्वयंपाकी आला. त्यानं दार उघडलं. मी त्याला विचारलं, "आज क्या बनाया खानेके लिये?" त्यानं काहीतरी नाव सांगितलं. मी म्हणाले, "जो कुछ बनाया है, वो मेरे लिये थोडासा उप्पर भेज देना." तो "हो" म्हणाला. हे सगळं करायला मला सगळं धैर्य एकवटावं लागलं. पण मी ते केलं. याचं कारण मला दुसऱ्यानं केलेला वेगळ्या चवीचा पदार्थ खाण्याची जबरदस्त इच्छा झाली होती. त्यानं वाटीभर भाजी आणून दिली होती आणि मी ती आवडीनं खाल्ली. डोहाळजेवण करण्याची प्रथा का पडली असावी व "तुला काय खावंसं वाटतं?" हे विचारण्याची पद्धत का सुरू झाली? त्याचं उत्तर मला मिळालं. अशा वेळी होणारे शारीरिक व मानसिक बदल इतरांना कळण्यासारखे नसतात. ज्या स्त्रियांना अजिबात डोहाळे लागत नाहीत, त्यांचे सर्व व्यवहार नेहमीसारखेच चालू असतात. त्या अगदी नशीबवान म्हणायला हरकत नाही. पण माझा अनुभव वेगळा आहे.

डॉक्टर श्रीखंडे यांचे यजमान मकुंदराव. ते प्रेमळ व शांत स्वभावाचे होते. त्यांना दोन मुलं. मोठा शेखर व मुलगी नंदू. अंजू मुकुंदरावांना खूप आवडायची. मुलं त्यांना 'पप्पा' म्हणायची, म्हणून मी पण पप्पा म्हणू लागले. ते अंजूला खेळण्यासाठी खाली बोलावून घ्यायचे. नंदू तिच्यापेक्षा वर्षानं मोठी असेल. दोघी मिळून खेळायच्या. पप्पा त्यांना गोष्टी सांगायचे. गमती करायचे. त्यांना सारस्वत पद्धतीचं जेवण आवडायचं. विशेषत: आमसोलाची कढी, तळलेले बांगडे, पापलेटची आमटी हे पदार्थ. मी अंजूबरोबर त्यांच्याकडं पाठवून द्यायची.

त्या वेळी माझा भाऊ हरीश सबइन्स्पेक्टर होता. त्याचं घर ऑपेरा हाऊसला होतं. उषावहिनी व त्यांची मुलं राजशेखर, निरंजन, हे दोघं अजितपेक्षा थोडे मोठे. त्यांच्याकडं मी अजित, अंजूला घेऊन राहायला गेले होते. चार दिवस राहून मंगेश आम्हांला घरी न्यायला आला. बसनं सायनला आलो. मधल्या रस्त्यानं येताना 'साईप्रसाद'कडं पाहिलं तर आमच्या दारात पोलिसांची व्हॅन व पोलीस उभे. चौकशी केली तर म्हणाले, तिसऱ्या मजल्यावर चोरी झाली. म्हणजे आमच्याच घरात. वर आम्ही एकटेच राहतो. कोणीतरी पोलिसांना वर्दी दिल्याचं दिसत होतं. अंजूनं घाबरून रडायला सुरुवात केली. अजित बावरून गेला. चारसहा वर्षांचं वय. पोलिस बघून आणि चोरी झाली म्हणून दोघंही घाबरले. वर गेले. बघतो तर चोरानं कुलूप न तोडता, कोयंड्याचा स्क्रू काढून कडी निखळून दार उघडलं होतं. आत इन्स्पेक्टर लोक खुर्च्या घेऊन बसले होते. म्हणाले, कशाला हात लावू नका. नशीबच म्हणायचं की मी सायनला काहीच दागिने आणले नव्हते. गिरगावात सासूबाईंकडं मोठे दागिने ठेवून आले होते. एकच लहान सोन्याचा हार आणला होता. पण तो मी गळ्यात घालून गेले होते. तो गळ्यातच होता.

लग्नातल्या सगळ्या चांगल्या साड्या जाग्यावरच होत्या आणि मोठी चांगली भांडीसुद्धा नेलेली नव्हती. मी त्यांना म्हणाले, "बाकी कशाला हात लावत नाही. फक्त कपाटात माझ्या साड्या आहेत की नाही ते बघते." "बरं" म्हणाले म्हणून कपाट उघडून पाहिलं. साड्यांना हात लावलेला नव्हता. भांडी पण फळीवर तशीच होती. चोरांना हवं होतं, सोनं नाणं व पैसे. ते घरात काही नव्हतंच. अंजूच्या कानांतले बारीक डूल वगैरे होते ते त्यांनी नेले. आणि एक गजराचं घड्याळ. एवढा खटाटोप करून फारसं काही त्यांच्या हाती लागलं नाही. पोलिसांना चोर सापडला नाही. पण एवढं कळलं की घर बंद ठेवणं धोक्याचं आहे.

अभयच्या वेळी आठवा महिना होता. दिवसभराच्या कामानं थकून, अशक्तपणामुळं मुलांना झोपवताना मी तिथंच त्यांच्याजवळ गाढ झोपून गेले. रात्री केव्हातरी मंगेश आला. मला उठवायला लागला. मी आवाज न करता त्याला सांगितलं की, "मला अगदी बरं वाटत नाही. जरा झोपू दे." हे ऐकून तो भयंकर चिडला. वाट्टेल ते बोलायला लागला. इतका बोलला की रात्रभर पुढं झोप लागली नाही. मी विचार करत राहिले, की खरंच मी इथं राहते आहे कशासाठी? लग्न झाल्यापासून असं कोणतं सुख मला मिळालं आहे? नुसती त्याला आयुष्यात उभं करण्यासाठी, घरात राहून एकटी सर्व संसाराच्या खस्ता काढते आहे. प्रकृतीची वाट लागली आहे. आणि असल्या बोलण्यानं कायमच्या मनावर जखमा होत आहेत. तक्रार तरी कोणाकडं करू? लग्न करून सर्वांना दुखवलं आहे. एक भाऊ हरीश तेवढा प्रेमानं माझी चौकशी करतो. आता इथं राहणं आपल्याला शक्य होणार नाही. पहाटेच उठले. दोन मुलं, मंगेश, तिघंही झोपलेले होते. मला कितीही, काहीही बोलला तरी त्याला लगेच अजूनही पुन्हा गाढ झोप लागू शकते. बंब पेटवला. अंघोळ केली. थोडे कपडे पिशवीत भरून घेतले. मुलांमुळं पाय घोटाळला. विचार केला. मुलं शेवटी त्याचीच आहेत. मी फक्त साधन आहे. आठवा महिना चालू होता. पोटातलं मूल, बाळंतपण हे भयंकर प्रश्न पुढं उभे होते; पण डोक्यातली सणक त्याहीपेक्षा भयंकर होती. मी दार लोटून सरळ खाली उतरले. बसस्टॉपवर गेले. ऑपेराहाउसची बस घेतली. हरीशच्या घरी गेले. सर्व जण झोपेत होते. मला दारात बघून उषावहिनी आश्चर्यचकित झाल्या. "ताई, तुम्ही इतक्या सकाळीच? एकट्याच आलात?" मी म्हणाले, "सांगते सगळं. हरीश उठला नाही का अजून?" "ते उठले नाहीत. आता थोड्या वेळात उठतील. तुम्ही बसा ना." वहिनींची एक मामेबहीण आलेली होती. थोड्या वेळानं भाऊ उठला. त्यानं मला आत बोलावलं. काय झालं म्हणून विचारलं. मी सांगितलं, "हे वरचेवर असं चालू आहे. माझी काळजी घेत नाही, पर्वा करत नाही. भयंकर ओरडतो. सर्व परिस्थितीचा राग माझ्यावर काढतो. आता मला हे सहन होत नाही. मला त्याची भयंकर भीती वाटायला लागली आहे! म्हणून मी निघून आले."

हे ऐकून भाऊ जरा अस्वस्थ झाला. म्हणाला, "सध्या तू शांतपणं इथं रहा. पुढं

बघू काय करायचं ते.'' अस्वस्थपणं मी इथं तिथं करत राहिले. पोटातल्या मुलाची काळजी करत होते. मी भावाला सांगितलं, ''मला मिशनमधे शाळेत किंवा इतर संस्थेत कुठंतरी नोकरी लावून दे. हे मूल मी सांभाळीन. मी पुन्हा तिथं जाणार नाही. माझी आई तेव्हा धाकटी बहीण सरल हिच्याकडं अहमदनगरला होती. ''रात्रीच्या गाडीचं मला तिकीट काढून दे, सध्या मी आईकडं जाते. मला मुंबईत राहायचं नाही.'' तो म्हणाला. ''जरा थांब. घाई करू नको. आई तरी काय करणार? तिचं आता घर नाही. ती रिटायर झाली आहे.''

कशीतरी दुपार काढली. कोपऱ्यात पडून राहिले. आत धडधडत होतं. फार भीती वाटत होती. आतल्या खोलीत बसून होते. तितक्यात मंगेश दोन्ही मुलांना घेऊन आत आला. मुलांना काहीच माहीत नव्हतं आणि कळत नव्हतं. ती गुपचूप येऊन माझ्याजवळ बसली. मंगेश हरीशकडं गेला. तिथं त्यांचं बराच वेळ बोलणं चाललं होतं. मला त्यांनी आत बोलावलं नाही. मला ते ऐकण्याची इच्छा पण झाली नाही. मनानंच अलिप्त झाल्यासारखं वाटत होतं. मुलांचे केविलवाणे चेहरे दिसत होते. सहा आणि चार वर्षांच्या दोन मुलांची, माझ्या पश्चात कोण काळजी घेईल? थोड्या वेळानं हरीशनं मला बोलावलं व म्हणाला, ''ताई हे बघ मी त्याच्याशी बोललो. त्याची समजून घातली. तुझी दोन मुलं लहान आहेत. बाळंतपण जवळ आलं आहे. तेव्हा मला असं वाटतं, की आता तू त्याच्याबरोबर घरी जा.'' परिस्थितीनं मला सगळीकडून आवळलं होतं. घरी जाऊन पुन्हा तोच संसाराचा गाडा घरात ओढत राहणं. निराशेनं मला घेरून टाकलं. तरी पुन्हा 'साईप्रसाद'कडं पावलं वळवली. नियतीनं माझ्या प्रेमाची पुरेपूर परीक्षा घ्यायचं ठरवलं असावं. त्या परीक्षेत पास होण्यासाठी, अशक्त शरीरानं व मनानं पुन्हा एकदा तयारीला लागले.

ह्या वेळेस मम्मींकडं बाळंतपणासाठी न जाता, सायन हॉस्पिटलमधे डॉक्टर आरोसकरांकडं जावं असं मी ठरवलं. म्हणजे ऑपरेशन करायचं असलं तर डॉक्टर तिकडच्या तिकडंच करतील. असा विचार होता. त्याप्रमाणं तिकडं नाव घातलं. तपासायला जाऊ लागले. तपासून डॉक्टर औषधं, मलमं वगैरे लिहून द्यायचे. ते आणायला पैसे नसायचे. मी इतकी बारीक झाले होते की मला मागून पाहिलं तर मी गरोदर आहे असं नवव्या महिन्यावरसुद्धा वाटत नसे. त्यामुळं पोटातल्या मुलाचं पोषण नीट झालं नाही. मूल फार कमी पौंडाचे आहे ते कळत होतं.

माझी आई रिटायर झाली होती. ती माझा भाऊ हरीश याच्याकडं राहत होती. मंगेशच्या आई एक दिवस आल्या आणि ''बाळंतपणासाठी कोणाला बोलवायचं ठरवलं आहेस?'' म्हणून विचारू लागल्या. ''आम्ही काही विचार केला नाही.'' असं मी सांगितलं. तर म्हणाल्या, ''ह्या वेळी मला काही यायला जमणार नाही, तेव्हा तू तुझ्या आईला बोलावून घे.'' मी म्हणाले, ''विचारून बघते तिला.'' ती म्हणाली, ''येईन पण मी जास्त दिवस राहू शकणार नाही.'' कारण माझ्या पाठोपाठ आशावहिनी (आबाची बायको) व धाकटी बहीण सरल ह्यांचेही दिवस भरत आले

होते. "फार तर फार पंचवीस दिवस राहीन." म्हणाली. मी म्हटलं, "ठीक आहे, तेवढे तर तेवढे."

अभयच्या जन्माच्या आधीच मंगेशची बी०ए०ची परीक्षा झाली होती. परीक्षेच्या आधी अभ्यास करण्यासाठी त्याला दोन-तीन महिने रजा पाहिजे होती. रजा घेतली तर पगार बंद होईल म्हणून तेवढ्या पैशांची व्यवस्था करून ठेवायला पाहिजे होती. मंगेशनं काकांजवळ पैसे मागितले, "मला पाचशे रुपये उसने द्या. तुमच्याजवळ नसतील तर कोणाकडून घेऊन द्या. पण रजेच्या दिवसांत घरखर्चाची सोय असायला हवी. मुलं लहान आहेत." पण त्यांनी ते स्पष्टपणं नाकारलं. "तुला पैसे देऊ शकणार नाही," म्हणाले. शेवटी मी मधे बोलले, "त्यानं शिकावं ही तुमची इच्छा होती ना? मग आता जरा उशिरा का होईना पण तो शिकतो आहे, तर आम्हांला मदत करा." तरी ते नाहीच म्हणाले. त्यावर मी म्हणाले, "प्रभाचं जर आता लग्न ठरलं तर तुम्ही कसे ना कसे पैसे उभे करालच ना? आमच्या पण आयुष्याचा प्रश्न आहे. ह्या वेळी आम्हांला पण मदत करा."

हे माझं वाक्य ऐकून सासूबाई भयंकर चिडल्या. "प्रभाचं लग्न व्हायला नको का? तिच्या लग्नासाठी खर्च करायला नको का? एक आणि दोन! खूप बोलल्या. मग आम्ही दोघं गप्प बसलो. आणि ते दोघं निघून गेले. शेवटी यदुनाथ थत्ते यांनी पैसे दिले असं मला आठवतं.

थोडी आधीची गोष्ट : त्या काळी ऑल इंडिया रेडिओवर नवीन जागा निर्माण केल्या होत्या. प्रोग्रॅम प्रोड्यूसर म्हणून कलावंत लोकांना घ्यावं म्हणजे प्रोग्रॅममध्ये विविधता येईल आणि रेडिओच्या कामात कलावंतांना स्थान असेल असा उद्देश नभोवाणी मंत्री डॉक्टर केसकरांचा होता. त्या वेळी मंगेशची बी०ए०ची परीक्षा होऊन त्यानं एम०ए०ला ॲडमिशन घेतली होती. बी०ए०ला त्याला गोल्ड मेडल मिळालं होतं. मराठी व संस्कृतमधे पहिला वर्ग मिळून तो युनिव्हर्सिटीत पहिला आला होता. त्यामुळं त्याचंही नाव रेडिओतील पोस्टसाठी निवडण्यात आलं होतं. पण त्या निवड समितीवर एक पु० मं० लाड होते. पुरुषोत्तम मंगेश लाड–म्हणजे मंगेशचे आते भाऊ. ते आय०सी०एस० होते. फार हुशार व मोठे अधिकारी होते. बाकीच्या मेंबर्सनी मंगेशला अनुकूलता दर्शविली होती पण विरोध केला लाडांनी. कारण काय तर तो त्यांचा नातेवाईक म्हणून. नातेवाईक असला तरी तो सर्वतोपरी लायक होता. वशिल्यानं आलेला नव्हता. त्याची निवड इतर लोकांनी केली होती. पाडगावकर व लाड यांचं एकमेकांच्या घरी येणं जाणं नव्हतं, की आडनाव सारखं नव्हतं. असं असताना ह्यांनी त्याची आलेली नोकरी घालवण्याचं काही एक कारण नव्हतं. तो फर्स्ट क्लास फर्स्ट बी०ए० होऊन वर्षभर बेकार राहिला. साधना प्रेस पुण्याला गेला होता आणि ती पण त्याची नोकरी गेली होती. शिकवण्या करून आणि अमेरिकन पुस्तकांची भाषांतरं करून तो पैसे मिळवत होता.

माझ्या बाळंतपणाआधी पु० मं० लाडांना कॅन्सर झाला होता. आजार वाढल्यावर त्यांना दिल्लीहून मुंबईत आणलं होतं. मी अभयच्या वेळी गरोदर होते. मंगेशला त्यांनी भेटायला ये असा निरोप पाठवला. लगेचच तो त्यांना भेटायला गेला. त्याला त्यांच्याबद्दल खूप आदर होता. भेटून घरी आल्यावर मला सांगायला लागला, "त्यांचं दुखणं विकोपाला गेलं आहे. त्यांना फार वेदना होताहेत. त्यांना सहन होत नाही. म्हणाले की, 'तुला ऑल इंडिया रेडिओवर नोकरी मिळत होती पण मीच नको म्हणून सांगितलं, म्हणून त्यांनी घेतलं नाही. माझ्यामुळं तुझी नोकरी गेली.'" मंगेश वरचेवर त्यांना भेटायला जायचा आणि घरी येऊन दु:खानं वर्णन करून मला सांगायचा. पण मी जे काय हाल काढत होते ते त्यांच्यामुळं असं मला वाटायचं, माझ्या औषधांना पैसे नाहीत. जन्माला येणाऱ्या बाळासाठी नवं कापड आणायला पैसे नाहीत. माझ्या जुन्या साड्यांतून चादरींतून गोधड्या शिवल्या. मंगेशच्या जुन्या लेंगे-झब्ब्यांतून, पोटाचे पट्टे व लंगोट शिवले आणि अंजूच्या फ्रॉकच्या घेरातून झबली शिवली. मशिन घरात होती म्हणून मी पुढं चार-पाच महिने लागणारे सर्व कपडे, एकही नवा कपडा न आणता तयार करून ठेवले होते. नोकरी मिळाली असती तर इतकी वाईट परिस्थिती नक्कीच झाली नसती.

अभयच्या वेळी मला नववा महिना होता. एक दिवस पुरुषोत्तम नाईक घरी आले. पण ते एकटे नव्हते. त्यांच्याबरोबर एक लहान चणीची, गोरीपान, नाकेली, नाजूक मुलगी होती. मला म्हणाले, "यशोदाताई ही विजया (मंदाकिनी). आमचं लग्न ठरलं आहे. ह्या फेब्रुवारी महिन्याची नऊ तारीख ठरलीय." साल होतं १९५७. मला हळूच विचारायला लागले, "कशी आहे मंदा? आवडली का तुम्हांला?" मी म्हणाले, "हो फार आवडली. सुंदर आहे–स्मार्ट आहे. मात्र फार बारीक आहे हो. तुम्ही उंच, दणकट, रुबाबदार. तुमच्यापुढं ती अगदी लहानशी वाटते एवढंच. बाकी चांगलीच आहे."

ठरल्याप्रमाणं त्यांचं लग्न झालं. अंजू चार वर्षांची होती. ती गळ्यात हार घालून त्या दोघांच्या मधे जाऊन बसली. लग्नानंतर काही वर्षं ते दादरला राहायला गेले. त्यामुळं मधे बरीच वर्षं आमचा फारसा संबंध आला नाही.

काही वर्षांनी ते पुन्हा सायनला राहायला आले. आमचं येणं-जाणं वाढत चाललं होतं. मंदा पण खूप आपलेपणानं बोलायला लागली. काही चांगला पदार्थ केला तर आमच्या घरी पाठवल्याशिवाय राहायची नाही. दोघंही बालमोहन विद्यामंदिर या महाराष्ट्रातल्या विख्यात विद्यालयात शिकवत. पुढं पुरुषोत्तम नाईक बालमोहनचे प्राचार्यही झाले. वेळ असेल तेव्हा आम्हांला घरी बोलवत. खाणंपिणं, गप्पागोष्टीत फार मजेत वेळ जायचा.

मंदाचा स्वभाव अगदी मनमोकळा. जरा बोलघेवडाच. आपण काही प्रकृतीची तक्रार केली तर ती तिच्या अनुभवाप्रमाणं लगेच त्यावर उपाय सांगेल. स्वयंपाकातली

अडचण सांगितली तर त्या वेळी काय करायचं ते सांगेल. उदाहरणार्थ, काकडी-टोमॅटोची कोशिंबीर केली तर तिला पाणी सुटतं. त्यावर ती लगेच सांगेल, "यशोदाताई त्या कोशिंबिरीत थोडे सुके कुरमुरे टाकायचे किंवा थोडे सुके पोहे टाकायचे म्हणजे त्यातलं सत्त्व कमी होत नाही. चव कमी होत नाही."असं तिचं नेहमीच चालू असतं.

आता तर आमची मैत्री इतकी पक्की झाली आहे की दोन दिवस एकमेकांशी फोनवरून बोलणं झालं नाही तर आम्हांलाच चैन पडत नाही. कधी घरात जेवण कमी असेल तर दोघं लगेच काहीतरी पाठवून देतील. असे डबे पाठवणं तर सततच चालतं. त्यामुळं त्यांच्या स्वयंपाकघराला मी माझंच दुसरं 'स्वयंपाकघर' म्हणते.

सध्या मी नाईक यांना 'आप्पा'च म्हणते. कारण त्यांची मुलं त्यांना आप्पा म्हणतात. त्या दोघांना तीन मुलं. सर्वांची आता लग्नं झालीत. मोठा दीनानाथ. त्याची पत्नी वसुधा. मुलगी ज्योती. जामात रवी रोंघे. धाकटा मुलगा विश्राम (विशू). त्याची पत्नी मीना. सहा नातवंडं आहेत. असा सुखाचा संसार.

चार वर्षांपूर्वी त्यांना हार्ट ॲटॅक आला होता. त्यांना लायन्स मेडिकल सेंटरमधे ठेवलं होतं. तिथं आम्ही दोघं त्यांना भेटायला गेलो. आम्हांला वाटलं ते अगदी घाबरून, खचून गेले असतील. पण आश्चर्य म्हणजे ते हसून पाडगावकरांना म्हणाले, "बाबा (पाडगावकर), तुमच्या आधी नंबर लावला की नाही?" आम्ही ते ऐकून सर्दच झालो. नंतर त्यांची बायपास सर्जरी झाली. बरे होऊन घरी आले. विसावा, पथ्य, व्यायाम, औषधं असं सगळं चालू होतं. साधारणपणं महिना होत आला होता आणि माझा मोठा भाऊ हरीश निवर्तला. सर्वांप्रमाणं आप्पांना ही गोष्ट कळवली. त्यांनी विचारलं, "किती वाजता फ्युनरल आहे? मी शिवडीला येणार." मी घाबरले. त्यांना सांगितलं, "तुम्ही येऊ नका. तुम्ही अजून पूर्ण सुधारला नाहीत. तुम्ही विसावा घ्या."

आम्ही शिवडीला गेलो. धार्मिक विधी सुरू होते. मी सहज मागं वळून बघते तर, विशूला घेऊन आप्पा तिथं मागं उभे! मी काळजीनं त्यांच्याकडं गेले. त्यांना एका झाडाच्या पारावर बसवलं. पाणी प्यायला दिलं. मागचा पुढचा विचार न करता दुसऱ्यासाठी काहीही करण्याची त्यांची तयारी असते. मला त्यांनी मोठी बहीण मानलं आहे.

माझे दिवस भरत आले होते. माझी आई मदतीला येऊन राहिली होती. अजित पहिलीत होता व अंजू माँटेसरीत. आईला सारस्वत पद्धतीच्या जेवणाची काहीच माहिती नव्हती. आणि असण्याचं काही कारणही नव्हतं. तिनं वीस वर्षं नोकरी करून साधेपणानं घर चालवलं होतं. ती पण आता थकलेली होती. माझ्या आईनं केलेले पदार्थ मंगेशला आवडेनात. तो काकांच्या छत्राखाली, आजीच्या, आईच्या कोडकौतुकात चांगलंचुंगलं खाल्लेला मुलगा. त्यातून काही माणसं, वेळप्रसंग बघून थोडी स्वत:ला, किंवा स्वत:च्या आवडीनिवडींना बाजूला ठेवून वागणारी असतात; पण

त्याला ते जमण्यासारखं नव्हतं किंवा तसं काही केलं पाहिजे हे कळत नव्हतं. ऐन वेळेस काही बदल करण्यासारखा नव्हता.

१६ फेब्रुवारीपासून माझ्या पोटात दुखायला लागलं. पण ते अगदी बारीक दुखत होतं. मोठ्या कळा येत नव्हत्या. १७ तारीख पण अशीच गेली. कळा वाढत नव्हत्या. शेवटी १८ तारखेला सकाळी मी मंगेशला म्हणाले, "तू आज मला सायन हॉस्पिटलला सोडून नंतर मग गिरगावात शिकवणीला जा. कारण तू गेल्यानंतर दोन मुलांना सोडून आईला माझ्याबरोबर येता येणार नाही. मला एकटीला जावं लागेल."

सकाळी आठ-साडेआठला आम्ही दोघं, चालतच हॉस्पिटलमधे गेलो. पोटात दुखतच होतं. गेल्यावर मला आत घेतलं गेलं. आणि मंगेश त्याच्या कामाला निघून गेला. तिथं पाहिलं तर एका पॅसेजच्या दोन्ही बाजूंना अनेक बायकांना बाळंत होण्याच्या आधी कळा देत ठेवलेलं होतं. त्यामधे सर्व थरांतल्या बायका दिसत होत्या. बहुतेक अशिक्षित वाटत होत्या. काही जणी खूप जोरजोरानं ओरडून, ओरडून नवऱ्यांना दोष देत होत्या-शिव्या देत होत्या. एखादी टेबलवर घेण्याच्या आधी तिथंच किंचाळत बाळंत होत होती. मग तिला तिथून काढलं जात होतं. हा सर्व कोलाहल बघून मला तर धडकीच भरली. नरक म्हणतात तो ह्यापेक्षा वेगळा काय असणार? हॉस्पिटलचा स्टाफ क्वचितच दिसत होता. कोणाचीही खास विचारपूस केली जात नव्हती. माझ्या कळा वाढत नव्हत्या. मनावर असह्य ताण वाढत होता. एकटेपणाची भावना घाबरवून टाकत होती.

शेवटी संध्याकाळी चार वाजता डॉक्टर तिथं आले. सकाळपासून दिसलेला पहिलाच ओळखीचा माणूस. मी उठून उभी राहिले. त्यांना सांगितलं की, "डॉक्टर आता मला सहन होत नाही. कळा तर वाढत नाहीत. मी काय करू?" ते थोडक्यात म्हणाले की, "जे काही नैसर्गिकपणं होईल ते हवं आहे. थोड्या वेळानं तुम्ही बाळंत व्हाल." आणि ते निघून गेले. संध्याकाळी सहा वाजेपर्यंत भेटायची वेळ होती. आई मुलांना घेऊन भेटायला आली होती. पण भेटायची वेळ टळून गेल्यामुळं ती आत येऊच शकली नाही. शेवटी निराशाच झाली. कोणीच आलं नाही. मंगेशसुद्धा नाही.

नंतर एक मराठी दिसणारी, साडी नेसलेली, शिकणारी डॉक्टर असावी. ती आत आली. तिनं मला पाहिलं. "ह्यांना टेबलावर घ्या" म्हणाली. टेबलावर गेले. उजव्या बाजूला लेडी डॉक्टर व डाव्या बाजूला एक अनुभवी दिसणारी अशी नर्स उभी. "कळा द्या, असं करा, तसं करा." असं सांगायला लागल्या. दोघी आपसात बोलत होत्या. डॉक्टरनं नर्सला विचारलं, "हा मुलगा असेल का मुलगी?" नर्स म्हणाली, "नक्की मुलगा. माझा अंदाज चुकणार नाही." मी मनात म्हणाले, "मुलगा असेल तर किती बरं होईल. मी ऑपरेशन करून घेईन. एकुलत्या एक मुलाच्या-मंगेशच्या वंशाला आणखी एक दिवा मिळेल." खूप कष्टानं शेवटी एकदाची मी बाळंत झाले. मला दुसरा मुलगा झाला. आणि मोठ्या जबाबदारीतून मोकळं झाल्यासारखं मला

वाटलं. पण त्या अनोळखी ठिकाणी भीती वाटत होती. थकवा व एकटेपणा जाणवत होता. संध्याकाळचे सात वाजून गेले तरी मंगेश परतला नव्हता. दिवसभर पोटात अन्नाचा कण गेला नव्हता. तेवढ्यात त्यांनी अभयला स्वच्छ करून, गुंडाळून माझ्यापासून लांब एका टेबलावर आणून ठेवलं. मी वळून त्याच्याकडं पाहिलं तेव्हा त्याचा चेहरा मला एकदम पु० मं० लाडांसारखा वाटला. त्यांना सर्व जण तात्या म्हणत. मनात आलं, हा मुलगा त्यांच्यासारखा दिसतो तेव्हा तसाच हुशार पण होईल.

मी पेइंग वॉर्डमधे खाट घेतली होती. पण माझे पैसे भरले नसल्यामुळं, मला लगेच वॉर्डमधे नेलं नाही. आधी फक्त दहा रुपये भरायचे होते. मंगेश न आल्यामुळं ते कोण भरणार! मला एका स्ट्रेचरवर ठेवून अंगावर एक पातळ चादर टाकली आणि स्ट्रेचर एका उघड्या पॅसेजमधे ठेवून दिला. पैसे भरण्याची गोष्ट मला ठाऊक नव्हती. मला समजेना की इथं का आणून ठेवलं आहे? त्या काळात मुंबईत थंडी पडायची. थंडगार वारा अंगावरून वाहत होता. भूक लागली होती. असहाय वाटत होतं. आठ वाजले– नऊ वाजले आणि दहा पण वाजले. मी हताश झाले. त्यानंतर मंगेश आला.

मला वॉर्डमधे नेलं व खाटेवर घातलं. बाळंत होऊन चार तास होत आले होते. मी नर्सला बेडपॅन द्यायला सांगितलं. ती माझ्या अंगावर खेकसली, "आताच आलांत आणि लगेच बेडपॅन काय मागता?" तिला काय माहीत की मी आताच बाळंत झाले नाही. चार तास उलटून तशीच उपाशी बेशुद्ध झाल्यासारखी मी गुंगीत पडून होते. रात्री कधीतरी मूल रडतं आहे हे मला कळलं. पण कुठलीही हालचाल करण्याचं त्राण माझ्यात राहिलं नव्हतं. मी उठू शकले नाही. आणि कोणी येऊन त्याला बघितलं नाही. सकाळी नर्स आली. तिनं बाळाचे कपडे काढले. तिला कळलं की रात्री त्याला काळी शी झालेली आहे. आणि त्याचे कपडे तेव्हा न बदलल्यामुळं ती सुकून गेली आहे. ती पुन्हा माझ्यावर ओरडली, "रात्री तो रडला ना? मग उठून त्याचे कपडे का बदलले नाही? सगळी शी सुकून, चिकटून राहिली आहे." उत्तर काय देणार? मी गप्प पडून राहिले. दु:खानं स्वत:लाच दोष देत राहिले.

सकाळी मंगेश आला व सांगायला लागला की, "मी नऊ वाजताच रात्री आलो. पण माझ्याजवळ डिपॉझिट भरायला दहा रुपये नव्हते. शेवटी माझ्या ओळखीचा एक डॉक्टर भेटला. त्यानं मला दहा रुपये दिले. ते भरले. तेव्हा त्यांनी तुला वॉर्डमधे आणलं. आता मी तुझ्या आईकडून दहा रुपये आणलेत ते त्याचे त्याला देऊन टाकतो." हे सर्व कल्पनेपलिकडचं होतं. बोलण्यासारखं काही शिल्लकच राहिलं नव्हतं. मी त्याला एवढंच सांगितलं की, "डॉक्टरांकडं जा, आणि त्यांना सांग की, मूल न होण्यासाठी तिचं ऑपरेशन करून टाका." बाळंतपणानंतर ते ऑपरेशन करणं सोपं असतं असं मी ऐकलं होतं.

संध्याकाळी आई दोन्ही मुलांना घेऊन भेटायला आली. कसंबसं तिनं घर चालू ठेवलं होतं. मंगेश पण आला. आल्याबरोबर मी विचारलं, "डॉक्टरांना भेटलास का? काय म्हणाले?" म्हणाला, "नाही, आज डॉक्टर भेटलेच नाहीत." पुन्हा

दुसऱ्या दिवशी मी तोच प्रश्न विचारला. म्हणाला, "डॉक्टर म्हणाले, की मुलं इतकी लहान असताना आणि तिला अजून तीस वर्षं पण पुरी झाली नसताना आम्ही ऑपरेशन करत नाही." माझी भयंकर निराशा झाली. आता हेच भोग आणि किती वर्षं चालू राहणार? ह्या विचारानं मन फार विषण्ण झालं.

तेव्हा सायन हॉस्पिटल म्हणजे सैनिकांच्या जुन्या बरॅक्स होत्या. संडास अगदी खराब. बाहेरच्या बाजूला व्हरांड्याच्या पलीकडं होते. रात्री दिवे बंद झाले की बाहेर जायला भीती वाटायची. त्यातच एका रात्री शेवटच्या खाटेवरची एक बाई मेली. सगळ्या बाळंतिणी घाबरल्या. काय काय गोष्टी सांगायला लागल्या. स्वच्छतेच्या नावानं सगळा उजेडच होता. घरात आईला त्रास होत होता. म्हणून मी सात दिवसांनी घरी जायचं ठरवलं. लेडी डॉक्टरला विचारलं. ती म्हणाली, "इतक्यात जाऊ नका, तुम्हांला अजून खूप ब्लीडिंग होतं आहे." पण मी ऐकलं नाही. दिवसाला पाच रुपये प्रमाणं सात दिवसांचे पस्तीस रुपये भरले आणि अशक्त मुलाला घेऊन घरी आले. आल्यापासून बसून करता येईल अशी मदत आईला करू लागले.

अभयचं वजन खूप कमी म्हणजे चार पौंड सात औंस एवढंच होतं. अजितचं पावणेसहा पौंड, अंजूचं पाच पौंड. दर वेळी मुलाचं वजन कमी होत गेलं. त्याला कपडे घालणं, बदलणं, धरणं सगळंच अगदी कठीण वाटू लागलं. अंगावरचं दूध कमी झाल्यामुळं डब्याचं दूध चालू केलं. त्याच दुधानं अंजू चांगली बाळसेदार झाली होती. पण ह्याला ते पचेना. शेवटी फार झालं तेव्हा डॉक्टर मर्चंटना दाखवलं. त्यांनी सांगितलं की आताच्या आता डब्याचं दूध बंद करा, वरचं म्हशीचं दूध लावा. तरी तक्रारी चालूच राहिल्या.

मला घरी येऊन जास्त दिवस झाले नव्हते. मंगेशनं एक दिवस सांगितलं की, "तात्या (पु० मं० लाड) वारले." त्याला खूप वाईट वाटलं. त्यांच्या घरी जाऊन सर्वांना तो भेटून आला. मला अशक्तपणामुळं व सर्व प्रकारच्या मानसिक ताणामुळं, कधी नव्हे अशी भयंकर भीती वाटायला लागली. ज्या खोलीत माझी कॉट व पाळणा होता त्या खोलीची रात्री भीती वाटायला लागली. नीट झोप लागेना. मी लाडांना एकदोनदा पाहिलं होतं. काही कारण नसताना त्यांच्या विचारानं भारून गेल्यासारखं होऊ लागलं. शेवटी मी आईला सांगितलं की, "पहिली माझी खोली बदल. ह्या खोलीत झोपणं मला शक्य नाही." तिनं लगेच खोली बदलून दिली. मग हळूहळू मन शांत होऊ लागलं.

आई फक्त सत्तावीस दिवस राहिली. ती लगेच आशावहिनींकडं गेली. मला खूप जोराचा फ्ल्यूचा अॅटॅक आला होता. पण तिचा नाइलाज होता. आता सर्वच जबाबदारी माझ्यावर पडली. प्रकृतीची साथ नव्हती त्यामुळं सगळं फार कठीण वाटत होतं. मंगेशचं लेखनाचं आणि संसारापुरते किंवा अपुरे पण पैसे मिळवण्याचं काम चालू होतं.

तीन मुलांबरोबर त्याचे तीन काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले. १९५० मधे 'धारानृत्य' अजितबरोबर. १९५३ ला 'जिप्सी' अंजूबरोबर. १९५७ मधे 'छोरी' अभयबरोबर. मी तीन मुलांना जन्म दिला. तर त्याला सहा अपत्यं मिळाली. लग्नानंतर सातच वर्षांत ही खूप मोठी कमाई झाली. शिवाय अमेरिकन पुस्तकांची भाषांतरं चालूच होती. १९५७ ते १९७२पर्यंत भाषांतरांचं काम चालूच होतं. जयवंत दळवी यांच्याकडून ती अमेरिकन पुस्तकं भाषांतरासाठी येत होती. फार गुणवत्तेची. वाचण्यासारखी ती पुस्तकं. 'नववधूचं आगमन', 'अपुला आपण वैरी', 'भिडली रात्र पहाटेला', 'बाळपणीचा काळ सुखाचा', 'अमेरिकन समाज', 'अमेरिकन संगीतकार', 'कार्ल सँडबर्ग', 'हे सारे मानवासाठी', 'वाटाड्या', 'जीवन त्यांना कळले हो' शिवाय 'कवि आणि कविता' दोन पुस्तकं. अशी वेगवेगळ्या लेखकांच्या पुस्तकांची सुंदर भाषांतरं त्यानं केली आहेत.

त्याबरोबरच काव्यवाचनाचे कार्यक्रम चालूच होते. कधी एकट्याचा स्वतंत्र, तर कधी तिघांचे–करंदीकर, बापट मिळून. १९५३मधे 'जिप्सी'ला महाराष्ट्र राज्य पारितोषिक मिळालं. १९५६मधे बी०ए०ला मराठी-संस्कृत विषय घेऊन तो पहिल्या क्रमांकानं पहिल्या वर्गात आला. तर्खडकर गोल्ड मेडल व गडकरी पारितोषिक त्यानं मिळवलं.

१९५७ साली कीर्ती कॉलेजमधे असिस्टंट प्रोफेसर म्हणून त्यानं काही महिने काम केलं. त्याच सुमारास ऑल इंडिया रेडिओवर असिस्टंट प्रोड्यूसर म्हणून नोकरी मिळाली. त्याच वर्षी 'छोरी' कवितासंग्रहाला महाराष्ट्र राज्य पारितोषिक मिळालं. तसंच मध्यप्रदेशचं 'स्टेट ॲवॉर्ड' मिळालं.

बी०ए०ची परीक्षा झाली, रिझल्ट लागला. घरात आनंदीआनंद झाला. माझ्या आईला पण फार आनंद वाटला. "या मूर्ख मुलीनं काय पण नवरा शोधून काढलाय. हा संसार झेपणार कसा हिला?" असं तिला वाटायचं. पण ह्या निकालानं हे सिद्ध झालं की, तो नुसता कवी नाही तर फार बुद्धिमान पण आहे. तेव्हा माझी आई म्हणाली की, (ती मला ताई म्हणायची.) "ताई, ते कॉनव्होकेशनला जाणार असतील ना? तू पण जाणार असशील तर माझी पण फार इच्छा आहे एकदा तो समारंभ बघण्याची." मी मंगेशला सांगितलं. त्यानं तीन पासेस आणले होते. सासूबाई, आई व मी अशा तिघींना त्यानं तिथं नेलं. आणि आम्ही डोळे भरून तो समारंभ पाहिला. घरी जाताना सासूबाई सांगायला लागल्या की, "त्याची परीक्षा चालू असताना मी 'शिवलीलामृत' वाचायला घेतलं होतं. म्हणून असं यश त्याला मिळालं." त्या काय म्हणत होत्या ते मी शांतपणानं ऐकून घेतलं.

अभय दोन महिन्यांचा होत आला होता. विशेष काही सुधारला नव्हता. आई लवकर गेली. मला अशक्तपणा खूप वाटत होता. त्यातच फ्ल्यू झाला. खोकल्यानं, सर्दीनं हैराण झाले. टी०बी० होतो की काय, असं वाटायला लागलं. गिरगावातून निरोप आला की प्रभा माळ्यावरच्या जिन्यावरून पडली. तिची कंबर फार दुखायला

लागली. घरगुती उपायांनी काहीच फरक पडेना म्हणून एक्स-रे काढला. तर त्यात कंबरेच्या हाडाला क्रॅक आहे व प्लास्टर घातलं पाहिजे असं सांगितलं आहे. प्रभाचं व मंगेशचं भांडण झालं होतं. ते दोघं एकमेकांशी बोलत नव्हते.

प्रभा एक दिवस सायनला माझ्याकडं आली व म्हणाली की, "वहिनी, मला कमरेला प्लास्टर घालायला सांगितलं आहे. प्लास्टर सहा आठवडे किंवा जास्त पण ठेवावं लागेल. तोपर्यंत मला बिछान्यातून उठता येणार नाही. शांतारामाच्या चाळीत राहून सर्व व्यवस्था करणं जमणार नाही. तेव्हा मी इकडं येऊ का?" मी तिला लगेच यायला सांगितलं. जागा भरपूर होती. ते सर्व जण चाळीत राहतात आणि आम्ही मोठी जागा वापरतो त्याबद्दल माझ्या मनात नेहमी अपराधीपणाची भावना होती.

तिला नायर हॉस्पिटलला नेलं. प्लास्टर घातलं. प्लास्टर सुकल्याशिवाय घरी जाऊ नये असं डॉक्टरांनी सांगितलं होतं. पण ती तिथं राहायला तयार नव्हती. हॉस्पिटलमधे पाणी पण घेईना. तेव्हा तसंच तिला ॲब्युलन्समधे घालून सायनला तिसऱ्या मजल्यावर आणलं. मी तिची सर्व व्यवस्था करून ठेवली होती. हवेशीर खोलीत कॉट घालून, बेडपॅन, तोंड धुवायला गिंडी आणि इतर लागणाऱ्या सर्व वस्तू तयार होत्या. सुहास तिच्याबरोबर राहिली. तोपर्यंत एवढं मोठं पोटापासून मांडीपर्यंत प्लास्टर मी कधीच पाहिलं नव्हतं. ते बघून मला इतकं वाईट वाटलं की, आतल्या खोलीत जाऊन मी खूप वेळ रडले. दु:ख करत बसायला वेळ नव्हता. घरात मोठी चार माणसं व तीन लहान मुलं होती. फक्त भांडी, धुण्याला काशिनाथ नावाचा म्हातारासा गडी होता. त्याचं झोपडं बिल्डिंगच्या बाजूलाच होतं. त्याची बायको कृष्णाबाई, मुलगा मारुती व त्याची बायको बाबी–अगदी तरुण मुलगी होती. प्रभाचं काम करण्यासाठी वेगळी बाई ठेवली होती. तिला वेगळा पगार द्यावा लागे. तोपर्यंत मंगेशला नोकरी मिळाली नव्हती. पुरेसे पैसे घरात येत नव्हते. सुहास महिनाभर राहिली. मंगेशचा व प्रभाचा अबोला चालू होता. सुहासचे व प्रभाचे पण मधून मधून खटके उडत. कामाला ठेवलेल्या बाईचं काम प्रभाला पसंत पडत नव्हतं. त्यावरून ती तिला बोलत असे. घरी आल्यावर लक्षात आलं की तिचं प्लास्टर तुटलं आहे. सुहासकडं हॉस्पिटलचे फोन नंबर होते. तिकडं फोन करून ॲब्युलन्स मागवली आणि पुन्हा तिला दुसरं प्लास्टर घातलं. मग घरी आणलं. त्या प्लास्टरमधून एक लहानसं हिरवं रोपटं वर आलेलं दिसत होतं. मुलांना फारच गंमत वाटली. ती रोज येता-जाता ते बघून जात. पण जसं ते प्लास्टर सुकू लागलं तसं ते रोपटं पण सुकून गेलं.

प्रभाला हलकं पातळ अन्न घ्यायला सांगितलं होतं. रोजचं जेवण नुसतं पाठीवर पडून राहिल्यानं पचणार नव्हतं. ते आदलून बदलून चालू होतं. ती वेळ जाण्यासाठी पडल्या पडल्या मण्यांचे बटवे तयार करत होती. आम्हांला प्रत्येकीला भेट देत होती. अभय लहान दोन महिन्यांचा होता. मी जेवत असताना तो रडला तर ती थोडा वेळ त्याला पोटावर धरून खेळवत होती. मुलाबाळांमधे तिचा वेळ मजेत जात होता.

सुहासचं कॉलेज सुरू होणार म्हणून काही दिवसांनी ती पुन्हा गिरगावात निघून

गेली. ती गेली त्याच्या दुसऱ्या दिवसापासून प्रभाची कामाची बाई येईनाशी झाली. तिची वाट बघून शेवटी मी प्रभाच्या सकाळच्या सगळ्या गोष्टी उरकायला सुरुवात केली. कामाच्या बाईला निरोप पाठवला. चार-पाच दिवसांनी ती आली. तोपर्यंत माझे खूप हाल झाले. ती बाई आपल्याला कामच नको म्हणायला लागली. मी घाबरले. सगळं काम मला झेपण्यासारखं नव्हतं. शेवटी तिच्या हातापाया पडून तिला राजी करून घेतलं.

एकदा प्रभाच्या कॉटच्या वरच्या छतावर एक मोठी पाल आली. ती बघून मुलं घाबरली आणि मीसुद्धा घाबरले. आम्ही ओरडायला लागलो. पाल सरकत सरकत प्रभाच्या बरोबर कॉटच्या वर गेली. ती पण "वहिनी, वहिनी" करून ओरडायला लागली. पण ती हलू शकत नव्हती. मी काठीनं पालीला घालवायला बघत होते. ती प्रभाच्या अंगावर पडेल म्हणून भीती वाटत होती. तसं झालं असतं तर ती प्लास्टरसकट उठून पळाली असती. पण तिचं नशीब की पाल खिडकीतून पटकन बाहेर निघून गेली.

एकदा अंधार पडायला सुरुवात झाली होती. मंगेश घरात नव्हताच. आणि एक अतिशय वेगानं उडणारी आणि फडफडणारी तळव्याएवढी पाकोळी घरात घुसली. दारं-खिडक्या उघड्याच होत्या. पुन्हा आली ती आली आणि प्रभाच्याच खोलीत. आंधळ्यासारखी भिंतीवर आपटायला लागली. मुलं आणि मी घाबरून हॉलमधे पळालो. प्रभा आत एकटीच पडून. माझ्या नावानं ओरडत होती. पण मला मुलांना सोडून तिथं जायला धीर होईना. प्रभा शेवटी चिडली. "मी एकटी इथं पडून आहे, आणि तुम्ही सगळी जणं पळून जाता?" म्हणाली. शेवटी काशिनाथच्या मदतीनं ती पाकोळी दारातून बाहेर घालवली. आणि सर्व जण प्रभाच्या खोलीत जाऊन तिचं समाधान करू लागलो.

तीन महिन्यांनी तिचं प्लास्टर काढलं. तिचे सांधे आखडल्यासारखे झाले होते. त्या सुमारास माझी आई पण राहायला आली होती. आम्ही दोघी तिला दोन बाजूंना धरून उभं करीत होतो. पुढं पाऊल टाकायची, चालायची सवय करत होतो. ती अशक्त झाली होती. तिला चांगला आहार चालू केला. सहा महिन्यांत ती पूर्ण सुधारली आणि घरी गेली. पुढं आयुष्यभर तिचे माझे संबंध अतूट जिव्हाळ्याचे राहिले. सासूबाई वारल्यानंतर तर ती मलाच आईच्या ठिकाणी मानू लागली. मला भेटी देणं, राहायला बोलावणं, कौतुकानं चांगलं काही करून आग्रहानं खाऊ घालणं, मानानं मोठेपणा देणं असंच तिचं वागणं.

अभय चार महिन्यांचा झाल्यावर मंगेशला ऑल इंडिया रेडिओवर एकदाची नोकरी लागली. एम०ए०चा अभ्यास चालू होता. नोकरी, कॉलेज व अभ्यास असा तो रात्रंदिवस कामात गुंतलेला असे. घरात मुलांकडं लक्ष द्यायला वेळ मिळत नव्हता. क्वचित त्यांना घेऊन दादर चौपाटीवर किंवा हॉटेलात जात होतो. पण मुलं मुळीच तिखट खात नव्हती. म्हणून त्यांचं जेवण अंड्यांवर भागवावं लागे. भेळसुद्धा गोड करायला सांगत असू.

अभयची आजारपणं सारखी चालूच होती. मला पण काम झेपेनासं झालं होतं. त्या वेळी म्हातारा काशिनाथ भांडी, धुणी करायचा. प्रभा, सुहास मला 'वहिनी' म्हणायच्या म्हणून तो पण 'वहिनी' म्हणायला लागला. एक दिवस म्हणाला, "वहिनी, आमच्या मारुतीचं लग्न झालं. माझी अगदी तरुण सून घरात आहे. तिला ठेवता का कामाला? ती स्वयंपाक करून देईल तुमचा." मी म्हणाले, "साहेबांना विचारते आणि मग सांगते." मंगेशला विचारलं. तो म्हणाला, "तुला ठेवायचं तर ठेव. माझं काही म्हणणं नाही." त्यांना दोघांना जेवण आणि पगार कबूल केला आणि कामावर ठेवलं. सकाळी बाबी आली. ती कोवळी, उंच, नुकतंच लग्न झालेली, नाजूक, नाकीडोळी नीटस मुलगी होती. मला ती आवडली. हळूहळू मी तिला स्वयंपाकाची पद्धत शिकवली. ती तरुण असल्यामुळं मुलांशी चांगली वागायची. काम झालं की खाली झोपडीत निघून जायची. तिची पुष्कळ मदत व्हायला लागली. मुलांना तिच्याकडं ठेवून थोडा वेळ खाली जाण्याची पण सोय झाली. अभयकडं लक्ष द्यायला जास्त वेळ मिळू लागला.

जुलै, ऑगस्टचा महिना होता. अभयची प्रकृती बरी नव्हती. रात्री खूप ताप चढला होता. त्याला घेऊन मोठ्या कॉटवर मी झोपले होते. बाकी सगळे जमिनीवर गाद्या घालून झोपले होते. मंगेश हॉलमधे दारातच वाऱ्यासाठी झोपला होता. त्या काळी दूधवाला पहाटे येऊन, बेल वाजवून, दूध देऊन जायचा. नेहमीसारखी पहाटे बेल वाजली. मंगेश दारात होता. तो उठला. गादीवरून जमिनीवर पाय टाकला तो पाण्यात पडला. त्याबरोबर तो ओरडला, "अग यशोदा, इथं पाणी कुणी टाकलं?" मी उठले. खाली पाय ठेवते तर ते पाण्यात. भराभर लाइट लावले. बघते तर पाची खोल्यांत घोट्यापर्यंत पाणी भरलेलं. मुलांच्या गाद्या पाण्यात. बाहेर धो धो पाऊस पडत होता. पण हे पाणी कुठून आलं? लहान बाथरूममधून नळाचा आवाज आला. जाऊन बघते तर तो नळ पूर्ण उघडलेला होता. आता खरं वाटणार नाही; पण तेव्हा तिसऱ्या मजल्यावर नळाला फवारा उडावा इतक्या जोरानं पाणी यायचं. ती बाथरूम मी अंघोळीसाठी वापरत नव्हते. नळ बंद करून ठेवलेला होता. म्हणून मी रोज न लागणारे सुक्या माशांचे डबे तिथं ठेवले होते. आदल्या दिवशी दुपारी मी ती बाथरूम उघडून मासे काढण्यासाठी आत गेले होते. माझ्या मागून अजित पण आत आला होता. त्यानं आत येऊन काय केलं ते मी पाहिलं नाही. मी माझं काम करून, दाराला कडी लावून बाहेर आले. आता लक्षात आलं की, दिवसा त्या नळाला पाणी नसायचं. अजितनं आत येऊन पूर्ण नळ उघडून ठेवला होता. ती बाथरूम जरा उंचावर होती व तिला उंबरठा नव्हता. त्यामुळं सर्व पाणी वेगानं खाली येऊन घरभर पसरलं. सगळ्या गाद्या ओल्या झाल्या. बाहेर पाऊस. गॅलरीतून काशिनाथला हाक मारली. ते दोघंतिघं आले. त्यांच्या मदतीनं सर्व मिळून ते भयंकर पाणी सकाळपर्यंत आम्ही काढत होतो.

बाबी चांगलं काम करत होती. त्या काळी गॅस सिलिंडर आले नव्हते. आम्ही स्टोव्हवर आणि कोळशाच्या शेगडीवर स्वयंपाक करत होतो. एक दिवस काम करत असताना बाहेरच्या खोलीत बाबी एकदम फीट येऊन खाली पडली. शरीराला

हिसके बसून तोंडातून फेस येऊ लागला. मी असं दृश्य कधीच पाहिलं नव्हतं. हे काय होतंय तेच मला कळेना. मी पळत गॅलरीत गेले आणि काशिनाथला व कृष्णाबाईला हाका मारून त्यांना वर बोलावलं. ते दोघं आले. ती बेशुद्धच होती. त्यांना त्याचं फारसं काही वाटलेलं दिसलं नाही. काशिनाथ म्हणाला, "तुम्ही घाबरू नका वहिनी. ती आपोआप शुद्धीवर येईल आणि कामाला लागेल." म्हणजे हिला फेफरं–म्हणजे फिट्स येतात हे त्यांना आधीपासून ठाऊक आहे तर! मला मात्र काळजी वाटायला लागली. मनात भीती बसली. ती आत काम करत असताना कसलाही मोठा आवाज झाला की मी तिला काय झालं म्हणून विचारून थांबत नव्हते तर प्रत्यक्ष जाऊन बघत होते.

अशा फिट्स चार-पाच वेळा आल्यानंतर मंगेशनं आणि मी ठरवलं की तिला सायन हॉस्पिटलमधे नेऊन डॉक्टरांना दाखवायचं. एक दिवस आम्ही तिला घेऊन गेलो. डॉक्टरांनी सांगितलं की, "हा पूर्ण बरा न होणारा आजार आहे. फिट्सचं प्रमाण वाढू नये आणि त्रास कमी व्हावा म्हणून औषध देता येतं. रोग्याला फीट येण्याच्या आधी थोडी पूर्वसूचना मिळते तेव्हा त्यानं पटकन मोकळ्या जागेत जावं. नाही तर इतर दुखापती जास्त होतात. तिची औषधं आणली व चालू केली. फारसा फरक दिसला नाही. फिट्स अधूनमधून येतच होत्या. ते बघून बघून मी सायकिक होत चालले. कोणाला तरी फीट आल्याची स्वप्नं पडू लागली. ती घरात आल्यापासून डोळे आणि कान तिच्याकडं लागून राहायचे.

पुढं फिट्सचं प्रमाण वाढत गेलं. आठवड्यातून एकदा असं होऊ लागलं. एकदा ती खाली पाटावर बसून स्वयंपाक करत होती. मी बाजूला इतर काही काम करत होते. शेगडी पेटत ठेवली होती. ती अगदी फुलली होती. शेगडी लोखंडी होती, आणि बसल्या बसल्याच बाबी एका क्षणात पुढं कोसळली. तिचा उजवा हात रसरसलेल्या शेगडी भोवती पडला. कवेत घ्यावी तशी शेगडी जवळ येऊन कोपराच्या आतल्या भागाला चिकटली. हे सर्व काही सेकंदांत झालं. बघताक्षणीच मी पुढं झाले आणि तिला शेगडीपासून बाजूला ओढून काढलं. म्हणून तेवढी तरी वाचली. थोड्या वेळानं शुद्धीवर आली पण भाजलेल्या जखमांच्या वेदनांनी कळवळत होती. औषध लावलं. जखमा बऱ्या होईपर्यंत रजा दिली. आता मात्र विचार करायलाच हवा होता. मारुती पण तिच्या पगारावरून त्रास द्यायला लागला होता. बाबीला काढून घेतो म्हणायला लागला. आणि त्यानंच तिचं येणं बंद केलं. एका अर्थी बरं झालं. पण माझ्या मनाला ते सहन झालं नाही. मी तिच्यासाठी खूप रडले. तिला मात्र त्याचं फारसं काही वाटलेलं दिसतं नाही. ती दुसऱ्या दिवशी आली. मी दिलेली तिची नवी साडी वर वाळत होती ती घेऊन निघून गेली. मी रडत बसले. पण एक धडा शिकले. ह्या नोकरांमधे मनानं गुंतायचं नाही. त्यांना कशाचीही जाणीव राहत नाही. त्यांच्यासाठी जीव तोडून केलेल्या सगळ्या गोष्टींवर पाणी पडतं. ह्यामुळं पुढच्या आयुष्यात पुन्हा असा दुःख करण्याचा प्रसंग माझ्यावर आला नाही. नोकरांसाठी मी नंतर कधी रडले नाही.

मंगेशला रेडिओवर नोकरी मिळाली. त्यामुळं फार मोठ्या काळजीतून सुटका झाली. त्याचबरोबर त्याचं लेखन जोमदारपणं चालू होतं. १९५४ साली 'निंबोणीच्या झाडामागे' हा लघुनिबंधांचा संग्रह प्रकाशित झाला. ते पुस्तक विद्यापीठात अभ्यासक्रमात लागलं होतं. तसंच बी०ए०नंतर त्यानं त्यानं एम०ए०ला ॲडमिशन घेतल्यानंतर 'जिप्सी' संग्रह बी०ए०ला अभ्यासक्रमात लागला. नशीब एवढंच की त्याच्याच बी०ए० संग्रहाचा त्याला अभ्यास करून पेपरात उत्तरं लिहावी लागली नाहीत. (तसं झालं असतं तर 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'मधे त्याचं नाव घालावं लागलं असतं.) 'शर्मिष्ठा' ही संगीतिका त्यानं लिहिली आणि रेडिओसाठी, 'राधा', 'बिल्हण', 'जनाबाई', 'वाट पंढरीची', 'ख्रिस्तजन्म' अशी नभोनाट्यं लिहून सादर केली. तसंच शनिवारी सकाळी सादर होणारा 'आपली आवड' हा कार्यक्रम त्या वेळी सुरू झाला. त्यासाठी त्यानं सुंदर, सुंदर भावगीतं लिहिली. त्यांना यशवंत देव, श्रीनिवास खळे यांनी चाली दिल्या आणि त्यांतली बहुतेक गाणी, अजरामर करून टाकली. अशा प्रकारे सर्वच क्षेत्रांत त्याची घोडदौड चालू होती.

१९६३ साली 'वात्रटिका' नावाचा विनोदी, लहान चुटक्यासारखा, चार ओळींचा कवितांचा संग्रह रामदास भटकळ यांच्या पॉप्युलर प्रकाशनतर्फे प्रसिद्ध झाला. १९६० साली 'बोरकरांची समग्र कविता' हे पुस्तक मौज प्रकाशननं प्रकाशित केलं. प्रस्तावना म्हणून मंगेशनं बोरकरांची घेतलेली अभ्यासपूर्ण प्रदीर्घ मुलाखत त्यात समाविष्ट केली आहे. वयाबरोबर येणाऱ्या नव्या अनुभवांमुळं मंगेशच्या कवितेच्या फॉर्ममधे बदल होत गेलेले दिसतात. १९६६ साली 'विदूषक' हा संग्रह प्रसिद्ध झाला. पुस्तकाच्या नावावरूनच कळतं की, प्रेम, निसर्ग, ध्येयवाद यांतून पुढं जाऊन कविता वेगळं वळण घेत आहे.

मौज प्रकाशनानं १९७८ साली प्रसिद्ध केलेला 'सलाम' संग्रह तर महाराष्ट्रभर गाजला आणि त्याच्या पुढं अनेक आवृत्त्या निघत राहिल्या. ह्यातल्या उपरोधिक कविता लोकांना इतक्या आवडल्या की त्या विशिष्ट कविता म्हटल्याशिवाय काव्यवाचनाचा कार्यक्रम संपेना झाला.

त्याच्या कवितेबद्दल लिहावं एवढी मला काव्याची समज नाही आणि अभ्यास पण नाही. त्या त्या कालखंडातल्या लेखनाचा उल्लेख केला पाहिजे म्हणून हे लिहिलं. श्री०पु० भागवत यांची आणि त्याची मैत्री हळूहळू वाढत गेली. रेडिओवर नोकरीला असताना, ऑफिस सुटल्यावर मंगेश सरळ घरी कधीच येत नसे. मौज प्रेसमधे जाऊन तिथं श्री०पु० व इतर जमलेल्या साहित्यिकांशी गप्पा मारून मग घरी यायचा. साहित्यिकांना एकत्र जमण्यासाठी व गप्पांसाठी ती आवडीची जागा झाली होती. घरी यायला उशीर झाला की मी समजत असे, आज हा मौज प्रेसमधे गेला असणार! घरातल्या कुठल्याच कामासाठी मी त्याच्यावर अवलंबून नसल्यामुळं तो केव्हाही आला तरी त्याला बोलत नसे किंवा आमच्या दिनक्रमात फरक पडत नसे. शिवाय अजूनही त्याचा अभ्यास चालू होता. एम०ए०ची तयारी चालू होती. शांताराम जोगांकडं संस्कृत

शिकण्यासाठी जात होता. शेवटी रजा घेऊन तास न् तास अभ्यास चालू होता. ताणलेल्या वातावरणात मुलांची फार काळजी घ्यावी लागे. ती कचरा करत, पसारे मांडून ठेवत. पळापळी, ओरडा, भांडणं चालू असत. बाबांची बेल वाजली की एकदम आवाज बंद करून आत पळून जात. तो घरात आल्यावर दारात कागदाचा तुकडा पडलेला दिसला तरी खूप जोरानं ओरडत असे. मोठ्या आणि लांब पल्ल्याच्या आवाजाची देणगी त्याला आहे. तो आवाज काव्यवाचनासाठी फार प्रभावी ठरतो हे खरं. पण घरातसुद्धा त्याच आवाजानं बोलल्यावर तो भीतिदायक वाटतो.

घरासमोर अर्ध्या भागात मोकळं टेरेस आणि भिंतीकडं दोन बाजूंना दोन अशा भाडेकरूंच्या पाण्याच्या टाक्या त्या वेळी होत्या. त्यांना लाल रंग दिलेला होता. एकदा अंजूला शाळेत खडू सापडला. पेन्सिलचा तुकडा, बांगडीच्या काचा, शिंपले, मणी अशा वस्तू जमवण्याची तिला सवयच होती. तर मिळालेल्या खडूनं तिनं लाल टाकीवर चित्रं काढली आणि काही लिहून ठेवलं. आपल्या उंचीचा फळा व खडू मिळाल्यावर कुठल्या मुलाला त्यावर लिहावंसं वाटणार नाही? मंगेश घरी आला. दार उघडायला मी गेले. अंजू तिथंच माझ्यामागं उभी होती. आत येताच त्याच्या लक्षात आलं की ह्या टाकीवर लिहून ठेवलं आहे. तो जो भयंकर चिडला, ओरडायला लागला आणि एक सणसणीत फटका तिच्या पाठीवर मारला. चार-पाच वर्षांची नाजूक मुलगी, ती इतकी घाबरली की तिला एकदम चड्डीतच मुती झाली. पाची बोटं पाठीवर लाल होऊन उठली. तिचे ओले कपडे बदलले. गच्ची पाणी टाकून धुतली आणि पाठीला तेल लावून तिला शांत केलं. एरवी मंगेश तिचे खूप लाड करायचा. तिला 'माझं बिलू' म्हणायचा. तिच्यासाठी गाणं पण म्हणायचा, "बिलू ते, बिलू ते बाबांचं पिलू ते." त्याचं वागणं दोन्ही टोकांना जाणारं. प्रेम व लाड केले तर ते अगदी गुदमरून टाकणारे असणार आणि राग आला तर तो भयंकर घाबरवून टाकणारा असणार. त्यामुळं अशा रागापासून मुलांना वाचवण्याची कसरत मला नेहमीच करावी लागली.

आमच्या बिल्डिंगचा मागचा रस्ता 'डेड एंड'. म्हणजे तो पुढं जाऊन बंदच केलेला होता. रस्त्यावर गाड्या येत नसत. वस्ती फार कमी. त्यामुळं पार्क केलेल्या गाड्या एक-दोनच असायच्या. धारावीची झोपडपट्टी नव्हती. येणारी-जाणारी माणसं पण नसायची. म्हणून काही मुलं त्या रस्त्यावर सायकल चालवायला यायची. त्यांना बघून अजितला पण सायकल शिकावी असं वाटायला लागलं. सायकल भाड्यानं घ्यायची म्हणजे पैसे बाबांजवळ मागायला पाहिजेत. एक दिवस तो धीर करून विचारायला गेला. "बाबा मी सायकल घेऊ का भाड्यानं? मला सायकल चालवायला शिकायचं आहे." त्यानं स्पष्ट शब्दांत सांगितलं, "काही नको. सायकल चालवायची नाही. तू पडशील, तुला लागेल, त्या कुणाच्या तरी मुलाचा हात मोडला, तसा तुझा मोडेल." अजितला अतिशय वाईट वाटलं. त्या वयातली ती हौस होती. खरं तर, त्याच्या मनात भीती निर्माण करण्याचं काही कारण नव्हतं. माझे तिन्ही भाऊ सायकल चालवायचे.

मला व सरलला पण सायकल चालवता येत होती. मी शाळेत असताना येरवड्यापासून पुण्यापर्यंत सायकल चालवत गेले होते. आमची आई 'नको' म्हणून म्हणत नसे. पण ह्या घरात प्रत्येक गोष्टीला आधी 'नाही', म्हटलं जातं हे लक्षात आलं. त्यानं ''नाही'' म्हटल्यावर मला अजितला ''जा'' म्हणून सांगायची हिंमत नव्हती. मी पण गप्प बसून कामाला आत गेले.

थोड्या वेळानं बाहेर आले. बघते तर मागच्या गॅलरीतल्या दारावर मागच्या भिंतीवर चार,पाच ठिकाणी अजितनं लिहून ठेवलं होतं : 'बाबा वेडे आहेत, बाबा वेडे आहेत.' खूप वाईट वाटलं. मी सांगितलं, ''हे बघ अजित, उद्यापासून, बाबा घरी येण्याच्या आधी मी तुला सायकल चालवायला पाठवीन. मात्र त्यांना कळू द्यायचं नाही.'' त्याला खूप आनंद झाला. आणि तो सायकल चालवायला शिकला.

झोक्यावर बसायला मला लहानपणापासून फार आवडायचं. येरवड्याला वडाच्या झाडाला दोऱ्या बांधून खूप उंच उंच झोके घेत होतो. इंडस्ट्रियल स्कूलच्या मुलांच्या ग्राउंडवर लोखंडी साखळ्यांचे, बसायला फळी असलेले झोके होते. मुलं ग्राउंडवर नसताना मी, विमल, सरल तिथं जाऊन झोके घेत होतो.

एका लहान मुलाला समोरच्या बिल्डिंगमधे दारावर लहान दोऱ्या बांधून लहानसा झोका करून दिला होता. एक दिवस मंगेशनं त्या मुलाला झोका घेताना पाहिलं. आणि घरात त्यानं गोंधळ घालायला सुरुवात केली. तो झोका गॅलरीच्या वर जाऊन तो मुलगा खाली पडेल अशी त्याला भीती वाटायला लागली. तो भयंकर अस्वस्थ झाला. मानसिक संतुलन ढळल्यासारखा करायला लागला. मी म्हणाले, ''असं काय करतोस? झोका तसा पुढं येणार नाही, त्याच्या घरातल्या माणसांना कळत नाही का? तू कशाला अस्वस्थ होतोस?'' पण कशाचा काहीच परिणाम झाला नाही, मुलांना कधीच घरात झोका बांधून द्यायचा नाही अशी मला तंबी मिळाली. ह्याच मंगेश पाडगावकरांनी झोपाळ्याची सुंदर, सुंदर गाणी लिहिली आहेत. त्यांतल्या काही ओळी :

झुले बाई झुला माझा, झुले बाई झुला,
सकाळच्या उन्हात या झोके घेऊ चला,

हिरव्या हिर्व्या फांदीला ग,
झुला माझा बांधीला ग,
आता होता भुईवर, भेटे आभाळाला,
झुले बाई झुला माझा, झुले बाई झुला!

झुला झाला अनावर,
जीव माझा खालीवर,
माया याची माझ्यावर, सांभाळितो मला,
झुले बाई झुला माझा, झुले बाई झुला!

झुला माझा पाखरू ग,
वाऱ्याचे हे लेकरू ग,
एक झोका मला आणि एक झोका तुला,
झुले बाई झुला माझा, झुले बाई झुला!

तसंच अंजू तरुण झाल्यानंतर

दिवस तुझे हे फुलायचे
झोपाळ्यावाचून झुलायचे...

प्रत्यक्ष व्यवहार किंवा जगण्याच्या कल्पना आणि कवीच्या काव्यातल्या कल्पना यांचा पुष्कळदा परस्पर काहीही संबंध नसतो असं म्हणावंसं वाटतं.

एकदा भर दुपारच्या उन्हात आम्ही गिरगावात जाण्यासाठी बसस्टॉपवर चाललो होतो. बाहेर जायचं असेल त्या वेळी त्याच्या डोक्यात नवीन कविता घोळत असतेच. त्याप्रमाणं त्या दिवशी आमची जाण्याची तयारी चालू होती. आणि तो खोलीत बसून भिंतीकडं नजर लावून ओळी जुळवत होता. तू उशीर केलास. आता बस चुकणार. हे तुझं नेहमीचंच आहे. कधी वेळेवर निघत नाही. असं खूप काही त्यानं मला बोलून घेतल्यावर आम्ही एकदाचे खाली उतरलो. कडेवर एक मूल, एक हाताला धरून, एक मोठी पिशवी, एक पर्स. असे सर्व बोजे सांभाळत, म्युनिसिपल शाळेपर्यंत आलो. वरून उन्हाचे चटके बसत आहेत. कडेवरचं मूल जड वाटत आहे. जीव मेटाकुटीला आला आहे. आणि त्याला एकदम ह्या ओळी आठवल्या :

तूं असतिस तर झालें असतें
गडे उन्हाचें गोड चांदणें

त्या कोपऱ्यावरच त्यानं मला त्या म्हणून दाखवल्या. ही जुनीच कविता होती. पण आता भर उन्हात, हातांत ओझी असताना, बस चुकेल ह्याची काळजी असताना, त्या वेळी त्या परिस्थितीत या ओळी अगदीच विसंगत वाटल्या. मी चमकून त्याच्याकडं पाहिलं. आणि म्हणाले, "तू जरा अंजूला घेतोस का? तिला उचलायचा मला फार त्रास होतो आहे. बसस्टॉप येईपर्यंत मी तिला घेऊ शकणार नाही." तर म्हणाला, "मीच तर घेतो नेहमी. तुझ्यापेक्षा मीच मुलांना जास्त वेळ उचलून घेतो."

त्याच्या कल्पनेतल्या भराऱ्या अगम्य ठिकाणी जाऊन घिरट्या घालत असत आणि मी आलेल्या परिस्थितीशी शरीरानं व मनानं एकटीच घाबरून झुंज देत चालले होते. माझ्या सध्याच्या जीवनाशी सुसंगती नसणाऱ्या कवितांबद्दल मला आपुलकी वाटेनाशी झाली. खरं तर ही दोन जगं वेगवेगळी आहेत हे कळत असूनही. त्याचं जग वेगळं आणि माझं वेगळं होत चाललं. माझ्या सुखदु:खाशी तो समरस होईनासा झाला. खरं तर आधीपासून फारसा नव्हताच.

१९५८ साली मंगेश एम०ए०ला बसणार होता. अभ्यास जोरात चालला होता. त्यासाठी रात्री जागणं आवश्यक होतं. आधीच त्याला झोप फार. कोणीतरी त्याला झोप न येण्यासाठी गोळ्या असतात असं सांगितलं. त्यानं गुपचूप त्या गोळ्या आणून घ्यायला सुरुवात केली. पण माझ्याकडं काही बोलला नाही. मी मुलांची काळजी घेत होते तशीच त्याची पण घेत होते. जेवणाची, झोपेची, झोपेतून उठवण्याची सर्व जबाबदारी पार पाडत होते. संसाराची, मुलांची कुठलीच कामं त्याला सांगत नव्हते.

परीक्षेच्या आदल्या दिवशी तो फारच थकलेला आणि घाबरलेला दिसत होता. संध्याकाळी अंधार पडल्यावर म्हणाला,

"मला आता घरात बसून अभ्यास करवत नाही."

"तू आधी जेवून घे. अगदी साधी, पोटाला त्रास होणार नाही, अशी खिचडी केली आहे. जेवल्यावर गच्चीत वाऱ्यावर बसून अभ्यास कर. लाइटची व्यवस्था मी करून देते." मी म्हणाले.

गच्चीत दिवा नव्हता. म्हणून मी एक जुना टेबललँप खिडकीच्या गजांना बांधला आणि बाहेर आरामखुर्ची नेऊन ठेवली. जेवल्यावर त्याला सांगितलं,

"आता तू शांतपणं इथं बसून अभ्यास कर. मी मुलांना जेवायला घालते आणि झोपवते."

तो अस्वस्थपणे "हो" म्हणाला आणि मी आत गेले. थोड्याच वेळात त्यानं "यशोदा" म्हणून हाक मारली.

मी बाहेर गेले. तिन्ही मुलं माझ्यामागं घोटाळत होती, "काय झालं? काय पाहिजे"? म्हणून विचारलं.

"मला काही वाचताच येत नाही. वाचलेलं कळत नाही आणि लक्षात पण राहत नाही. असं काय होतं समजत नाही."

मी म्हणाले, "तसं होत असेल तर आता झोप. फार अभ्यास केल्यामुळं तसं होत असेल."

तेव्हा रडकुंडीला येऊन म्हणाला की, "मणक्यातून, पाठीतून, दोन्ही हातांकडं वेदना जात आहेत. मला धडधडतंय. फार भीती वाटते, मी उद्या परीक्षेला बसू शकणार नाही."

हे ऐकून आणि त्याची केविलवाणी अवस्था बघून मी फार घाबरले. काय करावं ते कळेना. मी म्हणाले,

"तुझ्या पाठीला, हातांना मी तेल, अमृतांजन चोळून देते." म्हणून पटकन बाटली आणली. होता तेवढा जोर लावून पाठ, हात चोळायला सुरुवात केली. काहीच फरक पडेना.

"पाठ शेकून देऊ का?" म्हणून विचारलं.

"नको" म्हणांला.

आता करणार तरी काय? माझी नुसती धावपळ चालू होती. रेडिओवर कामाला असताना त्यानं घरात फोन घेतला होता. एकदम मला वाटलं की श्री०पुं०ना फोन करून सांगावं. मी त्यांना फोनवरून सगळं सांगितलं.

ते म्हणाले, "पाडगावकरांना सांगा की आता तुम्ही स्वस्थ झोपा. काय करायचं ते उद्या सकाळी बघू. मी सकाळी येतो."

अस्वस्थपणं रात्र काढली. नाही, नाही त्या विचारांनी झोप उडाली. मंगेशला काय झालं असेल? परीक्षा देऊ शकेल का? स्मृती पुन्हा येईल का हे असंच पुढं राहील? तसं झालं तर काय करायचं? नाना विचारांनी डोकं भणभणून गेलं. तशीच सकाळी उठले. भराभर कामं आटपून घेतली. मुलांना उठवलं. त्यांचं सर्व उरकलं. मंगेश उठला. तो खिन्न व उदास दिसत होता. पुन्हा तसाच बसून राहिला.

तेवढ्यात श्री०पु०भागवत आले. त्यांनी सर्व चौकशी केली. त्यांनी येताना एक बाटली आणली होती. तीत सूतशेखर मात्रा, आलं आणि लिंबाचा रस होता. "ही त्यांना थोडी, थोडी द्या. लवकरच बरं वाटेल. घाबरू नका." म्हणाले.

मी त्याप्रमाणं केलं. मंगेश सारखा म्हणत होता की,

"मी आज परीक्षा देऊ शकणार नाही, मला काही एक आठवत नाही. डोळ्यांपुढून नुसत्या ओळी सरकतात. अर्थ कळत नाही. मी हॉलवर येणार नाही."

भागवतांनी व मी त्याची खूप समजूत घातली. थोडं जबरदस्तीनं त्याला अंघोळ करून तयार व्हायला लावलं. आम्ही ठरवलं की त्याच्याबरोबर परीक्षेच्या हॉलवर जायचं. अंजू व अभय यांना घरीच बाईंजवळ ठेवलं. अजितला बरोबर घेतलं. टॅक्सी करून हॉलवर गेलो. बरेच ओळखीचे लोक भेटले. वातावरण बदलत होतं. मंगेशला आम्ही हसून, शुभेच्छा देऊन दारापर्यंत नेऊन सोडलं. आत गेला खरा पण काय करील याची खात्री नव्हती. आम्ही दोघं व अजित समोरच हॉटेल होतं तिथं आत जाऊन अशा ठिकाणी बसलो की मंगेश जर बाहेर पडला तर लगेच दरवाजातून दिसेल. चहा मागवला. अजितला खायला मागवलं आणि गप्पा करत बसलो. लक्ष बाहेर दरवाजावर होतं. वेळ काढत बसून होतो. एक तास गेला. आता पूर्ण पेपर लिहील असं वाटायला लागलं. तरी मनात भीती कायम होती. भागवत म्हणाले, "पाडगावकरांना अति जाग्रणानं, अभ्यासाच्या ताणामुळं आणि काळजीमुळं 'नर्व्हस ब्रेकडाउन' झाला असणार." पण आता मेंदू नीट ठिकाणावर येऊन कांम करू लागलेला दिसत होता. दोन तास झाले. अजित पण बसून कंटाळला होता. आपली पण काहीतरी जबाबदारी असल्यासारखा शहाणपणानं त्रास न देता बसून होता. अंजू आणि अभय घरी काय गोंधळ घालत असतील याचा विचार मनात येऊन काळजी वाटत होती.

शेवटी एकदाचे तीन तास संपले. आम्ही उठलो. तीन तास टेबल अडवून बसलो म्हणून इराण्यानं काही तक्रार केली नव्हती. दारावर जाऊन उभे राहिलो. थोड्याच वेळात मंगेश हसत हसत बाहेर आला. म्हणाला, "सुरवातीला पाच, दहा मिनिटं

गोंधळल्यासारखं वाटलं. पण लिहायला सुरुवात केल्यावर सर्व, सहजपणं आठवत गेलं. पेपर उत्तम लिहिला.'' आम्ही दोघांनी सुटकेचा नि:श्वास टाकला आणि घरी आलो. त्याला पूर्ववत आत्मविश्वास आला आणि पुढच्या पेपरांना काही त्रास झाला नाही. परीक्षा सुरळीत पार पडली. आईनं मुलाचं करावं तसं प्रेमानं मी त्याचं सर्व काही करत होते. त्याचं मन शांत राहील याची काळजी घेत होते.

आता लक्ष रिझल्टकडं लागलं होतं. योग्य वेळी तो जाहीर झाला. आणि बी०ए०प्रमाणंच पहिल्या वर्गात पहिला नंबर मिळून त्याला उज्ज्वल यश मिळालं. तसंच 'न०चिं०केळकर सुवर्णपदक' व युनिव्हर्सिटी मेरिट स्कॉलरशिप मिळाली. आपली हुशारी आणि बुद्धिमत्ता त्यानं सिद्ध करून दाखवली.

काकांना, आईला अतोनात आनंद झाला. इतका हुशार मुलगा, शिक्षण सोडून भटकत राहिला होता. फुकट चालला होता. तो मार्गावर आला. त्याला दोष देणाऱ्या नातेवाइकांचं, आप्तांचं, तोंड बंद झालं. त्याला मार्गावर आणल्याचं श्रेय काका आई मला देऊ लागले. काका एकदा म्हणाले, ''यशोदा, तू त्याला लगाम घातलेस आणि त्याला आवरलंस. आमचं तो ऐकत नव्हता. तू सांगितलेलं ऐकतो.'' नुसत्या कविता करून पैसा कसा मिळणार होता? संसार कसा चालणार होता? मानानं जगता कसं येणार? त्याचं श्रेय ते मला देत असत. मंगेशनं पुढं पीएच०डी० न करण्याचं ठरवलं. तो एम०ए०ला बसत होता तेव्हा मला वाटलं, मी पण त्याच्याबरोबर अभ्यास करून एम०ए० व्हावं. बी०ए०ला माझेही तेच दोन विषय होते. पण...

एकदा मी मुलांना शाळेत सोडायला शिशुविहार शाळेत गेले होते. मुलांना सोडवल्यावर मनात आलं, जरा सायन कसं आहे ते फिरून पाहावं. सायन स्टेशनच्या रस्त्यावरून पुढं गेले. तिथं एक कमान दिसली. तीवर लिहिलं होतं, 'आयुर्वेदिक महाविद्यालय.' मी धीर करून आत गेले. जुन्या इमारतीत एक लहानसं ऑफिस होतं. चौकशी केली. तेव्हा समजलं की, मॅट्रिकला संस्कृत घेऊन पास झालेल्यांना इथं प्रवेश मिळतो. जागा रिकाम्या आहेत. लवकरच कॉलेज सुरू होणार आहे. सुरवातीला फी १२५ रुपये भरायची आहे. हे सर्व ऐकून मी वेडावून गेले. मी तर संस्कृत घेऊन बी०ए० झाले. घरापासून सहज चालत येण्याच्या अंतरावर आहे. मुलांची शाळा तर अगदीच जवळ. मी लगेच ऑफिसमधून फॉर्म घेतला. संध्याकाळी मंगेश आल्यावर त्याला सर्व सांगितलं. फॉर्म दाखवला आणि १२५ रुपये मागितले. त्याचा चेहरा एकदम बदलला. इतर काहीही चर्चा न करता अलिप्तपणं एकच वाक्य बोलला, ''माझ्याजवळ पैसे नाहीत.'' मला अतिशय दु:ख झालं. तीन वर्षांचा कोर्स होता. कशी प्रण पुरी केली असती, कुणाला सांगणार? मनात कुढत राहिले.

लवकरच मनानं पुन्हा उचल खाल्ली. मंगेशला म्हणाले, "गव्हर्नमेंटचा लायब्रेरियनचा एक वर्षाचा कोर्स आहे. तो करण्याची माझी इच्छा आहे. कुठल्याही लायब्ररीत नोकरी मिळेल. वाढत्या खर्चाला व महागाईला तोंड देता येईल. कष्टानं शिक्षण पार पाडलं. त्याचं सार्थक व्हावं. नुसतं चूल आणि मूल करत जगावं ह्या विचाराची बाई मी नव्हते. घराबाहेर काहीतरी करण्यासाठी धडपडत होते. मंगेशनं माझ्या बोलण्याकडं पूर्णपणं दुर्लक्ष केलं. पुन्हा तो विषय काढला नाही. मी आठवण केली तेव्हा म्हणाला, "ते फॉर्म कुठं मिळतात मला ठाऊक नाही."

शेवटी मी ठरवलं आता नवीन काही शिकून मग नोकरी मिळवण्यापेक्षा, आहे त्याच शिक्षणात मला म्युनिसिपालिटीत नक्की नोकरी मिळेल. त्या काळी त्या मिळत होत्या. म्हणून पुन्हा एकदा प्रयत्न करून मंगेशकडं विषय काढला.

"मी म्युनिसिपालिटीत अर्ज करू का?"

तो म्हणाला, "तुला तिथं काय काम करता येईल? ते तुला जमणार नाही, आणि माझ्या बायकोनं दुसऱ्या पुरुषांच्या हाताखाली काम केलेलं मला आवडणार नाही."

मी म्हणाले, "माझ्यापेक्षा कमी शिकलेल्या, सामान्य बुद्धीच्या बायका पण तिथं नोकरी करतात. तर मला जमणार नाही असं का म्हणतोस"?

त्यावर उत्तर न देता गप्प बसण्याचं धोरण त्यानं स्वीकारलं. ज्या ज्या वेळी मी त्याला बोलण्यात पकडते तेव्हा उत्तर न देता तो खोलीतून निघून जातो. आणि प्रश्नाला बगल देतो. चर्चा करत नाही. दुसऱ्याचं म्हणणं ऐकून घेत नाही. त्याला 'नको' म्हणजे, तो शेवटचा शब्द समजायचा. नेटानं पुन्हा विषय काढायचा प्रयत्न केला तर अतिशय तुच्छतेनं, अंगावर ओरडून, "मला आता वेळ नाही, मला त्रास देऊ नकोस. तू खोलीतून बाहेर जा." हे ऐकावं लागतं. एकोप्यानं सामंजस्यानं समान पातळीवर येऊन चर्चा करण्याची सोयच ठेवली नाही. आणखी काही वर्षांनी तर मला त्यानं 'अतिसामान्य' हे विशेषण लावायला सुरुवात केली. त्याचा नावलौकिक व प्रसिद्धी वाढत गेली तसतशी मी 'अतिसामान्य' होत गेले, "सामान्य माणसं ही सामान्यच असतात आणि सामान्यच राहातात." हे वाक्य वेळोवेळी ऐकवलं जातं.

ह्या सर्व वागण्याचा व विचारांचा अर्थ एकच होता की, जशी त्याची आजी होती, आई होती, तशीच यशोदा. तिसऱ्या पिढीतली, त्यांच्यापेक्षा शिकलेली, वेगळ्या संस्कृतीतून आलेली, वेगळ्या विचारांची असली तरी त्यांच्यासारखीच ती राहावी, चूल, मूल आणि स्त्री या भूमिकेपेक्षा दुसरा कोणताही विचार तिनं करू नये. घराबाहेर पडून स्वतंत्रपणं काही करण्याचा विचार मनात आणू नये.

नरेश मंत्री तेव्हा दिल्लीला 'सन्निधी' मधे राहून काकासाहेब कालेलकरांकडं काम

करत होते. ते खूप दिवसांपासून सांगत होते की तुम्ही दोघं दोनतीन आठवड्यांसाठी मुलांना घेऊन दिल्लीला या. सन्निधीमधे राहण्याची व जेवणाची सोय होईल. अगदी कमी खर्चात दिल्लीतली प्रेक्षणीय स्थळं आणि आग्र्याचा ताजमहाल वगैरे बघून होईल. मुलं साधारण मोठी झाली होती. अजित अकरा, अंजू नऊ आणि अभय पाच वर्षांचा होता. प्रश्न माझाच होता. माझा पाइल्सचा त्रास खूप वाढला होता. दर वेळी जोरात ब्लीडिंग होत होतं. ॲनिमिया व अशक्तपणा फार वाढलेला होता. तरी मुलांच्या शाळा बुडवून जायचं ठरवलं. रिझर्वेशन केलं. खालचे दोन बर्थ व वरचे तीन. बांधाबांधी केली. नरेश नको म्हणत होते तरी मी अंथरुणं-पांघरुणं बांधून मोठा बोजा घेतला. मुलांना एक एक होता तो साधा स्वेटर घेतला. जानेवारी महिना, त्यामुळं भयंकर थंडी असणार हे माहीत होतं. जाण्याच्या आधी एक दिवस गिरगावातून आई (सासूबाई) भेटायला आल्या. म्हणाल्या, "मला आधी का सांगितलं नाही? मी पण आले असते. दिल्ली, आग्रा बघण्याची माझी फार इच्छा आहे." मी मंगेशला म्हणाले, "त्यांना पण घेऊ या." नाही तरी मी एकटीच तीन मुलांना घेऊन पुढं जाणार होते. मंगेश नंतर पाच दिवसांनी येणार होता. मंगेशनं त्यांना सांगितलं, "तुझं तिकीट काढून आणतो. तू ह्यांच्या डब्यात, त्यांच्याजवळ बस. आता घरी जा. तुझी बॅग भर. उद्या सामान घेऊन परत ये." त्यांना खूप आनंद झाला. दुसऱ्या दिवशी त्या सामान घेऊन आल्या. मुलांनी आपले खेळ, पत्ते बरोबर घेतले होते. प्रवास मोठा आहे म्हणून चांगली व्यवस्था केली.

गाडी संध्याकाळी सुटली. वेळ मजेत जात होता. मुलं खुषीत होती. जेवणं झाली. अजित, अंजू पटापट वरच्या बर्थवर गेले. खाली दोनच बर्थ होते. एक आईंना द्यावा लागला. अभयला मी सांगत होते, "तू लहान आहेस, तुझी झोप फार गाढ आहे. तू खाली आजीच्या समोर झोप मी वर जाते. किंवा तुला दोन बाकांच्या मधे बिछाना घालून देते." पण तो ऐकेना. "दादा, ताई वर झोपलेत तर मीसुद्धा वरच झोपणार." म्हणाला. तो ऐकेचना. त्याला इतक्या उंचावर झोपवायला मला भीती वाटत होती. तो झोपेत लोळतो. फार गाढ झोपतो. तो पडला तर? पण नाही म्हणजे नाही. तो वरच जाऊन झोपला. माझ्याजवळचा बिछाना सोडला. त्याच्या दोऱ्या होत्या त्या घेतल्या आणि अभयच्या बर्थला, समोरच्या बाजूनं वरून दोन लोखंडी साखळ्यांना घट्ट आवळून बांधल्या. थंडी वाढत चालली होती. मी कामानं, दगदगीनं फार थकले होते. अभयच्या खालच्या बाकावर झोपले. गाडीचा आवाज व धक्के जोराचे होते. त्यामुळं नीट झोप येईना. थंडीचा कडाका वाढत होता. गाडीनं पूर्ण वेग घेतला आणि माझा डोळा लागला.

मध्यरात्री आईंनी मला उठवलं आणि म्हणाल्या, "अग यशोदा, हा अभय बघ खाली पडला आहे." मी चटकन उठले. बघते तर अभय खाली गोळ्यासारखा पडलेला. त्या अर्धवट उजेडात नीट दिसेना. त्याला एकदा टॉयलेटला नेऊन आणावं आणि मग नीट झोपवावं म्हणून मी त्याला उचललं. उभं करायला बघत

होते. कारण पाच वर्षांच्या मुलाला उचलणं मला जड जात असे. पण तो पाय टेकीना. बघते तर पाय लुळे पडल्यासारखे दिसले. तसंच त्याला टॉयलेटमध्ये नेलं आणि माझ्या लक्षात आलं की तो बेशुद्ध आहे. तसाच त्याला घेऊन आले. मांडीवर घेऊन बसले आणि माझी दातखिळी बसली. आई विचारत होत्या, "काय झालं? पण मला बोलता येईना-सांगता येईना. मी खुणा करून अर्धवट आवाज काढून काहीतरी सांगण्याचा प्रयत्न केला. त्यांना कळलं की नाही ठाऊक नाही. त्या पुन्हा झोपून गेल्या. गाडीतली सगळीच माणसं चिडीचूप झोपलेली होती. माझ्याजवळ घड्याळ नव्हतं. मध्यरात्र असावी. थंडीनं कहर केला होता. थंडीची लाट आलेली होती. मला बोलता येत नव्हतं. तेव्हा कोणाला उठवून काही सांगणं शक्य नव्हतं. अभयला उलटी व्हायला लागली. माझ्याजवळ एक प्लॅस्टिकचा मग होता. त्यात तो थोडा ओकला पण बेशुद्धच होता. डोळे उघडत नव्हता. बोलत नव्हता. लोळागोळा होऊन पडला होता. दर अर्ध्या तासानं त्याला उलटी होत होती. उलटीत किंचित रक्त दिसत होतं. म्हणजे मेंदूला इजा झाली आहे हे मला कळत होतं. त्याला मांडीवर घेऊन धडधडत्या अंत:करणानं घाबरून, स्वत:ला मनातल्या मनात दोष देत बसून होते. त्याला उलटी आली की भांडं पुढं करत होते, त्याच्या कपाळावर लहान वाटीएवढं टेंगूळ दिसत होतं. तासामागून तास जात होते. डब्यात काहीच, कुणाचीच हालचाल नव्हती. नाही नाही ते विचार मनात येत होते. हा बरा होईल का नाही? मेंदूला दुखापत म्हणजे काही व्यंग राहणार नाही ना? इतके तास काहीच उपाय न झाल्यामुळं काही विपरीत घडणार तर नाही? मनातली धडकी कमी होत नव्हती. पहाट व्हायला लागली. माझी दातखीळ सुटत नव्हती. अभय होता तसाच पडून होता. शुद्धीवर येण्याचं काहीच लक्षण दिसत नव्हतं. अकरा वाजता गाडी दिल्लीला पोचायला हवी होती. मुलं उठली. आई उठल्या. सर्वांनी तोंडं धुऊन नाश्ता केला. बरोबरचं सामान आवरायला घेतलं, मी अभयला मांडीवर घेऊन बसून होते. अकरा वाजून गेले. गाडी लेट आहे असं कळलं. शेवटी दुपारी एक वाजता गाडी दिल्लीला पोचली. नरेश डब्यात आले. मी अभयला खांद्यावर घेऊन उभी राहिले. नरेशला सगळं सांगितलं, ते माझ्यावर खूप रागावले. "वर का ठेवलंस त्याला? झोप लागल्यावर खाली का घेतलं नाहीस?" वगैरे. खाली जागा नव्हती. आईंना ऐनवेळेस बरोबर घेतल्यामुळं ती जागा त्यांना द्यावी लागली हे कसं सांगणार?

मी डब्यात बोलत उभी असताना अभय एकदम बोलला, "पत्ते वर ठेवलेत ते घे." म्हणाला आणि पुन्हा ग्लानीत गेला. पण तो शुद्धीवर येतो आहे. त्याची स्मृती नीट काम करते आहे, त्याला ऐकू येतं आहे. हे माझ्या लक्षात आलं. नरेशबरोबर एक जपानी तरुण मुलगा आला होता. सर्वांनी मिळून सामान गाडीपर्यंत नेलं. अभय माझ्या खांद्यावर होता. त्याला उचलणं थकव्यामुळं फार जड जात होतं. तशीच लटपटत गाडीपर्यंत गेले. 'सन्निधी'ला पोचलो. थंडी मी म्हणत होती. नरेशनी सांगितलं, अंघोळी करा आणि जेवायला या. अभयला खाटेवर ठेवलं. त्यानं किंचित

डोळे उघडले. त्याला थोडा डाळभात भरवण्याचा प्रयत्न केला. पण तो खाऊ शकेना. पुन्हा उलटी झाली.

सर्वांची जेवणं झाल्यावर मी नरेशना म्हणाले "अभयला डॉक्टरकडं न्यावं लागेल." पण साधारण बारा तास तरी तो बेशुद्ध होता. अजूनही ग्लानीतच होता. नरेशनी लगेच फोन नंबर काढला. डॉक्टरची चौकशी केली. मुलांच्या स्पेशालिस्ट एक डॉक्टरबाई होत्या. त्यांची सहा वाजताची ॲपॉइंटमेंट घेतली. पाच वाजता टॅक्सीनं निघालो. नरेश, मी आणि कोकीसान (जपानी तरुणाचं नाव) तो पण मदतीला आला. एक तास सगळ्या दिल्लीत फिरलो. बाईंचा दवाखाना सापडेना. सहा वाजल्यावर डॉक्टर बाहेर जाणार होत्या. माझा जीव खालीवर होऊ लागला. आजचा दिवस पण डॉक्टरला दाखवल्याशिवाय गेला तर आणखी त्याची प्रकृती बिघडत जाईल अशी भीती वाटत होती.

शेवटी एकदाची टॅक्सी त्यांच्या दारात पोचली. बाई दाराला कुलूप लावून बाहेर उभ्या होत्या. आम्हांला बघताच त्यांनी दार उघडून आत घेतलं. काय झालं ते सर्व नीट विचारून घेतलं. अभयला तपासायच्या खोलीत घेऊन गेल्या. मला आत येऊ दिलं नाही. तपासणी झाल्यावर बाहेर येऊन बसल्या. माझे प्राण कानात येऊन राहिले होते. म्हणाल्या, "नशिबानं त्याच्या मेंदूला काही इजा झालेली नाही. तो लवकरच पुन्हा पहिल्यासारखा होईल. मी औषधं लिहून देते ती आणा व वेळेवर द्या."

आम्ही घरी आलो. अभय हळूहळू सुधारत होता. एका मोठ्या खोलीत ओळीनं पाच बाजा घातल्या होत्या. भरपूर गरम पांघरुणं–म्हणजे प्रत्येकाला पाच-पाच ठेवलेली होती. मी नरेशना म्हणाले, "मंगेश येणार आहे. तो कुठं झोपेल? ह्या बाजेवर माणूस झोपला की ती खोल, आत जाते." नरेश म्हणाले, "इकडं एवढ्याच माणसांची सोय होऊ शकते. तू न सांगता आईंना का घेऊन आलीस? मी ह्यापेक्षा जास्त काही करू शकत नाही." स्वयंपाकाला सबल नावाचा मुलगा होता. हसमुखभाई तिथंच राहून काम करायचे.

पाच दिवसांनी मंगेश आला. अभयबद्दल त्याला सविस्तर सांगितलं. पण जे घडलं ते प्रत्यक्ष पाहिलं नसल्यामुळं त्याची तीव्रता त्याला जाणवलेली दिसली नाही.

आईंच्या बाजूची बाज माझी होती. तिथंच त्या खोल गेलेल्या बिछान्यात तो आनंदानं माझ्या बाजूला येऊन झोपला. मला मात्र त्या अडचणीत, खोलात आणि आई बाजूलाच असताना सुखानं झोपणं शक्य झालं नाही. थंडीमुळं खाली जमिनीवर जाऊन झोपणंही शक्य नव्हतं.

अभयला जरा बरं वाटायला लागल्यावर नरेशनी आम्हांला दिल्लीतील एक एक ठिकाण दाखवायला सुरुवात केली. बरं वाटलं म्हटलं तरी, अभय फार चिडचिड करायला लागला. तो लहान होता. आपण काय बघतो त्यामागचा इतिहास माहीत नसल्यामुळं नुसतं फिरण्यात त्याला आनंद वाटत नसावा. दिल्ली बघून झाली. अगदी प्रजासत्ताकदिनी २६ जानेवारीला लालकिल्ल्यावर पण नेलं. नंतर आग्र्याला

जायचं होतं. तिथं दोन दिवस मुक्काम करायचा होता. तेवढ्यात अंजूच्या सर्व अंगावर डोक्यापासून पायापर्यंत पुरळ आली–थोडा ताप आला आणि तिचे केस गळून पडायला लागले. मी घाबरले. आता आग्रा नको–खूप झालं असं वाटायला लागलं. शेवटी मंगेशनं सांगितलं, "आग्र्याला डाक बंगल्यावर उतरण्याची सर्व व्यवस्था केली आहे. तेव्हा मी अंजली व अभय इथंच राहतो दिल्लीत. तू अजितला बरोबर घेऊन जा ताजमहाल बघायला."

नरेश, कोकीसान, मी, अजित आणि आई असे आग्र्याला निघालो. तिथं उतरलो तेव्हा अंधार पडला होता. स्टेशनपासून डाक बंगल्यापर्यंत टांगा केला. रात्र गडद अंधाराची होती. काळोख दाटून आला होता. रस्त्यावर दुसरं एकही वाहन किंवा माणूस दिसत नव्हता. निरभ्र आकाश मात्र चमचमणाऱ्या ताऱ्यांनी भरून गेलं होतं–जवळ व खाली आल्यासारखं वाटत होतं. कधी बघितलं नाही इतकं ताऱ्यांनी गच्च भरलेलं आकाश त्या रात्री पाहिलं. निर्मनुष्य रस्त्यातून अंधाऱ्या रात्री टांग्यातून जाताना मनातून घाबरले होते. पण त्या आकाशाचं मनावर कोरलेलं चित्र कधीच न पुसून जाणारं.

दुसऱ्या दिवशी सुप्रसिद्ध ताजमहाल पाहिला. मुमताज व शहाजहान यांच्या प्रेमाचं प्रतीक बघताना आश्चर्य वाटलं. आपल्या प्रिय माणसासाठी एखादा राजा सर्व जगाला आकर्षित करू शकेल असं शिल्प उभं करू शकतो. इतरही आग्र्यातली प्रेक्षणीय स्थळं बघून झाली. दिल्लीला परतलो. कोकीसानशी चांगली ओळख झाली. तो जपानी उच्चारात हिंदी व इंग्रजी बोलायचा. त्याचं बोलणं समजायला त्रास व्हायचा. तरी तो मुलांना फार आवडला. मला पण एक 'परदेशी' म्हणून त्याच्याबद्दल आकर्षण वाटू लागलं होतं. त्याला सायनला येण्याचं आमंत्रण दिलं. त्यानं आमचे बरेच फोटो काढले होते. ते नंतर पोस्टानं पाठवले. आम्ही परत मुंबईला परतलो. मुलांची तीन आठवडे शाळा बुडली होती. तो अभ्यास भरून काढायचा होता. ढासळत्या प्रकृतीनं पुन्हा संसाराला लागायचं होतं.

एक गोष्ट वाईट झाली ती म्हणजे, मंगेश, अंजू व अभय यांचा ताजमहाल पाहायचा राहून गेला. त्यानंतर मंगेश कितीतरी वेळा दिल्लीला गेला. तिथं राहिला. पण आवर्जून जाऊन ताजमहाल पाहिला की नाही हे मला ठाऊक नाही. पण त्यानं स्वत: मात्र आमच्या प्रेमाची आठवण म्हणून जी काव्यशिल्पं तयार करून ठेवली आहेत, ती माझ्या मते अजरामर आहेत. दिल्लीहून आल्यानंतर आईंनी मला व मंगेशला घड्याळ घेऊन दिलं. ते माझं पहिलं मनगटी घड्याळ. ते चांगल्या कंपनीचं होतं. खूप वर्षं टिकलं.

माझा देवावरचा विश्वास पूर्णपणं उडत चालला होता. आल्या प्रसंगाला धीरानं तोंड द्यायचं, जे काही करणं त्या त्या परिस्थितीत शक्य आहे ते उपाय करत राहायचं. खूप प्रयत्न करूनसुद्धा मी मनापासून ईश्वराची प्रार्थना करू शकत नव्हते.

इतर कुठल्याही धर्मापेक्षा ख्रिस्ती धर्म मला आवडत होता व अजूनही आवडतो. पण म्हणून रोज उठून प्रार्थना तरी काय करायची, तर "हे देवा, तू सर्व जगाचा निर्माता आहेस. तू दयाघन आहेस म्हणून तू माझ्यावर कृपा कर व माझी सर्व संकटं दूर कर. आज मला हे पाहिजे–उद्या मानसिक शांती व समाधान पाहिजे. ते सर्व तू मला दे. मी तुझी रोज स्तुती करीन." हे बोलणं मला न पटणारं. संकटांना तोंड देण्यासाठी लागणारं धैर्य मला माझ्या मनातून मिळवावं लागत होतं. प्रयत्न केला तर मनच खूप मोठी शक्ती देऊ शकतं. इतकी की इतर कुठलाही मनुष्यप्राणीसुद्धा ते काम करू शकत नाही हे माझ्या प्रत्ययाला येत होतं.

प्रभा, सुहास या दोघींचं लग्न एकाच मांडवात एकाच दिवशी झालं होतं. शंकर परुळकर व शशिधर आडारकर असे दोन सुशिक्षित व सुसंस्कृत जावई काकांना व आईला मिळाले होते. गिरगावात आता फक्त तीन म्हातारी माणसं राहत होती. म्हातारी आजी फारच म्हातारी झाली होती. ८५च्यावर वय असावं. ती एकदा बिछान्यातून उठताना पडली आणि तिच्या कमरेचं हाड मोडलं. तिला सायन हॉस्पिटलला आणलं. तिथं डॉ० घीवाला यांनी तिचं ऑपरेशन केलं. त्याच वेळी सुहासचं पहिलं बाळंतपण जवळ आलं होतं. आजीचे सर्व विधी बिछान्यात करावे लागत होते. ती उठू शकत नव्हती. आई एक दिवस मला म्हणाल्या, "ही दोन्ही कामं मी गिरगावात चाळीत राहून करू शकत नाही. तिथं जागा नाही आणि संडासाची सोय पण नाही. सायनला जागा आहे. तेव्हा आजीला हॉस्पिटलमधून सरळ तुझ्याकडं आणून ठेवते. तिचं सर्व तू कर. सुहासचं बाळंतपण मी करते." मी म्हणाले, "तुम्ही आजीला घेऊन जा. कारण तिचं सोवळं आहे. इतक्या वर्षांत तिनं घासभर अन्न माझ्या हातचं खाल्लं नाही की, मी केलेला कपभर चहा घेतला नाही." त्यावर त्या म्हणाल्या, "पण ती तुझ्याकडं यायला तयार आहे." हे ऐकून मला एक मोठा आश्चर्याचा धक्का बसला. हे कसं शक्य आहे? ज्या सोवळ्यामुळं हे सर्व रामायण घडलं, ते एकदम सोडलं कसं? हा माझ्या चांगल्या वागणुकीचा परिणाम की स्वच्छ व टापटीप राहणीचा परिणाम, की वेळ निभावून नेण्यासाठी केलेली तडजोड होती? ती फार मोठी तडजोडच असावी असं विचार करताना वाटतं.

प्रभाच्या प्लास्टरच्या वेळी केली तशी सर्व व्यवस्था स्वतंत्र खोलीत आजीसाठी केली. स्ट्रेचरवरून काकांनी तिला तिथं आणून ठेवलं. तिकडं सुहास बाळंत होऊन तिला मुलगी झाली. तिचं नाव उर्मिला ठेवलं. फार सुंदर नाव. मला खूप आवडलं. मी तिच्यासाठी गोधड्या, लंगोट, झबली घरात मशिनवर शिवून बारशाला नेली. उर्मिला गोरी आणि सुंदर दिसायची.

सायनला आजीसाठी बाई ठेवली नाही. ऑल इंडिया रेडिओवर पगार तसा कमीच होता. संसाराचा खर्च वाढत होता. जमेल तिथं काटछाट करणं आवश्यकच होतं. म्हणून सकाळी आजीला बेडपॅन देण्यापासून सर्व कार्यक्रम घड्याळाच्या

काट्याप्रमाणं ठरवून टाकले होते. मुलं उठायच्या आधी आजीचं बेडपॅन, तोंड धुणं, चहाबरोबर चिवडा किंवा बिस्किटं असं खाणं, त्यानंतर मंगेशचा चहा, खाणं, मुलांना कॉफी, ब्रेड बटर. मग डब्यांची तयारी. मुलं जेवून, डब्यात भाजी-चपाती घेऊन शाळेत जायची. साडेनऊला मंगेशचा डबेवाला यायचा. मुलं शाळेत गेली की आजीचं जेवण, माझं जेवण. दुपारी शिवण किंवा साफसफाई, संध्याकाळी चार वाजता आजीला चहा. मुलांचं संध्याकाळचं खाणं. मग सर्वांचा रात्रीचा स्वयंपाक. असं सर्व शिस्तीनं वेळेवर चालू होतं. दर रविवारी दुपारी जेवायला काका असायचे. सर्वांची, आजीची चौकशी करायचे. आणि माझी ओढाताण, तारांबळ पण त्यांच्या दृष्टीतून सुटली नाही. तिकडं सुहासला दुधाच्या गाठी होऊन ऑपरेशन करावं लागलं. तिला ॲडमिट केलं. काकांना, आईला, उर्मिलाला सांभाळणं कठीण पडू लागलं. ते दोघं हैराण झाले. मी तिला भेटायला गेले होते. तिथं गेल्यावर हे सर्व समजलं म्हणून मी सुहासला म्हणाले, "मी उर्मिलाला थोडे दिवस सायनला घेऊन जाऊ का? तुला बरं वाटलं की पुन्हा आणून देते." पण का ते अजूनही ठाऊक नाही. ती माझ्यावर रागावलेली दिसत होती. ती म्हणाली, "काही नको, त्यापेक्षा 'माझी आई' या संस्थेत ठेवीन तिला. मला हे उत्तर फार अपमानकारक वाटलं. अतिशय दु:खानं मी परत आले. करत होते त्यापेक्षा आणखी काय केलं असतं म्हणजे त्या मंडळींचं समाधान झालं असतं?

एक दिवस आजीला बघायला डॉक्टर श्रीखंडेबाईंना बोलावलं. त्या वर आल्या. बघितल्यावर म्हणाल्या, "त्यांना सारखं झोपवून ठेवू नका. थोडा वेळ बसू द्या. उभं करा आणि सावकाश पाऊल पुढं टाकून चालायचा प्रयत्न करू द्या. नाहीतर सर्व शरीर आखडून जाईल. त्या कधीच चालू शकणार नाहीत." मी आजींना तसं सांगितलं व हळूहळू उभं केलं. इतक्यात माझ्या नणंदा भेटायला आल्या. त्यांनी ते बघितलं आणि, "तिला का उभं केलं? का चालायला लावलं? तुम्हांला त्रास होतो म्हणून तुम्ही तिला चालायला लावता" असा दोष द्यायला सुरुवात केली. मी त्यांना खूप सांगून पाहिलं, "डॉक्टरनी तसं सांगितलं आहे." पण त्यांना ते पटलं नाही. दुसऱ्या दिवशी स्वत: सासूबाई आल्या आणि, "तिला चालायला सांगू नको." म्हणाल्या. ते त्यांचं सांगणं शास्त्रीय माहिती व ज्ञान यांवर आधारलेलं नव्हतं. पण आपल्याला तिची किती काळजी वाटते ते त्यांनी मला दाखवलं. त्यानंतर मी विचार केला की काय व्हायचं ते होऊ दे. इतकं करून जर मला वाईटपणाच देणार असतील तर राहू दे आजीला बिछान्यातच शेवटपर्यंत. शेवटी तसंच झालं. आजी पुन्हा कधीच उभी राहू शकली नाही की चालली नाही.

आजींना माझ्याकडं येऊन सहा महिने होत आले होते. त्यांना इकडं खूप आवडलं. माझ्या वक्तशीरपणामुळं कधी त्यांची हयगय झाली नाही. एका रविवारी दुपारी काका आले. त्या रात्रीपासून मला खूप ताप आला होता. सकाळी उठून तापातच काम करत होते. स्वयंपाक केला. त्यांना जेवण वाढताना त्यांच्या लक्षात

आलं. म्हणाले, "यशोदा, तुला काय झालं?" मी सांगितलं की, "कालपासून ताप येतो आहे. कामाला बाई नाही. म्हणून तापातच काम करते आहे." त्यांना फार वाईट वाटलं; म्हणाले, "यशोदा, मी आठ दिवसांनी म्हातारीला गिरगावात नेणार आहे. ते आमचे भोग आहेत. तुला त्रास कशाला? तुला काही झालं तर तुझ्या मुलांना कोण बघेल? मी ॲम्बुलन्स ठरवली आहे. तिच्या कामासाठी बाई ठरवली आहे. तिला मी नेईन तेव्हा तू बरोबर ये आणि बाईला सर्व नीट समजावून दे."

आम्ही आजींना घेऊन गिरगावात गेलो. सुहास तिच्या घरी गेली होती. सासूबाईंचा चेहरा रागाचा होता. त्या मनातून चिडलेल्या दिसत होत्या. मला सांगितल्याप्रमाणं मी बाईला सर्व काम दाखवलं. त्या माझ्याशी काहीच बोलल्या नाहीत. मी समजले, मी सायनच्या नव्या मोठ्या जागेत राहते आणि त्यांना चाळीत राहून हा त्रास काढावा लागतो. याचा त्यांना राग आलेला आहे. दर पावसाळ्यात मोठा पाऊस पडायला लागला की मला फार भीती वाटायची. ह्या पावसात जर शांतारामाची चाळ कोसळली आणि बरंवाईट झालं तर सर्व दोष माझ्यावर येईल. मी मंगेशला काकुळतीनं सांगत असे की, त्यांना जाऊन सांग, "पावसाळ्यात तरी इकडं राहायला येत जा." तो जाऊन सांगत होता की नाही, ठाऊक नाही. घरात तीन म्हातारी माणसंच राहिली होती. काकांना वरचेवर ताप यायला लागला. दर वेळी गिरगावात त्यांची देखभाल करण्याचा मंगेशला त्रास होऊ लागला. 'साईप्रसाद' मधे दुसऱ्या मजल्यावरचा एक भाडेकरू गेला होता. पण त्याचा मुलगा जागा सोडीना. मंगेशनं एक दिवस खाडकन त्याचं दार उघडलं आणि त्याला तिथून जायला सांगितलं. तेव्हा तो घाबरला आणि निघून गेला. मंगेशनं स्वत: लगेच स्वत:चं कुलूप लावलं आणि काकांना खाली येऊन राहायला सांगितलं. स्वतंत्र ब्लॉक आहे म्हणून सासूबाई पण शेवटी तयार झाल्या. आणि शांतारामाची चाळ सोडून ते सायनला येऊन राहू लागले. आजी रात्रंदिवस बिछान्यातच होती. तिच्यासाठी चंद्रभागा नावाची बाई ठेवली. ती त्यांची भांडी, धुणी व इतर सर्वच कामं करायची व त्यांच्याकडंच राहायची. तिला मूलबाळ नव्हतं. तरुणपणातच नवऱ्यानं टाकलं होतं. ती काळी, बुटकी आणि दिसायला अगदी सुमार. काका-आईंचा स्वतंत्र संसार आनंदात सुरू झाला. तिन्ही मुली भेटायला येऊ लागल्या. मी वर असल्यामुळं त्यांना धीर वाटायचा.

सायनची वस्ती भराभर वाढत होती. दहा वर्षांत सायन पूर्णपणं बदलून गेलं. आणि तिसऱ्या मजल्यावर ठरल्या वेळी चढणारं पाणी बंद झालं. काकांनी बिल्डिंगसाठी वॉटर पंप घेतला नव्हता. खालच्या भाडेकरूंच्या टाकीत थोडं पाणी पडायचं. पण आमच्या वरच्या टाक्या रिकाम्या राहत. टाकीवर चढून सर्व घराला लागणारं पाणी बालद्यांनी काढावं लागे. मला फारच त्रास व्हायला लागला. भयंकर खोकला लागला. काही केल्या बरा होईना. शेवटी मंगेशनं हवा बदलण्यासाठी थोडे दिवस पुण्याला डॉक्टर कालेलकरांकडं नेऊन ठेवलं. तिथं विजया चिटणीस व तिची धाकटी बहीण

यांची ओळख झाली. मी मंगेशला सांगितलं की, "आता पाण्याची काहीतरी सोय केल्याशिवाय मी मुंबईला येणार नाही. डायरेक्ट नळाचं पाणी रात्री दोन वाजता येतं. तेसुद्धा अर्ध्या तासात जातं. रोज जागरण व दिवसभर काम मला झेपत नाही." तरी त्यानं काहीच हालचाल केली नाही. तसंच एक दिवस मला मुंबईला नेलं.

शाळेची घाई, बंब पेटत ठेवायचा, अंघोळीसाठी भराभर टाकीतून पाणी काढायचं, स्वयंपाक, जेवणं, डबे दहाच्या आत उरकायचे. कपडे धुणं, भांडी घासणं यांसाठी पाणी लागायचं. संध्याकाळी फार थोडं पाणी शिल्लक राहायचं. असं किती दिवस चालवायचं? ह्या विचारानं निराश वाटायचं. अति श्रमामुळं शरीर थकून जायचं.

एक दिवस संध्याकाळी मंगेश घरी आला. त्याच्याबरोबर पांढरा लेंगा-झब्बा घातलेले एक गृहस्थ होते. दिवस उन्हाळ्याचे. ते मुंबईच्या घामानं, उकाड्यानं हैराण झालेले दिसत होते. मंगेशनं आत येऊन माझी ओळख करून दिली. "ही यशोदा, आणि हे राम पुजारी." आणि लगेच पुढं म्हणाला, "अग, त्याला आंघोळ करायची आहे. त्याला फार घाम आला आहे." मी एकदम चपापले. आणि आत गेले. पाठोपाठ मंगेश आला. त्याला मी हलक्या आवाजात म्हणाले, "पाणी कुठं आहे? अंघोळीला एक बादलीतरी पाणी पाहिजे. तेही संपलं तर सकाळी तोंड कसं धुणार?" तो म्हणाला, "कसंही कर पण त्याला पाणी दे." हे आमचं बोलणं, माझं थोडं त्रासलेलं बोलणं त्यांच्या–रामभाऊंच्या कानावर पडलं. त्यांना फार वाईट वाटलं. कसंतरी थोडं फार पाणी जमा करून मी त्यांना दिलं. पण आयुष्यभर ते ही गोष्ट विसरले नाहीत. नंतर जेव्हा ते मला भेटतात तेव्हा अंघोळीच्या पाण्यासाठी बोलल्याशिवाय राहत नाहीत. पाण्यासाठी चाललेले माझे हाल, त्यांना कोण वर्णन करून सांगणार? मंगेशची पहिली अंघोळ झाली की तो तयार होऊन निघून जात असे.

वसंत बापट व विंदा करंदीकर यांना एकदा संध्याकाळी जेवायला बोलावलं होतं. त्यांना मासे आवडतात म्हणून कोळंबीची रसाची आमटी, तळलेले पापलेट वगैरे पदार्थ केले होते. दोघं आले. खूप गप्पागोष्टी, हास्यविनोद झाले. मी जेवण वाढलं. अगदी आवडीनं, आनंदानं ते जेवत होते. जेवण संपत आलं. आणि बापट एकदम उठले. आणि बाथरूममधे गेले. तेव्हा घरात बेसिन नव्हतं. आणि त्यांना भडाभड उलटी झाली. एकदम उलटी का झाली कळेना. बाहेर आल्यावर त्यांनी सांगितलं की, "मला कोळंबीची ॲलर्जी आहे. ती मी खायला नको होती. पण आवडते म्हणून खाल्ली. त्यामुळं असं झालं." त्यांना आणखी त्रास होऊ नये म्हणून मी पळत जाऊन डॉक्टर श्रीखंडेबाईंना बोलावून आणलं. त्यांनी गोळ्या दिल्यावर जरा बरं वाटलं. आता प्रश्न होता बाथरूम धुण्याचा. कारण पाणी फार कमी होतं. मी बाथरूमकडं जायला लागल्याबरोबर करंदीकर मागून आले. म्हणाले, "वहिनी तुम्ही

बाहेर जा. बाथरूम तुम्ही धुवायची नाही. मी धुणार आहे.'' मी त्यांना खूप अडवायचा प्रयत्न केला. पण ते ऐकेनात. सरळ आत गेले. खराटा घेतला. पिंपात शिल्लक होतं त्यातलंच थोडं थोडं पाणी घेऊन त्यांनी बाथरूम धुऊन काढली.

शेवटी मीच पुढाकार घेतला. सर्व भाडेकरूंना भेटले. पाण्याच्या पंपासाठी सर्वांकडून वर्गणी गोळा केली. 'गानला' नावाच्या कॉन्ट्रॅक्टरला गाठलं. खर्चाचा अंदाज घेतला. दोन पंप आणवले. पंपाची खोली बांधली आणि सहा महिन्यांत पंप सुरू झाले. त्याच सुमारास चंद्रभागेच्या भावानं एका शांताबाई नावाच्या बाई कामाला आणून दिल्या. प्रौढ बाई होत्या. त्यांचं सासरचं नाव सत्यवती होतं. पण ते म्हणायला अवघड म्हणून मी त्यांना माहेरच्या नावानं शांताबाई म्हणून हाक मारायची. त्यांना चार मुलगे होते. ते मोठे होते. चंद्रभागा त्यांची लांबची नणंद लागायची. त्या नुकत्या गावाहून आल्या होत्या. खेड्यातून आल्यामुळं शहरी राहणीची त्यांना काहीच माहिती नव्हती. फारच अडाणी. दिव्याचं बटण माहीत नव्हतं की पाण्याचा नळ उघडायची माहिती नव्हती. जेवण भरपूर लागायचं. तरी मी त्यांना ठेवून घेतलं आणि शिकवायला सुरुवात केली. त्या शिकत होत्या. त्यांना स्वयंपाक करायला शिकवलं. भांड्या-धुण्याला दुसरा गडी होता. रोजची भाजी, आमटी शिकेपर्यंत चार महिने लागले. मधून मधून त्यांची मुलं भेटायला यायची. घरकामात मला मदत होऊ लागली.

माझ्या पाइल्सच्या दुखण्यानं अगदी उच्चांक गाठला. फार वर्षं मी ते दुखणं अंगावर काढलं होतं. आता तर संडासात बसल्याबरोबर रक्ताच्या चिळकांड्या उडत. नायगावला डॉक्टर करमरकरांचं हॉस्पिटल होतं. त्यांना दाखवलं. त्यांनी सांगितलं की आता ऑपरेशन करण्याशिवाय इलाज नाही. रक्त जाऊन ॲनिमिया फार वाढेल आणि दुसरे प्रश्न निर्माण होतील. तेव्हा ऑपरेशन करायचं ठरवलं. मुलांकडं बघायला माझ्या आईला बोलावून घेतलं व मी ॲडमिट झाले.

दुसऱ्या दिवशी सकाळी आठला टेबलावर घेतलं. ऑपरेशन झाल्यावर मला कॉटवर आणून ठेवलं. पूर्ण शुद्धीवर येण्याच्या आधीच मी भयंकर हिस्टेरिक झाले. उठून पळायला बघत होते. काय काय बडबडत होते. माझ्याजवळ मंगेश, मोठी नणंद कुमुदिनी, तिचे यजमान गुरुमामा व काका इतकी माणसं होती. मी उठू नये म्हणून सर्वांनी माझे हातपाय दाबून मला धरून ठेवलं. सर्व घाबरले. डॉक्टरांना बोलावलं. त्यांनी पुन्हा झोपेचं मोठं इंजेक्शन दिलं आणि झोपवून टाकलं. संध्याकाळी चार वाजण्याच्या सुमाराला मला त्या भयंकर वेदनेची जाणीव झाली. शुद्ध येऊ लागली. आठ तासांनंतरसुद्धा असह्य वेदनेनं मी तडफडू लागले. माझ्या अशक्त शरीराला हे दुखणं सोसेनासं झालं. मला कोणी स्पर्श केला किंवा कॉटच्या दांडीवर हात ठेवला तरी सहन होईना. सोसण्याशिवाय दुसरा इलाज तरी काय होता?

हिस्टेरियामधे झालेल्या ओढाताणीमुळं सर्व स्नायू दुखायला लागले. विशेषत: मान व पाठ. मानेचं दुखणं पुढं कधी बरंच झालं नाही. त्यातून स्पाँडिलायटिस झाला. दुपारी माझ्याकडं बसायला सासूबाई यायच्या. माझी आई मुलांना बघायची. रात्री झोपायला मंगेश यायचा. सकाळी डॉक्टर आले. ते म्हणाले, "हे दुखणं तुम्ही इतके दिवस कसं सहन केलंत? लहान चेंडूच्या आकाराचे चार गोळे कापून काढावे लागले. पाडगावकरांना बघायला बोलावलं होतं. पण ते आले नाहीत! पुरुषासारखे पुरुषसुद्धा दुखण्यामुळं आरडाओरडा करत असतात. तुम्ही त्या मानानं खूप सहन करत आहांत."

रोज पेनिसिलीनचं इंजेक्शन चालू केलं. ते घेतलं की माझा जीव घाबरा झाल्यासारखा व्हायचा. आणि हातांना खाज यायला लागली. पुन्हा डॉक्टरांना सांगितलं तेव्हा त्यांनी ते बंद केलं. हातांची खाज मात्र पुढं तीन महिने चालू होती.

ऑपरेशननंतर वर्षानं माझ्या मनाची पुन्हा तडफड सुरू झाली, अशक्तपणा व इतर त्रास होत होताच. तरी पुन्हा मी मंगेशकडं, "मला काही तरी शिकायचं, काम करायचं आहे म्हणून सांगायला सुरुवात केली, वय ३५-३६ चं झालं होतं. आता काही केलं नाही तर पुन्हा कधीच काही संधी मिळणार नाही. शेवटी बऱ्याच विचारानंतर त्यानं मला 'शिशुविहार'चा एक वर्षाचा माँटेसरी कोर्स करायला परवानगी दिली. मी त्याला गमतीनं म्हणाले की, "ह्या कोर्सला परवानगी दिलीस. कारण इथं फक्त बायका व लहान मुलं यांच्याशीच संबंध येईल म्हणूनच ना?" शांताबाई घरीच राहत होत्या व स्वयंपाक करायला शिकल्या होत्या, मुलं ११ ते ५ शाळेत असत म्हणून मला पण ११ ते ५ कोर्सला जाणं सोईचं झालं. तिथं मालती मनोहर ह्या आम्हांला शिक्षिका होत्या. सरला देवधर मुख्याध्यापिका होत्या. एक वर्ष केव्हाच संपलं. चांगल्या मार्कांनी पहिल्या वर्गात मी पास झाले. लगेच जूनमधे सरलाताईंचा फोन आला की सायनला शिशुविकास शाळेत एका टीचरची जागा रिकामी आहे. तुम्ही ती नोकरी घ्या. शाळेत जाऊन चौकशी केली तेव्हा समजलं की त्यांनी प्रायमरी स्कूलला एक तास थोडं इंग्रजी शिकवण्याचा प्रयोग चालू केला आहे. राम कोल्हटकर यांची कल्पना असावी. माझ्याशिवाय त्या लहानशा शाळेत ग्रॅज्युएट कोणी नसावं म्हणून मला तो एक वर्ग घ्याल का म्हणून त्यांनी विचारलं. मी 'हो' म्हणाले. माँटेसरी शाळा सुरू होण्याआधी एक तास मला इंग्लिशचा वर्ग घ्यावा लागे. घंटा झाल्याबरोबर तिकडं माँटेसरी वर्ग सुरू होत असे. माँटेसरी वर्गात खरं म्हणजे आधी जाऊन काही रांगोळी काढणं, फळ्यावर चित्र काढून ठेवणं, लहानशी पुष्परचना करणं, प्रार्थनेनंतर लागणारे खेळ बाहेर काढून ठेवणं, असं काम करावं लागतं. मला मात्र इंग्लिशच्या वर्गावरून येऊन हे काम करायला वेळ मिळत नव्हता. मी वर्गात आले की इतर शिक्षिकांनी बडबड करायला सुरुवात केली. मी त्यांना समजावून सांगितलं की मी मुद्दाम काम चुकवत नाही. मला वेळ मिळत नाही. त्या बाया

वगैरे नाही. तिला चादरीसकट उचलून खाली जमिनीवर ठेवलं. वर चादर टाकली. आता प्रश्न असा होता की रात्रभर सगळे जण खाली कसे बसून राहणार? काकांनी तो प्रश्न सोडवला. "तुम्ही सर्वांनी वर जाऊन झोपा. मी एकटा खाली झोपतो" म्हणाले. कल्पना भयंकर होती. प्रेत खोलीत असताना एकट्या माणसानं रात्रभर तिथं राहायचं. जावई असून पण ते तयार होते. दुसरा इलाज पण नव्हता. अशा तऱ्हेनं म्हाताऱ्या आजीचा अंत झाला. माझ्या लग्नानंतर पंधरा वर्षांनी पहिला मृत्यू घरात झाला.

ऑपरेशननंतर आजी सहा महिने माझ्याकडं राहिली. ते एक प्रकारे मला मिळालेलं चांगलं प्रमाणपत्र होतं. मी तिची नातसून. गिरगावात असताना ती मला कधीच काही बोलली नाही. शांतपणं पहाटे उठून, गड्यानं धुतलेली भांडी विसळून ठेवणं, चहा करणं, स्वयंपाकाला सुरुवात करणं, वगैरे कामं सुरू असत. मला आत जाण्याची परवानगी नव्हती. तिच्या सोवळ्यामुळं मला फारसं काम पडलं नाही हे खरं. पण माझ्याबद्दल काही तक्रार पण कानावर पडली नाही. उलट प्रभा, सुहास यांना माझं उदाहरण देत असत. "ती बघ कशी सावरून, सांभाळून चालते. तुमच्यासारखी पदर इथं तिथं लावीत चालत नाही." पण कधी माझ्या हातचा एक कप चहासुद्धा ती प्यायली नव्हती. तडजोड म्हणून जरी ऑपरेशननंतर ती माझ्याकडं राहिली तरी नंतर तिला तसं राहणं आवडायला लागलं होतं. कारण काकांनी पुन्हा गिरगावात जायचं सांगितल्यावर ती जायला तयार नव्हती. म्हणाली की, "नको. इथंच बरं आहे– यशोदेसारखं माझं तिथं कोण करणार"? पण तिला जावं लागलं, कारण काकांना माझे आणखी हाल करायचे नव्हते. आणि ती सासूबाईंची एकुलती एक मुलगी म्हणून तिनंच आईला बघावं असं काकांना वाटलं असेल. ते तिथं नंतर सायनला राहायला आल्यामुळं तिची अखेरची सेवा पण माझ्याच हातून झाली. निदान तेवढी काळजी घेतल्यामुळं तिच्या शरीरात किडे पडले नाहीत.

एकदा काका, आई व मी बाहेर जाण्यासाठी निघालो होतो. सायनच्या बस डेपोवर ६६ नंबरच्या लाइनमधे उभे होतो. बराच वेळ झाला. बस काही येईना. उभे राहून राहून कंटाळलो होतो. इतक्यात काही कल्पना नसताना एकदम काका खाली कोसळले–बेशुद्ध झाले. एकदम धावाधाव झाली. गर्दी जमली. काकांचा जाड सुती कोट घामानं ओलाचिंब झाला होता. कोणीतरी टॅक्सी आणून दिली. मी टॅक्सी आधी घराकडं नेली. काका-आईंना खाली ठेवून मी वर आले. पैसे घेतले. आम्ही सायन हॉस्पिटलला जातो असा घरी निरोप ठेवला. खाली आले व टॅक्सी हॉस्पिटलकडं घेतली. वॉर्डबॉईजनी त्यांना काढून स्ट्रेचरवर ठेवलं. त्यांना लवकर ट्रीटमेंट मिळावी म्हणून मी सारखी सांगत होते. मंगेश कामाला गेलेला होता. मुलं घरात नव्हती. आम्ही दोघी डॉक्टरांची वाट बघत उभ्या होतो. खरं वाटणार नाही– पण बरोबर दोन

तासांनी त्यांना आत घेतलं. तपासलं व ॲडमिट करून घेतलं. मी डॉक्टरांना म्हणाले, "अशा पेशंटना लवकर इलाज होईल अशी व्यवस्था असली पाहिजे." त्यावर मला उत्तर मिळालं, "दोन तास पेशंट जगला म्हणजे तो जगण्याची शक्यता असते, म्हणून आम्ही त्यांना दोन तासांनीच आत घेतो." कोण दीड शहाणा डॉक्टर होता ते आता आठवत नाही. पण असेही डॉक्टर असतात, हे समजलं.

काकांची प्रकृती सुधारत होती. संध्याकाळी आई एकट्याच मधल्या गेटनं त्यांना भेटायला जायच्या. मी जमेल तेव्हा जात असे. एकदा त्या जात असताना रस्त्यात मुलं पतंग उडवीत होती. त्यांच्या मांजात पाय अडकून त्या पडल्या. डाव्या हाताला दुखापत झाली. त्या घाबरून तशाच हात धरून वर माझ्याकडं आल्या. घरात माझ्याशिवाय कोणीच नव्हतं. आल्याबरोबर काय झालं ते त्यांनी सांगितलं ."पाणी प्यायला दे" म्हणाल्या. त्याबरोबर मी गडबडले. कारण माझा तिसरा दिवस होता. चवथ्या दिवशी डोकीवरून अंघोळ झाल्याशिवाय त्या कुणाच्याच हातचं खात-पीत नसत. काही न बोलता सरळ पाणी द्यावं असं मला क्षणभर वाटलं. पण श्रद्धा असलेल्या माणसाला फसवावं हे मनाला पटेना. मी त्यांना सांगितलं की, "माझा तिसरा दिवस आहे, मी पाणी देऊ का तुम्ही स्वत: घेता?" पण हात जास्त दुखत असल्यामुळं त्या म्हणाल्या, "असूं दे, तूच दे. नुसता हात हालला तरी वेदना सहन होत नाही." मंगेशनं घरी आल्यावर त्यांना डॉक्टरकडं नेलं. हाताचं हाड मोडलं होतं. त्याला प्लास्टर घालून दिलं. पुन्हा सगळ्यांचा स्वयंपाक व जेवणं वर करणं भाग पडलं. माझा अशक्तपणा तसाच होता. स्वत:कडं लक्ष द्यायला वेळ नव्हता. काकांना बरं वाटल्यावर ते पण घरी आले. खालचं स्वयंपाकघर बंद होतं. सर्वांची काळजी घेणं हे माझं काम होतं. एक गमतीची गोष्ट मला मधेच आठवली. ३ ह्या आकड्याचा आणि माझा काहीतरी संबंध असावा असं विचार करताना वाटतं. मला मोठे ३ भाऊ, ३ भावजया, सख्खी बहीण एक पण कमल, विमल ह्या दोन चुलत बहिणी लहानपणापासून आमच्या घरीच असल्यामुळं त्या धरून ३ बहिणी, ३ मेहुणे, लग्नानंतर सासरी घरात ३ म्हातारी माणसं, ३ नणंदा, ३ मेहुणे. पुढं मुलं झाली ती ३ व नोकर माझ्याकडं २ व आईंकडं १ मिळून ३च.

माझी प्रकृती बिघडत चालली होती. अशक्तपणा इतका वाढत होता की काम होईना. काका, आई, चंद्रभागा, अजित, अंजली, अभय, मंगेश व मी स्वत: इतक्या सगळ्यांचा स्वयंपाक व ऊठबस मला होईनाशी झाली. आईंना वर येऊन महिना झाला होता. डाव्या हाताला प्लास्टर होतं. मंगेश तेव्हा ऑल इंडिया रेडिओवर नोकरीला होता. सकाळी उठून त्याचं खाणं, अंघोळ झाल्यावर मी त्याला म्हणाले की, "मला फार थकवा येतो, अशक्त वाटतं. सर्वांचं काम मला झेपेनासं झालं आहे. काही तरी मार्ग काढला पाहिजे." हे सर्व मी अगदी टेकीला येऊन बोलत होते. आवाज काढला नाही की, कोणाबद्दल तक्रार केली नाही. तरीसुद्धा एकदम स्फोट

व्हावा तसा मंगेश चिडून माझ्या अंगावर ओरडायला लागला. "तू समजतेस काय स्वत:ला? तुझ्यानं होत नाही तर आम्ही डबे आणून खाऊ." आणि भयंकर चिडून तो बेडरूममधे पिंजऱ्यातल्या वाघाप्रमाणं फेऱ्या मारायला लागला. माझा थकलेला जीव इतका घाबरून गेला की त्याला उत्तर देण्याचं त्राण माझ्यात राहिलं नाही. थोड्या वेळानं तो ऑफिसला निघून गेला. आणि नंतर माझ्या लक्षात आलं : सासूबाईंनी हा गोंधळ ऐकला आहे. कारण त्या वर होत्या. मंगेशचा आवाज आकाशाला भिडला होता. मला खूप लाज वाटली. काहीच झालं नाही असं भासवून मी कामाला लागले. दुसऱ्या दिवशी मंगेशच्या आई मला सांगत आल्या, "काका ओरडायला लागलेत, यशोदेला किती दिवस त्रास द्यायचा? तू आता खाली स्वयंपाक सुरू कर. चंद्रभागा कातून, चिरून देईल. तू फक्त फोडण्या दे. तेव्हा उद्यापासून आम्ही खाली स्वयंपाक करू." मी मनातून समजले पण काही बोलले नाही. फक्त एवढंच विचारलं की, "नक्की जमेल ना तुम्हांला? प्रयत्न करून पहा. नाही तर मी करतेच आहे." दुसऱ्या दिवसापासून ते खाली गेले. ह्याही वेळी काकांनी मला कामाच्या रगाड्यातून सोडवलं.

त्या खाली गेल्या आणि आठच दिवसांत मला जुलाब सुरू झाले. मम्मींकडं गेले. औषध घेतलं. काहीच परिणाम झाला नाही. त्यांनी औषध बदलून दिलं. त्याचा पण परिणाम झाला नाही. डॉक्टर म्हणाल्या, "हे वेगळं काहीतरी आहे. पंधरा दिवस झाले, कोणत्याच औषधानं जुलाब थांबत नाहीत." दिवसातून चार ते पाच वेळा जावं लागे. थकवा असा वाढला की मला जिना चढून वर जाता येईना. मग मंगेशनं लक्ष घातलं. मला डॉक्टर फडक्यांकडं नेलं. त्यांनी कोलायटिस झाला म्हणून पंधरा दिवसांची ट्रीटमेंट दिली. ती फुकट गेली. मग कोणीतरी सांगितलं म्हणून वैद्याकडं नेलं. त्या औषधानं उलट्या व्हायला लागल्या. असं करता करता, चार महिने होत आले. भांड्याधुण्याला फक्त बाई होती. सकाळी सहा वाजता उठले की झोपायला रात्री अकरा वाजत. झोपेतून जागी झाली की भीती वाटायची. आजचा दिवस कसा पार पाडणार? रक्त कमी होत चाललं होतं. शरीर पांढरं फटफटीत दिसायला लागलं. जुलाब चालूच राहिले.

एक दिवस मंगेश सांगत आला की त्याला ऑफिसच्या कामासाठी आठ दिवस दिल्लीला जायचं आहे. त्या वेळेस पद्मा लोकूर व बाळासाहेब दिल्लीला राहत होते. त्यांची आमची चांगली ओळख होती. त्या स्वत: कविता लिहीत असल्यामुळं मंगेशकडं येणं-जाणं, गाठीभेटी होत असत. आधी ते मुंबईला राहायचे. त्या वेळी बदली होऊन ते दिल्लीला राहायला गेले होते. मंगेश त्यांच्या घरीच उतरणार होता. दिल्लीला जायचं म्हणून तो फार आनंदात होता. जाण्याआधी मी त्याला म्हणाले की, "माझे जुलाब काही थांबत नाहीत. हे सर्व माझ्या सहनशक्तीपलीकडं गेलं आहे. तू मला सायनच्या हॉस्पिटलमधे ॲडमिट कर आणि मग दिल्लीला जा." तो लगेच म्हणाला, "तुला ॲडमिट करू? आणि मग मुलांना कोण बघेल? मी आल्यावर मग

बघू या.'' दुसऱ्या दिवशी तो निघून गेला. काका, आई खालच्याच मजल्यावर राहत होते. त्यांना माझी ढासळणारी प्रकृती दिसत होती. तीन लहान नातवंडं आहेत. त्यांचे हाल होत आहेत. सर्व कळत असूनही सूसबाईंची काहीच मदत मिळाली नाही.

मंगेश दिल्लीला गेल्यावर काका एक दिवस वर आले. मला म्हणाले, ''यशोदा, तुमचे खूप मोठे मोठे डॉक्टर पाहिले. कोणाच्याच औषधानं तुला बरं वाटत नाही. आज मी तुला माझ्या डॉक्टरकडं घेऊन जातो. दुपारची जेवणं झाली की तयार रहा. टॅक्सी घेऊन येतो. तुला घेऊन जातो.'' मी तयार झाले. फार थंडी वाजत होती म्हणून शाल गुंडाळून घेतली. काकांबरोबर टॅक्सीत बसले. टॅक्सी लॅमिंग्टन रोडला डॉक्टर ए० आर० रांगणेकर यांच्या दवाखान्यासमोर थांबली. आम्ही वर गेलो. मुलंबाळं घेऊन बायका आल्या होत्या. डॉक्टर कोणाला ओरडत होते. कुणाबरोबर विनोद करत होते. आम्हांला बसायला सांगितलं. ''आधी मुलांना बघतो'' म्हणाले. ''ती फार वेळ थांबू शकत नाहीत.'' ते खरंच होतं. शाल गुंडाळून मी शांतपणं बसून होते. थोड्या वेळानं माझ्याकडं आले. म्हणाले, ''फार थंडी वाजते का?'' मी ''हो'' म्हणाले. काय त्रास आहे, तक्रार आहे ते त्यांनी विचारून घेतलं आणि पोट तपासायला लागले. एकदम म्हणाले, ''पोट कुठं आहे''? जुलाब होऊन होऊन पोट पार खपाटी गेलं होतं. पाठीला लागलं होतं. खूप वेळ वेगवेगळ्या ठिकाणी पोटात दाबून बघत होते आणि अंदाज घेत होते. तपासणी संपली. खुर्चीवर जाऊन बसले. काका आणि मी समोर बसलो. त्यांनी काकांना फैलावर घ्यायला सुरुवात केली. ''काय करीत होतात इतके दिवस? दिसत नाही का तिची काय अवस्था झाली आहे ते? स्वयंपाक कोण करतं''? काका म्हणाले, ''तीच करते.'' त्यावर आणखी चिडले. ''आजपासून तिनं स्वयंपाकखोलीत पाय टाकायचा नाही. तिला एक महिनाभर पूर्ण बेडरेस्ट द्या.'' आणि एक प्रिस्क्रिप्शन लिहून दिलं, ते तयार करून आणा व तिला पाच दिवस द्या.'' मी त्यांना विचारलं, ''डॉक्टर हे झालं आहे तरी काय मला?'' तेव्हा म्हणाले, हा 'स्प्रू' आहे. तोपर्यंत मी हे नाव एकदाच आईच्या तोंडून ऐकलं होतं. माझ्या एका काकूंना आधी 'स्प्रू' झाला होता आणि नंतर आतड्याचा टी०बी० झाला–त्यातच त्या वारल्या असं ती सांगायची.

डॉक्टर रांगणेकरांनी माझी एकही इतर तपासणी करायला सांगितली नव्हती. अगदी साधं म्हणजे माझं वजन किती आहे हेसुद्धा पाहिलं नव्हतं. तपासण्या केल्या असत्या तर त्या धक्का देणाऱ्या निघाल्या असत्या. मरणाच्या दारातून मी परत आले. अशी माझी खात्री आहे.

त्याही औषधाचा परिणाम पहिले चार दिवस झाला नाही. मी मनातून घाबरलेच होते. मंगेश दिल्लीहून परतला होता. पाचव्या दिवशी मात्र भयंकर प्रकारचं कॉन्स्टिपेशन सुरू झालं. मी औषध थांबवायला बघत होते. पण मंगेशनं सांगितलं, ''त्यांनी जितके दिवस घ्यायला सांगितलं तितके दिवस घेतलंच पाहिजे. बंद करायचं नाही.''

घाबरून मी ते घेत राहिले. माझा त्रास वाढत राहिला. म्हणून डॉक्टरांकडं जायचं ठरवलं. इतक्या लांब गेलो आणि समजलं की डॉक्टर बाहेरगावी गेलेत ते पंधरा दिवस येणार नाहीत. पुन्हा घरी आले. औषध बंद करून टाकलं. कॉन्स्टिपेशन जाईना.

डॉक्टरांनी मला सहा महिने उकडलेल्या भाज्यांचा आहार घ्यायला सांगितलं होतं. वर फक्त मेयॉनीज सॉस घातला तर चालेल. तसेच सहा महिने पोटाला पट्टा बांधला पाहिजे. नाही तर आतडी सैल पडून पोट खाली येईल. संध्याकाळी रोज अर्धा तास चाललं पाहिजे. महिन्यानंतर मी थोडा वेळ खाली चालायला जाऊ लागले. भांड्याधुण्याच्या बाईलाच स्वयंपाक करायला सांगितलं होतं. कशी का होईना, वरण, भात भाजी तरी मुलांना मिळत होती.

एक दिवस सायन हॉस्पिटलच्या बाजूनं फिरत असताना कोपऱ्यावरच्या बंगल्यातून गाडी बाहेर आली. कोणी गोरा, चांगले कपडे घातलेला, सुशिक्षित माणूस गाडी चालवताना दिसत होता. गाडी माझ्या मागं मागं येऊ लागली. मनातून घाबरले. हा असं काय करतोय? माझ्या मागं का येत असावा? मी चटकन दिशा बदलली आणि उलटी फिरून घरी निघून गेले. पुन्हा दोन दिवसांनी तोच प्रकार. पुन्हा मी त्याला चुकवून घरी गेले. मंगेशला मी काही बोलले नाही. कारण प्रत्यक्षात त्यानं मला त्रास दिला नव्हता. काही दिवसांनी ते विसरून पण गेले. मधे काही दिवस गेले. आणि अचानक एक दिवस त्यानं मागून गाडी आणून माझ्यापुढं आडवी घातली. आणि मी थांबल्याबरोबर इंग्लिशमधून माझ्याशी बोलायला सुरुवात केली, "तुझं नाव काय"? मी म्हणाले, "ते मी सांगणार नाही. नाव विचारण्याचं तुला काय कारण"? तो म्हणाला, "नाही–तसं काही नाही सहजच विचारलं. पण तू रोज इथं फिरायला का येतेस?" मी म्हणाले, "डॉक्टरांनी मला तसं सांगितलं आहे. कारण मी खूप आजारी होते." तर म्हणाला, "असं का? मग गाडीत येऊन बस, मी तुला खूप फिरवून आणतो. तुला कसली आवड आहे? गाणं, म्युझिक वगैरे?". आता मला त्याचा रोख लक्षात आला. "तू कुठे राहतेस?" खरं तर मी घराच्या फार जवळ उभी होते. मग मी त्याला चांगला फैलावर घेतला, "मी कुठं राहते हे मी तुला मुळीच सांगणार नाही. तू माझ्या वाटेला जाऊ नकोस. तुला वाटलं त्या प्रकारची मी बाई नाही. पुन्हा मला त्रास देऊ नकोस." असं बोलून, त्याला माझं घर कुठं आहे हे समजू नये म्हणून उलटी फिरून मागच्या बाजूनं घरी गेले. मनात गोंधळ उडाला होता. आता हा माणूस रोज मला त्रास देणार की काय? फिरायला जाताच येणार नाही–हा कुठून तरी माझ्यावर लक्ष ठेवीत असावा–तीन मुलांची आई मी. तरुण दिसत असले तरी प्रकृतीनं खलास झाले होते. त्यामुळं मनही कमकुवत झालं होतं.

मी मंगेशला हे सर्व सांगितलं. तो जो भयंकर चिडला, "तू त्याच्याशी बोललीसच

का? त्याच्या दोन थोबाडीत का ठेवून दिल्या नाहीस? कोण आहे तो? त्याचं नाव काय? कुठून येतो? का येतो? तुझ्या जागी दुसरी कोणी बाई असती तर त्याच्या तोंडात मारल्याशिवाय राहिली नसती.'' असं बोलत राहिला. मी त्याला खूप समजावून सांगण्याचा प्रयत्न केला की, ''मी तशी भित्री बाई. एकदम एखाद्या पुरुषाच्या–ते पण तो गाडीत बसलेला–असताना, भर रस्त्यात तोंडात मारण्याची हिंमत माझ्यात नाही.'' मंगेश भयंकर अस्वस्थ झाला. त्यानं त्या कोपऱ्यावरच्या बंगल्यात फोन केला आणि विचारलं, की अशी, अशी गाडी घेऊन येणारा माणूस कोण आहे? तेव्हा कळलं की तो एक डॉक्टर आहे. मंगेशनं लगेच माझा भाऊ हरीश याला फोन केला. तेव्हा तो पोलीस सबइन्स्पेक्टर होता. मला खूप त्रास झाला. ह्याला सर्व सांगितलं, ती चूकच झाली असं वाटायला लागलं.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी हरीश आला. खूप चर्चा, बोलणी झाली. माझा भाऊ म्हणाला, ''ताई, उद्या तू फिरायला निघालीस, की तुझ्या मागून थोडं अंतर ठेवून मी चालतो. तो मला ओळखणार नाही. कुणी तरी माणूस चालला आहे. असं वाटेल त्याला. आणि मग तो आला की मी त्याला बघून घेतो.'' हरीश उंच, धिप्पाड व सशक्त होता. शिवाय पोलिस ट्रेनिंगचं उत्तम शिक्षण त्याला मिळालं होतं. त्यानं त्याला चांगलाच ठोकून काढला असता. इतक्या खलबतानंतर शेवटी असं ठरलं की सध्या काहीच करायचं नाही. माझ्या स्पष्ट बोलण्यानं तो समजला असला तर पुन्हा येणार नाही.

आणि तसंच झालं. तो माझ्यामागं पाठलाग करत नव्हता. पण कुठंतरी गाडी उभी करून मी जाईपर्यंत बघत राहायचा. नंतर तेही बंद झालं. क्वचित मी खरेदीहून येत असताना तो गाडीतून जाताना दिसायचा. शेवटी तेही बंद झालं आणि ते प्रकरण संपलं.

१९६० साली मंगेशनं ऑल इंडिया रेडिओची नोकरी सोडून दिली. सोमय्याशेठनी घाटकोपरला कॉलेज सुरू केलं होतं. ते नुकतंच बांधलं असल्यामुळं दगड, धोंडे, चिखल तुडवीत आत चालत जावं लागे. 'विद्याविहार' नावाचं नवं स्टेशन पण जवळ करून घेतलं. तिथं मंगेशला रेडिओपेक्षा जास्त पगार देऊन मराठीचा प्रोफेसर व विभागप्रमुख म्हणून बोलावून घेतलं. वर्षभर त्यानं फार आवडीनं काम केलं. मुलांमध्ये तो प्रिय झाला होता. थोडा येण्या-जाण्याचा त्रास होता. तरीही कुरकुरत का होईना पण तो मनापासून काम करायचा. दुसऱ्या वर्षी काही प्रोफेसर्सनी ते कॉलेज सोडायचं ठरवलं आणि मातोश्री मिठीबाई कॉलेजमधे नोकरी घ्यायचं ठरवलं. कारण तिथं पगार थोडा अधिक होता. त्यानं कॉलेज बदललं. तेही कॉलेज घरापासून फार लांब होतं. तिथं गेल्यानंतर लक्षात आलं की मराठीला मुलं फार कमी आहेत. त्यामुळं कॉलेजच्या मॅनेजमेंटनं शिकवण्याच्या संदर्भात काही पर्याय सुचवले. पण

मंगेशला ते मान्य झाले नाहीत. आणि वर्षभरातच ही नोकरी संपली.

एक दिवस मंगेश राजीनामा दिल्याचं सांगत आला. मला ते ऐकून मोठा धक्का बसला. तीन मुलं पदरात आहेत. ती अजून फार लहान आहेत. आता पुन्हा त्याला कुठं नोकरी मिळणार? मन फार खिन्न झालं. मंगेश पण फार अस्वस्थ झाला. झालेल्या अन्यायामुळं तो फार चिडलेला होता. पण तक्रार कुणाकडं करणार? दु:ख व संताप कवितेतून व्यक्त होऊ लागला. निसर्ग, प्रेम ह्यांत रमलेला हा कवी सामाजिक अन्यायावर कोरडे ओढू लागला. कवितेचं वळण पूर्ण बदलून गेलं. दर महिन्याचा पगार बंद झाला. संसार चालवण्यासाठी पैसे मिळवणं भाग होतं. पुन्हा अमेरिकन पुस्तकांची भाषांतरं करायला सुरुवात केली. काव्यवाचनाचे कार्यक्रम चालू होते. पण त्यांतून फारसा पैसा मिळत नव्हता.

शेवटी १९६४ साली त्यानं थोड्या खटपटीनं पुन्हा ऑल इंडिया रेडिओवर नोकरी मिळवली. त्याच वर्षी फिल्म सेन्सॉर बोर्डावर मेंबर म्हणून त्याला घेतलं गेलं. फार मोठा दिलासा मिळाला. पुन्हा आयुष्य स्थिरावलं. इतक्या वर्षांत लहान मुलांसाठी गाणी त्यानं लिहिली नव्हती. ती लिहायला सुरुवात केली. १९६४ मधे 'भोलानाथ' हे पुस्तक प्रसिद्ध झालं. आणि १९६७ मधे 'बबलगम'. दोन्ही पुस्तकांना महाराष्ट्र राज्य पारितोषिकं मिळाली. सारखं काहीतरी वेगळं नवीन लिहिण्याची त्याला आवड आहे. त्यामुळं काव्याचे प्रकार बदलत चालले होते.

रेडिओवरची नोकरी त्याला आवडायला लागली होती. तिथं असताना गाणी पण पुष्कळ लिहिली. आधी तो गाणी लिहिणार नाही असं म्हणत असे. मराठी नाटक, सिनेमा यांसाठी गाणी मागण्यासाठी आलेल्यांना 'नाही' म्हणून सांगितलं होतं. पण रेडिओसाठी मात्र भावगीतं लिहिली. १९५६ ते १९९० पर्यंत जवळ जवळ ७० ते ८० गीतं रेकॉर्ड झाली. श्रीनिवास खळे, यशवंत देव यांनी खूप सुंदर चाली लावून रेडिओवर 'आपली आवड'मधे लावायला सुरुवात केली. तेव्हा टी०व्ही० नसल्यामुळं रेडिओ जास्त प्रमाणात लावला जात असे. त्यामुळं ती लोकांच्या कानांवर पडून त्यांना प्रसिद्धी मिळाली. लता मंगेशकर, हृदयनाथ, अरुण दाते आणि नंतरच्या काळात सुरेश वाडकर, वीणा सहस्त्रबुद्धे, सुमन कल्याणपूरकर, सुधा मल्होत्रा या गायकांनी त्याची अप्रतिम गाणी गाईली. प्रतिभावंत कवींचे शब्द आणि प्रतिभावंतांचे स्वर आणि संगीत यांमुळे या गाण्यांना रसिकांचा अपूर्व प्रतिसाद मिळाला. पाठोपाठ दोन काव्यसंग्रह आले. १९६२मधे 'उत्सव' व १९६६मधे 'विदूषक' अशी त्याची पुस्तकं पाठोपाठ प्रसिद्ध झाली.

सायनची वाढ वेगानं होत होती. वस्ती मोठ्या प्रमाणावर वाढत होती. इमारती बघता बघता उभ्या राहत होत्या. शांत, निवांतपणं फिरण्याचे माझे रस्ते, वाहनांच्या गर्दीनं व माणसांच्या लोंढ्यांनी भरून वाहू लागले. घाणीनं किळसवाणं वाटू लागलं. शाळा, कॉलेजं निघाली. डी०एस० हायस्कूल निघालं. एस०आय०ई०एस० कॉलेज निघालं. तसंच सायन हॉस्पिटलच्या इमारती वाढत गेल्या. तिथं वेगवेगळ्या विभागांची

भर पडत चालली. तिथं मेडिकल कॉलेज सुरू झालं.

त्याच सुमारास श्री० पु० भागवत सायनला राहायला आले. ते एस०आय०ई०एस० मधे मराठीचे प्राध्यापक व विभागप्रमुख म्हणून आले. लायब्ररीत आणि कॉलेजच्या इतरही कामात त्यांचा मोठा सहभाग होता. त्यांच्या पत्नी विमलताई, गिरगावात ट्रेनिंग कॉलेजमधे शिकवत होत्या. त्यांचा एकच मुलगा अशोक हा डी०एस० हायस्कूल आणि नंतर एस०आय०ई०एस०मधे शिक्षण घेत होता. त्यांचं आमचं एकमेकांकडं येणं-जाणं वाढलं. मंगेशची आणि त्यांची मैत्री दृढ होत गेली. भागवतांबरोबर गप्पागोष्टी करायला मला फार आवडायचं. वाचन अफाट असल्यामुळं त्यांचं बोलणं ऐकताना समृद्ध झाल्यासारखं वाटे. इंग्लिश जुने चांगले चित्रपट, त्यांतील नटनट्या हे सर्व त्यांना ठाऊक. इंग्रजी चित्रपटांतली संभाषणं पण त्यांना पूर्ण कळत असत. क्वचित कधी इंग्रजी चित्रपटाला गेलो तर माझी त्यांच्या जवळ जागा पटकवण्याची घाई चालायची. त्यातलं काही कळलं नाही तर त्यांना विचारता येत होतं. अस्सल ब्राह्मणी जेवण जेवल्याचा आनंद विमलताईंनी केलेल्या जेवणातून मिळायचा. अजूनही मिळतो. दोघंही किती रसिक, अभिरुचिसंपन्न आहेत ते त्यांच्या घरात गेल्याबरोबर लक्षात येतं.

अजित चौथीपर्यंत सायनच्या शिशुविकास शाळेत शिकला. त्याला मनापासून शाळेत जायला आवडायचं नाही. घराबाहेर जाऊन इतर मुलांत खेळायला पण नकोच असायचं. घरी असला तर सर्व वेळ माझ्या मागं मागं असायचा. कंटाळा आला की येऊन विचारायचा, "आई, आता मी काय करू?" मग मी सांगायची, "अरे, तू चित्र काढ, चित्र रंगव, गोष्टींचं पुस्तक वाच." असं सांगून त्याचं मन रमवायची.

अजित चवथी पास झाल्यावर मंगेशनं त्याच्यासाठी त्याला दादा रेगे यांच्या 'बालमोहन' शाळेत पाचवीच्या वर्गात प्रवेश घेतला. त्यांची स्कूल बस सायनला येत नसे. दहा-अकरा वर्षांच्या अजितला बेस्टच्या बसनं पाठवायचं ठरलं. आता आहे तेवढी तेव्हा बसला गर्दी नसायची. पण सायनहून शिवाजीपार्कला शाळेत जाणारी मुलंही सोबतीला नव्हती. तो जेवून, दुपारचा डबा घेऊन जायचा. संध्याकाळी तो घरी येण्याच्या वेळी मी हॉलच्या खिडकीतून त्याची वाट बघत उभी राहायची. त्याची फार काळजी वाटायची. शनिवारी सकाळची शाळा असायची. सकाळी उठून शाळेत जायला त्याला मुळीच आवडत नसे. किती उठवलं तरी तो उठत नसे. "मी जात नाही" म्हणून सांगायचा. शाळेत पण, 'शनिवारी शाळेत न येणारा मुलगा' म्हणून तो प्रसिद्ध झाला होता. जुने शिक्षक त्याची अजूनही आठवण काढतात.

तो एस०एस०सी० झाल्यावर सायनच्या एस०आय०ई०एस० कॉलेजमधे जाऊ लागला. तिथं विष्णुपंत भागवतांचा मुलगा श्रीकांत त्याच्या वर्गात होता. दोघांची चांगली मैत्री झाली. पिरियड बुडवून ते मॅटिनीला 'रूपम' थिएटरला जायचे. पण हे मला मात्र कळत नसे. त्याच काळात अजित सिगारेट ओढायला शिकला. त्याचा

मला संशय आलाच होता. एक दिवस अभय धावत धावत वर आला. घाबरून मला सांगायला लागला की, "आई, दादा ना, तिकडं रस्त्यावर सिगरेट ओढत उभा आहे."

इंटरनंतर त्याला मेडिकलला जाण्याची इच्छा होती. पण टोटलमुळं मुंबईत ॲडमिशन मिळू शकली नाही. म्हणून त्याला कालिनाला बी०फार्म०ला घातलं. तो काही मनापासून कॉलेजला जात नव्हता. अभ्यास करत नव्हता. डोक्यात मेडिकलच घेऊन बसला होता. म्हणून बी०फार्म०चं एक वर्ष उत्तीर्ण झाल्यावर आम्ही पुन्हा त्याच्या मेडिकलच्या खटपटीला लागलो. थोड्या प्रयत्नांनी त्याला सोलापूरला 'वैशंपायन' मेडिकल कॉलेजमधे ॲडमिशन मिळाली. सर्व काही त्याच्या मनासारखं झालं. आम्ही मात्र काळजीत पडलो. त्याचा मेडिकल कॉलेजचा खर्च, हॉस्टेलचा-मेसचा खर्च व येण्या-जाण्याचा प्रवासखर्च हे सगळं कसं झेपणार? घरात आम्ही दोघं व आणखी अंजू व अभय शिकत होते. घरकामासाठी ठेवलेल्या शांताबाई होत्या. इतका खर्च रेडिओच्या पगारात कसा भागणार? आम्ही दोघं रात्री गच्चीत फेऱ्या मारता मारता विचार करत होतो. आणखी काटकसरीनं संसार केला पाहिजे. तो मोठा मुलगा आहे. तो आधी नीट शिकलाच पाहिजे हे कळत होतं. सगळे आव आणता येतात पण पैशांचा आव आणता येत नाही. तरी अजितची तयारी सुरू झाली. कपडे, बिछाना, गरम पांघरुणं, स्वेटर, इत्यादी अगदी जरुरीपुरतं सामान घेतलं आणि आम्ही दोघं त्याला घेऊन सोलापूरला गेलो. मेडिकल कॉलेजच्या शेजारीच, डिस्ट्रिक्ट जज्ज आठल्ये यांचा बंगला होता. मंगेशनं त्यांना कळवलं होतं. मंगेशवर ते फार प्रेम करायचे. त्यांच्या पत्नी इंदुताई फार प्रेमळ व उत्साही. दोघांनी आमचं फार जोमानं स्वागत केलं. अजितला हॉस्टेलवर सोडलं. आम्ही त्यांच्या बंगल्यावर राहिलो. मला रॅगिंगची भयंकर भीती वाटत होती. पेपरमधे कुठं कुठं झालेल्या रॅगिंगच्या बातम्या वाचून धडकी भरली होती. सोलापूरला जाण्याच्या आधीपासून मला डिसेंट्री झालेली होती. कोणाला न सांगता तशीच दिवस काढत होते. श्री० आठल्ये यांनी आमच्या स्वागतार्थ सर्व मेडिकल कॉलेजच्या स्टाफला पार्टी द्यायचं ठरवलं. इंदूताईंनी फार श्रम घेऊन तऱ्हतऱ्हेचे पदार्थ मोठ्या प्रमाणात तयार करून बूफे मांडला. संध्याकाळी सर्व स्टाफ आला. भरपूर खाऊन, चहा-कॉफी घेऊन लोक गेले. ते सर्व पाहून आम्ही अचंबित झालो व भारावून गेलो. दुसऱ्या दिवशी ते सांगत होते की फिरून या–तुळजापूरला जाऊन या. पण अजितला सोडून जायचं या कल्पनेनं माझं मन खिन्न व उदास झालं होतं. त्याला इतर मोठी मुलं त्रास देतील, रॅगिंग करतील म्हणून, नाही नाही ते विचार मनात येत होते. मंगेशचीही फारशी इच्छा दिसली नाही. मग आम्ही कुठं तुळजापूरकडं वगैरे गेलो नाही. तिसऱ्या दिवशी रात्रीच्या गाडीनं आम्ही परत जायला निघालो. बंगल्यासमोर सर्वांना निरोप देताना अजित पण आला होता. इतका वेळ कोंडून ठेवलेले अश्रू आता आवरेनात. सर्वांसमोरच मी रडायला सुरुवात केली. राम पुजारी व त्यांची पत्नी सुहासिनी हे पण

तिथं होते. ते सोलापूरचेच. तिथं ते फार लोकप्रिय आहेत. संगीताचं त्यांचं ज्ञान व आवड आश्चर्यकारक आहे. त्यांनी पण माझी खूप समजूत घातली. ''आम्ही सर्व इथं आहोत. तू काळजी करू नकोस.'' पण तो अश्रूंचा महापूर आवरण्यापलिकडं गेला होता. रडतच स्टेशनवर जाऊन गाडीत बसले. गाडी सुरू झाली. किती तरी वेळ झाला तरी रडणं थांबेना. तेव्हा मंगेश म्हणाला, ''अग, तू अशी रडत राहिलीस तर लोकांना वाटेल की मीच तुला काहीतरी केलं आहे! आता गप्प रहा आणि रडणं थांबव.''

सकाळी घरी पोचलो. माझ्या शरीरात हालचाल करण्याचं त्राण शिल्लक राहिलं नव्हतं. अजितच्या रिकाम्या खाटेवर जाऊन जी पडले ती मी पंधरा दिवस ती खाट सोडली नाही. आधीच डिसेंट्री–त्यांत मुलगा शिकायला दूर गेल्याचं दुःख माझ्या सहनशक्तीपलिकडं गेलं. पुन्हा सावरायला फार वेळ लागला.

पैशांच्या विवंचनेत असतानाच एक दिवस, सुनीता देशपांडे यांचा मंगेशला फोन आला. 'युसिस'मधे प्रेस सेक्शनमधील मराठी संपादकाची जागा रिकामी झाली आहे. तुम्ही तिथं लवकर अर्ज करा. ऑल इंडिया रेडिओवर सुरवातीला पु०ल०देशपांडे पण मंगेशबरोबर नोकरीला होते. नंतर ते पण सोडून गेले. रेडिओचं काम मंगेशला फार आवडायचं. पण पगार अगदी मोजका होता. ती नोकरी सोडायला त्याचं मन सहजासहजी तयार होईना. त्यातून युसिस म्हणजे तिथं अमेरिकन अधिकारी. त्यांचे उच्चार व बोलणं कळलं नाही तर उत्तर काय देणार? तो मनातून घाबरला होता. मी म्हणाले, ''हे बघ, तू महाराष्ट्रातला प्रसिद्ध कवी आहेस. उत्तम शिक्षण व दोन सुवर्णपदकं तुला मिळाली आहेत. तुला मराठी विभागातच काम करायचं आहे. त्यांच्या भाषेचा सराव आपोआप होईलच. तुझ्या आवडीचं काम तू सोडून जाणार. तेव्हा इंटरव्ह्यूला पगार चांगला दोन हजार मागून घे. काही कमीपणा वाटण्याचं कारण नाही. सध्या आपल्याला पैशांची फार जरूर आहे. अजितला दर महिन्याला पैसे पाठवावे लागतील. रेडिओवर पगार वाढण्याची शक्यताच नाही.'' इंटरव्ह्यू झाला व ती नोकरी त्याला मिळाली. फक्त एकदम दोन हजार न ठरवता १७०० रुपये सुरवातीला देऊन नंतर वाढत वाढत गेला. त्यानंतर बरीच वर्षं 'टू थावजंड' हा आमच्या घरात विनोदी आकडा झाला होता. अजूनही आठवण झाली की मंगेश 'टू थावजंड' म्हणतो आणि आम्ही सर्व जण हसतो.

युसिसमधे जागा रिकामी झाली आहे ही बातमी एरवी आम्हांला समजलीसुद्धा नसती. समजली असती तरी मंगेशनं तिथं अर्ज करावा ही कल्पना पण मनात आली नसती. ह्या सर्वाला सुनीता कारणीभूत आहे. तिच्यामुळं आमच्या जीवनाला एक फार मोठी कलाटणी मिळाली. गेली वीस-एकवीस वर्षं पैशांच्या काळजीत असणाऱ्या आम्हांला तीतून कायमचं मुक्त केलं. मंगेशचं वय तेव्हा ४२ झालं होतं. सुनीतानं

आमच्याविषयी ही जी आत्मीयता दाखवली ती आम्हां दोघांना आयुष्यभर विसरता येणार नाही.

मंगेशची नवी नोकरी सुरू झाली. आणि डिसेंट्रीच्या जंतूंनी माझ्या लिव्हरमधे प्रवेश केला. पुन्हा माझ्या तक्रारी वाढू लागल्या. पहिल्याच दिवाळीत मला जे०जे० हॉस्पिटलला ॲडमिट करावं लागलं. डॉक्टर करंदीकर डीन होते. त्यांनी सर्व मदत केली आणि डॉक्टर लेले हे उपचार करत होते.

दिवाळीत अजित पहिल्यांदाच घरी आला. आणि मी घरात नाही बघून हिरमुसला झाला. मला भेटायला आला. "घरात तू नाहीस तर अगदी कंटाळा येतो." म्हणाला. माझ्या शरीराचे हाल संपत नव्हते. कॉन्स्टिपेशन होऊन फिशर झाला. तो भयंकर दुखायला लागला. असह्य वेदना सहन करून हैराण झाले. डिसेंट्रीसाठी 'इमिटीन'ची दहा इंजेक्शनं घ्यावी लागली. ती इंजेक्शनं हार्टवर परिणाम करतात म्हणून ती घेत असताना झोपून राहायला सांगितलं होतं. माझ्या हार्टवर परिणाम झाला नाही. पण आतड्यांची नैसर्गिक हालचाल होईनाशी झाली. लवचीकपणा कमी झाला. दिवस पुढं जातच राहिले. ते माझ्यासाठी थांबणार नव्हते. अजित प्रत्येक सुट्टीत घरी यायचा. येताना बरोबर मित्र असायचे. डॉक्टर माधव बोऱ्हाटे, डॉक्टर सुरेश जोशी, डॉक्टर विश्वास राऊत. तेव्हा हे सर्व विद्यार्थी होते. आमच्याकडं एक दोन दिवस मुक्काम करायचे. मुंबईत फिरायचे, चित्रपट बघायचे, हॉटेलात जायचे–असे त्यांचे कार्यक्रम आनंदात पार पडायचे. अंजू व मी त्यांची सर्व व्यवस्था बघत होतो. सोलापूरची गाडी पहाटे यायची. त्या रात्री दारावरच्या बेलकडं कान लागलेले असायचे. शांताबाईंची खूप मदत व्हायची. त्या माझ्याकडं टिकून राहिल्या होत्या. असं अजितचं शिक्षण चालू राहिलं.

अंजलीला बालमोहन शाळेत न घालता डी०एस० हायस्कूलमधे घातलं होतं. ती शाळा सायनला आमच्या घरापासून चालत जाण्याच्या अंतरावर आहे. मंगेश म्हणाला, "ती मुलगी आहे. तिला इतक्या लांब येण्या-जाण्याचा त्रास नको." तिला खेळांची फार आवड होती. शाळेतर्फे खेळात भाग घेऊन तिनं पुष्कळ सर्टिफिकेटं मिळवली. ती मोठी होऊ लागली तशी फार सुंदर दिसायला लागली. मुळात रंग गोरापान, उंची पाच फूट, पाच इंच आणि केस तर दृष्ट लागावे असे, मांडीपर्यंत लांब. केस मोकळे सोडले म्हणजे पिसाऱ्यासारखे सुंदर, लांब व सोनेरी दिसायचे. वयानुसार नटण्याची आवड पण निर्माण झाली. अंगलट बारीक व नाजूक. लहानपणी सात वर्षांची असताना तिला कावीळ झाली होती. खूप त्रास झाला हाता. अंगावर हाताएवढाल्या मोठ्या गांधी यायच्या. खाज यायची. पुष्कळ उपाय करावे लागले. ऑटोब्लड देऊन पाहिलं. सांताक्रूझच्या डॉक्टर अवसरे यांच्याकडं तिला नेत होतो. नंतर ती बरी झाली. पण प्रकृती नाजूकच राहिली.

तिला मैत्रिणी खूप. ती खाली खेळायला जायची, मैत्रिणींच्या घरी जायची.

डॉक्टर श्रीखंडे यांची मुलगी नंदू हिच्याकडं पण खूप वेळा जायची. दोघीही तरुण झाल्या होत्या. बोलायला विषय खूप होते. एकदा नंदू आमच्या घरी आली आणि तिनं अंजूला स्वत:च्या पोटात गाठ आली असल्याचं सांगितलं. कदाचित किडनी स्टोन असेल असं डॉक्टर म्हणत होते. पण आणखी तपासण्या केल्यावर नक्की कळेल. मला म्हणाली, "बघा ना तुम्ही पोटाला हात लावून–बाहेरूनसुद्धा हाताला लागते." तिनं दाखवलेल्या जागी मी बोटांनी दाबून पाहिलं. अगदी सहजपणं ती गाठ हाताला लागत होती. लवकरच तिचं टाटा हॉस्पिटलमधे ऑपरेशन झालं. आणि अतिशय वाईट बातमी समजली की तो कॅन्सर आहे. जास्त पसरल्यामुळं पूर्ण काढणं शक्य झालं नाही. ऑपरेशनच्या वेळी त्यांना घरी जेवण पाठवणं वगैरे जी काही मदत करता आली ती मी करत होते. कॅन्सर झाला हे ऐकून आम्ही पण हबकून गेलो. नंदूला घरी आणलं. तिचा घरात वेळ जाईना म्हणून ती वरचेवर अंजूला बोलावून घ्यायची. मला ते फारसं आवडत नसे. कारण पंधरा, सोळा वर्षांच्या मुलीनं रोज दुखणी, आजारपण, डॉक्टर, औषधं, ट्रीटमेंट, त्यांचे परिणाम, ह्या गोष्टी ऐकाव्यात हे त्या अंजूच्या हळव्या वयात मला बरोबर वाटेना. पण तिला तिथं जाऊ नको असंही सांगवेना. कशी तरी दोन वर्ष गेली आणि नंदूला डोळ्यांनी नीट दिसेना, डोकं दुखणं, केमोथेरपीनं केस गळणं वगैरे त्रास सुरू झाले. तो कॅन्सर त्या तरण्याताठ्या सुंदर मुलीच्या मेंदूपर्यंत पोचला. हे तिचे हाल बघणं अंजूला फार त्रासदायक होत होतं. ती वर येऊन मला सांगायची. दु:खी व्हायची. आणि एक दिवस आज नंदूला फार त्रास होत असल्याचं अंजू सांगत आली. मी खाली गेले. तिच्या जवळ बसले. ती पाय फार दुखतात म्हणून सारखे आपटत होती. तिच्या पोटऱ्यांना मम्मीनं दिलेलं तेल लावून दिलं. तिला खाली झोपवलं होतं. आक्का उशाकडं बसून होत्या. मम्मीचं त्याही परिस्थितीतलं धीराचं वागणं बघून आश्चर्य वाटत होतं. त्या तिची नाडी बघत होत्या. डॉक्टर अरविंद बावडेकर त्यांचे नातेवाईक. त्यांना फोन केला. मी थोडा वेळ वर आले आणि दहा पंधरा मिनिटांत नंदू गेल्याचा निरोप आला.

तिचे वडील मुकुंदराव आधीच वारले होते. सुलभाबाईंना स्वत: डॉक्टर असूनही शोकांतिका एकटीला सोसावी लागली. हृदय हेलावून सोडणारी ही घटना होती. एक आई आपल्या मुलीचं मृत्यूकडं नेणारं आजारपण, आपलं काम, कर्तव्य न सोडता चार-पांच वर्षं कसं काढू शकते हे आम्ही आमच्या डोळ्यांनी पाहिलं आहे. ह्याच घटनेवर आधारित असं 'अखेरचा सवाल' हे नाटक वसंत कानेटकर यांनी लिहिलं आहे. कानेटकर पण त्यांचे नातेवाईक. मुकुंदरावांची धाकटी बहीण सुधा हिचं लग्न कानेटकरांशी झालं आहे.

अंजूला हे दु:ख पचवणं फार जड गेलं. अशा दु:खावर 'काळ हेच औषध' म्हणतात ते खरं. एस०एस०सी० झाल्यावर मंगेशनं ठरवलं की तिला एस०एन०डी०टी० कॉलेजमधे घालायचं. ती शाळेत असताना माझी फार इच्छा होती की तिला नाच शिकवावा. माझ्या ह्या बोलण्याकडं मंगेशनं अर्थातच दुर्लक्ष केलं. "कलेचं क्षेत्र फार

धोक्याचं असतं. तिच्या अंगात कला असेल तर ती आपोआपच वर येईल. मी स्वत: तिला तिथं जाऊ देणार नाही.'' हे त्याचं म्हणणं मला पटत नव्हतं. शाळकरी वयात शिकवायला जर बाई असेल तर तिथं धोका कसला? आयुष्यभर काही ती नाचणार नाही. नाचाचं, गाण्याचं किंवा एखादं वाद्य वाजवण्याचं प्राथमिक ज्ञान जर मुलांना लहानपणी, शास्त्रोक्तपद्धतीनं दिलं तर पुढच्या आयुष्यात आपल्या आवडीचा छंद जोपासायला, विरंगुळा म्हणून त्याचा उपयोग होतो असं मला वाटायचं. हे मी त्याला खूप सांगून पाहिलं पण त्याला पटलं नाही.

तसंच मंगेश रेडिओवर काम करत असताना, 'गंमत जंमत' कार्यक्रमात तिनं भाग घ्यावा असं मला वाटायचं. शाळेच्या नाटकात किंवा नाचाच्या कार्यक्रमात ती भाग घेत असे. रेडिओवर तिला नेणं मंगेशला सहज शक्य होतं. पण तेही त्यानं ऐकलं नाही. ''माझी मुलगी आहे म्हणून तिला घ्या असं मी तिथं जाऊन सांगणार नाही.'' असं त्याचं म्हणणं. मी म्हणाले, ''तसं जाऊन सांगण्याची काही जरूर नाही. अर्ज करून तिला जाऊ दे. त्यांना पसंत असेल तर घेतील. नाहीतर नाही म्हणून सांगतील.'' तेही शक्य झालं नाही. त्याच्या ह्या स्वभावामुळं, शाळा आणि अभ्यास ह्यांशिवाय वेगळं असं मुलांना काही शिकवता आलं नाही.

एस०एन०डी०टी० कॉलेज फक्त मुलींचं आहे आणि ते युसिसच्या म्हणजे त्याच्या ऑफिसच्या जवळ आहे. शिवाय मराठीतून शिक्षण घेणं सोपं पडेल. ह्या विचारानं ते कॉलेज निवडलं. रोज आगगाडीनं तिला इतक्या लांब पाठवायचं मला जरा धोक्याचं वाटत होतं. लांबची शाळा नको म्हणून डी०एस०मधे घातलं. आता एकदम इतक्या लांब पाठवायला हा कसा तयार झाला असा प्रश्न मला पडला.

अंजू वृत्तीनं खेळकर व आनंदी. मैत्रिणी तिला अतिशय आवडायच्या. तिला बघून मला खूप समाधान वाटायचं. मंगेशला पण ती फार आवडायची. सुंदर कपडे घालून फुलपाखरासारखी ती भिरभिरत असायची. बडबडत असायची. हसत असायची. माझ्या चपला, अंगठ्या, वेळप्रसंगी साड्या-दागिने घालून मिरवून यायची. ते बघणं किती सुखाचं होतं! तिन्ही मुलं एकत्र बसून खेळत, रेडिओवरची गाणी ऐकत, गप्पा-चर्चा-वादविवाद करत. आनंदात असायची. क्वचित भांडतसुद्धा. भांडण झाल्यावर मात्र मी, कोणी काय केलं हे ऐकून घेत नसे. कारण ते कोडं सोडवणं अवघड असायचं. म्हणून फारशी चौकशी न करता, दोघांनाही एक एक फटका मारून निघून जायचं. त्यामुळं भांडण आणखी पुढं जात नसे. मी त्यांना सांगत असे, ''हाच तुमचा सर्वांत आनंदाचा काळ आहे. काळजी घ्यायला आईवडील आहेत. तिन्ही भावंडं एकत्र आहांत. जमेल तेवढी मौजमजा करता. उद्या प्रत्येक जण आपापल्या वाटेनं निघून जाल. हे दिवस पुन्हा येणार नाहीत.'' त्यांना मी काय बोलते ते कळत होतं की नाही ठाऊक नाही. आता ते आठवतं की नाही हेही ठाऊक नाही. पण तिघं तीन दिशांना आहेत. त्यांनी न भांडता, प्रेमानं राहावं ह्यातच माझ्या जीवनाचं सार्थक आहे. त्यांच्यावर उत्तम संस्कार करण्याचं ते वय होतं. वेळोवेळी मी ते करत होते.

प्रसंगानुरूप या वास्तवाची आठवण करून देत होते आणि स्वत: प्रामाणिकपणं, न्यायाला धरून खरेपणानं वागून, शिस्तीनं कामं करून उदाहरण घालून देत होते.

मला लहानपणापासून गाणी म्हणण्याची अतिशय आवड. आवाज तसा बेताचाच तरी गात राहायचं. सबंध दिवस माझं गाणं–म्हणजे घरात–चालू असायचं. मंगेश माझी नक्कल करून खूप चिडवायचा. तरी मी गायची. मी कुठली गाणी म्हणत होते ते अजून अंजूला आठवतं. तीच सवय अंजूला लागली. सर्व आवडीच्या गाण्यांच्या तिनं कॅसेट्स करून घेतल्यात. त्या गाडीत लावून त्याबरोबर स्वत: गाणी म्हणत राहायचं हा तिचा आवडीचा छंद. रोज रूपकला शाळेत सोडायला सकाळीच ती गाडी घेऊन बाहेर पडते. मराठी नवी, जुनी गाणी कॅसेटवर लावून ठेवते. मला सांगते की, "आई, आम्ही मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घातलं आहे. त्यांनी ही मराठी गाणी ऐकावीत, ती ऐकून ऐकून पाठ व्हावीत. त्यांतलं संगीत, शब्द त्यांच्या परिचयाचे व्हावेत असं मला वाटतं–त्यांतला आनंद त्यांना घेता आला पाहिजे. ती ऐकताना मलाही आनंद होतो. मी पण त्याबरोबर गाते." ते सर्व जण गाडीत असले, दिलीप ड्रायव्हिंग करत असला तर दिलीप, रैना, अंजू, रूपक सगळेच गाऊ लागतात. सर्व गाडीच गाऊ लागते. वातावरण संगीतमय होतं आणि आपल्याला एका वेगळ्याच विश्वात नेतं. मग मीही गाऊ लागते.

अजित, अंजू, अभय लहान असताना त्यांना घेऊन आम्ही खारला वसंत बापट व नलूताई यांच्याकडं जात होतो. बापटांना लहान मुलं विशेष आवडायची. त्यात विशेषत: लहान मुलींचे ते फार लाड करायचे. मुलांना ते सांगायचे, "हे पहा मी खारचा राजा आहे. माझ्या महालात चॉकलेटच्या भिंती आहेत. आइस्क्रीमचे खांब आहेत. पेपरमिंटचे दिवे व टॉफीच्या खिडक्या आहेत. तुम्ही येणार का माझ्या महालात?" त्या बालवयात ही कल्पना मुलांना खरीच वाटायची. आणि तसा महाल डोळ्यांसमोर आणायचा प्रयत्न करायची. हा 'खारचा राजा' त्यांना अगदी आवडायचा. बापट कधी सायनला आले तर, ओरडत मला येऊन सांगायची की, "आई, आई खारचा राजा आला. खारचा राजा आला."

मोठी होऊन अंजू कॉलेजला जायला लागली तरी, तिला जवळ घेऊन ते तिचे तसेच लाड करायचे. तिच्या कॉलेजजवळच मंगेशचं ऑफिस असल्यामुळं तिला पुष्कळदा रस्त्यात बाबा दिसायचे. तिला वाटायचं की ते जवळ आले की आपल्याशी बोलतील. पण तो त्याच्याच तंद्रीत असायचा. ह्या मुलींच्या घोळक्याकडं न बघता तसाच पुढं निघून जायचा. तिला फार वाईट वाटायचं. मुलींच्यासमोर अपमान झाल्यासारखं वाटायचं. ती घरी आल्यावर मला सांगायची, "आई, बघ ना बाबा कसे आहेत! आज माझ्या समोरून गेले पण माझ्याकडं पाहिलं नाही की माझ्याशी बोलले नाहीत." मग मी मंगेशला विचारायची, "असं का करतोस? बोलत का नाही तिच्याशी?" तो म्हणायचा, "माझं लक्ष नव्हतं. मी तिला पाहिलंच नाही."

त्याच वयात तिच्यासाठी त्यानं, 'दिवस तुझे हे फुलायचे, झोपाळ्यावाचून

झुलायचे' हे अतिशय सुंदर व समर्पक गाणं लिहिलं. हे गाणं आपल्यावर आणि आपल्यासाठी लिहिलं याचा तिला मोठा अभिमान. असं भाग्य किती जणींच्या वाट्याला येतं?

कॉलेजचं दुसरं वर्ष संपून ती बी०ए०ला गेली. तिला 'सोशॉलॉजी' व सायकॉलॉजी घ्यावं लागलं. तिनं पूर्ण सोशॉलॉजी घेऊन ग्रॅज्युएशन करावं अशी माझी इच्छा होती. पण त्या वेळी तसा विषय घेण्याची सोय नव्हती. इंग्लिश विषय पण आवश्यक होता. ती आणि तिची मैत्रीण, सुधा क्षीरसागर. सुधा आमच्या समोरच्याच बिल्डिंगमधे राहायची. दोघी मिळून अभ्यास करायच्या. भटकायच्या–गप्पा मारायच्या. दसऱ्याला रावणदहन बघायला सुधाच्या घरच्या माणसांबरोबर शिवाजीपार्कला जायच्या. गच्चीत गेलं की सुधा समोर दिसायची. "ए, ये ना ग." असं म्हटल्याबरोबर ही चपला घालून लगोलग खाली उतरायची. अजितला तेव्हा फोटो काढायचा छंद जडला होता. मी त्याच्यासाठी नरेश मंत्रीकडून जपानहून कॅमेरा मागवला होता. एक 'टू इन वन' पण मागवला होता. अजित तिचे खूप फोटो काढायचा. फोटो काढताना वेगवेगळे प्रयोग करून पाहायचा. ते सर्व फोटो मी अल्बममधे लावून ठेवले आहेत. नंदू लोखंडे, पद्मा लोकूर यांची मुलगी गीता हिचे पण फोटो त्यानं काढले आहेत. वंदना गुप्ते–तेव्हाची वंदना वर्मा–ही तिच्या वर्गात होती. ती अभ्यासासाठी आठ दिवस सायनला येऊन राहिली होती. तिला तळलेली कोळंबी फार आवडायची. अजूनही आवडते. ती मला आई म्हणते. भेटली की कडकडून मिठी मारते. आता ती प्रसिद्ध नटी झाली तरी, "कोळंबी खायला कधी येऊ?" असं विचारते.

सुधा व अंजू यांचा इंग्लिशचा अभ्यास नीट झाला नव्हता. मंगेशला मी सांगितलं त्यांना जरा शिकव. परीक्षेच्या आधी थोडे दिवस त्यानं त्यांना शिकवलं. आणि, "मी शिकवलं म्हणून पास झालांत." असं विनोदानं म्हणून सर्वच श्रेय उपटलं.

तशीच मीना कानिटकर. ती डॉक्टर मिसेस कानिटकरांची मुलगी. त्या सायन हॉस्पिटलमधे गायनॅकॉलॉजिस्ट होत्या. मीनाला वाचनाची आवड होती. ती वेळ असेल तेव्हा आमच्या घरी यायची. पुस्तकं पुष्कळ होती. ती घेऊन वाचत बसायची. कधी मुलांबरोबर घरातच, 'डब्बा ऐसपैस' खेळायची. खेळताना मुलं सगळं सामान हलवून टाकायची. पसारा करायची. तरी अंजूची आई ओरडत कशी नाही, याचं तिला आश्चर्य वाटायचं. ती घरी जाऊन तिच्या आईला सांगायची. अजूनही त्याची आठवण काढते. मी कधी पुण्याला गेले तर माधव व मीना मला फार आवडीनं जेवायला मोठ्या हॉटेलात नेतात आणि जुन्या आठवणी काढतात. ती पुढं एम०डी० झाली. आणि अजितचा मित्र माधव बोऱ्हाटे याच्याशी तिनं प्रेमविवाह केला.

माझा भाऊ हरीश व उषावहिनी यांना प्रवासाची फार आवड होती. त्यांना तीन मुलं : राजशेखर, निरंजन व हेमंत. ते जवळपास कुठं सहलीला जाणार असले तर

मला विचारत. "तुला मुलांना घेऊन यायचं तर ये" म्हणत. कधी विहार लेक, कार्ला. तर कधी जरा लांब : माथेरान, महाबळेश्वर, पाचगणी. खर्च ज्याचा त्यानं करायचा. आमची देखभाल करण्याची आणि नेण्या-आणण्याची जबाबदारी त्याची असे. ती तो उत्तम रीतीनं पार पाडत असे. माझी मुलं जरा लहान असली तरी ती सगळी आनंदानं खूप मजा करायची. खाणं, फिरणं, फोटो काढणं, विनोद करणं असं चालायचं. मंगेश सहसा आमच्यात नसायचा. मुलांसाठी खर्चाचे पैसे द्यायचा. स्वत:च्या जबाबदारीवर असे कार्यक्रम आखणं त्याला शक्य होत नसे. प्रवासाला जायचं म्हटलं की तो एकदम कावराबावरा होतो. घाबरल्यासारखं करतो. काळजी करत राहतो. चांगले विचार येण्याऐवजी वाईटच विचार त्याच्या मनात आधी येतात. सामानच जास्त घेतलं, टॅक्सी मिळणार नाही, गाडी चुकेल, डब्यात चढायलाच मिळणार नाही अशा विचारांनी तो हैराण झालेला असतो. स्वत:च्या व इतरांच्या काळजीमुळं हे घडत असणार. पण पुष्कळ वेळा मला त्याची कीव येते. प्रवासाचा आनंद, मौज तो घेऊ शकत नाही. सोबत असलेल्या माणसांच्या मनावरचा ताण वाढतो. काही सांगायचा, समजवायचा प्रयत्न केला तर ते आवडत नाही. तो वाटेल त्या ठिकाणी एकदम चिडतो आणि मोठ्यानं आवाज काढून सर्वांपुढं अपमान करतो. जबाबदारी घेणारा, माहिती असणारा दुसरा कोणी बरोबर असेल तर मात्र तो शांत असतो. त्यामुळं आम्ही दोघांनी मुलांना घेऊन फारसा प्रवास केलेला नाही. हरीशमुळं काही ठिकाणी त्यांना मजेनं नेता आलं.

खरं पाहिलं तर मंगेशनं कार्यक्रमांच्या निमित्तानं खूप प्रवास केला आहे. कधी बापट, करंदीकर यांच्याबरोबर तर कधी एकट्यानं. तरीसुद्धा अजूनही घरातून सामान भरून निघेपर्यंत त्याची उलघाल चालू असते. स्वत:च्या कपड्यांच्या घड्या करता येत नाहीत. खूप प्रयत्न करूनही त्याला ते जमत नाही. बऱ्याच वर्षांपर्यंत मी त्याची बॅग भरून देत असे आणि आल्यावर रिकामी करत असे.

मला बरोबर घेऊन जायचं असलं तर आधी तीन दिवसांपासून सूचना द्यायला सुरुवात होते. जसजसा जाण्याचा दिवस जवळ येतो. तसतशी त्याची अस्वस्थता वाढत जाते. मला मात्र पंचवीस वर्षांच्या तरुणीसारखं नुसतं, लवलवत राहावं लागतं. सव्वा ते दीड तास आधी, आम्ही दादर स्टेशनवर जायला निघतो. गाडी येण्याच्या आधी एक तास सामानाजवळ उभे राहतो. आधीची धावाधावी आणि एक तास दोन पायांवर उभे राहिल्यामुळं मी प्रवासाच्या आधीच थकून गेलेली असते. मनावरच्या ताणामुळं अर्धा उत्साह कमी झालेला असतो. तरी घरात राहून कंटाळल्यामुळं आणि प्रवासाला जाण्याची आवड असल्यामुळं मी त्याच्याबरोबर जात राहते.

मंगेशच्या आईला ज्योतिषशास्त्राची आवड होती. भविष्य सांगणारा कोणी भेटला की ह्या मुलांच्या पत्रिका दाखववायच्या. साडेसाती, रास, लग्न ह्याची त्यांना स्वत:ला माहिती होती. तसंच त्यांच्या नणंदेचा मुलगा (पुरुषोत्तम लाडांचा भाऊ), मधुकर

लाड हे तर फारच हुशार व त्या विषयावर प्रभुत्व असणारे समजले जात. रेडिओवर नोकरीला असताना मंगेशला ज्योतिषाचा अभ्यास करण्याची जबरदस्त इच्छा झाली. त्यानं मधू लाड यांच्याकडून व इतर ठिकाणाहून पुस्तकं जमा केली. घरातच वाचन व अभ्यास सुरू केला. लाडांकडं जाऊन चर्चा करायच्या. त्यांच्याकडून आणखी माहिती मिळवायची. स्वत:च्या विचारानं व बुद्धीनं निर्णय घ्यायचे. असं सतत दोन वर्षं चालू होतं. इतकं की दोन वर्षं काव्यलेखन मागं पडलं. पुढं त्यानं त्या विषयात इतकं प्रावीण्य मिळवलं की, लाड स्वत:च त्याला शंका विचारू लागले. ह्याला हे ज्ञान प्राप्त झालं आहे हे त्यांनी मान्य केलं.

पण प्रत्यक्ष रोजच्या व्यवहारात किंवा मुलांच्या संदर्भात पत्रिका पाहून निर्णय घेतले नाहीत. माझी तर पत्रिकाच नव्हती. सासूबाईंनी माझ्या आईला दिवस, वेळ, तारीख विचारून पत्रिका तयार करून घेतली. त्यामुळं मला पण उत्सुकता वाटायला लागली. पण मंगेशनं कधी नीट काही सांगितलं नाही. फक्त विनोदानं तुझा नवरा ग्रेट आणि तुझी मुलं ग्रेट एवढंच सांगायचा. एक वाक्य मात्र पुष्कळदा सांगितलं की, "तू ज्या कुणाशी लग्न केलं असतंस, तो माणूस मानमान्यता पावून प्रसिद्ध झाला असता." म्हणजे मला प्रसिद्ध नवरा मिळणार हे माझ्या पत्रिकेत किंवा माझ्या नशिबातच होतं तर?

अंजू बी०ए० झाल्यावर आम्ही तिच्या लग्नाच्या खटपटीला लागलो. मी ख्रिश्चन असल्यामुळं तिच्या लग्नात थोडी अडचण येणार हे धरून चाललो होतो. काही साहित्यिकांनी माझ्या धर्माचा विचार न करता, स्वत:च्या मुलांसाठी तिला मागणी घातली होती. पण वयातलं मोठं अंतर, उंची, शिक्षण वगैरे गोष्टी न जुळल्यामुळं त्यांना "हो" म्हणता आलं नाही. मंगेशला मुलगा हिंदू आणि शक्यतो सारस्वतच असायला हवा होता. तिनं प्रेमविवाह केला असता तर हा विचार करण्याची जरूर पडली नसती. पण तसं झालं नाही. काही मुलं तिला भेटायला, बोलायला बोलवीत होती. मी तिच्याशी बोलून तिला पूर्ण विश्वासात घेतलं होतं. त्यामुळं मैत्रिणीसारखं ती सर्व काही मला सांगत असे. तिला सांगून ठेवलं होतं की, "बाहेर कुठंही मुलांना भेटायचं नाही. त्यानं जर बोलावलं तर त्याला आपल्या घरी बोलव. त्याला काय बोलायचं असेल ते बोलू दे. आणि मुलगा माझ्या नजरेखालून जाईल." त्याप्रमाणं ती वागत होती. माझ्यावर पूर्ण विश्वास ठेवून राहायची.

सारस्वत समाजात माझी ओळख नव्हती. घराबाहेर फारशी जात नसल्यामुळं इतरही ओळखी वाढल्या नव्हत्या. माझा भाऊ हरीश हा तेव्हा बुश रेडिओ फॅक्टरीत मॅनेजर म्हणून काम करत होता. त्याला सांगून ठेवलं. तसंच माझी नणंद प्रभा परुळकर हिला सांगितलं होतं. मंगेशचे चुलत भाऊ रमेश व शाम. रमेशची पत्नी 'मीरा' व शामची पत्नी 'मृणाल' यांना पण मुलगा सुचवायला सांगितलं होतं. सर्वांनी स्थळं सुचवली.

एक-दोन ठिकाणी मी खिश्चन आहे म्हणून अंजूला न बघताच, "आमच्या घरात आजीचं सोवळं आहे. आईला चालणार नाही." अशी उत्तरं मिळाली. आम्ही मनातून जरा घाबरलो. एका ठिकाणी मुलगी पसंत पडली. पण त्यांची त्यांच्या स्वामीवर भक्ती असल्यामुळं दोन मुलींचे फोटो पोस्टानं स्वार्मीकडं पाठवण्यात आले. स्वामींनी दुसऱ्या मुलीच्या फोटोला पसंत केलं.

एके ठिकाणी अंजूला बघायच्या आधी तिच्या वर्गातल्या एका मुलीनं तिच्याबद्दल खोट्या गोष्टी त्यांना सांगितल्या. त्यांनी नीट चौकशी न करता तेच खरं मानलं. त्यामुळं ते जमू शकलं नाही. ह्यानंतर आम्ही ठरवलं की आधी काही न सांगता सरळ मुलगी दाखवायची. पसंत असेल तर पुढच्या गोष्टी सांगायच्या.

काही दिवसांनी माझी जाऊ मीरा हिचा मला फोन आला. ती शारदाश्रम शाळेत शिक्षिका होती. आता मुख्याध्यापिका झाली आहे. तिला एक शिक्षिकेकडून एक स्थळ समजलं होतं. ते होतं डॉ० रवींद्र कुळकर्णी यांच्या मुलाचं. तिनं सांगितलं, "वरळीला त्यांची पाच मजली इमारत आहे. तळमजल्यावर फार्मास्युटिकल कंपनी आहे. ते काँग्रेसचे मोठे कार्यकर्ते आहेत. नुकतेच मेयर झाले होते. भरपूर मोठी जागा आहे. समोर सुंदर बगिचा आहे. त्यांचा तीन नंबरचा मुलगा दिलीप, देखणा आहे. तो त्यांच्याबरोबर फॅक्टरीत काम करतो. केमिस्ट्री घेऊन बी०एस्सी० झालेला आणि फॅक्टरीत काम करण्यासाठी फार्मसीचा डिप्लोमा घेतलेला आहे. त्यांना पाच मुलगे व तीन मुली." हे तपशील पुरेसे आकर्षक होते. मंगेशला मी मीराचा फोन काय होता ते सविस्तर सांगितलं. त्यानं ऐकून घेतलं पण पुढं काहीच हालचाल केली नाही. मीरानं पुन्हा थोड्या दिवसांनी फोन केला की, "वहिनी जाऊन आलांत का कुळकर्णींकडं?" मी नाही म्हटल्यावर म्हणाली, "भावोजी येत नसतील तर आपण दोघी जाऊ या. मी तुमच्याबरोबर येते." हे वाक्य ऐकून माझं मन भरून आलं. किती ही मुलगी माझ्याशी प्रेमानं वागते? पुन्हा फोन करते, मी येते म्हणून सांगते! कोण कशाला कुणासाठी इतकं करील? मंगेशला मी सांगितलं, "तू येणार नसलास तर मीरा आणि मी आधी जाऊन भेटून येतो." तो म्हणाला, "नको मी फोन करतो. त्यांना. दिवस ठरवतो. मग आपण जाऊ." त्याप्रमाणं मी मीराला कळवलं.

मंगेशनं डॉ० रवींद्र कुळकर्णींना फोन केला. दिवस ठरवला. त्या दिवशी संध्याकाळी आम्ही धडधडत्या अंत:करणानं अंजूला घेऊन त्यांच्या घरी गेलो. त्यांनी आनंदानं आमचं स्वागत केलं. मंगेशला कवी म्हणून ते ओळखत होते. त्यांच्या नात्यागोत्याच्या कोकणातल्या गावांच्या गोष्टी झाल्या.

"आमचं स्थळ तुम्हांला कोणी सुचवलं?" असं त्यांनी मला विचारलं. अंजू आणि दिलीप यांना गाडीतून बाहेर पाठवलं. पण आश्चर्य म्हणजे मला माझ्या माहेरासंबंधी एक प्रश्न विचारला नाही. विचारलं तर सरळ सांगायचं असं मी ठरवलं होतं. पण त्यांनी कोणी विचारलंच नाही. अंजू दिलीप बाहेरून आल्यावर, डॉक्टर कुळकर्णी "चार दिवसांनी कळवतो" म्हणाले. आणि आम्ही घरी निघून आलो.

चार दिवसांनी डॉ० कुळकर्णी यांना मंगेशनं फोन केला. मी घाबरून बेडरूममधून बाहेरच आले नाही. ते म्हणाले, "मुलगा घरी आला नाही. नंतर फोन करा." पुन्हा काही तासांनी फोन केला तेव्हा, "मुलगी पसंत आहे, गुरुवारी भेटायला या." म्हणाले. आता भेटायला गेल्यावर मात्र माझ्या धर्माबद्दल सांगायचं असं आम्ही ठरवलं. काय होईल ते होईल पण मुलीला नंतर त्रास व्हायला नको. जे खरं आहे ते आधीच स्पष्ट व्हायला हवं असं ठरवून आम्ही दोघं गेलो. सुरवातीची बोलणी झाली. मला वाटलं मंगेश आता सांगेल, मग सांगेल, पण त्याच्या तोंडातून शब्द निघेना. मी मनात ठरवलं की आता आपणच सुरुवात करायची. मी बोलले, "डॉक्टर, हे बघा, देणीघेणी ह्याबद्दल बोलण्याच्या आधी एक गोष्ट मला तुम्हांला सांगितली पाहिजे. ती ही की, मी हिंदू नाही. मी खिश्चन आहे." "असं का? मला माहीत नव्हतं." ते म्हणाले आणि वळून गुलाबताईंकडं बघायला लागले. थोडा वेळ गप्प राहिले आणि एकदम म्हणाले, "हरकत नाही त्यामुळं काही फरक पडत नाही. हे पारडं जड आहे." मग मंगेशनं माझ्या वडिलांबद्दल, त्यांच्या वाङ्मयाच्या आवडीबद्दल, मराठी भाषेच्या प्रेमाबद्दल सांगितलं. माझ्या आईचे वडील ब्राह्मण होते. त्यांचं नाव 'हरिपंत केळकर'. त्यांच्याबद्दल अशा पुष्कळ गोष्टी सांगितल्या. लग्न ठरलं. "ते वैदिक पद्धतीनं करायचं." मी म्हणाले, "लग्नाला मला बसता येणार नाही–लोक विरोध करतील. शिवाय त्यांतलं मला काही ठाऊक नाही." त्यावर मला म्हणाले, "त्याची तुम्ही काळजी करू नका. लग्नाच्या वेळी, दोन मैलांच्या परिसरात कोणी विरोध करणारे येणार नाहीत–त्याची मी व्यवस्था करीन. तुम्ही निश्चिंत रहा." अशा तऱ्हेनं अंजूचं लग्न थाटात पार पडलं. नंतर काही वर्षांनी कळलं की आम्ही बोलणी करायला जाण्याच्या आधी, नात्यातल्या एकानं त्यांना फोन करून पाडगावकरांची बायको खिश्चन असल्याचं सांगितलं होतं. मुलीला होकार देऊ नका. असंही. तेव्हा मला कळलं की मला एकही प्रश्न कसा विचारला नाही ते. त्यांना ते आधीच माहिती होतं. त्यांनी कळू दिलं नाही. हासुद्धा सुसंस्कृतपणाचा भाग आहे. गुलाबताईंनी पण बोलताना ह्या मुद्द्यावरून अंजूचा कधी अपमान केला नाही. त्यामुळं त्या दोघांबद्दल मी नेहमीच आदर बाळगून राहिले.

कवी बोरकर एकदा घरी आले. आम्ही दोघंच बोलत बसलो होतो. मी माझ्या मनातलं दुःख त्यांना सांगितलं, "मंगेशच्या आईनं तुमच्याकडं तक्रार केली की, 'तो संसारात लक्ष घालत नाही. पुरेसं मिळवत नाही. त्याच्यासाठी आता मी काय करू? तुम्ही काही उपाय सांगा.' त्यावर उत्तर म्हणून, तुम्ही म्हणालांत की, 'तुम्ही सर्वांनी परत गिरगावात जा. त्याला एकट्याला इथं राहू दे. त्याला पैसे देऊ नका व वर्षभर इकडं येऊ पण नका. जबाबदारी पडली की तो हातपाय हालवायला लागेल.' दुसऱ्याच दिवशी ते सर्व जण इथून जायला निघाले. माझ्यासाठी काही भांडी व

सामान मागं ठेवलं. मला म्हणाल्या, 'तू बोरकरांना सांगितलंस ना? मला वेगळं राहायचंय, म्हणून आम्ही गिरगावात पुन्हा जातो आहेत.' मी त्यांना सांगण्याचा प्रयत्न केला पण त्यांना ते पटलं नाही, त्याहून अपमानकारक गोष्ट अशी की त्या मला बोलत असताना, मंगेशनं माझी बाजू घेतली नाही आणि एक शब्दही माझ्यासाठी बोलला नाही. हा खोटा आरोप माझ्यावर ठेवून त्यांना सायनहून जाऊ दिलं. ही मोठी जखम माझ्या मनावर झाली आहे. माझं दु:ख कमी होत नाही. मी काय करू? खरं काय ते तुम्हांला ठाऊक आहे.''

त्यावर ते म्हणाले, ''हे बघ यशोदा, ह्या जगात पुष्कळ अविवेकी माणसं असतात. ती जर काही बोलली, तर आपण ते मनाला लावून घ्यायचं नाही. त्यांच्यामुळं, आपलं आयुष्य दु:खी होऊ द्यायचं नाही. तू जर प्रामाणिक व सरळ आहेस तर असल्या बोलण्याला महत्त्व देऊ नकोस.''

लहानसा, शाळेत जाणारा अभय त्यांना फार आवडायचा. त्याला ते 'अबू बेन ॲडम' म्हणायचे. मला म्हणायचे की, ''हा माझा मुलगा आहे. तो मी तुझ्याकडं सांभाळण्यासाठी ठेवलाय. तो मोठा झाला की मला माझा मुलगा परत दे. तू वाढवलास म्हणून तुला वाटेल तुझाच आहे म्हणून.'' असं म्हणून त्यांनी एकदा पाकिटातून लगेच पैसे काढले. माझ्याकडं देत म्हणाले, ''ह्या पैशातून त्याच्यासाठी शाळेत जेवण नेण्याचा डबा घेऊन ये.'' मी एक डबा आणला व त्यावर त्यांच्याकडून भेट असं घालून घेतलं. खूप वर्षं अभय तोच डबा शाळेत नेत होता.

एकदा ते आले. मंगेशनं मासे आणायचं ठरवलं. मी मनातून घाबरले. कारण मला माशांचं जेवण काहीच येत नव्हतं. बोरकरांना घेऊनच तो बाजारात गेला. दोघं तऱ्हेतऱ्हेचे, मी न बघितलेले भरपूर मासे घेऊन आले. बोरकर मला सांगायला लागले, ''यशोदा याचं 'तिखलं' कर, याचं 'सुकं' कर, याचं 'सांबारं' कर, हे 'तळून' काढ.'' ते मासे बघून आणि ती नावं ऐकून मी गडबडून गेले. मी त्यांना सांगितलं, ''हे बघा बोरकर, ह्यांतलं मला अजून तरी फारसं काही येत नाही. मुख्य गोष्ट म्हणजे विळीवर बसून मासे नीट करता येत नाहीत. तुम्ही जर मला थोडी मदत केलीत, पदार्थ करण्याची पद्धत सांगितलीत तर मी करण्याचा प्रयत्न करीन.''

ते लगेच तयार झाले. ''चल, आण इकडे विळी. मी कापून देतो तुला मासे.'' माझ्यावरचं मोठं संकट टळलं असं मला वाटलं. मी लगेचच विळी त्यांच्यापुढं ठेवली. त्यांनी भराभर काम सुरू केलं. मी बाजूला बसून बघत होते. मंगेश मागंच उभा होता. मला म्हणाले, ''यशोदा, ही मदत मी तुला केली, हे माझ्या बायकोकडं बोलू नकोस हं कधी. कारण तिला मी अशी मदत कधीच केलेली नाही.'' नंतर कशात काय घालायचं, खोबऱ्यात काय वाटायचं वगैरे सूचना देऊन ते बाहेर जाऊन बोलत बसले. मी सांगितल्याप्रमाणं सर्व पदार्थ तयार करून वाढले. ते कसे झाले होते हे त्यांचं त्यांनाच ठाऊक!

संसारातल्या अडचणी, मंगेशचा स्वभाव, सर्व त्यांना ठाऊक होतं. मंगेशवर

त्यांचं अतोनात प्रेम होतं. हा प्रतिभावंत मुलगा आहे हे त्यांनी केव्हाच ओळखलं होतं. त्याच्या संगतीत वेळ घालवायला त्यांना अतिशय आवडायचं. सायनला आले की त्यांना खूप कविता सुचायच्या. एकदा तर एका दिवसात त्यांनी पाच कविता लिहिल्या आणि आनंदानं आम्हांला वाचून दाखवल्या. माझ्यावरही त्यांचा लोभ होता. मला जवळ बसवून घेत आणि "तुला काय त्रास आहे?" असं विचारत. काही तक्रार सांगितली की त्यावर ते उपाय सुचवत. सल्ला देत. रात्री सर्व जण झोपल्यावर मला थांबवून माझ्याशी बोलत बसत. इतक्या आस्थेनं, वडिलकीनं माझी चौकशी करणारं दुसरं होतं कोण?

मला सांगायचे, "तू एकदा गोव्याला ये मी कसं तुझं माहेरपण करतो ते बघ." ते बोरीला राहत असताना आम्ही त्यांच्या घरी गेलो होतो. तसेच एकदा ऑफिसच्या कामासाठी मंगेश गोव्याला गेला तेव्हा मला घेऊन गेला होता. मित्राची गाडी आणून गोव्यातली सर्व महत्त्वाची स्थळं बोरकरांनी आम्हांला फिरवून दाखवली. त्या वेळी त्यांचा उत्साह ओसंडून जात होता. त्यांना काय दाखवू आणि काय नको असं होत होतं. वागण्यात चपळपणा दिसत होता. शरीर लहान व नाजूक चणीचं असल्यामुळं चालणं उठणं, बसणं अगदी सहजपणं होत असे. सिगारेट ओढणं हे एक व्यसन होतं. मला म्हणायचे, "यशोदा, मला तुझ्यावर एक लेख लिहायचाय." पण तो शेवटी त्यांच्या मनातच राहिला. मी मात्र त्यांच्या एकसष्टीला 'मांडवी'मधे, श्रीराम कामत यांच्या सांगण्यावरून एक लेख लिहिला होता. तो त्यांना इतका आवडला की दोनतीन वेळा त्यांनी मला तसं सांगितलं.

मला बोरकर पत्र लिहायचा आग्रह करायचे.

एकदा मी त्यांना सविस्तर लिहिलं. त्यांना माझ्या पत्राचा खूप आनंद झाला. त्यांनी मला उत्तर म्हणून मोठं पत्र लिहिलं :

३, प्रराम अपार्टमेंट
लकाकी रोड, पुणे १६
जुलै १८,८२

प्रिय यशोदा,

आपला उणापुरा तीस वर्षांचा जिव्हाळा. एवढ्या दीर्घ कालावधीतले तुझे पहिलेच पत्र आलेले. त्यामुळे त्याची मला किती अपूर्वाई वाटली असेल याची तूच कल्पना कर. तुझे अक्षर सुवाच्य आहे, शुद्धलेखन निर्दोष आहे आणि तुझी भाषाशैली तुझ्या स्वभावासारखीच सरळ साधी आहे. तेव्हा या बाबींबद्दल तुझा संकोच काढून टाक. मला असले प्रांजल लेखन मनापासून आवडते. म्हणूनच तर केव्हापासून मी तुला सांगत आलो की, कागदाशी रोज हितगुज करण्याची सवय लावून घे. कुणी सांगावे, त्यामुळे लक्ष्मीबाई टिळकांप्रमाणे एक चांगली लेखिका म्हणून प्रसिद्धीला येशीलही.

माझ्या मते त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट आहे ती, त्यामुळे आपल्या मनाचे खळमळ धुऊन जातातही...

माझ्यावरल्या मायेमुळं, कविवर्य बोरकरांनी माझ्या लेखनाविषयी थोड्या अधिकच कौतुकानं इथं आपलं मन उघडं केलं आहे. माझ्या लेखनाविषयीच्या काहीशा उंच अपेक्षाही कौतुकानंच व्यक्त केल्या आहेत.

तर पुढं पत्रात, आपली प्रकृती, गोव्यातला आपला संकल्पित कार्यक्रम, मी गोव्यात त्यांच्याकडं माहेरपणाला यावं यासाठीचा आग्रह अशा अनेक संदर्भांना स्पर्श करतात. त्यांतून एका कुटुंबवत्सल, प्रेमळ अशा ज्येष्ठ सुहृदाचं दर्शन घडतं. ते लिहितात :

...माझी प्रकृती ठीक होईल अशी अपेक्षा आहे. त्या वेळी मी काही दिवस जरूर तुझा पाहुणचार घेईन. तू काही दिवसांसाठी इकडे येऊ शकली असतीस तर मला खूप आनंद झाला असता. तुलाही थोडे माहेर झाले असते आणि आपले रमीचे डाव रंगत राहिले असते. पण तू पिंडाने गृहिणी आहेस. त्यामुळे तिथून हलणे तुला कठीण असले तर मी ते समजू शकतो. इतक्या लांबूनदेखील तुझी सदिच्छा मला सदैव नवे त्राण देत राहील. मी आता रमी खेळू शकलो आहे. पण जोडीदार क्वचितच मिळतो...

तुझा स्नेहांकित
बोरकर

यानंतर एकदा आले आणि मला पन्नास रुपये काढून दिले. म्हणाले, "यशोदा, ह्या पैशातून तू तुला आवडेल ती साडी घे." मी एक चॉकलेटी रंगाची जरीची साडी आणली आणि खूप वेळा त्यांची आठवण काढून आवडीनं नेसले. बोरकरांनी मला दिली म्हणून मिरवून घेतलं.

बोरकर बरीच वर्षं पुणे रेडिओवर प्रोड्यूसर होते. गोवा स्वतंत्र झाला. ते रिटायर झाल्यावर गोव्याला जाऊन राहिले. त्यांची मोठी मुलगी दुर्गा वज्रम. ती पुण्याला राहते. पुष्कळ वेळा ते तिच्याकडं येऊन राहत. त्यांना भेटायला आम्ही दुर्गाकडं जात होतो. दुर्गाची आणि माझी मैत्री वाढत गेली. त्या वेळी बोरकरांना रमी खेळण्याचा नाद लागला होता. जो भेटायला येईल त्याला बसवून ते त्याच्याबरोबर रमी खेळायचे आणि सारख्या सिगरेटी ओढायचे. सायनला आले की मंगेश ऑफिसला गेल्यावर सकाळीच मला हाक मारायचे, "यशोदा, चल रमी खेळू या." "मला नीट रमी खेळता येत नाही हो. तुम्हीच जिंकणार. मग काय मजा? शिवाय मला अंघोळ करायची आहे. स्वयंपाक करायचा आहे." मी सांगायची. त्यावर म्हणायचे, "मी शिकवतो ग तुला. तुझ्याकडून पॉइंटचे पैसे घेणार नाही." मंगेशला किंवा इतरांना पैसे घेतल्याशिवाय सोडत नसत. अंघोळ, स्वयंपाक राहू दे. मग कर, आधी इथं

येऊन खेळायला बस.'' आमची रमी सुरू व्हायची. मी शंभर, शंभर पॉइंट्सनी हरायची. तरी ते खेळ थांबवायचे नाहीत. सारखे सिगरेट ओढत राहायचे. इतके की जवळ बसल्यामुळं त्या धुराचा त्रास होऊन माझा जीव गुदमरायचा. त्याचाच त्यांच्या फुप्फुसांना त्रास होऊन फार कफ व्हायला लागला. फुप्फुसं निकामी होत गेली. सर्व डॉक्टरांनी सांगून पाहिलं पण सिगरेटचं व्यसन ते सोडू शकले नाहीत.

त्यांच्या कविता त्यांच्याच तोंडून ऐकायला मला खूप आवडायच्या. कधी म्हणा म्हणून सांगितलं तर रंगून जाऊन म्हणत. 'रमलाची रात्र' म्हटल्याशिवाय त्यांना सोडत नसे. ''ही कविता कां लिहावीशी वाटली तुम्हांला?'' एकदा मी विचारलं. म्हणाले, ''माझा एक मित्र आणि मी जपानला जाणार होतो. पण काही कारणामुळं मी जाऊ शकलो नाही. आणि तो एकटाच गेला. मला फार वाईट वाटलं. मग मी ठरवलं की हरकत नाही. मी प्रत्यक्ष जरी जाऊ शकलो नाही तरी कल्पनेनं मी जपानचं चित्र उभं करीन. अशा प्रकारं ही कविता तयार झाली.'' 'काळे काळे केस तुझे, काळे काळे डोळे', 'प्रत्येकाच्या उरीं बाई भुंगा कोरतो', 'तुझीं गो पैंजणां–' गोव्याच्या भाषेत लिहिलेल्या, त्या ढंगानं म्हटलेल्या हातवारे करत चेहऱ्यावरचे भाव बदलत म्हटलेल्या कविता, मी कधी विसरू शकणार नाही. काही कविता ते गाऊनसुद्धा म्हणायचे त्यांचा आवाज चांगला होता. आणि स्वत: लावलेल्या सोप्या सुंदर चाली गुणगुणत राहायची त्यांना सवय होती. दिवसभर डोक्यात कविता व तोंडानं गुणगुणणं चालू असायचं. खरोखरीच त्यांचं अन्तर्बाह्य रूप प्रतिभावंत कवीचं होतं.

पुण्याला वज्रम यांच्याकडं असताना त्यांचं दुखणं बळावत गेलं. एक दिवस एकदम बोलताना कविता वाचत असताना ते बेशुद्ध झाले. दुर्गा तर त्यांची मुलगीच पण वज्रमनी जे काही त्यांच्यासाठी केलं ते मुलानं करावं ह्याहीपेक्षा जास्त होतं. त्यांच्याबद्दल आदर, प्रेम, कौतुक हे व्रजमांच्या नजरेतून दिसायचं. स्वत: परप्रांतीय, परभाषिक असूनही असं प्रेम करणारा जावई विरळाच.

आम्हांला कळल्याबरोबर आम्ही मुंबईहून निघालो. पुण्यात गेल्यावर कळलं की त्यांना हॉस्पिटलमधे ठेवलं आहे. ते बेशुद्ध होते. कोण आले, कोण गेले हे समजायच्या पलीकडं ते गेले होते. घरच्या मंडळींना भेटून त्यांचं शेवटचं दर्शन घेऊन आम्ही निघालो. मंगेश फार दु:खी झाला. दोघांच्या वयात फार मोठं अंतर होतं. तरी जीवाभावाचा मित्र असावा असे वाटायचे. ते गेल्यानं निर्माण झालेली पोकळी पुन्हा भरून आलीच नाही.

अभय माझा तिसरा व सर्वांत धाकटा मुलगा. माझी प्रकृती चांगली नसल्यामुळं त्याचं नीट पोषण झालं नाही. त्यामुळं जन्मत: तो कमी वजनाचा होता. वाढ पूर्ण झाली होती. तसा दोष अजिबात नव्हता. त्यातच अंगावरचं दूध पुरत नाही म्हणून

डब्याचं दूध चालू केलं. तेही पचेना. सर्दी, खोकला, जुलाब वगैरे वरचेवर चालू असायचे. डॉक्टरांचे उपायही चालू होते. शाळेत नियमितपणं जाणं शक्य होत नसे. तो चार वर्षांचा झाल्यावर मी घरीच त्याला शिकवायला सुरुवात केली. माझ्या लक्षात आलं की हा मुलगा फार हुशार आहे. शिकवलेली गोष्ट त्याला लगेच समजते. समजलेली लक्षात राहते. लक्षात ठेवून तो ती लिहू शकतो. एकदा मुळाक्षरं शिकवल्यावर त्याला अधिक काही शिकवावंच लागलं नाही. बाराखड्या, जोडाक्षरं आपोआप येतच गेली. तसंच अंकांचं. एकदा १ ते १० अंक शिकवले. पुढं १०० पर्यंत त्याला येतच गेले. पुढं लक्षात आलं की गणितांत त्याचा मेंदू फार तल्लखपणं चालतो. म्हणून आम्ही त्याला सायनच्या शाळेत न ठेवता दादरच्या 'पाटकर गुरुजी' शाळेत घातलं. येण्या-जाण्याचा त्रास. शाळेच्या बसेस मुलांना वेळेच्या खूप आधी घेऊन जात. मुलांना परत खूप उशिरा पोचवत. त्याच्या नाजूक प्रकृतीला मानवत नव्हतं. बऱ्याच वेळा त्याला बसनं नेण्या-आणण्याचं काम मलाच करावं लागायचं.

तिथं तो चांगला शिकायला लागला. पहिल्या पाचातच नंबर असायचा. चवथीत गेल्यावर मला म्हणाला, "मी स्कॉलरशिपच्या परीक्षेला बसणार आहे." त्याला वरचेवर ताप येत होता. मी म्हणाले, "अभय, स्कॉलरशिपच्या परीक्षेला बसायला काहीच हरकत नाही. पण जास्त वेळ शाळेत राहणं,जास्त अभ्यास करणं तुला झेपेल का? मला वाटतं तू नको बसू स्कॉलरशिपला." पण त्यानं ऐकलं नाही. ताप मधून मधून येतच होता. त्याच्या तापाची भीती वाटायची. कारण एकदा ताप चढायला लागला की, १०४° च्या खाली थांबत नसे. लहान वर्षा-दीड-वर्षांचा असताना त्याला कन्वल्शन आली होती. तापात तो बेशुद्ध झाला होता.

एकदा संध्याकाळी शांताबाई शेळके घरी आल्या होत्या. मंगेशबरोबर हॉलमधे त्या बोलत बसल्या होत्या. त्यांच्या गप्पा रंगात आल्या होत्या. मी आत अभयजवळ होते. त्याचा ताप वाढत होता. बोलता बोलता १०४° झाला. आणि माझा तोल सुटला. मी हॉलच्या दारात जाऊन एकदम रडायलाच सुरुवात केली. ते दोघं विचारायला लागले, काय झालं म्हणून. तेव्हा ताप वाढल्याचं सांगितलं. त्यांनी माझी समजूत घातली पण मन शांत होईना. कशानंच ताप जात नाही. आता करायचं तरी काय?

शेवटी मला ज्या डॉक्टर रांगणेकरांकडं काकांनी नेलं होतं त्यांच्याकडं आम्ही त्याला घेऊन गेलो. त्यांनी तपासलं आणि सांगितलं की, "हा मलेरिया आहे. तीन, चार दिवसांत बरं वाटेल. सांगितलेल्या गोळ्या नीट दे." त्या गोळ्यांनी ताप गेला. आणि स्कॉलरशिपच्या परीक्षेचा त्रास सहन करून अभ्यास करता आला. त्याला चवथीची स्कॉलरशिप मिळाली.

नंतर पाचवीपासून त्याला पण बालमोहन शाळेत घातलं. तिथंही तो उत्तम मार्क मिळवून पास व्हायचा. सातवीची स्कॉलरशिप पण मिळाली. आणि एस०एस०सी० नंतर एस०आय०ई०एस० कॉलेजला त्याला घातलं. त्याला बॅडमिंटनची फार

आवड निर्माण झाली. क्लबमधे नाव घातलं. रोज संध्याकाळी खेळायला जायचा. परीक्षेच्या आधी त्याला दोन्ही बाजूंना गालगुंडं झाली. १०४°च्या वर ताप चढला. गिळता येईना. फर्स्ट इयर सायन्स परीक्षा आणि आय०आय०टी०ची प्रवेश परीक्षा द्यायची होती. गालगुंडांनी त्याला जेरीला आणलं होतं. कसा तरी अभ्यास करून दोन्ही परीक्षा त्यानं दिल्या. फर्स्ट इयरला चांगल्या टक्क्यांनी पास झाल्यावर त्याला आय०आय०टी०ला बनारस विद्यापीठात ॲडमिशन मिळत होती. ती घ्यायची की नाही ह्याचा निर्णय मलाच घ्यायचा होता. बनारसला पाठवायला मला भीती वाटायला लागली. तिथं रॅगिंग जास्त होतं. मुलांच्या दंगली होतात–एका मुलाचा कॅम्पसमधे खून झाला, अशा बातम्या वाचलेल्या होत्या. मी म्हणाले, "अभय तुला बनारसला पाठवावं असं वाटत नाही. ते फार लांब आहे. आपल्याला तिथली काही माहिती नाही. तेव्हा तू इंटरला बस आणि पुन्हा आय०आय०टी०ची प्रवेश परीक्षा दे. या वेळी तुला चांगले मार्क मिळाले तर जवळपास ॲडमिशन मिळेल." त्यानं माझं ऐकलं. कुठंही मिळाली तरी आय०आय०टी०ची ॲडमिशन सोडायची म्हणजे एक मोठं धाडस होतं. पुन्हा मिळाली नाही तर? मी शहाणपणा केला की मूर्खपणा मला ठाऊक नाही. पण एवढं खरं की अभय मी म्हणत होते त्याला तयार झाला. तो सहसा माझ्या सांगण्याबाहेर जात नसे.

तो अबोल व शांत होता. कधी चिडला तर मात्र आवरत नसे. लहानपणी हट्ट खूप करायचा. मनाविरुद्ध झालेलं सहन करत नसे. अजितच्या आणि त्याच्या वयात सहा वर्षांचं अंतर आहे. त्यामुळं अजित आपल्याबरोबर त्याला घेत नसे. अंजूबरोबर त्याचं चांगलं जमायचं. पण ती तिच्या खेळात आणि मैत्रिणीत दंग. त्यामुळं अभय जास्त वेळ माझ्याच मागं असायचा.

आता तो खूप समंजस झाला होता. इंटरचा अभ्यास त्यानं मनापासून सुरू केला. मंगेश ऑफिसमधून आला की "आय०आय०टी०चा अभ्यास कर" म्हणून त्याच्या मागं लागायचा. तो "हो" म्हणून गप्प बसायचा. असं रोज व्हायला लागल्यावर अभय मला म्हणाला, "आई बाबांना सांग ना, सध्या मला इंटरचा अभ्यास खूप केला पाहिजे. आय०आय०टी०ची प्रवेश परीक्षा नंतर आहे. तो अभ्यास करायला पुढं वेळ मिळेल." मी मंगेशला सांगितलं. पण ते त्याला पटेना. "आय०आय०टी०चा अभ्यास कर," सारखं तेच. शेवटी मी त्याला म्हणाले, "तू अभयच्या भानगडीत पडू नकोस आणि त्याला त्रास देऊ नकोस. तो आणि मी दोघं मिळून काय ते बघून घेऊ." मग मंगेशनं त्याला सांगायचं बंद केलं.

पुढच्या वर्षी अभयनं दोन्ही परीक्षा दिल्या. इंटरला त्याला ८७ टक्के मार्क मिळाले. युनिव्हर्सिटीत तो ७ वा आला.

आय०आय०टी०च्या परीक्षेत वेस्ट झोनमधून अभय २६वा आला. त्याला सरळ मुंबई आय०आय०टी०त ॲडमिशन मिळाली. पाहिजे तो विषय निवडण्याची परवानगी मिळाली. त्यासाठी मंगेशनं काही लोकांचा सल्ला घेतला आणि मेकॅनिकल

इंजिनियरिंगला ॲडमिशन घेतली. मी मुलांना म्हणायची, तुम्ही तिघंही मला सारखेच आवडता. कारण अजित हा घराचा 'आनंद' आहे. अंजू घराची 'शोभा' आहे. अभय या घराचं 'कौतुक' आहे. मुलं लहान–म्हणजे शाळेत असताना–आम्ही सर्व मिळून पत्ते व विशेषत: कॅरम खेळत होतो. मला लहानपणापासून कॅरम या खेळाची फार आवड होती. आमच्या घरी येरवड्याला कॅरम होता. खेळून खेळून मला चांगली प्रॅक्टिस झाली होती. शाळेत कॅरमच्या मॅचेस झाल्या त्या वेळी मला दोन बिल्ले मिळाले होते. ती आवड कायम आहे. असेच एकदा रमेश तेंडुलकर आले. त्यांना आम्ही खेळायला घेतलं. ते पण चांगलंच खेळत होते. खूप मजा आली. आम्ही त्यांना सांगितलं की, तुम्हांला वेळ असेल तेव्हा फोन करून खेळायला येत चला. त्याप्रमाणं ते यायचे. येताना नेहमीच दोन मोठ्या पुड्या बरोबर असायच्या. त्यांत भजी–कांदा बटाट्याची, किंवा कसली तरी. दुसऱ्या पुडीत भरपूर फरसाण असायचं. ते आले की मी चांगलं भांडं भरून चहा करायची. तीन मुलं आणि आम्ही तिघं मिळून चांगला ताव मारत होतो. खाऊन झालं की संध्याकाळपर्यंत खेळत होतो. मधून मधून गप्पा, विनोद चालू असायचे. मंगेश पण चांगलाच खेळायचा. पण त्याला हरलेलं चालत नसे. त्यामुळं तो फार मन लावून आणि जिंकण्याच्या ईर्षेनं खेळायचा. असे हे साधेपणाचे, आनंदानं खेळण्याचे दिवस होते. तेंडुलकरकाका येणार म्हटल्यावर मुलं अगदी खूष होऊन जायची.

आणि एक दिवस ती भयंकर बातमी आली. तेंडुलकरांची पत्नी अचानक वारली. क्षणभर ते खरंच वाटेना. पण अशा वाईट बातम्या सहसा खोट्या ठरत नाहीत. त्यांना आमच्यासारखीच तीन लहान मुलं होती. मंगेश फार बैचेन झाला. त्यांना भेटायला त्यांच्या घरी गेला. तो धक्का तेंडुलकरांना सहन होण्यासारखा नव्हता. भेटायला येणाऱ्या माणसांची रीघ लागली होती. त्यांना उत्तर देत, तिथं बसून राहणं त्यांना अशक्य झालं होतं. मंगेशनं त्यांना सांगितलं, "रमेश, तू दिवसभर माझ्या घरी चल. इथं राहून तू आणखी खचून जाशील." आणि तो त्यांना घरी घेऊन आला. त्यांच्याशी बोलणं तर सोडाच पण त्यांच्याकडं बघणंही शक्य झालं नाही. त्यांना आम्ही आमच्या बेडरूममधे नेलं. म्हटलं, "तुम्ही इथं पडून रहा. विसावा घ्या. इथं कोणी त्रास द्यायला येणार नाही." त्यांनी आमचं ऐकलं. दार लोटून घेतलं. त्यांच्या मुलांना बघायला घरी आई, वडील, भावंडं होती. रजनी–त्यांची मेहुणी म्हणजेच मुलांची मावशी होती.

मंगेश ऑफिसला गेला की दुपारी मी त्यांना जेवण्याचा आग्रह करून थोडं वाढत होते. एवढं मोठं संकट कोसळल्यावर ते जेवणार काय? मधून, मधून चहा नेऊन देत होते. त्यांची चौकशी करत होते. संध्याकाळी ते पुन्हा घरी निघून जात. असं आठ, दहा दिवस चाललं होतं. ते सावरण्याचा प्रयत्न करत होते. नंतर यायचे थांबले.

महिने गेले–वर्ष गेलं. आम्ही मनांतल्या मनात तेंडुलकरांची–त्यांच्या मुलांची काळजी करत होतो. आणि बातमी आली की ते त्यांची मेहुणी रजनी हिच्याशी लग्न करणार आहेत. ते घरी येऊन पत्रिका देऊन गेले. एक किती कठीण प्रश्न सुटल्यासारखं वाटलं. ती मुलांची मावशी असल्यामुळं तिला त्यांची सवय होती व प्रेमानं ती काळजी घेत असे. आम्ही लग्नाला गेलो.

नंतर दोन, तीन वर्षांनी रजनीला मुलगा झाला. तोच हा 'सचिन तेंडुलकर'. इतक्या लहान वयात आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळवणारा क्रिकेटवीर. रमेश बोलावलं तर अजूनही घरी येत. जुन्या दिवसांची आठवण काढत. त्यांनी मला सुंदर आकाशी रंगाची, जरीच्या बुट्ट्या असलेली, चंदेरी साडी दिली होती ती आठवण हळूच माझ्या मनातून वरती येते. मनानं निर्मळ, साधा व सरळ माणूस. कुणाचा द्वेष नाही हेवा नाही. स्वत: चांगला कवी असून त्याचाही कधी गवगवा नाही. सचिननं एवढं नाव कमावलं म्हणून त्याचाही गर्व नाही. शेवटपर्यंत ते होते तसेच होते.

सासूबाईंची प्रकृती नीट राहत नव्हती. त्यांना मधुमेह पूर्वीच झाला होता. सायनला आल्यावर त्यांना डॉक्टर आजगावकर यांच्याकडं घेऊन गेले. सकाळी उपाशी पोटी बोलावलं होतं. ग्लुकोज देऊन विशिष्ट वेळानंतर रक्त व युरीन तपासणं. असं चालू होतं. आणि मधल्या वेळात पेशंटला मधुमेह म्हणजे काय, पूर्वी तो कसा ओळखत, युरीन केलेल्या जागी मुंगळे आले आणि जमिनीवर युरीन वाळल्यावर पांढरे कण दिसले तर त्या माणसाला मधुमेह झाला आहे असं समजत. पूर्वी पथ्य काय असे! आता गोळ्या देऊन किती जास्त पदार्थ खाता येतात! तरीही शरीरात साखर प्रमाणापेक्षा अधिक वाढत असली तर इन्शुलीन इंजेक्शन निघालं आहे. आणि काळजी घेतली नाही तर गँगरीन होतं. त्याचे भयंकर परिणाम–असं सविस्तर ज्ञान सासूबाईंना मिळालं. तसंच पाच तासांचं शिक्षण मला पण मिळालं.

त्यांना रोज जेवणाआधी एक इंजेक्शन सुरू केलं. डॉक्टर मिसेस श्रीखंडे शेजारीच असल्यामुळं चांगली सोय झाली होती. डॉक्टर आजगावकर मला सांगत होते त्यांना मी इंजेक्शन द्यावं म्हणून. मी देऊ शकले असते. पण मी ते काम घेतलं नाही. जर काही कमी-जास्त औषध घेतलं गेलं असतं तर अनर्थ झाला असता. आयुष्यभर माझ्या मनाला टोचणी लागून राहिली असती ती वेगळीच.

पुढं त्यांना सारखा ताप यायला लागला. खूप थकल्यासारख्या दिसायला लागल्या. एक दिवस संध्याकाळी वर येऊन मुलांच्या खाटेवर पडल्या होत्या. मी जवळच बसले होते. म्हणाल्या, "यशोदा, मला इथं काय झालं आहे ते बघ बरं जरा." असं म्हणून पोलका वर केला. मी वाकून बघितलं तर बोटाच्या दोन पेरांएवढी लांब व जाडसर वाढ झालेली दिसली. मी मनातून दचकले. त्यांना काही बोलले नाही. नंतर तपासासाठी त्यांना सायन हॉस्पिटलमधे ॲडमिट केलं. सिस्टरला बोलावून ती वाढ

झालेली दाखवली आणि सांगितलं की डॉक्टर आल्यावर त्यांना हे दाखव. डॉक्टरांनी पाहिलं आणि टाटा कॅन्सर हॉस्पिटलमधे नेऊन दाखवायला सांगितलं. मंगेशनं तिकडं ओळख काढून तपासण्याचा दिवस ठरवला. आम्ही दोघं त्यांना घेऊन गेलो. तो नक्की कॅन्सर आहे. पण आता ऑपरेशन करता येणार नाही. फक्त रेडिएशन घ्या. असं डॉक्टरांनी सांगितलं.

मला स्पाँडिलायटिसचा त्रास होताच आणि फिशर पण फार दुखत होता. तरी तशीच रोज दुपारी घरातलं काम आटोपल्यावर टॅक्सीनं त्यांना 'टाटाला' घेऊन जात होते. तिथं लाइनमधे कडक बाकावर बसवत नसे. उभी राहिले तर किती वेळ उभी राहू शकणार? असं दोन महिने चालू होतं. टॅक्सीचे पैसे मंगेश देऊन ठेवत होता. रेडिएशन संपल्यावर मंगेशनं ठरवलं की आई-काकांची शांतादुर्गेला जाण्याची इच्छा आहे. तर आता ती पुरी करावी. "मला म्हणाला, "तुला बरोबर यावं लागेल. मी एकटा त्यांना नेऊ शकणार नाही." त्यानं विमानाची तिकिटं काढली. आम्ही चौघं गोव्याला गेलो. देवळाच्या मागं बांधलेल्या ब्लॉकमधे दोन ब्लॉक घेऊन राहिलो. ते दोघं रोज सकाळी देवळात जाऊन पूजा करायचे. अभिषेक, प्रार्थना सर्व काही त्यांच्या मनासारखं झालं. पाच-सहा दिवसांनी पुन्हा विमानानं आम्ही परत आलो. त्यांची विमानात बसण्याची हौस पण पुरी झाली. त्यानंतर काही वर्षं बरी गेली.

एकदा शाम मराठे घरी आले होते. त्यांच्या पाठीच्या मणक्याला बाक आलेला दिसत होता. तेव्हा ते म्हणाले, "हे काहीच नाही. मी कमरेतून पूर्ण वाकलो होतो. दिल्लीत एक बंगाली बाई आहे. तिनं माझ्यावर उपचार केले. तिच्या हातात काही आजार बरे करण्याची शक्ती आहे. माझ्यामधे खूपच सुधारणा झाली. ती आपल्या शरीरावरून तिची बोटं फिरवते. त्यांतून कंप निर्माण होतो आणि त्या लहरी हाडापर्यंत जाऊन आजार बरा करतात. आता माझ्या पाठीत फार थोडा बाक दिसतो." त्यावर मंगेश म्हणाला की, "यशोदेला स्पाँडिलायटिसचा फार त्रास होतो. डावा खांदा व पाठीच्या दुखण्यानं ती हैराण झाली आहे. डॉक्टर बावडेकरांकडं तिनं पुष्कळ वेळा ट्रीटमेंट घेतली. पण हे दुखणं फिजिओथेरपीनंसुद्धा पूर्ण बरं होत नाही. डॉक्टर अरविंद बावडेकरांनी तीनचार वेळा फी न घेता, मला सर्व ट्रीटमेंट दिली होती. आणि त्यांनी नंतर सांगितलं, "हे दुखणं आम्ही पूर्ण थांबवू शकत नाही. काही जड कामं तुम्ही यापुढं करायची नाहीत. मसाला वाटायचा नाही–कपडे धुवायचे नाहीत– दोन किलोपेक्षा जास्त वजन उचलायचं नाही. कांडायचं, कुटायचं नाही. घरातल्या माणसांना खरं वाटत नसेल तर मी हे पथ्य सर्व लिहून देतो–प्रिस्क्रिप्शनसारखं."

आता दुसरा इलाज नव्हता म्हणून मंगेशनं मराठेंना विचारलं. म्हटलं, "यशोदेला त्या बाई ट्रीटमेंट देणार असल्या तर तिला मी दिल्लीला घेऊन येतो." ते म्हणाले, "अगदी जरूर या. माझ्याकडंच उतरा. मी बाईंना फोन करून अपॉइंटमेंट घेऊन ठेवतो. आठ दिवस वेळ काढून या."

ठरल्याप्रमाणं एक दिवस आम्ही शाम मराठेंच्या घरी जाऊन पोहोचलो. त्या वेळी त्यांची पत्नी मीना जिवंत नव्हती. पूर्वाश्रमीची किसन वराडकर. तिला मी लहानपणापासून ओळखत होते. ती विल्सन कॉलेजमधे, माझा भाऊ हरीश याची मैत्रीण होती. ती येरवड्याला सॅनिटोरियममधे आली की आम्ही तिला भेटायला जात होतो. शाम मराठे आणि तिचा मुलगा नयन दोघंच घरात होते. स्वयंपाकाला महाराज होता.

त्यांनी आमचं फार प्रेमानं आदरातिथ्य केलं. गाडीतून मला त्या बंगाली बाईकडं घेऊन गेले. पहिल्या वेळी, तिच्या हातातून येणाऱ्या लहरी थोड्या प्रमाणात मला जाणवल्या. नंतर त्या जाणवेनाशा झाल्या. म्हणून तिनं विजेच्या यंत्रानं त्या लहरी निर्माण करण्याचा प्रयत्न केला. पण माझ्या मानेवर व खांद्यावर त्याचा काही परिणाम झाला नाही.

तिथं असताना माझा भाऊ हरीश याचा मंगेशला फोन आला होता. मंगेशनं सांगितलं की, सहज चौकशी करायला त्यानं फोन केला होता. मला जरा आश्चर्य वाटलं. माझी सिटिंग्स संपल्यावर आम्ही मुंबईला येण्यासाठी आगगाडीत बसलो. ज्या कामासाठी इतका खर्च करून, इतक्या लांब गेलो ते साध्य झालंच नाही. दुखण्यात तिळमात्र फरक झाला नव्हता. गाडी मुंबईच्या जवळ येऊ लागली आणि मंगेश म्हणाला, "दिल्लीत असताना हरीशचा फोन आला होता. तेव्हा त्यानं एक वाईट बातमी सांगितली–तुझ्या आईला पॅरॅलिसिसचा ॲटॅक आला आहे. पण तेव्हा मी तुला काही बोललो नाही." मला एकदम मोठा धक्का बसला. माझा त्याच्या बोलण्यावर विश्वास बसेना. म्हटलं खरं सांग, "नुसता ॲटॅक आला की ती गेली?" तो म्हणाला "नाही, नुसता ॲटॅक आला असं तो म्हणाला. आपण घरी गेल्यावर अंघोळ करून तिला बघायला भांडूपला जाऊ." मुंबई येईपर्यंत मी अश्रू ढाळत, विचार करत राहिले. ज्या आईनं वडिलांच्या पश्चात पाच लहान मुलं व दोन चुलत बहिणी यांचं पालनपोषण, शिक्षण केलं. समर्थपणं आईची व वडिलांची भूमिका पार पाडली, नोकरी केली, वडील असताना वैभवात राहिलेली त्यांच्यानंतर गरिबीतही तितकीच स्वाभिमानानं राहिली, तिला मी अतोनात दु:ख दिलं. तिच्या इच्छेविरुद्ध, मनाविरुद्ध परधर्मातल्या मुलाशी लग्न केलं. मंगेशपेक्षा जास्त शिकलेला, चांगली नोकरी असलेला, आर्थिक दृष्ट्या सुस्थितीत असलेला नवरा मला नक्कीच मिळाला असता. माझं तरुणपण जास्त सुखात गेलं असतं. माझे चाललेले हाल बघून तिचा जीव तुटायचा. अशा आईला आता अपंग अवस्थेत, बिछान्यात पडलेली पाहायचं? त्यापेक्षा तिचा पटकन प्राण गेला असता तरी बरं झालं असतं, असं तेव्हा वाटलं. आणि नंतर तिचे जे हाल झाले ते बघून तर फार तीव्रतेनं तसं वाटलं.

घरी गेलो. डोक्यावरून अंघोळ केली. मग ट्रेननं भांडूपला गेलो. हरीश तेव्हा बुश रेडिओमधे मॅनेजर होता. त्याचा दोनमजली बंगला होता. अगदी वरच्या मजल्यावर आई असायची. खाली हॉलमधे भाऊ उभा होता. डोळे मोठे करून माझ्याकडं पाहत म्हणाला, "आता वर जाऊन मोठमोठ्यानं रडून गोंधळ करायचं काही कारण नाही."

मी जरा चमकून त्याच्याकडं पाहिलं आणि तिथं न थांबता वर पळाले. ती हताशपणं बिछान्यात पडली होती. मी तिच्या खाटेवर जाऊन बसले. ती रडायला लागली. आणि मी पण हरीशचं न ऐकता तिच्या छातीवर डोकं ठेवून मोठ्यानं रडले. खूप रडले. तिची उजवी बाजू लुळी पडली होती. तोंड वाकडं झालं होतं. नीट बोलता येत नव्हतं. थोडा वेळ बसले. समजूत तरी कशी घालणार! "तुला जरा बरं वाटलं की मी माझ्याकडं घेऊन जाईन. आता तू विसावा घे." असं म्हणून खाली आले. तिथं उषावहिनी होत्या. त्या फार काळजीत पडलेल्या दिसत होत्या. थोड्या चिडलेल्या पण. म्हणाल्या, "हे असले पेशंट किती पण वर्षं जगतात. मी एकटीच का सगळं करू?" माझ्या मनात आलं, खरंच, माझ्या आईला आणखीही दोन सुना आहेत. पण बाकीच्या दोन्ही भावांची घरं लहान होती. आर्थिक परिस्थिती पण सर्वसामान्य होती. आणि एवढी मोठी जबाबदारी अचानक घेण्याची त्यांची इच्छा पण नसावी.

मी त्यांना म्हणाले, "सासरच्या माणसांसाठी करावं लागतं वहिनी, अडचणीच्या वेळी. मी तर एकटीच सून आहे. मला तीन म्हाताऱ्या माणसांचं करायचं आहे. मी कुणाकडं तक्रार करू?" त्यावर म्हणाल्या, "ताई, तुम्ही म्हणजे मी नाही." मी गप्पच बसले.

आठ-पंधरा दिवसांनी आईला भेटायला भांडूपला येत होते. तिच्यात फारसा फरक दिसत नव्हता. तिच्या कामासाठी एक बाई ठेवली होती. ती तिचं तोंड आतून नीट धुवत नसावी. तिला नीट बोलता येत नव्हतं आणि गिळता पण येत नव्हतं. म्हणून तिला मी तोंड उघडायला सांगितलं तर जिभेवर व तोंडात जाड थर आलेला दिसला. गॉझ पीसेस घेऊन तिची जीभ स्वच्छ करून दिली. फिजिओथेरपिस्ट येत होती. कसली तरी इंजेक्शन्स चालू होती. तिची सर्व प्रकारे काळजी ते घेत होते. ती बरी होऊन चालायला लागेल याची भावाला खात्री वाटत होती. तेवढ्यात तिला दिलेल्या इंजेक्शनचं सेप्टिक झालं. मांडीवर मोठं ॲबसेस होऊन त्यात पस झाला. डॉक्टरला घरी बोलावून ते कापून घ्यावं लागलं. ताप येत होता. तिचा अशक्तपणा वाढत चालला. सुधारण्याचं लक्षण दिसेना.

दुपारी मी एकटीच एकदा तिला भेटायला गेले. घर सामसूम होतं. खाली दोन बाया बसल्या होत्या. "वहिनी कुठं आहेत?" मी विचारलं. एक जण म्हणाली, "त्या गेल्यात पुण्याला. त्यांच्या मुलाकडं." मी विचारलं, "किती दिवस झाले?" त्यावर म्हणाली, "झाले आठ, दहा दिवस. मी इथं स्वयंपाक करते आणि ही आयाचं काम करते. बसा ना तुम्ही. मी तुम्हांला काहीतरी खायला करून देते." मी म्हणाले, "नको नको, मला काही खायला नको आहे. मी वर जाऊन आईला भेटते." मी वर आले. आई पडून होती. मला तिनं विचारलं, "कधी आलीस? किती वाजले?" "मी आताच आले. चार वाजलेत." मग मी तिच्याशी बोलत बसले. "म्हातारपणी माणसाला काही ना काही होणारच. माझ्या सासूबाईंना तर कॅन्सर झाला आहे. तू तरी बरी होशील. पण कॅन्सर कसा बरा होईल?" असं काही

ना काही सांगून तिचं समाधान करायला बघत होते. दर पंधरा मिनिटांनी किती वाजले विचारायची. मला येताना बर्फी आण म्हणायची. आणली की, लहान तुकडे करून ठेवायला सांगायची. खोलीत आलेल्या प्रत्येक माणसाला एक एक तुकडा द्यायची. तोंड गोड करून पाठवायची. असं तिला का वाटत असेल? सांगता येत नाही.

हरीश घरी आला. त्याचा चेहरा खूप ताणलेला, काळजीत पडलेला दिसत होता. मंगेशनं माझ्या आईच्या खर्चासाठी म्हणून आधीच हजार रुपये काढून दिले होते. तिच्यासाठी आया ठेवावी लागली. त्याला एकट्यालाच सर्व खर्च पडायला नको असं आम्हांला वाटलं. त्याचा मोठा मुलगा राजू डॉक्टर झाला होता. तो पुण्याला राहत होता. हरीश म्हणाला, "उषा राजूकडं गेली आहे. तिचं ब्लडप्रेशर वाढलं. आईचं सगळं करणं फार त्रासदायक व्हायला लागलंय. सगळं स्वास्थ्यच नाहीसं झालंय." त्या वेळी पुन्हा एकदा वाटलं की ही जगलीच नसती तर बरं झालं असतं. तिला स्वत:ला त्रास आणि इतरांनाही. मी म्हणाले, "मी घरी जाते. मंगेशला विचारते. तो तयार झाला, तर मी आईला सायनला नेऊन ठेवते." मी घरी आले. मंगेशला विचारलं. तो म्हणाला, "माझी काही हरकत नाही. तुला झेपत असेल तर आण." थोडा मुलांचा पण विचार करायला पाहिजे होता. अजित सोलापूरला मेडिकल कॉलेजमधे होता. अंजू बी०ए०ला होती. अभय एस०एस०सी०ला बसणार होता. खाली सासूबाई कॅन्सरनं आजारी होत्या. काका खूप म्हातारे होऊन थकलेले होते. मी मुलांना जवळ बोलावून सगळं सांगितलं. "मी थोडे दिवसांसाठी माझ्या आईला इथं आणणार आहे. तिचा तुम्हांला थोडा त्रास होईल. ती रात्री रडते. चिडते, कधी ओरडते पण. तुम्ही लक्ष द्यायचं नाही. आपला अभ्यास शांतपणं करा. तुमचं वर्ष फार महत्त्वाचं आहे. त्यांनी बरं म्हटलं. अंजू मधेच मला विचारायला लागली की, "आई, तू वृद्धाश्रम काढते आहेस का?" मी म्हणाले, "असं नाही, ती सर्व आपलीच माणसं आहेत. ती आता म्हातारी झालीत. तरुण असताना त्यांनी आमच्यासाठी खूप कष्ट घेतलेत. आता आम्ही त्यांना बघितलं नाही तर कोण बघेल?"

एका खोलीत आईसाठी सर्व स्वतंत्र व्यवस्था केली. बेडपॅन, गिंडी, तांब्याभांडं सगळं जमा केलं. आणि भावाला फोन केला. "कधी येऊ अँब्युलन्स घेऊन? सर्व व्यवस्था केली आहे. मंगेशनं मोठ्या मनानं संमती दिली आहे." तो जरा थांबला आणि म्हणाला, "ताई, नको नेऊस तू तिला." मी म्हणाले, "का पण, कारण काय?" तर म्हणाला, "नको. तुझ्याकडं असताना तिचं काही बरंवाईट झालं तर ते बरं दिसणार नाही. असू दे तिला इथंच." एका अर्थी तेही खरंच होतं. कारण आई रिटायर झाल्यापासून हरीशनं तिला स्वत:च्या घरी ठेवून घेतलं होतं. "तू खूप कष्ट केलेस आता सुखानं माझ्या घरात रहा." असं सांगितलं. त्याची परिस्थिती चांगली होती. घर मोठं होतं. त्यानंच गेली बारा वर्षं तिची देखभाल केली होती. आता मृत्यूच्या वेळी मुलीच्या घरी, जावयापुढं उघड्यानागड्या अवस्थेत जाऊन राहणं.

जावई पण तिनं पसंत केलेला नव्हता. तो हिंदू आहे. तिच्या मनाविरुद्ध मी लग्न केलं असल्यामुळं तिला माझ्याकडं आणणं योग्य नव्हतंच. शिवाय मला माझ्या सासरच्या माणसांची जबाबदारी होतीच.

महिने जात होते. आईला तळमजल्यावर आणून ठेवलं होतं. वाचनाची तिला फार आवड होती. एकदा आम्ही दोघं तिला भेटायला गेलो होतो. जाताना न विसरता मिठाई घेतली. तिच्या खोलीत गेलो. तर ती डाव्या हातात रीडर्स डायजेस्ट धरून वाचत होती. आम्हांला बघून तिला फार आनंद झाला. मिठाईचे तुकडे कापून दिले. मंगेशला रीडर्स डायजेस्टमधला जोक वाचून दाखवायला लागली. तो टकलावरचा जोक होता. मंगेशला तेव्हा टक्कल पडायला सुरुवात झाली होती. ती हसत होती. मंगेशला ती सुशिक्षित व हुशार म्हणून आवडायला लागली होती. तसंच आपला जावई बुद्धिमान व प्रतिभावंत आहे याचा तिलाही अभिमान वाटायला लागला होता. जाईल तिथं सांगायची, "मंगेश पाडगावकर माझे जावई आहेत. मंगेश हिंदू असून, मनातून देव मानत असून, घरात देव ठेवणं, रोज पूजा-प्रार्थना करणं, सणवार, व्रतवैकल्यं, उपासतापास ह्यांपैकी काहीही करत नाही." पण म्हणून मी जर येशू ख्रिस्ताचा फोटो घरात आणून लावला तर ते त्याला चालणार नाही. पण त्याच्या देवाधर्माचा मला तसा काही त्रास झाला असंही नाही.

आईची आणि माझी ती शेवटचीच भेट ठरली. एका रात्री दीड वाजता भावाचा फोन आला : "सगळं संपलं." सकाळी आम्ही गेलो. मी अतोनात रडले. रडू आवरताच येईना. आई गेली. शिवडीला शांत, हिरव्यागार परिसरात एका शंकासुराच्या झाडाखाली तिच्यासाठी खड्डा खणलेला होता. तिची पेटी आत सोडली. आणि एका थकलेल्या श्रांत जिवाला कायमचा विसावा मिळाला. वडील कळत नसतानाच वारले होते. त्यांच्यासाठी असा शोक करण्याची वेळ येणार नाही. हे मनात आल्याशिवाय राहिलं नाही. आईचं दु:ख सहन होईना. मला झोप लागेना. जरा डोळा लागला की अर्धवट झोपेत भास व्हायला लागले...मी माझ्या खोलीत झोपले आहे. ती हॉलमधून चालत येते. तिची वाजलेली पावलं ऐकू येतात. ती दारावरचा पडदा बाजूला करते आणि आत डोकावून मला बघते. मी घाबरून जात होते. असे रोजच भास व्हायला लागले. दिवसभर मी बेचैन असायची. तिचा आत्मा माझ्या घरात माझ्या भोवती घोटाळतो आहे की काय? असं वाटायला लागलं. पण मी तर आत्मा वगैरे काही मानत नाही. मग हे आहे तरी काय? फारच त्रास व्हायला लागला. तेव्हा मी माझ्या सासूबाईंना सांगितलं. त्या एकदम गंभीर झाल्या आणि म्हणाल्या, "तुझ्यावरून उतरून टाकलं पाहिजे." ह्यापेक्षा जास्त काहीच बोलल्या नाहीत. काय टाकलं पाहिजे? काय टाकलं पाहिजे? मला काही ठाऊक नव्हतं, की माझा त्यावर विश्वासही नव्हता. तरी मी त्यांना नको म्हणाले नाही. कारण ह्यातून मला मुक्तता पाहिजे होती. सुखाची झोप पाहिजे होती. डॉक्टरला सांगावं असं वाटेना. म्हणून मी गप्प बसले. एका संध्याकाळी त्यांनी दोन अंडी मागवली. मला वाटतं, भात होता,

हळद, कुंकू आणि काय काय, आठवत नाही. सगळं एका पानावर ठेवलं. मला बोलावलं. उभं केलं. तोंडानं काहीतरी पुटपुटत ते माझ्याभोवती फिरवलं. मला म्हणाल्या, "हलू नकोस, इथंच उभी रहा." ते पान कामवाल्या बाईकडं दिलं आणि ते बाहेर तिठ्यावर कुठल्या जागी ठेवायचं ते सांगितलं. ती परत आल्यावर मला म्हणाल्या, "आता जा तू वर. मागं वळून पाहू नको."

खरं म्हणा, खोटं म्हणा. शहाणपणा म्हणा, मूर्खपणा म्हणा. माना, अगर मानू नका. पण त्या रात्री मला तसा भास झाला नाही. त्यानंतरही पुन्हा कधीच झाला नाही. ते सर्व मानसिक होतं. पण ज्या उपचारावर माझा विश्वास नाही त्या उपचारांनी मला कसं बरं वाटलं? त्याचं उत्तर मला ठाऊक नाही.

अजित एम०बी०बी०एस०चं पहिलं वर्ष पास झाला. तेव्हा मंगेशनं मला म्हटलं की, "तुझी इच्छा असेल तर थोड्या खटपटीनं मी त्याला, पुढच्या शिक्षणासाठी मुंबईला बदलून घेऊ शकेन." मुलं माझ्यापासून लांब गेली हे मला कधीच सहन झालं नाही. तरी त्याचं शिक्षण नीट पार पडावं म्हणून मी मन घट्ट केलं आणि सांगितलं की, "नको, त्याचं तिकडं ठीक चाललं आहे. तो घरी येऊन राहिला तर तसाच नीट अभ्यास करील याची मला खात्री नाही. तिकडं आहे तो बरा आहे." त्याला मेसमधलं जेवण मुळीच आवडत नव्हतं. जेवणाच्या बाबतीत त्याच्या फार खोडी आहेत. सोलापूरला त्यानं वेगवेगळ्या हॉटेलांतून डबा आणून पाहिला. त्याचे मित्र घरी आले की मला सांगायचे. त्याला कुठलंच जेवण आवडत नाही. हे सर्व मला ठाऊक होतं. पण मी विचार केला, जेवणाचं कौतुक करण्याची ही वेळ नाही. त्याचं शिक्षण होणं ही महत्त्वाची गोष्ट आहे. म्हणून त्याला मुंबईला आणण्याचा विचार केला नाही. शिक्षण सुरळीत पार पडलं. तो एम०बी०बी०एस० पहिल्याच वर्षी पास झाला. आम्हांला अतिशय आनंद झाला. मी सगळ्या 'साईप्रसाद'ला पेढे वाटले. एक वर्ष इंटर्नशिप होती. त्यातले सहा महिने बाहेरगावी सांगली जिल्ह्यातल्या तासगाव या तालुक्याच्या गावी.

नंतर मुंबईला आला. सकाळचं थोडं काम झालं की तो रिकामा असायचा. मला वाटलं, हा असा रिकामा राहण्यापेक्षा एखाद्या चांगल्या डॉक्टरकडं संध्याकाळी मदतीला गेला तर त्याला थोडा अनुभव मिळेल. पेशंटशी वागण्या-बोलण्याची पद्धत कळेल. ज्ञान मिळेल. त्या वातावरणाची सवय होईल. एक दिवस मी त्याला घेऊन डॉक्टर खंडेपारकरांच्या घरी गेले. त्यांना माझा विचार सांगितला. ते म्हणाले, "डॉक्टर आठवले सायनलाच असतात. ते अशा विद्यार्थी मुलांना काही महिन्यांसाठी कामाला ठेवून घेतात. थोडे पैसे पण देतात." मी म्हणाले, "ते फारच चांगलं होईल. अजितला चालत येता-जाता येईल इतक्या जवळ त्यांचा दवाखाना आहे. पण आमची त्यांची तशी ओळख नाही. तुम्ही त्यांना फोन कराल का?" ते म्हणाले,

"त्याला उद्याच चार वाजता तिकडं पाठवा मी त्यांना फोन करतो." दुसऱ्या दिवशी दुपारी अजित गेला. तो रात्र झाली तरी परतला नाही. मंगेश रात्री जेवून झोपायला गेला. दहा वाजून गेले. काय झालं ते कळेना. मी जेवले पण नाही. त्याची वाट बघत राहिले. शेवटी धीर करून डॉक्टर आठवल्यांचा फोन फिरवला. त्यांनीच उचलला. मी विचारलं, "अजित पाडगावकर तुमच्याकडं आला आहे का?" ते म्हणाले, "हो तो इथंच आहे. कामं चालू आहेत. तुम्ही काळजी करू नका. थोड्या वेळात तो घरी येईल." शेवटी अकरा वाजता अजित घरी आला. मग आम्ही जेवलो आणि झोपलो. त्यांच्याकडं काम करायला त्याला आवडायला लागलं. शिवाय ते महिन्याला ३०० रुपये त्याला पॉकेटमनीही द्यायचे. आणि मग रोजच हा कार्यक्रम सुरू झाला. अजितला गुरू भेटावा तसे ते भेटले. त्याचा आत्मविश्वास वाढला. ते लहान मुलांचे डॉक्टर. आयुर्वेदिक औषधांचा पण ते वापर करत. मुलांच्या आजारांची, औषधांची माहिती त्याला होत गेली. ह्या सर्व अनुभवाचा त्याला पुढं पुष्कळ फायदा झाला.

पुढं एम०डी०ला ॲडमिशन घेतली. त्याला गायनॅकॉलॉजी विषय पाहिजे होता, पण तो मिळेना. मंगेशनं बरीच खटपट केली. शेवटी पिडिॲट्रिक्स घेतलं आणि वाडिया हॉस्पिटलच्या हॉस्टेलमधे रूम घेतली. पुन्हा त्याचं सामान भरलं. अंथरूण-पांघरूण बांधलं. मंगेश म्हणाला, "यशोदा, तू चल आमच्याबरोबर. तू स्वत: त्याची खोली, सामान, बिछाना, तुझ्या हातांनी लावून दे. तुझा हात यश देणारा आहे." हे वाक्य ऐकून मी चमकून त्याच्याकडं पाहिलं. ह्यापूर्वी तो असं कधीच बोलला नव्हता. आज अचानक हे काय ह्याच्या मनात आलं.

आम्ही अजितबरोबर त्याच्या खोलीवर पोचलो. खोली मला आवडली. मी भराभर त्याचं जरुरीचं सामान बाहेर काढलं. चादरी, पांघरुणं काढली. बिछाना छानपैकी तयार केला. सर्व ठाकठीक झाल्यावर आम्ही जायला निघालो. अजित फारसा खूष नव्हता. कारण त्याला पिडिॲट्रिक्समधे टर्म मिळाली होती. गायनॅकमधे नव्हती. इलाज नव्हता. त्याला सोडून घरी आलो.

अजितला जाऊन महिना पण झाला नव्हता. मधेच एक दिवस तो घरी आला. त्याला ताप आला होता. तो स्वत: एम०बी०बी०एस० होता. एक दोन दिवस त्यानं स्वत:च औषधं घेतली. ताप कमी होईना म्हणून डॉक्टर श्रीखंडेबाईंना बोलावलं. त्यांनी तपासलं. म्हणाल्या, "मला वाटतं, हा टॉयफॉइड आहे." त्यांनी त्यावरच्या गोळ्या लिहून दिल्या. त्या गेल्यावर अजित मला म्हणाला, "आई, मम्मींनी डोस लिहून दिला तो कमी आहे." खरा डोस किती तो त्यानं मला सांगितला. मी तरी काय सांगणार? मला त्यातलं कळत नव्हतं. तसंच औषध चालू केलं. ताप कमी झाला.

मंगेश व मी दोन दिवसांनी गोव्याला जाणार होतो. घरात शांताबाई होत्या. अंजू तिच्या सासरी वरळीला होती. आणि अभय आय०आय०टी०त होता. खाली आजी, आजोबा होते. तो जरा बरा आहे असं बघून आम्ही गोव्याला गेलो. मंगेशचा

कार्यक्रम होता. तीन दिवसांनी परत आलो. अजित म्हणाला, ''आई, मला पुन्हा ताप येतो आहे.'' मी जरा घाबरले. हा कसला ताप असेल? त्याचे काही मित्र आले. ताप वाढत चालला होता. विजय पाटकरनं त्याच्या पॅथॉलॉजिकल तपासण्या करून घेतल्या. त्यात युरिनरी इन्फेक्शन आहे असं दिसलं. 'स्युडोमोनास' नावाचे जंतू आढळले. ते वाचून अजित भयंकर घाबरला. कारण त्या वेळी त्या जंतूंना नष्ट करणारं खात्रीचं औषध नव्हतं. अजित म्हणाला, ''मला असाच ताप येत राहणार. पाच वर्षांच्यावर मी जगणार नाही.'' आम्ही भयंकर घाबरलो. तापाचं प्रमाण चढतंच होतं. ओळखीचे लोक नातेवाईक (कधी न येणारे पण) भेटायला येऊ लागले. मी त्याच्याच खोलीत, दुसऱ्या कॉटवर झोपत होते. असे दोन महिने गेले. वाडिया हॉस्पिटलला जाऊन त्याचं सर्व सामान परत आणलं. खोली रिकामी करून दिली. ती टर्म सोडली. शेवटी मंगेशनं त्याच्या इतर सर्व तपासण्या करून घेतल्या. स्टूल्स, युरीन, ब्लड मोठ्या पॅथॉलॉजिस्टकडं पाठवलं. टी०बी०ची टेस्ट घेतली. सर्व नॉर्मल. फक्त 'स्युडोमोनास'ऐवजी 'ईकोलाय' जंतू युरीनमधे आले.

एकदा संध्याकाळी डॉक्टर आठवले स्वत: त्याला बघायला आले. सर्व रिपोर्ट्स पाहिले. त्याला ते चांगलेच ओळखत होते. मंगेशला पण कवी म्हणून ओळखत होते. बाबा पत्रिका पाहून भविष्य सांगतात असं अजितनं त्यांना सांगितलं होतं. म्हणून त्यांनी घरी आम्हां तिघांना जेवायला बोलावलं आणि सर्वांच्या पत्रिका दाखवल्या होत्या.

ते म्हणाले 'स्ट्रेप्टोमायसिन' इंजेक्शन सुरू करावं असं मला वाटतं.'' संध्याकाळी मम्मींना बोलावलं. त्या येण्याच्या आधी अजित मला म्हणाला, ''आई स्ट्रेप्टोमायसिनची मला ॲलर्जी तर येणार नाही ना?'' मी त्याची समजूत घातली. ''आधी तुला टेस्ट डोस देणार आहेत. काही झालं नाही तरच पूर्ण इंजेक्शन देणार.'' तो शरीरानं आणि मनानंही खूप खचला होता. घाबरला होता. पंचवीस वर्षांचा एम०बी०बी०एस० झालेला तरुण मुलगा असा इतके महिने तापानं पडलेला, निराश झालेला पाहून माझा जीव तिळतिळ तुटत होता. मी त्याला सांगितलं, ''अजित, तू काळजी करू नकोस. वाट्टेल ते झालं तरी मी तुला बरं करणार आहे. जगातून कुठूनही डॉक्टर आणि औषध आणीन पण तुला बरं केल्याशिवाय राहणार नाही.'' तो लहान नव्हता. त्याला माझ्या मर्यादा ठाऊक होत्या. तरी त्यानं खचून जाऊ नये म्हणून मी त्याला धीर देत होते.

संध्याकाळी मम्मी वर आल्या. त्याला स्ट्रेप्टोमायसिनचा टेस्ट डोस दिला. थांबल्या. घड्याळ बघत बसल्या. काही रिॲक्शन आलेली दिसली नाही. म्हणून त्यांनी इंजेक्शन दिलं आणि निघून गेल्या. रात्र झाली होती. अजित झोपला. मी पण बाजूच्या कॉटवर झोपले. मध्यरात्री मला एकदम जाग आली. अजित बाथरूमला जाऊन परत येत होता. खिडकीतून त्याच्या तोंडावर उजेड पडला. मी त्याच्याकडं पाहिलं तर त्याचा चेहरा लालभडक होऊन दुप्पट मोठा दिसला. ताडकन उठले.

दिवा लावला. बघते तर तो डोक्यापासून पायापर्यंत फुलला होता. ताप पाहिला तो १०४° वर चढलेला. जाऊन मंगेशला उठवून आणलं. बघून तो पण घाबरला. सकाळ होण्याची वाट बघत बसलो. शेवटी अजित म्हणाला तशी त्याला इंजेक्शनची रिॲक्शन आली होती. ती भयंकर होती. काळजाचं पाणी पाणी होत होतं. सकाळीच तीन डॉक्टरांना फोन करून घरी बोलावलं. पॅथॉलॉजिस्ट डॉक्टर गायतोंडे, फिजिशियन डॉक्टर राममूर्ती, युरॉलॉजिस्ट डॉक्टर फडके तिघेही सकाळीच घरी आले. त्यांनी चर्चा करून सांगितलं, "त्याची सर्व औषधं सध्या बंद करा. कुठल्याही क्षणी त्याला अतिदक्षता विभागात ॲडमिट करावं लागेल." ते निघून गेले. आता काय करणार? काहीच औषध नाही. हे कमी कसं होईल?

सायनला डॉक्टर हब्बू नावाचे प्रसिद्ध होमिओपाथीचे डॉक्टर होते. त्यांची माझी फार चांगली ओळख होती. माझ्या प्रकृतीसाठी मी वेळोवेळी त्यांच्याकडून औषध आणत होते. ते माझ्याशी फार आपुलकीनं वागायचे. त्यांचा दवाखाना अगदी चालत जाण्याच्या अंतरावर. मंगेश ऑफिसला गेल्यावर मी त्यांच्याकडं जायचं ठरवलं. शांताबाईंना अजितकडं लक्ष ठेवायला सांगून खाली उतरले. त्यांच्याकडं गेले. थोडक्यात त्यांना सर्व सांगितलं. "सर्व औषधं बंद केलीत. तुम्ही काही तरी देऊ शकाल का?" असं म्हटलं. आणि मला रडू आवरेना. त्यांच्या पुढंच मी रडायला सुरुवात केली. त्यांनी माझी समजूत घातली. म्हणाले. "मी अनिलला दुपारी तुमच्या घरी पाठवतो. तो त्याला बघून येईल. मग काय औषध द्यायचं ते मी ठरवतो." अनिल त्यांचा डॉक्टर मुलगा. ॲलॉपाथीत एम०डी० केलेलं. नंतर होमिऑपाथीचं इंग्लंडमधे शिक्षण घेतलेलं. त्यांच्याबरोबर तो प्रॅक्टिस करायचा. मी घरी आले. अजितला सगळं सांगितलं. तो 'बरं' म्हणाला.

दुपारी डॉक्टर अनिल आला. त्यानं अजितचं नीट निरीक्षण केलं. मग म्हणाला, "हे मी तीन दिवसांत कमी करू शकतो. तुम्ही माझ्याबरोबर या. मी औषध देतो."मी त्याच्याबरोबर गेले. त्यानं काही पुड्या, गोळ्या दिल्या. त्या कशा, केव्हा घ्यायच्या ते सांगितलं. मी जवळजवळ पळतच घरी आले. पहिली पुडी अजितला दिली. सांगितल्याप्रमाणं इतर गोळ्या देत होते. निदान काही उलटा परिणाम दिसत नव्हता. दुसऱ्या दिवशी सकाळी पाहिलं तर अंगावर उठलेली पुरळ किंचित दबल्यासारखी दिसत होती. थोडा लालपणा कमी झाला होता. दुसऱ्या दिवशी आणखी फरक वाटला. तिसऱ्या दिवसानंतर माझी भीती खूप कमी झाली. मी पुन्हा डॉक्टर हब्बूंकडं गेले. फोड, पुरळ सुकत चालल्याचं आणि तापही गेला असल्याचं त्यांना सांगितलं. दिलेलं औषध घेतलं. त्यांचे मनोभावे आभार मानून घरी आले. अजित बिछान्यात उठून बसू लागला होता. सापानं कात टाकावी तशी त्याची कातडी सुकून निघायला लागली. अगदी तळहात व तळपायाची जाड चामडीसुद्धा सुकून पडत होती. ती तो काढून कागदावर त्याचा ढीग करून ठेवायचा. केस कितीतरी गळून गेले. हळूहळू तो सुधारत होता. म्हणजे त्याचा पुनर्जन्मच झाला असं म्हणायला हवं.

डॉ० अजित फडके म्हणाले. "चार महिने तो बिछान्यात आहे. आणखी थोडी शक्ती आली की त्याला मुंबईबाहेर हवा बदलायला पाठवा. त्याप्रमाणं मंगेशनं पाचगणीला राहण्याची व्यवस्था केली. अभयला सुट्टी पडल्यावर दोन्ही मुलं मी व माझी चुलत बहीण विमल असे चौघे पाचगणीला गेलो. हॉलिडे होममधे असल्यामुळं आम्ही ब्रेड व इतर सामान विकत आणून स्वत:च काही पदार्थ करून जेवत होतो. पैसे फार मोजके होते. रोज किती खर्च करायचा ते ठरवून ठेवलं होतं. त्या हवेत आणि निसर्गाच्या सान्निध्यात अजितचा मूड एकदम बदलला. सकाळी उठून दोघे भाऊ फिरायला जायचे. भरपूर खायचे-झोपायचे. अतिशय आनंदात दिवस गेले. गेलेला आत्मविश्वास पुन्हा मिळाला. आम्ही मुंबईला परतलो. पिडिॲट्रिक्सची टर्म गेली होती. मंगेशनं पुन्हा नव्यानं गायनॅकसाठी प्रयत्न केले. त्याला यश आलं. अजितच्या नशिबानं त्याला तो विषय मिळाला. जे०जे० हॉस्पिटलच्या हॉस्टेलमधे तो राहायला गेला. आमचा अजित आम्हांला परत मिळाला.

सासूबाईंची प्रकृती बिघडत चालली होती. सायन हॉस्पिटलमधे डॉक्टर शहा यांना दाखवलं. ते म्हणाले, "ऑपरेशन करावं लागेल. जखम ओली झाली आहे आणि ती तशीच गळत राहील. म्हणून तिथला संपूर्ण भागच काढून टाकला पाहिजे." सर्वांनाच वाईट वाटलं. सत्तरीनंतर त्यांच्यावर ही वेळ यावी हे कोणालाच सहन झालं नाही. इलाज नव्हता. ऑपरेशन झालं.

त्याच सुमारास अंजूला पहिल्याच वेळी दिवस गेले होते. तिला नऊ महिने पूर्ण होण्याआधीच सासूबाईंना पुन्हा ॲडमिट करावं लागलं. अंजू बाळंतपणाला आली. त्या वेळी अजित जे०जे० हॉस्पिटलला एम०डी० करत होता. तो हॉस्टेलमधे राहत होता. अभय आय०आय०टी०ला हॉस्टेलमधे व मंगेश कार्यक्रमासाठी गोव्याला गेला होता. घरात मी आणि शांताबाई. शनिवार, रविवार म्हणून मुलं घरी आली होती. दिलीप अंजूला घेऊन आला होता. संध्याकाळी सर्व जण एका लग्नाला जाऊन आलो. रात्री दहानंतर तिच्या पोटात थोडं दुखायला सुरुवात झाली. सकाळपर्यंत कळा वाढल्या. तिची नर्सिंग होममधे निघण्याची तयारी केली. अजित, अभय आपापल्या कामासाठी हॉस्टेलवर निघून गेले. दिलीपनं आम्हांला दोघींना डॉक्टर श्रद्धानंद ठाकूर यांच्या शिवाजी पार्कच्या 'गोकुळ' नर्सिंग होममधे नेलं. तो म्हणाला, "मी थांबू शकत नाही. वडील मला रजा देणार नाहीत. मी लॅबॉरेटरीत जातो. संध्याकाळी येतो." डॉक्टरांनी तिला तपासलं. सांगितलं की, तिला अजून पुष्कळ वेळ आहे. घरी घेऊन जा. जास्त कळा येऊ लागल्यावर आणा. तेव्हा मात्र मी गडबडले. त्यांना मी सांगितलं, घरात एकही पुरुष माणूस नाही. आम्ही तिसऱ्या मजल्यावर राहतो. मंगेश गोव्याहून दोन दिवसांनी येणार आहे. मुलं होस्टेलवर गेलीत. दिलीप संध्याकाळपर्यंत येणार नाही. तिला घरी नेलं तर, येताना टॅक्सी आणण्यापासून सर्व घाईगडबड मला एकटीला करावी लागेल. दिलेल्या तारखेच्या

आधीच पंधरा दिवस तिच्या पोटात दुखायला लागल्यामुळं हा गोंधळ झाला. मंगेशनं हा शेवटचा कार्यक्रम घेतला आहे. त्यानंतर तो बाहेरगावी जाणार नाही असं ठरलं होतं. डॉक्टरांनी आम्हांला दोघींना तिथंच राहण्याची परवानगी दिली. इतकंच नाहीतर तिच्याबरोबर माझ्यासाठी चहा व जेवणसुद्धा पाठवून दिलं. कलावंतावर निरपेक्ष बुद्धीनं प्रेम करणारे डॉक्टर ठाकूर व त्यांची पत्नी निर्मला यांनी पाडगावकर तिथं हजर नसूनही आम्हांला अतिशय आपुलकीनं मदत केली व धीर दिला.

अंजूच्या कळा वाढत नव्हत्या. संध्याकाळी दिलीप आला. रात्री श्री० पु० भागवत व विमलताई दोघे आले. माझा धीर सुटत चालला. चोवीस तास होऊन गेले होते. अंजूचे हाल मला बघवेनात. मी श्री०पुं०ना सांगितलं, "आता मला तिच्या जवळ थांबवत नाही." ते म्हणाले, "यशोदाबाई, तुम्ही बाहेर जाऊन बसा. विमल तिच्याजवळ थांबेल." मी बाहेर जाऊन जिन्याच्या पायरीवर बसले आणि मला रडू आवरेना. शेवटी बारानंतर फॉरसेप्स की व्हॅक्यूम लावून मूल बाहेर काढलं. मुलगी होती. मी अंजूजवळच राहिले.

दुसऱ्या दिवशी सर्वांना कळवलं. मंगेश घरी आला. शांताबाईंनी त्याला सांगितलं, "मुलगी झाली." त्याला खरंच वाटेना. "इतक्या लवकर कशी बाळंत झाली?" आश्चर्य आणि आनंद. ते आमचं पहिलं नातवंड. आम्ही आजी-आजोबा झालो. वसंत बापट भेटायला आले. अंजू म्हणाली, "बापटकाका, एखादं चांगलं नाव सुचवा ना!"त्यांनी दोन-तीन नावं सुचवली. त्यात एक 'रैना' होतं. दुसरं 'मानसी'. "पण मानसी ठेवू नका. कारण ते नाव मी माझ्या काव्यसंग्रहाला देणार आहे. तुम्ही सारखं मानसीनं शू केली. मानसीनं आणखी काय केलं, म्हणाल. ते काही मला बरं वाटणार नाही." तेव्हा रैनाच नाव पक्कं झालं. सर्वांना ते आवडलं होतं.

सासूबाईंची तब्येत बिघडत चालली होती. ऑक्सिजन लावावा लागे. त्यांना घरी न्यायला सांगत होते. एकाच वेळी बाळंतीण घरात आणि कॅन्सरनं आजारी (हाताबाहेर) असलेला पेशंट मी एकटी कशी सांभाळणार? मंगेशनं डीन डॉक्टर अहिल्या पुंडे यांना सांगून आईला हॉस्पिटलमधेच ठेवण्याची व्यवस्था केली. त्या वेळी ती फार मोठी मदत त्यांनी केली. थोडे दिवस सुहास त्यांच्याजवळ झोपायला जायची. नंतर प्रभानं 'शोभा' नावाची मुलगी दिली. ती सोबतीला राहत असे. मला घरच्या व्यापातून फार थोडा वेळ मिळे. त्यांचे सारखे निरोप यायचे, "यशोदेला येऊन जायला सांग." एकदा रात्री अकरा वाजता सुहासचा फोन आला. "आईनं तुम्हांला आता भेटायला बोलावलं आहे."

इतक्या रात्री का बरं बोलावलं? मंगेश बाहेरगावी गेलेला. अंजू, रैना घरात. अकरा वाजता रात्री मी एकटी चालत इतक्या लांब कशी जाऊ? सोबत नाही की वाहन नाही. मी तिला सांगितलं, "मी उद्या सकाळीच लौकर येते." तशा त्या बऱ्या आहेत ना?" ती म्हणाली, "तशी बरी आहे. पण तिला तुम्हांला काहीतरी सांगायचं

आहे. तुम्ही सकाळीच या.''

मी सकाळीच उठून, अंघोळ करून हॉस्पिटलमधे पळाले. त्यांच्याजवळ जाऊन बसले.

''कशाला बोलावलतं? मी विचारलं.

म्हणाल्या, ''मला वाटलं की मी आता मरते. पण त्याआधी मला तुला काही सांगायचं होतं.''

''काय सांगायचंय?''

''माझा तुला आशीर्वाद आहे. तुझं आणि तुझ्या मुलाबाळांचं चांगलं होईल. माझं काही चुकलं असेल तर मला क्षमा कर.''

मी म्हणाले, ''असं काय बोलता तुम्ही? तुमची प्रकृती सुधारेल. आणि माझी क्षमा काय मागता?'' त्यावर त्या काही बोलल्या नाहीत. एवढंच म्हणाल्या, ''ह्या वेळी घरातून निघतानाच मी समजले होते की, मी पुन्हा घरी जाणार नाही. म्हणून दागिन्यांचा डबा येताना तुझ्याकडं देऊन आले.''

मंगेशच्या वाढदिवसाची त्यांना आठवण होती. तोपर्यंत जणू त्या जीव धरून थांबल्या होत्या. १० मार्चला त्यांनी वाढदिवसाची आठवण केली. मंगेश हा त्यांचा एकच अतिशय लाडका मुलगा. तो ज्ञानेश्वरासारखा बुद्धिमान व प्रतिभावंत व्हावा असं त्यांना वाटत असे. त्याचं पुष्कळसं यश, त्यांनी बघितलं. प्रसिद्धी, मानमरातब पाहिले. लग्नानंतर घेतलेल्या शिक्षणातलं, पहिल्या दर्जाचं यश पाहिलं. गोल्ड मेडल्स पाहिली. त्याच्या यशात माझा पण अर्धा वाटा आहे. म्हणून त्यांनी अशा प्रेमानं मला आशीर्वाद दिला असावा.

१९७७ साली, ११ मार्चला संध्याकाळी मंगेश त्यांच्या शेजारी उभा असताना त्यांनी, ''मंग्या मी आता जातंय.'' असं म्हणत प्राण सोडला. एक पर्व संपलं. काका मागं एकटेच राहिले.

कुमुदिनी काकांना भेटायला आली होती. नंतर ती माझ्याकडं आली. खूप वेळ गप्पा मारत बसली होती. बोलता बोलता म्हणाली, ''दोन दिवस लागोपाठ माझ्या घरात एक घटना घडली.'' मी म्हणाले, ''काय?''

''काय झालं! दुपारी मी एकटीच घरात काम करत होते. खोलीतला पंखा चालू होता. अचानक एक चिमणी आत आली, आणि एकदम पंख्याच्या पात्यावर आपटून खाली पडली. काहीतरी आवाज झाला म्हणून मी बघते तर, चिमणी खाली मरून पडलेली. मला फार वाईट वाटलं. तिला उचलून खाली टाकून दिलं. दुसऱ्या दिवशी दुपारी पुन्हा माझं लक्ष नसताना फडफड आवाज आला म्हणून जाऊन बघते तर दुसरी चिमणी तशीच मरून खाली पडली आहे. मी फार घाबरले. हे चाललंय तरी काय? मी ऑपरेशन करून घ्यायचं ठरवलं त्यामुळं माझ्या मनात सारखे तेच

विचार चालू होते. आणि अशा वेळी पुन्हा पुन्हा हा लहानशा पक्ष्याचा मृत्यू मला माझ्या घरातच का पाहावा लागतो कळत नाही.''

हे ऐकल्यावर खरं तर मी पण मनातून थोडी चरकले होते. पण तसं तिला न भासवता तिचं समाधान करत राहिले.

सासूबाई वारल्यावर काका आणि चंद्रभागा दोघंच खाली होते. चंद्रभागेचा पगार वाढवला आणि तिला सांगितलं की, ''तुमच्या दोघांचा आमटी भात तूच करत जा. वर मी काही वेगळं केलं तर खाली पाठवून देत जाईन.'' मंगेशच्या पाठची बहीण कुमुदिनी ही दर पंधरा दिवसांनी त्यांना भेटायला यायची. येताना काहीतरी करून आणायची. त्यांना खायला द्यायची. बसून त्यांचे फाटलेले कपडे शिवायची. नंतर वर येऊन माझ्याशी गोष्टी करत संध्याकाळपर्यंत बसायची.

अशीच ती एकदा आली. जरा अस्वस्थ दिसत होती. म्हणाली, ''वहिनी मी ऑपरेशन करून घेणार आहे. माझं वजन मला सहन होत नाही. त्यासाठी हे ऑपरेशन आहे. मुंबईच्या उकाड्यात जीव हैराण होतो.'' मी घाबरले. ''असं करू नको. त्यासाठी ऑपरेशनशिवाय वेगळे काही उपाय असतील. व्यायाम असतील, आसनं असतील ती कर. आधीच तुझी तीन ऑपरेशन्स झालीत. त्यात तुला डायबिटीस. आणखी कापाकापी करायची कल्पनाच कशी सहन होते तुला?'' माझ्या बोलण्याकडं तिनं फारसं लक्ष दिलं नाही. म्हणाली, ''सगळी व्यवस्था झालीय.'' तिला चार मुली. पहिली शोभा ती एम०बी०बी०एस० होऊन डॉक्टर विवेक देसाईबरोबर लग्न केलं होतं. दुसरी मेधा ती एम०बी०बी०एस होऊन एम०डी० करत होती. तिसऱ्या शैलजा-पद्मजा ह्या जुळ्या मुली. फारच हुशार. त्या दोघी के०ई०एम०ला मेडिकलच्या दुसऱ्या वर्षाला एकाच वर्गात होत्या. म्हणजे जावई, विवेक धरून घरात पाच डॉक्टर्स शिवाय गुरुमामा. ह्या सर्वांच्या विरोधाला न जुमानता तिनं हट्टानं हा निर्णय घेऊन सर्वांकडून सर्व व्यवस्था करून घेतली होती.

अजितचं लग्न नुकतंच झालं होतं. दिलीप, अंजू, अजित, कमल व मी सगळ्यांनी पुण्याला चार दिवस हॉटेलात जाऊन राहायचं ठरवलं होतं. आमचं रिझर्वेशन केलेलं होतं. तिनं ऑपरेशनचा दिवस सांगितला त्याच्या दुसऱ्या दिवशी सकाळीच आम्ही गाडीत बसणार होतो. ऑपरेशनची वेळ दुपारनंतर होती. आम्ही विचार केला की, संध्याकाळीच हॉस्पिटलमधे जावं. ऑपरेशन झाल्यावर तिला भेटावं. मग घरी येऊन सामान बांधावं. स्वयंपाक करून जेवून झोपावं. आणि सकाळी उठून पुण्याला जावं. त्याप्रमाणं आम्ही गेलो. चारी मुली, जावई विवेक, गुरुमामा तिच्या खोलीत थांबलेले होते. अजून ऑपरेशन संपलं नाही असं कळलं. तासानंतर पुन्हा चौकशी केली. ऑपरेशन झालं पण ऑबझर्वेशनसाठी आतच ठेवून घेतलं म्हणाले. पुन्हा तासानं चौकशी केली. अजूनही बाहेर आणता येणार नाही असं समजलं. आता मात्र माझ्या मनात शंका आली, की काहीतरी गडबड आहे. संध्याकाळ होऊन गेली. डॉक्टर पण स्वत: येऊन भेटले नाहीत. किंवा काही

अडचण आहे असं सांगायला पण कोणी बाहेर आलं नाही.

वाट बघून, आम्ही घरी निघून आलो. दुसऱ्या दिवशी सकाळी पुण्याला गेलो. मंगेश, चंद्रभागा आणि काका घरीच होते. काका जवळ जवळ बहिरे झाले होते. आजूबाजूला कोण काय बोलतं ते त्यांना ऐकू येत नसे. त्यांना काहीच सांगितलेलं नव्हतं.

आमची पुण्यात मजा चालू होती. सगळे आनंदात होते. रात्री जेवायच्या आधीच मंगेशचा फोन आला की कुमू फार सीरियस आहे. तिला के०ई०एम०ला हलवलंय. तिला अतिदक्षता विभागात ठेवलंय. शरीरात रक्त गोठण्यासाठी जे द्रव्य असतं ते तिच्या शरीरातून नाहीसं झालं आहे. त्यावर दिलेली औषधं लागू पडत नव्हती. रक्त देण्यासाठी बाहेर मेडिकलच्या विद्यार्थांची रांग लागली होती. पण दिलेलं रक्त शरीरातून सर्व वाटांनी बाहेर पडत होतं. आम्हांला कोणालाच आत जाऊ देत नाहीत. तू घाई करून येऊ नकोस. काही उपयोग होणार नाही. ऐनवेळी गाडीत जागा पण मिळणार नाही. तेव्हा तू मुलं येतील तेव्हाच त्यांच्या बरोबर ये. हे सगळं खरं असलं तरी माझा जीव तिकडं जायला तडफडत होता. ट्रीपमधला आनंद तर गेलाच होता. मुलं पण मला एकटीला जाऊ द्यायला तयार नव्हती. नाइलाजानं तडफडत मी तिथंच राहिले. लक्ष सगळं फोनकडं होतं. आणखी एक दिवस मधे गेला. तिसऱ्या रात्री फोन आला–ती वारली असा. दुसऱ्या दिवशी आम्ही निघणारच होतो. त्याप्रमाणं निघालो. घरी गेलो. तिचं दर्शनही झालं नाही. मन फार खिन्न झालं. मंगेशनं खूप धावपळ केली होती. सर्व व्यर्थ गेलं. मुली पोरक्या झाल्या. गुरुमामा एकटे पडले.

मरण आलं की बुद्धी पण तशीच फिरते म्हणतात. त्याचं प्रत्यंतर आलं. तिनं लगेचच हे ऑपरेशन टाळलं असतं तर आणि किती तरी वर्षं ती जगली असती.

ही भयंकर बातमी काकांना कशी सांगायची? कुमुद, जाताना सांगून गेली होती की, "मी काकांना ऑपरेशनबद्दल काही सांगितलेलं नाही. तुम्ही पण सांगू नका. मी बरी झाले की त्यांना येऊन भेटेन."

काकांना तिचं ऑपरेशन आहे हेच माहीत नव्हतं. कसलं ऑपरेशन हे पण माहीत नव्हतं. ऐकू येत नसल्यामुळं घरात काय बोलणी चाललीत, काही गडबड आहे हे पण कळलं नाही. आता एकदम ही बातमी सांगितली तर म्हातारपणी फार मोठा धक्का बसला असता. समजावून सांगायला गेलं तर ऐकू येत नाही. आम्ही खूप विचार केला आणि ठरवलं की, मंगेशनं त्यांना एक पत्र लिहावं आणि त्यात कुमूला हार्ट अॅटॅक आला आणि ती वारली असं लिहावं. त्याप्रमाणं पत्र लिहिलं. त्यांना वाचायला दिलं. ते त्यांनी शांतपणं वाचलं. रडायला लागले. काही प्रश्न विचारले. खालच्या ब्लॉकमधे गेल्यावर खूप रडले असं चंद्रभागा सांगत होती.

गुरुमामांना भेटायला गेलो. मला पाहून ते बांध फुटल्यासारखं रडायला लागले. ते बघून माझ्या काळजाचं पाणी पाणी झालं. एकदा भेटणं तर आवश्यकच होतं. नंतर कुमुदिनीनं ऑपरेशन व्हायच्या आधी आठच दिवसांपूर्वी सांगितलेली पंख्यात

सापडून मृत्यू आलेल्या दोन चिमण्यांची गोष्ट सतत आठवून भिववत राहिली.

रैना मोठी होत होती. दिलीप अंजू सुट्टी असेल तेव्हा तिला घेऊन सायनला यायचे. मंगेशचा तिच्यावर फार जीव जडला. स्वत:च्या मुलांचे केले नाहीत असे तिचे लाड करायचा. तिच्यासाठी गाणी करायला लागला. ''रैनाबाई, रैनाबाई सांभाळ तुझा कोंबडा.'' तसंच मोराचं गाणं ''कुठून तरी येऊन बसला मोर माझ्या घरावर!''

ती सात महिन्यांची झाली. आणि एक दिवस सकाळीच वरळीहून अंजलीचा फोन आला, ''रैनाला पाण्यासारखे मोठे जुलाब होत आहेत. एक तासात पाच वेळा झाले.'' मी तिला सांगितलं, ''तुझ्या घरात एकत्र कुटुंबात येऊन मी तुला मदत करू शकणार नाही. तेव्हा तू तिला घेऊन सायनला ये.'' त्याप्रमाणं ती आली. अजितनं तिला डॉक्टर आठवलेंना दाखवलं. त्यांनी सांगितलं हा गॅस्ट्रो आहे. गंभीर दुखणं आहे. केव्हाही तिला त्यांच्या हॉस्पिटलमधे ॲडमिट करता यावं म्हणून चिठ्ठी देऊन ठेवली होती. अजित म्हणाला, शक्यतो ॲडमिट करायचं नाही. कारण अशा नाजूक अवस्थेत इतर आजारी मुलांमुळं दुसरं काही इन्फेक्शन होण्याची शक्यता असते. घरीच सर्व काळजी घेऊन बसलो. ताप चढत होता. जुलाब थांबत नव्हते. अभय झोपेतून उठून, तिला बघून जात होता. अजित लक्ष ठेवून होता. अंजू थकून मधेच झोपी जात होती. पुन्हा उठत होती. रात्र सरत नव्हती. फारशी सुधारणा दिसत नव्हती. असे दोन दिवस गेल्यावर जुलाबांचं प्रमाण कमी होत गेलं. तिची पचनशक्ती वाढेपर्यंत काळजी घ्यावी लागली. हळूहळू ती सुधारली. अंजू पुन्हा वरळीला गेली.

रैना नऊ महिन्यांची झाली. टेबलाला, खुर्चीला धरून उभी राहायला लागली होती. हाताला लागेल ती वस्तू घ्यायची, सरकवायची, फेकून द्यायची. सगळे ड्रम भरून खेळ घरभर पसरवून टाकायची. घर आवरायला एक माणूस तिच्यामागं धावायला लागू लागलं. अंजूला दुपारी झोपायला पाहिजे असायचं. म्हणून ती तिला बेडरूममधे घेऊन दार बंद करून घ्यायची. थोडे खेळ तिच्यासमोर ठेवून झोपायची. अंजू जास्त झोपते म्हणून दिलीपची थोडी तक्रार असायची. पण तिची झोप कमी झाली नाही.

एक दिवस सकाळी दिलीपचा फोन आला की, ''अंजूला फार ताप आला आहे. १०५° पर्यंत चढला होता. मग डॉक्टरांना बोलावलं. त्यांनी इंजेक्शन दिलं. आता थोडा कमी झाला आहे. १०५° डिग्री म्हटल्यावर मी दचकले. हा साधा ताप नसावा. वेगळंच लक्षण दिसतं. दिलीप कामाला गेला होता. मी लगेच वरळीला गेले. अंजू गुंगीत पडून होती. आता ताप कमी झाला असला तरी तो चढण्याची शक्यता आहे म्हणून काही तास मी तिथंच राहिले. आणि तसंच झालं. ताप पुन्हा चढायला लागला. मी तिला आणि रैनाला सायनला न्यायचं ठरवलं. कारण तिथं राहून त्यांची

काळजी घेणं मला जमलं नसतं. टॅक्सी बोलावली. त्यांचे कपडे बांधले. रैनाच्या बाटल्या घेतल्या आणि संध्याकाळी सायनला आले. ताप वाढतच होता.

रात्री आठ-साडेआठला अभयचा फोन आला. आवाज जड झाला होता. म्हणाला, "आई, मला ताप आलाय. उद्या माझी एक परीक्षा आहे. ती झाली की मी घरी येतो." दुसऱ्या दिवशी दुपारपर्यंत अभय तापातच घरी आला. आला तसाच थकून बिछान्यात झोपला.

रात्री अजित 'सेंट जॉर्जेस'मधून घरी आला. त्याला सांगितलं, तर तो म्हणायला लागला, "मला पण ताप आला आहे. मी झोपतो." मला हे काय चाललं आहे तेच कळेना. रैनाला दूध देत होते. तिला सांभाळत होते. तिघांना ताप उतरण्याच्या गोळ्या देत होते. शांताबाईंच्या मदतीनं आमचं जेवण करत होते. ताप असणाऱ्यांना पेज, रव्याची कांजी, चहा, कॉफी देत होते.

त्याच्या दुसऱ्या दिवशी मंगेशला ताप आला. तो अभयच्या बाजूला झोपला. अंजू, अभय यांच्या तापाचं प्रमाण खूपच जास्त होतं. १०४°, १०५° असं टेंपरेचर जात होतं. तर मंगेश व अजित १०२°, १०३° या प्रमाणात तापत होते. अंजू-अभयची काळजी वाटायला लागली. ते दोघं बेशुद्ध झाल्यासारखे पडून होते. अजितनं मात्र त्याच अवस्थेत उठून मेडिकलची पुस्तकं काढून वाचली. आणि सांगितलं की हा 'डेंग्यू' ताप आहे. तोपर्यंत मी तर हे नावसुद्धा ऐकलं नव्हतं. "तापाची मुदत संपेल तेव्हाच तो जाईल. तोपर्यंत काहीही औषध दिलं तरी तो जाणार नाही. जाताना अंगावर रॅश येईल. मगच तो उतरेल."

पाचव्या दिवशी दिलीप सायनला आला. तो ताप घेऊनच. तोही येऊन झोपला. त्याला उलट्या व्हायला लागल्या. तो सारखा "अंजू, अंजू" करायला लागला. ती उठू शकत नव्हती. बेशुद्ध झाल्यासारखी पडून होती. हाक मारलेली पण तिला ऐकू येत नव्हती, की आपली लहान मुलगी आहे तिची ती चौकशी करत नव्हती. दिलीपची काळजी मीच घेत होते. धीर देत होते. माझ्या घरावर हे कसलं अरिष्ट आलं? माझी तरणीताठी मुलं कमरेतून मोडली. त्यांना उठून बाथरूमपर्यंत जाणं कठीण होऊ लागलं. कोणाचाच ताप उतरेना. ताप चढला की कपाळावर थंड घड्या घालत मी ह्या खोलीतून त्या खोलीत फिरत होते. माझ्या मागं रैना धडपडायची. नशिबानं ह्या तापानं तिला आणि मला गाठलं नव्हतं.

अंजू आणि अभयची अवस्था बघून मला फार काळजी वाटायला लागली. अजित तसा लहान व अननुभवी. म्हणून दुसऱ्या कोणातरी डॉक्टरला दाखवावं, जरूर पडली तर ॲडमिट करता यावं, म्हणून मी डॉक्टर खंडेपारकरांना फोन केला, आणि घरी येऊन सर्वांना बघून जाण्याची विनंती केली. त्यांचा चांगुलपणा असा की ते लगेच घरी आले. त्यांनी सर्वांना तपासलं. "अंजूला ॲडमिट करून घ्या." असं मी म्हणाले. पण ते नको म्हणाले. त्यांनी औषध लिहून दिली. कशी द्यायची ते सांगून गेले. अजितला खात्री होती की मुदत संपताच हा ताप जाईल. म्हणून वेगळं

काही औषध दिलं नाही.

आणि तसंच झालं. एकेकाच्या अंगावरून खाली पायावर पुरळ येत गेली आणि ताप उतरत गेला. दिलीपचे वडील आणि मोठा भाऊ, दोघे त्याला घरी घेऊन जायला आले होते. पण तो गेला नाही. सर्वांना फार अशक्तपणा आला. ताठ उभं राहून चालता येईना. पुढचे आठ दिवस कोणीच कामाला जाऊ शकलं नाही.

एकाच कुटुंबातली पाच जणं वेगवेगळ्या ठिकाणी राहत असताना त्या दोनचार दिवसांतच सगळ्यांना ताप कसा आला? हा प्रश्न कायम मनात घर करून राहिला आहे. एक विशिष्ट डास चावल्यामुळं 'डेंग्यू' ताप येतो असं कळलं. मग माझ्याच घरातल्या सर्वांना वेगवेगळ्या ठिकाणी हे डास कसे चावले? करणी करावी तसा एकेक जण ताप घेऊन घरी कसा येत गेला? हा योगायोग म्हणावा की संकट म्हणावं? आजूबाजूला बिल्डिंगमधे कोणाला हा ताप आल्याचं कानावर आलं नव्हतं. त्यातून मी व रैना कशा बचावलो? मला जर ताप आला असता तर इतक्या सर्वांची सेवा, देखभाल कोणी केली असती? नऊ महिन्यांच्या रैनाला कोणी सांभाळलं असतं?

त्या तापाची आठवण आली की हे प्रश्न मनात पिंगा घालत राहतात. त्यांची उत्तरं मला कधीच मिळाली नाहीत. यापुढं कधी मिळतील असं पण वाटत नाही.

अजित एम०डी० होऊन ठाण्याच्या सिव्हिल हॉस्पिटलमधे अनुभवासाठी नोकरीला राहिला होता. त्याचं आता लग्न करायचं म्हणून घरातली थोडी रचना बदलून त्याच्यासाठी बेडरूम करण्याचं काम चालू होतं. स्वयंपाक खाली काकांच्या ब्लॉकमधे करत होतो. शांताबाई व चंद्रभागा दोघी मिळून ते काम करायच्या. मी खाली आणि वर लक्ष ठेवून असायची. एक दिवस दोघींचं खाली कडाक्याचं भांडण झालं. शांताबाई चिडल्या. बिल्डिंग दणाणली. मी खाली पळाले. शांताबाई एकदम नोकरी सोडून जायला निघाल्या–ऐकेचनात. माझा नाइलाज झाला. माझ्या संसाराच्या ऐन कामाच्या दिवसांत, संकटात, अडचणीत, त्यांची मला मोलाची मदत झाली होती. मला फार वाईट वाटलं. आता त्या म्हाताऱ्या झाल्या होत्या. जास्त वर्षं काम करू शकल्या नसत्या. थकल्या होत्या. त्यांना जाऊ देणंच योग्य होतं. सतरा वर्ष त्यांनी काम केलं म्हणून सतरा वर्षांची बिदागी–म्हणजे प्रत्येक वर्षासाठी एक असा सतरा महिन्यांचा पगार त्यांना देऊन त्यांना जाऊ दिलं.

अजितला मुली सांगून येत होत्या. अजित ठाण्याला राहायचा. तो मुलींना बघायला त्यांच्या घरी जायला सहसा तयार होत नसे. म्हणून तो कार्यक्रम आमच्याच घरी होत असे. खाणं, चहापाणी याची व्यवस्था मलाच करावी लागायची. त्याच

सुमारास माझा मोठा भाऊ आबा ह्याला हार्ट-अॅटॅक आला असा पुण्याहून फोन आला. म्हणून घाईघाईनं धाकटा भाऊ हरीश, उषावहिनी व मी त्यांच्या गाडीनं पुण्याला जाऊन त्याला मिलिटरी हॉस्पिटलमधे भेटायला गेलो. त्याला वॉर्डमधेच ठेवलं होतं. मी आत गेले. तो मला म्हणाला, "अग ताई, बस ना माझ्याजवळ." समोर मॉनिटरवर आलेख येत होता. त्या अवस्थेत तो सहजपणं हसून म्हणाला, "तो पाहिलास का माझ्या हार्टचा टी०वी०? मी मनातून भयंकर घाबरले होते. म्हणाले, "नको रे बाबा, मी बाहेर जाते. अशा वेळी जास्त बोलून तुला त्रास देणं बरोबर नाही." तरी तो मला आग्रह करत होता, "बस थोडा वेळ. तसं काही होणार नाही. कोणी तुला बोलणार नाही." पण मी त्याचं ऐकलं नाही. तो नको म्हणत असताना बाहेर निघून गेले. आशावहिनींना भेटून आम्ही पुन्हा मुंबईला निघून आलो.

पंधरा दिवसांनी बेळगावची एक मुलगी अजितसाठी बघायची होती. ती आधी एकदोन दिवस येऊन तिच्या कोणातरी नातेवाइकांकडं उतरणार होती. त्यांचं नाव, पत्ता किंवा फोन नंबर आम्हांला ठाऊक असण्याचं काही कारण नव्हतं. फक्त त्यांचा सायनला येण्याचा दिवस आणि वेळ नक्की ठरवलेली होती. तो दिवस उजाडला. सकाळीच माझी घाईगडबड सुरू झाली. दुपारी अजित जेवायला घरी येणार होता. चहाला पोहे आणि काहीतरी गोड करायचं होतं. मनात सगळी योजना तयार होती. सकाळचे दहा वाजून गेले होते. फोनची घंटा वाजली. घरात मी एकटीच होते. पळत जाऊन फोन घेतला. फोन हरीशचा होता. म्हणाला, "पुण्याहून फोन आला होता, आबा वारला. त्याला हॉस्पिटलमधे असतानाच दुसरा अॅटॅक आला. त्यात तो वाचू शकला नाही. फ्युनरल उद्या संध्याकाळी आहे. आपण उद्या सकाळीच निघू. दुपारपर्यंत पोचू. रात्री तिथं राहू, कधी यायचं ते मग ठरवू. मी आणि उषा सकाळीच गाडी घेऊन येतो. तू तयार रहा." मी कशा परिस्थितीत सापडले आहे, हे त्याला काही न सांगता "हो" म्हणाले आणि फोन बंद करून खाली बसले. वडील लवकर वारल्यामुळं वडिलांच्या ठिकाणी असलेला, माझ्यापेक्षा नऊ-दहा वर्षांनी मोठा भाऊ गेला म्हणून एकटीच दु:खानं रडले. नंतर मंगेशला ऑफिसात फोन केला. संध्याकाळचा मुलगी बघण्याचा कार्यक्रम आम्ही बदलू शकत नव्हतो. त्यांच्याशी संपर्क साधू शकत नव्हतो. मनावर दगड ठेवून रडत रडत पुन्हा कामाला लागले. दुपारी अजित आला. त्याला काही सांगितलं नाही. तो हातपाय धुऊन जेवायला बसला. जेवण झाल्यावर त्याला सांगितलं.

तो एकदम ओरडला, "आबामामा वारले? मग आधी कां सांगितलं नाहीस?"

"आधी सांगून तू काय करणार होतास? नीट जेवला नसतास, म्हणून सांगितलं नाही."

म्हणाला, "रद्द कर संध्याकाळचा कार्यक्रम."

"ते शक्य नाही. कारण ती मंडळी कुठं उतरलीत, त्यांचं नाव, पत्ता, फोन

काहीच आपल्याला ठाऊक नाही.'' मी म्हटलं.

तो विचारात पडला. ''तू काळजी करू नकोस. मी सर्व नीट पार पाडते.'' मी सांगितलं.

संध्याकाळी ठरल्याप्रमाणं मंडळी आली. पोहे फोडणीला टाकले. चहा केला. गोष्टी चालू होत्या. मधेच एकानं नेमकी आबाची ओळख सांगितली आणि तो आता कुठं आहे? कसा आहे? वगैरे प्रश्न मला विचारले. तेव्हा मात्र मी साफ खलास झाले. ''सगळं ठीक आहे. बरं आहे.'' अशी त्रोटक उत्तर देऊन मी आत पळाले. माझ्या डोळ्यांसमोर त्याचा मृतदेह आला. तो देह थंड बर्फात असल्यामुळं बरा आणि ठीकच होता म्हणायचं ना!

काका आणि चंद्रभागा खालच्या ब्लॉकमधे राहायचे. सासूबाई वारल्यामुळं ते जेवायला वर यायचे. जेवल्यावर सर्व आवरून पुन्हा खाली जायचे. भांडी, धुणी करायला विठ्ठल नावाचा गडी होता. तो काम करून जाईपर्यंत चंद्रभागा थांबत नसे. कारण मी घरात असायची. एक दिवस माझं बाहेर काही काम होतं. म्हणून जेवणं आटोपल्यावर जायचं ठरवलं. विठ्ठल भांडी घाशीत होता. मंगेश बेडरूममधे जाऊन झोपला होता. अभय बाहेरच्या कॉटवर गुंगीत जरा पडला होता. विठ्ठलला सांगितलं की, ''तुझं काम झालं की, बाहेरचं दार ओढून बंद कर आणि मग तू जा.'' आणि मी निघून गेले. संध्याकाळी घरी आले. पुन्हा स्वयंपाक, जेवणं आटोपली. दुसऱ्या दिवशी सकाळी उठले. सहज समोरच्या फळीकडं लक्ष गेलं. बघते तर फळी रिकामी. कंदमुळाचं दहा किलोचं मोठं भांडं व त्याच्या आतली दोन, अशी दोन तांब्याची व एक पितळेचं–एकूण तीन भांडी फळीवर दिसत नव्हती. भांडी चोरीला गेली हे लक्षात आलं. बाई माणसाचा भांड्यांत किती जीव असतो हे वेगळं सांगायला नको. दुसऱ्या दिवशी विठ्ठल कामालाच आला नाही. खूप चौकशी केली. तेव्हा डॉक्टर श्रीखंडे यांच्याकडं काम करणारी ताराबाई म्हणाली, ''मी दुपारी एका अर्धी पँट घातलेल्या मुलाला डोक्यावरून भांडी घेऊन जाताना मागच्या बाजूनं पाहिलं. त्याचं तोंडं दिसलं नाही. मला वाटलं तुम्ही कल्हईला भांडी दिली. म्हणून मी लक्ष दिलं नाही.'' म्हणजे तो विठ्ठलच असणार याची खात्री झाली. म्हणून तो आज कामाला आला नाही. विठ्ठल दिसायला साधाभोळा आणि गरीब वाटायचा–इतका की त्याचं नाव घ्यायला पण धीर होत नव्हता. दुसऱ्या दिवशी तो शांतपणं येऊन कामाला लागला. त्याला विचारलं, तेव्हा शांतपणं, चेहऱ्यावर तोच निरागस भाव ठेवून, ''आपल्याला काहीच ठाऊक नाही,'' म्हणाला.

मग मंगेशनं माटुंगा पोलिस स्टेशनला तक्रार नोंदवली. पोलिस आले. विठ्ठलला पकडलं–मारलं असं समजलं. पुढं नेहमीप्रमाणं काहीच घडलं नाही. मोलामहागाची भांडी गेली ती कायमचीच.

अंजूच्या लग्नानंतरची पहिलीच दिवाळी होती. तिच्या सासरी फराळ द्यायचा म्हणून मी काळजीपूर्वक सर्व फराळ केला. एक मोठा डबा विकत आणला. त्यात तो व्यवस्थित भरला. दिवाळीच्या दिवशी दोघांनी तो नेऊन द्यायचं ठरवलं. मी चांगली साडी नेसून तयार झाले. दिवाळी म्हणून गळ्यात पुतळी-हार घातला. म्हाताऱ्या आजीनं माझ्या लग्नात मला दिला होता. मंगेश पण तयार झाला. जिना उतरून खाली आलो. मला वाटलं होतं, आज दिवाळी–मी चांगली तयार झाले आहे–हातात फराळाचा मोठा डबा आहे–मुलीच्या सासरी जायचं आहे–तेव्हा मंगेश आज नक्की टॅक्सीनं वरळीला नेईल. तो सरळ बसस्टॉपच्या दिशेनं चालायला लागला. त्याच्या मागं मी. "आज टॅक्सी नाही करायची का? मी विचारलं. "कशाला टॅक्सी? बसनंच जाऊ. डबा माझ्याकडं दे. मी धरतो." माझा अपेक्षाभंग झाला. तसेच चालत बसस्टॉपवर गेलो. बसमधे बसलो. म्हणजे दोघांना एकाच सीटवर बसायला जागा मिळाली. मनात म्हटलं ठीक आहे. टॅक्सीचे पैसे तरी वाचले. आमच्या मागची सीट जरा उंच होती. तिथं एक पुरुष व बाई बसले होते. ते अगदी गरीब परिस्थितीतले व अशिक्षित दिसत होते. आपसात बोलत होते. गळ्यातला हार मानेला एका ठिकाणी टोचायला लागला. म्हणून मी पुन्हा पुन्हा हात लावून हार सरकवत होते. वरळीचा स्टॉप आल्यावर आम्ही उठलो. दरवाजात एकदम गर्दी झाली. मला मागून कोणीतरी ढकलतं आहे असं वाटलं. काही क्षणात आम्ही खाली उतरलो. माझ्या पाठीमागं बसलेला तो माणूस व बाई, घाईनं उजव्या हातानं पुढं जाताना दिसले. मी त्यांना पाहत होते तेव्हा ते दोघं मागं वळून बघत होते आणि जोरानं पुढं जात असताना दिसले. आम्ही पण चालत पुढं निघालो. घरी पोहोचलो. डॉक्टर कुळकर्णी, गुलाबताई, दिलीप, अंजू सर्वांना भेटलो. शुभेच्छा दिल्या. फराळाचा डबा दिला. चहापाणी झालं. परत निघालो. पुन्हा बसमधे बसलो. आणि बसताक्षणी माझ्या लक्षात आलं की सोन्याचा अडीच-तीन तोळ्यांचा हार गळ्यात नाही. मी पटकन उठले. सीटखाली आजूबाजूला बघायला लागले. तिथं काहीच नव्हतं. मंगेश म्हणाला, "आपण पुढच्या स्टॉपवर उतरून वरळी पोलीस स्टेशनवर जाऊन तक्रार नोंदवू." गेलो. तक्रार लिहून दिली. हाराचं चित्र मी काढून दिलं. आणि दु:खी मनानं घरी आलो. मी आल्याबरोबर अंजूला फोन करून विचारलं की, "मी आले तेव्हा माझ्या गळ्यात हार होता का?" ती म्हणाली, "मला काही आठवत नाही. मी दिलीपच्या आईंना विचारते." ती विचारून आली. त्या म्हणाल्या, "हार गळ्यात नव्हता. कारण दिवाळी असून अंजूच्या आईनं गळ्यात कसं काही घातलं नाही, असा विचार माझ्या मनात आला." म्हणजे हार वरळीला घरी पोहोचायच्याच आधी नाहीसा झाला होता. तो मागं बसलेला माणूस व बाई, घाईघाईनं जाताना, मागं वळून बघताना अजूनही डोळ्यांसमोर येतात. पोलिसांना तो सापडणं शक्यच नव्हतं. त्यांच्याकडून काहीच समजलं नाही. म्हणजे म्हाताऱ्या आजीची एकमेव आठवण चोरीला गेली. आणि किती हजारांचं नुकसान?

मंगेशनं तेवढे पैसे मोजले आणि कार्यक्रम करून परत मिळवले. आणि एकदा कवी बोरकर आले असताना त्यांना सर्व सांगितलं. बोरकर एकच वाक्य बोलले, "पैसे परत मिळवलेत, पण तिला हार परत करून घातलात का?" त्यावर त्यानं उत्तर दिलं नाही. त्या दिवसाचा बसचा प्रवास फार महाग पडला. नुकसान व्हायचं असलं की त्या वेळी माणसाला बुद्धी पण तशीच होते.

अजितच्या लग्नाचे प्रयत्न चालूच होते. मुलगी गोरी पाहिजे होती. काकांनी आणि मंगेशनं ती डॉक्टर असावी म्हणून आग्रह धरला. कारण गॉयनॅकॉलॉजिस्टला दुसऱ्या डॉक्टरांची मदत लागतेच. तेव्हा त्या दृष्टीनं विचार चालू झाले. आणि एक दिवस माझी धाकटी जाऊ म्हणजे शामची पत्नी 'मृणाल' घरी आली. तिनं पुन्हा एकदा कमल मनोहर नाईक हिचं स्थळ सुचवलं. कमलच्या आईवडिलांशी तिचं मामामामीचं नातं असल्यामुळं तिनं सर्व माहिती पुरवली. म्हणाली, "वहिनी, तुम्ही आधी मुलगी बघा. गोरी आहे. एम०बी०बी०एस०ला बसली आहे. मराठी, बाळबोध वळणातली आहे. तुमच्या घरात अगदी एकरूप होऊन जाईल. तुम्हांला आवडली तर अजितला दाखवू." मी बरं म्हणाले व दिवस ठरवला.

माझा पोटाचा त्रास चालूच होता. जाण्याच्या दिवशी तर पोट फारच दुखायला लागलं. अंजूला सोबत यायला सांगितलं. तिच्याबरोबर दोन वर्षांची रैना. मृणाल पण आली. तिला ताप भरत होता. तरी तशीच ती आली होती. मी म्हणाले, "मृणाल, आज नकोच जाऊ या. त्यांना फोन करून सांगता येईल का?" पण तिनं ऐकलं नाही. म्हणाली, "ते वाट बघतील. त्यांनी खाणं वगैरे करून ठेवलं असेल. आता ठरवलंच आहे तर जाऊन येऊ." अग, पण तुला ताप आला आहे. त्याचं काय?" "हरकत नाही" म्हणाली. आणि आम्ही बसस्टॉपवर चालत गेलो.

पार्ल्याला गेलो. एकमजली बंगली व चहूबाजूनं मोठं कंपौंड होतं. तिथं नारळ, आंबा, फणस, पेरू, जांब वगैरे खूप झाडं होती. पाठच्या बाजूला लहानशी विहीर. कमलच्या आजोबांच्या काळातलं जुनं वैभव अजूनही शिल्लक होतं. आम्ही वर गेलो. कमलची आई पुढं आली. मृणालनं ओळख करून दिली. त्या पिवळ्या रंगाची साडी नेसल्या होत्या. गोरापान रंग, सुंदर चेहरा, एखाद्या राणीला शोभावं असं रूप पाहून मी थक्क झाले. कुठल्याही तऱ्हेची कृत्रिम रंगरंगोटी न करता निर्मळ, आणि जातीचं सौंदर्य बघत होते. चाळिशीची बाई, पाच बाळंतपणं झालेली. संसाराचे बरे वाईट अनुभव घेतलेली. पण ह्यांपैकी कुठलीच बाब सौंदर्याच्या आड येऊ शकली नाही.

तशीच सुगरण–खायला केलेले पदार्थ एकापेक्षा एक चवदार व स्वादिष्ट होते.

कमलही तशीच गोरी, अंगकाठी अगदी बारीक, चेहरा तजेलदार, नाजूक, चांगली उंची. मला ती आवडली. हा सर्व कार्यक्रम पार पडेपर्यंत रैनाला कोणीतरी

खाली कंपौंडमधे नेलं होतं. आम्ही उठलो. जिना उतरून खाली आलो. बघतो तर रैना कमलच्या धाकट्या भावांबरोबर मजेत खाली खेळत आहे. तिला हाक मारली, पण ती येईना. मी अंजूला म्हणाले, "जा. घेऊन ये जा तिला. एकदम इतकी जवळीक बरी दिसत नाही. अजून आपण 'हो' की 'नाही' ठरवलं नाही." अंजू गेली पण रैना म्हणाली, "मला इथंच खेळायचंय. तुम्ही घरी जा. मी येत नाही." ह्या अनोळखी घरात, मुलांत ही एकदम इतकी कशी रमली? शेवटी तिला ओढून रडवून आणावं लागलं. मृणालचा ताप चांगलाच वाढला होता म्हणून टॅक्सी केली. तिला आधी माटुंग्याला तिच्या घरी सोडलं आणि मग आम्ही सायनला आलो.

अंजूला पण कमल आवडली होती म्हणून कमल व तिचे मामा रमेश राणे यांना घरी बोलावलं. अजितशी भेट घडवून आणली. अजितला विचारलं, "काय रे, तुला आवडली का कमल?" तेव्हा, "हो, ठीक आहे." म्हणाला. आणि लग्न ठरलं.

१९८०मधे जूनच्या एक तारखेला त्यांचं लग्न झालं. अगदी मोजक्याच लोकांना बोलावलं आणि रजिस्टर लग्न केलं. घरातली मोठी सून म्हणून कमल घरात आली.

अभय आय०आय०टी०तून बी०टेक० झाला होता. ह्यूस्टनला एम०एस० करण्यासाठी स्कॉलरशिप मिळाली होती. तो ऑगस्टमधे अमेरिकेला जाणार म्हणून माझा जीव अस्वस्थ झाला होता. त्याला मी विचारलं, "पुन्हा कधी भेट होईल आपली?" तेव्हा म्हणाला, "एम०एस०नंतर मी पीएच०डी० किंवा एम०बी०ए०चा कोर्स करीन. मधे चार ते पाच वर्षं मी अमेरिका सोडू शकणार नाही."तेव्हा मात्र मला रडू आवरणं अशक्य झालं. त्याला विमानाचं जाण्याचं तिकीट काढून दिलं. त्याला विमानतळावर सोडून आम्ही परत आलो. आणि मला एकटेपणानं घेरलं. आयुष्यभर घर, नवरा, मुलं ह्याच वर्तुळात गिरगिरत राहिलेल्या मला ती गती थांबून भोवऱ्यासारखं खाली पडून निष्क्रिय झाल्यासारखं वाटायला लागलं.

अभयचा ह्यापुढचा शिक्षणाचा खर्च आम्हांला करायचा नव्हता. स्कॉलरशिपसाठी त्यानं आपला शिक्षणाचा दर्जा कायम टिकवला. पुढचं पाच वर्षांचं शिक्षण स्वत:च्या हिमतीवर व जबाबदारीवर पार पाडलं.

अभय अमेरिकेला गेल्यावर एकदा अजितच्या लग्नानंतर माझा भाऊ हरीश व उषावहिनी यांनी काश्मीरला जाण्याचा बेत केला आणि मंगेशला विचारलं, "आम्ही दोघं जातो आहोत तर आमची इच्छा आहे की तुम्ही दोघांनी बरोबर यावं. खर्च अंदाजे दोघांचा चार, पाच हजारांच्या वर जाणार नाही. 'जम्मूतावी' एक्सप्रेसनं निघू. दिल्लीत माझं काम आहे. नंतर जम्मू व नंतर काश्मीर असा प्रवास होईल. तिथं राहण्यासाठी हाउसबोटची सोय होईल. आठवडाभर काश्मीर फिरून मग परत येऊ."

आम्ही विचार केला, आणि 'हो, येतो' म्हणून सांगितलं. ह्या प्रवासाचं सविस्तर वर्णन उषावहिनींनी त्यांच्या 'एक एक वेस ओलांडताना' ह्या प्रवासवर्णनाच्या पुस्तकात केलं आहे. ते फारच खासगी आणि लोभसवाणं झालं आहे.

ठरल्याप्रमाणं आम्ही मुंबईहून सर्व गरम कपडे आणि इतर व्यवस्था करून गाडीत बसलो. आणि योग्य वेळी दिल्लीत उतरलो. त्या वेळी नरेश मंत्री दिल्लीत नव्हते. ते जपानी भाषा शिकण्यासाठी आणि तिकडं शाळा-कॉलेजमधे हिंदी शिकवण्यासाठी जपानला राहायला गेले होते. हरीशनं दिल्लीतलं त्याचं काम केलं, त्या दिवशी आम्ही बसमधून दिल्लीदर्शनला गेलो. त्यानंतर आग्र्याला जाऊन पुन्हा ताजमहाल पाहिला. इतरही ठिकाणी फिरलो. दुसऱ्या दिवशी जम्मूला पोहोचलो. तिथं एक ख्रिस्ती रेव्हरेंड व त्यांच्या पत्नी दोघंच राहत होते. त्यांच्याकडं एक रात्र मुक्काम केला आणि पुढं बसनं काश्मीरला गेलो. तिथं एक गोरे मिशनरी आहेत. त्यांची पत्नी व ते एक फार सुंदर शाळा चालवतात. त्यांनी अगदी स्वस्तात एक हाउसबोट आम्हांला मिळवून दिली होती. ते स्वत: आमच्याबरोबर आले. बोट आतून दाखविली. बोटीच्या मालकाला सांगून सर्व व्यवस्था करून ते निघून गेले. थंडी भयंकर होती. दुसऱ्या दिवशी हरीशनं आणि मंगेशनं जाऊन महत्त्वाचे पॉइंट्स बघण्यासाठी बसची तिकिटं काढून आणली. दुसऱ्या दिवसापासून सकाळीच तयार होऊन न्याहरी करून निघत होते. मालक आम्हांला लंच-बॉक्स बरोबर देत असे. लक्षात राहिलं गुलमर्ग. एका विशिष्ट मुक्कामाला बस थांबली. त्याहून वर ज्यांना ग्लेशियर बघायची असतील त्यांना समोर दिसणारा उंच डोंगर चढून किंवा लहान घोड्यावर बसून जावं लागे. तो चढ बघून मनातून मी घाबरले. घोड्यावर बसायला मला भीती वाटायची. मी स्पष्टच सांगितलं की, "मी येणार नाही, तुम्हाला जायचं तर खुशाल जा. खाली धाबे आहेत. दुकानं आहेत. नदी आहे. ते सर्व बघत मी इथंच फिरते. तुम्ही जाऊन या." मंगेश गडबडला, "तू एकटी कशी राहशील? मग मी पण जात नाही." म्हणाला. मी त्याला आग्रह केला आणि जायला सांगितलं. "एवढी माणसं आहेत–मला कोण काय करणार आहे?"

शेवटी तिघांनी ओव्हरकोट, टोप्या भाड्यानं घेतल्या व ते गेले. मी इथं तिथं फिरले. दुकानात गेले. बारीकसारीक खरेदी केली. दोन तास झाले. लंच घ्यायचा होता पण ह्यांचा पत्ताच नाही. मग एका धाब्यावर बसून त्यांची काळजी करीत बसले. सगळी माणसं परतली तरी ह्यांचा पत्ता नाही. अगदी ड्रायव्हर पण सीटवर बसला. मग मात्र मला धडकी भरली. आता काय करायचं? तिघांचं काय झालं असेल? शेवटी एकदाचे ते थकून येताना दिसले. भयंकर थंडीनं आणि चढ चढून थकल्यानं त्यांच्या अंगात त्राण राहिलं नव्हतं. मोठ्या आजारातून उठल्यासारखे दिसत होते. त्यांच्या तोंडातून शब्द बाहेर पडत नव्हता. अक्षरश: आत येऊन सीटवर ते कोसळले. मी म्हटलं, "काय झालं?" "काही नाही आम्ही भयंकर थकलो." म्हणाले. मी भराभर लंच-बॉक्स उघडून प्रत्येकाच्या हातात सँडविचेस दिली. त्यांना

धड खातासुद्धा येईना. मी विचार करीत राहिले, कसा असेल तो चढ? बरं झालं मी गेले नाही. मला झेपलंच नसतं. पुन्हा बोटीवर आलो. दुसऱ्या दिवशी कोणीही बाहेर पडण्याच्या अवस्थेत नव्हतं. मोगल, निशात वगैरे गार्डन्स पाहिली. पण एक गोष्ट आठवणीत राहिली की, वरून येताना ग्लेशियरवरचे बर्फाचे माती चिकटलेले तुकडे माझ्यासाठी मंगेशनं आणले होते. ते विरघळून गेले पण आठवण कायम आहे. तीस तासांचा प्रवास करून पुन्हा मुंबईला परतलो.

अजितला स्थिरस्थावर करण्याचं काम शिल्लक होतं. तो नुसती नोकरी करणार नव्हता. त्याला मॅटर्निटी होम काढायचं होतं. माझी इच्छा होती की त्यानं ठाण्याला जाऊन सेटल व्हावं. आर्थिकदृष्ट्या ते त्याला शक्य नव्हतं. मानसिकदृष्ट्या एवढी मोठी जबाबदारी आपल्याला पेलणार नाही हे तो जाणून होता. त्याच्या बरोबरच्या मुलामुलींनी लहान लहान जागांत चार, पाच कॉट्स टाकून हॉस्पिटल चालू करायला सुरुवात केली होती. एक दिवस त्यानं खालच्या आजोबांच्या ब्लॉकची चौकशी केली. "तो जर मला दिला तर मी सुरुवातीला लहानसं हॉस्पिटल सुरू करू शकेन" म्हणाला. इतक्या लहान जागेत हॉस्पिटल काढायचं ही कल्पना मंगेशला-मला मुळीच पसंत पडली नाही. माझ्या मनात विचार सुरू झाले. आजोबांना आणि चंद्रभागेला वर घेतलं तर अडचण होईल. गर्दी होईल. खाली तीन पिढ्यांच्या सामानाचा भयंकर पसारा होता. खूप भांडी, सामान, कपडे. काकांच्या प्लॅन्सचे ढिगारे साठवलेले होते. सर्वांवर मात म्हणजे खूप ढेकूण होते. या सर्व विचारानंच धडकी भरली. हे सर्व मला झेपेल का? भरलं घर रिकामं करून द्यायचं. प्रत्येक वस्तूला दुसरी जागा शोधायची, किंवा वर नेऊन कुठं तरी कोंबायची म्हणजे चेष्टा नव्हती. हे मला एकट्या बाईला या वयात कसं जमणार? पण मी हे आव्हान स्वीकारायचं ठरवलं. घरात भांडीधुणी करणाऱ्या शेवंतीच्या नवऱ्याला मदतीला बोलावलं. नको असलेली भांडी गोणीत भरून विकायला नेली. त्यांचे हजार, दीड हजार आले ते अजितला खर्चाला दिले. फर्निचरमधे ढेकूण-म्हणून थोडे गच्चीत नेऊन टाकले. बाकीचे विकले. ते पण पैसे अजितला दिले. काकांचे माळ्यावर धूळ खात असलेले आणि काळे पडलेले निरुपयोगी प्लॅन्स सरळ त्यांना न कळू देता, खाली कचऱ्याच्या कुंडात टाकले. काकांचं-चंद्रभागाचं सामान, कपडे वर आणले. त्यांतून खालचे ढेकूण वर आले. हे केवळ शेवंतीबाईच्या आणि तिच्या नवऱ्याच्या मदतीनं ही प्रचंड हलवाहलव करून मी तो ब्लॉक रिकामा केला आणि मग त्या ब्लॉकमधे अजित व कमल आले. आणि त्यांनी रिनोव्हेशनला प्रारंभ केला.

अजितच्या हॉस्पिटलला आकार आला. ठाण्याहून सुलोचना राजापूरकर नावाच्या सिस्टर आल्या. त्या अनुभवी होत्या. लग्नानंतर वर्षाच्या आतच नवरा वारला. तेवढ्यात एक मुलगा झाला. आयाच्या कामापासून सुरुवात करून आता सिस्टरच्या

हुद्यावर आल्या. बाळंतपणं करणं, आया मेहेतरणींना नीट शिस्त लावणं, हॉस्पिटलचे कपडे, स्वच्छता यांवर देखरेख करणं, अशी सर्व कामं त्या सहजपणानं करत. आयुष्यात कसलंच सुख न लाभल्यामुळं स्वभावात कठोरपणा व कडवटपणा आला होता. त्याचा नंतर आम्हां सर्वांना त्रासही झाला. त्या जेवायला वर माझ्याकडं होत्या. त्यांनी मांसाहार सोडल्यामुळं त्यांचा विचार डोक्यात ठेवूनच जेवण टग्वावं लागे. रोज जेवायला सकाळी सात आणि संध्याकाळी सात माणसांचं जेवण चंद्रभागेच्या मदतीनं करत होते. हॉस्पिटलमधे फारसे पेशंट एकदम येईनात: नवीन हॉस्पिटलचा जम बसायला, नाव व्हायला, पेशंटना विश्वास वाटायला काही वर्षं जातातच. एकदा डॉक्टरबद्दल विश्वास निर्माण झाला की माणसं थोडी गैरसोय सोसूनसुद्धा हॉस्पिटलमध्ये येतात. पेशंटना जेवण देण्याची सोय सुरू केली. आणि घरात स्वयंपाकाचा रोजचा मोठा व्याप सुरू झाला. सकाळी दहा, संध्याकाळी दहा माणसांच्या स्वयंपाकाची जबाबदारी पडू लागली. भाज्या आणणं–त्या निवडणं, कापणं, तयार करणं. शिवाय संध्याकाळी घरातल्यांना नॉनव्हेज पदार्थ करावा लागे. काम खूपच वाढलं. तरी अजितनं पेशंटना जेवण देण्याची योजना बंद करीपर्यंत चालू ठेवलं होतं. पाहुणे तर नाहीतच–पण कधी अंजू-दिलीपला जेवून जा म्हणणं शक्य होत नसे.

दिवस जात होते. पेशंट वाढत होते. शेवटी खाली पेशंट ठेवायला जागा नाही अशी वेळ आली. तेव्हा ओळखीच्या पेशंटना दोन-चार वेळा वर घरात आणून ठेवावं लागलं. त्याच सुमारास अंजूचं दुसरं बाळंतपण आलं.

माझ्या वाढदिवसादिवशी, आमचे मित्र श्रीनिवास खळे यांना मी आमच्या घरी गाणी म्हणण्यासाठी आग्रह करून बोलावलं होतं. २४ ऑक्टोबर १९८१ हा तो दिवस होता. ठरवल्याप्रमाणं ते तबलजींना घेऊन आले. त्याआधीच बिर्याणीची डेकची घरी आलेली होती.

त्याच वेळी अंजली बाळंतपणासाठी सायनला आलेली होती. ह्या वेळी तिला मुलगा व्हावा अशी सगळ्यांची इच्छा होती. रैना पाच वर्षांची झाली होती. त्याच दिवशी संध्याकाळी तिच्या पोटात दुखायला लागलं. तिच्या सासूबाईंना कळवलं. मुलगा होतो का मुलगी हे लगेचच कळावं म्हणून त्या हॉस्पिटलमधे येऊन थांबल्या होत्या. अजित व कमल यांनी अंजूला आत नेलं. आम्ही सर्व बाहेर थांबलो होतो. आतून बोलण्याचे आवाज ऐकू येऊ लागले. गुलाबताई (दिलीपच्या आई) दाराला कान लावून ऐकत होत्या. त्या एकदम मागं वळून म्हणाल्या, "मुलगा झाला". कमल बाहेर आली. म्हणाली, "छान गोरापान, रूपवान मुलगा झाला अंजूला."

त्या रात्री आम्ही श्रीनिवास खळे यांचं गाणं अगदी आनंदानं ऐकलं आणि त्यांच्याबरोबर बसून बिर्याणी खाल्ली. तोपर्यंत अंजू सर्व सोपस्कारातून मोकळी झाली होती. ती म्हणाली "मला भूक लागली आहे. मला पण थोडी बिर्याणी द्या."

तिलाही थोडी बिर्याणी पाठवून दिली.

पुढं अजितनं या मुलाचं नाव 'रूपक' असं ठेवलं.

इंदिरा 'मॅटर्निटी'त अजितचा चांगला जम बसला होता. ती जागा अपुरी पडत होती. तो दुसऱ्या जागेच्या शोधात होता.

आमच्या बिल्डिंगच्या मागच्या रस्त्यापलीकडं 'गद्रे' यांची 'समाधान' नावाची इमारत आहे. समाधानच्या तळमजल्यावर गद्रे यांची आई–गंगूताई राहायच्या. गद्रे दांपत्य तिसऱ्या मजल्यावर वेगळं राहतं.

गंगूताई वारल्यावर काही दिवसांनी मी गद्रे यांना भेटायला गेले. सर्व गोष्टी झाल्यावर निघताना "आता ह्या ब्लॉकचं काय करणार?" असं सहजच विचारलं. म्हणाले "बँकेचे लोक मागताहेत पण अजून नक्की निर्णय घेतला नाही." मी म्हणाले, "जेव्हा केव्हा निर्णय घ्याल तेव्हा अजितची आठवण ठेवा. तो मॅटर्निटी होमसाठी जागा बघतोय." म्हणाले, "समोरच राहत असल्यामुळं अजितला मी लहानपणापासून ओळखतो. तो चांगला मुलगा आहे. त्याला नंतर मला भेटायला सांगा." मी "बरं" म्हणाले आणि घरी आले. मग अजितला सांगितलं "गद्रेमामांशी माझं असं असं बोलणं झालं आहे. आता तू स्वत: एकदा त्यांच्याकडं जा आणि बोलणी कर." त्याप्रमाणं तो त्यांच्याकडं गेला. शेवटी त्यांनी तो ब्लॉक अजितलाच दिला. हॉस्पिटल तयार झाल्यावर त्याचं नाव अजितनं 'समाधान हॉस्पिटल' असंच ठेवलं. आणि अजितची पुढची वाटचाल बघून आम्हां दोघांना आयुष्यभर पुरेल इतकं 'समाधान' मिळालं.

काही वर्षांनी हरीशची दिल्लीच्या ऑफिसमधे एकदोन वर्षांसाठी बदली झाली होती. तो मुंबईला कामासाठी आला की मला फोन करायचा. मग एखाद्या रात्री आम्ही त्याला ड्रिंकला, जेवायला बोलवत होतो. मंगेश आणि मी पण त्याच्याबरोबर बसून, गप्पागोष्टींबरोबर खाण्यापिण्याचा आनंद घेत होतो.

एकदा असाच तो आला असताना म्हणाला की, "कुठल्या तरी काँटेस्टमधे मी भाग घेतला होता त्यात मी जिंकलो. आणि आम्हां दोघांना नेपाळचं येण्याजाण्याचं तिकीट बक्षीस म्हणून मिळालं. आम्ही तीन महिन्यांनी नेपाळला जाऊ." त्याबरोबर मी म्हणाले, "मी पण येते नेपाळला तुमच्याबरोबर. आधी दिल्लीला येते–दिल्लीपासून पुढं नेपाळपर्यंत विमानाचं तिकीट जास्त नसेल. येऊ का?" तो म्हणाला, "ये ना, माझी काहीच हरकत नाही. नाहीतरी उषा तिकडं एकटीच असते. ती कंटाळते. मुलं मुंबईत आहेत त्यामुळं तिला दिल्लीत जाऊन राहायला नको होतं. पण मीच आग्रह धरला, म्हणून ती आलीय. आम्हांला नंतर एक महिन्यासाठी इंग्लंडला जाऊन

राहण्याची संधी मिळणार आहे. त्याची व्यवस्था मला दिल्लीत राहून करणं सोपं पडेल. आता मी परत जाईन तेव्हाच तू माझ्याबरोबर ये.''

मी मंगेशला विचारलं, ''जाऊ का? मला फार कंटाळा आलाय. घरात मन लागत नाही. एकटेपणा वाढत चाललाय. मी भावाबरोबरच जाते.'' तेव्हा मंगेश पण नको म्हणाला नाही. ''तुला जायचं तर जा'' म्हणाला. पडत्या फळाची आज्ञा घेऊन मी लगेच तयारीला लागले. तिकडं घरात काम करण्यासाठी हरीशनं एक यमुना नावाची मुलगी बरोबर घेतली होती. ती तिसऱ्या वर्गाच्या बायकांच्या डब्यात होती. मधेच एखाद्या स्टेशनवर उतरून तो तिची चौकशी करत होता. शेवटी दिल्लीला पोचलो. सी०एन०आय०भवनमधे दिल्लीत हरीश राहत होता ती मोठी इमारत होती. तिथं खाली हॉस्टेलसाठी खोल्या होत्या. वरच्या मजल्यावर त्याचा ब्लॉक होता. तिथं आम्ही राहत होतो. बाजूलाच पार्लमेंट हाउस होतं. राजीव गांधी मीटिंगसाठी येत असे त्या वेळी अगदी कडक बंदोबस्त असायचा. आमच्या गच्चीवरसुद्धा बंदूकधारी शिपाई उभे असायचे. वहिनींनी आजूबाजूच्या सर्व इमारती फिरवून दाखवल्या. त्याच वेळी आत्मचरित्र लिहायला लागावं अशी जोरदार इच्छा मनात आली. मी माझी जरुरीची पत्रं बरोबर घेतली होती. ती आधी सगळी नीट वाचून, पुन्हा लिहून काढली आणि एक दिवस लिहायला सुरुवात केली. सातव्या वर्षापासून सासवडच्या ज्या गोष्टी मला आठवत होत्या तिथून सुरुवात केली.

तोपर्यंत नेपाळला जाण्याची व्यवस्था झाली होती. हरीशचा थोडा गैरसमज झाला होता. त्याला एकट्याचंच तिकीट मिळालं आणि वहिनींचं तिकीट पैसे देऊन घ्यावं लागलं.

एक दिवस विमानानं खाटमांडूला उतरलो. मिशनच्या इमारतीत जरा स्वस्तात अशा, आम्हांला दोन इमारतींत दोन अशा वेगळ्या खोल्या मिळाल्या. मला एकटीलाच वेगळं झोपावं लागलं. अनोळखी ठिकाणी परदेशात असं झोपणं असुरक्षित वाटत होतं. पण नंतर सुरक्षित वाटत गेलं.

पशुपतिनाथ मंदिर पाहून आलो. सर्व इमारती लाकडापासून बांधलेल्या आहेत. 'कुमारी माता', काष्ठमांडव, पूर्वीच्या राजांचे महाल, हिमालयाची शिखरं, 'मस्त्यपुच्छ' इत्यादी धुक्यामुळं व ढगांमुळं दिसणं अवघड असतं. तेसुद्धा आम्हांला दिसलं. नंतर पोखराला गेलो. सरोवरात बोटीनं फिरलो. चीनमधून व जपानमधून येणाऱ्या वस्तूंची तिथं खूप दुकानं. त्या मानानं वस्तू स्वस्त होत्या. आम्ही मनसोक्त फिरत होतो. खरेदी करत होतो. जेवायला 'कम्युनिटी किचनमधे' त्यांच्या वेळेला हजर होत होतो. तिथं कॉंटिनेंटल जेवण मिळायचं. ते मला आवडत होतं. पण संध्याकाळी सहाला रात्रीचं जेवण जेवावं लागे.

मुक्काम संपला. परत दिल्लीला आलो. यमुनाला आधीच मुंबईला परत पाठवलं होतं. ती खूप त्रास द्यायची. स्वयंपाकाला हात लावत नसे. कपडे, भांडी करून वर गच्चीत बसून राहायची. लहानसहान वस्तू लांबवायची. म्हणून तिला पुन्हा मुंबईला

नेऊन सोडलं. सर्वच काम आमच्यावर पडलं.

१९८४ साल होतं. कमलचे नऊ महिने भरत आले होते. आणि १५ एप्रिल १९८४ ला तिला मुलगा झाला. अजितनं तिचं नाव डॉक्टर साठे यांच्या हॉस्पिटलमधे घातलं होतं. मुलगा गोरा, गुटगुटीत व सुंदर दिसे. राजापूरकर सिस्टर त्याची चांगली काळजी घेत.

काकांची प्रकृती खालावत चालली होती. मोठा आजार असा काहीच नव्हता. म्हातारपण आलं होतं. वय माणसाला कमकुवत करत असतं. ते थकत चालले होते. क्षीण होत चालले. त्यांना कॉन्स्टिपेशन होऊ लागलं. त्यावर ते स्वत:च गोळ्या घ्यायचे. अवरोध करण्याची स्नायूंची शक्ती कमी होत चालली. अंगावरचे कपडे घाण होऊ लागले. आता ते कोण धुणार? चंद्रभागानं साफ नकार दिला. ती म्हणाली "तुम्ही मला कितीही पैसे दिलेत तरी हे काम मी करणार नाही." ऐनवेळेस असल्या कामाला कोण माणूस मिळणार? शेवटी ते काम मी करायला लागले. ते कपडे धुवावेच लागायचे. फेकून द्यावे म्हटलं तरी असे किती कपडे फेकणार?

या काळातच 'कुंपणावरचे शेत' या पुस्तकाचं प्रकाशन अमेरिकेत पाच वेगवेगळ्या राज्यांत करायचं असं प्रकाशक श्री० मधुकाका कुलकर्णी, श्री० लाटकर यांनी ठरवलं. सोबत काही, सांस्कृतिक करमणुकीचा कार्यक्रम असावा म्हणजे आकर्षण वाढेल, आणि उपस्थिती पण वाढेल असा विचार होता. म्हणून त्यांनी व्यंकटेश माडगूळकर यांचं कथाकथन, मंगेश पाडगावकर यांचं काव्यवाचन आणि सुभाष भेंडे यांच्याशी गप्पागोष्टी असं योजून त्या तिघांना बरोबर न्यायचं ठरलं.

त्या वेळी अभय ह्यूस्टनला होता. तो एम०एस० झाला होता. आणि नुकतीच एम०बी०ए०ची परीक्षा पास होऊन नोकरीच्या शोधात होता. त्यांच्या पाच कार्यक्रमांपैकी एक कार्यक्रम ह्यूस्टनला होता. अभय मला गेली साडेचार वर्षं भेटला नव्हता. शिक्षण चालू असताना तो हिंदुस्थानात येऊ शकला नाही. त्याला बघायला भेटायला माझा जीव तळमळतो हे मंगेशला ठाऊक होतं. म्हणून त्यानं माझं तिकीट स्वत: काढून मला पण सोबत न्यायचं ठरवलं. तशीच सुभाष भेंडेची पत्नी 'पुष्पा' पण येणार होती.

जाण्याच्या आधी मला पुन्हा पाइल्सचा त्रास सुरू झाला होता. हे दुखणं घेऊन एवढा प्रवास कसा करायचा? त्यापेक्षा आधीच डॉक्टरांना दाखवून घ्यावं म्हणून डॉक्टर सुशील नाडकर्णी यांना दाखवलं. त्यांनी सांगितलं की, "तुम्हांला पुन्हा तीन पाइल्स झालेले आहेत." मला मोठा धक्का बसला. पंधरा-वीस वर्षांपूर्वी एवढं मोठं ऑपरेशन केल्यानंतर, पुन्हा कसं हे दुखणं आलं? डॉक्टर म्हणाले, "पंधरा वर्षांनंतर पुन्हा पाइल्स वाढू शकतात. तुम्ही घाबरू नका. आता ऑपरेशन न करता, बाहेरच्या बाहेर पाइल्स काढून टाकता येतात. त्याप्रमाणं ती काढून घेतली. त्यानंतर

माझ्या पोटऱ्या भयंकर दुखायला लागल्या. म्हणून डॉक्टर सोमण यांना विचारलं. ते म्हणाले, ब्लड सरक्युलेशन नीट होत नाही म्हणून पाय दुखतात. त्यासाठी त्यांनी औषधं दिली. ती मी घ्यायला सुरुवात केली. दुखणं बरं व्हायचं बाजूला राहिलं, आणि तोंडात असे फोड आले की, अन्नाचा कणसुद्धा खाता येईना. गोळ्या बंद केल्या.

अजितनं तनयच्या बारशासाठी हॉल घेऊन खूप लोकांना जेवायला बोलावलं होतं. माझी प्रकृती खूप बिघडली होती. तरी तशीच सर्व तयारीनिशी हॉलवर गेले. बारसं अगदी थाटात पार पडलं. 'तनय' नाव ठेवलं. तनय गोरापान, सुंदर गुटगुटीत दिसत होता. त्याच्या बारशाच्या जेवणाची चवसुद्धा मी घेऊ शकले नाही. तेव्हा पुढं कधीच "तुझ्या बारशाला मी जेवलेय." असं म्हणायची पण सोय राहिली नाही.

१९८४ जूनच्या ७ तारखेचं आमचं अमेरिकेला जाण्याचं तिकिट होतं. तोपर्यंत तो जवळ जवळ दोन महिन्यांचा होत होता. घरात स्वयंपाकाला चंद्रभागा, भांडी, धुणी, झाडूपट्टा ह्या कामाला लीला. तनयला अंघोळ व इतर कामासाठी राजापूरकर सिस्टर. आणि 'गॉयनॅकॉलाजिस्ट' अशी संपूर्ण व्यवस्था घरात होती.

परदेशी जाण्याची आमची ही पहिलीच वेळ. काही महत्त्वपूर्ण ठिकाणं, त्या हवामानातलं सृष्टिसौंदर्य बघायला मिळेल–आणि मुख्य म्हणजे साडेचार वर्षांनंतर माझा अभय मला भेटणार ह्या कल्पनेनं मी अगदी आनंदात होते. शरीर साथ देत नव्हतं. थकवा जाणवत होता. तरी मन माघार घेत नव्हतं. ते मनच शक्ती देत होतं.

ठरल्याप्रमाणं आम्ही सर्व जण विमानात बसलो. आणि त्या दीर्घ प्रवासाला निघालो. पोटाला पट्टा बांधला आणि आता पंचवीस-सव्वीस तास आपल्याला पूर्ण विसावा मिळेल अशा विचारानं मी सुखावले. न्यूयॉर्कला उतरलो. तो अवाढव्य एअरपोर्ट बघून माणसाच्या मेंदूची व कर्तृत्वाची पहिली साक्ष पटली. किती स्वच्छता, सुविधा, सुखसोई, योग्य ठिकाणी सूचना आणि मदतीला तत्पर व विनयशील कर्मचारी–हे सर्व असूनही कडक शिस्त आणि काटेकोर नियम. ह्या सर्वांतून बाहेर पडून आम्ही सर्व जण वासंती अभ्यंकर हिच्या घरी गेलो. रात्री अभयचा फोन आला. त्याच्या देशात तर मी येऊन पोचले होते. त्याला म्हणाले, "कधी येतोस भेटायला?" तर म्हणाला, "मी येऊ शकणार नाही, तिकीट फार महाग आहे. तेवढे पैसे माझ्याजवळ नाहीत. अजून मला नोकरी मिळाली नाही." मला वाईट वाटलं. मी निराश होऊन खुर्चीवर जाऊन बसले. मंगेशला म्हणाले, "हे काय! इथं येऊन पण अभयला भेटू शकत नाही? हे कसं शक्य आहे?" मंगेश म्हणाला, "ह्यूस्टनला प्रोग्रॅम आहे, तेव्हा आपण तिकडं जाऊ आणि त्याला भेटू. तो न्यूयॉर्कपासून फार लांब राहतो." मी मनात म्हटलं, म्हणजे अजून तीन-चार आठवडे तो भेटणार नाही.

श्रीयुत अभ्यंकर आमचं बोलणं लक्षपूर्वक ऐकत होते. थोड्या वेळानं आमच्याजवळ येऊन म्हणाले, "मी अभयला इकडं येण्या-जाण्याचं एक तिकीट पाठवू शकतो. माझा तोच व्यवसाय आहे." मंगेश म्हणाला, "ठीक आहे, सध्या तुम्ही एक तिकीट त्याला द्या. तो नोकरीच्या शोधात आहे. त्याचं शिक्षण पूर्ण झालेलं आहे. बी०टेक०, एम०एस० आणि आता एम०बी०ए०" ते म्हणाले, "त्याच्या नोकरीसाठी पण मी प्रयत्न करतो." म्हटल्याप्रमाणं अभ्यंकरांनी एक तिकीट त्याला पाठवलं. त्या भल्या माणसानं आपलं बोलणं खरं केलं. दोनच दिवसांनी अभय त्यांच्या घरी येऊन पोचला. आणि मी आनंदाश्रू आवरीत त्याला कडकडून भेटले. तो आम्हा दोघांकडं आळीपाळीनं बघत राहिला. मी म्हणाले, "असा काय बघतोस रे?" जास्त म्हातारे झालेलो दिसतो ना आम्ही?" म्हणाला, "हो. थोडा फरक झालाच आहे. पाच वर्षं म्हणजे मोठाच काळ गेला ना!"

एक दिवस अभय व आम्ही वासंतीबरोबर बाहेर गेलो. वासंती गाडी पार्क करून दुकानात गेली. आम्ही दोघं गाडीतच बसून होतो. अचानक अभय मला म्हणाला की, "आई, माझी आणि एलिझाबेथ नावाच्या अमेरिकन मुलीची चांगली मैत्री झाली आहे. आता परत हिंदुस्थानात येण्याचा माझा विचार नाही. मी इथंच राहायचं ठरवलं आहे. मला वाटलं तर मी तिच्याशी लग्न पण करीन. त्यावर तुझं काही म्हणणं आहे का?" पुन्हा एक धक्का.

मी तिच्याबद्दल सर्व माहिती विचारून घेतली. तिचे आईवडील, तिची भावंडं, त्यांचा नोकरीधंदा. वडील इंजिनियर होते आणि आई हेड नर्स. आक्षेप घ्यावा असं काही वाटलं नाही. ती पण ग्रॅज्युएट होऊन एम०बी०ए० झाली होती. मी म्हणाले, "घरातून येताना मी तुला सांगितलं होतं की तू तरुण आहेस. इतकी वर्षं घरापासून दूर राहिल्यानंतर सहवासात येणाऱ्या तरुण मुलीबद्दल प्रेम वाटणं अगदी साहजिकच आहे. तू तिच्याशी मैत्री ठेव पण घाईनं लग्न करू नकोस. आपल्या मुली जास्त सहनशील व जुळवून घेणाऱ्या असतात. जेवण बदलण्याचा प्रश्न येत नाही. चालीरीतींचा फरक पडत नाही. ती गोरी आहे याचं दडपण मनावर राहत नाही. असं असूनही तुला जर लग्न करायचंच असेल तर, मी तुला कुठल्या तोंडानं नको म्हणून सांगू? कारण लग्नाच्या बाबतीत मी स्वत:च कुणाचं ऐकलेलं नाही. घाई करू नकोस. पूर्ण विचार कर. आणि तुला जे योग्य वाटेल ते कर." त्यावर तो काही बोलला नाही. तेवढ्यात वासंती परत आली. आणि आम्हांला घेऊन घरी आली. लवकरच अभय परत ह्यूस्टनला गेला. त्याची भेट झाली याचा फार आनंद झाला. पुन्हा ह्यूस्टनला गेल्यावर तो भेटणार होताच.

इकडं त्याला चांगल्या चांगल्या मुली सांगून येत होत्या. पण त्याला भारतात येण्याचा व्हिसा नसल्यामुळं त्यांचा विचार केला गेला नव्हता.

त्यानंतर गेलो वॉशिंग्टनला दिलीप व शोभा चित्रे यांच्या घरी. घरात गेल्यागेल्याच दिलीपनं मला अगदी अगत्यानं एका खुर्चीवर बसायला सांगितलं. मी अगदी

सहजपणं खुर्चीत बसले. पण बसल्याबरोबर एक अनपेक्षित धक्का बसून मी वर उडाले. जरा घाबरले. काहीतरी त्यांनी माझी थोडी गंमत करायचं योजलं असावं. काय ते कळलं नाही. दिलीप-शोभानं जोरात हसून आमचं आगमन साजरं केलं. त्यांच्या घरातले दिवस फार आनंदात गेले. गप्पागोष्टींना तर ऊत आला होता. उंची ड्रिंक्स, तसंच उत्तम जेवण. शोभानं केलेलं खेकड्याचं कालवण तर मी कधीच विसरू शकणार नाही. त्याच वेळी मला वाटतं त्यांच्या दोन मुलांपैकी एकाला ताप आला होता. ते दोघं जरा काळजीत होते. तरी आमच्यापुढं तसं काहीही न बोलता त्यांनी उत्साहानं आम्हांला खरेदीला नेलं. सर्व महत्त्वाची प्रेक्षणीय स्थळं फिरून दाखवली.

त्यांच्या घरून निघताना दिलीपनं मला विचारलं, "कशी वाटली आमची अमेरिका?" क्षणभर मराठी माणसाच्या तोंडून 'आमची अमेरिका' हा शब्द कानाला खटकला. पण नंतर विचार करता असं वाटलं की, पंचवीस वर्षं एखाद्या देशात राहिल्यावर, त्या देशाचं नागरिकत्व मिळाल्यावर, तो देश आपला आहे असं वाटणं साहजिकच आहे.

ह्यूस्टनला कवी बा० भ० बोरकर यांचा मुलगा चंद्रनाथ व पत्नी कविता हे राहतात. त्यांनी स्वत:च आमची दोघांची जबाबदारी स्वीकारली होती. त्यांचा मुलगा 'नील' लहान होता. तो रडायचा. जरा त्रास द्यायचा. तरी कवितानं आम्हांला न्याहरीपासून रात्रीच्या जेवणापर्यंत सर्व ताजे पदार्थ करून घातले. आमच्याबरोबर जेवायला अभय आणि एलिझाबेथ पण रोजच असायचे.

मंगेशच्या कार्यक्रमाला अभय एलिझाबेथला घेऊन आला होता. अभयला कविता वाचायची आवड होती. शाळेत, कॉलेजमधे असताना संध्याकाळी घरी आला की त्याच्या बाजूच्या टेबलावर बाबांनी नवीन काय लिहून ठेवलंय ते तो जाऊन हळूच वाचून यायचा. ह्या कार्यक्रमाला स्टेजवरून मंगेशचा आवाज ऐकताना तो घळाघळा रडायलाच लागला. एलिझाबेथ त्याचे डोळे पुसत होती. तिला त्यातला एक शब्द पण कळत नव्हता. तरी ती अभयला आवडते म्हणून साडी नेसून आमच्या दोघांच्या मधे बसली होती. अभय पण मनानं उत्कट व हळवा आहे. इतरांपेक्षा अतिशय अबोल आहे.

अभयला सोडून निघताना खूप वाईट वाटत होतं. त्याची काळजी वाटत होती. नोकरी मिळेपर्यंतच्या काळाची चिंता वाटत होती. त्याच्याजवळ पैसे कमी होते. म्हणून मंगेशनं आम्हांला लागतात तेवढे डॉलर्स ठेवून कार्यक्रमांचे मिळालेले डॉलर्स त्याला दिले. त्यानं अमेरिकेतलं शिक्षण स्कॉलरशिपच्या पैशावर काटकसरीनं पूर्ण केलं होतं. त्याला जरूर असताना आम्ही थोडीशी मदत करू शकलो याचा आम्हां दोघांनाही आनंद वाटला.

अमेरिकेत आम्ही ज्या ज्या राज्यात गेलो तिथं महत्त्वाची प्रेक्षणीय स्थळं तिथल्या स्नेही, आम्हांवर लोभ करणाऱ्या मंडळींनी आम्हांला दाखविली. मुख्य म्हणजे

म्युझियम्स–त्यांतल्या ममीज, एक्सप्रेस टॉवर्स, नदीच्या खालून धावणारी आगगाडी, डिस्नेलँडची पूर्ण एक दिवसाची सहल, अद्‌भुत व कल्पनातीत प्रचंड असा नायगारा फॉल्स, प्रेसिडेंट लिंकनचा भव्य, हलताबोलता पुतळा, प्रेसिडेंट जॉन केनेडींची कबर व तीवर जळणारी अमरज्योत. दुसऱ्या महायुद्धात मारल्या गेलेल्या तरुण सैनिकांचं नजर पोचणार नाही आणि चालून संपणार नाही एवढं मोठं कबरस्थान पाहून मन व्याकूळ होऊन गेलं. माणसाला हवं आहे तरी काय? पृथ्वी कमी पडली म्हणून आता इतर ग्रहांवर राज्य मिळवण्याचे प्रयत्न अविरत चालू आहेत. नुसतं कुतूहल व संशोधन म्हणून केलेलं प्रयत्नांचं स्वागतच. पण त्यावर हक्क सांगण्याचे प्रयत्न, हे कबरस्थान पाहिल्यावर अगदी हीन वाटू लागतात. आपल्याला प्रत्यक्ष अशा मोठ्या लढाईचा अनुभव नाही. तरुण मुलांची पिढीच्या पिढी मारली जाते म्हणजे कशी आणि किती, याची मनानं कल्पना करून कळणार नाही. त्यासाठी हे कबरस्थान पाहिलं पाहिजे.

परतताना शेवटी लंडनला आलो. आम्हांला घ्यायला डॉक्टर मीना प्रभू दोन मोठमोठ्या गाड्या घेऊन आली होती. तिनं सराईतपणं सर्वांचं सामान त्यांत ठेवून घेतलं. सामान भरपूरच होतं. आम्ही दोघं तिच्या गाडीत बसलो. आम्हांला वसंतराव व नंदा पटवर्धन यांच्या घरी सोडायचं होतं. तास-दोन तास चकरा मारल्यावर त्यांचं घर सापडलं. पुढचं तिकीट मुंबईला जाण्यासाठी मिळालं नव्हतं तोपर्यंत त्यांच्याकडंच राहायचं होतं. आल्याबरोबर सर्वांनी लंडन बघायला जायचं ठरवलं. सगळे तयार व्हायला लागले. मला मनातून इच्छा असूनही, मी उठू शकले नाही. जेटलॅग म्हणा की, महिन्याभराच्या भटकंतीचा परिणाम म्हणा की, स्पाँडिलायसिस व पाइल्सचा त्रास म्हणा. भयंकर थकव्यानं मी बिछान्यातच पडून राहिले. आणि बसनं लंडन शहर बघायचं राहूनच गेलं. मी गेले नाही म्हणून मंगेश पण गेला नाही. मी त्याला खूप सांगितलं जायला पण त्यानं माझं ऐकलं नाही. म्हणतात ना एकदा हुकलेली संधी पुन्हा येत नाही. तसंच झालं. लंडन तर राहिलंच पण पुढं काही जण युरोपची टूर करून आले. ती पण आमची राहून गेली.

वसंतरावांकडं आठ, दहा दिवस राहावं लागलं. नंदानं आमची व्यवस्था फार चांगली ठेवली. हसत गप्पा मारत, विनोदात असा आमचा वेळ मजेत गेला. परदेशी कुणाहीकडं गेलं तरी थोडं काम हे करावं लागतं. कारण तिथं नोकरच नसतात. स्वयंपाक बहुतेक घरातली बाईच करते. भांडी घासणं, स्वत:चे कपडे धुणं, आवराआवरी करणं, जेवणाची तयारी करणं, आपली बाथरूम व संडास स्वच्छ ठेवणं ही कामं करावीच लागतात. त्याची आता पूर्ण माहिती झाली होती.

डॉक्टर मीना प्रभूनं दुपारी जेवायला बोलावलं होतं. खूप मोठा व सुंदर बंगला, गाडीवर इंग्लिश ड्रायव्हर, स्वयंपाकाला थायलंडमधली बाई, बागेची आणि मागच्या मोठ्या जंगलाची काळजी घ्यायला इंग्लिश माळी. जेवायला संपूर्ण ब्राह्मणी बेत.

आंबारस, पुरी, मटकीची उसळ, वगैरे. हे सर्व वैभव पाहून मात्र मी थक्क झाले. घराचं नूतनीकरण करून भिंतीचा रंग बदलला की, सर्व पडदे, टॉवेल, नॅपकिन्स गादीवरच्या सुंदर लेसच्या नव्याच वाटणाऱ्या चादरी व त्या रंगात न शोभणाऱ्या सर्व शोभेच्या वस्तू पण टाकून दिल्या जातात हे मला पहिल्यांदाच समजलं. हे सर्व माझ्या मध्यमवर्गीय मनाला कितपत मानवलं, हा प्रश्न फार वेगळा आहे.

पाडगावकरांच्या डोळ्यांतून मोतीबिंदूच्या ऑपरेशननंतर सारखं पाणी यायचं म्हणून मीनानं लंडनमधल्या डोळ्यांच्या डॉक्टरांची अपॉइंटमेंट घेतली. आणि त्यांना तपासायला घेऊन गेली. ते डॉक्टरही काही करू शकले नाहीत. पुढं आपोआपच ते पाणी यायचं बंद झाले. डोळे पुसण्यासाठी मी मलमलचे मऊ लहान लहान रुमाल हातानं शिवून दिले होते. त्यांतले एक-दोन अजूनही पडून आहेत.

त्या वेळी बाबा कदम यांचा हुशार मुलगा उमेश लंडनमधे इंटरनॅशनल-लॉचं शिक्षण घेत होता. त्याला मंगेशनं फोन केला. भेटायला ये म्हणून. तो आला. आणि आम्हांला तुसादचं मेणाचं प्रदर्शन बघायला घेऊन गेला. अप्रतिम, आश्चर्यकारक असे हे पुतळे बघताना, हे पुतळे आहेत की माणसंच, असा प्रश्न पडावा. वाटेत जाताना बकिंगहॅम पॅलेस बाहेरून पाहिला.

इतर ठिकाणी आम्ही कोणाबरोबर गेलो होतो त्यांचं नाव इतक्या वर्षांनंतर माझ्या लक्षात राहिलं नाही. त्यांची क्षमा मागायला हवी.

शेक्सपियरचं जतन करून ठेवलेलं घर, त्यातलं फर्निचर, काही भांडी, पळ्या, चमचे, वर जाण्यासाठी असलेला जिना, तो जन्मला ती खोली–सगळं कसं लखख ठेवलं आहे. ते सुरक्षित राहावं म्हणून घेतलेली काळजी स्पष्ट दिसत होती. तिथं मी त्या घराचा फोटो असलेला, हाताएवढा लहानसा ट्रे घेतला. आठवण म्हणून.

त्यानंतर ऑक्सफर्ड, स्ट्रॅटफर्ड या अतिशय जुन्या युनिव्हर्सिटीज आत जाऊन पाहिल्या. तिथले विद्यार्थी पाहिले. जुन्या वास्तू आणि वस्तू जपून आणि सांभाळून ठेवाव्यात तर या लोकांनीच. त्यांची वाहवा करावी तेवढी थोडीच. त्यांचं साहित्याबद्दलचं प्रेम आणि ते निर्माण करणाऱ्या कलावंतांबद्दलचं प्रेम हे वाखाणण्यासारखं आहे. आणि स्वच्छता तर आपल्याला लाज वाटेल अशी आहे.

सर्व पाहून लंडनला परतताना मनोहारी, निसर्गरम्य, हिरव्यागार परिसरातून गाडी जात होती. रस्ते गुळगुळीत, सुंदर, धक्के न बसू देणारे. हिरवीगार कुरणं मुद्दाम मेंढ्यांना चरण्यासाठी सुरक्षित ठेवली होती. किती बघू, आणि काय बघू? गाडीच्या वेगात सर्व भराभर मागं पडत होतं. आणि अचानक एका हिरव्यागार मखमली कुरणात, एक आश्चर्य दिसलं. दोन्ही टोकं कुरणांत टेकलेलं एक लहान इंद्रधनुष्य, स्पष्ट रंगांत, स्थिरपणं उभं होतं. कमान उभी करावी तसं. आमच्या अगदी जवळ. त्या कमानीखालून जावं. दोन्ही रंगीत टोकं हातात धरावी असं वाटलं. गाडी थांबावी–पुढं जाऊ नये–पण ते शक्य नव्हतं. ओरडून ते दृश्य मंगेशला दाखवलं. नजर न काढता साठवून ठेवलं. सृष्टीच्या चमत्काराचा एक सुंदर अनुभव. खरा खरा.

मंगेशनं नंतर त्या दृश्यावर कविता लिहिली.

थोडीफार खरेदी करून, पटवर्धन पतिपत्नींचा निरोप घेऊन पुन्हा विमानात बसून मुंबईला परतलो.

प्रचंड थकवा जाणवत होता. बारीक ताप येत होता. डाव्या बाजूला स्पॉडिलायटिसनं असह्य वेदना सुरू झाल्या. न थांबणाऱ्या. घरात तशीच वावरत होते. ताप आला तर दिसतो–हाताला लागतो. पण वेदना दिसत नाहीत–त्यांचा तीव्रपणा कळत नाही.

डॉक्टर अरविंद बावडेकर यांच्याकडंच मी स्पाँडिलायटिससाठी ट्रीटमेंट घेत होते. ते कधी माझ्याकडून फी घेत नसल्यामुळं त्यांना त्रास देणं अवघड वाटायचं. तरी पुन्हा त्यांच्याकडंच गेले. त्यांनी मला पाठीत दुखणाऱ्या विशिष्ट ठिकाणी हायड्रोकॉरटिझॉनचं इंजेक्शन दिलं. त्या वेळी सोबत अजित आला होता. काही दिवसांनी बोलावून पुन्हा दुसरं इंजेक्शन दिलं. तरी दुखणं पूर्ण गेलंच नाही. माझंही वय साठीला आलं होतं.

काकांचं म्हातारपण वाढत चाललं होतं. त्यांचं वय ८७च्या वर गेलेलं. नेमका काय आजार आहे ते कळत नव्हतं. एक दिवस त्यांना सारख्या उलट्या व्हायला लागल्या. पोटात काहीच ठरेना. त्यांना जमिनीवरच वारंवार वांती होऊ लागली. सारखं चाललेलं ते वमन पुसून थकले. कंटाळले. म्हणून अजितच्या हॉस्पिटलमधून भांडं आणून ठेवलं. त्याचा वापर करणं त्यांना जमेना. संध्याकाळी अजितनं डॉक्टर सोमण यांना बोलावलं. त्यांनी तपासलं. उलटी झालेली बघितली. काही औषधं लिहून दिली. ती दिल्यावर जरा बरं वाटायला लागलं. तरी मधून मधून कपडे घाण होत होते. ती घाणच काढण्याची शारीरिक व मानसिक शक्ती मला कशी, कुठून आली होती ते मला ठाऊक नाही. कदाचित ती त्यांचीच पुण्याई असेल.

एकदा त्यांची धाकटी मुलगी सुहासिनी आडारकर व शशी (जावई) त्यांना पंधरा दिवसांसाठी बोरिवलीला राहायला घेऊन गेले. त्यांच्या आवडीचे पदार्थ करून त्यांना खाऊपिऊ घातलं. तिला पण ह्याच प्रसंगांना तोंड द्यावं लागलं. दोनच आठवड्यांनी त्यांना ते परत घेऊन आले. मला त्यांचं काय काय करावं लागतं ह्याची तिला कल्पना आली. तसं तिनं जाताना मला बोलून दाखवलं.

त्यानंतर कॉटवरून उठताना ते पडायला लागले. दोनतीन वेळा खूप जोरानं पडले. डोकं फुटून रक्त आलं. "यशोदा", "यशोदा" करून ओरडायचे. त्यांना उठवून औषध लावून पट्टी लावत होते. "एकदम उठू नका, उठायचं असेल तेव्हा मला हाक मारीत जा." असं सांगून ठेवलं होतं. पण ते ऐकत नव्हते.

१९८४ चा जून महिना संपत आला होता. त्यांचा वाढदिवस १ जुलैला. त्यांना

८७ वर्षं पूर्ण होणार होती. सासूबाई असताना तिन्ही मुली, जावई त्यांच्या वाढदिवसाला रात्री जेवायला यायचे. आम्ही दोघी चार-पाच किलो मटण, आणत होतो. भरपूर पुऱ्या, कढी, भात करून सर्वांना आनंदानं वाढत होतो. त्या वारल्यानंतर ते जेवण बंद पडलं. पण मी घरातल्या घरातच मटण करून वाढदिवस साजरा करायची. मुली जमेल तेव्हा येऊन त्यांना भेटी देऊन जायच्या.

जूनच्या ३० तारखेला ते उठताना जोरानं खाली पडले. त्यांच्या कंबरेला मार बसला. त्यांना औषध लावून तसंच झोपवून ठेवलं होतं. त्यांना वेदना होत होत्या. १ जुलैला मी मटणाचं जेवण केलं आणि ताट वाढून त्यांच्या कॉटजवळ घेऊन गेले. ताट ठेवलं आणि हातांना धरून, उठून बसायला मदत करू लागले. ते "ओय, ओय" करून ओरडायला लागले. मी विचारलं, "काय झालं?" तर म्हणाले की, "कंबरेत फार दुखतं, मला उठता येत नाही." मी म्हणाले "तुम्ही पडून रहा, मी तुम्हांला घास देते." तर "नकोच. मला जेवणच नको." म्हणाले. मला खूप वाईट वाटलं. वाढदिवसासाठी मुद्दाम केलेलं जेवण ह्यांना आज नको झालं–म्हणजे प्रकृती जास्तच बिघडलेली दिसते.

त्यांनी संध्याकाळी मला खोलीत बोलावलं आणि म्हणाले, "मंगेशला आणि अजितला इकडं बोलव. मला त्यांच्याशी बोलायचं आहे." मी दोघांना बोलावून आणलं. त्यांना ते म्हणाले, "मला आता एखाद्या हॉस्पिटलमधे ठेवा. आता हे घरात जमणार नाही."

मला समजलं, देहाच्या कुठल्याही विधीसाठी त्यांना आता उठता येत नव्हतं. दरवेळी मीच त्यांच्यापुढं भांडं धरून त्यांना मदत करत होते. पुन्हा ते भांडं धुऊन आणून ठेवत होते. सुनेकडून हे काम करून घेणं कुठल्याही स्वाभिमानी पुरुषाला सहन होण्यासारखं नव्हतं. मला पण स्पाँडिलायटिसमुळं इच्छा असून त्यांची सेवा शुश्रूषा करणं फार त्रासदायक होत चाललं होतं हे खरं.

आम्ही सर्वांनी एकत्र बसून विचार केला. काय करावं कळेना. मंगेश म्हणाला, "आया ठेवून बघू या. म्हणजे दिवसा एक आणि रात्री एक." त्यांची खोली लहान. सटरफटर सर्व सामान तिथं आणून ठेवलं होतं. खालचा ब्लॉक रिकामा करून चंद्रभागाला आणि त्यांना वर आणल्यापासून घरात अडचण आणि गर्दी झाली होती. ती आया बसणार कुठं? जेवणार कुठं? चंद्रभागा पण त्याच खोलीत झोपायची. तिचं सामान पण तिथंच. समोरच लहान स्वयंपाकखोली. चंद्रभागा दुसऱ्या बाईशी पटवून घेणारी नव्हती. तिनं कुरकूर, बडबड करून भांडणं सुरू केली असती याची मला खात्री वाटत होती. शिवाय दुसऱ्या बाईकडून काकांनी कामं करून घेतली असती की नाही, ठाऊक नाही! बहुतेक नाहीच.

अशा पेशंटना कोणीही हॉस्पिटलमधे ठेवून घेत नाही. महिनोन्‌महिने एक कॉट अडवून ठेवणं कोणालाच परवडत नाही. आता करायचं तरी काय? कळेना. तेवढ्यात एक दिवस कमल सांगायला लागली की, "दादर टी० टी०ला 'बिल'

नर्सिंग होम' आहे. तिथं पार्शी लोकांचा वृद्धाश्रम आहे. अशा तऱ्हेचे म्हातारे लोक तिथं ठेवलेले दिसले.''

तिथं जाऊन कमल-अजित यांनी माहिती काढली. आणि कशीतरी एक जागा त्यांच्यासाठी मिळवली. ॲम्ब्युलन्स बोलावून त्यांना तिकडं नेलं. हॉस्पिटलसारखी स्वच्छता नव्हती. तरी बाकी सोय होती.

तिथं गेल्यावर काका म्हणाले, ''माझ्या कमरेचा एक्स-रे काढायचा.'' कोणालाच वेळ नसल्यामुळं ते काम मलाच करावं लागलं. समोर दीक्षितांच्या क्लिनिकमधे त्यांना स्ट्रेचरवर उचलून नेलं. एक्स-रे काढला. डॉ० म्हणाले ''कंबरेच्या हाडाला क्रॅक गेला आहे. पण ह्या वयात आता प्लास्टर घालता येणार नाही. काहीच करता येणार नाही. त्यांना झोपवून ठेवा.'' पुन्हा उचलून बिल नर्सिंग होममधे नेऊन ठेवलं. त्यानंतर त्यांची प्रकृती खालावतच गेली. त्यांना बेडसोअर्स झाले. आजूबाजूचं भान कमी झालं. मंगेशला फार वाईट वाटत होतं. त्यांना घरातून बाहेर न्यायची त्याची मुळीच इच्छा नव्हती. तो स्वत: काहीच करू शकत नाही. करता आलं असतं तर त्यानं नक्कीच त्यांची सेवा केली असती. एक दिवस तर तो घळघळा त्यांच्यासाठी रडला. ''त्यांना त्यांच्या घरातच मरण येऊ दे.'' म्हणाला. आम्हांला पण फार दु:ख होत होतं. माझ्या हातानं वयाची साठी जवळ आलेली असताना, शरीरात अनेक ठिकाणी वेदना असताना, बाकी संसाराची जबाबदारी अंगावर असताना, जास्तीत जास्त जे करणे शक्य होतं ते, न चिडता, कोणावर राग न काढता मी करतच होते.

एक महिनाभर ते तिथं होते. आणि एक दिवस फोन आला, काका गेल्याचा. मंगेशनं निर्णय घेतला की आता त्यांना परत घरी आणायचं नाही. सर्व नातेवाइकांना कळवलं. सर्व जण आले. तिथूनच त्यांना सायनच्या स्मशानात नेलं आणि दहन केलं. आम्ही घरी आलो. एकदम रिकामं वाटायला लागलं. गेल्या पिढ्यांतील म्हाताऱ्या माणसांची जबाबदारी आमच्यावर होती. त्यांतले काका शेवटचे. इतकी वर्षं त्यांच्याबरोबर राहून, प्रसंगी त्यांच्या मदतीनं–सल्ल्यानं संसार रेटत आणला होता. ती प्रेमळ, सहानुभूतिपूर्ण साथ आता कायमची संपली होती.

मी काकांना वडिलांच्या जागी मानत होते. माझे वडील, मी सात वर्षांची असताना वारले. भाऊ पण लहान. त्यामुळं मी तरुण होईपर्यंत घराला समर्थ अशा पुरुषाचा आधार नव्हता. तो इथं सापडला असं मला वाटायचं.

सुरवातीला काकांना मी सून म्हणून पसंत नव्हते. पण पुढं मुलाचा ढासळता संसार मी ज्या पद्धतीनं सावरत गेले–इंटरपासून, एम०ए०पर्यंत शिक्षण पूर्ण होईपर्यंत समर्थपणं त्याच्या पाठीशी उभी राहिले–मुलांना जन्म देऊन त्यांची उत्तम काळजी घेत होते. हे पाहिल्यावर त्यांचं मतपरिवर्तन झालं. मंगेशला काही सांगायचं असलं तर ते आधी मला सांगायचे. आणि हे ''तू त्याला सांग'' म्हणायचे.

सायनला राहायला आल्यावर काही घरगुती, कौटुंबिक प्रश्न उद्‌भवला तर वर येऊन माझा सल्ला विचारायचे. मला म्हणायचे ''तू आमचा नाना फडणीस आहेस

म्हणून तुला विचारायला येतो. "आईचं आणि त्यांचं भांडणं झालं तर, त्या काकांना भीती घालायच्या, "तुम्ही काय बोललात आणि वागलात ते आता वर जाऊन यशोदेला सांगते.''आई, वर येण्याच्या आधीच काका वर यायचे आणि काय झालं ते मला सांगून जायचे. माझा त्यांच्याबद्दल गैरसमज होऊ नये याची ते काळजी घेत. त्यांच्या भांडणात कोण चुकलं, कोण बरोबर याचा निवाडा करण्याचं न्यायाधीशाचं काम पुष्कळदा माझ्याकडं येत असे.

असे माझे सासरे, आता कायमचे दृष्टीआड झाले. त्यांचं क्रियाकर्म, दिवस घालणं काहीच मंगेशनं केलं नाही. म्हणाला, "मी ते काही मानत नाही. माझा त्यावर विश्वास नाही.'' माझी फार इच्छा होती की त्यानं ते करावं, कारण हिंदू समाजात मुलगा हवा असतो तो त्यासाठी. मोक्ष मिळवण्यासाठी. आत्म्याला शांती व समाधान मिळण्यासाठी. ते त्याला 'मंदू' म्हणायचे. त्यांच्या जिवंतपणीच्या इच्छा त्यानं पुऱ्या कराव्यात आणि बहिणींनाही समाधान मिळू द्यावं असं वाटलं. पण मंगेशनं तो विचार पूर्णपणं झटकून मनातून काढून टाकला.

नरेश मंत्री जपानला गेले. ते जपानमधेच राहिले. आम्हांला एकदा जपानला या म्हणून ते सारखा आग्रह करत होते. मंगेशनं, आपल्याला रजा नाही, वेळ नाही म्हणून सांगितलं. तरी मला नरेश आग्रह करत राहिले. मी म्हणाले, "अंजूचं बाळंतपण आहे मग कशी येऊ?'' त्यांना माझा राग आला, म्हणाले, "आज हिचं बाळंतपण, उद्या कमलचं बाळंतपण, अशी तू हीच कामं करत राहणार आहेस का? तुझा अर्धा खर्च मी करतो. मी माझ्या बहिणींना पण खर्च दिला नाही. इतकं करून तुला नसेल यायचं तर राहिलं.''

त्यानंतर मला जपानला येण्याचा त्यांनी आग्रह केला नाही. 'कुंपणापलीकडचे शेत'च्या प्रकाशनासाठी आम्ही दोघं अमेरिकेला पण जाऊन आलो होतो. तनयचा जन्म होऊन तो वर्षाचा होऊन गेला होता. ८५, ८६ साल असावं. मी जपानला जायचं ठरवलं. मंत्रींना कळवलं मी येते म्हणून. मंगेश पण म्हणाला, तू जा. मी काही येत नाही. तो खरंच का नाही आला ते मला कधीच कळलं नाही. खर्च जास्त होईल म्हणून असेल असं वाटतं. पण एक खरं की मला प्रवासाची, नवीन, प्रेक्षणीय स्थळं बघण्याची आवड आहे हे त्याच्या लक्षात आल्यावर त्यानं मला कधी नको म्हटलं नाही. स्वत: बेत आखून फारसं नेलं नसलं तरी कोणाबरोबर जात असेन तर जाऊ दिलं. तो एप्रिल महिना होता. साल १९८७.

मी जपानला जाते हे कळल्यावर प्रभा म्हणाली, "मी पण येते, मी नरेशला भाऊ मानला आहे. आबांची (परुळकर) त्यांची पण कॉलेजमधली ओळख होती. ते दोघं विल्सनमधे रूमपार्टनर्स होते. मला तिची सोबत झाली. आणि तिला माझी.

ओसाकाला मेडिकल चेकअप होऊन आम्ही टोकियोला उरतलो. नरेश आम्हांला घेऊन जायला आले होते. मित्राची गाडी होती. दोन तासांचा प्रवास होता. मैल न् मैल इमारतीसाठी लागणाऱ्या वृक्षांची लावलेली जंगलं दिसत होती. स्वच्छ, सुंदर रस्ते, आधुनिक बनावटीच्या देखण्या गाड्या एकीमागून एक आवाज न करता चालल्या होत्या. मधून मधून बैठी, सुबक लहान लहान घरं दिसायची. मी डोळे उघडे ठेवून कुतूहलानं सर्व बघून घेत होते. नरेशचं घर पंधराव्या मजल्यावर आहे. मागच्या बाजूला रेल्वे लाइन आहे. वर मोठा ब्रिज बांधलेला आहे. गाड्यांचा आवाज इतक्या जोरानं येतो की एकीपुढं एक सरकणाऱ्या डबल जाड काचा लावून ती बाजू बंद केली आहे. त्या बाजूनं पाहिलं तर 'फूजी' पर्वत चांगला दिसतो.

गेलो त्याच दिवशी संध्याकाळी 'अशोका हॉटेल' मधे आपल्याला जायचं आहे म्हणून त्यांनी सांगितलं. लगेच आम्ही तयार झालो. आणि हॉटेलमधे गेलो. त्यांच्याजवळ गाडी नसल्यामुळं सर्व प्रवास रेल्वेनं किंवा चालत करावा लागत होता. हॉटेलमधे खाण्यापिण्याची अगदी चंगळ होती. कोणीतरी दिलेली ती पार्टी होती.

दुसऱ्या दिवशी सकाळी उठून फूजी पर्वत पाहिला. धुकं नव्हतं, ढग नव्हते. तो अगदी स्वच्छ दिसत होता. नरेश म्हणाले, "तुम्ही अगदी नशीबवान आहांत. फूजी फार क्वचितच इतका स्वच्छ दिसतो." आणि मग रोज सकाळी उठून फूजी पर्वताकडं बघण्याचा नादच लागला.

नरेश म्हणाले, "ह्या आठवड्यात साकुराची फुलं (चेरी ब्लॉसम) फुलण्याचा सीझन आहे. फुलं फुलली की आठ दिवस इथं तो एक सोहळाच साजरा करतात." आम्ही सकाळी उठून स्वयंपाक करून, जेवून, घराबाहेर पडत होतो. बुद्धमंदिरं बघितली. त्यांतल्या बुद्धाच्या मोठ्या मूर्ती पाहिल्या. समोर एक अग्निकुंड जळत असायचं. त्यात प्रत्येक जण उदबत्ती लावून प्रार्थना करून मग मूर्तीकडं पाहत असे. आम्ही पण उदबत्ती लावत होतो. शुभ, अशुभ ते लोक मानतात. त्यासाठी बनवलेल्या काही वस्तू मंदिरापुढं विकत मिळतात. काळा दोरा व काही चिन्हं. त्यावर जपानी भाषेत लिहिलेलं. मंत्र असावेत. लहान लहान घंटा. त्यांत बांधलेला लांबट कागद. त्यावर भुताखेतांनी दूर राहावं म्हणून लिहिलेला मंत्र. तसंच एका मंदिरात जाताना, आम्हांला एक लहानसं झाड दिसलं. त्या झाडावर बांधलेल्या लहान लहान असंख्य कागदाच्या पुड्या दिसल्या. "हे काय आहे?" मी आश्चर्यानं विचारलं. नरेश म्हणाले, "ह्या विशिष्ट झाडावरच हे कागद बांधतात. आपल्या मनात काही इच्छा असेल तर ती कागदावर लिहून ह्या झाडाला टांगून ठेवली की इच्छा पुरी होते, अशी त्यांची कल्पना आहे."

एका मंदिराच्या बाजूला डोंगराच्या उतारावर असंख्य लहान मुलांचे मुखवटे ठेवले होते. ज्यांची लहान मुलं निवर्तलीत त्या मुलांच्या नावानं इथं असे मुखवटे ठेवण्याची पद्धत आहे. जपानी लोक मृत शरीर आधी जाळतात आणि मग त्यातली

हाडं जमा करून त्याची कबर बांधतात. दरवर्षी त्या कबरीवर फुलं, त्याच्या आवडीचे खाण्याचे पदार्थ व दारूचा ग्लास ठेवतात. जपानी लोकांनी आपली भाषा, संस्कृती, रीतिरिवाज सर्व टिकवून ठेवलं आहे. फक्त त्यांच्या पेहरावात फरक झाला आहे. तिथं अमेरिकन पद्धत आलेली दिसते. किमोनो आता फक्त लग्नसमारंभात किंवा सणाला घातलेला दिसतो. आपल्या नऊवारी साडीसारखा.

आठ दिवस झाले तरी साकुराची फुलं फुलेनात. झाडांवर कळ्या येऊन राहिल्या होत्या. नरेशचं सारखं चाललं होतं की, "फुलं का फुलत नाहीत? फुलण्याची वेळ टळून चालली आहे." आणि अचानक रात्री बर्फ पडायला सुरुवात झाली. सकाळी उठून पाहिलं तर सगळं टोकियो शहर पांढरंफेक झालेलं. आता फुलं न फुलण्याचं कारण कळलं. आधी फुलली तर आपण बर्फानं जळून जाऊ हे त्यांना कळलं होतं.

आमच्या गॅलरीत बर्फाचा ढीग झालेला होता. नरेश म्हणाले, "गेल्या ऐंशी वर्षांत, एप्रिल महिन्यात कधी बर्फ पडलं नव्हतं. तुम्ही आलांत आणि निसर्गनियम पण बदलला. त्या दिवशी आम्ही घरीच कुडकुडत राहिलो. बाहेर जाण्याची मला तरी हिंमत झाली नाही. गॅलरीत बर्फाजवळ उभं राहून फोटो काढले.

तीन, चार दिवसांनी साकुरा फुलायला लागला. मग एक दिवस, जेवण तयार करून बांधून घेतलं, आणि साकुराच्या पार्कमधे गेलो. आमच्याबरोबर मूनसान व तिच्या दोन सुंदर मुली पण आल्या. तिनं पण काही जपानी पदार्थ करून आणले होते. पार्कमधे साकुराचे मोठे वृक्ष होते. काहींची फुलं पांढरी, काही गुलाबी छटा असलेली तर काही पूर्ण गुलाबी. फुलांना वास नाही. वृक्षावर नावाला एक पण पान शिल्लक नव्हतं. संपूर्ण वृक्ष नुसता फुलांनी बहरलेला. हे दृश्य मन वेडावून टाकणारं होतं. किती तरी एकर जागेत ठिकठिकाणी नुसती हीच झाडं. दुसरं झाड दिसत नव्हतं. तिथंच बसून जेवलो. मूननं आणलेल्या जपानी पदार्थांची चव घेतली. जपानी बियर पिऊन पाहिली. एका रस्त्यावर दोन्ही बाजूंनी सर्व साकुराची झाडं. रस्त्यावर, त्यांनी वाकून पूर्ण कमान केली होती. बाजूनं दिव्यांची आरास केलेली. आपल्याकडं गणपतीत करतात तशी. त्या कमानीखालून आम्ही सम्राटासारखे चालत गेलो.

नरेशच्या एका विद्यार्थ्यानं आम्हांला फिरायला म्हणून बाहेर नेलं. काय बघायचं ते सांगितलं नव्हतं. एका हॉटेलात बाहेरच्या टेबलावर, बरोबर वसुधा–नरेशची जपानी मैत्रीण होती. आम्ही पुरी, भाजी, पोहे करून आणले होते ते खाल्ले. ऊन पडलेलं होतं. चालत जरा पुढं गेलो. तिथं दोन-तीन जपानी लोक खुर्च्या-टेबलं मांडून बसले होते. नरेशनी तिथं जाऊन पैसे भरले व आम्हांला म्हणाले, "चला. कुठं जायचंय? इथं तर काहीच दिसत नाही! बाजूला रस्त्यानं माणसांची ये-जा चालू आहे." आणि अचानक एक मोठा खड्डा दिसला. त्याला आत उतरायला ओबडधोबड पायऱ्या व हातानं धरायला कठडा होता. आम्ही खाली उतरायला सुरुवात केली. फार थंड वाटायला लागलं. चार-पाच पायऱ्या उतरलो आणि समोर एक आश्चर्य दिसलं: संपूर्ण बर्फानं भरलेली ती एक गुहा होती. थक्क होऊन आम्ही पाहत

राहिलो. उजव्या हाताला बर्फाच्या लाद्यांवर लाद्या रचलेल्या दिसत होत्या. दहा-पंधरा फूट पुढं गुहा संपत होती. सर्व भिंती संपूर्ण बर्फानं झाकलेल्या होत्या. उजेडासाठी आत दिवा होता. शेवटच्या पायरीपर्यंत आम्ही गेलो. पुढं पायऱ्याच नव्हत्या. नुसतं बर्फ. थंडीनं गारठलो. हात काळेनिळे पडले म्हणून चढून वर आलो. आणखी थोडा वेळ थांबावं असं वाटतं होतं. पण ते शक्य नव्हतं. हासुद्धा एक निसर्गचमत्कार. बाहेर ऊन आहे आणि पंधरा वीस फूट खोल गुहेत नुसतं भयंकर गोठवून टाकणारं बर्फ. जपानमधे असे आणखी पण बोगदे होते म्हणे. म्युनिसिपल गार्डन म्हणजे तर एक 'फुलांचं गाव' आहे. सर्व रंगांची, चित्रविचित्र आकारांची तजेलदार फुलं, मोठ्या कुंड्या भरून नुसती फुलंच फुलं. आणि वेलींसाठी मांडव आणि त्यांवरून डोकावणारी नाना रंगांची लहान मोठी फुलं. आयुष्यात पहिल्यांदाच एकाच ठिकाणी इतकी फुलं पाहिली. नंतर एका मोठ्या खोलीत गेलो. तिथं बोनसायचे सर्व प्रकार टेबलावर कुंड्यांत ओळीनं मांडून ठेवलेले. मोठ्या वृक्षाचं रूपांतर आठ ते दहा इंचांच्या झाडात केलं होतं. झाडाला वरून कुठंही कापल्याची खरवडल्याची खूणही दिसत नव्हती. काही झाडं तर त्याहूनही लहान केली होती. झाडं अगदी निरोगी, तजेलदार, आणि हिरव्या पानांनी डवरलेली. ही खास जपानी कला. बाहेरच्या बाजूला, शंभर वर्षांचे-दोनशे वर्षांचे, असे बोनसाय जमिनीत वाढलेले होते. माणसानं सौंदर्यदृष्टी उलट दिशेनंसुद्धा कशी टिकवली आहे, त्याचं हे प्रत्यक्ष उदाहरण.

काचेचं मोठं घर बांधून तिथं भारतीय फुलझाडांची रोपं, विशिष्ट हवामान राखून वाढवली आहेत. रातराणी, चमेली, बोगनवेल, चाफा, अशी काही मला आठवतात. प्रत्येक घरापुढं जागा असेल त्याप्रमाणं त्या त्या ऋतूंत फुलणारी मोहक फुलझाडं फिरताना दिसतात.

अस्सल जपानी घरात जाऊन जेवणाची संधी आम्हांला मिळाली. जपानी राजपुत्राला व्हायोलिन शिकवणारे म्हातारे शिक्षक आहेत. ते जुन्या खानदानी पद्धतीनं राहतात. आम्ही सर्व गोल करून बैठकीवर बसलो होतो. मधे गॅसची ज्वाळा न दिसणाऱ्या शेगड्या, त्यावर तवे ठेवले होते. मोठे मोठे बाउल भरून सर्व प्रकारच्या भाज्यांचे काप, चिकन, मटणाचे चपटे तुकडे, थोडं थोडं तेल टाकून त्यावर भाजून इतर सॉस वगैरेबरोबर देत होते. ते फार चवदार लागत होते. संपूर्ण घर सुंदर सुंदर वस्तू आणि फुलं ह्यांनी सुशोभित केलं होतं. अगदी संडाससुद्धा.

त्यांनी आम्हांला व्हायोलिन (खूप मोठं) वाजवून दाखवलं. त्या सुरांतून माणसाच्या भावना म्हणजे, प्रेमाची धून वेगळी, आनंदाची वेगळी, दु:खाची वेगळी. आणि चिडून कडकडाट करणारी वेगळी. घरातल्या स्त्रिया आदबशीर, कष्टाळू व कुटुंबवत्सल वाटल्या. गोऱ्या, नाजूक चणीच्या त्यांच्या नाजूक हालचाली बघत राहाव्याशा वाटल्या.

हिरोशिमा बघायला आम्ही आगगाडीनं गेलो होतो. नरेशचा पुतण्या मनोज हा आमच्या सोबत होता. तिथं एका मठात उतरलो. ती सुंदर इमारत होती. त्यांचे नियम

आणि जेवणाच्या वेळा सांभाळणं आम्हांला फार त्रासदायक झालं. आम्ही फार थकलो होतो. थोडा विसावा पाहिजे होता. त्या ठिकाणी एक माणिक नावाची सुंदर मराठी मुलगी जपानी शिकण्यासाठी येऊन राहिली होती. दुसऱ्या दिवशी नागासाकीला गेलो. अणुबाँबनं उद्ध्वस्त झालेलं शहर. एक इमारत तशीच ठेवली आहे. बाजूनं लोखंडी कुंपण घालून सर्व अवशेष तसेच ठेवलेले बघायला मिळतात. आम्हांला उशीर झाला त्यामुळं म्युझियम बंद झालं होतं. तिथं एक उग्र लष्करी अधिकारी उभा होता. त्यानं ठामपणं नकार दिला. वाईट वाटलं. पण इलाज नव्हता. बाकी सर्व फिरून बघितलं.

रात्री मठातील अधिकाऱ्यांनी आम्हांला जेवायला हॉटेलात नेलं. त्या दिवशी जपानमधे जाऊन चिनी जेवण जेवण्याचा योग होता. इथं मिळणाऱ्या चायनीज जेवणापेक्षा फार वेगळ्या चवीचं ते जेवणं होतं. पदार्थही इथं न पाहिलेले वेगळेच होते. मला ते जेवण फारच आवडलं.

मुंबईला परतण्याच्या तिकिटांची व्यवस्था केली. सामान बांधलं. निघण्याची तयारी झाली. नरेश बाहेरच येईनात. आपल्या खोलीत दार लावून बसून राहिले. आम्ही परत जाणार म्हणून त्यांना अतिशय दु:ख होत होतं. म्हणजे ते रडतच होते. दु:खानं त्यांचा निरोप घेतला. मनोजबरोबर एअरपोर्टला गेलो. एक अविस्मरणीय असा अनुभव घेऊन घरी परतलो.

अभयनं लग्नानंतर एकदा एलिझाबेथला घेऊन भारतात यायचं ठरवलं. आणि आमची गडबड उडाली. आमची बेडरूम त्यांना द्यायची असं ठरलं. सामानाची हलवाहलवी केली. कपाट थोडं रिकामं करून ठेवलं. आमचं सामान दुसऱ्या अडचणीच्या खोलीत हलवलं. पण मुख्य अडचण होती ती कमोडची. घरात एकच संडास आणि तो बैठा. खूप चर्चा, वादविवाद झाले. माझी इच्छा होती की घरात मोडतोड न करता बाहेर गच्चीत एक कमोड बांधून घ्यावा. पण ते म्युनिसिपालिटीच्या नियमात बसत नव्हतं. तरी मी तोच आग्रह धरला आणि माझी मैत्रीण वासंती मुझुमदार हिला फोन केला. सर्व अडचण सांगितली. वासंती-अरुण यांनी नुकताच घराच्या मांडणीत मोठा बदल करून सुंदर इंटिरियर डेकोरेशन करून, नवा रंग दिला होता. तिनं मला कुळकर्णी नावाच्या कॉंट्रॅक्टरचं नाव सांगितलं व फोन नंबर दिला. त्यांना फोन केला. ते दुसऱ्या दिवशी आले. मंगेश म्हणाला, "तूच त्यांच्याशी बोल आणि तुला कुठं काय हवं ते सांग." नियमाविरुद्ध म्हणून अजित पण जरा गप्पच होता. तरी अजित आणि मी दोघांनी कसं आणि कुठं बांधकाम करायचं ते त्यांना सांगितलं.

त्यांनी पंधरा दिवसांत कमोड व निळ्या टाइल्स लावलेली बाथरूम भराभर बांधून दिली. मग ती मंगेशला इतकी आवडली की, घरी आलेल्या प्रत्येक माणसाला तो बाहेर नेऊन दाखवायला लागला. त्याचं ते कौतुक बरेच दिवस चालू होतं. त्याचा

खर्च पंधरा हजार रुपये मंगेशनंच दिला. आम्ही गच्चीत बांधकाम करतो आहोत हे लगेचच म्युनिसिपल सुपरवायझर्सच्या लक्षात आलं. आणि त्यांनी आम्हांला नियम दाखवायला सुरुवात केली. ते सर्व निस्तरण्याचं काम पण शेवटी मंगेशलाच करावं लागलं. तो नियमित करून घेतला. दरवर्षी त्यासाठी रक्कम भरावी लागते. आता म्हातारपणी तर तो आम्हांला फारच सोईचा वाटतो.

अभय, एलिझाबेथ आले. दोन तीन आठवडे राहिले. आणि परत गेले. ती फार खुषीत आहे असं मला वाटलं नाही. मी अभयला नियमित पत्र लिहीत होते. त्याची उत्तरं येत होती. त्याच्या पत्रांचा सूर बदलत चालला होता. मला फार काळजी वाटायची. एक दिवस मी मंगेशला म्हणाले, "मला आज फार अस्वस्थ वाटतंय. अभयची आठवण येते. काळजी वाटते. मी त्याला फोन करू का?" तो नशिबानं "नको" म्हणाला नाही. मी लगेच फोन फिरवला. अभयनंच उचलला. टेलिपथी म्हणा किंवा काही म्हणा, तो अतिशय दु:खानं म्हणाला, "आई, एलिझाबेथ घरातून निघून गेली." त्याचं बोलणं ऐकलं आणि माझ्या काळजात धस्स झालं. मी त्याचं समाधान करायला लागले. "जाऊ दे" म्हटलं, "तुझी लायकी समजण्याइतकी कुवतच नव्हती तिची. तू काळजी करू नकोस. आता माझं ऐक. मी तुझा संसार परत नीट मांडून देते."ह्या बोलण्यानं त्याचं समाधान झालं नाही हे कळत होतं.

नंतर म्हणाला, "मी बॅडमिंटन खेळताना पडलो आणि माझ्या डाव्या गुडघ्याचं लिगामेंट तुटलं आहे. मी चालू शकत नाही. कुबड्या घेऊन फिरतो आहे. लगेचच हा दुसरा धक्का. इतकं रामायण झालं तरी ह्या मुलानं एक फोन केला नाही. काही एक कळवलं नाही. एकटाच शारीरिक, मानसिक दु:ख सहन करत का राहिला? ती मुलगी, ह्या अवस्थेत त्याला एकटा टाकून निघून कशी गेली? मी सात समुद्र अलीकडं. इथून काय करू शकणार?

आम्ही दोघांनी त्याला सांगितलं, "तू मनाला त्रास करून घेऊ नकोस. आणि ज़र गुडघ्याचं ऑपरेशन करायचं असलं तर आम्हांला लगेच कळव." मंगेशनं लगेच घाई करून माझ्या पासपोर्ट-व्हिसाची तयारी करून दिली. आणि मला सांगितलं की "तू जाऊन त्याच्याजवळ राहा. त्याची काळजी घे." त्याप्रमाणं त्याला कळवलं. "कधी येऊ?" म्हणून विचारलं तर तो म्हणाला, "तू अजिबात येऊ नकोस. ऑपरेशननंतर मी माझ्या अमेरिकन मित्राकडं चार दिवस राहीन. आणि बरं वाटल्यावर माझ्या घरी जाईन." आणि खरंच, त्या अमेरिकन मित्रांनीच त्याला मदत केली. त्याचा गुडघा हळूहळू बरा झाला.

डिव्होर्स प्रकरण पूर्ण झाल्यावर त्याला घरी येऊन जा म्हणून सांगितलं. त्याप्रमाणं तो आला. डिव्होर्स घेऊन सहाच महिने झाले होते. तिला विसरणं त्याला कठीण जात होतं. पुन्हा लग्न करायला तो "नाही" म्हणायला लागला. एक दिवस रात्री त्याच्या खोलीत जाऊन बोलत बसले. त्याला सांगितलं की, "लग्नाला नाही म्हणतोस ते, एकटं राहून तुला काय वेडं व्हायचंय? पुन्हा एखाद्या अमेरिकन

मुलीच्या जाळ्यात अडकशील. तू अजून फार तरुण आहेस. तुला तुझं आयुष्य पुन्हा उभं केलं पाहिजे. आयुष्य उधळून देऊ नकोस.'' असं त्याला समजवताना रात्रीचे दोन वाजले. शेवटी तो तयार झाला. मुली बघ म्हणाला. तो सहसा माझ्या शब्दाबाहेर जात नसे. आताही तो नाइलाजानं तयार झाला. आणि परत अमेरिकेला गेला.

मी ठरवलं आता वेळ घालवायचा नाही. सर्व कामं झटपट झाली पाहिजेत. मंगेशला म्हणाले, ''टाइम्स ऑफ इंडिया'त मी सरळ नाव आणि फोन नंबर देऊन जाहिरात द्यायची ठरवलंय. तुझं काय मत आहे?'' तो म्हणाला, ''नाव कशाला देतेस?'' मी म्हणाले, ''नाव आणि फोन नंबर दिला तर जास्त लवकर काम होईल. पत्रापत्रीमधे फार वेळ जाईल. मला तर त्याचं लवकर लग्न करून द्यायचंय.'' तो म्हणाला, ''तुला नाव घालायचं असलं तर घाल. पण माझं नाव घालू नकोस. आणि आलेला एकही फोन मी उचलणार नाही.'' मी म्हणाले, ''बरं हरकत नाही. नाव घालणं तुझ्या प्रतिष्ठेच्या आड येत असेल तर मी माझं एकटीचं, 'यशोदा पाडगावकर' म्हणून नाव घालीन. पाडगावकर नाव त्यात येईल पण त्याला माझा नाइलाज आहे.''

अजितला सांगितलं, ''मला जरा मदत कर. जाहिरात कुठं देतात, कशी देतात ते मला ठाऊक नाही.'' तो लगेच माझ्याबरोबर आला. मला त्यानं सर्व प्रकारची मदत केली. आणि आम्ही घरी आलो. रविवारच्या टाइम्सला जाहिरात आली. सोमवारी सकाळपासून फोन यायला सुरुवात झाली. मंगेशनं ठरवल्याप्रमाणं फोन घ्यायला नकार दिला. ''माझा फोन असला तर फक्त मला सांग'' म्हणाला. मी फोनवरून मुलींची माहिती विचारून लिहून घ्यायला सुरुवात केली. फोन नंबर घेऊन ठेवले. ह्या कामात कमल घरात असेल तेव्हा मला मदत करायची. अशा तऱ्हेनं आम्ही माहिती जमा केली. कमल आणि मी जाऊन मुली बघायला लागलो. एकदोनदा अंजू पण सोबत आली. मुलगी अमेरिकेस जाऊ शकेल की नाही? हा पण विचार मनात ठेवावा लागला. हाही मुद्दा मंगेशनं उपस्थित केला होता की लग्न झालं तरी व्हिसा मिळून मुलगी तिकडं जाईपर्यंत दीड-दोन वर्षंसुद्धा जातात. म्हणून इथली मुलगी बघण्यापेक्षा अमेरिकेतलीच बघावी. त्यासाठी त्यानं त्याच्या काही मित्रमंडळींना अमेरिकेत मुलगी बघायला सांगितलं होतं पण त्यातून काही निष्पन्न झालं नाही.

माझं संशोधन चालूच होतं. आणि एका रविवारी मीनलच्या आईचा फोन आला. त्या गोरेगावला राहतात. मी म्हटलं, ''आम्हांला गोरेगावला येऊन तुमचं घर शोधायला फार त्रास पडेल.'' तेव्हा त्या म्हणाल्या, ''आम्हां दोघींना ड्रायव्हिंग येतं. आम्हीच तुमच्या घरी येतो.'' त्याप्रमाणं त्या दोघी आल्या. एकमेकांच्या माहितीची देवाणघेवाण झाली. मीनल सर्वांना आवडली. ती एअर इंडियात ग्राउंड होस्टेस होती. ग्रॅज्युएट होऊन ट्रॅव्हल टूरिझमचा कोर्स केलेला होता. इंग्लिश मिडियममधून शिकल्यामुळं उत्तम इंग्लिश बोलता येत होतं. तिला विमानाची फ्री तिकिटं मिळत होती. तिचा पण

दोन वर्षांपूर्वी डिव्होर्स झाला होता.

शैलाताई म्हणाल्या, "अभयला इकडे बोलवायच्या आधी तिचे फोटो त्याला पाठवून द्या. फोटोत पसंत पडली तर त्याला बोलावून घ्या." अभयला फोटो पाठवले. त्याला ते आवडले. तो दोन आठवड्यांसाठी भारतात आला. येताना तो हाँगकाँगवरून आला. मधे एक रात्र त्यानं तिथं मुक्काम केला. विसावा घेऊन तेलाचा मसाज घेतला. मग भारतात येणाऱ्या विमानात बसला.

मीनल एअरपोर्टवरच नोकरी करत होती. ती मला विचारायला लागली की, "मी अभयला घ्यायला विमानापर्यंत जाऊ शकते. मी त्याला सर्व व्ही०आय०पी० ट्रीटमेंट देईन. तर मी युनिफॉर्ममधे आत जाऊ का?" मला कळेना काय सांगू? ही आत येणार याची अभयला कल्पना नसणार. तो नीट तयार झालेला असेल का नाही? तरी मी तिला 'जा' म्हणाले. फोटो पाहिले असल्यामुळं दोघांनी तिथंच एकमेकांना ओळखलं. मीनलचे आई-वडील आणि आम्ही बाहेर वाट बघत उभे होतो. थोड्याच वेळात दोघं अगदी रुबाबात बाहेर येताना दिसले. मला जी भीती वाटत होती ती खरी ठरली. कारण अभयनं हाफ पँट घातली होती. कालच्या मसाजाचं तेल चेहऱ्यावर दिसत होतं. त्यात तो रंगानं सावळा आहे. पण त्यामुळं काही फरक पडला नाही. सर्वांची ओळख करून दिली. दुसऱ्या दिवशी अभयनं आणि तिनं भेटायचं ठरवलं आणि आम्ही त्याला घेऊन घरी आलो.

दुसऱ्या दिवशी बँड्राला एका ठिकाणी मीनल गाडी घेऊन येणार तिथं अजित कमल व मी त्याला घेऊन गेलो. तेवढ्यात मीनल आली. खूप सुंदर तयार होऊन आली होती. खाली उतरली. अभयला आत बसवलं. स्वत: ड्रायव्हिंगला बसली. गाडी स्टार्ट केली. आणि अशा वेगानं ती त्याला घेऊन निघून गेली की मला भीतीच वाटली. तिथंच मी अजितला म्हणाले, "ह्या मुलीनं माझ्या मुलाला पळवलं!" आणि ते खरंच झालं. त्या दोघांनी एकमेकांना पसंत केलं. आणि लग्न करायचं ठरवलं.

मीनलचे वडील रमाकांत सोमण व शैलाताई यांच्याशी बोलून लग्नाची तारीख नक्की केली. आणि तयारीला लागले. अजितनं आणि मी फिरून सायनमधे हॉल नक्की केला. आणि सायनचेच भटजी ठरवले. मंगळसूत्र, अंगठी, दागिने हे सगळं खरेदी केलं. त्यांनी साड्या त्यांच्या पसंतीनं घेतल्या. लग्नानंतरचं जेवण अजितनं दादर क्लबला ठरवलं. लग्नाला कमीत कमी माणसं बोलावली. आणि लग्न पार पडलं.

जवळच्याच चांगल्या हॉटेलमधे अभय-मीनल दोनतीन दिवस हनिमूनला जाऊन आले. आणि दोन दिवसांनी अभय परत गेला.

मीनलजवळ इंग्लंडपर्यंतचं तिकीट होतं. ती त्याच्या पाठोपाठ इंग्लंडला पोचली आणि तिनं अभयला फोन केला. त्यानं तिला अमेरिकेचं तिकीट पाठवलं. ती अमेरिकेत पोचली. अभय तिला घरी घेऊन गेला. लग्नानंतर आठ दिवसांनी मीनल अमेरिकेत होती.

अभयच्या लग्नानंतरच्या रात्री मी थकून आतल्या खोलीत कॉटवर पडून विचार करत होते. खोलीत दिवा चालू नव्हता. तेवढ्यात मंगेश आत आला आणि म्हणाला, "यशोदा तू जे काही केलंस त्याला तोड नाही. मी तुझे पाय धरतो." खरोखरीच त्यानं माझे पाय धरले. आणि डोळे पुशीत तो खोलीतून बाहेर गेला. त्याच्या सर्व प्रकारच्या विरोधाला न जुमानता मी एकटी पुढचे निर्णय घेतच राहिले. त्यात मला यश आलं. पैशाच्या बाबतीत मात्र त्यानं मला कधी अडवलं नाही. लागतील तेवढे पैसे काढून दिले. हे माझं नशीबच म्हणायचं.

अभयला नवऱ्याच्या वेषात हॉलमधे येताना बघून माझा मनावरचा ताबा सुटला आणि मला अतोनात रडू कोसळलं. ही वेळ रडण्याची नाही. मुलीची आई रडते, मुलगी जाणार म्हणून. पण माझ्या रडण्याचं कारणच वेगळं होतं. त्याच्या विस्कटलेल्या संसाराची घडी पुन्हा नीट बसवून देताना येणारे ते आनंदाश्रू होते. माझ्या अथक प्रयत्नांना यश आलं होतं. कमल जवळ आली म्हणाली, "आई आता रडू नका. अभयला काय वाटेल?" मी "हो" म्हणाले आणि मन आवरून पुढच्या कामाला लागले.

तिच्या आईवडिलांना पण अभयसारखा जावई मिळाला म्हणून आनंदच झाला, त्याला त्यांनी हिऱ्याची अंगठी केली. आणि "आम्हांला हिरा मिळालाय" असे उद्‌गार काढले. त्यानं आय०आय०टी० तून बी०टेक केलं. नंतर स्कॉलरशिपवर अमेरिकेत एम०एस० आणि एम०बी०ए० पूर्ण करून त्याला उत्तम नोकरी मिळाली होती. तो पूर्ण निर्व्यसनी आहे. दारू, सिगारेट, पान, तंबाखू, सुपारी–कसलंच व्यसन नाही. ही त्यांना आणखी समाधान देणारी गोष्ट ठरली.

श्री० पु० भागवत-विमलताई सायनला राहायला आल्यावर आमचं त्यांच्याकडं येणं-जाणं वाढलं. एकदा एका कामाच्या निमित्तानं त्यांच्या घरी गेले होते. तेव्हा वासंती हॉलमधे बसली होती. भागवतांनी आमची ओळख करून दिली. मला ती आवडली. ओठांची नाजूक ठेवण, नितळ कांती, मुद्रेवर गोडवा. वागण्यात काहीसा संकोच होता. मी उभ्याउभ्याच भागवतांशी कामाचं बोलून निघून आले. पण वासंतीचा गोडवा ध्यानात राहिला.

नंतर काही ना काही कारणानं आम्हांला वासंतीकडं जेवणाचं आमंत्रण येऊ लागलं. मला त्यांच्या घरी जायला आवडायचं याला कारण अरुणचा उमदा स्वभाव. तो चार्टर्ड अकौंटंट आहे आणि हुशारही आहे हे कळलं. अनेक विषयांचं त्याचं उत्तम वाचन असायचं आणि अभ्यासही. मोठ्या विश्वासानं बोलत असे. त्याहूनही आवडला त्याचा आनंदी स्वभाव आणि विनोदबुद्धीही तशीच. सर्वांना आपलंसं करून टाकायचा तो क्षणभरात. तुम्ही घरचेच आहांत अशी जाणीव तो निर्माण करी आणि वातावरणात मोकळेपणा आणी. लहान मूल असो की म्हातारं माणूस. एकाच

आस्थेनं, मायेनं तो पाहुणचार करी. पुष्कळ वेळा मोठमोठ्या हॉटेलात तो आम्हांला जेवायला घेऊन जाई.

वासंती काहीशी संकोची व अबोल स्वभावाची. पण हळूच म्हणायची, "तुम्ही या ना आमच्या घरी. कधी येता? तुम्ही आलांत की फार आनंद होतो." ही बहुगुणी आहे हे लौकरच लक्षात आलं. तिला संस्कृतचं चांगलं ज्ञान आहे. चांगल्यापैकी कविता करते. वरच्या दर्जाची चित्रकार. पाडगावकरांच्या अनेक पुस्तकांची मुखपृष्ठं तिनं केलेली आहेत. तसेच पुस्तकांसाठी फोटोही काढले आहेत. ताज आर्ट गॅलरीत तिनं रंगवलेल्या तैलचित्रांचं प्रदर्शन मी पाहिलेलं आहे. घरात मोठमोठी ऑइल-पेंटिंग्ज आहेत. ललित लेखनात तिनं नाव मिळवलेलं 'नदीकाठी' हे तिचं पुस्तक, 'मौज' नं प्रकाशित केलं आहे. महाराष्ट्र शासनासह पुष्कळ पारितोषिकं त्या पुस्तकाला मिळाली. अरुण, वासंती दोघंही संगीताचे नादी. कुमार गंधर्वांची वासंतीनं दूरदर्शनवर मुलाखत घेतली होती. आणि इंदिरा संतांचीही बेळगावला जाऊन दूरदर्शनसाठी मुलाखत घेतली होती.

कुमार गंधर्व, इंदिराबाई संत, चित्रकार गोपाळ अडिवरेकर व त्यांची पत्नी उमा, वसंत बापट, विंदा करंदीकर अशी मंडळी त्यांच्या घरी भेटत. चित्रपट, नाट्य क्षेत्रांतली मंडळीही तिथं भेटत. त्याच वातावरणात वाढलेली त्यांची श्रुती खेळकरपणं वावरत असायची.

वासंती, अरुण वयानं आमच्यापेक्षा खूप लहान. पण आमच्या मैत्रीत ते जाणवायचं नाही. सुप्रसिद्ध कवी मंगेश पाडगावकर यांच्याबद्दल आदर आणि प्रेम वाटलं तर ते जाणण्यासारखं आहे. पण माझ्याबद्दल का, कसं, इतकं प्रेम? त्याचं उत्तर आजवर सापडलेलं नाही.

१९७५ मधे वासंती-अरुण शिवाजीपार्कला राहायला आले. आणि त्यांचं घर आम्हांला अगदी जवळचं झालं. वासंती जिवलग वाटू लागली.

मंगेशनं स्वत:ची एकसष्टी साजरी करायची नाही असं ठरवलं होतं. त्या दिवशी आम्ही दोघं मुंबईबाहेर निघून गेलो. पण परत आल्यावर अरुणनं त्याचा डाव हाणून पाडला. साने गुरुजी विद्यालयात सर्व मित्रमंडळींना बोलावलं. शोभा जोशीचं गाणं ठेवलं. शेवटी सत्कारही केला. आणि सर्वांना चहा-खाणंही दिलं.

त्यांच्या घरी श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांची वारंवार भेट होऊ लागली. वासंती आणि श्रीनिवास कुलकर्णी एकाच गावचे– कऱ्हाडचे. त्या दोघांच्या आवडीनिवडी सारख्या. साहित्य, चित्रकला, संगीत आदी गोष्टींत समान स्वारस्य. कऱ्हाडला त्यांची घरं जवळजवळ आणि दोघांच्या घरांत कौटुंबिक जिव्हाळा होता.

वासंती मुंबईत यायच्या आधीपासून श्रीनिवास कुलकर्णी यांची आणि आमची ओळख होती. १९६१ सालापासून ते सायनला आमच्याकडं येत होते. पाडगावकरांच्या कवितेचे ते प्रेमी. कधी त्यांची श्री० पु० भागवत यांच्या घरी भेट व्हायची. कविता हा त्यांचा आवडीचाच विषय होता. ते कऱ्हाडहून कवितेला वाहिलेलं 'रूप' नावाचं

अनियतकालिक प्रसिद्ध करत. 'सत्यकथेत' त्यांचं ललितलेखन आणि कविता येऊ लागल्या. पुढं 'डोह' आदी त्यांची पुस्तकं 'मौज'नं प्रसिद्ध केली. ती मी वाचली. वेगळ्याच अंगानं लिहिण्याची त्यांची पद्धत मला फार आवडली. किंचित गूढ अशा वातावरणात पात्रं आणि प्रसंग समर्थपणं उभे करण्याची शक्ती त्यांच्या लेखनात आहे हे जाणवलं आणि त्यांच्याविषयी कुतूहल निर्माण झालं. त्यांच्याशी संवाद करायला आवडू लागलं.

कऱ्हाडला त्यांच्या घरी कधी कधी जाण्याचा योग येई. त्यांची पत्नी ललिता आणि उदयन व आलोक ही दोन मुलं, अगत्यशील, गुणी, आणि कला-वाङ्मयप्रेमी. त्या सर्वांशी आमचा एक ऋणानुबंध जडला.

आता मंगेशची सर्व पुस्तकं 'मौज' प्रकाशनतर्फे प्रकाशित होत होती. ७८ साली 'सलाम' प्रकाशित झाला. ते फार नावाजलं आणि गाजलंसुद्धा. ८१ मधे 'गझल', ८४मधे 'भटके पक्षी', त्यानंतर ८९मधे सर्व भावगीतं एकत्र करून 'तुझे गीत गाण्यासाठी' हे भावगीतांचं पुस्तक प्रकाशित झालं. त्याच्या अनेक आवृत्त्या सहजच निघत राहिल्या. ९० मधे 'बोलगाणी' आली, आणि माणसं वेडावून गेली. अगदी आपल्या मनातलं, आपल्या घरातलं, हवं तेच, काही विनोदाच्या अंगानं, काही उपदेशाच्या अंगानं काही उपहासाच्या अंगानं, साध्या सोप्या आपल्याच भाषेत, काव्याच्या अंगानं मुक्तपणं लिहिलेली बोलगाणी गाण्यासाठी नव्हती. गायकाची जरूर नसलेली गाणी. रसिकांना खूपच आवडली. नंतर 'उदासबोध' पाठोपाठ 'त्रिवेणी' असं लेखन चालूच राहिलं. दोन वर्षं कबिराच्या भजनांचं आणि दोह्यांचं भाषांतर झालं. त्यानंतरचं 'सूरदास' हे भाषांतर.

"रिटायर झालो आता काय करायचं?" हा त्याला कधी प्रश्न पडलाच नाही.

नोकरी चालू असताना, असाच एकदा कोल्हापूरला कार्यक्रम होता. घरी आल्यावर म्हणाला की, "अग यशोदा, ह्या वेळी माझी एका फार प्रेमळ व चांगल्या कुटुंबाशी ओळख झाली. त्यांचं नाव आहे 'वीरसेन कदम' पण सगळे त्यांना 'बाबा' म्हणतात. त्यांची पत्नी 'कुमुदिनी'. त्यांना 'माई' म्हणतात. त्यांचा मुलगा 'उमेश'. तो फार हुशार आहे. लॉ कॉलेजमधे शिकतो. तुला पण ते कुटुंब फार आवडेल. आणि ते तंतोतंत खरं ठरलं. बाबा कादंबरीकार आहेत. माईंना वाचनाची आवड. त्या लग्नानंतर शिकून एम०ए० झाल्यात. आणि उमेशनं पहिला नंबर आणि गोल्डमेडल कधी चुकवलं नाही. असं लहानसं कुटुंब. पूर्णपणं मनानं एकमेकात गुंतलेलं. आम्हांला कोल्हापूरला आग्रहानं बोलावतात. मी पण संधी मिळेल तेव्हा त्यांच्या घरी जाऊन राहते. मी जास्त दिवस राहावं म्हणून माझं गाडीचं रिझर्वेशन बदलून घेतात. खास कोल्हापुरी पदार्थ करून खाऊ घालतात. पांढरा रस्सा, खिमा पॅटीस, खिम्याच्या गोळ्यांची बिर्याणी, मटण, चिकन, अगदी चायनीज जेवणसुद्धा त्या उत्तम करतात.

त्या सुगरण आहेत यात शंकाच नाही. जाताना स्टेशनवर आणून सोडतात. ''वहिनी आता पुन्हा कधी येता? अण्णांना (मंगेश) वेळ नसेल तर एकट्याच या.'' असं म्हणतात. मी दर चार महिन्यांनी राहायला यावं असं माईंनी फर्मान काढलं आहे. असं प्रेम फार क्वचित मिळतं.

बाबा हे प्रसिद्ध पोलिस-प्रॉसिक्यूटर. आता निवृत्त झालेले. त्या दोघांना जंगलातून फिरण्याची आवड आहे. शिकार करण्याची आवड आहे. रात्री जीप काढून ते आम्हांला शिकार बघायला घेऊन जायचे. कधी डाकबंगल्यात, पन्हाळ्याला मुक्काम तर कधी राधानगरी धरणावर मुक्काम. कधी आंब्याला डाकबंगल्यात. आंबा इथला हा बंगला अगदी जंगलात आहे. एक रखवालदार फक्त तिथं मागं राहतो. त्या वेळी आमच्याबरोबर अंजू आणि दिलीप आले होते. जीपमधे बसून सर्व तिथं पोचलो. उतरताना मंगेश तिथं मागं राहिला. उंचावरून उतरताना त्याची पँट मागच्या बाजूनं पूर्ण उसवली. ती रेडिमेड पँट होती. ट्रीपच्या मूडमधे असल्यामुळं त्यानं नुसती पँट घाईनं चढवली होती. मी पुढं गेले होते. बाहेर एकदम गोंधळ ऐकू आला म्हणून मागं फिरले. बघते तर मंगेश एकदम चेहरा पाडून माझ्याकडं आला. म्हणाला, ''अग, उतरताना माझी पँट फाटली. आता काय करायचं?'' आम्ही आत गेलो. त्याला खुर्चीवर बसवलं. आणि सगळ्यांनी खो खो करून हसायला सुरुवात केली. अंजू आणि मी कॉटवर पडून पोटात दुखेपर्यंत हसलो. शेवटी करायचं काय हा प्रश्न कोणी सोडवू शकेना. दुसरी पँट तर इथं जंगलात मिळणं शक्य नव्हतं.

माझ्या डोक्यात एकदम विचार आला आणि मी उठून बाहेर गेले. रखवालदाराच्या झोपडीत जाऊन त्याला विचारलं, ''तुझ्याजवळ सुईदोरा आहे का?'' तो आधी ''नाही'' म्हणाला. मी एकदम निराश झाले. त्याला पुन्हा म्हणाले, ''अरे, नीट बघ ना. असेल कुठंतरी.'' ''बघतो'' म्हणाला. आणि आत जाऊन शोधायला लागला. आश्चर्य म्हणजे एक जाड सुई घेऊन आला. मी म्हटलं, ''दोरा?'' पुन्हा आत गेला आणि पुडीचा दोरा घेऊन आला. त्या ठिकाणी तेवढं साहित्य बघूनसुद्धा मला अत्यानंद झाला. त्याला म्हटलं, ''दे तो.'' सुईदोरा घेऊन आत गेले. म्हणाले, ''पँट काढून दे. शिवून देते.'' तो म्हणाला, ''पण मी तोपर्यंत काय गुंडाळू?'' गुंडाळता येईल एवढा मोठा टॉवेलपण कुणीच आणला नव्हता. पुन्हा माझ्या मेंदूनं चलाखी दाखवली. चटकन पुढं होऊन मी कॉटवरची चादर ओढून काढली. त्याला आतल्या खोलीत चादर गुंडाळून बसायला सांगितलं. तो गुपचूप मी सांगितलेलं ऐकत होता. आत जाऊन तो पँट काढून चादर गुंडाळून बाहेर आला. तेव्हा पुन्हा एकदा हास्याची मोठी लाट उसळली. मी शांतपणं खुर्चीवर बसून त्या जाड दोऱ्यानं जेवढं चांगलं शिवता येईल तेवढं शिवलं. पँट त्याला परत दिली. ती पँट घालताना त्याला केवढ्या मोठ्या संकटातून सुटल्यासारखं वाटलं असेल, त्याचं तोच जाणं!

माईंनी जेवण घरून करून आणलं होतं. सर्व जण जंगलात फिरून आलो होतो. येऊन थोडं मद्य घेतलं. आणि माईंच्या हातचं चविष्ट जेवण जेवलो. जेवून जरा

झोपलो आणि संध्याकाळी चहा घेऊन घरी जायला निघालो. जाताना रखवालदाराचा मौल्यवान सुईदोरा परत केला आणि त्याचे मनापासून आभार मानले.

अजूनही जेव्हा कोल्हापूरला जातो तेव्हा माईंच्या उत्तम उत्तम पदार्थांनी तृप्त होऊन येतो. पण गंमत म्हणजे इतकं करूनही बाबांचं आणि माईंचं पूर्ण समाधान होतच नाही. मग म्हणतात, ''वहिनी, ह्या खेपेस खिमा कटलेट करायचं राहिलं. पांढरा रस्सा राहिला'' किंवा ''चायनीज राहिलं.'' दर वेळेस बाबा मला स्वत:च्या दोन तरी कादंबऱ्या भेट देतात. अशी ही प्रेमळ माणसं. कायमचीच स्नेही होऊन राहिली.

आम्हां दोघांचीही साठी उलटलेली होती. मुंबईची हवा मला मानवेनाशी झाली. खरं तर कधीच मानवली नाही. लग्न झाल्यापासून शांताराम चाळीतून सुटका व्हावी अशी इच्छा करत होते. अंजूच्या जन्मामुळं तिथून सुटले. त्या वेळी सायनला स्वच्छ चांगली हवा होती. थंडीत थंडी पण खूप पडायची. वारा इतका जोराचा असे की, समोरच्या दाराला खिट्टी लूवनही दोन दारं एकमेकांवर आपटत राहायची. पाणी भरपूर आणि जोरानं यायचं. रात्री गच्चीत बसून जेवायला मुलांना फार आनंद वाटायचा. त्यासाठी भांडी, ताटवाट्या न्यायला आणि आणायला ती मला मदत करायला तयार असायची. रात्री गच्चीत गाद्या घालून झोपायला त्यांना खूप आवडायचं.

तेव्हा माझी नुकती पंचविशी उलटली होती. तारुण्याची उभारी होती. आनंद, उत्साह होता. मुळात आनंदी स्वभावाची जोड होती.

साठीनंतर चित्र पूर्ण बदललं होतं. सायनची वस्ती वेगानं वाढत गेली. ट्रॅफिकमुळं वातावरण अशुद्ध होऊ लागलं. घशाचा, खोकल्याचा त्रास वरचेवर होऊ लागला. वय वाढलं तसं घाम येण्याचं प्रमाण इतकं वाढलं की, बाहेर जाणं तर सोडाच पण घरात काम करतानासुद्धा मानेभोवती पंचा गुंडाळून घाम पुशीत काम करावं लागू लागलं. त्यामुळं अतोनात थकवा जाणवू लागला.

तिसरा मजला असल्यामुळं वर सिमिटाची गच्ची. घरासमोर अर्धी गच्ची. उन्हाळ्यात ती तापायला लागली की घरात भट्टी तयार झाल्यासारखं वाटे. चपला घातल्याशिवाय गच्चीत पाय टाकता येत नसे. गरम वाफांनी घामाच्या धारा वाहू लागत. त्यामुळं कातडीला त्रास होऊ लागला आणि मग माझा अस्वस्थपणा वाढायला लागला. कितीतरी वर्षांपासून संध्याकाळी पण अंघोळ करत होते. तरी शरीर व मन स्वस्थ राहीना.

म्हणून मी मंगेशला म्हणाले, ''खरं तर मला कधीच मुंबईत राहायला आवडत नव्हतं. तुझ्या नोकरीमुळं काही बोलताच आलं नाही. आता तू रिटायर होणार आहेस तेव्हा आपण कुठंतरी कोरड्या हवेत जाऊन राहू या. मला इथं फार त्रास होतो आहे.''

त्यानं तेवढ्याच जोरात स्पष्ट शब्दांत सांगितलं की, " मी मुंबई सोडून कुठंच जाणार नाही." चर्चा करायला काही संधीच दिली नाही. मला खूप दु:ख झालं. ह्या घामातच, राहिलेलं आयुष्य घालवणं माझ्या नशिबात आहे तर! तरुणपणात जे काही केलं त्याची आठवण ठेवून आता त्यानं थोडा तरी माझा विचार करावा असं मला वाटत होतं. पण आता त्याचे दिवस बदलले होते.

तसं असलं तरी माझा शारीरिक, मानसिक त्रास कमी न होता वाढतच होता. मुंबईतून सुटण्याची इच्छा प्रबळ होत होती. काही दिवसांनी ह्याच प्रश्नाला वेगळं वळण देऊन तोच विषय काढला. मी म्हणाले,

"अजितचं हॉस्पिटल आता चांगलंच चाललंय. कमलचं एम०डी०पर्यंतचं शिक्षण पार पडलंय. त्यांना एक मुलगा आहे. जवळच सायन हॉस्पिटलमधे कमलला चांगली नोकरी लागलीय. त्यांना स्वतंत्रपणं संसार करण्याची इच्छा आहे. सगळ्यांनाच असते तशी. त्यांच्यामधे आपण किती दिवस राहायचं? शिवाय घरात जागा कमी पडायला लागलीय. आपल्या सामानाची अडचण व्हायला लागली. आपल्या मदतीची गरज उरली नाही. वेळीच जबाबदारी अंगावर पडली तर ते स्वतंत्रपणं उत्तम संसार करतील. वेळ नसेल तर नोकर ठेवतील. मी आता घरात काम करण्याची जरूर नाही. चंद्रभागा घरातच राहते. जमेल तसा स्वयंपाक करते आणि इतरही सगळीकडं लक्ष ठेवून असते. कपडे, भांडी, झाडूपट्टा करायला वेगळी बाई आहेच."

इतकं हे मी बोलत असताना मंगेश डोक्याखाली दोन उशा घेऊन, पाय लांब करून पडलेला होता. मी उत्तराची अपेक्षा करताच त्यानं डोळे मिटून घेतले. एक शब्दही बोलला नाही. मला टाळण्यासाठी किंवा मला उत्तर द्यायचं टाळण्यासाठी असं तो नेहमीच करत असे. माझा राग अनावर झाला. मी म्हणाले,

"अरे, काही तरी बोल. मी समोरच्या भिंतीशी बोलते आहे का? ह्या पद्धतीनं माझा अपमान का करतोस? डोळे मिटून आणि उत्तर न देऊन प्रश्न सुटत नाहीत. उलट प्रश्नांची तीव्रता वाढून त्याचा कधीतरी स्फोट होतो."

तेव्हा तो पुन्हा म्हणाला, "हे माझ्या बापाचं घर आहे, ते सोडून आणि माझी लेखनाची जागा सोडून मी कुठंही जाणार नाही. ज्यांना त्रास होत असेल त्यांनी जावं." मी मनात म्हणाले, अजितही तसंच म्हणेल, 'माझ्याही बापाची जागा आहे, मी का जाऊ?'

मग मी म्हणाले, "अजित जाणार नाही, त्याचं इथं छान बस्तान बसलं आहे. खालच्या मजल्यावर कन्सल्टिंग. समोरच हॉस्पिटल. रात्री दोन, तीनला जरी पेशंट आले तरी तो पाच मिनिटांत तिथं चालत जाऊ शकतो. आणि त्यांनी अन्यत्र कुठं जावं, अशी अपेक्षा करणं पण बरोबर नाही. तेव्हा मी एकटीच कुठंतरी कोरड्या हवेत जाऊन राहते."

त्यावर त्यानं पुन्हा तोंड आणि डोळे मिटून घेतले. ह्या कोरड्या वागण्यानं भयंकर मनस्ताप झाला. निराश वाटू लागलं. एकटं वाटू लागलं. जगणंच निरर्थक

वाटू लागलं. पण श्वास चालू आहे तोपर्यंत जगणं भाग आहे. आयुष्याच्या अखेरीला तरी मला स्वत:चा विचार केला पाहिजे असं वाटलं. जन्मभर नवरा, मुलं, घरातली म्हातारी माणसं, वरचेवर येणारे पाहुणे, नातलग यांच्यासाठीच तर धडपडत राहिले. स्वत:चा विचार करायला कधी फुरसदच मिळाली नाही. मी ह्या समाजातली नसून वेगळी कोणी आहे हा विचार पण पूर्णपणं पुसून गेला होता. पण आता ती वेळ आली आहे असं वाटलं. मला थोडे दिवस तरी स्वत:साठी जगलं पाहिजे असं वाटलं. आणि मी नाशिकला जाऊन राहावं असा विचार पक्का केला. माझी बहीण सरला. तिचा मोठा मुलगा अविनाश गायकवाड हा नाशिकमधे, ऑटोस्किल ट्रेनिंग स्कूलमधे डायरेक्टर म्हणून काम करतो. सरला पण तिथंच राहते. त्याचा मोठा बंगला आहे. त्याच्या मदतीनं नाशिकमधे एक लहानसा भाड्याचा ब्लॉक घेऊन राहावं. तिन्ही मुलं सुस्थितीत आहेत. त्यांची काळजी करण्याची जरूर राहिली नव्हती. मंगेशच्या जेवणाखाण्याची, नोकर असल्यामुळं काळजी नव्हती. अजित, कमल डॉक्टर असल्यामुळं प्रकृतीची काळजी ते घेतच होते. तेव्हा वानप्रस्थाश्रमाला हीच योग्य वेळ आहे असं वाटलं.

मला आठवतं त्याप्रमाणं ही १९९१ सालातली गोष्ट आहे; मंगेशचा कुठंतरी बाहेरगावी कार्यक्रम होता. कार्यक्रम संपल्यावर त्या कार्यकर्त्यांनी त्याला रात्रीच्या गाडीत बसवून दिलं होतं. आणि गाडीतच त्याला जोरदार कंबरेच्या आर्थ्ररायटिसचा अॅटॅक आला. गाडी दादरला आली. पण त्याला सामान घेऊन खाली उतरता येईना. गाडीतल्या माणसांच्या मदतीनं तो खाली उतरला. कोणीतरी घरी फोन केला. अजित तसाच स्टेशनवर पळाला. मंगेशला गाडीत घालून सरळ डॉक्टर सुधीर जोशी ह्या ऑर्थोपेडिक डॉक्टरांच्या हॉस्पिटलमधे घेऊन गेला. डॉक्टरांनी औषध व उपाय सांगितले. मग त्याला घरी आणलं. हे दुखणं बरेच दिवस चालू होतं. सर्व फिजिओथेरपीची ट्रीटमेंट घेतली, फारसा फरक नव्हता. नंतर आशा जोशी हिला पुरुषोत्तम नाईक यांनी पाठवलं. ती त्यांची भाची लागते. तिनं महिनाभर अॅक्युप्रेशरची ट्रीटमेंट दिली. त्यानंतर पुष्कळच सुधारणा दिसायला लागली. चालण्या-फिरण्याएवढा तो बरा झाला.

त्याच वेळी अमेरिकेत मीनल गरोदर होती. तिला आठ महिने झाले होते. तिचे आईवडील म्हणजे रमाकांतजी व शैलाताई तिच्या डोहाळ्याच्या वेळी तिकडं राहून आले होते. ते दोघंही मोठ्या पदावर नोकरी करत होते. आता पुन्हा बाळंतपणाला जाता येणार नाही–रजा मिळणार नाही, म्हणाले. तेव्हा अभय, मीनल यांनी मला विचारलं. तिकिटाच्या पैशांचा प्रश्न आला तेव्हा मीनल म्हणाली, "माझे भारतात पैसे आहेत त्यातून तुम्ही तिकीट काढून या." तिला १९९१ मधली २४ ऑक्टोबर तारीख दिली होती. म्हणजे माझ्याच वाढदिवसाची तारीख. अंजूचा मुलगा रूपक हा

पण २४ ऑक्टोबरचाच. म्हटलं आता दुसरा नातू पण तीच तारीख घेतो की काय? तेव्हा सप्टेंबरच्या सुरवातीला निघावं असं ठरलं. माझी नणंद प्रभा आणि मेहुणे शंकर परुळकर हे दोघं न्यूयॉर्कपासून दोन तासांच्या अंतरावर डॅनबरी नावाचं शहर आहे तिथं राहत होते. श्री० परुळकर रंगतज्ज्ञ. त्यांच्याकडं आठ दहा दिवस राहून मग फिनिक्सला अभय-मीनलकडं जावं असा बेत ठरला.

मंगेशची कंबर जवळजवळ बरी झाली होती. आणि एक दिवस त्यानं जाहीर केलं आपण पण अमेरिकेला जाणार. त्यानं यावं अशी माझी फारशी इच्छा नव्हती. कारण कंबरेच्या दुखण्यातून तो नुकताच बरा झाला होता. इतक्या लांबच्या प्रवासात तासन्‌तास एका जागेवर बसून पुन्हा अॅटॅक आला तर मी काय करू शकेन? शिवाय अमेरिकेत नोकर नसतात हे सर्वांनाच ठाऊक आहे. सून बाळंतीण म्हणजे सर्व काम एकहाती मलाच करावं लागणार. त्यातून सहानुभूतीनं विचार करणारी, मदत करणारी माणसं बरोबर असली तर त्यांचा त्रास न वाटता उलट धीर वाटतो.

शिवाय अभय-मीनलला ते कितपत आवडेल याची शंका होतीच. कारण घरात लहान मूल असताना अमेरिकेत घरी कोणाला जेवायला पण बोलवत नाहीत. घरात राहायला तर नाहीच नाही. जरी कोणी आलं तरी मुलाला खोलीतून बाहेर आणत नाहीत. इन्फेक्शन होऊ नये म्हणून पहिले दोन महिने तरी फार काळजी घेतली जाते. अशा परिस्थितीत मंगेशनं येण्याचा बेत पक्का केला. स्वत:चे पैसे खर्च करून तिकीट काढलं. आम्ही दोघं भरपूर सामानासकट इथून निघालो. आणि न्यूयॉर्क विमानतळावर उतरलो. तिथं आम्हांला घ्यायला प्रभा आणि आबा (परुळकर) मित्राची गाडी घेऊन आले होते. त्यांच्याबरोबर गप्पा मारत दोन अडीच तासांनी डॅनबरीत पोचलो. अतिशय सुंदर, हिरवंगार आणि समृद्ध शहर पाहून मन व शरीर विसावलं. आणि मला जेटलॅग आला. सगळे जण मार्केट बघायला गेले. पण मी उठूच शकले नाही. नंतर पुन्हा जाऊन पाहिलं. हवा फार थंड होती. भरपूर व तऱ्हेतऱ्हेची फळं, ताज्या फडफडीत हिरव्या भाज्या, आणि इतरही लागणारे सर्व पदार्थ खच्चून भरले होते. मोठं मार्केट फिरत असताना मुलांना कंटाळा येऊ नये म्हणून अंतराअंतरावर वरच्या बाजूला मोठी मोठी खेळणी–आवाज करणारी, बोलणारी, गाणारी अशी लावलेली होती. मी हे असं पहिल्यांदाच पाहिलं.

प्रभानं, भाऊ-भावजय आले म्हणून प्रेमानं फळं, भाज्या, व तऱ्हेतऱ्हेचे पदार्थ करून घातले. आमचे मंगेश पाडगावकर आलेत. त्यांचा एक कार्यक्रम करू या असं सुचवलं. त्याप्रमाणं शनिवारी संध्याकाळी खूप मंडळी हेमंत व स्मिता राजाध्यक्ष यांच्या घरी जमा झाली. मंगेशनं कविता उत्तम वाचून तृप्त केलं. खूप ओळखी झाल्या. सर्व लोक खूष झाले. दिवस मजेत गेले.

आता मीनलची काळजी वाटायला लागली. तेव्हा फिनिक्सचे वेध लागले. संध्याकाळचं विमान होतं. प्रभानं छानपैकी जेवणं केलं. आबांनी–परुळकरांनी बियरचे

डबे उघडले. थोडीशी बियर घेऊन जेवलो. आणि वेळेवर विमानात जाऊन बसलो. पाच-सहा तासांचा प्रवास होता. अभय-मीनल उतरवून घ्यायला येणार होते. फिनिक्सला पोचलो. सामान ढकलगाडीवर घेतलं. अभय-मीनल आलेच होते. त्यांना भेटलो आणि माझ्या पोटात भयंकर कळ आली. संडासात जाणं भागच होतं. मी अभयला म्हणाले, "घरी जायला किती वेळ लागेल?" तो म्हणाला, "तासभर." मी समजले आपल्याला इतका वेळ थांबता येणार नाही. तसं मी अभयला सांगितलं. त्यानं मीनलला सांगितलं की तिला टॉयलेटकडं घेऊन जा. मी आत गेले आणि एखादा नळ सुरू व्हावा तसं जोरात शरीरातून पाणी बाहेर पडू लागलं. इतकं की, मी घाबरले. पण ते थांबेनाच. अगदी गॅस्ट्रो झाला होता तेव्हासुद्धा हा अनुभव आला नव्हता. मीनल बाहेर उभी होती. मोठं पोट घेऊन तिला किती उभं राहावं लागतंय, पण माझा नाइलाज होता. कशीबशी बाहेर पडले. प्रचंड थकवा जाणवू लागला. तोंडाची चव गेली. मीनलला म्हणाले, "खूपच मोठा ढाळ झाला ग." त्यावर ती म्हणाली, "हो. मला वाटलंच कारण फार वेळ तुम्ही आत होतात." गाडीत जाऊन बसलो. घरी आलो तर रात्रीची जेवायची वेळ झाली होती. मीनलनं उत्तम जेवण करून ठेवलं होतं. मला तर खुर्चीवर बसणं आणि चव गेल्यामुळं जेवणं पण शक्य नव्हतं. तरी त्यांना वाईट वाटू नये म्हणून दोन घास पोटात ढकलले. आणि वर जाऊन अंघोळ करून कपडे बदलून झोपले. दुसऱ्या दिवशी पुन्हा तसं काही झालं नाही. पण आल्या आल्याच मिळालेल्या अनुभवानं घाबरून गेले. थकून गेले.

इथं पण जवळपास राज्यातून मंगेशला बरेच कार्यक्रम मिळाले. दर वेळी त्याला एअरपोर्टवर न्यायचं आणि येताना परत घेऊन यायचं काम अभयला करावं लागलं. मीनलची प्रकृती चांगली होती. लवकर बाळंत होण्याचं लक्षण दिसत नव्हतं. येऊन दोनतीन दिवस झाले होते. सकाळीच रामदास फुटाणे यांचा फोन आला. "मी ग्रँड कॅनियन बघायला जातोय विजय दामलेंबरोबर. गाडीत जागा आहे तर तुम्ही येता का?" अभय-मीनल म्हणाले, "बाबा, जरूर जा. ते जगातलं एक आश्चर्य आहे. ही संधी सोडू नका. आईला पण घेऊन जा जागा असली तर." मंगेशनं त्यांना परत फोन केला की, "एक जागा असेल तर यशोदा पण आली तर चालेल का?" ते म्हणाले, "आहे जागा, तुम्ही लगेच तयार व्हा. मी अर्ध्या तासात येतो." मी नको म्हणत होते. पण अभय म्हणाला "आई, तू मीनलची काळजी करू नकोस. मी घरी आहे. तू जा. इथं आल्यावर ग्रँड कॅनियन बघायलाच पाहिजे. मीनलच्या बाळंतपणात मला तुम्हांला न्यायला जमणार नाही." मग मी पण तयार झाले. मीनलनं गडबडीनं खाण्यासाठी फळं, कुकीज वगैरे पदार्थ व पाणी बास्केटमधे दिलं. आणि आम्ही निघालो. चार ते पाच तासांच्या ड्रायव्हिंगनंतर आम्ही ग्रँड कॅनियनजवळ आलो.

जगातलं एक आश्चर्य पाहिलं. निसर्गाचं अवाढव्य भीषण आणि तरीही मनोहर असं रूप पाहून मी जागच्या जागी थक्क होऊन बघत राहिले. कडेकडेनं खूप

फिरलो. वेगवेगळ्या कोनांतून वेगवेगळी दृश्यं दिसत होती. काही ठिकाणी दगडांतून कोरलेल्या बुद्धमंदिरांचे देखावे तर काही ठिकाणी हिंदूच्या मंदिरांचे आकार. काही राजवाड्यांची स्थापत्यशिल्पं. कल्पना करता येणार नाही इतकी खोल दरी. वरून दिसणारी वाहणाऱ्या नदीची बारीक रेघ–प्रत्यक्षात ती फार मोठी आणि भयंकर नदी.

त्यानंतर पाहिला फिल्म-शो. खोल दरीतून बेफाम वाहणाऱ्या नदीतून होडीनं प्रवास करणारे प्रवासी. त्यांचं धाडस व कौशल्य पाहून छाती धडधडू लागली. आपल्याच अंगावर पाण्याचे लोंढे येत आहेत असं वाटून जागच्या जागी भिजून गेलो. अभय म्हणाला ते खरंच होतं. निसर्गाचं हेही रूप बघायलाच पाहिजे होतं.

२४ ऑक्टोबरची तारीख पुढं गेली आणि एक नोव्हेंबरला पहाटे मीनलच्या पोटात दुखायला लागलं. त्यांची सर्व तयारी होतीच. सकाळीच अभयनं वर येऊन मला सांगितलं की, "आम्ही हॉस्पिटलला जातो." मंगेश कार्यक्रमासाठी बाहेरगावी गेला होता. घरात मी एकटीच होते. दुपार होऊन गेली तरी अभयचा फोन आला नाही. अस्वस्थपणं एकटीच वाट पाहत राहिले. शेवटी संध्याकाळी पाच वाजता फोन आला, "मुलगा झाला, पण ऐन वेळी सिझेरियन करावं लागलं. दोघंही ठीक आहेत. काळजीचं कारण नाही."

मंगेशला इथं आल्यापासून लहान मुलांच्या कविता सुचायला लागल्या. सकाळी उठल्यावर न्याहारी घेऊन तो चालायला बाहेर पडायचा. दिवसात सहा मैल चालण्याचा नेम त्यानं केला होता. संध्याकाळी पुन्हा चालायचा. दिवसभर कविता लिहिणं असा त्याचा कार्यक्रम त्यानं मोडला नाही. मी सारखी सकाळी काय करायचं, संध्याकाळी काय, मीनलसाठी खीर–वगैरे माझं चालू होतं. तीन पुस्तकं होतील इतक्या त्याच्या कविता लिहून झाल्या. एकटीनं सर्व कामं करायची सवय राहिली नव्हती. तेव्हा आम्ही आमचा मुक्काम हलवायचं ठरवलं. चार महिने होत आलेच होते. लॉसएंजल्स इथं सुभाष दामले व राजश्री यांच्या घरी चार-पाच दिवस राहून मग मुंबईला परतायचं असं ठरलं. अभय-मीनलनं तिकिटं काढून आम्हांला एअरपोर्टवर सोडलं. रात्री उशिरा विमान पोचलं. सुभाष व राजश्री घ्यायला आले होते. ते आम्हांला सामानासकट घरी घेऊन गेले. राजश्रीच्या बोलक्या स्वभावामुळं जरासुद्धा परकेपणा वाटला नाही. गप्पागोष्टी, खाणंपिणं, खरेदी करणं, मेक्सिकन हॉटेलमधे जेवणं, बाकीचा वेळ विसावा घेणं असा मजेत वेळ गेला.

शेवटी जाण्याच्या दिवशी त्यांनी आम्हांला ब्रिटिश एअरवेजच्या विमानात बसवून दिलं. सामान जास्त होतं तरी एक बॅग जास्तीची आत घालून दिली. पण सुखाचा प्रवास नशिबात नव्हता. ते विमान लंडनला थांबून मग मुंबईला येणार होतं. पण लंडनला फार धुकं पडलं. हवा खराब झाली म्हणून लंडनला न नेता आम्हांला 'एडिंबरो' विमानतळावर नेलं. पुढच्या प्रवासाची काय व्यवस्था आहे हे स्पष्ट न सांगता मध्यरात्री एक वाजता खाली उतरवलं. आणि आपापलं सामान काढून घ्यायला सांगितलं. अतोनात हाल झाले. कोणी वाली नाही अशी अवस्था झाली.

पहाटे सामानासकट एका हॉटेलात नेऊन ठेवलं. ते हॉटेल उंचावर होतं. वीसएक पायऱ्या चढून सामान वर कसं नेणार? मंगेश नुकताच कंबरेच्या दुखण्यातून उठलेला. मला स्पाँडिलायटिस व थकवा. तेव्हा काही लोकांना विनंती करून मदत करायला सांगितलं. हॉटेलात गेल्यावर त्यांनी खोलीच्या चाव्या दिल्या. सकाळचा ब्रेकफास्ट इथं घेऊन पुन्हा विमानतळावर जाऊन बसायला सांगितलं. त्यासाठी बस येणार होती. दोन-तीन तास पण झोप मिळाली नाही. साडेसातला पुन्हा आम्हांला विमानतळावर आणून सोडलं. आता आमचं विमान आम्हीच ठरवायचं होतं. लंचसाठी सात-सात डॉलर्स दिले. मी मंगेशला म्हटलं, अभयला फोन करून सांगू या. कारण मुंबईला आपल्याला घ्यायला कोणीतरी येईल. त्यांना आधीच कळवलं तर बरं होईल. बऱ्याच खटपटीनं अभयला फोन लागला. पण उशीरच झाला होता. दुपारी दिलेल्या पैशातून आम्ही लंच घेतला. मी तिथंच कोचावर झोपून गेले. शेवटी एअर इंडियानं जायचं ठरवलं. ढकलगाडीतून सामान खूप लांबपर्यंत न्यावं लागलं. सामान जास्त म्हणून तो अधिकारी चिडला. पैसे मागू लागला. आम्ही कशा परिस्थितीत सापडलो आहोत याची त्याला कल्पना नसावी. शेवटी एकदाचे एका विमानात बसलो. आम्ही बारा तारखेला येणार म्हणून सगळे जण विमानतळावर येऊन गेले. अभयचा निरोप उशिरा मिळाला. ह्या सर्व खटपटीत आमचे दोन दिवस हरवले. आम्ही बाराऐवजी चौदा तारखेला मुंबईला येऊन एकदाचे पोचलो. आम्हांला घ्यायला आले होते, असिस्टंट कमिशनर जयवंत, अजित, कमल व घरातील इतर माणसं. सर्वांनी सुटकेचा नि:श्वास सोडला.

घरी येऊन बघतो तर, चार महिन्यांत, अजित-कमलनं घराचं नवीन पद्धतीच्या सुंदर ब्लॉकमधे रूपांतर करून टाकलं होतं. आम्ही गेल्यापासून सुरू केलेलं काम त्यांनी अतोनात त्रास सहन करून अहोरात्र चालू ठेवलं होतं. आमची बेडरूम कडेला असल्यामुळं ती त्यांना झोपायला वापरता आली. पोचल्याबरोबर अभयचा फोन आला. आम्ही सुखरूप पोचलो खरं, पण अतोनात थकलो होतो. तो थकवा जायला पुढं महिना लागला.

अमेरिकेत अभयच्या घरात असताना मी शेवटचा म्हणून नाशिकला जाण्याचा विषय काढला. कोणत्या कारणामुळं मला हा निर्णय घ्यावा लागत आहे, हे सांगण्याचा पुन्हा एकदा प्रयत्न केला. ''त्यातून तू काही बदल सुचवलास तर मी जाण्याचा बेत रद्द करीन'' असं मंगेशला सांगून पाहिलं; पण या वेळी मला एकही उत्तर त्याच्याकडून मिळालं नाही. फरक इतकाच होता की त्या वेळी तो बसलेला होता. आणि त्यानं डोळे मिटून घेतलेले नव्हते. तो मधून मधून फक्त माझ्याकडं बघत होता. एखादं कुत्रं, मांजर जरी आपल्याकडं क्यॉंव म्यॉंव करीत आलं तरी आपण त्याची दखल घेतो. मग ह्या वागण्याचा अर्थ मी काय समजावा? जर आपलेपणाच शिल्लक

राहिला नसेल तर त्यानं मला आनंदानं "जा" म्हणून सांगायला पाहिजे होतं. तसंही तो म्हणत नव्हता. इंग्लिश शब्दच वापरायचा झाला तर दोघांतलं कम्युनिकेशन (परस्परसंवाद) बंद व्हावं असा तो जाणीवपूर्वक प्रयत्न करत असेल का? काही समजतच नव्हतं. वागण्याची ही अगम्य पद्धत माझ्या काळजाचे तुकडे करत आहे हे त्याला कसं कळत नव्हतं?

असं जर आहे तर माझा निर्णय घ्यायला मी मोकळी आहे असा विचार करून मी आल्यावर खरेदीला लागले. नाशिकला जाऊन एक ब्लॉक महिन्याच्या भाड्यानं ठरवला. तीन महिन्यांचं भाडं देऊन आले. कुलूप लावलं. सेंट्रल बँकेत जाऊन अकौंट उघडला. परत आले. संसाराला लागणारं सामान जमवलं. बांधाबांधी झाली. फक्त निघण्याचा दिवस ठरवायचा होता.

आणि एक दिवस सकाळच्या वेळेला आप्पा (पुरुषोत्तम नाईक) येऊन बसले. आम्ही दोघेच हॉलमधे बोलत होतो. तितक्यात अचानक अंजू आली. आणि तिनं मला फैलावर घ्यायला सुरुवात केली. मी जाणार आहे हे तिला खूप दिवस आधीपासून ठाऊक होतं. तेव्हा ती मला काहीच बोलली नव्हती. आज अचानक ही तोफ तिनं का डागली? आप्पांनी पण तिला साथ द्यायला सुरुवात केली. आमची तिघांची खूप जोरात वादावादी झाली. मंगेश बाहेर आलाच नाही. तो खोलीत बसून राहिला. कमल पण बाहेर आली नाही. अजित थोड्या प्रमाणात इथं तिथं घुटमळत होता. मी त्यांना खूप समजावून सांगण्याचा प्रयत्न केला की, मी माझ्या शारीरिक व मानसिक स्वास्थ्यासाठी जात आहे. मी कोणाशीही भांडून जात नाही. पण माझं कोणी ऐकून घ्यायलाच तयार होईना.

मध्यंतरी मंगेश दिलीपबरोबर नाशिकला गेला होता. तेव्हा ब्लॉक बघून आला होता. मला काय फर्निचर लागेल ह्याचा दिलीपला अंदाज घ्यायला त्यानं सांगितलं. गॅस मिळावा म्हणून तिथं तो तशी व्यवस्था करून आला होता.

इथं मंगेशच्या एका उपजत गुणाविषयी सांगायला हवं. तो म्हणजे दुसऱ्यांच्या अडचणीत आपण होऊन मदत करणं. नाशिकमधे मला काय हवं-नको ते त्यानं पाहिलं ते याच गुणामुळं. त्यानं ज्यांना आपलं म्हटलं त्यांच्यासाठी तो वेळी सर्व प्रकारचं साहाय्य करणारच–ते आर्थिक असो–एखाद्या कामासाठी कुठं शब्द टाकण्याचं असो. त्यानं अनेकांना असं साहाय्य केलं आहे. मीसुद्धा त्यानं कोणाला साहाय्य करावं असं सुचवलं तेव्हा अनेकदा त्यानं माझं म्हणणं मानलं आहे. तसं साहाय्य करण्याचं आवश्यक आहे असं त्याला मनोमन वाटायला मात्र हवं.

नाशिकला जायचं माझं चाललं असताना तो मला तिथं हवी ती व्यवस्था पाहत होता. पण एकदा अचानक "मी मात्र तिथं येऊन राहणार नाही हं." हे मंगेशनं मला निक्षून सांगितलं. मनातून तो रागानं धुमसतो आहे हे मला कळत होतं.

शेवटी मी हरले आहे हे मला कळलं. तो सांगेल तिथंच राहिलं पाहिजे. असेल

त्याच परिस्थितीत न बोलता न तक्रार करता जन्मभर राहिलं पाहिजे. हे समजून आलं.

जमवलेलं सगळं सामान माळ्यावर टाकून दिलं. काही वस्तू कोणाकोणाला देऊन टाकल्या. अवीला नाशिकमधे फोन केला. ब्लॉक नको म्हणून सांगायला सांगितलं. ते माझं काम त्यानं केलं. सेंट्रल बँकेत अकौंट उघडला होता. तो मात्र अजून तसाच पडून आहे.

पूर्वी कधीतरी वाचलेल्या आणि आवडल्या म्हणून उतरून ठेवलेल्या काही ओळी इथं द्याव्या असं वाटतं :

> यश आणि संपत्ती पचवायलाही माणसापाशी एक शक्ती असावी लागते. प्रमाणाबाहेर यश व शक्तीपलीकडे पैसा मिळाल्यामुळं मूळची साधी माणसं पूर्ण बदलून जातात. आपण तरुणपणी केलेलं प्रेम हा एक मूर्खपणा होता असं उत्तरायुष्यात माणसाला वाटणं हे खरोखरच एक मोठं दुर्दैव आहे. खरं म्हणजे तरुणपणी पाहिलेली ध्येयस्वप्नं व केलेलं प्रेम हेच त्या माणसाचं जमेचं अंग असतं...

एकदा असंच काही क्षुल्लक कारणावरून मला नीट समजून न घेता माझी अवहेलना केली गेली. त्याचं मला मरणप्राय दु:ख झालं. आपली आता आवश्यकता संपली आहे. अशी जाणीव झाली. आयुष्य संपवू म्हटलं तरी ते संपत नाही. मला निराशेनं घेरलं होतं. हे अंजूच्या लक्षात आलं आणि ती मला आपल्या घरी घेऊन गेली.

माझी नणंद प्रभा मुंबईत आली होती. ती पुन्हा अमेरिकेला जाणार होती. ती माझ्या मागं लागली होती की, "वहिनी ह्या वेळेस तुम्ही माझ्याबरोबर या." मी अंजूकडं असताना तिचा फोन आला "वहिनी अमेरिकेची तिकिटं खूपच कन्सेशनमधे मिळतायत. तुम्ही चलाच माझ्याबरोबर." तिचा उत्तेजित व आनंददायक आवाज ऐकून मी तिकडं जाण्याचा माझा विचार पक्का केला. मंगेशला फोन करून मी सांगितलं आणि पैशांची व्यवस्था करायला सांगितलं. अनायासे अभयची भेट झाली असती. तो लांब असल्यामुळं त्याची मला नेहमीच जास्त काळजी वाटते. विचार पक्का झाला. मंगेशला अंजूकडून फोन केला, की मी प्रभाबरोबर अमेरिकेला जाते आहे. खूप कन्सेशनमधे तिकीट मिळतंय, तेव्हा मला तिकिटासाठी व पाचशे डॉलर खरेदीसाठी पैसे दे.

मग मी आठ दिवसांनी घरी आले. उन्हात फिरून फिरून तिकडं नेण्यासाठी खरेदी केली. मोठमोठ्या दोन बॅगा एकहाती भरल्या. निघण्याचा दिवस आला. प्रभा

आणि विवेक (तिचा मुलगा, त्यानं मला जाण्यासाठी खूप आग्रह केला होता. त्याची धाकटी बहीण वंदना. ते दोघंही माझ्याशी प्रेमानं वागतात.) गाडी घेऊन खाली मला घ्यायला आले. मंगेशचा निरोप घेऊन मी त्यांच्याबरोबर खाली उतरले.

वेळेवर पोचलो. विमानात बसलो. आणि मनाला एक वेगळ्याच प्रकारची शांती वाटली. पण विचार थांबले नाहीत. ते तर मला सततच साथ करणार आहेत. लंडनला चार तास थांबलो. पुन्हा विमानात बसलो ते एकदम न्यूयॉर्कला उतरलो. आबा (परुळकर) गाडी, घेऊन आम्हांला न्यायला आले होते. आम्हां दोघींना बघून त्यांना खूप आनंद झाला आहे असं वाटलं.

डॅनबरीला पोहोचायला गाडीनं दोन तास लागतात. सुंदर स्वच्छ रस्ते, दोन्ही बाजूंनी हिरवीगार झाडं. पाहून डोळे निवले. डॅनबरी राज्यावर निसर्गाचा वरदहस्त आहे. रस्ते वळणावळणाचे, उंचसखल जाणारे. जंगल असावं अशी हिरवी झाडी, त्यात मधेच एखादं सुंदर घर दिसतं. इथं कुणी राहत असेल असं बाहेरून बघून वाटत नाही. पुढं शहरात गेल्यावर तर वास्तुशिल्पाचे सुंदर सुंदर नमुने दिसतात. हे समृद्ध शहर आहे.

अपार्टमेंटमधे आलो. गॅलरीतून पुढं पार्किंग लॉट दिसत होता. घर मला आवडलं. आम्ही दोघींनी सावकाश सर्व आणलेलं सामान लावलं. सर्व स्थिरस्थावर झाल्यावर मी माझा रोजचा कार्यक्रम सुरू केला. सकाळी मला फार लवकर जाग येते. सर्वांच्या आधी उठून तोंड धुणं वगैरे आटपून, अर्धा तास योगासनं करायची. किंग जॉर्ज शाळेत, संध्याकाळी साडेपाच नंतर छोटू गांधी यांचे योगासनांचे वर्ग चालतात. अजितच्या सांगण्यावरून मी त्याच्या गाडीतून तिथं जायला सुरुवात केली. नियमितपणं जात राहिल्यामुळं मला त्याचा चांगलाच फायदा जाणवू लागला. म्हणून मी अमेरिकेतही योगासनं चालू ठेवली. कारण त्यामुळं मन स्थिर, शरीराचा लवचीकपणा कायम राहतो असा माझा अनुभव.

त्यानंतर मी आत्मपर अनुभव लिहायला सुरुवात करायची. तिकडं पण बराच भाग लिहून पुरा केला. तरी पण खूप शिल्लक राहिला. घरात माझं लेखन कधीच नीट होऊ शकलं नाही. कुणाकडं राहायला गेलं की तिथं मी लिहिता येईल तेवढं लिहीत गेले.

अभयचा शनिवारी फोन येत असे. तो मला म्हणायला लागला की, "प्रभाआत्याकडं किती दिवस राहणार आहेस? माझ्याकडं कधी येतेस?" मी म्हणाले, "इतक्यात येणार नाही. माझी मन:स्थिती ठीक नाही." तो म्हणाला, "नाही, नाही. तसं चालणार नाही. तुला थोडे दिवस तरी आलंच पाहिजे." म्हटलं, "विचार करते."

प्रभा आणि आबा यांनी माझी खूप काळजी घेतली. खरं म्हणायचं तर माझे खूप लाड केले. घरात उत्तम पदार्थ होत होतेच. पण अमेरिकेत मिळणारे सर्व चांगले पदार्थ–उदाहरणार्थ, पिझ्झा, बर्गर, मेक्सिकन फूड इत्यादी सर्व प्रकार आम्ही आनंदानं खाल्ले. जेवायच्या आधी मी व्हिस्को घेतली की लहान ग्लासात शेरी वाईन दोघांना

देत होते. टी०व्ही०पुढं बसून आम्ही मजेनं सगळ्याचा आनंद घेत होतो.

अभयनं त्यांना दोघांना ग्रँड कॅनियन बघायला आमंत्रण दिलं होतं. तेव्हा असं ठरलं की मी आधी दोन आठवडे अभयकडं जायचं. नंतर ते दोघं आल्यावर ग्रँड कॅनियन बघायला जायचं. त्याप्रमाणं मी आधी फिनिक्सला गेले. 'पार्थ' अभय-मीनलचा पहिला मुलगा–तो लहान होता. बोबडं इंग्लिश बोलत होता. मला पाहून त्याला फार आनंद झाला. घरी गेल्याबरोबर "तमॉन आजी, तमॉन आजी" असं म्हणून, हाताला धरून सगळं घर फिरून दाखवलं. तो काय बोलतो ते फारसं कळत नव्हतं. विचारावं लागत होतं. बोबडं मराठी ऐकायची सवय होती. पण इंग्लिशचा, ते पण अमेरिकन–अंदाज येत नव्हता. मीनल बिझनेस मॅनेजमेंटचा कोर्स करत होती. तरी जे करता येईल ते ती माझ्यासाठी करत होती.

दोन आठवडे मजेत गेले. नंतर प्रभा व परुळकर आले. अभयनं सर्वांना बसता यावं म्हणून मोठी गाडी घेतली होती. पण ती अगदी ग्रँड कॅनियनला जायच्या दिवसापर्यंत मिळाली नाही. अभय, मीनल सकाळपासून गाडीसाठी गेले होते. ते दुपारी आले. सर्व तयारीनिशी आम्ही त्या सुंदर नव्या, कोऱ्या गाडीत बसलो. अर्ध्या अंतरावर सेडोना म्हणून एक गाव आहे तिथं उंच सुळक्यांचे रेड रॉक्स आहेत. उन्हात तर तांब्यापेक्षा लाल चमकदार रंगाचे ते दिसतात. तिथून जवळच्याच हॉटेलमधे अभयचा एक स्यूट कायमचा बुक केलेला आहे. तिथं उतरलो. एक रात्र तिथं राहून दुसऱ्या दिवशी सकाळी ब्रेकफास्ट घेऊन बाहेर पडायचं असं ठरलं. रात्री आबांनी चायनीज जेवण आणण्यासाठी अभयजवळ पैसे दिले. तो जेवण घेऊन आला. पार्थ जरा त्रास देत होता. मीनल कंटाळली होती. तरी आम्ही सगळे मिळून जेवलो. रात्री झोपून सकाळी थोडं खाऊन सगळं सामान आवरून ग्रँड कॅनियन बघायला निघालो. पुन्हा तेच निसर्गाचं आश्चर्यकारक रूप बघताना वेडावून गेले.

परुळकरांची रजा संपली होती. पण आठ दिवस पूर्ण विश्रांती मिळाल्यामुळं ते फार समाधानी होते. त्यांनी निघताना एक लहानसं भाषण केलं. सर्वांचे आभार मानले. भेटवस्तू दिल्या, घेतल्या. आम्ही पुन्हा डॅनबरीला जायला निघालो आणि पार्थ इतका भयंकर रडायला लागला की मी तीन मुलांची आई असून घाबरून गेले. त्याला कसं शांत करावं हे मीनलला कळेना. शेवटी अभयनं गाडी चालू केली. खिन्न मनानं परत डॅनबरीला आलो.

प्रभाची व माझी अमेरिकेत राहण्याची मुदत संपत आली होती. आम्ही न्यूयॉर्कवरून मुंबईला परत येणार होतो. डिसेंबर सुरू झाला होता. कडाक्याची थंडी. बर्फ पडायला सुरुवात झाली. आमची खरेदी, बांधाबांधी सुरू झाली. सामान नेहमीप्रमाणं जास्तच झालं. आम्ही येतो म्हणून कळवलंच होतं.

खूप महिने परदेशी राहिल्यावर आता आपल्या घरी जावं, असं बाईला मनापासून वाटायला हवं .पण मी मात्र आता गेलंच पाहिजे या कर्तव्यभावनेनं चाललले होते.

कदाचित माझीच मोठी चूक होत असेल, की एखादी दुष्ट शक्ती माझा पाठपुरावा करीत असेल? काय सांगावं? शेवटी माणसं, वागतात, बोलतात एक, पण त्यांची मनं आतल्या आत फार गूढ, अगम्य, अतर्क्य पद्धतीनं विचार करत असतात. अभयकडून खूप दिलासा मिळाला होता. त्या भरवशावर मी मुंबईत येऊन उतरले. मला घ्यायला मंगेश, अजित-कमल, तनय, दिलीप-अंजू सर्व जण आले होते.

निवृत्तीचं वय निघून गेल्याला पण खूप वर्षं झालीत. किती इच्छा पुऱ्या झाल्या, किती झाल्या नाहीत. किती आकांक्षा पुऱ्या व्हायच्या राहिल्या आहेत? ह्या शब्दांना आता काही अर्थ उरले नाहीत. ते फक्त शब्द राहिलेत.

पुढच्या शिक्षणासाठी दोन्ही मुलं हॉस्टेलमधे राहायला गेली. तेव्हा रडू आवरणं अशक्य झालं. आता ते रोज दिसणार नाहीत. त्यांना रॅगिंग होईल, ही तर सर्वांत जास्त मनाला घाबरवणारी गोष्ट होती. त्यांना बाहेरचं जेवण आवडणार नाही ही प्रत्येक आईला काळजी वाटायला लावणारी गोष्ट, मलाही छळीत होती. आता माझा एकटेपणा वाढत जाणार होता. अंजली पण लग्न होऊन गेली होती. तिची काळजी म्हणजे, ती घरात एकुलती एक म्हणून लाडात वाढलेली, एकदम दहा माणसांच्या एकत्र कुटुंबात तिला काय काय त्रास होतील? तिला कामाची सवय नव्हती. फुलपाखरासारखी उडणारी, बागडणारी. तिला एकदम किती बंधनं पडतील? ती मुलगी म्हणून मनानं, शरीरानं खूप निकट, जास्त जवळची होती. ती गेल्यापासून तर अधिकच उदास वाटू लागलं. दिवस कसा तरी कामात जाई. पण संध्याकाळी निराशा दाटून येई. एकटं वाटे, गच्चीत बसून रडणं हा एकच दु:खाला वाट मोकळी करून देण्याचा उपाय होता.

मंगेशचा मुळातच घरात राहण्याचा स्वभाव नव्हता. किंवा असं म्हणता येईल की घरच्या कारभारात लक्ष घालणं, मुलांबरोबर खेळणं, त्यांना फिरायला नेणं, काही वाचून दाखवणं, नुसतं गप्पा मारणं, हे त्याला शक्य होत नसे. घरात असताना आपल्या खोलीत पडून, कविता लिहीत, काही वाचत असे. किंवा चक्क झोपलेला असे. मुलं घराबाहेर गेल्यानंतरही त्याच्या ह्या कार्यक्रमात फरक पडला नाही. मी घरी एकटी आहे. याची आठवण नव्हती. कधी तरी युसिसमधे असताना, मधेच घरी फोन करायचा. माझी आठवण आली म्हणून. पण ते तेवढंच. घरी आल्यावर चिडणं आणि ओरडणं. हे काही फार मनावर घेण्यासारखं नव्हतं असं आता वाटतं. एकूण काय मी एकटेपणानं घेरली जात होते. अशी खूप वर्षं गेली.

परवा मी मंगेशला म्हणाले, "तू कॉलेजमधे असताना कविता लिहीत होतास. भारावून जाऊन माझ्याकडं बघत होतास. आणि मी पण वेडावून सगळी बंधनं झुगारून देऊन तुझ्यामागं उठून आले. त्या वेळी मी विचार केला नाही की तू शिक्षण सोडून दिलं आहेस. पैसे मिळवण्याचं दुसरं साधन तुझ्याजवळ नाही. आईवडील

मध्यमवर्गातले. धाकट्या तीन बहिणी–त्यांत दोन लग्नाच्या. त्या वेळी शिकत होत्या. केवळ तुझ्या प्रेमाच्या भरवशावर अवलंबून राहून मी आले. त्या काळी मी पदवीधर होते. पण त्याचा उपयोग या घरानं करून घेतला नाही. किती कष्टानं मी शिक्षण पूर्ण केलं होतं! आर्थिक, मानसिक, शारीरिक बळ व आधार नसताना पूर्ण केलेलं शिक्षण माझ्या संसारात अडचणीच्या वेळीसुद्धा कामाला येऊ शकलं नाही. याचं माझ्या मनाला अतोनात दु:ख होत असे. संसार अंगावर पडल्यामुळं तू शिकलास–नोकरी केलीस. त्यातच काव्यलेखन जोरात चालू होतंच. अजूनही त्यात खंड पडलेला नाही. मला तेव्हा जर हे आधी कळलं असतं की तू आयुष्यभर कविताच लिहिणार आहेस. स्वत: खोलीत बंद करून घेणार आहेस. तर मला वाटतं, मी तुला लग्नाला होकार दिला नसता.''

तेव्हा तो म्हणाला की ''हो. ते वय लहान होतं.''

प्रियाराधन चालू असताना स्त्री ही केवळ एक प्रेयसी असते. त्या वेळी तिच्याकडून फारशा अपेक्षा केल्या जात नाहीत. उलट तिला खूष ठेवण्यासाठी प्रेम आणि सहानुभूती यांचा वर्षाव केला जातो. ज्या दिवशी ती कायदेशीर लग्न होऊन घरात येते, त्या एका क्षणात ती प्रेयसीची पत्नी होते. आणि दुसऱ्या दिवशी सकाळपासून तिच्यावर हक्क सांगितला जातो. त्या घरात चौकटीत घट्ट बसेल असं तिचं वागणं असावं लागतं. सर्वांचं समाधान होईल, सर्वांचा आदर राखला जाईल, नवऱ्याला सतत खूष ठेवलं जाईल, आणि प्रत्येक बारीकसारीक गोष्ट त्याच्या संमतीनं केली जाईल अशी मोठी अपेक्षा केली जाते. तसं न घडल्यास तिला समजावणी दिली जाते. हा एका रात्रीत झालेला बदल पेलवणं मनाला फार, भारी पडतं. विशेषत: तो जर आंतरधर्मीय विवाह असेल तर फारच मन मारून राहावं लागतं. आणि वाटतं, अरे, आपण आपलं सगळंच स्वातंत्र्य घालवून बसलो आहोत. पूर्वीच्या अशिक्षित स्त्रियांची तुलना पन्नास वर्षांपूर्वी पदवीधर झालेल्या स्त्रीशी कशी करता येईल? शिकलेल्या मुलींना आपल्या शिक्षणाची, कर्तृत्वाची व स्वातंत्र्याची पूर्ण कल्पना आलेली होती. अशा वेळी गमावलेल्या स्वातंत्र्याचं दु:ख जन्मभराचंच दु:ख होऊन बसतं. उलट बायको शिकलेली आहे म्हणून, घरातली सर्व पडतील ती कामं करून (नोकरी सोडून) बाहेरची सर्व कामं तिच्यावर टाकून नवरा पूर्णपणं स्वत:ला मोकळा करून घेऊ शकतो.

संसार दोघांचा आहे हे विसरून चार पैसे खर्चायला दिले की आपलं कर्तव्य संपलं, असंही अजून कितीतरी पुरुषांना वाटतं. घराबाहेर पडून केलेल्या नोकरीची पैशांच्या रूपानं किंमत मिळते. पण घरात राहून रात्रंदिवस मरमर केलेल्या कामाची, कमी पैशांत सर्व कुटुंबाला पोटभर जेवू घालताना केलेल्या कष्टांची व मानसिक ओढाताणीची किंमत तर मिळत नाहीच. पण अवहेलना पदरात पडते. कारण ते काम कमी प्रतिष्ठेचं समजलं जातं. हा केवढा मोठा अन्याय समाजानं स्त्रीवर केलेला आहे.

त्याच्या कवितेत, गाण्यात, कुठं सूचक जरी माझा उल्लेख आला तर तेव्हा मला आनंद वाटायचा. पण लगेच निसर्गातला दृष्टान्त पुढं आला की मी त्याला म्हणायची, "लगेच निसर्गाकडं का जातोस? फक्त माझ्यावरच पूर्ण कविता लिही ना." तो म्हणायचा, " मला तसं करता येणार नाही. हीच माझी स्टाइल आहे." मला खूप वाईट वाटायचं. गाण्यांच्या बाबतीतही तसंच झालं. 'असा बेभान हा वारा', 'कशी येऊ, कशी येऊ?' किंवा 'जेव्हा तुझ्या बटांना उधळी मुजोर वारा', 'लाख चुका असतिल केल्या, केली पण प्रीती...' वगैरे किती तरी गाणी कशी तयार झाली हे फक्त मलाच ठाऊक आहे. अशा वेळी आनंदाचे, तृप्तीचे पुष्कळ प्रसंग येत असत. तेव्हा त्यानं लिहिलेली प्रत्येक कविता असो, गाणं असो, तो मलाच वाचून दाखवत असे. माझं मत विचारत असे. आणि मगच फेअर करत असे. असं खूप वर्षं चालू होतं.

पुढं पुढं संसार वाढत चालला. अडचणी, पैशांची तंगी मनाला खच्ची करायला लागली. काळजीनं मन अस्वस्थ होऊ लागलं. त्यामुळं शरीराच्या, विशेषत: पोटाच्या तक्रारी सुरू झाल्या. घरातून लक्ष उडून कविता जास्त सामाजिक, राजकीय, उपरोधिक किंवा विनोदी अशा होऊ लागल्या.

तेव्हा मात्र मी गडबडले. आणि नकळत आम्हा दोघांची दोन वेगवेगळी विश्वं होताहेत हे माझ्या लक्षात येऊ लागलं. मी कसल्यातरी काळजीत आहे. शरीरात वेदना आहे. हातानं काम करत आहे. अशा वेळी तो कविता वाचून दाखवायला आला की मी माझा मूड सोडून मी त्याच्या मूडमधे जाऊ शकत नव्हते. माझ्या मनात द्वंद्व चालू होई. हा जे काही लिहितोय ते माझ्या काळज्यांशी, माझ्या स्वाथ्याशी, माझ्या मुलांच्या गरजांशी, सुसंगत नाही. त्या माझी आर्थिक गरज भागवू शकत नाहीत. मला–म्हणजे माझ्या संसाराला त्यांतून काहीच मिळत नाही. मला गरज आहे अधिक सहवासाची, अधिक संभाषणाची, थोड्या अधिक पैशांची, प्रेमाची, थोड्या सहानुभूतीची आणि थोड्या आपलेपणाची. कवितेतल्या काल्पनिक गोष्टी माझा संसार सोपा करणार नव्हत्या. त्यात मन रमेनासं झालं. रसिकांना हे मान्य होईलच असं नाही. किंबहुना होणारही नाही–कलावंताची कला दैनंदिन व्यावहारिक गोष्टींतून व्यक्त होत नाही. ती अभिव्यक्त होत असते त्याच्या मनात चाललेल्या आंदोलनांतून. तो आपली निर्मिती करत असताना त्याचं मन वेगळ्याच जगात जाऊन पोचलेलं असतं हे मी अर्थात जाणू शकते.

पण एवढ्या जाणिवेनं माझी व्यक्तिगत सोडवणूक होऊ शकत नाही.

अशा वेळी मी मंगेशला म्हणत असे, "थांब जरा. मग ऐकते कविता." त्याचा त्याला राग येई. त्याच्या आवेगाला तेव्हाच वाट मोकळी व्हायला हवी असे. त्याच सुमारास श्री० पु० भागवत सायनला राहायला आले. त्यांची मैत्री होतीच–ती वाढत गेली. आणि अलिप्तपणं कविता ऐकण्याचं काम श्री० पु० भागवत करू लागले. त्याच्या कवितेवर त्यांची अनुभवी मार्मिक, प्रतिक्रिया देऊ लागले. आणि मंगेशला

वडिलकीच्या नात्यानं कवितेबद्दल सल्ला देणारा, प्रेमानं चुका दाखवणारा, आणि न कंटाळता त्याचं म्हणणं चिवटपणं ऐकून घेणारा गुरू मिळाला. आता तर प्रकाशकही तेच आहेत. हा तर दुग्धशर्करायोग घडून आला आहे. की मणिकांचनयोग? काहीही म्हणा.

मी बाजूला पडलेच होते. ती दरी रुंदावत गेली. तरी पण आधी म्हटल्याप्रमाणं संसार समृद्ध व संपन्न होत गेला. मंगेशला यशाचं शिखर गाठता आलं. आर्थिक दृष्ट्या परिस्थिती चांगली सुधारत गेली. आणि सुखी संसाराचं परिपूर्ण चित्र तयार झालं हे खरं आहे.

मी मनाजोगा जोडीदार निवडला. तरी जोडीदार मात्र वृत्ति-प्रवृत्तीनं जगावेगळा. अशा व्यक्तीशी समरस होत असताना जे वाट्याला आलं ते आपलं म्हणत, स्वीकारत यावं लागलं. त्या वाटचालीत स्वत:विषयीचं भान हळूहळू अधिक जागं होत गेलं.

मी कशी जगत आले याविषयी मोकळेपणानं–अलिप्तपणानं लिहावं एवढीच या लिहिण्यामागची ऊर्मी होती.

अभिप्राय

सुधीर रसाळ

हेतुगर्भ, समतोल कलाकृती

दि. २ मे २००३

यशोदा पाडगावकर यांना,

सप्रेम नमस्कार.

मी हे पत्र 'कुणास्तव कुणीतरी' या तुमच्या आत्मचरित्रासंबंधी लिहीत आहे. खरं म्हणजे तुमचं हे पुस्तक प्रकाशित होऊन ३ वर्षं झाली आहेत. तेव्हा त्यावर आज इतक्या उशिरा प्रतिक्रिया देण्यात काहीच मतलब नाही. परंतु तरीही मला या पुस्तकाबद्दल सांगावंसं वाटलं म्हणून, उशिरा का होईना, लिहीत आहे. मला हे पुस्तक केवळ आठ दिवसांपूर्वी मिळालं. औरंगाबादला पुस्तकं तात्काळ उपलब्ध होत नाहीत. शेवटी इथल्या 'राजहंस प्रकाशना'च्या प्रतिनिधीला सांगून ते मागवून घेतलं. हाती आल्यावर मी ते एका बैठकीत वाचून संपवलं आणि आज मी त्यासंबंधी आपणांस लिहीत आहे.

मला तुमचं हे आत्मचरित्र खूप आवडलं. मराठीतील उत्तम आत्मचरित्रांत ह्या पुस्तकानं आणखी एका आत्मचरित्राची भर पडली.

अतिशय प्रसिद्ध आणि लोकप्रिय असलेल्या व्यक्तीच्या पत्नीनं लिहिलेलं आत्मचरित्र कोणत्या परिप्रेक्ष्यात वाचावं, याबद्दल वाचकाचा नेहमीच गोंधळ होतो. ही लेखिका तुलनेनं अपरिचित असते. तिच्या पतीची जनमानसात एक अनुकूल, आदरणीय, श्रद्धेय अशी प्रतिमा उमटलेली असते. वाचकाला आत्मचरित्र-लेखिकेच्या या प्रसिद्ध पतीबद्दल खूप कुतूहल असतं. ही लोकप्रिय व्यक्ती जाणून घ्यावी, तिच्या खाजगी जीवनाबद्दल वाटणारं कुतूहल शमवावं, या इराद्यानं वाचक असं आत्मचरित्र वाचू लागतो. मुळात एका व्यक्तीच्या असलेल्या या आत्मचरित्राला तो लेखक-कवीचं 'चरित्र' म्हणून सामोरा जातो. त्याच्या मनात या प्रसिद्ध व्यक्तीच्या उमटलेल्या प्रतिमेशी तो या आत्मचरित्रात उमटलेल्या प्रतिमेची तुलना करतो. या आत्मचरित्रामुळे जर त्याच्या मनातल्या प्रतिमेची समृद्धी वाढली, तर त्याला हे आत्मचरित्र, लेखकाचं चरित्र म्हणून प्रिय होतं आणि जर ही प्रतिमा भग्न पावली, तर ते त्याला अप्रिय होतं. आपल्या आवडत्या लेखकावर लेखिकेनं अन्याय केल्याची त्याची भावना होते. असं लेखन एका (अनामिक) व्यक्तीचं आत्मचरित्र म्हणून केवळ वाचलं जाणं, त्याला न्याय देणारं जरी असलं, तरी फार अवघड असतं. 'कुणास्तव कुणीतरी' हे आत्मचरित्र वाचण्यापूर्वीच, ते 'यशोदा पाडगावकर यांचं आत्मचरित्र' म्हणून वाचायचं, असा निर्णय मी घेतला होता.

आत्मचरित्र हा असा लेखनप्रकार आहे की, त्याचं चांगलेपण त्याच्या कलात्मकतेवर अवलंबून नसतं. 'प्रांजळपणे सांगितलेली स्वत:ची कहाणी' हे तिचं रूप आत्मचरित्राला

मोल देण्यासाठी पुरेसं असतं. आत्मचरित्र हा मुळात व्यक्तीनं सांगितलेला आपला इतिहास असतो. इतिहासाचं चांगलेपण ज्या कसोट्यांवर ठरतं, त्याच कसोट्यांवर आत्मचरित्राचंही मूल्य ठरत असतं. अशा आत्मचरित्रात कथन नेमकं आणि साधं, सरळ असलं, त्यात शैलीची वैशिष्ट्यं नसली, तरी 'इतिहास' म्हणून त्याचं मोल कमी होत नाही.

काही आत्मचरित्रं केवळ 'इतिहास' नसतात. स्वत:च्या जीवनाचा आकार शोधण्याच्या किंवा स्वत:च्या जीवनाची अर्थपूर्णता शोधण्याच्या प्रेरणेतून ती लिहिली जातात. हा आकार सिध्द करणाऱ्या किंवा ही अर्थपूर्णता प्रकट करणाऱ्या घटना-प्रसंगांनाच अशा आत्मचरित्रात स्थान असतं. आपल्या समग्र जीवनातील अशा घटना-प्रसंगांची, व्यक्तींची निवड करून त्यांची एक संघटना लेखक बांधतो. ही संघटना म्हणजे आत्मचरित्रकाराच्या जीवनाचा आकार किंवा ही संघटना म्हणजे त्यानं आपल्या जीवनाची प्रकट केलेली अर्थपूर्णता. स्वत:च्या जीवनाची अर्थपूर्णता शोधताना तो अनेक जाणिवांचा पट विणीत असतो. या जाणिवा विवक्षित भाववृत्तीनं भारावलेल्या असतात. या भाववृत्ती कथनाची शब्दकळा निश्चित करतात. कथनातील प्रतिमा-प्रतीकं घडवतात. अशा आत्मचरित्रात लेखक जीवनाच्या विशिष्ट बिंदूवर उभा असतो. तेथून तो आपल्या पूर्वायुष्याकडे पाहत असतो. हा बिंदू म्हणजे लेखनकाळातील त्याचं वर्तमान. त्याचं हे वर्तमान त्याच्या समग्र भूतकाळाचा परिपाक असतं. ह्या वर्तमानात तो अनुभवीत असलेल्या भावना, ताणतणाव, त्यातले स्थायी भाव यांच्या संदर्भात तो आपल्या भूतकाळाची अर्थपूर्णता शोधीत असतो. या वर्तमानात स्थिर बनलेल्या त्याच्या भाववृत्तीची छाया त्याच्या भूतकाळावर पडत असते. त्याची ही स्थिरावलेली भाववृत्ती त्याच्या कथनाला प्रारंभापासून अखेरपर्यंत एक भावनिक सूर देते. भूतकाळातील घटना-प्रसंगांशी संलग्न असलेल्या विवक्षित भाववृत्ती आणि वर्तमानातील स्थिर भावनिक सूर अशी दुहेरी भावनिकता त्याच्या कथनाला लाभत असते.

तुमचं हे आत्मचरित्र या दुसऱ्या जातीचं, ज्याला कलाकृती म्हणता येईल त्या जातीचं आहे. या आत्मचरित्राचं कथन खूपच अर्थपूर्ण, हेतुगर्भ बनलं आहे. आपल्या जीवनाची अर्थपूर्णता साकार करण्याचा हेतू या कथनाला सहजपणे प्राप्त झाला आहे. उदाहरणार्थ, बालपणीच्या सासवडच्या आठवणींमध्ये जीवनाच्या रम्यतेचा आणि तरीही हे सारं गमावलं गेलं याचा दुहेरी सूर. असे दुहेरी सूर तुमच्या या कथनाची अर्थपूर्णता समृद्ध करतात. मंगेश पाडगावकरांशी लग्न करण्यासाठी तुम्ही आईचं घर सोडता आणि बोरकरांच्या घरी येता, तेथे पाडगावकरांची भेट होते, ह्या संपूर्ण प्रसंगाचं कथन विविध, बदलत्या भाववृत्तींनी अतिशय समृद्ध बनलं आहे.

कथा, कादंबरी, आत्मचरित्र या सर्व कथनपर वाङ्मयप्रकारांचं प्राणतत्त्व 'कथन' हेच असतं. पहिल्या, 'ऐतिहासिक आत्मचरित्र' या लेखनप्रकारात कथन नेमकं, वस्तुनिष्ठ, भावनिरपेक्ष, सरळ असं असतं. परंतु या दुसऱ्या 'ललित' आत्मचरित्रात ते अनेक संदर्भसूचक, व्यंजक, भावगर्भ आणि भावसमृद्ध असं असतं. तुमच्या या

आत्मचरित्रातील कथनात ही वैशिष्ट्यं उतरलेली आहेत, असं मला वाटतं.

या आत्मचरित्रात तुम्ही मंगेश पाडगावकरांत आणि तुमच्यात झालेला पत्रव्यवहार सुरुवातीला दिलेला आहे. सकृद्दर्शनी तो देणं अनावश्यक वाटतं. परंतु या आत्मचरित्राच्या एकूण मांडणीचा जर विचार केला, तर हा पत्रव्यवहार देऊन तुम्ही या आत्मचरित्राची अर्थपूर्णता समृद्ध केली असल्याचं लक्षात येतं. विवाहपूर्व काळातील तुमचा पत्रव्यवहार तुम्हां दोघांची एक प्रतिमा उभी करतो. विवाहानंतर तुम्हां दोघांच्या वाट्याला आलेल्या सहजीवनात हळूहळू या पूर्वप्रस्थापित प्रतिमांचा व्यत्यास प्रकट व्हायला लागतो आणि शेवटी जीवनाच्या वैफल्याचा, हाती काहीच न लागल्याचा शोकपूर्ण प्रत्यय हे आत्मचरित्र देतं. याचा अर्थ असा की, तुम्हांला या आत्मचरित्रातून तुमच्या व मंगेश पाडगावकरांच्या सहजीवनाची कहाणी सांगायची आहे. ही कहाणी तुम्हां दोघांमधील विवाहपूर्व पत्रसंवाद आणि विवाहोत्तर सहजीवन या दोन भिन्न टप्प्यांनी घडली आहे. या दोन टप्प्यांवर जे घडतं, त्यांत अनेक परस्परसंवादी घटक आहेत, हे खरं; परंतु त्यांतील परस्परविरोधी, परस्परव्यत्यासी घटक अतिशय प्रभावी आहेत. ह्या दुसऱ्या प्रकारच्या घटकांमुळे तुमच्या (आणि पाडगावकरांच्याही) मनाला, व्यक्तिमत्त्वाला एक आकार आला आहे. 'वैफल्य' हा या आकाराचा केंद्रबिंदू आहे. कवी म्हणून मंगेश पाडगावकरांना यश मिळत गेलं, लोकप्रियता मिळत गेली. हे घडत असताना तुम्हां दोघांमधील सहसंवेदन आणि भावनिक पातळीवरचं सहजीवन संपुष्टात येत असल्याची आणि केवळ एकत्र राहणंच शिल्लक राहत असल्याची वैफल्याची जाणीवही घट्ट होत गेली, याचा एक उत्कट प्रत्यय हे आत्मचरित्र देतं.

तुमच्या या आत्मचरित्रात तुम्ही तुमच्या आणि पाडगावकरांच्या सहजीवनाचं डोळस, धीट आणि प्रांजळ असं चित्र रेखाटलं आहे. भारतीय, विशेषत: हिंदू कुटुंबव्यवस्था, तिच्यात एकूण स्त्रीचं आणि प्रामुख्यानं कुटुंबचालक गृहिणीचं स्थान, तिच्या मातृभावनेला आणि पतिप्रेमाला प्राप्त होणारी सुखद-दु:खद रूपं, तिच्या कौटुंबिक-सामाजिक कर्तव्यांचे आणि तिच्या नैसर्गिक हक्कांचे त्याबरोबरच तिच्या निर्णयाच्या आणि निवडीच्या स्वातंत्र्याचे प्रश्न, तिची स्वत्व-जपणुकीची गरज आणि स्वत्च-विलोपनाची तिच्याकडे होत राहणारी मागणी, या व अशा अनेक प्रश्नांसंबंधींचं तीव्र भान हे आत्मचरित्र वाचकाच्या मनात जागृत करतं. पण त्याशिवाय हिंदू आणि ख्रिस्ती समाजांतील व्यक्तींची मानसिकता, एकमेकांकडे पाहण्याचे त्यांचे दृष्टिकोन, त्यांच्यातील ताणतणाव यांचंही एक दर्शन हे आत्मचरित्र घडवतं.

परंतु याचा अर्थ भारतीय समाजजीवनाचं चित्रण हे या आत्मचरित्राचं सूत्र आहे, असा मात्र नाही. ते मुख्यत्वेकरून 'यशोदा' नामक एका विशिष्ट स्त्रीचं 'मंगेश पाडगावकर' नामक एका विशिष्ट कवीबरोबरच्या तिच्या सहजीवनाचं हे 'चरित्र' आहे. या गोष्टीचं तुम्ही वाचकाला क्षणभरही विस्मरण होऊ दिलं नाही, हे तुमचं फार मोठं यश आहे. दोन व्यक्तींच्या विवक्षित सहजीवनाची ही कहाणी आपल्याबरोबर अनेक सामाजिक आणि व्यक्तिजीवनविषयक प्रश्न घेऊन येते. या आत्मचरित्रात येणारे हे

प्रश्न जसे सामान्य, सार्वत्रिक स्वरूपाचे आहेत, तसेच ते दोघांच्या सहजीवनाचे अतूट असे भागही आहेत. दोन व्यक्तींचं सहजीवन आणि त्यातून उगवणारे अनेक सामाजिक, जीवनविषयक प्रश्न यांची अभिव्यक्ती करताना उचित असा तोल तुम्ही साधला आहे.

प्रत्येक आत्मचरित्र हे प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे आत्मसमर्थन करणारं असतंच. प्रश्न हे आत्मसमर्थन आत्मचरित्रातील घटना आणि व्यक्ती यांच्याशी सुसंगत आहे काय? त्यातून ते अपरिहार्यपणे निष्पन्न होतं काय? हा असतो. अनेक वेळा आत्मचरित्रकाराचं वर्तन, त्याचं परिस्थितीचं आकलन आणि त्यानं घेतलेले निर्णय चुकीचे असतात. या चुका त्यानं कधी अभावितपणे, तर कधी हेतुपुरस्सर केलेल्या असतात. परंतु त्याला या चुकांची उचिततेपेक्षा कितीतरी अधिक किंमत मोजावी लागते. आपण जे केलं, ते चुकीचं होतं, याचं प्रांजळ कथनही त्याच्या आत्मचरित्रात येतं; पण त्याचं अतिशय कटू, विनाशक असं फळ आपल्याला मिळालं, हा एका परीनं आपल्यावर अन्याय झाला, असंही त्याला प्रांजळपणे वाटत असतं. असं जर त्याला वाटत नसेल, तर त्याचं दु:ख अपरिहार्य ठरणारच नाही. त्याचं अपरिहार्यत्व तो प्रकट करू शकणार नाही आणि अपरिहार्य न ठरणारं दु:ख वाचकावर कोणताच संस्कार करणार नाही. अशा प्रकारे अपरिहार्य बनणाऱ्या दु:खाला आत्मसमर्थनाचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष पदर लाभलेला असतोच. तुमच्या या आत्मचरित्रात चांगल्या अर्थानं आत्मसमर्थन आहे.

आत्मचरित्रात आलेला आत्मचरित्रकाराचा दृष्टिकोन, त्यानं आपल्या जीवनात आलेल्या व्यक्तीची केलेली आकलनं यांना वस्तुनिष्ठतेची कसोटी लावून त्यांचा खरेपणा तपासणं अयोग्य असतं. विशिष्ट परिस्थितीनं घडवलेल्या, काही विशिष्ट गुणधर्म निसर्गत:च घेऊन आलेल्या, विशिष्ट प्रकारचं जीवन जगणाऱ्या व्यक्तीला या सर्वांच्या परिणामातून विशिष्ट दृष्टिकोन प्राप्त होत असतो. या दृष्टिकोनातून तो भोवतालच्या परिस्थितीचं, त्याच्या जीवनात आलेल्या व्यक्तींचं आकलन-अर्थन करीत असतो. त्यानं केलेलं हे आकलन-अर्थन हे त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा भागच असतं. व्यक्तीच्या जीवनात विशिष्ट स्थलकालाच्या परिमाणात जे प्रत्यक्ष घडलेलं असतं, ज्याला आपण 'तथ्य' म्हणतो, तेवढ्यालाच सत्याची कसोटी लावता येते. प्रत्येक आत्मचरित्र अशा तथ्यांबद्दल प्रामाणिक असावं लागतं. अशा तथ्यांचं त्याचं आकलन हे त्याच्या व्यक्तिमत्त्वाचं प्रक्षेपण असतं. या आत्मचरित्रात मंगेश पाडगावकरांसह अनेक व्यक्तींची जी आकलनं आहेत, ती 'यशोदा' नामक एका विशिष्ट व्यक्तीची आकलनं आहेत. या व्यक्तींच्या संबंधात जी तथ्यं असतात, त्यांच्याशी ही आकलनं-अर्थनं सुसंगत हवी, एवढी अपेक्षा मात्र करावीच लागते. या तथ्यांशी सुसंगत ठरतील, अशी भिन्न आकलनं-अर्थनं संभवू शकतात. हे लिहिण्याचं कारण असं की, मंगेश पाडगावकर नामक एका सुप्रसिद्ध आणि लोकप्रिय कवीबद्दलच्या तुमच्या आकलन-अर्थनाचा स्वीकार मराठी वाचक चुकीच्या दिशेनं करताना आढळतो. आत्मचरित्र कसं वाचावं, हे अनेकांना कळालेलं नसतं. त्यामुळे अनेकदा आत्मचरित्रकारावर गैरलागू टीका (आणि त्याची गैरलागू स्तुतीही) केली जाते. सुनीताबाई देशपांडे यांच्या आत्मचरित्रावर झालेली अशी टीका

मला आठवते.

हे पत्र खूपच लांबलं. तुमच्या आत्मचरित्राच्या निमित्तानं माझे विचार स्पष्ट करून घ्यावेत, हाही एक हेतू ह्या पत्रलेखनामागे होता. एक वाचक म्हणून आपली प्रतिक्रिया लेखकाला कळवावी, हा तर मुख्य हेतू होताच. मला तुमचं हे आत्मचरित्र आवडलं. मराठीतील आत्मचरित्रांत मोलाची भर या लेखनामुळे पडली आहे. तुमचं मी हार्दिक अभिनंदन करतो.

लेखक-कवीचं, त्यानं निर्मिलेलं जग आणि त्याच्या भोवतालचं प्रत्यक्ष वास्तव यांच्या नात्यासंबंधी अनेक प्रश्न तुमच्या आत्मचरित्रानं उभे केले आहेत. परंतु त्यासंबंधी लिहीत नाही. ह्या दीर्घ पत्र-वाचनाचा वैताग मी तुम्हांला दिलेलाच आहे, तो अजून वाढवणं इष्ट नाही.

कळावे,

आपला

सुधीर रसाळ
१००, श्रेयनगर, नवा उस्मानपुरा
औरंगाबाद ४३१००५. फोन २३३८१३४

राजहंस प्रकाशन
TM

राजहंस प्रकाशन
TM

राजहंस प्रकाशन
TM

राजहंस प्रकाशन
TM

राजहंस प्रकाशन
TM

राजहंस प्रकाशन
TM

राजहंस प्रकाशन
TM

राजहंस प्रकाशन
TM

राजहंसची निवडक चरित्रात्मक
आणि व्यक्तिचित्रात्मक पुस्तके

विल्यम शेक्सपिअर
के. रं. शिरवाडकर

तमाशा : विठाबाईच्या आयुष्याचा
योगिराज बागूल

शुभ्र काही जीवघेणे
अंबरीश मिश्र

कायदेआझम
आनंद हर्डीकर

भगीरथाचे वारस
वीणा गवाणकर

डॉ. खानखोजे
वीणा गवाणकर

हसरे दुःख
भा. द. खेर

मिर्झा ग़ालिब
वसंत पोतदार

देवगंधर्व
शैला दातार

कलावंत आणि विचारवंत
ज्ञानदा नाईक

मराठीत स्त्रियांच्या आत्मवृत्तांना एक समृद्ध परंपरा लाभलेली आहे. ही परंपरा उंचावणारे 'कुणास्तव कुणीतरी...' हे यशोदा पाडगावकर यांचे अविस्मरणीय आत्मवृत्त.

सासवडमध्ये यशोदाबाईंचे वडील ख्रिस्ती धर्माचे मिशनरी होते. तिथल्या बालपणच्या सुखाच्या काळापासून हे आत्मवृत्त सुरू होते. एकाएकी हे सुखाचे दिवस संपतात. वडिलांचा अकस्मात मृत्यू होतो. कुटुंबाच्या प्रपंचाचे तारू हेलकावे खाऊ लागते...नियतीच्या चढउतारातले अनुभव यशोदाबाईंचे संवेदनक्षम मन नोंदत राहते: नोकरी आणि मुलांचे संगोपन या उसाभरीत आईची होणारी त्रेधा, भावंडांचे व स्वत:चे शाळा-कॉलेजांतले शिक्षण, मित्रमैत्रिणी, शिक्षक, वाढणारे वय, तऱ्हातऱ्हांच्या दुष्ट-सुष्ट व्यक्ती त्यांच्या अभिलाषा आणि सदिच्छा...प्रतिभावंत कवी म्हणून पुढे ख्यातनाम झालेल्या मंगेश पाडगावकरांवर जडलेली प्रीती. लग्नासाठी घरी झालेला तीव्र विरोध आणि तो निर्धाराने दूर ठेवून लग्नात झालेली परिणती...एका धर्माच्या संस्कृतीतून दुसऱ्या धर्माच्या संस्कृतीत प्रवेश करत असताना आयुष्यभर करत राहावा लागलेला मानसिक संघर्ष...मिळालेले सन्मान आणि साहिलेल्या अवहेलना...

अर्धशतकाहूनही अधिक काळ अनुभवलेल्या विशाल जीवनकलहाचे रम्यभीषण रूप यशोदाबाई इथे संवेदनशीलतेने, सहजपणे चित्रित करतात. त्यांच्या जीवनाविषयीच्या अनावर उत्सुकतेची, रसिक आणि आनंदी वृत्तीची, स्वभावातल्या ऋजुतेची आणि सोशिकतेची साक्ष सतत मिळत राहते.

संसारातल्या सुखदु:खांच्या छायांच्या पलीकडे जाऊन त्या त्यांचे स्वरूप अलिप्तपणे पाहताना दिसतात...जीवनाचे निखळ रूपच त्यांना पाहायचे आहे हे जाणवते. हे रूप पाहत असताना, हरपत चाललेल्या श्रेयाचा झाकोळ त्यांच्या लेखनावर उतरत येतो.

'मी कशी जगत आले याविषयी मोकळेपणानं, अलिप्तपणानं लिहावं एवढीच या लिहिण्यामागची ऊर्मी होती' असे यशोदाबाईंनी मनोगतात म्हटले आहे. त्याचा निर्भर प्रत्यय इथे येतो.

राजहंस प्रकाशन। पुणे